दिग्विजयाचा क्रम व्हॅरसनें इ. स. ६ त पुढें चालविला. पण जर्मनांच्या राष्ट्रीय संस्था मोडून रोमन साम्राज्याच्या संस्थांचें जूं त्यांच्या मानेवर लादण्याचा प्रयत्न रोमन सत्ता दृढ करण्यासाठीं त्यानें केला तेव्हां सर्व जर्मन बंड करून उठले. या देशभक्तीनें प्रेरिलेल्या उठावणीचा चालक चेरुस्की टोळीचा मुख्य आर्मीनिअस हा होता. आर्मीनिअस यानें व्हॅरसचा पराभव करून इ. स. ९ मध्यें एका तडाक्यासरशीं त्याच्या पलटणींसह त्याला ठार मारून टाकिलें. एवढेंच नव्हे, तर तो इतक्या आवेशानें व झपाट्यानें पुढें चालून गेला कीं, रोमनांना त्याच्या पुढें मुळींच टिकाव धरवेना. जर्मनीच्या हद्दींतून रोमनांना त्यानें पार हांकून दिलें. आर्मिनिअसचा पराभव करून याचा सूड लौकरच जर्मेनिकसनें घेतला. इ. स १६ मध्यें त्यानें आपल्या पलटणी जर्मनींतून परत आणिल्या. यापुढें आपल्या सरहद्दीचें केवळ रक्षण करावयाचें असें धोरण रोमनांनीं स्वीकारिलें. होतां होइल तों टोळ्याटोळ्यांमध्यें भांडणें लावून द्यावयाचीं व त्यांना निःशक्त करावयाचें आणि प्रसंगच पडेल तेव्हां लष्करी सामर्थ्यानें त्यांना गप्प बसवावयाचें असें रोमनांनीं केलें व त्यांत त्यांना यशहि मिळालें. याप्रमाणें साधारणतः रोमनांचें बचावाचें धोरण होतें तरी या काळांत त्यांनीं फ्रिशिअन व बटाव्हिअन टोळ्यांवर आपलें वर्चस्व स्थापिलें ६९ त बटेव्हिअनांनीं जेव्हां बंड उभारिलें तेव्हां तें मोडतां मोडतां रोमनांच्या नाकीं नव आले. भयंकर रक्तपात झाला तेव्हांच तें शमलें. शंभर वर्षांनीं ही स्थिति पार पालटून गेली व जर्मनांचींच रोमनांना दहशत वाटूं

लागली. मार्कोमानी व स्वादी या टोळ्यांनीं रोमन साम्राज्यावर स्वाऱ्या केल्या तेव्हां त्यांना हद्दीबाहेर घालविण्यास रोमचा बादशहा ऑरेलिअस याला ८ वर्षे (१६६ ते १७४) लागलीं. तिसऱ्या शतकापासून एक एक टोळी न येतां त्यांचे मोठे मोठे संघ येऊन साम्राज्याला उपद्रव करूं लागले. या रानटी टोळ्यांनीं डॅन्यूब नदीच्या मध्यापासून तों ऱ्हाइन नदीच्या मुखापर्यंत साम्राज्याच्या सरहद्दीवर मोठा कहर उडवून दिला. शहरें व किल्ले यांवर जमन हल्ले करीत व रोमनांनीं बचावासाठीं सरहद्दीवर बांधिलेले तट पाडून टाकीत. जीमुळें शेवटीं रोमन साम्राज्याचा विनाश झाला त्या चळवळीला आरंभ ३७५ त झाला. हूण नांवाच्या रानटी लोकांची टोळधाड यूरपावर आली व त्यामुळें अनेक टोळ्यांना स्थानांतर करावें लागलें. रोमन हद्दीला लागून ज्या जर्मन टोळ्या होत्या त्यांच्यावर पलीकडील टोळ्यांचा दाब जसा जास्त जास्त बसूं लागला तशा त्या रोमन साम्राज्यांत घुसूं लागल्या त्यांचा अखंड लोंढा जसा सुरू झाला तसे रोमनांचे तट वगैरे पार ढासळून गेले. यानंतर फ्रांकांचें प्राबल्य होईपर्यंत जर्मनांचा इतिहास दुर्बोध आहे. त्यांत खरें किती व खोटें किती याविषयीं नक्की असें कांहीं सांगतां येत नाहीं. एक दोन गोष्टी मात्र निर्विवाद आहेत. हूणांच्या मागून स्लाव्ह लोक आले व त्यांनीं ज्या जर्मन टोळ्या स्थानांतर करून रोमच्या साम्राज्यांत निघून गेल्या होत्या त्यांचा प्रदेश व्यापून टाकिला, व जे टोळ्यांचे प्रबळ संघ स्वस्थानीं कायम राहिले त्यांत मुख्य मुख्य म्हणजे आले

मानी, थुरिंजिअन, सॉक्सन, बव्हेरिअन व फ्रान्क हे होत. फ्रांकांनींच पुढें फ्रान्स व जर्मनी हीं राज्यें स्थापिलीं. यामुळें त्यांच्याकडे इतिहासकार विशेष लक्ष पुरवितात.

रोमन साम्राज्याचा विनाश झाल्यावर जर्मनींत अनेक लहान मोठीं राज्यें स्थापिलीं गेलीं. प्रत्येकवर त्या त्या टोळीचा मुख्य राज्य करीत असे व त्यांच्या आपआपसांत एकसारख्या लढाया सुरू असत. या राज्यांमध्यें फ्रांकांचें राज्य सर्वांत महत्त्वाचें होय. फ्रांकांमध्यें दोन जाति होत्या. सालिअन फ्रांकांनीं ऱ्हाइन नदीच्या मुखाजवळ व रिपुआरिअन फ्रांकांनीं ऱ्हाइनच्या मध्यभागावर वसति केली होती. ४२७ पासून ४४७ पर्यंत सालिअन फ्रांकांच्या एका शाखेवर क्लॉडिअन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें व त्याच्यानंतर आलेल्या राजांनीं आपली सत्ता सबंध फ्रान्स व जर्मनी यांवर स्थापण्याचा उपक्रम केला. या घराण्यांतील क्लोव्हिस या राजानें आलामानी टोळीचा पराभव करून सालिअन व रिपुआरिअन फ्रांकांचें एकीकरण केलें. पण ५११ त तो मेला तेव्हां त्याच्या राज्याचे तुकडे पडले. असे तुकडे पडत जाऊनच शेवटीं फ्रान्स व जर्मनी हीं दोन अलग राष्ट्रें झालीं. क्लोव्हिसचा मुलगा थिउडेरिक यानें ५३१ त थुरिंजिआचा दक्षिणेकडचा भाग आपल्या राज्याला जोडला. थिउडेरिक नंतर त्याचा मुलगा थिऊडे बर्ट १ यानें आलेमानी, बव्हेरिअन व कांहीं साक्सन टोळ्यांवर आपलें स्वामित्व स्थापिलें. पण ५४८ त तो मरण पावला, तेव्हां फ्रांकांची जर्मनींतील सत्ता संपुष्टांत येत चाललो. बव्हेरिअन, थुरिंजिअन व साक्सन या जर्मन

टोळ्यांनीं पुनः स्वातंत्र्य मिळविलें तें ६८७ पर्यंत कायम राहिलें. पण त्या नंतर हेरिस्टालचा पिपिन व त्याचा मुलगा चार्ल्स मार्टेल यांनीं जर्मनांबरोबर झगडून आपल्या मध्यवर्ती सत्तेचें अंशतः पुनरुज्जीवन केलें. थुरिंजिआच्या ड्यूकला पदच्यूत करून व आलामानींना जिंकून दोन्ही प्रदेशांवर फ्रांक अधिकारी कारभार चालवूं लागले. बव्हेरिआवरहि याच सुमाराला फ्रांकांचा अंमल बसला. पण एकसारख्या चाललेल्या लढायांनीं देश उध्वस्त झाला तरी व कांहीं वेळ पर्यंत कांहीं टोळ्यांना खडणी द्यावी लागली तरी साक्सनांनीं आपली स्वतंत्रता कायम राखिली. ठेंगू पिपिनच्या कारकीर्दीत जर्मनांचीं बंडें पुष्कळ झालीं, पण त्यानें आपला भाऊ कार्लोमान याच्या मदतीनें बंडवाल्यांना दाबांत ठेविलें. ठेंगू पिपिननंतर ७७१ त त्याचा मुलगा शार्लमेन (थोर चार्ल्स) राज्यावर आला.

दोन्ही पिपिन व शार्लमेन यांच्या कारकीर्दीत बहुतेक जर्मन टोळ्यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला रोमनांशीं संबंध आल्यामुळें ऱ्हाइन नदीजवळील टोळ्यांत कोठेंकोठें ख्रिस्ती धर्माच्या तुरळक छटा दिसत, पण बहुतेक सर्व जर्मन अख्रिस्तीच होते. पण ७१७ मध्यें सेंट बॉनिफेसला पोपनें जर्मनीचा बिशप नेमिलें तेव्हांपासून ही धर्मांतराची चळवळ जोरांत सुरूं झाली. त्यानें केलेल्या बायबलच्या उपदेशानें बव्हेरिआ व थुरिंजिआ येथें पुष्कळ परिणाम झाला. बव्हेरिआंत, थुरिंजिआंत व इतरत्र त्यानें बिशपांची नवी प्रतिष्ठा किंवा जीर्णोद्धार केला ७५५ त तो धर्मासाठीं मारिला गेला. तेव्हां सॉक्सनांशिवाय बाकीच्या सर्वांनीं ख्रिस्ती धर्माचा अंगिकार केला.

होता. पूर्वीचा रानटी धर्म अगदीं पार नाहींसा झाला होता असें नाहीं. लोकांच्या धर्मविचारांवर व चालीरीतींवर जुन्या धर्माचा थोडासा पगडा अद्यापिहि दिसत होता परंतु ख्रिस्ती धर्म जोरावर होता व जमनांची सुधारणा करण्यास तो बराच उपयोगीं पडला

शार्लमेन हा महाप्रतापी राजा होऊन गेला. त्याच्या आजानें व बापानें फ्रांकांना वर्चस्व मिळवून दिले होतें व शार्लमेनला मोठें राज्य ठेविलें होतें. याच्या बलावर उत्तरेकडील सॉक्सनांना व आग्नेयी-कडील आव्हरांना शार्लमेननें आपल्या अंमलाखालीं आणिलें. अशा रीतींनें शार्लमेनचें जर्मनींतील राज्य आल्प्स पर्वतापासून उत्तरसमुद्रा-पर्यंत व व्हाइन नदीपासून हंगेरीपर्यंत पसरलें होतें. शार्लमेनच्या कारकीर्दीचें जर्मनीच्या इतिहासांत फार महत्त्व आहे. या वेळेपासून एकराष्ट्रीयतेला, सुव्यवस्थेला व धर्मसुधारणेला खरोखर प्रारंभ झाला. सर्व जर्मन टोळ्या आतां एका राज्यछत्रा-खालीं आल्या. युद्ध, राज्यसंस्था, कायदा, धर्म सर्वच दिशांनीं एकराष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ होत गेली. फ्रांकांची राज्यपद्धति सार्वत्रिक झाल्यामुळें व फ्रँक अधिकारी राज्यकारभार चालवीत असल्यामुळें टोळ्यांत आपलेपणा आला व ख्रिस्ती धर्माचाहि परिणाम अशाच प्रकारचा झाला. शार्लमेंननें पाद्र्यांना जहागिरींची व विशेष हक्कांची खैरात वाटून व शेंकडों मठ व शाळा स्थापून, ख्रिस्ती धर्माचा प्रसार फार झपाट्यानें घडवून आणिला. देशभर शांतता नांदावी व राज्यकारभार सुयंत्र चालावा अशाविषयींहि त्यानें

व्यवस्था केली. त्यानें स्लाव्ह टोळ्यांशीं निकाराचें युद्ध केल्यामुळें त्यांना फ्रांकांची चांगली दशहत बसून ते गडबड करीनासे झाले. साम्राज्याच्या पूर्वसरहद्दीवर ठिकठिकाणीं लष्करी ठाणीं बसवून सरहद्दी जवळच्या प्रांतांतील लोकांना देखील आपण सुरक्षित आहों असें त्यानें वाटावयास लाविलें. पूर्वी टोळ्यांचे डयूक म्हणून जे मुख्य नायक असत ते शार्लमेननें काढून टाकिले व त्यांच्या संस्थानांचे लहान लहान जिल्हे किंवा भाग करून त्यांवर कौंट नांवाचे अधिकारी नेमिले व त्यांनीं स्वतंत्र न व्हावें अशासाठीं मधून मधून मिसी-डॉमिनिसो नांवाचे अधिकारी पाठविण्याची पद्धति त्यानें पाडिली. पण शार्लमेनच्या साम्राज्याचे कांहीं अनिष्ट परिणाम घडून आले. जर्मनांच्या प्राचीन कालापासून चालत आलेल्या जनसभा जशा मोडल्या तशी टोळ्यांतील स्वतंत्रतेची लालसा मावळली लष्करांत नोकरी करावी लागल्यानें लोकांचें वैयक्तिक स्वातंत्र्य कमी झालें. धर्माधिकाऱ्यांशीं संगनमत केल्यानें धार्मिक व राजकीय सत्ताधाऱ्यांतील बिघाडाचें बीज पेरिलें गेलें.

८०० मध्यें पोपलिओ ३ नें शार्लमेनला बादशहा म्हणून राज्याभिषेक केला, म्हणून शार्लमेनचें राज्य हें 'रोमन धर्मराज्य' म्हणून प्रसिद्धीस आलें. शार्लमेनच्या वंशांतील बादशहांनीं व राजांनीं सुमारें एक हजार वर्षें जर्मनीवर राज्य केलें. पण या अफाट मुलुखावर व्यवस्थित राज्य चालविण्याचें सामर्थ्य शार्लमेन शिवाय दुसऱ्या कोणाच्याहि अंगीं दिसून आलें नाहीं.

शार्लमेनचा मुलगा 'धर्मात्मा' लुई यानें राज्याचे चार विभाग करून ते आपल्या चार मुलांना दिले. राजघराण्यांत पुढें जी यादवी माजली तिचा परिणाम असा झाला कीं, जर्मनी गॉलपासून व हे दोन्ही देश बर्गंडी व इटलीपासून फुटले. ८४३ त व्हर्द्यूंचा तह होऊन कांहीं जर्मन प्रांत शार्लमेनचा नातू 'जर्मन' लुई याच्या वांटणीला आले व तो जर्मनीचा राजा झाला. ८८४ मध्यें 'लठ्ठ' चार्ल्सच्या अंमलाखालीं बर्गंडी खेरीजकरून शार्लमेनच्या साम्राज्यांतील सर्व प्रांत एक झाले पण ही एकी फार दिवस टिकली नाहीं. ८८७ त त्याला पदच्युत करून आर्नल्फनें जर्मनीचें राज्य बळकाविलें. तेव्हां पश्चिमेचें फ्रांक राज्य (म्हणजे फ्रान्स) व पूर्वेचें फ्रांक राज्य (म्हणजे जर्मनी) अशीं दोन निरनिराळीं राज्यें झालीं. आर्नल्फनें ८९१ त नार्समेनचे हल्ले परतवून लाविले, पण यानंतर हंगेरिअनांच्या स्वाऱ्या आल्या. शार्लमेनच्या घराण्यांतील शेवटचा राजा 'बाळ' लुई हा अल्पवयी होता. त्याच्या कमकुवत कारकीर्दीचा शेवट त्याच्या अठराव्या वर्षीं ९११ त झाला.

या सुमाराला राजसत्ता जवळजवळ नाहींशी झाली होती. सरंजामी पद्धतीमुळें ठिकठिकाणीं ड्यूकांची सत्ता फार प्रबळ झाली, व त्यांना आर्च बिशप, बिशप, अॅबॉट इत्यादि धर्माधिकाऱ्यांचें साहाय्य मिळालें. यांचें डायेट (राष्ट्रीय सभा) मध्यें मताधिक्य असे व त्यांनीं आपला राजा आपण निवडावयाचा प्रचार सुरूं केला. यांच्याकडून निवड झाल्यावर पोपनें त्याला राज्याभिषेक करावा लागत

20 APR 1990

असे व मगच तो अधिकारारूढ होई. यावेळीं जर्मनींत फ्रॉंक, साक्सन, बव्हेरिअन, स्वाबिअन व लोरेनर अशीं पांच लहान लहान राष्ट्रें होतीं. जेते व राज्यसंस्थापक म्हणून फ्रांकांचा वर्चष्मा असे. यामुळेंच कार्लोव्हिजिअन घराण्याचा शेवट झाल्यावर संस्थानिक मतदारांनीं फ्रांकांचा डयूक कॉन्राद याला राजा निवडिलें. त्यानें ९११ पासून ९१८ पर्यंत राज्य केलें, पण त्याला आपला अधिकार नीट चालवितां आला नाहीं. म्हणून त्यानें आपण होऊनच आपला प्रतिस्पर्धी जो साक्सनीचा डयूक हेन्री त्याला आपल्या मागें राजा निवडण्याबद्दल संस्थानिकांचें मन वळविलें. हेन्री १ (९१९ ते ९३६) हा मोठा कर्तबगार राजा निघाला. त्याला लोकांवर छाप सहज पाडतां येई व त्याचे हुकूम न पाळण्याचें धैर्य कोणालाहि होत नसे. तो मोठा वीर होता व मोठा राजकारणी पुरुषहि होता. त्यानें नवी मुलकी व लष्करी संघटना घडविली. प्रत्येक दहा नागरिकांपैकीं एकाला वेठीला धरून त्यानें नवीं शहरें बांधविलीं. न्यायदान, समारंभ व उत्सव, जत्रा, व्यापार या सर्वांसाठीं शहरांचा त्यानें उपयोग करून घेतला. हंगेरींतील माजिअर त्याप्रमाणेंच डेन व स्लाव्ह यांची सत्ता त्यानें मोडून काढिली. त्याच्या कारकीर्दींत खासगी लढाया बंद झाल्या. त्याचा मुलगा थोर ऑटो यानें आपल्या बापाची उज्वल परंपरा पुढें चालवून राजसत्ता दृढ केली. सर्व डयूकांना त्यानें शरण यावयास लाविलें. कांहीं संस्थानें खालसा करून कांहींतील डयूकच्या पदावर त्यानें आपले नातेवाईक नेमिले. ९५१ लो लॉंबर्ड राज्याची व्यवस्था लावण्यासाठीं इटलींत गेला, पण इतक्यांत जर्मनींत उभारलेलें बंड

मोडण्यासाठीं त्याला परत यावें लागलें. यावेळीं माजिअरांची स्वारी आल्यामुळें बंडवाल्यांनीं बंड थांबविलें व परशत्रूशीं झगडण्याची तयारी केली. ९५५ त माजिअरांजा पुरा मोड झाला. आटोनें एल्ब आणि साल नद्यांच्या पलीकडे आपल्या राज्याच्या सीमा नेल्या व लांबर्डी खालसा करून इटलींतहि पाय शिरकविला. पोपनें त्याला ९६२ त बादशहा म्हणून राज्याभिषेक केला. येथून पुढें जर्मन राजांनीं बादशाहीवर व लांबर्डीच्या राज्यावर आपला हक्क सांगण्यास सुरुवात केली. इटलीशीं संबंध आल्यानें बादशहाचा विशेष फायदा झाला असें नाहीं. त्यांना पुष्कळ वेळां आपला देश सोडून इटालींत जावें लागे व त्यामुळें आपल्या देशाचें हित त्यांना नीट साधतां येत नसे. जर्मनांची राष्ट्रीय भावना आटोच्या कारकीर्दीत वाढली; परंतु त्या बरोबरच मध्यवर्ती सत्ता निःसत्त्व होत जाऊन संस्थानिकांचें व धर्माधिकाऱ्यांचें प्राबल्य वाढलें. त्याच्या मृत्यूनंतर ज्या अंतःस्थ लढाया एकसारख्या सुरू झाल्या त्यांच्या योगानें हें प्राबल्य जास्तच होत गेलें. शेवटीं याला आळा, फ्रँकोनिअन घराण्याचा पहिला बादशहा कॉन्राद २ (१०२४ ते १०३०) यानें घातला. त्यानें मोठमोठ्या सरदारांच्या हाताखालील छोटेखानी सरदारांना जवळ केलें व शहरांशीं सख्य केलें. कॉन्रादचा मुलगा हेन्री ३ (१०३० ते १०५६) यानें राजसत्ता जास्तच दृढ केली, खासगी लढाया बंद केल्या व १०४३ त सार्वत्रिक शांतता झाल्याचें जाहीर केलें. त्यानें पोपशाहीची सुधारणा करण्याचा



प्रयत्न केला व एकामागून एक चार जर्मन पोप नेमिले. या वेळेपासून बादशहा पोप यांच्यामध्यें तेढ पडून त्यांच्या एकमेकांविरुद्ध झटापटी चालू झाल्या. पुढील राजा हेन्री ४ हा वयांत आला नव्हता तोंपर्यंत मोठ्या सरदारांनीं आपली गेलेली सत्ता परत मिळविली. १०७५ मध्यें पोप ग्रेगरी ७ नें पाद्यांनीं लग्न करितां कामा नये व कोणत्याहि ऐहिक सत्ताधाऱ्याकडून नेमणूक करून घेतां कामा नये असे हुकूम सोडिले तेव्हां हेन्रीनें त्यांना विरोध केला. पण पोपनें त्याजवर बहिष्कार घातला व त्याच्या सरदारांना व प्रजेला त्याच्या विरुद्ध बंड करण्यास चिथाविलें निरुपाय होऊन हेन्री पोपला कानोसा येथें १०७७ त शरण गेला. तीन दिवस पोपनें त्याला बाहेर ताटकळत ठेविलें व शेवटीं एकदां त्याला भेट देऊन त्याच्यावरील बहिष्कार काढून घेतला तथापि त्याची ग्रहदशा संपली नाहीं. जर्मन संस्थानिकांनीं अनायासें मिळालेल्या संधीचा फायदा करून घेण्यास कमी केलें नाहीं. त्यांनीं १०७७ त एकत्र जमून हेन्रीला पदच्युत केलें, व स्वाबिआचा डयूक रूडॉल्फ याला त्याच्या जागीं निवडिलें. हेन्री व रूडॉल्फ यांच्यामध्यें मोठें युद्ध होऊन १०८० मध्यें रूडॉल्फचा पराभव झाला व तो लढाईंत मारला गेला. १०८४ मध्यें हेन्रीनें स्वतःचा नेमिलेला पोप क्विर्ट याच्याकडून रोममध्यें राज्याभिषेक करवून घेतला. इकडे जर्मन संस्थानिकांनीं रूडॉल्फच्या मागून इर्मानला राजा निवडिलें, पण हेन्री विरुद्ध त्याचें कांहीं चाललें नाहीं. इर्मान नंतर एग्बर्ट हा राजा निवडिला गेला. पण १०९० त त्याचा खून झाला तेव्हां हेन्रीला प्रतिस्पर्धी राहिला नाहीं.

पोपशाहीनें मात्र त्याची पुरी पाठ पुरविली. प्रत्यक्ष त्याचे मुलगे कॉन्राद व हेन्री ५ यांना पोपनें त्याच्या विरुद्ध लढावयास लाविलें. हेन्रीचा लढाईंत पराभव होऊन तो कैद केला गेला. पण तो तेथून निसटला व त्यानें झगडा पुनः सुरू केला. ११०६ च्या आगस्ट-मध्यें तो मरण पावला. शेवटीं हेन्री ५ च्या कारकीर्दीत या पोप व बादशाहा यांच्यामधील लढ्याचा तडजोडीनें निकाल लागला. ही तडजोड वर्म्स येथें ११२२ त झाली. दोन्ही बाजू भांडूनभांडून कंटाळल्या होत्या. मोठमोठे धर्माधिकारी निवडण्याचा हक्क पाद्र्यांना देण्यांत आला व बादशाहा, पूर्वी अधिकाराचें चिन्ह म्हणून धर्माधिकाऱ्यांच्या हातांत आंगठी घालून काठी देत असे तो हक्क त्यानें पाद्र्यांना देऊन टाकला. पण या निवडणुकी बादशहाच्या किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या समोर व्हाव्या व नव्या धर्माधिकाऱ्याच्या हातांत त्यांची जमीन त्याजकडे राजाचा सेवक म्हणून आहे हें दर्शविण्यासाठीं राजदंड बादशहानें द्यावा असेंहि ठरलें. एकंदरींत पोपशाहीची सत्ता पुष्कळच वाढली. बादशाही मुकुट कोणाला द्यावयाचा हें ठरविण्याचा हक्क पोपशाही सांगूं लागली व इनोसेंट २ या पोपनें तर साक्सनीच्या लोथारला हाताखालच्या सरदाराला कांहीं द्यावें त्याप्रमाणें बादशाही मुकुट दिला (११३३).

अनेक भांडणें व कारस्थानें होऊन शेवटीं ११३७ त इतिहास प्रसिद्ध होहेन स्टॉफेन घराण्याचा अंमल सुरू झाला. फ्रांकोनिआचा डयूक कान्राद ३ हा ह्या घराण्यांतील पहिला राजा होय. पोपच्या कैवाऱ्यांना ग्वेल्फ व बादशहाच्या कैवाऱ्यांना घिबेलिन अशीं नांवें

पडलीं व त्यांच्या लढाया काव्राद ३ च्या कारकीर्दींत सुरूं झाल्या. मोठमोठे सरदार व संस्थानिकहि आपापसांत भांडत होते. त्यांत आणखी काव्रादनें तुर्कांशीं चालू असलेल्या धर्मयुद्धांत भाग घेतला. या सर्व कारणांमुळें जर्मनी अगदीं हैराण होऊन गेला. त्याच्या नंतरचा राजा निवडण्यासाठीं संस्थानिक मतदार फ्रांकफोर्ट येथें जमले. यापुढें रोमन धर्मराज्याचा शेवट होईपर्यंत बादशहाच्या निवडणुकी याच शहरांत होत गेल्या व याच शहरांत त्यांना राज्याभिषेकहि होत गेला. बार्बारोसा फ्रेडरिक (११५२ ते ११९०) याला काव्रादच्या शिफारशीवरून बादशहा निवडण्यांत आलें. त्याची कारकीर्द फार वैभवशाली झाली. तो अत्यंत शूर व न्यायी होता. दरोडेखोर सरदारांची खोड मोडून त्यानें देशांत शांतता स्थापिली व कायद्याप्रमाणें वागण्याची शिस्त प्रजेला लाविली. शहरांचीहि भरभराट त्यानें घडवून आणिली. अनेक प्रकारचे हक्क त्यांना देऊन त्याची भक्ति त्यानें संपादन केली. तथापि शहरांचे प्रतिस्पर्धी जे जर्मन सरदार त्यांचें त्याच्यावरील विलक्षण प्रेम कमी झालें नाहीं. त्याचा यत्किंचित्हि अपमान झालेला त्यांना खपत नसे. त्याच्या अलौकिक बुद्धीची छाप तत्क्षणीं इतरांवर पडे व सरदारांकडून सुद्धां तो अन्याय्य अशा मदतीची केव्हांहि अपेक्षा करीत नसल्यामुळें तो आपले न्याय्य हक्क बजावी तेव्हां त्यांना वैषम्य वाटत नसे. राष्ट्रीय सभेंत त्याच्या इतकें वजन कोणत्याहि बादशहाचें पडलें नाहीं. त्यानें पुष्कळ सुधारणा संस्थानिकांच्या परस्परसंबंधांत घडवून आणिल्या. जर्मनीचें कल्याण याहिपेक्षां जास्त त्याच्याकडून

अ ३५३
२१७

झालें असतें. पण साहसप्रिय व कल्पनाप्रिय अशा त्याच्या स्वभावाला इटालीवर स्वामित्व स्थापण्याच्या महत्त्वाकांक्षेनें लोभविलें होतें. १११५ त त्यानें आपल्याला रोम येथें राज्याभिषेक करवून घेतला. या पुढील त्याचीं बरींच वर्षें लॉंबर्डीतील शहरांशीं व पोप अलेक्झँडर ३ शीं भांडण्यांत गेलीं. याच्या इटलींतील पराक्रमांनीं त्याच्या देशबांधवांच्या हृदयांत राष्ट्राभिमानाची ज्योत पेटविली. आयुष्याच्या आरंभापेक्षांहि आयुष्याचा शेवट जास्त ऐश्वर्यमय व्हावा म्हणून तो ११८९ मध्यें मोठें सैन्य घेऊन धर्मयुद्धांत लढण्यासाठीं पॅलेस्टाइनकडे निघाला. ११९० त तो बुडून मरण पावला अशी बातमी आली, तेव्हां सर्व लोक शोकानें विव्हल झाले आपल्या देशाचें आतां नष्टचर्य ओढवणार अशी चिंता त्यांना वाटली. कारण या धर्मयुद्धाच्या पायीं त्याच्या बरोबर जर्मनीचे थोरथोर सरदारहि नाश पावले होते. या ग्रहदशेच्या दिवसांना लौकरच सुरुवात होऊन जर्मनींत फार अंदाधुंदी माजली. फ्रेडरिक २ (१२१२ ते १२५०) च्या कारकीर्दींत पोपशाहशीं भांडण होऊन त्याला बहिष्कृत करण्यांत आलें. फ्रेडरिकच्या जागीं एक प्रतिस्पर्धी बादशहा निवडला जाऊन फ्रेडरिकला इटलींत जावें लागलें. तो इटलींत गेल्याबरोबर जर्मनींत बेबंदशाही झाली. ती १२७३ मध्यें हॅब्सबर्गचा रूडाल्फ बादशहा होईपर्यंत कायम राहिली.

होहेनस्टॉफेन घराण्याच्या अंमलाखालीं जर्मनीचा पुष्कळ उत्कर्ष झाला यांत संशय नाहीं. या राजांच्या अंगीं पुष्कळ थोर सद्गुण असल्यामुळें हे आपल्या प्रजेला अत्यंत प्रिय झाले. धर्मयुद्धांत

उमदे राऊत ' प्रसिद्धीस आले; जर्मन वाङ्मयाची वळी उमलली; गॉथिक शिल्पकलेची रमणीयता वाढली; शहरांची भरभराट वृद्धिंगत झाली; ज्यांना शेतांतले गुलाम म्हणावें अशा गरीब शेतकऱ्यांना स्वतंत्रता मिळाली; स्थानिक रीतीभातींचीं कोडें तयार करण्यांत आलीं. याच्या उलट कांहीं गोष्टी जर्मनीला अपकारक झाल्या. या महत्त्वाकांक्षी राजांनीं इटलींत सत्ता स्थापण्याचा व पोपची सत्ता नाहींशी करण्याचा वेडा नाद घेतल्यामुळें जर्मनीला फार हाल काढावे लागले. या अंदाधुंदींत मोठमोठे सरदार स्वतंत्र संस्थानिक बनले व त्यांच्या जहागिरी व हुद्दे वंशपरंपरा चालावे असें ठरलें. संस्थानिकांनीं व धर्माधिकाऱ्यांनीं बळकाविलेल्या विशेष हक्कांना फ्रेडरिक २ ला संमति द्यावी लागली, व बादशहाच्या निवडणुकीला सातच मतदार ठरविण्यांत आले. निष्फळ पराक्रमांनीं जर्मनी निःसत्त्व होऊन गेला व फ्रेडरिक २ च्या मरणाबरोबर जें साम्राज्याचें वैभव अस्तंगत झालें तें कायमचेंच.

१२७३ त रूडॉल्फ़ बादशाहा झाला तेव्हां त्यानें राजसत्ता पुनः स्थापिली व न्यायदान चोख व्हावें अशी व्यवस्था केली. पण त्याच्या कारकीर्दींत शहरांचे हक्क विशेष वाढविण्यांत आले नाहींत. या बाबतींतलें त्यांचें धोरण पुढील दोन बादशहांनीं फिरविलें. एवढेंच नव्हे, तर गुलाम शेतकरी व ज्यू यांच्याशीं सख्य केलें. बादशाही व पोपशाही यांच्यामधील भांडण अखेरीस लुई ४ च्या (१३१४–१३४७) कारकीर्दींत थांबलें. कारण १३३८ त सातहि मतदारांनीं असें जाहीर कीं, बादशहाच्या निवडणुकीला पोपच्या संम

तींची आवश्यकता नाहीं. लुईच्या आमदानींत सार्वत्रिक शांतता राहिली. शहारांशीं त्यानें शेवटपर्यंत चांगले संबंध ठेविले, तेथील उद्योगधंदे व व्यापार वाढला. सरदारी प्राबल्य कमी होऊन औद्योगिक वर्गांचें महत्व वाढल्यानें शहरांची राज्यपद्धति जास्त जास्त लोकतंत्र होऊं लागली. चार्लस (१३४७–१३७८) या बादशहाचें लक्ष बादशाही मुलुखाकडे फारसें नसून वंशपरंपरेनें आलेल्या बोहेमिया, मोरोव्हिआ, सायलेशिआ व ल्यूसेशिया या मुलुखाकडेच विशेष होतें. १३५६ त त्यानें ' सोनेरी आज्ञापत्र '* काढून बादशाहीच्या मतदारांचे हक्क व कर्तव्य, बादशहाच्या निवडणुकीची व राज्याभिषेकाची पद्धति, साम्राज्याचीं नाणीं, चालीरीति, व्यापारी तह व स्वतंत्र शहरांचें हक्क व कर्तव्यें हीं सर्व ठरवून टाकिलीं. चार्लसचा मुलगा वेन्सेस्लॉस (१३७८–१४००) हा राजपदाला अगदीं नालायक आढळून आला त्याच्या कारकीर्दींत बादशाहीविषयीं लोकांना तिरस्कार वाटूं लागला. १३९६ त ऑस्ट्रिआचा ड्यूक लिओपोल्ड याचा सेंपाक येथें पराभव करून स्विट्झर्लंडनें आपल्या स्वातंत्र्याचा पाया घातला १४०० त वेन्सेस्लासला पदच्युत करण्यांत येऊन रूपर्ट बादशहा झाला. रूपर्टनंतर १४१० त वेन्सेस्लासचा भाऊ सिजिस्मंड हा बादशहा झाला याच्याच कारकीर्दींत हुस नांवाच्या धर्मशिक्षण विशपला न्यायाचा फार्स करून पाखंड म्हणून जाळण्यांत आलें (१४१५). हुसला प्रथम सुरक्षिततेचें

---

* यावरील शिक्कामोर्तब सोनेरी होतें त्यावरून हें नांव पडलें.

वचन देऊन सिजिस्मंडनें तें पुढें मोडलें. यामुळें सिजिस्मंडच्या नांवाला कायमचा कलंक लागला आहे. या नीच कृत्यामुळें हुसाइट युद्ध सुरूं झालें व पुढें जी ख्रिस्ती धर्मसुधारणा झाली तिचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं. १४१५ त सिजिस्मंडनें दुसरी एक महत्त्वाची गोष्ट केली तीं म्हणजे ब्रंडेनबुर्ग हें संस्थान आपला मित्र होहेन्झालर्न फ्रेडरिक याला विकलें. होहेन्झालर्न घराण्याच्या नेतृत्वाखालीं हें छोटें संस्थान उत्कर्ष पावून पुढें प्राशिआचें राज्य बनलें. सिजिस्मंडच्या मागून ऑस्ट्रिआचा आल्बर्ट २ हा बादशहा झाला त्याच्या अंगांत राज्य चालविण्याची मोठी शहामत आहे असें दिसून आलें, परंतु तो दोनच वर्षांनीं मरण पावला. त्याचा नातेवाईक फ्रेडरिक ४ (१४४०–१४९३) हा मोठा गुणी, परंतु स्वार्थी व आळशी बादशहा निघाला. बादशाही कायमची मिळालेल्या आपल्या हॅब्स बर्ग घराण्याचा उत्कर्ष करावा मग जर्मनीचें कांहीं झालें तरी हरकत नाहीं, असें त्याचें आपमतलबी धोरण होतें. तुर्कांपासून जर्मनीला पुष्कळ उपद्रव झाला. पण त्या देशाचें रक्षण करण्यासाठीं फ्रेडरिकनें कांहीं देखील केलें नाहीं. फ्रेडरिकचा मुलगा मॉक्झिमिलिअन १ (१४९३–१५१९) हा बापापेक्षां अगदीं निराळ्या स्वभावाचा होता. तो उद्योगी, महत्त्वाकांक्षी व कारस्थानी होता, पण तो निश्चयी नव्हता. त्यानें आपल्या राज्याच्या अंतर्गत कारभारांत पुष्कळ सुधारणा घडवून आणिल्या. न्यायदानाचें काम जास्त चोख झालें. पोलीस व संघटित सैन्य यांची स्थापना त्यानें केली. पत्रांची नेआण त्यानें सुरूं केली. याच कारकीर्दींत 'वरिष्ठ न्यायकोर्ट' व

ऑलिक कौन्सिल (त्यावर अपील नसे) हीं जादा कोर्टें स्थापन झालीं. साम्राज्याचे दहा विभाग करण्यांत येऊन प्रत्येक विभागावर एक पिढिजाद अध्यक्ष व पिढिजाद संस्थानिकांना राष्ट्रीय सभेला येण्याबद्दल बोलावणारा अधिकारी नेमण्यांत आला मॉक्सिमिलि अनच्या कारकीर्दीच्या अखेरीस १५१७ त धमसुधारणेचा आरंभ झाला.

मॉक्सिमिलिअनबरोबर मध्ययुगाचा शेवट झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं तोफांच्या दारूचा शोध लावल्यामुळें सरंजामी पद्धत नाहींशी होऊन राजे लोक भाडोत्री शिपाई ठेवूं लागले, बादशाही सत्ता नांवालाच राहिली होती सस्थानें व शहरें यांनीं बहुतेक स्वातंत्र संपादिलें होतें. रोमच्या कायद्याचा अंमल सगळीकडे सुरूं झाल्यानुळें एकीला मदत झाली.

पैसे घेऊन पापापासून मुक्त करणारीं माफीपत्रें विकण्याच्या पोपच्या पद्धतीचा ल्यूथरनें १५१७ त निषेध केला तेव्हां सुधारणेला प्रारंभ झाला असें म्हणावयास हरकत नाहीं पण धर्मसुधारणेचा खरा जोर चार्ल्स ५ (१५१९ ते १५५५) च्या कारकीर्दीत झाला. यानें स्पेन व त्याच्या अंमलाखालील देश साम्राज्यास जोडिले स्पेन, इटली, नेदर्लंड वगैरे अवाढव्य मुलुखाची व्यवस्था पहावयाची व फ्रान्सबरोबर युद्ध चालवावयाचें यांतच चार्ल्सला सर्व लक्ष घालावें लागलें, म्हणून जर्मन मुलुखाची व्यवस्था त्यानें आपला भाऊ फर्डिनांड याजवर सोंपविली अशा रीतीनें धार्मिक

भांडणाचा निकाल जर्मनीच्या संस्थानिकांना बादशहाच्या मदती-शिवाय लावावा लागला. १५२४–२५ त ल्यूथरच्या उपदेशानें चेतलेल्या शेतकऱ्यांनीं मोठें जबरदस्त बंड उभारिलें तें मोडण्यासहि बादशहानें मदत केली नाहीं चार्ल्स हा स्वतः धर्मसुधारणेच्या पूर्ण विरुद्ध होता व त्याच्या विरोधामुळें धार्मिक तंट्याचा निकाल तडजोडीनें लावणें अवश्य झालें. सर्व धर्मसुधारकांना आतां प्रोटेस्टंट हें नांव मिळालें होतें व प्रोटेस्टंट राजांनीं स्क्मालकाल्डचा संघ स्थापिला. साक्सनीच्या मॉरिसची मदत घेऊन चार्ल्सनें तो संघ मोडिला. परंतु सुधारणेची प्रगति इतकी झपाट्यानें होत गेली कीं, शेवटीं मॉरिसनेंच चार्ल्सला १५५५ त ऑग्सबुर्गचा तह करावयास लाविलें. या तहानें ल्यूथरच्या अनुयायांना कॅथॉलिकांबरोबरीनें वागवावयाचें असें ठरलें. या सर्व भानगडींचा वीट येऊन चार्ल्सनें अधिकारत्याग केला व नंतर त्याचा भाऊ फर्डिनांड यानें सर्व प्राटेस्टंटांना धार्मिक मतस्वातंत्र्य देऊन टाकून साम्राज्याला त्रासदायक झालेला तंटा मिटविला. फर्डिनांड हा स्वत. सालस स्वभावाचा व शांतताप्रिय होता. परंतु जर्मन संस्थानिकांनीं धार्मिक बाबतींसाठीं अंतःस्थ युद्धें उपस्थित केल्यामुळें आणि फ्रेंच व तुर्क यांनीं बाहेरून साम्राज्यावर स्वाऱ्या केल्यामुळें त्याची कारकीर्द धामधुमींत गेली. पुढील पन्नास वर्षांत अंतःस्थ कटकटींनीं साम्राज्याचे वाभाडे निघाले. माक्सिमिलिअन २ (१५६४ ते १५७६) हा फार शहाणा व न्यायी बादशहा होता. त्यानें निरनिराळ्या पंथांच्या अनुयायांत सख्य नांदावें म्हणून प्रयत्न केला. पण त्याचा मुलगा रूडाल्फ

(१५७६ ते १६१२) यानें आपल्या धर्मवेडानें व घरसोडीच्या धोरणानें बापाचें चांगलें काम सर्व बिघडवून टाकिलें. याच्या कारकीर्दींत धार्मिक पक्षभेद इतके विकोपाला गेले कीं, सर्व पक्षांनीं बाहेरील शत्रूंची मदत इतरांचा पाडाव करण्यासाठीं घेतली. या सार्वत्रिक बेबंद बादशाहीचा कळस ' तीस वर्षांचें युद्ध ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या अनर्थावह व निर्दय कलहानें झाला. हें युद्ध माटिअस (१६१२–१९) व फर्डिनांड २ (१६१९–३७) यांच्या कारकीर्दींत चालून त्याचा शेवट फर्डिनांड ३ (१६३७–५७) च्या कारकीर्दींत वेस्ट फालिआच्या तहानें झाला (१६४८).

या धर्मयुद्धाचे जर्मनीवर फार अनिष्ट परिणाम झाले. जर्मनीचा साम्राज्याशीं फारसा संबंध राहिला नाहीं. हॅब्सबर्ग घराण्याचा ऑस्ट्रिआंत जो मुलुख होता त्याच्याशीं साम्राज्य निगडित झालें. जर्मनीची लोकसंख्या युद्धांतील कत्तलीनें निम्मी झाली. व्यापार व उद्योगधंदे जवळजवळ नाहींसे झाले. जर्मनीचे फ्रान्स व स्वीडन यांनीं मोठमोठे लचके तोडिले. स्वित्झर्लंड व नेदर्लंड हीं साम्राज्यांतून फुटून बाहेर पडलीं व स्वतंत्र झालीं. लढाईनंतरचा जर्मनी म्हणजे बऱ्याचशा रानवट व स्वार्थी अधिपतींच्या अंमलाखालील संस्थानांचा समूह झाला. या सर्व बेजबाबदार संस्थानिकांचें स्वातंत्र्य वेस्टफालिआच्या तहानें कायम केलें. शहरांतहि सर्व सत्ता मूठभर श्रीमंतांच्या हातांत गेली. जर्मनीच्या संस्थानांना ऐक्य बांधणारें बंधन असें एकच राहिलें; तें म्हणजे बादशाहीची नांवाची सत्ता. आतांही

कायदे, तह व लढाया करण्याची सत्ता बादशहाकडून काढून घेऊन राष्ट्रीय सभेकडे देण्यांत आली.

तीस वर्षांच्या युद्धानंतर प्रशिआचा उत्कर्ष होण्यास आरंभ झाला. १६११ त ब्रांडेन्बुर्ग व प्रशिआची डची हीं एक झालीं. १६५७ त प्रशिअन डची पोलंडच्या अंमलाखालीं नाहीं असें जाहीर करण्यांत आलें. मोठा संस्थानिक मतदार म्हणून प्रसिद्ध असलेल्या फ्रेडरिक विल्यमच्या कारकीर्दीत इतरहि प्रांत जोडण्यांत आले. दुर्गुणांनीं भरलेल्या राजांचा सुळसुळाट झालेला असल्यामुळें फ्रेडरिक विल्यम हा आपल्या काळांत आदर्शभूत संस्थानिक मानला जात असे. त्याचा मुलगा फ्रेडरिक याला राजा म्हणून घेण्याची फार हांव होती. पाण्यासारखे पैसे आतून त्यानें आपली ही हांव १७० मध्यें पुरी करून घेतली. फ्रेडरिकच्या उधळपट्टीनें झालेलें कर्ज त्याचा मुलगा फ्रेडरिक विल्यम १ यानें कडक काटकसरीचें धोरण स्वीकारून फेडिलें, एवढेंच नव्हे तर, खजिना संपत्तीनें खचून भरून ठेविला. सर्व खात्यांची उत्तम संघटना करून त्यानें कार्यक्षम अधिकारीवर्ग निर्माण केला व त्याच्या सैन्याची उत्तम अंमलदारांबद्दल, उत्तम शिक्षणाबद्दल व उत्तम शिस्तीबद्दल सर्व युरपभर ख्याती पसरली. तो १७४० त मेल्यावर थोर फ्रेडरिक प्रशिआचा राजा झाला. या तरुण, महत्त्वाकांक्षी व कर्तबगार राजाला आपलें राज्य वाढवावें एवढेंच नव्हे, तर युरपच्या राजकारणांत आपल्या देशाचें कांहीं तरी वजन पडावें अशी अनिवार इच्छा होती. तो राज्यावर

येऊन सहा महिने होण्याच्या आंत बादशहा चार्ल्स ६ (१७११ ते १७४०) मरण पावला. त्यानें आपला सर्व ऑस्ट्रिअन मुलूख आपली मुलगी मेरिआ थेरेसा हिला मिळावा अशी व्यवस्था करून तिला सर्व युरपिअन राजांची संमति घेऊन ठेविली होती. आलेल्या संधीचा फायदा घेऊन फ्रेडरिकनें सायलेशिआवर स्वारी केली व तो प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. त्या बरोबर बव्हेरिआ व फ्रान्स यांनींहि मेरिआ थेरेसाचे कांहीं प्रांत मिळविण्याचा प्रयत्न केला. फ्रेडरिकनें कधीं ऑस्ट्रिआची व कधीं फ्रान्सची बाजू घेऊन दोघांनाहि समबल ठेविलें; व सायलेशिआ आपल्या हातांतून जाऊं दिला नाहीं. फ्रेडरिकच्या विश्वासघाताचा सूड घेण्यासाठीं मेरिआ थेरेसानें मोठें कारस्थान रचिलें. क्षणभर ती फ्रान्साशीं ऑस्ट्रिआचें असलेलें चिरकालीन वैरहि विसरली, व फ्रान्स, रशिआ, पोलंड व साक्सनी या सर्वांच्या साहाय्यानें प्रशिआ विरुद्ध सात वर्षांचें युद्ध तिनें आरंभिलें. फ्रेडरिकची लोकोत्तर कर्तबगारी या भयंकर संकटाच्या वेळींच दिसून आली. आपल्यापेक्षां किती तरी पटीनें प्रबल असलेल्या या शत्रुसंघाशीं सतत सात वर्षें झुंजून शेवटीं तो विजयी झाला व सायलेशिआ त्यानें पचविला. प्रशिआ हा युरपांतील एक प्रमुख राष्ट्र झाला व जर्मनीच्या राजकारणांत ऑस्ट्रिआशीं स्पर्धा करूं लागला. १७७२ त ऑस्ट्रिआ व रशिआ यांच्यांशीं संगनमत करून फ्रेडरिकनें पोलंडचा कांहीं भाग प्रशिआला जोडिला. फ्रेडिरिक हा १७८६ त मरण पावला. त्याची राज्यपद्धति एकतंत्र होती, परंतु त्यानें आपल्या सत्तेचा स्वार्थासाठीं

उपयोग न करितां केवळ लोकहितास्तव केला. लोकांच्या कल्याणा-
स'ठीं चंदनाप्रमाणें झिजावयाचें, हें जें आपल्या इकड़ील अशोक,
विक्रम व शिवाजी अशा थोर राजांचें उच्चतम ध्येय होतें तेंच फ्रड-
रिकनें आचरून दाखविलें. त्याच्या आमदानींत प्रशिआचें राज्य-
सुसंघटित, सुव्यवस्थित व सुसंपन्न झालें. पण १७८९ त फ्रेंच राज्य-
क्रांतीची जी वावटळ आली तिच्यामुळें २५ वर्षें यद्धाची दंगल
उडून प्रशिआचे धिंडवडे निघाले. १७९३-९५ मध्यें प्रशिआ,
ऑस्ट्रिआ व रशिआ या तिघांनीं मिळून पोलंड पारच खाऊन टाकिला.
पण १८०१ मध्यें फ्रेंचांनीं आपली सरहद्द ऱ्हाइनला आणून भिड
विली. १८०३ मध्यें नेपोलिअननें हॅनोव्हर बळकाविलें. १८०६
मध्यें त्यानें मध्य व दक्षिण जर्मनींतील संस्थानिकांचा ऱ्हाइन संघ
म्हणून संघ स्थापिला. तेव्हां फ्रान्सिस २ नें बादशाही मुकुटावर
पाणी सोडिलें व अशा रीतीनें एक हजार वर्षांपूर्वी शार्लमेननें स्थापि
लेल्या रोमन धर्मराज्याचा अवतार संपला.

भाषांतरकर्त्यांची प्रस्तावना.

१८७१ त जें स्थापिलें गेलें त्या जर्मन साम्राज्याच्या स्थापने-संबंधींची तपशीलवार हकीकत देणारें म्हणून कर्नल मॅलेसनचें पुस्तक बरेंच प्रसिद्धीस आलें आहे. लेखक लष्करी अंमलदार असल्यानें त्यानें लढायांच्या वर्णनावर फार भर दिली आहे. त्या पुस्तकाचें बडोदें सरकारच्या आज्ञेनें केलेलें मराठी भाषांतर होय. पुस्तकाचें भाषांतर करितांना निव्वळ मराठी वाचकांनाहि कोठें अडखळल्यासारखें वाटूं नये याविषयीं विशेष खबरदारी घेतली आहे.

बडोदें सरकारच्या अधिकाऱ्यांनीं सुचविल्याप्रमाणें आरंभीं जर्मनीच्या १८०६ पर्यंतच्या इतिहासासंबंधीं दोन प्रास्ताविक शब्द लिहिले आहेत व शेवटीं महायुद्धाची थोडक्यांत हकीकत देऊन इतिहास १९१९ पर्यंत आणून भिडविला आहे, हीं दोन्हीं प्रकरणें माझे मित्र रा. रा. सबनीस एम्. ए. (केंब्रिज) न्यू पूना कॉलेजमधील इतिहासाचे प्रोफेसर यांनीं लिहिलीं आहेत.

बडोदें सरकारनीं एका महत्त्वाच्या पुस्तकाचें मराठी भाषांतर करण्याची संधि दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

वि. ग. आपटे.

अनुक्रमणिका.

प्रकरण	नांव	पृष्ठ
१ लें	शार्लमेनचें राज्य	१
२ रें	ऑस्ट्रिआ पुन्हां डोकें वर काढतो....	३३
३ रें	प्रशिआ १८५२ ते १८५७	६०
४ थें	प्रिन्स विल्यम आपल्या भावाचा राज्यकारभार पहातो	८०
५ वें	पहिला विल्यम याची कारकीर्द	१०६
६ वें	स्लेस्विग–होल्स्टीन ऑस्ट्रो-प्रशिअन स्वारी व तिचे परिणाम	१३७
७ वें	ऑस्ट्रियाचें परराष्ट्रीय धोरण	१६४
८ वें	सन १८६६ सालचें युद्ध	१८७
९ वें	सन १८६६ सालचें युद्ध–बोहेमियावरील स्वारी	२०६
१० वें	कोनिग्रॅट्झची लढाई	२४१
११ वें	कस्टोझाची लढाई	२७२
१२ वें	तिसरा नेपोलियन व बिझमार्क	३००
१३ वें	फ्रँको जर्मन युद्ध	३४३
१४ वें	कोलोंबे–व्हाऊन व्हाइल–ग्रॅव्हेलाट	३९६
१५ वें	सेडन	४३१
१६ वें	युद्धाचें अखेरचें स्वरूप	४५९
१७ वें	आरंभलेल्या कामाची सिद्धि	४८७
१८ वें	हल्लींच्या युद्धाचीं ठोकळ कारणें	४९४
१९ वें	महायुद्ध व व्हार्सायचा तह	५०५

17 JAN 1994

जर्मन साम्राज्याची पुनः संस्थापना.

प्रकरण १ लें.

C 373

शार्लमेनचें राज्य–दुसऱ्या फ्रेन्सिसनें केलेला राज्यत्याग–नेपोलिअनचा काळ–१८१५ ते १८४८, १८४८ ते १८५२.

इसवी सन ८०० मध्यें शार्लमेन यानें स्थापिलेलें पवित्र रोमन साम्राज्य १८०६ सालीं आगष्ट महिन्याच्या सहाव्या तारखेस लयास गेलें. म्हणजे हें राज्य १००६ वर्षें टिकलें होतें. आपल्या वंशांत छत्रचामरादि राजचिन्हयुक्त अधिराज्यपद परंपरेनें निरंतर चालावें ही पराक्रमी चार्लस राजाची आकांक्षा सफल झाली नाहीं, कारण सन १९११ त त्याचा वंशच मुळीं निर्मूल झाला. तेव्हांपासून 'ड्यूक', 'कौंट' इत्यादि पदव्या धारण करून स्वसंतोषानें साम्राज्याची सेवा करीत असलेल्या शेंकडों सरदारांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें व त्याबरोबरच राजाधिराज निवडण्याचा आपला हक्कहि बजावण्यास त्यांनीं प्रारंभ केला. प्रथमतः ठरलेली निवडणुकीची पद्धत अव्यवस्थत अतएव अव्यवहार्य आहे असें कालगतीनें अनुभवास आलें; आणि

म्हणून तेराव्या शतकांत राज्यांतील अत्युच्च दर्जाच्या सात संस्थानिकांसच मत देण्याचा अधिकार देऊन मिक्वडणुकीच्या पद्धतीचें नियमन करण्यांत आलें. ही मताधिकाऱ्यांची संख्या १६४८ त आठ व १६९२ त नऊ केली. सन १७७७ त ती संख्या पुनः आठांवर आणिली, परंतु ल्युनेव्हिलच्या तहान्वयें (फेब्रुआरी ९ सन १८०१) ती संख्या पुनः दहापर्यंत वाढविली. सन १४०७ पासून शेवटपर्यंत ह्या मतदारमंडळानें हा राजाधिराजपदाचा मान प्रायः हॅब्स्बर्ग घराण्यांतील प्रतिनिधीला दिला नाहीं असें क्वचित्च घडलें.

पहिल्या फ्रॅन्सिसनें केलेला राज्यत्याग.

पूर्वजांपासून वंशपरंपरेनें प्राप्त झालेल्या संस्थानांचा राजा म्हणून व जर्मनीचा बादशाहा म्हणूनहि दुसऱ्या बादशाहानें फ्रान्स देशांतील राजक्रांतीमुळें उद्भवलेल्या युद्धत पुढाकार घेतला होता १७९६ सालापर्यंत त्याच्या व त्याच्या दोस्तांच्या सैन्यांनीं मिळविलेल्या जयांची व अपजयांची बहुतेक तोंडमिळवणीच होती. सन १७९५ त तर जयश्रीचा ओघ निश्चितपणें त्याला व त्याच्या दोस्तांना अनुकूल असाच होता. परंतु पुढील म्हणजे १७९६ सालीं नेपोलिअन बोनापार्टाच्या अद्वितीय बुद्धिसामर्थ्यानें तींच जयश्री स्पष्टपणें त्यांना प्रतिकूल होऊन तिनें प्रतिपक्षाकडे आपलें तोंड फिरविलें. याच लोकोत्तर पुरुषानें फ्रॅन्ससस बादशाहास १७९७ च्या आक्टोबरच्या १७ व्या तारखेस क्यांपोफोरमिओ येथील सुचविलेला तह स्वीकारण्यास भाग पाडिलें. सदर तहाप्रमाणें सखल प्रदेश व आयोनिअन

बेटें फ्रान्स देशाला–मिलन, मँचुरिआ व मोदेना हीं नुकतींच अस्तित्वांत आलेल्या सिसआलपाइन लोकसत्ताक राज्यास–देणें फ्रेंच्सिस यास आवश्यक झालें. या सर्वांचा मोबदला म्हणून व्हेनिस मात्र एका गुप्तशर्तीस अनुसरून त्याच्या स्वाधीन केलें. एक वर्षा-नंतर युद्धास पुन्हां आरंभ झाला. नेपोलिअन ईजिप्त देशांत होता व रशिआनें ऑस्ट्रिआस फार मोठें साहाय्य दिल्यामुळें ऑस्ट्रिआस प्रारंभीं जिकडे तिकडे य.:प्राप्तिच होत गेली. युद्धारंभीं लागोपाठ मिळत गेलेल्या जयामुळ व्हिएन्ना राजधानींत ज्या मोठ्या उत्साहो-त्पादक आकांक्षा प्रजाजनांच्या अंत.करणांत उत्पन्न झाल्या होत्या त्या सर्वांचा बीमोड होऊन त्यांच्या जागीं प्रबल निराशेनें आपलें ठाण दिलें. याचीं कारणें पुढीलप्रमाणें आहेत:–बोनापार्ट ता. ९ ऑक्टोबर रोजीं ईजिप्त देशाकडून परत आला व एका महिन्याच्या आंतच त्यान प्रचलित शासनपद्धति शिथिल करण्याच्या हेतूनें तिज-वर इतक्या जोराचा हल्ला केला कीं, त्या कामीं त्यास बरेंच यश येऊन त्याची पहिला कॉन्सल म्हणून नेमणूकहि झाली. या सर्वांत अखेरची व मुख्य गोष्ट म्हणजे मारेंगोची स्वारी होय. पूर्वी झालेल्या तहाप्रमाण ज्या फायदेशीर गोष्टी फ्रान्सच्या पदरीं पडल्या होत्या, त्या ल्युनेव्हिल येथें पुढें झालेल्या तहान्वयें कायमच्या फ्रान्स देशाला मिळाल्या व त्यामुळें पश्चिम जर्मनींत फ्रान्सचें वर्चस्व अतोनात वाढलें. विजयी नेपोलिअन यानें लादलेल्या तहांतील शर्ती सौम्यच होत्या. टिलसिट येथील तहांत रशिआवर लादलेल्या शर्ती आपण विचारांत घेतल्या नाहींत, तर आपणांस असें आढळून येईल कीं, तरुण विजयी नेपोलिअननें

जित शत्रूशीं सौम्यपणानें वर्तन केलें असा फक्त हा एवढाच समज होय. तदनंतरचे त्याचे उद्गार व कृति यावरून असें निःसंशय सिद्ध होतें कीं आपण या वेळीं शत्रूला दयार्द्र दृष्टीनें वागविलें, ही आपल्या हातून मोठी चूक झाली, असा त्याचा ग्रह झाला होता

ऑस्टरलिट्झच्या लढाईचे परिणाम.

फ्रान्स व ऑस्ट्रिआ यांच्यामधील तह चार वर्षें टिकला. दरम्यान् मारेंगोचा जेता फ्रेंच प्रजेचा बादशाहा झाला आणि तीन महिने जातात न जातात, तोंच जर्मन बादशाहा फ्रॅन्सिस यानें फ्रॅन्सिस हें नांव धारण करून, ऑस्ट्रिआचा बादशाहा ही पदवी स्वीकारल्याचें जाहीर केलें. (आगस्ट ११, १८०४) नेपोलिअन याला फ्रेंच बादशाहाचा अधिकार व पदवी प्राप्त झाली तेव्हां व त्याही पूर्वी कांहीं दिवसापासून तो इंग्लंडवर स्वारी करण्याची जंगी तयारी करण्या या कामांत अगदीं गढून गेला होता. त्याची या कामीं जय्यत तयारी चालू होतीच, इतक्यांत १८०५ च्या आगस्ट महिन्याच्या पांचव्या तारखेस बादशाहा फ्रॅन्सिस यानें पिटच्या विनवण्यांस वश होऊन नेपोलिअनच्या विरुद्ध युद्ध पुकारिलें. समुद्रकिनाऱ्यापासून आपलें सैन्य नेपोलिअन यानें दक्षिण जर्मनीमध्यें किती विलक्षण शिताफीनें नेलें. उल्म येथें एका ऑस्ट्रिअन फौजेला त्यानें शरण येण्यास कसें भाग पाडिलें व आपल्या राज्याभिषेकाच्या वर्षदिनींच ऑस्टरलिट्झ येथें रशिआशीं संयुक्त अशा दुसऱ्या एका ऑस्ट्रिअन फौजेचा पूर्ण पराभव त्यानें कसा केला, या सर्वांची

हकीकत विस्तारानें येथें सांगणें अनावश्यक आहे. क्यांपोफोरमिओ व ल्युनेव्हिल येथें 'ज्या शत्रूस मी फाजील दयार्द्र दृष्टीनें वागविलें त्यास आतां यत्किंचित्हि दयामाया मी दाखविणार नाहीं' असें आपल्या सैनिकास बजावून त्यानें युद्धास आरंभ केला होता, व त्यानें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें केलेंहि. ऑस्टरलिट्झच्या लढाईचा परिणाम प्रेसबर्गचा तह हा होय या तहानें ऑस्ट्रिआचा व्हेनिसवरील हक्क नाहींसा झाला; टिरोल, व्हारलबर्ग, ईशस्टँडचें संस्थान, पासाच्या बिशपच्या अधिकारांतील कांहीं भाग हीं बव्हेरिआच्या अंमलाखालीं गेलीं; कान्स्टन्स व ब्रिस्गाचा बहुतेक भाग व साबिआचा कांहीं भाग आणि ऑसबर्ग, हीं अनुक्रमें बँडने व वूर्टेबर्ग याखालीं सामील झालीं. बव्हेरिआ व वूर्टेबर्ग येथील मतदारांना राजपद प्राप्त झालें व बँडेन हें स्वतंत्र राजाचें संस्थान आहे असें ठरलें. या कालचा अगदीं अलीकडील इतिहासकार जो फाइफ, त्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे अशा रीतीनें साम्राज्याच्या शासनपद्धतीचें नुसतें नांव सुद्धां शिल्लक राहिलें नाहीं.

व्हाइनसंघ.

परंतु दुसरा व तीक्ष्णतर असा प्रहार या शासनपद्धतीवर पुढें लवकरच व्हावयाचा होता. सन १८०५ च्या डिसेंबर महिन्याच्या २६ व्या तारखेस प्रेसबर्ग येथील तहनाम्यावर सह्या झाल्यावर जी थोडी फुरसत नेपोलिअन यास मिळाली, तिचा विनियोग त्यानें जर्मनीला जर्जर करून टाकण्याच्या उद्देशानें एक जोमदार

योजना तयार करण्याच्या कामीं केला. जर्मन साम्राज्याचीं छकलें करून त्याच्याच अवशेषांतून जर्मनींत एक नवीन राज्य स्थापण्याचा यानें व्यूह रचिला. ह राज्य म्हणजे ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यामध्यें पाचरीसारखें बसविलें असून या दोन्ही राष्ट्रच्या अंमलापासून अगदीं स्वतंत्र होतें तें जमळ जवळ फ्रॉन्सच्या परगण्यासारखें असून त्याच्या कारभाराचीं सर्व सूत्रें फ्रान्सच हालवीत असे सन १८०६ सालीं पहिले सहा महिने त्यान ही योजना सिद्धीस नेण्याकरितां नेहमींप्रमाणें जिवापाड परिश्रम करून जुलई महिन्यांत तिची सांगोपांग पूर्णता केली. जर्मनीच्या पश्चिम व दक्षिण भागांतील सोळा प्रमुख संस्थानाधिपतींनीं जमन साम्राज्यांतून फुटून जर्मन बादशाहाची आपणांवरील सत्ता झुगारून दिली व फ्रॉन्सच्या छत्राखालीं एक नवीन संघ स्थापन करून त्यास ऱ्हाइनसंघ असें नांव दिलें. नेपोलिअननें तगादा लाविल्यामुळें आगष्टच्या सहाव्या तारखेस जर्मन संघ मोडल्याची व पवित्र रोमन साम्राज्याच्या सम्राट् पदवीचा आपण त्याग केल्याची द्वाही फ्रॅन्सिस बादशाहानें फिरविली. वर्ष संपण्याच्या आधीं सॅक्सनी संघाला मिळाल्यावर ऑस्ट्रिअन व प्रशिअन वगळून बाकीचे बहुतेक सर्व जर्मन या संघांत समाविष्ट झाले. स्वसंरक्षणाचा व परपीडनाचा उद्देश धरून अशा रीतीनें एकत्र झालेल्या या प्रांतांचा वस्तुतः एक फ्रेंच परगणाच बनला. या प्रदेशाची लोकसंख्या जवळ जवळ दीड कोटी असून त्याचें क्षेत्रफळ सव्वा लाख चौरस मैल होतें. सॅक्सनीचा समावेश झाल्यावर या

प्रांतांतील सैनिकांची संख्या १,१९,१८० असावी असें ठरलें. या सर्वांस युद्धकलेचें शिक्षण फ्रेंच लष्करी अधिकारीच देत. या प्रदेशाची सरहद म्हणजे व्यवहारांत फॉन्सचीच सरहद गणली जात असे. जर्मनीच्या अगदीं मध्यावर संस्थापित केलेला हा संघ ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांना भयावह होऊन बसला. ह्या संघाची घटना झाल्यादिवसापासून संघाच्या योजकास आणि सामान्यतः सर्व यूरपखंडास हा संघ म्हणजे राजकारणपटुत्वाचें एक अपूर्व दृश्यफल आहे, असें वाटत असे. जर्मनीच्या एका मोठ्या भागातील लोकांस आपले अंकित करून नेपोलिअननें इतःपर जर्मन लोक एकत्र होऊन फ्रॉन्स देशाविरुद्ध उठतील ही गोष्ट सर्वथैव अशक्य कोटींतील करून टाकिली, असा सार्वत्रिक समज झालासें दिसूं लागलें. या संघांत समाविष्ट झालेल्या जर्मन लोकांस या मिलाफानें तात्कालिक फायदे झाले यांत संशय नाहीं. न्याय मिळणें सर्वांस सुलभ झालें; समाजांतील निरनिराळ्या वर्गांवर करांची वांटणी पूर्वापेक्षां जास्त समतेच्या तत्त्वावर होऊं लागली; हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत महत्त्वाकांक्षी माणसास आपली उन्नति करून घेण्याचे मार्ग खुले होते अशी उच्च पद प्राप्त करून घेण्याची संधि, नाहींशी करून टाकिलेल्या किरकोळ संस्थानांच्या अंमलाखालीं महत्त्वाकांक्षी मनुष्यास कधींहि मिळाली नसती.

ऱ्हाइनसंघाचे गुणदोष.

परंतु नेपोलिअननें जन्मास घातलेल्या या संघास जें रूप प्राप्त झालें तें फ्रॉन्सच्या हितसंवर्धनास प्रतिकूल होतें व या योगानें

जर्मनांची एकी होण्यासच फार मोठी मदत झाली, याविषयीं शंका आतां आपल्या मनास क्वचित्च शिवेल. रणभूमीवर जोंपर्यंत लागोपाठ जय मिळत जाईल, तोंपर्यंतच केवळ या संघाचें अस्तित्व शक्य होतें. सन १८१२ त रशिआवर केलेल्या स्वारीवरून या संघाची उभारणी ज्या पायावर केली होती, तो पाया केव्हां दगा देईल याचा नेम नाहीं, ही गोष्ट प्रत्ययास आली, व सन १९१३ त जर्मनींत केलेल्या स्वारीनें तर हा प्रत्यय अधिकच दृढ झाला. लाप्झिगची लढाई झाली तत्पूर्वी व तदनंतर फ्रान्सविषयीं द्वेष एकाएकीं दिसूं लागला, एवढाच दुष्परिणाम या संघाचा फ्रॉन्सवर झाला, असें कदापि म्हणतां येणा रेनाहा.

ह्राइनसंघानें जर्मनीची एकी होण्यासच मदत झाली.

या संघाच्या स्थापनेमुळें राष्ट्राचा एकोपा होण्यास मूळ कारण जी संघशक्ति, तिचें बीज जर्मनीच्या अगदीं केंद्रस्थानीं पेरलें गेलें. हें बीज सद्यःकालीं फलद्रुप झालें, हें आपण प्रत्यक्ष बघतोंच आहों. खरोखर सन १८०६ तच नेपोलिअनच्या या धोरणाचा कांहीं दूरदर्शी पुरुषांनीं निषेध केला. कारण त्यांच्या मतें या धोरणाचे असे दुष्ट परिणाम होणें अगदीं अपरिहार्य होतें. अशा निषेधकारांमध्यें कांहीं फ्रेंच माणसेंहि होतीं. अशा तत्कालिनापैकीं बॅरन मार्बो, मार्शल ऑगेरॉ याचा त्या वेळचा एडिकांग, हा एक आहे. त्यानें आत्मचरित्रपर एक ग्रंथ लिहिला असून त्याची गणना आजपर्यंत जगतांत जे अति मनोहर आत्मचरित्रपर ग्रंथ निर्माण झाले आहेत

त्यांत होते. या ग्रंथांत बॅरन मारबो यानें त्या वेळीं बनलेलीं आपलीं मतें विस्तारानें दिलीं आहत हीं त्याचीं मत आपल्या प्रत्यक्ष अनुभवास आलेल्या गोष्टी विचारांत घेतां येथें थोडक्यांत देणें योग्य होईल, असें वाटतें. बॅरन मारबो लिहितोः—"मी जरी त्यावेळीं वयानें फार लहान होतों, तरी जर्मनींतील लहान संस्थानांची संख्या कमी करून तीं संस्थानें पार नाहींशीं केलीं ही नेपोलिअननें मोठी चूक केली, असा ग्रह माझ्या मनाचा झाला प्राचीनकाळीं फ्रॅन्सच्या विरुद्ध जर्मनांचा युद्धप्रसंग आला असतां जर्मनसैनिकांमधील या आठशें संस्थानिकांस एकत्र होऊन एकजुटीनें शत्रूस तोंड देणें अशक्य होतें. युद्धप्रसंगीं यांपैकीं कांहीं संस्थानिकांस सैनिकांची एखादी लहानशी तुकडी, कित्येकांस तुकडीचा अल्पल्प भाग, कित्येकांस तर एखादा अर्धा सैनिक, सैन्यभरतीस देतां येत असे याचा परिणाम असा होई कीं या भिन्न भिन्न प्रकाराच्या सैनिकांनीं बनलेल्या सैन्यसमूहास संयुक्त होऊन परस्परांच्या संयुक्त मदतीनें युद्ध चालविण्याचें तत्त्व मुळीं ठाऊकच नसे व एकदा पराभव पावतां-क्षणींच ते सर्व अष्टदिशांस सैरावैरां पळूं लागून त्यांची पूर्ण वाता-इत होई. परंतु नेपोलिअनन या छोट्या संस्थानांची संख्या ३२ वर आणिली त्याच वेळीं जर्मन सैनिकांत जुटीच्या तत्त्वांचें बीजारोपण त्यानें केलें असा त्याच्या कृतीचा अनपेक्षित परिणाम झाला मोड लेल्या संस्थानांमुळें कायम राहिलेले संस्थानाधिपति बलिष्ठ झाले व त्यांस लहानच परंतु सुसंघटित असें सैन्य तेव्हांच उभारतां आलें बादशाहा नेपोलिअन याचा, त्यानें अंमलांत आणलेल्या योजनेचा, अंतिम हेतुच असा होता कीं, या नवीन पद्धतीनें जी युद्धसामग्री

या नव्या प्रांत तयार होईल, तिचा सर्व फायदा आपल्या देशास मिळावा. फ्रेंचांस जोंपर्यंत विजयप्राप्ति होत होती, तोंपर्यंत हा हेतु पूर्णपणें सिद्धीस गेला परंतु फ्रेंचांस प्रथम अपयश येण्याबरोबर हे बत्तीस संस्थानाधिपति एकाच विशिष्ट हेतूनें प्रेरित होऊन त्यांनीं एकजुटीनें फ्रेंचांस विरोध केला व रशिआशीं मैत्री करून बादशाहा नेपोलिअन यास उलथून पाडिलें.

जर्मन संयुक्त संस्थानसंघ.

सन १८१२ सालच्या स्वारीनें व्हाइनसंघ मरण्याच्या पंथास लागला व लाइझिगच्या लढाईनें त्याचा अंत झाला. सन १८१५ त त्याच्या जागीं जर्मनसंयुक्तसंस्थानसंघाची स्थापना झाली. सन १८१४ च्या पावसाळ्यांत जर्मनीच्या पुनर्घटनेची योजना तयार करण्याचें काम ऑस्ट्रिआ, प्रशिआ वर्तान छोटीं संस्थानें यांवर सोंपविण्यांत आलें. सन १८१५ त जून महिन्याच्या आठव्या तारखेस ही योजना जाहीर करण्यांत आली; परंतु सन १८१३-१४ सालीं मारीन किंवा मरेन या तत्त्वावर जो घनघोर संग्राम झाला, त्यामुळें उत्पन्न झालेल्या आकांक्षां वर त्या योजनेनें विरजण पडून लोकांचा अगदीं हिरमोड झाला मेटर्निक याच्या दडपशाहीमुळें उत्तर जर्मनींतील देशाभिमानी लोकांच्या अमर्याद आकांक्षा खचीं झाल्या. या देशभक्तांचें समाधान करणें फार दुर्घट होतें, हें कबूल केलेंच पाहिजे. नेपोलिअननें ज्यांना राजपद दिलें तें आतां त्याच्या कचाट्यातून मुक्त झाले व त्यांनीं गेलीं आठ वर्षें आपल्या राज्यांत चालविलेला स्वैराचार शक्य तितका कायम ठेव-

ण्याचा निश्चय केला. ऑस्ट्रिआला त्याच तत्त्वाचा अंगिकार करणें सर्वतोपरि भाग होतें. प्रशिअन राष्ट्रांतील लोकांचा कल सर्वसाधारणतः जरी प्रगतीचे मार्गाकडे होता तरी राजा व त्याचे मंत्री यांची अंतःकरणप्रवृत्ति मेटर्निकच्या इतकीच प्रगतीच्या मार्गापासून विमुख होती अर्थात्च या पांच राष्ट्रांनीं एकत्र बसून जो खल केला, त्याचा निर्णय असाधानकारक होऊन जर्मनीस नांवाला मात्र संयुक्त राष्ट्र हें पद लाभलें. सन १८१५ च्या जून महिन्यांत झालेल्या कायद्यावरून संयुक्त संस्थानांची 'डायेट' सभा अस्तित्वांत आली. या सभेला संस्थानाचे, संस्थानच्या गटाचे अथवा स्वतंत्र शहराचे एकंदर १२ प्रतिनिधि येणार होते. संस्थानांच्या गटाच्या, किंवा स्वेगळ्या संस्थानच्या शास्त्यांनीं या तिनिधींची नेमणूक केली होती. मेन नदीवरील फ्रँकफोर्ट शहर हेंही सभा भरण्याचें ठिकाण ठरविलें होतें. सन १८१६ च्या नोव्हेंबर महिन्यांत या डायेट सभेची बैठक झाली व शेवटली बैठक १८६६ सालीं आगस्टांत झाली इतक्या अवधींत जर्मनीचें एकीकरण घडवून आणण्याच्या कामीं 'डायेट' सभेकडून म्हणण्यासारखी खटपट बिलकूल झाली नाहीं, पण ऑस्ट्रिआचें वर्चस्व मात्र सर्वांत अधिक असें होतें. सन १८१५ ते १८४८ पर्यंत मेटर्निक याच्या अनियंत्रित राज्यकारभारांत व पुढें सन १८४८ त उद्भवलेल्या दंगे धोप्यानंतर जी प्रतिगामी राज्यव्यवस्था सुरू झाली, तींत ऑस्ट्रिआनें आपल्या वर्चस्वाचा उपयोग प्रजाजनांच्या स्वातंत्र्याबद्दलच्या महत्त्वाकांक्षा दडपून जिरवून टाकण्याकडेच केला. आपली बडेजाव वाढविणें व प्रशिआची

मानखंडना करणें हें ऑस्ट्रिआ या धोरणाचें मूलतत्त्व होतें ही डायेट सभा एकावन्न वर्षे अस्तित्वांत होती. यांपैकीं सरासरी तीन वर्षे म्हणजे जुलई १८४८ ते मे १८५१ पर्यंत जरी तिचे अधिकार तात्पुरते काढून घेतले होते तरी या एकंदर अवधींत खऱ्या देशभक्तिपर तत्त्वांची जोपासना करून त्यांच्या बळणावर राज्यपद्धति चालविण्यास या सभेस पुष्कळ अवसर मिळाला होता. परंतु तसें कांहीं न करितां सभेनें आपलें बुद्धिसामर्थ्य क्षुद्र कारवाया व दडपशाही करण्यांतच खर्च केलें.

सन १८४८ चील राज्यक्रांति.

डायेट सभेचें वर्तन परच्छंदानुवर्ति व तिच्या दर्जास कमीपणा आणणारें असें होतें. जर्मनीसंबंधीं कांहीं प्रश्नांची वाटाघाट चालू असतां मेटर्निक या सभेच्या द्वारें आपले विचार वाटेल तसे जाहीर करी. अशा स्थितींत सन १८४८ च्या फेब्रुवारी माहिन्यांत पॅरिस येथें जी राज्यक्रांति झाली, तिच्यामुळें या सभेस मोठा धक्का बसून ती खडबडून जागी झाली. याच राज्यक्रांतीमुळें जर्मनींतील प्रत्येक संस्थान या लोकांस आपण त्वरित व निश्चयपूर्वक कांहीं तरी हा चाल केली पाहिजे असा हा औपणांस इशाराच मिळाला आहे, असें वाटलें. याच वेळीं फेब्रुवारीच्या २७ व्या तारखेस मॅनहीम येथें आपल्या मायभूमीकरितां कांहीं अल्पशा तरी सुधारणा कशा घडवून आणितां येतील, याचा विचार व्हावा म्हणून देशभक्तांची सभा भरली होती त्या सुधारणा म्हणजे मुद्रणस्वातंत्र्य, पंचांच्या

साहाय्यानें खटल्यांची चौकशी, हत्यारें वापरण्यास मोकळीक व लोकांच्या प्रतिनिधींच्या सल्ल्यानें राज्यकारभार ह्या होत्या. पॅरिसमध्यें झालेल्या चळवळीन अधिकारीवर्गाच्या पोटांत मोठी धास्ती उत्पन्न होऊन जिकडे तिकडे ह्या सूचनांचा स्वीकारच होत गेला बॅडेन संस्थानानें पुढाकार घेतला व बाकीच्या संस्थानांनीं त्याचें अनुकरण केलें. आस्ट्रिअन व प्रशिअन सरकारांखेरीज इतरनीं अपवादात्मक कायदे रद्द करण्याचें व शासनपद्धतीशीं इमान पाळण्याबद्दल सैनिकांकडून शपथ घेवविण्याचें वचन दिलें त्याचप्रमाणें भिन्न भिन्न धार्मिक पंथांची राजकारणदृष्ट्या समता, राजमंत्र्यांची जबाबदारी, न्यायाधिशांचें स्वातंत्र्य व इनामदारी हक्कांच्या अवशेषांचें उच्चाटन इत्यादि गोष्टी जाहीर करण्याचेंहि अभिवचन त्यानीं दिलें राजकर्त्यांकडून या गोष्टीस बहुतेक विरोध झालाच नाहीं म्हटलें तरी चालेल. बव्हेरिआमध्यें दंगेधोपे झाले. परंतु ता. २० मार्च रोजी लुई राजानें राजपदत्याग केल्यामुळें तेहि दंगेधोपे शांत झाले. दरम्यान् तर शहराप्रमाणेंच फ्रँकफोर्ट शहरीं प्रजाजनांचा उत्साह व चित्तक्षोभ हे अगदीं अनावर होऊन गेले होते व म्हणून 'डायेट' सभेनें ता. ३ मार्च रोजीं एक ठराव केला या ठरावान्वयें संयुक्तसंस्थानसंघामध्यें प्रविष्ट असलेल्या प्रत्येक संस्थानास कोणतेंहि वर्तमानपत्र किंवा पुस्तक परवानगीशिवाय प्रसिद्ध करावयाचें नाहीं हें नियंत्रण रद्द करण्याचा व कांहीं अटींवर मुद्रणस्वातंत्र्य जाहीर करण्याचा अधिकार देण्यांत आला प्रजेतील खळबळ एकसारखी वाढतच आहे. असें पाहून 'डायेट'

सभेनें जर्मनीच्या शास्त्यांस देशाची पुनर्घटना करण्याच्या प्रश्नाचा ऊहापोह करण्याकरितां फ्रँकफोर्टला तुम्ही आपले प्रतिनिधि पाठवून द्या, अशा निमंत्रणपत्रिका रवाना केल्या या निमंत्रणपत्रिका 'डायट' सभेनें पाठविल्या, याचा अर्थ तिनें आपल्याच मृत्यूची द्वाही जिकडे तिकडे फिरविली असा झाला असें प्रत्ययास आलें. राष्ट्रीय आकांक्षांची एवढी मोठी खळबळ उडाली कीं, लोकांच्या मनाला सभेचा अगदीं विसर पडून तिचा लय झाल्यासारखाच झाला. १८४८ जुलई ते १८५० मेपर्यंत तीन वर्षांत तिची एकहि बैठक झाली नाहीं. आपल्या लोकांना अप्रिय अशा शासनपद्धतींच्या अंतःशत्रूंवर विजय मिळाल्यावरावर ऑस्ट्रिआनें केली ती खटपट कली नसती तर 'डायेट' सभेचें नांव पुनः ऐकूंहि आलें नसतें. ऑस्ट्रिअन सत्तेचें राजकारण महत्त्वाकांक्षेच्या पायावर उभारलें होतें. या राजकारणाचा पुरस्कार करणारा कर्तृत्ववान् प्रतिनिधि हें राजकारण पूर्णतेस नेण्य करिता ज्या अनेक योजना तयार करीत होता त्यांची योग्य जुळणी होण्यास यास बाह्यतः तरी राष्ट्राची संमति मिळणें आवश्यक होतें म्हणून त्यानें १८५० सालीं ह्या मृतप्राय 'डायेट' सभेचें कसें पुनरुज्जीवन केलें व तिच्या केवळ नांवाचा उपयोग त्यान जर्मनीवर ऑस्ट्रिअन सत्तेची स्वैरेच्छा लादण्याच्या कामीं कसा केला हा सर्व प्रकार पुढील हकीकतीवरून वाचकांच्या ध्यानांत सहज येईल. ही सभा १५ वर्षे काशी प्राण धरून राहिली व पुढें कौंट बिस्मार्क या तडाक्यांत तिचा ही इतर बेगडी संस्थाप्रमाणें कसा अंत झाला, याचें वर्णन योग्य वेळीं ओघानें पुढें येईलच.

वरील क्रांतीचे प्रथम परिणाम.

सन १८४८ त लोकमताचा स्फोट झाल्यावर जर्मनींत ज्या घडामोडी झाल्या, त्यांचा विचार करितांना पुढील दोन मुद्दे ध्यानांत धरणें आवश्यक आहे. पहिल्या अठरा महिन्यांत ऑस्ट्रिआ आपल्या कार्यांची व्यवस्था लावण्यात इतका मग्न होऊन गेला होता कीं, त्याला जर्मन भागांची विल्हेवाट लावण्याच्या बाबतींत निश्चयात्मक रीतीनें लक्ष घालण्यास फुरसत नव्हती. दुसरा मुद्दा असा कीं, जर्मनांस राष्ट्रीयत्व प्राप्त होण्यास जो मार्ग चोखाळावयास पाहिजे होता तो मार्ग ऑस्ट्रिआपेक्षां प्रशिआच दाखवून देण्यास जास्त समर्थ आहे असा जर्मनींतील देशभक्तांचा भरंवसा होता. हे नूसबर्ग राजे ज्या संमिश्र राज्यावर राज्य करीत होते, त्या राज्याची सन १८४८ च्या राज्यक्रांतीच्या वावटळीनें जितकी वाताहत झाली तितकी पूर्ण वाताहत यूरोपांतील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राची झाली नाही, इतकें नमूद केलें म्हणजे पुरें आहे. लाबर्डी, व्हेनिस, बोहेमिआ, हंगारी ह्या प्रांतांतून, इतकेंच नव्हे तर खुद्द राजधानींतहि बंडाळी माजल्यामुळें ऑस्ट्रिआची स्थिति हुबेहूब समुद्रकिनाऱ्यावर आदळलेल्या व मोठमोठ्या लाटांबरोबर झगडत असलेल्या भग्न तारवासारखी झाली होती या दुर्दशेतून लौकरच वर डोकें काढून फेब्रुवारी १८४८ च्या पूर्वीचा दिमाख व बेगुमानपणा पुनः दाखविण्यास ऑस्ट्रिआनें सुरुवात केली. परंतु १८४८ त ऑस्ट्रिआ अगदीं विपन्नावस्थेंत मग्न झालेला दिसला आणि सर्वांची दृष्टि व अंतःकरणें औत्सुक्यानें व आतुरतेनें प्रशिआ व त्याचा राजा यांजकडे लागून राहिलीं.

प्रशिआचा राजा चौथा फ्रेड्रिक विल्यम.

अशा स्थितींत बर्लिन व फ्रँकफोर्ट येथें धुमाकूळ कसा माजला, त्याचें पर्यवसान शेवटीं कोणत्या धोरणांत झालें त्या धोरणाचा प्रशिआनें नीट फायदा घेतला असता तर २० वर्षांनीं १८७१ त जें साम्राज्य स्थापिलें तें १८५१ तच कसें स्थापितां आलें असतें याचें संक्षिप्त वर्णन देण्यापूर्वी प्रशिआवर त्यावेळीं राज्य करीत असलेल्या राजाच्या स्वभावाचें यावेळीं थोडें निरीक्षण करणें अस्थानीं होणार नाहीं.

पॅरिसनें फ्रेंच राजाला त्याच्या कुटुंबासह राजधानींतून काढून लाविलें त्यावेळीं प्रशिआचा राजा चौथा फ्रेड्रिक विल्यम हा ५४ वर्षांचा होता. सन १८११–१४–१५ सालांच्या, मोठी खळबळ उडवून देणाऱ्या मोहिमेंत जरी यानें तरुणपणीं सैनिकाची नोकरी केली होती, तरी त्याची वृत्ति योद्धयाची नव्हती. 'कल्पनासृष्टींत वावरणारा' हा त्याच्याविषयींचा अभिप्राय अगदीं यथावत् आहे. त्याची झार निकालस याच्या ठायीं असलेली अमर्याद श्रद्धा बहुतेक परमेश्वराच्या ठिकाणीं असणाऱ्या श्रद्धेच्या जोडीला जाऊन पोहोंचली होती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. कोणत्याही तऱ्हेनें ऑस्ट्रिआस दुखविणें हें भयावह आहे, असें त्यास नित्य वाटत असे. राजाचें ऐश्वर्य व तें उपभोगणारे राजे यांच्याविषयीं त्याचा बहुमान इतका विलक्षण होता कीं, राजा व प्रजा यांच्यामध्यें जमीनअस्मानाइतकें अंतर आहे, असें त्यास वाटे. त्याचें मन भावनाप्रधान असून निश्चय करण्याच्या कामीं तें दुबळें होतें. तो जात्या उत्साही असतांही

सवयीनें आळशी बनला होता. त्याचा परिणाम असा झाला कीं, आपल्या दरबाराच्या सरदारांचे व आपले स्वतःचे परंपरेनें चालत आलेले अधिकार व हक्क जोंपर्यंत अबाधित चालू होते तोंपर्यंत प्रजा सुखी असावी अशी नुसती इच्छा दर्शविण्याच्या पलीकडे त्यानें कधींहि कांहींच केलें नाहीं. प्रजाजनांशीं बोलतांना गोड गोड शब्दांचा उपयोग करून त्यांस गोंजारण्यास तो नित्य तयार असे, परंतु राजकारणांत आपणास यथायोग्य स्थान मिळवून जबाबदारीनें काम करण्याचें सामर्थ्य यावं म्हणून साधनें मिळविण्याविषयीं जी त्यांची ओरड चालली होती, तीं साधनें होत होईल तों त्यास द्यावयाचीं नाहींत, असा त्याचा नेहमीं प्रयत्न चालू होता. वचनें पूर्ण त्याची इच्छाहि मनांत नसतां तीं वचनें देण्यास मात्र त्याची तयारी असे तो जर सोळाव्या लुईच्या जागीं फ्रॉन्स देशावर राज्य करीत असता, तर त्या हतभागी राजानें जितकें हृदयदौर्बल्य दाखविलें तितकेंच त्यानेंहि दाखविलें असतें. परंतु या दोन राजांच्या परिस्थितींत असें अंतर होतें कीं, सन १७८९-९० सालीं फ्रेंच सैन्यानें लोकपक्षास उचलून धरिलें, तर सन १८४८ सांत सैनिक, राजास एकनिष्ठपणें धरून राहिले.

१८४८ साल बर्लिनची स्थिति.

सन १८४८ च्या मार्च महिन्यांत लोकांच्या आकांक्षा व उत्साह यांस फार जोराचें मूर्तस्वरूप येत चाललें. सनदशीर प्रजास्वातंत्र्य याचा अतिविस्तृत अर्थ करुन तशा प्रकारचें स्वातंत्र्य मिळण्या-

विषयांच्या ओरडीबरोबरच, एकीच्या तत्त्वावर जर्मन राष्ट्राची पुनर्घटना झाली पाहिजे अशाबद्दल ओरड सुरू झाली बारिकसारिक गोष्टी वर्ज्य करून इतर कोणत्याहि बाबतींत लोकांच्या मागण्या अंशतःहि स्वीकारण्यास राजाची तयारी नव्हती. नियतकालिक प्रशिअन 'डायेट' सभेची बैठक होण्याचें निश्चित झालें आहे तेव्हां तुमच्या मागण्यांचा विचार त्या बैठकींत होईल असें सांगून या चळवळीच्या पुढाऱ्यांस आवरून धरण्याचा प्रयत्न राजानें त. ५ मार्च रोजीं केला. पुढें तीन दिवसांनीं छापखान्याच्या किंवा मुद्रणाच्या कायद्यांची दुरुस्ती करण्याचा विचार चालू आहे, असें लोकांस कळविण्यांत आलें; परंतु असल्या क्षुल्लक व आळेंबळें देऊं केलेल्या देणग्यांनीं लोकांचें समाधान न होतां त्यांचीं मनें अधिक चिरडीस गेलीं. पुढें सहा दिवस चिडलेल्या सामान्य लोकांचे थवेच्या थवे बर्लिन शहरांतून गस्त घालीत फिरत होते व ते सैनिकांबरोबर कांहीं तरी कुरापत काढून दोन हात करण्याची संधि मिळण्याची वाट पाहत होते असें दिसलें. इतर मोठ्या शहरांत विशेषतः व्हिएन्नांत ह्या चळवळीचा परिणाम काय झाला हें खात्रीलायक समजेपर्यंत निश्चित अशी कोणतीहि गोष्ट करावयाची नाहीं, असा राजाचा बेत उघड उघड होता. परंतु लोकांचें एकंदर धोरण पाहून कांहींतरी पाऊल पुढें टाकणें भाग झाल्यावर ता. १४ रोजीं त्यानें लोकांचीं मनें शांत व्हावीं म्हणून एक निर्जीव असा प्रयत्न केला. पार्लमेंटाची सभा ता. २७ ला बोलावून ड्रेसडेन येथें राजमंडळाची सभा भरेल तिज पुढें एकीकरणाचा प्रश्न चर्चेस खास येईल, असें अभिवचन देऊन

राजानें एक जाहीरनामा फिरविला. ह्या अदूरदर्शी जाहीरनाम्यानें बर्लिनचे नागरिक अधिकच संतप्त झाले; आणि तीन दिवस बर्लिन शहरीं सारखा धुमाकूळ माजून राहिला. व्हिएना येथें झालेल्या स्फोटाचा अकल्पित परिणाम ता. १५ रोजीं संध्याकाळीं कानीं पडल्यावर राजाच्या मनाची चिंता यत्किंचित्हि दूर झाली नाहीं. तरी पण त्यानें आपला हट्ट सोडण्याचें मनांत आणिलें नाहीं. व्हाइन प्रांतांतील लोकांची वृत्ति फार उच्छृंखल झाली आहे तिजकडे लक्ष न दिलें तर मोठें संकट ओढवेल, असें बजावणारें एक शिष्टमंडळ कोलोन येथून राजाकडे आलें होतें. दुसरेंही एक असेंच शिष्टमंडळ खुद्द बर्लिनहून आलें होतें. त्याचेंहि आग्रहपूर्वक सांगणें होतें कीं, लोकांच्या मागण्यांचा अनुकूल विचार करणें अत्यंत जरूर आहे. परंतु त्यांचा अनादर करून राजा कोणतीहि वाट न काढतां अजूनहि स्वस्थच होता. ता. १७ रोजीं तर त्यास झोंपहि आली नाहीं व तदनंतर त्यानें एक एक पाऊल माघार घेण्यास सुरुवात केली. ता. १८ ला मध्याह्नी त्यानें फरमान काढून पुढील गोष्टी त्यांत नमूद केल्याचें जाहीर केलें:—"मुद्रणस्वातंत्र्य दिलें आहे, ता. २ एप्रिल रोजीं संयुक्त प्रशिअन पार्लमेंट बोलाविलें आहे. जर्मनीचें पुनरुज्जीवन व्हावें म्हणून अत्यंत व्यवहार्य अशी योजना तयार करून तिची अंमलबजावणीहि व्हावी एतदर्थ अखिल जर्मनीच्या पार्लमेंटची बैठक भरविण्याच्या कामीं शक्य ती मदत करण्यास मी तयार आहें अस अभिवचन या शासनपत्रद्वारें मी देत आहे." या राजशासनपत्रानें निदान त्या वेळेपुरतें तरी लोकांचें समाधान झालें

20 APR 1990

असें दिसलें. राजवाड्याभोंवतीं टोळ्याटोळ्यांनीं लोकांची खूप गर्दी, पूर्ण समाधान व्यक्त करण्याकरितां जमली. राज्यक्रांतीच्या काळीं ज्यांच्या कारणांची मीमांसा कोणासही करतां येत नाहीं असे अनर्थ घडून येत असतात, त्याच प्रकारचा पुढें वर्णन केलेला अनर्थ घडला. त्यावेळचा तो सर्व देखावा अंतःकरणवृत्ति उचंबळून सोडणारा होता. राजवाड्याभोंवतीं लोकांचे थवेच्या थवे जमले होते. राजानें गर्दीच्या पुढच्या पुढच्या रांगांतील लोकांना तरी निदान आपलें भाषण ऐकूं जावें म्हणून पराकाष्ठा केली. परंतु त्याचे श्रम व्यर्थ गेले. १७९१ च्या जूनच्या विसाव्या तारखेस पॅरिस शहरीं जी स्थिति होती, तिच्यांत व या स्थितींत बरेंच सादृश्य होतें. मागच्या मागच्या रांगांतील लोकांनीं पुढच्या पुढच्या लोकांस जोरानें ढकलण्याचा इतका एकसारखा सपाटा चालविला होता कीं, ती धक्काबुक्की सहन करणें अशक्य झालें. चेंगराचेंगरी बंद व्हावी व उसासा टाकण्यास पातळाई व्हावी म्हणून तेथून निरनिराळ्या मार्गांनीं निघून जाण्यास लोकांस हुकूम सोडण्यांत आला. समुद्रासारख्या पसरलेल्या अफाट जनसमूहामध्यें अशिक्षित लोकांचाच भरणा फार असतो, व त्यामुळें लोकांची गर्दी, अपघात न होतां, सहज ओसरून जाणें दुरापास्त असतें. अशा स्थितींत घोंटाळा व अव्यवस्था न होण्यास निश्चित असा एकच उपाय असतो, तो म्हटला म्हणजे, गर्दींतील लोकांचा विचार व कृति यांची एकवाक्यता हा होय, व त्याचा बहुतकरून अभावच असतो. प्रस्तुत प्रसंगीं गर्दींतील लोकांस अधिक घोंटाळा व अव्यवस्था न होऊं देतां सहज

बाहेर पडणें शक्य झालें नाहीं. ज्या सैनिकांनीं राजाचा हुकूम ऐकिला होता, त्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं, लोकांनीं हुकूम अमान्य केला व म्हणून त्यांनीं बंदुका झाडल्या. लोकांस धसका बसून जो अधिकच गोंधळ उडाला, त्यांत घोडेस्वार व पायदळ यांनीं पुढें सर सावून हल्ला चढवून, लोकांस पिटाळून देऊन गर्दी मोडली. परंतु लोक चवताळून त्यांचा राग उद्दीपित झाला होता; रक्तपातहि झाला व म्हणून शहराच्या सर्व भागांतून लोक जमा होऊन त्यांनीं झटापाट चालू ठेविली, व रात्रीं संरक्षणार्थ तात्पुरती तटबंदी उभारण्याचा क्रमहि आरंभिला ता. १९ ला भयंकर लढाई जुंपण्याचा फार मोठा संभव दिसला. इतक्यांत राजानें "सर्व सैनिकांनीं माघार घेऊन राजवाड्यांत येऊन बसावें, असा हुकूम सोडावा" या सल्ल्यास आपली अनुमति असल्याचें जाहीर केलें. कारण घडलेल्या प्रकारामुळें राजाला अत्यंत वाईट वाटत होतें. ज्या सैनिकांना हा हुकूम मिळाला त्यांना शहर सोडून निघून जाण्याविषयीं हा हुकूम आहे असें वाटून ते निघून गेले व शहराचें संरक्षण करण्यास कोणीहि जाग्यावर राहिला नाहीं. जनता आतां जेत्यांच्या जागीं होती, व तिनें पॅरिस शहरांतील सामान्य जनसमूहानें वर उल्लेख केलेल्या सारख्या प्रसंगीं जें वर्तन केलें होतें त्यापेक्षां प्रस्तुत प्रसंगीं फार उदार व मोठेपणाचें वर्तन केलें. सैनिकांच्या अविवेकानें व घाईघाईनें केलेल्या कृतीचे दुष्ट परिणाम राजाच्या दृष्टीस पडावे, एवढाच लोकांचा हेतु होता; म्हणून त्यांनीं ठार झालेल्या लोकांचीं शवें राजवाड्याच्या अंगणांत आणवून त्यांच्या जखमा उघड्या करून

राजास दाखविल्या. राजा गच्चीवरून खालीं उतरून आला व डोक्याची टोपी काढून मृताच्या शेजारीं उभा राहिला. त्याचें सहानुभूतिपूर्ण परंतु स्वतःच्या प्रतिष्ठेस अनुरूप असें वर्तन पाहून, सर्वांनीं त्याची वाहवा केली. त्याच दिवशीं त्यानें राजकारणप्रकरणीं गुन्ह्यांबद्दल सर्वसाधारण क्षमेची द्वाही फिरविली; हत्यारें वापरण्याची परवानगी दिली; प्रतिगामी मंत्रिमंडळ काढून टाकिलें व प्रगमनशील लोकांमधून निवड करून नवें मंत्रिमंडळ बनविलें. दुसऱ्या पक्षीं लोकांनीं, झालेल्या अनिष्ट प्रकाराबद्दल राजास बिलकूल दोष दिला नाहीं. तदनंतर प्रजेच्या हितास घातुक असा सल्ला दिल्याबद्दलचा सर्व दोष प्रजाजनांनीं त्याच्या भावाच्या—जो पुढें बादशहा पहिला विल्यम हें पद पावला—माथीं मारला; व या राजपुत्रानें आपल्यावर लोकांची इतराजी झाली आहे, असें पाहून लंडनला निघून जाण्याची संधि साधली.

राजा व प्रजा यांचा समेट.

ता. २१ रोजीं बर्लिनचे रहिवासी यांचा पद्धतशीर समेट झाला. जर्मन एकीचें सूचक असें तीनरंगी निशाण धारण करून राजा मिरवणुकीच्या अग्रभागीं घोड्यावर बसून चालला होता. लोकसमूह त्याला 'जर्मन बादशहाकी जय' असा घोष करून अभिवादन करीत होता व तोंहि सार्वत्रिक घोका उत्पन्न झाला असतां सर्वांवर ज्या जबाबदाऱ्यांचा बोजा, पवित्र कर्तव्य म्हणून, येऊन पडतो त्याविषयीं मोठ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगत होता प्रजाजनांचा

अत्यंत धिक्कार करणाऱ्या या राजाला त्यांच्याकडून बादशहा या शब्दानें होत असलेला हा जयघोष विषवत् कडू वाटला. आपणांस हा सर्व प्रकार रुचत नाहीं असें खुणांनीं दर्शविण्याचा त्यानें प्रयत्न केला व जर्मनीच्या इतर अधिपतींचे हक्क मी लुबाडून घेण्यास तयार नाहीं असें त्यानें लोकांस पुन पुनः बजावून सांगितलें तथापि स्वथळीं परत आल्यावर त्यानें एक दुसरें फर्मान काढिलें. त्यांत धोक्याच्या प्रसंगीं मी सर्वांचें धुरीणत्व घेण्यास तयार आहें व इतउत्तर प्रशिआचा जर्मनींत पूर्ण अंतर्भाव झाला असें स्पष्ट लिहून एकाच सार्वभौम राजाच्या नेतृत्वाखालीं सर्व संस्थानाधिपति व अखिल प्रजाजन एकवटून अनन्य-भावानें साम्राज्याची सेवा करतील तर त्यांतच राष्ट्राचा तरणोपाय आहे, असें लोकांना उघडपणें बजाविलें होतें. परंतु या वेळचे त्याचे उद्गार व कृति यांवरून त्याच्या अंतर्यामींच्या ठाम समजुती काय आहेत, याची अंधुक अंधुक कल्पनासुद्धां लोकांस करितां आली नाहीं पुढें कांहीं दिवस लोटल्यावर एका प्रतिनिधिशीं तो एकांतीं या (मार्च ता. २१) दिवशींच्या आपल्या वर्तनाविषयीं बोलतां बोलतां असें म्हणाला कीं, शहरांतून निघालेली ती नामांकित मिरवणूक व तिच्या अनुषंगानें घडलेल्या गोष्टी म्हणजे आपणांला प्रयोग करून दाखवावें लागलेलें एक हास्यरसप्रधान नाटकच होय.

फ्रेडरिक विल्यमचा अडचणींतून निसटण्याचा प्रयत्न.

अशा रीतीनें शांतता स्थापित होऊन प्रगमनशील पक्षाची सरशी खास होणार असें जरी वाटूं लागलें होतें, तरी राजाच्या

परिस्थितींत अजून अनेक अडचणी दबा धरून होत्याच. ऑरेंज घराण्याचा वारस या नात्यानें स्वित्झर्लंडांतील न्युकॅटेल नांवाचें छोटें संस्थान प्रशिआच्या राजाच्या अंमलाखालीं आलें होतें. एकंदर राष्ट्रांत जी खळबळ उडाली होती, तिचा फायदा घेऊन या संस्थानांतील प्रजेनें आपल्या अधिपतीचें स्वामित्व झुगारून देण्याचा विचार केला. प्रशिअन पोल लोकांनीं राष्ट्रीय पुनर्घटना व्हावी म्हणून कांहीं मागण्या राजाकडे केल्या होत्या; व राजानें त्यांचें म्हणणें ऐकूनहि घेतलें होतें. त्या मागण्यांचा अनुकूल निकाल व्हावा म्हणून पोलिस लोकहि आग्रहान धरणें धरून बसले होते अशा विकट स्थितींत स्क्लेस्विग–होल्स्टीन येथील लोकांकडून डेन्स लोकांच्या विरुद्ध आम्हांस मदत करा अशी मागणी आली, व तीमुळें राजास प्रस्तुत अडचणींतून थोडी उसंत घेण्यास सवड मिळाली

याविषयीं थोडक्यांत हकीगत अशी आहे:–" आम्ही जर्मन प्रजा आहों म्हणून राष्ट्रीय जीवनक्रमास पोषक असे कांहीं हक्क आम्हांस मिळणें वाजवी आहे " अशी मागणी करण्याकरितां स्क्लेस्विग–होल्स्टीन येथील एक शिष्टमंडळ कोपेनहेगनला गेलें. ते हक्क येणेंप्रमाणें:—स्क्लेस्विगला जर्मन संघांत प्रवेश मिळणें; स्क्लेस्विग–होल्स्टीनला सर्वसाधारण शासनपद्धति लागू करणें; मुद्रणस्वातंत्र्य देणें; अप्रिय झालेल्या गव्हर्नरास कामावरून दूर करणें. डेन्मार्कच्या राजानें या मागण्या नाकारिल्याबरोबर लोकांनीं पूर्ण शांततेनें राज्यक्रांत घडवून आणिली, अधिकाऱ्याला कामावरून दूर केलें, त्याच्या जागीं

व 343
2996

पांच अधिकारयुक्त पंचांचा नेमणूक केली, एक सर्वसाधारण पार्लमेंट सभा बोलाविली व अधिकारी आणि प्रजा यांच्या दरम्यान् झटापट सुरू होणें अपरिहार्य असल्यामुळें तींत लोकपक्षास साहाय्य मिळावें म्हणून बर्लिनकडे मागणी घाडिली.

फ्रेडरिक विल्यम यानें मोठ्या आनंदानें मदत करण्याचें कबूल केलें व प्रशिअन फौजेला 'डचीज' मधून प्रवेश करण्यास हुकूम सोडले. ही मदत अगदीं योग्य वेळीं आल्यामुळें ही राज्यक्रांतिकारक चळवळ जोरानें चालू राहिली. ह्या प्रशिअन सैनिकांनीं 'डचीज' व्यापून टाकिल्या व डेन लोकांनीं आपल्या लढाऊ जहाजांनीं जर्मनीच्या व्यापारी आरमारावर हल्ला करून त्यास उलट जबाब दिला. ही स्थिति ता. ६ ऑगस्टपर्यंत चालून प्रशिआ व डेनमार्क यांनीं तात्पुरत्या सात महिने मुदतीच्या तहनाम्यावर सह्या केल्या. या तहाच्या वाटाघाटींत फ्रँकफोर्टच्या राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि घेण्याचें डेन्मार्कनें साफ नाकारिलें.

जर्मनींतील महत्त्वाच्या चळवळी.

जर्मनींतील बुद्धिमान् लोकांचे विचार व कृति यांच्या मिलाफाचें फळ फ्रँकफोर्ट येथील सभा व तिची कामगिरी हें होय. ह्या विचारी लोकांच्या मतें नेपोलिअन बरोबर झालेल्या यशस्वी झटापटींपासून अपेक्षित फलप्राप्ति झाली नाहीं हें उघड होतें. जर्मन लोकांमध्यें एकीचा अभाव असल्यामुळें त्यान जर्मनीचा बहुतेक भाग दास्यावस्थेंत आणून सोडिला होता त्याची नेपोलिअनाच्या दास्यांतून सुटका

झाल्यावर जर्मन लोकांमध्यें पूर्वी जसें एकजीव होण्याचें सामर्थ्य नव्हतें, तसें तें अजूनहि त्यांच्यांत उत्पन्न झालें नव्हतें. तें नेपोलिअनाच्या जुलमाचें जोखड त्यांच्या मानेवरून निघालें, परंतु लागलेंच त्याच्या जागीं मेटर्निक यानें आपलें जूं आणून घातलें. १८१५ ते १८४५ इतक्या अ धींत विचारस्वातंत्र्याच्या व लेखनस्वातंत्र्याच्या बाबतींत जितकी दडपशाही गाजली तितकी दडपशाही पूर्वी कधींहि अनुभवास आली नव्हती. जें नष्ट वैभव पुनः प्राप्त करून घेण्याकरितां गेलीं ३५ वर्षें जर्मनींची धडपड चालली होती, त प्राप्त करून घेण्याची संधि संनिध आली आहे असें वाटतांच हालचाल सुरू झाली. माणसांमाणसांमध्यें आणि निरनिराळ्या मध्यवर्ती स्थलांमध्यें दळणवळण सुरू झालें. फ्रँकफोट हें उत्तर व दक्षिण भागां[illegible] मध्यवर्ति असून 'डायेट' सभेचें संमेलनस्थान होतें. म्हणून ह्या ठिकाणीं त्या कालाच्या प्रचलित विषयांची चर्चा करण्याच्या कामीं विशेषतः जे लोक गुंतले होते अशा ५०० लोकांनीं फ्रँकफोटे येथें जमून तेथें अखिल जर्मनीच्या प्रतिनिधींचें राष्ट्रीय पार्लमेंट भरविण्याची तयारी करावी असें ठरलें. हे ५०० लोक एकत्र जमून त्यांनीं पांच दिवस बैठकी केल्या व नवीन पार्लमेंटाच्या सभासदांच्या निवडणुकीविषयीं ठरावहि पसंत केले; पण शेवटीं आपआपसांत भांडण्यासहि त्यांनीं आरंभ केला. ह्या ५०० लोकांच्या सभेस 'पूर्व पार्लमेंट' अशी सज्ञा होती. राज्यक्रांतीच्या वेळीं सर्व ठिकाणीं जहाल मंडळीहि असतेच. तसेच जहाल सभासद याहि पार्लमेंटांत होतेच. परंतु त्यांच्या बाजूला मताधिक्य नव्हतें.

त्यांनीं वादविवादांत हार खाल्लयावर बँडेन येथें बंड उभारलें. त्यांत त्यांचा मोड झाल्यावर त्यांस अमेरिकेंत हद्दपार केलें.

फ्रँकफोर्टची राष्ट्रीय सभा.

दरम्यान् निवडणुकी होऊन ता. १८ मे रोजीं राष्ट्रीय सन-दशीर सभा भरली सभासदांचा मुख्य हेतु जर्मनीचें एकीकरण होण्यास खात्रीनें उपयोगीं पडेल अशी घटना तयार करणें हा होता. त्या वेळची परिस्थिति, जिकडे तिकडे माजलेली अंदाधुंदी, नवीन उत्पन्न झालेला उत्साह—याचा व्यय पुष्कळ प्रसंगीं भलत्याच कामीं होत असे—संस्थानाधिपतींच्या व राजे लोकांच्या पोटांत भरलेली धडकी, आणि लोकांचा बेफामपणा या सर्व गोष्टी आपण विचारांत घेतल्या असतां, आपणांस असें कबूल करावें लागेल कीं, सभासदांनीं योजिलेल्या कामाची सिद्धि होणें अगदीं असंभवनीय होतें. अत्यंत उत्साही व जर्मनीचें एकीकरण घडवून आणण्यास अत्यंत आतुर असे गुणवान् शेंकडे सद्गृहस्थ यांत बरेचसे खोल व दूरवर विचार करणाऱ्यांचाहि समावेश होता—आजपर्यंत परस्परांपासून फटकून व स्वतंत्रपणानें वागणाऱ्या संस्थानांना सैन्याच्या साहाय्याशिवाय लागू करितां येईल अशा घटनेची योजना तयार करण्याकरितां सत्य संकल्पानें एकत्र जमले होते. ही योजना झटपट तयार करणें व विलंब न लागतां तिला पसंती मिळविणें हा एकच मार्ग ती पूर्ण यशस्त्री होण्याला खुला होता. हें जर न साधलें तर यशःपाप्त्यर्थ ऑस्ट्रिआ अगर प्रशिआ या दोन बलिष्ठ राष्ट्रांपैकीं

एकाचें आनुकूल्य योजनेला मिळवून घेणें सभेस प्राप्त होतें. यशः प्राप्तीला सर्वस्वी जरूर अशा त्वरेनें काम पार पाडण्याचें सोडून देऊन राष्ट्रीय सभेंतील तत्त्वज्ञानी, पंडित व फाजील उत्साही लोकांनीं मूलभूत तत्त्वें हुडकून काढण्यांत, काल्पनिक आक्षेपांची व स्क्लेस्विग होल्स्टिन प्रश्नाची चर्चा करण्यांत मौल्यवान् काळ व्यर्थ खर्च केला. ह्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांची योजना तयार होणार, इतक्यांत ऑस्ट्रिआनें आपलें वर्चस्व पूर्ववत् पुनः स्थापित केलें व लोकांच्या उत्साहाची वाफही जिरून गेली.

राष्ट्रीय सभेचा दीर्घसूत्रीपणा.

ह्या स्थळीं १८४८–४९ त ह्या राष्ट्रीय सभेचीं जीं स्थित्यंतरें झालीं त्यांची विशेष विस्तारानें छाननी करण्याचें कारण नाहीं. सभेस आरंभ ता. १८ मे रोजीं झाला, परंतु ता. २८ जून उजाडली तरी परराष्ट्रांवरोबर पत्रव्यवहार वगैरे करण्याच्या कामीं सभेस निश्चित अधिकार कोणते आहेत, याचा निकाल झाला नव्हता. ता. २९ जून रोजीं साम्राज्याच्या मुख्याधिपतीच्या जागीं ऑस्ट्रिआचा आर्चड्युक जॉन याची हंगामी योजना झाली. अंमलबजावणी करणाऱ्या प्रधानाधिकाऱ्याच्या जागीं कोणातरी संस्थानाधिपतीची कायमची निवड होईपर्यंत आर्चड्युक जॉन याची मुख्य शास्ता म्हणून झालेली नेमणूक चालावयाची होती. याच वेळीं सभेनें सर्व मुख्य अधिकारसूत्रें आपल्या हातांत आहेत, असें अप्रत्यक्ष रीतीनें सुचविणारें एक फर्मान काढून

तें सर्व जर्मनीभर तळ देऊन असलेल्या लष्करांस वाचून दाखवावें असा हुकूम सोडिला होता. ह्या फर्मानांतील मजकूर कानीं आल्यावर देशांतील निरनिराळ्या भागांच्या संस्थानाधिपतींनीं जे उद्गार काढले, त्यावरून राज्यघटना घडविणारांनीं आपणांस त्वरा करण्याविषयीं हा इषाराच आहे असें समजावयास पाहिजे होतें. प्रशिआचा राजा फ्रेडरिक विल्यम याला तर विशेषच क्रोध आला होता. कोलोन येथें त्याची व आर्चड्युक जॉन याची भेट झाल्यावर त्याचा क्रोधाग्नि जरी थोडा शमला तरी राष्ट्रीय सभेचें शिष्टमंडळ त्याच्या भेटीला आलें तेव्हां तो त्या मंडळाची कानउघाडणी पुढीलप्रमाणें करण्यास चुकला नाहीं. त्यानें मंडळास बजावून सांगितलें कीं आर्चड्युक जॉनच्या तोलाचे जर्मनींत इतर राजे आहेत व मी त्यांपैकीं एक आहें हें राष्ट्रीय सभेनें विसरून चालणार नाहीं.

फ्रेडरिक विल्यम याची बादशाहा म्हणून निवड.

इतकें झालें तरी राज्यघटना पुरी करण्याचें काम सभेनें त्वरित उरकून घेतलें नाहीं. जून महिन्याचे आरंभींच स्क्लेस्विग–होल्स्टीन प्रश्नाची चर्चा चालू झाली व त्यामुळें मुख्य गोष्ट बाजूला राहून सभेचें दौर्बल्य मात्र व्यक्त झालें. राष्ट्रीय सभेंतील असंख्य पक्षभेद व बॅडेन येथें उद्भवलेलीं बंडें आणि त्याचा मोड या गोष्टींचा नुसता उल्लेख करून त्यामुळें मुख्य व जरूरीच्या कामांकडे अवश्य लागणाऱ्या वेळेचा अपव्यय झाला, एवढें सांगितलें असतां पुरें आहे. एकीकरणाच्या कोणत्याहि योजनेंत ऑस्ट्रिअन सत्तेचा समावेश याचा अर्थ जर्मनेतरांच्या

संख्येचें आधिक्य असून चार कोटी प्रजेसह अखिल ऑस्ट्रिअन राज्याचा समावेश, असा आहे असें ऑस्ट्रिआचें म्हणणें पडल्यामुळें आस्ट्रिआ व सभा यांच्यामध्यें वितुष्ट आलें. यापेक्षां या गोष्टींचा जास्त विस्तार करणें इष्ट नाहीं. इतउत्तर जर्मन बादशहा ही पदवी कुलक्रमागत आहे, असें सभेनें २६७ विरुद्ध २५३ मतांनीं ता. २७ मार्च १८४९ रोजीं ठरविलें; ता. २८ रोजीं राज्यघटनेच्या योजनेचें दुसरें वाचन झालें व प्रशिआचा फ्रेडरिक विल्यम याची २९० मतांनीं बादशहा म्हणून निवड झाली, ती त्याच दिवशीं झाली, एवढें या ठिकाणीं नमूद केलें म्हणजे बस्स आहे.

फ्रेडरिक विल्यम याची परिस्थिति.

चौथा फ्रेडरिक विल्यम यानें या निवडणुकीच्या ठरावास कसें उत्तर दिले, याचें विवेचन करण्यापूर्वी प्रशिआमध्यें राजकारण कोणत्या धोरणास अनुसरून चाललें होतें व ऑस्ट्रिआची परिस्थिति काय होती, याकडे थोडी नजर फेंकणें जरूर आहे. डेन्मार्कबरोबर युद्ध उद्भवलें व त्याभुळें स्वदेशांतर्गत होत असलेले नानाविध त्रास कमी होऊन थोडेसें तरी स्वास्थ्य मिळेल, असें फ्रेडरिक विल्यम यास वाटलें येथपर्यंतची हकीकत मागें दिलीच आहे. प्रागतिकांच्या उत्साहातिरेकाला बाहेर पडून वाहून जाण्यास डॅनिश युद्ध हें एक खुलें द्वारच मिळालें, असा त्याचा समज होता. पुढें लवकरच ता. २२ मे रोजीं पहिली लोकसभा भरली. उत्तर जर्मनीतील हुशार माणसांनीं फ्रँकफर्ट सभेमध्यें सभासदस्थान पटकावल्यामुळें या सभेमध्यें

अगदीं मध्यम बुद्धीच्याच सभासदांचा भरणा झाला होता. या सभेचे हातून विशेषसें काम कांहीं झालेंच नाहीं. मधून मधून रस्त्यांमध्यें जे लहान लहान दंगेधोपे होत होते, ते मोडण्याचें सुद्धां या सभेस कठीण पडे. सरकारतर्फे जी घटना तिच्या पुढें विचाराकरितां मांडण्यांत आली होती, ती या सभेनें पाहिजे तितक्या प्रमाणांत लोकसत्तेच्या तत्त्वावर उभारलेली नाहीं म्हणून फेंटाळून लावली. तदनंतर मंत्रिमंडळानें राजीनामे दिले व नतर दहा दिवसांनीं एक नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वांत आले. या मंडळानें 'क्रियावान् मंत्रिमंडळ' असें नांव धारण केलें होतें. आरंभीं आरंभीं त्यानें घेतलेलें हें नांव यथार्थ आहे असें वाटलें, परंतु लवकरच असे कांहीं कूटप्रश्न उद्भवले कीं, ते सोडविण्याच्या कामीं त्याचें सर्व बुद्धिसामर्थ्य निष्फळ ठरलें. सरते शेवटीं अशिक्षित बाजारबुणग्या जनसमूहाच्या पुढाऱ्यांच्या बेफाम वर्तनानें व अतिरेकानें दडपशाहीचें धोरण धरणाऱ्या पक्षाचा मार्ग सहजच सुगम झाला. हळू हळू सुव्यवस्थाभिमानी पक्षांतील लोकांचा धीर पुनः जोरावत चालला, सैन्यांतील लोकांची स्वामिभक्ति अढळ होती आणि दहा पांच वेळां सत्रड देऊनहि सभा व्यवहारशून्य व कुचकामाची आहे असा राजास अनुभवहि आला. म्हणून त्यानें कौंट ब्रँडेनबर्ग यास अकस्मात् मुख्य मंत्रिपद दिलें व ता ८ नोव्हेंबर रोजीं सभा तहकूब करून तिनें ब्रँडनबर्ग येथें बैठक करावी असा हुकूम सोडला. दरम्यान राजधानीसभोवतीं सैन्य मोठ्या प्रमाणावर जमा होत चाललें व शहरास वेढा पडला असतां जी व्यवस्था करावी लागते,



ती केली जाईल असें जाहीर करण्यांत आलें. अजूनहि सभेचा विरोध करण्याचा निश्चय कायम आहे असें आढळून आल्यावर राजानें ता. ५ डिसेंबर रोजीं सभा बरखास्त केली, नवीन घटना जाहीर केली आणि सभासदमंडळें ज्यांत आहेत असें नवीन पार्लमेंट फेब्रुवारी रोजीं भरावें, असा हुकूम दिला.

सन १८४८ सालच्या शेवटल्या महिन्यांत व १८४९ सालच्या आरंभाच्या दिवसांत प्रशिआची परिस्थिति अशी होती दरम्यान् फ्रँकफोर्ट येथें प्रशिआच्या अध्यक्षत्वाखालीं जर्मनीच्या एकीकरणार्थ चाललेल्या प्रयत्नांचा काय परिणाम होतो, हें राजा संमिश्र भावनायुक्त अंतःकरणानें लक्ष लावून पहात होता. बादशहापद आपणांस देऊं करतील असें त्यास खास वाटत होतें. त्यांचा आपण स्वीकार करावा किंवा न करावा, ह्याचा विचार त्यानें स्वतःशीं फार वेळ मनःपूर्वक चालविला होता. हा विचार त्यांच्या मनांत प्रथमतः आल्यावर आरंभीं सभेचें म्हणणें आपण मान्य करावें, असें कांहीं वेळ त्यास निःसंशय वाटत असावें. सार्वभौम राजाचा मुकुट त्यास अर्पण करण्याकरितां पुढें केला, त्यावेळीं जे लोक त्याच्या आसपास होते, त्यांची अटकळ राजा मुकुट स्वीकारील अशीच झाली, यावरून वरील गोष्ट अगदीं उघड सिद्ध होते. त्याच्या मनाचे एकदां बनलेले ग्रह फार दृढ होते; जी गोष्ट आपल्या बरोबरीच्या लोकांनीं देऊं केली असतां त्यानें मोठ्या आनंदानें स्वीकारिली असती, ती कमी दर्जाच्या लोकांच्या हातून स्वीकारणें ही कल्पनाच त्याला अत्यंत तिरस्करणीय वाटे; यांतच

फ्रँकफोर्ट येथील सभेचा दीर्घसूत्रीपणा; तिच्या सत्तेस उतरती कळा लागल्याचे दाखले; झपाट्यानें होत असलेलें ऑस्ट्रिआचें पुनरुज्जीवन व दिवसेंदिवस वाढत चाललेलें ऑस्ट्रिआचें अरेरावीचें वर्तन ह्या गोष्टींची भर पडली या सर्व गोष्टींचा विचार मनांत येऊन सार्वभौमत्वसूचक मुकुट धारण केल्यास निश्चयेंकरून ओढावणाऱ्या संकटांचें हुबेहुब चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभें राहात असे. परंतु त्याचें मन दीर्घकालपर्यंत हेलखावे खात होतें. जर्मनींतील छोट्या संस्थानांनीं फ्रँकफोर्ट येथील योजना आपणांस पसंत होईल, असें दिग्दर्शन केलें होत. स्वतः राजानें (फ्रेडरिक विल्यम) संस्थानिकांस लिहिलेल्या पत्रिकेंत तिजविषयीं आपला अनुकूल अभिप्राय व्यक्त केला होता. परंतु प्रत्यक्ष देणगी पुढें केली जाण्याच्या अगोदर फेलिक्स स्क्वार्झेनबर्ग याच्या नेतृत्वाखालीं ऑस्ट्रिआनें जो उपक्रम केला त्यानें परिस्थिति जास्त बिकट झाली. इतकेंच नव्हे, तर राज्यक्रांतीचें वैशिष्ट्य पार नाहींसें झालें.

ऑस्ट्रिआ पुनः डोकें वर काढतो.

इतर सर्व जर्मन देशांचें राज्यक्रांतिमुळें झालेलें नुकसान एकत्र धरलें तरी त्यापेक्षां ऑस्ट्रिआचें नुकसान फार जास्त झालें होतें. कांहीं कालपर्यंत इटली व हंगेरीवरील ऑस्ट्रिआचा तावा नष्ट झाला. त्याची राजधानी व्हिएन्ना कित्येक वेळां क्रांतिकारी लोकांच्या हातीं लागली. परंतु ऑस्ट्रिआनें पूर्वस्थिति पुनरपि इतक्या अल्पकाळांत प्राप्त करून घेतली कीं, सर्व यूरपखंड तोंडांत बोटें घालून राहिलें.

नोरव्हा येथें (मार्च २३, १८४९) विजय होऊन मागोमाग मिलनचा तह झाला; व इटलींतील ऑस्ट्रिआच्या मालकीचीं स्थानें त्याच्या पुनः ताब्यांत आलीं. प्रिन्स वुइन्डिस्कार्झ यानें मोठा पराक्रम करून प्रेग व व्हिएन्ना येथील बंडांचा बंदोबस्त केला. सप्टेंबर १८४८ ते आगस्ट १८४९ पर्यंत ऑस्ट्रिआचा हंगेरीबरोबर तुमुल युद्ध-प्रसंग झाला त्यांत ऑस्ट्रिआला रशिआचें भरपूर साहाय्य असल्यामुळें त्याला पूर्ण यशःप्राप्ति झाली. मारेन्हिआंत आलमटझ येथें दिसेंबरच्या दुसऱ्या तारखेस बादशाहा फर्डिनांड यानें अवघा १९ वर्षांच्या तरुणबांड अशा आपल्या पुतण्यास राज्य अर्पण करून राजपदावरील आपला हक्क सोडून दिला. बादशाहा फ्रॅन्सिस जोसेफ राजपदारूढ झाला तत्पूर्वीच कांहीं थोडे दिवसांपासून राजकारणांमध्यें प्रख्यात प्रिन्स फेलिक्स स्क्वार्झेनबर्ग याजकडे धूरीणत्व आलें, व त्यानें आपल्या अल्पकालीन अमदानींत जर्मनीला आपल्या मर्जीप्रमाणें वांकविलें.

रशिआचें साहाय्य मिळवून इटालीवरील स्वामित्व पुनः मिळविणें व हंगेरींत राष्ट्रीय पक्षानें उभारलेलें बंड मोडणें ही सर्व कामगिरी फेलिक्स स्क्वार्झेनबर्ग याचीच होय. गतवैभव पुनः प्राप्त करून घेतलेल्या सार्वभौम राष्ट्रास शोभेल अशा दिमाखानें व बाणेदार रीतीनें तो बोलूं लागला. आपल्या स्वतःच्या राज्यांतील बेकीचा अगदीं नायनाट करणें व १८१५ ते १८४८ पर्यंत जर्मनींत ऑस्ट्रिआनें जें वर्चस्व अबाधित उपभोगिलें होतें, तें पुनः मिळवावयाचें, इतकेंच नव्हे तर, शक्य तर, त्याच्यांत

भरच घालावयाची, हें ध्येय फक्त त्या वेळीं त्यानें आपल्या दृष्टी-समोर ठेविलें होतें. त्यानें आपल्या कामास हात अशा कांहीं शिता-फीनें घातला कीं थोड्याच काळांत स्वराज्यांत तात्पुरती एकी होऊं लागली, व परराष्ट्रांत ऑस्ट्रिआचें वर्चस्व निश्चितपणें वाटूं लागलें. तो जर जास्त दिवस जगता व त्याच्याकडे अधिकार राहिला असता तर त्यानें केलेले फायदे टिकाऊ झाले असते. परंतु ही गोष्ट पूर्ण सिद्धीस जाण्यास जो कालावधि अवश्य लागावा, त्या मानानें तो फारच अल्पायुषी झाला. सन १८४९ त जर्मनीच्या एकीकरणाच्या कामीं जी प्रगति होत होती, तिच्यावर या पुरुषाच्या धोरणाचा काय परिणाम झाला, याचा या स्थळीं विचार करणें अवश्य आहे.

ऑस्ट्रिआ व फ्रँकफोर्ट येथील सभा.

जर्मनीच एकीकरण करून प्रशिआच्या नेतृत्वाखालीं त्याला संयुक्त संस्थानाचें रूप देऊन पुढें त्या संयुक्त संस्थानाचें एक अंग म्हणून ऑस्ट्रिआचा त्यांत समावेश करून घ्यावयाचा, असें फ्रँकफोर्ट येथील राष्ट्रीय सभेच्या मताधिक्य असणाऱ्या पक्षाचें धोरण आहे, असें मान-ण्यास भरपूर कारणें दिसून आलीं; तेव्हां जर्मनींतील इतर कोणत्याही राजाच्या हातांत सार्वभौमत्वाचीं सूत्रें देऊन कैसरचा दर्जा त्याच्या मानानें दुय्यम प्रतीचा लेखणें हें अत्यंत गैरवाजवी असून मी त्याचा जोरानें निषेध करितों, असें स्वार्झेनबर्ग यानें सर्वांस साफ कळविलें (फेब्रुवारी १८४९). एप्रिलच्या ५ तारखेस त्यानें ऑस्ट्रिआच्या सर्व प्रतिनिधींस परत बोलाविलें. याचीं कारणें पुढें देण्यांत येतलिच.

व्हिएन्ना येथें मोठी बंडाळी उसळली होती, तेव्हां मोरेव्हिआंतील क्रेमसीर हें शहर राजधानीचें ठिकाण केलें होतें या शहरीं एक पार्लमेंट सभा राज्यक्रांतीची लाट चालू असतांनाच भरण्याचें ठरलें होतें. परंतु ह्या सभेची बैठक आलमटझ येथें चालू असतां त्यानें ही सभा बरखास्त केली. या सभेनें घटनेचा मसुदा तयार केला होता, तो त्यानें एकीकडे सारून एक फरमान काढलें. तें आलमटझचें फर्मान या नांवानें लोकांस माहीत आहे; व सर्व ऑस्ट्रिअन राज्याला एकाच नमुन्याची व एकसूत्री घटना लागू केली आहे असें दर्शविण्याकडे त्याचा रोंख होता. या घटनेनें कैसरच्या सर्व प्रजेस समान हक्क मिळाले आहेत असें वरकांतीं दिसतें, परंतु खरा प्रकार असा होता कीं, त्याच्या राज्यांत या घटनेनें सर्वत्र अनियंत्रित राजसत्ता स्थापित झाली. कांहीं ठिकाणीं तर अजूनही पुंडाई चालूंच होती. आतां इतकें बरीक खरें कीं, जर्मन व स्लाव्ह प्रांतांना स्थानिक संस्था स्थापण्यास मुभा देणारीं कलमें या फर्मानांत होतीं. परंतु व्यवहार दृष्टीनें विचार केल्यास असें लक्षांत येईल कीं, या संस्थांचे अधिकार अत्यंत संकुचित होते.

स्कार्झेनबर्ग आणि प्रशिआ.

सॅक्सनी, बव्हेरिआ, वूर्टेबर्ग, हॅनोव्हर ह्या चार लहान राज्यांनीं कैसरचा दर्जा दुय्यम प्रतीचा केल्याबद्दल राष्ट्रीय सभेचा ऑस्ट्रिआनें जो जोराचा निषेध केला होता त्याला अप्रत्यक्ष रीतीनें पाठिंबा दिला होता. कारण यांनीं मतैक्यानें ज्या संयुक्त संस्थान

संघांत ऑस्ट्रिआचा अंतर्भाव नाहीं तो आम्हांस सर्वथैव मान्य नाहीं असें गभीरपणें जाहीर केलें होतें. आतां स्कार्झेनबर्गच्या मताप्रमाणें ऑस्ट्रिआचा समावेश ऑस्ट्रिआ म्हणेल त्याच अटीवर मात्र शक्य होता. ऑस्ट्रिआ जोडील किंवा मोडील. याचा अर्थ असा कीं, ऑस्ट्रिआ सांगेल त्या शर्ती जर कबूल झाल्या तर जर्मनींत ऑस्ट्रिआचें वर्चस्व खास स्थापित होणार; अथवा तीस वर्षेपर्यंत ज्या 'डायेट' सभेंत ऑस्ट्रिआच्या महती विरुद्ध कोणी अवाक्षर काढलें नव्हतें त्या 'डायेट' सभेची पुनः स्थापना ऑस्ट्रिआ करणार. ऑस्ट्रिआचा दर्जा कमी केल्याबद्दल ज्या पत्रकांत स्कार्झेनबर्ग यानें जोराचा निषेध केला होता, त्याच पत्रकांत त्यानें ऑस्ट्रिअन राज्यांतील परदेशीय मुलुखासह सर्व ऑस्ट्रिआच्या राज्याचा समावेश जर्मन संयुक्त संस्थान-संघांत व्हावा असें सुचविलें होतें. पुढें महिन्याच्या आंत आल्मटझचें फर्मान प्रसिद्ध झालें. या फर्मानाला अनुसरून ज्या नानाविध देशांस कैसरचें अनन्यगामी आधिपत्य कबूल होतें त्या सर्वांचा सरसकट एकाच गटांत अंतर्भाव झाला होता, व त्यामुळें फ्रँकफोर्ट येथें मोठी खळबळ उडून गेली. याच पत्रकाच्या प्रसिद्धीवरून प्रशिअन राजाच्या नेतृत्वाखालीं जर्मन राष्ट्राचें एकीकरण व्हावें, असें म्हणणाऱ्या पक्षांतील लोकांस आपलें काम त्वरित तडीस नेण्याचे झटून प्रयत्न करण्यास उत्तेजन आलें. मार्च ता. १८ रोजीं जर्मनीच्या धूरीणत्वाच्या जागीं प्राशिआच्या जागेची निवड झाली, असें मागें म्हटलें आहे. ती निवड याच पत्रकाचा प्रत्यक्ष परिणाम होय.

संयुक्त जर्मन राष्ट्राच्या देऊं केलेल्या धूरीणत्वाचा मान स्वीकारावा अगर नाकारावा हें ठरवितांना प्रशिआच्या राजानें जें वर्तन केलें, त्याच्या बरेवाईटपणाची छाननी करतांना त्या राजास ऑस्ट्रिआचें धोरण पूर्ण अवगत असून पुढें आलेल्या गोष्टीचा स्वीकार करणें म्हणजे पहिल्या प्रतीच्या बलाढ्य राष्ट्राबरोबर युद्धाच्या आखाड्यांत उतरण्यासारखें होतें, हें पक्कें ठाऊक होतें हें लक्ष्यांत धरलें पाहिजे युद्धास ठाकण्याची त्याची तयारी नव्हती, व झारचा पाठिंबा आपणास मिळेल असें त्यास वाटत नव्हतें. कारण पुढें लवकरच त्यास खात्रीलायक आधारानें कळून चुकलें कीं, त्या बलाढ्य राजाची पूर्ण सहानुभूति ऑस्ट्रिआच्या बाजूस होती. शिवाय असें कीं, त्याला ऑस्ट्रिआविषयीं नेहमीं एक प्रकारचा आदर वाटत असे, व जरी सन १८४९ च्या आरंभाला इटलींतील गेलेली सत्ता ऑस्ट्रिआस पुनः लाभली नव्हती व त्याचें सैन्य हंगेरीमध्यें गुंतलें होतें, तथापि दोन्ही जागीं ऑस्ट्रिआस यशःप्राप्ति होइल याबद्दल कोणासही शंका नव्हती या यशःप्राप्तीनंतर युद्धानुभवानें मुरलेलें व यश.संपादनानें उत्साहपूर्ण बनलेलें असें सैन्य ऑस्ट्रिआस पाहिजे तसा व पाहिजे तेव्हां उपयोग करण्यास अगदीं सज्ज ठेवतां येणें शक्य होतें. आपण राष्ट्रीय सभेनें देऊं केलेलें अग्रेसरत्व स्वीकारलें तर राज्यक्रांतीच्या बळावर निर्माण झालेल्या सभेच्या हातून त्याचा आपण स्वीकार केला असें होऊन राजाचे हक्क ईश्वरदत्त आहेत या तत्त्वाचा—या तत्त्वावर तर त्याची निस्सीम श्रद्धा होती—पुरस्कार करणाराविरुद्ध राज्यक्रांतीचा कैवारी

म्हणून आपणास आपल्या हक्कांचें संमथर्न करावें लागेल, ह्या विचाराचा पगडा त्याच्या मनावर जास्त बसला असेल, हें फार संभवनीय आहे. या गोष्टीच मोह त्याला अजूनही अनावर होता; आणि म्हणून ता २२ एप्रिल रोजीं संध्याकाळीं फ्रँकफोर्ट येथील सभेनें धाडलेलें शिष्टमंडळ त्याला मुकुट अपण करण्याकरितां बर्लिन शहरीं दाखल झालें तेव्हां कौंट ब्रॅन्डेनबर्ग यानें मंडळाचें आदरातिथ्य इतक्या आस्थेनें केलें कीं फ्रेडरिक विल्यम हा राष्ट्रीय सभेच्या पक्षास अनुकूल झाला आह असा सर्वसाधारण समज उत्पन्न झाला. परंतु दुसऱ्या दिवशीं सकाळीं जो प्रकार घडला त्यानें हा समज अगदीं दूर झाला. रात्रीं त्याच्या मनांत कोणतेहि विचार प्रादुर्भूत झालें असोत. इतकें निर्विवाद आहे कीं, सकाळीं उठल्यावर ज्या परंपरानुगत तत्त्वानुसार फ्रेडरिक विल्यम याचें शिक्षण झालें होतें त्या मताप्त तो इमानानें चिकटून बसणार, असें आढळून आलें. साम्राज्याची घटना जर्मनींतील संस्थानिकांनीं पसंत केल्याशिवाय व त्यांनीं स्वतः सार्वभौमत्वाचा मुकुट मला देऊं केल्याशिवाय मी तुमचें म्हणणं मान्य करणार नाहीं, असें त्यानें मंडळास स्पष्ट सांगितलें. हें त्याचें उत्तर बहुतेक नकारार्थीचें होतें व त्याच अर्थानें तें समजलें जावें, असा तें देण्यांत त्याचा उद्देश होताही. मंडळानेंही मोठ्या खेदानें त्याचा तोच अर्थ केला.

फ्रेडरिक विल्यम याचें जुलमी वर्तन.

हें फ्रेडरिक विल्यम याचें नकारात्मक उत्तर म्हणजे फ्रँकफोर्टच्या सभेला मृतप्राय करून सोडणारा तिजवर केलेला प्रहार होय. ज्यांनीं

जर्मनीला झालेल्या अनेक जखमा बऱ्या करण्याचा, कलहाच्या सर्व कारणांचा बीमोड करण्याचा, किंबहुना १८६६ ते '८७१ या अवधींत झालेलें काम अगोदरच साधून घेण्याचा कसून व कळकळीनें प्रयत्न केला होता, अशीं देशाभिमानी माणसें या फ्रँकफोर्ट सभेंत होतीं. प्रशिआच्या राजाच्या ह्या कारण्यानें त्यानें सार्वभौमत्वाचा राजमुकुट स्वीकारण्याचें नाकारलें, इतकेंच नव्हे तर पुष्कळ वादविवाद व तडजोडी करून ठरविलेली राज्यघटनाही त्यानें वस्तुतः झुगारून दिली. राजानें आपल्या उत्तरांत सुचविलेल्या राज्यघटनेविषयीं जो मजकूर घातला होता, त्यावरून जर्मनीला व विशेषतः ऑस्ट्रिआला ती घटना करण्याचें मुख्य तत्त्व कोणतें तें चांगलें व्यक्त आलें. ह्याचें उल्लेखावरून प्रिन्स स्क्वार्झेनबर्ग यानें राष्ट्रीय सभेच्या ऑस्ट्रिअन प्रतिनिधींना फ्रँकफोर्ट सोडून जाण्याबद्दल हुकूम साडला, हें पूर्वी सांगितलें आहेच. सभेनें राज्यघटना प्रसिद्ध केली हें तिचें करणें गैरशिस्त अतएव दोषास्पद होतें, हा त्यानें आपल्या कृतांस आधार घेतला होता. बव्हेरिआ आणि वूर्टेंबर्ग हीं ऑस्ट्रिआशीं सहकार करतील आणि सेक्सनी व हॅनोव्हर यापैकीं कोणीहि सभेचा पक्ष उचलून धरणार नाहीं, हें अगदीं स्पष्ट दिसलें. फ्रेडरिक विल्यम यानें नकारार्थी उत्तर दिल्यावर विलंब न लावतां नुकतीच आपण भरविलेली पार्लमेंट सभा उधळून लाविली, कारण त्या पार्लमेंटानें फ्रँकफोर्ट घटनेला उचलून धरणारा एक ठराव पास केला होता. राजानें पार्लमेंट सभेच्या हक्कांची पायमल्ली केलेल्या या प्रसंगाचें महत्त्व

वर्णन करावें तेवढें थोडें आहे. जेव्हां फ्रँकफोर्ट येथील सभेनें, उत्तरादाखल, घटना नापसंत करणाऱ्या सर्व सरकारांस, आपण ठरविलेल्या घटनेला अनुकूल असें मत प्रातिनिधिक सभांनीं बोलून दाखवूं नये अशी मुस्कटदाबी करण्याच्या उद्देशानें तुम्हीं या सभा मोडून टाकूं नये अथवा तहकूब करूं नये असें पत्रक काढिलें. तेव्हां प्रशिआंतील सरकारतर्फेच्या पत्रकांनीं राष्ट्रीय सभेची क्रांतिकारकांची सभा म्हणून निर्भत्सना केली.

फ्रँकफोर्ट सभेचा अंत.

सभेची अशी नाचकी झाल्यावर ज्या न्यायमूलक सामर्थ्याच्या पायावर या सभेची उभारणी केली होती तो पाया ढासळल्यामुळें व सर्व जर्मनींत तिला कोणीही त्राता असा न उरल्यामुळें त्या सभेचा अंत झाला हें निराळें सांगण्याची आवश्यकताच नाहीं इतक्यांत तारीख ४ मेच्या सुमारास कित्येक लोकपक्षीय पण अशांततापिय अशा लोकांनीं थोडीशी बंडाळी करण्यासही सुरवात केली. परतु चारपांच दिवसांनंतर प्रशिअन सैन्यानें सर्व बंडाळी मोडून राजधानीमध्य पुनः शांतता प्रस्थापित कली. ग्रँड डयूकनें सर्वसाधारण राज्यघटनेची योजना मान्य केली व फ्रँकफोर्ट सभेच्या ऐवजीं प्रस्थापित व्हावयाच्या संयुक्त संस्थानाच्या कायदे करणाऱ्या मंडळाची निवडणूक करण्यासाठीं जाहिराती प्रसिद्ध केल्या होत्या, तरीही कांहीं ठिकाणीं बंडाळी उपस्थित झाली, प्रजासत्तात्मक राज्यव्यवस्था जाहीर केली गेली, सन्यहीं बंडखोरांस सामील झालें आणि क्रांतिकारकांचा बडेनमध्यें

जणूं पाऊस पडूं लागला, अशी त्यांची संख्या दिवसेंदिवस फुगत चालली. ही परिस्थिति फ्रँकफोर्ट सभेला मोठी आणीबाणीची होती ऐक्य प्रस्थापित करण्यांत अपयश आल्यानें उत्पन्न झालेल्या बंडाळीस ती सभा आळा घालूं शकत होती किंवा नव्हती ? हेंच कळेना ! शेवटीं तिनें आळा घालण्याचा प्रयत्न केला. आर्चडयूक जॉन याला तिनें साम्राज्याचा रीजंट नेमिलें होतें म्हणून बॅडेन येथील बंडाळी मोडून टाकण्यास त्याला तिनें फर्माविलें व असें कळविलें कीं, जी राज्यघटनेची योजना जाहीर करून लोकांस धक्कदपटशा दाखविला आहे तिच संरक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे परंतु आर्चडयूकनें हा हुकूम मानण्याचें साफ नाकारिलें; इतकेंच नव्हे, पण त्याच्या व्हॉन गॅगर्न नांवाच्या दिवाणानें व इतर सर्व मंडळींनीं राजीनामे देऊन काढी ओस पाडिली यावेळीं प्रशिआही फ्रँकफोर्टाशीं संबंध तोडूं इच्छीत होता. त्यानही यावेळीं असा ठराव केला कीं तारीख १० मे रोजीं आर्चडयूकनें जर्मनीचें सैन्य एकत्र करून योजनेला पाठिंबा द्यावा असा जो ठराव झाला आहे त्या योगें देशांतील अंतःकलहाला एक प्रकारें आव्हानच केलें आहे. म्हणून प्रशिअन डेप्यूटीनीं फ्रँकफोर्ट येथून ताबडताब परत निघून यावें. सॅक्सनी व हॅनोव्हर यांनींही प्रशिआचें अनुकरण केलें. पुढें कांहीं दिवसांनीं म्हणजे ता. २० मे रोजीं अत्यंत माननीय अशा ६५ प्रतिनिधींनीं, सध्यांच्या परिस्थितींत सभेनें अंगीकृत कार्याचा त्याग केल्यास त्यापासून फारसें नुकसान होणार नाहीं व सभेचें कामही संपलेंच आहे असें मानावयास

हरकत नाहीं, असें ठाम मत जाहीर केलें. हळूहळू त्यांच्या मताचा स्वीकार उवलज्जहालांशिवाय इतर सर्वांकडून होत गेला. प्रथम जून ६ रोजीं हे जहाल स्टटगार्ट येथें जाऊन राहिले. परंतु त्या शांततामय राजधानींत त्यांचा विचित्रपणा व चंचलता निदर्शनास येऊन, लोकमत त्यांच्याविरुद्ध झाले व ता. १८ रोजीं त्यांस तेथून हांकून दिल्यावर त्यांची वाताहत झाली. बॅडेन येथील दंगेखोरांची हकीकत मागें दिलीच आहे. त्यांनी जास्त वेळ टिकाव धरला, व कांहीं वेळां प्रशिआच्या प्रिन्सला त्यांच्यापुढें माघार खावी लागली व पुरे सहा आठवडे तो लढत बसला, तेव्हां कोठें त्यांचा मोड झाला.

सन १८४८–४९ सालीं जर्मनींतील संस्थानांचें एकीकरण करण्याकरितां केलेल्या जंगी प्रयत्नाचा असा परिणाम झाला. हा प्रयत्न धिट्टाईचा, उदारपणाचा व देशभक्तिपूर्ण असा होता. या प्रयत्नाचा भर केवळ नैतिक सामर्थ्यावर असल्यामुळें मेन नदींच्या उत्तर व दक्षिण भागांतील देशांवर अनुक्रमें जे दोन बलाढ्य राजे राज्य करीत होते त्यांपैकीं एकाचें पूर्ण आनुकूल्य साध्य झाल्याशिवाय तो सिद्धीस जाणें अशक्य होतें. प्रशिआचा राजा होता त्यापेक्षां निराळ्या प्रकृतीचा असता, त्याच्या स्वभावांत धाडसीपणाची थोडी भर असती, तो जोरदार व निश्चयी असता, त्यांतल्या त्यांत स्क्लेस्विग–होल्स्टीन प्रश्नावर व्यर्थ वादविवाद न करितां राज्यघटनेची योजना त्वरित पूर्ण करण्याकडे जर सभेनें सावधान होऊन लक्ष दिलें असतें, किंबहुना जर सभेनें एप्रिल १८४९ त जी विनंति राजास केली, तीच

१८४८ च्या पावसाळ्यांत केली असती, तर ती विनंति मान्य होण्याचा पुष्कळसा संभव होता. परंतु दिरंगाईमुळें ऑस्ट्रिआस वेळ मिळाला आणि त्याचा विरोध घातुक झाला. प्रशिआच्या राजाला ऑस्ट्रिआशीं रणसंग्राम केल्याखेरीज १८४९ च्या एप्रिलांत केलेली विनंति मान्य करतां आली नसती. त्याच्या सैन्याची तयारी नसल्यामुळें ऑस्ट्रिआशीं युद्ध करण्याचा प्रसंग आलाच तर त्यास तोंड देण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नव्हतें हें पुढें स्पष्ट होईलच.

ऑस्ट्रिआ व प्रशिआ हीं सन्मुख येतात.

फ्रँकफोर्ट येथील सभा त्यास गेल्यामुळें ऑस्ट्रिआ आणि प्रशिआ एकमेकांसमुख आले. फ्रेडरिक विल्यम आणि प्रिन्स फेलिक्स स्वार्झेनबर्ग यांचीं मतें मूलतः परस्पर विरोधी होतीं. चालढकल करण्याच्या स्वभावामुळें विशेष कृति हातून झाली नाहीं, तरी प्रशिआच्या नेतृत्वाखालीं कांहीं तरी प्रकारचें जर्मनीचें एकीकरण व्हावें अशी फ्रेडरिक विल्यमची निदान इच्छा तरी होती. प्रिन्स फेलिक्स स्वार्झेनबर्ग याचा दृढ निश्चय होता कीं, सन १८४८ त मार्च महिन्याच्या पूर्वी ऑस्ट्रिआची जी स्थिति होती ती पूर्ववत् स्थापित करावयाची. पांच संस्थानांचा संघ व 'डायेट' सभा यांचें पुनरुज्जीवन करून त्यांत ऑस्ट्रिआचें वर्चस्व यथापूर्व स्थापावयाचें, हा त्याचा आद्य हेतु होता. या दोघांनीं आपापले हेतु साध्य करून घेण्याकरितां ज्या भिन्न भिन्न मार्गांचा अवलंब केला त्यांचें यथावकाश विवेचन करून झालेले परिणाम नमूद करून ठेवणें अप्रासंगिक होणार नाहीं. ही हकीकत

म्हणजे ज्याप्रमाणें युद्धांत त्याचप्रमाणें 'राजकारणांत जो कोणी मोठी छाती करून आपलें काम करण्यास सरसावतो त्यासच विजयश्री हटक्कून माळ घालते' या म्हणीचें अत्युत्कृष्ट उदाहरण आहे.

फ्रेडरिक विल्यम याच्या गुप्त आकांक्षा.

फ्रेडरिक विल्यम याच्या वर्तनानें फ्रँकफोर्ट सभा आतां आसन्नमरण झाली होती, अथवा प्रत्यक्ष लयासही गेली होती, असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां ज्या उच्च स्थानाच्या प्रभावापुढें ऑस्ट्रिआचें वर्चस्व फिक्कें पडेल असें उच्चस्थान, उत्तर व मध्य प्रांतांतील संस्थानाधिपतींच्या साहाय्यानें आपण मिळवावयाचें, अशी गुप्त इच्छा फ्रेडरिक विल्यम याची होती. त्याप्रमाणें त्यानें ही मनीषा तृप्त करून घेण्याकरितां १८४९ सालच्या आरंभींच गुप्त पत्रव्यवहार करण्यास प्रारंभ केला ता. ३ एप्रिल रोजीं जेव्हां देऊं केलेला राजमुकुट स्वीकारण्याचें त्यानें नाकारिलें, तेव्हांच ज्या शर्तीं पुढें निश्चित करण्यांत येतील त्या शर्तींप्रमाणें आपण होऊन जीं संस्थानें प्रशिआस येऊन मिळतील, त्या संयुक्त संस्थानांचें आधिपत्य मी स्वीकारणार आहे असें त्यानें म्हटलें होतें. पुढें लवकरच जर्मनींतील संस्थानांस त्यानें एक सर्वसाधारण पत्रक लिहिलें. त्यांत ता. १७ मे रोजीं बर्लिन येथें एक सभा भरणार आहे तिला ज्यांची खुषी असेल त्यांनीं यावें अशी इच्छा दर्शविली होती. दरम्यान् ता. १० मे रोजीं फ्रँकफोर्ट येथील सभेनें जो ठराव केला होता त्याला प्रशिअन सरकारनें जें उत्तर दिलें त्यावरून सभेची जी दुर्दशा झाली, तिच्यांतून तिचें डोकें कधींही वर निघालेंच नाहीं

प्रशिआचे डावपेंच.

जर्मन एकीकरणाचा पुरस्कार करणारी सभा म्हणून आजपर्यंत सभेचें जें न्यायमूलक सामर्थ्य होतें तें आपणास प्राप्त व्हावें व ब्रेसला, एल्बर्फील्ड्, ड्यूसेल्डार्फ व इतर मध्यवर्ती स्थानें यांतील लोकांचीं मनें शांत व्हावीं म्हणून राजानें फ्रँकफोर्ट येथें सभेला जरी अपयश आलें तरी जर्मनीचें एकीकरण होणें अजूनही शक्य असून तें करण्याचा प्रयत्न होणार आहे, असा जाहीरनामा काढला. ज्या किरकोळ संस्थानांनीं फ्रँकफोर्ट येथें ठरलेल्या राज्यघटनेस अनुमति दिली होती, त्यांनीं प्रथम राजानें बोलाविलेल्या सभेंत भाग घेतला नाहीं; तरी पुढें लवकरच त्यांच्यापैकीं २८ संस्थानांनीं आपणांस ही राजसभा मान्य असल्याबद्दल कळविलें. या सभेचें खरा हेतु कळावा म्हणून ऑस्ट्रिआनें एक प्रतिनिधि पाठविला होता. तो पहिली बैठक संपल्यावर निघून आला. बव्हेरिअन प्रतिनिधीनें त्याचें अनुकरण केलें. मग प्रशिआ खेरीज करून हॅनोव्हर व सॅक्सनी यांचे प्रतिनिधि जाग्यावर राहिले. ह्या तिघांनीं आपलें काम पुढें चालविलें व ता. २६ मे रोजीं 'तीन राज्यांचा संघ' या नांवानें माहीत असलेला संघ स्थापन केला. ह्या मंडळींचा हेतु सर्व जर्मन संस्थानांचा एक 'संयुक्त संस्थान संघ' काढावा व त्यांत जर्मनींस खुषीनें चिकटून राहणारीं जेवढीं संस्थानें असतील, त्या सर्वांचा समावेश करावा असा होता. हा उद्देश सफल व्हावा म्हणून एक संयुक्त प्रतिनिधि सभा (पार्लमेंट) ही आम्ही भरवूं असें अभि-

वचनहि देण्यांत आलें दरम्यान् फ्रेडरिक विल्यम यानें (पूर्वी हें नमूद केलेंच आहे) सॅक्सनी व बॅडेन येथें उत्पन्न झालेले दंगेधोपे मोडून टाकण्याकरितां सैन्य रवाना केलें त्यास बॅडेन येथें शांतता स्थापित करण्यास ६ आठवडे लागले. जर्मनींतील किरकोळ संस्थानें हळूहळू ' तीन राज्यांच्या संघांत ' येऊन सामील झालीं. परंतु ऑस्ट्रिआ, बव्हेरिआ व वूर्टेंबर्ग यांनीं या पुढें त्या संघाशीं मुळींच दळणवळण ठेविलें नाहीं. पूर्वी ता ३० सप्टेंबर रोजीं ऑस्ट्रिआ-बरोबर जो तहनामा झाला होता त्याची पुनरावृत्ति करणें एवढेंच काय तें या वेळीं घडवून आणतां आलें. जर्मनीच्या कारभाराची चिरस्थायी अशी व्यवस्था लागेपर्यंत संयुक्त पंचमंडळानें बंडाचें काम चालवावें अशी या वरील तहनाम्यांत शर्त होती. परंतु ऑस्ट्रिअन राज्यांतील अंतर्व्यवस्था जसजशी सुधारत गेली, तसतसा प्रिन्स स्क्वार्झेनबर्ग याजकडून प्रशिआच्या राजाच्या धोरणास होणारा विरोध बळावत चालला. नोव्हारा येथें ऑस्ट्रिआचा जय होऊन (२३ मार्च) उत्तर इटली ऑस्ट्रिआला परत मिळाला. व्हिलगॉस शरण आल्यावर (१३ आगष्ट) हंगेरीवर पुनः ऑस्ट्रिआचा अंमल चालू झाला. तदनंतर आपलें धोरण सिद्धीस नेण्याच्या कामीं युद्धांतून तावून सुलाखून निघालेलें सन्य आपणांस पाहिजे तेव्हां सज्ज ठेवितां येईल, अशी स्क्वार्झेनबर्ग याची पक्की खात्री होती. तदनुसार त्यानें आपल्या कामाचा उपक्रम असा कांहीं केला कीं, त्यानें कोणतें ध्येय डोळ्यांपुढें ठेविलें आहे याविषयीं बिलकुल शंका उरली नाहीं. प्रथम त्याला प्रशिअन संघांतून सॅक्सनी आणि हॅनोव्हर यांस सहज फोडतां आलें.

फ्रेडरिक विल्यम याचा अप्रामाणिकपणा.

तथापि प्रशिआनें जरी फक्त किरकोळ २८ संस्थानेंच त्याच्या मागून येण्यास तयार होतीं तरी आपला बेत तसाच चालू ठेवला, व एक नवीन संयुक्त संस्थान संघाच्या योजनेचा विचार करण्याकरितां ता २० मार्च १८५० रोजीं एरफर्ट येथें संयुक्त राजप्रतिनिधिसभा बोलाविली. बर्लिन येथें तयार केलेल्या राज्यघटनेचा मसुदा सभेपुढें विचारार्थ मांडला परंतु मसुद्याचें नुसतें वाचन संपलें न संपलें तोंच प्रशिआच्या राजाची कपटबुद्धि निदर्शनास आली जून १८४९ व मार्च १८५० च्या दरम्यान् प्रशिआमध्यें राजकारणाचें धोरण बरेंच प्रतिगामी स्वरूपाचें होतें. १८४८ च्या मार्च महिन्यांत गमावलेली सत्ता राजास पुनः प्राप्त झाली होती. त्यानें वापरलेली भाषाच वापरून बोलावयाचें असल्यास ज्यावेळीं त्यानें एक प्रकारच्या हास्यरसप्रधान नाटकाचा प्रयोग जणूं काय करून दाखविला त्यावेळीं त्यानें जें जें प्रजेचें म्हणणें मान्य केलें होतें तें तें सर्व आतां परत घण्याकडे त्याचा कल होता. त्याच्या मनावर भयाचा पगडा बराच बसला असतां त्यानें बर्लिन येथें जी संयुक्त राज्यघटना तयार केली होती ती आतां त्याला मर्यादेबाहेर लोकांना सवलती देणारी आहे अशी वाटली. आणि एरफर्ट येथें जी प्रतिनिधिसभा त्यानें बोलाविली होती तिनें ती जशीच्या तशी बहुतकरून पूर्णपणें पसंत केली असती; पण त्याच्या पक्षाच्या लोकांनीं तिची दुरस्ती झाली पाहिजे असा आग्रह धरिला. जर्मनीमध्यें ज

न्यायाभिमानी प्रगमनशील लोक होते त्याच्या मनांत राजाचें हें कृत्य पाहून तिरस्कार उत्पन्न झाला व त्यांस मोठी चिरड आली. प्रशिआचा चौथा फ्रेडरिक विल्यम हा टोलवाटोलवी करण्यांत मोठा कुशल असून त्याच्या बोलण्यावर यत्किंचित्हि विश्वास ठेवण्याची सोय नव्हती. त्याच्या हातून जर्मनीची खरी एकी होण्याच्या कामीं एखादी योजना तयार होईल हें मुळींच संभवनीय नव्हतें. या सर्व गोष्टींचा अनुभव लोकांस आतां पूर्ण येऊन चुकला होता.

दरम्यान् १८ ५ त स्थापन झालेल्या बंडाची सन १८४८ त नष्ट झालेली सत्ता पुनः बंडाला प्राप्त करून द्यावयाची हा जो ऑस्ट्रिआचा प्रधानहेतु तो हळूहळू साध्य करून घेण्याचा प्रयत्न करण्यास ऑस्ट्रिआला उत्तम संधि मिळाली. कारण तो आतां इतर सर्व भानगडींतून मोकळा झाला होता. फ्रेडरिक विल्यम याच्या मनाचा डळमळीतपणा व त्याचें बेइमान यांमुळें ऑस्ट्रिआचा मार्ग सुगम झाला. बंडांमध्यें सामील झालेल्या संस्थानांच्या १३ प्रतिनिधींची खास सभा (डायेट) फ्रँकफोर्ट येथें भरली होती व तिला पूर्ण अधिकार होते. ही डायेट सभा प्रिन्स स्वार्झेनबर्ग सांगेल त्या प्रमाणें वागण्यास तयार होती. तिचे अधिकार परिपूर्ण होते कारण न्यायतः ही सभा सर्व जर्मनीच्या प्रतिनिधींची म्हणजे ' बंड ' सभाच होती. अल्पावकाशांत अशी परिस्थिति उत्पन्न झाली कीं तिच्यामुळें स्वार्झेनबर्ग यास सभेच्या अधिकारांची अम्मलबजावणी परिणामकारक रीतीनें प्रशिआच्या विरुद्ध करण्यास चांगलीच संधि मिळाली

हेसी-कॅसलचा वृत्तांत.

हेसी-कॅसल संस्थानाचा अधिपति पहिला फ्रेडरिक विल्यम हा १८३१ सप्टेंबर ३० रोजीं आपल्या वयाच्या ६९ वर्षीं बापानें अधिकारपदाचा त्याग केल्यामुळें अधिकारारूढ झाला कायदेशीर शासनपद्धति बाजूला सारण्याकडे या तरुण संस्थानाधिपतीची प्रवृत्ति असे. कारण तो अनियंत्रित सत्तेचा भोक्ता होता. त्यानें संस्थानाची व्यवस्था ठरलेल्या शासन पद्धतीप्रमाणें लावण्याचा बाहणा मात्र केला. त्याचा बाप १८४७ च्या नोव्हेंबर महिन्याच्या ३० तारखेला निवर्तला. हा आतां तत्त्वदृष्ट्या व व्यवहारदृष्ट्या अधिपति झाला. काय वावटळ उठेल याची कल्पना त्याला झाली नाहीं तो अगोदरच शासनपद्धतीचा धिक्कार करीत असे. आतां ती सफाई बुडवून टाकण्याचा प्रयत्न त्यानें केला. परंतु आणाबाणीचा प्रसंग आल्यावर त्याच्या सैन्यानें त्यास सोडिलें, आणि त्याचा प्रयत्न सपशेल फसला ही अदल त्यास घडून फार दिवस गेले नाहींत, तोंच फेब्रुवारी १८४८ चें बंड उद्भवलें आणि लोकांच्या मनांत जी अस्वस्थतेची लाट उसळली तिचे परिणाम संस्थानाच्या प्रत्येक शहरीं व प्रांतोप्रांतीं भासमान् झालें. या वावटळी पुढें अधिपतीनें मान वांकविली आणि ज्या सुधारणा ताबडतोब झाल्या पाहिजेत असें लोकांचें निक्षून सांगणें होतें, त्या करण्याचें अभिवचन त्यानें दिलें. कारण ता. ५ मार्च रोजीं रात्रीं लोकांना अप्रिय अशा त्याच्या मंत्र्यानें—स्केफरनें-त्याची बाजू सोडून दिली लोकांनीं जास्तच निकड लावल्यावर

त्यानें सर्व बाबतींत हार खाल्ली, प्रागतिक मतांच्या लोकांचें नवें मंत्रिमंडळ बनविलें आणि सर्व वर्गाच्या प्रतिनिधींची सभा ता. १३ मार्चला बोलाविली. त्या दिवशीं सभा भरली व तिनें नवे ठराव करून लोकांनीं चिरकाल निमूटपणें सोसलेलीं दुःखें दूर केलीं. हेसी–कॅसलच्या लोकांना सुखाचा नवा मनु सुरू झाला, असें वाटलें. त्यांनी फ्रँकफोर्ट सभेस आपले प्रतिनिधि पाठविले, आणि ती सभा मोडल्यावर हें संस्थान प्रशिआनें स्थापिलेल्या 'तीन राज्यांचा संघ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या संघांत समाविष्ट झालें. १८४९ च्या जुलई महिन्यांत नवीन प्रतिनिधि सभेची (पार्लमेंटची) निवडणूक झाली व त्या सभेनें या शासनपद्धतीला पसंती दिली.

ऑस्ट्रिआ व प्रशिआ याचें परस्पर विरोधी धोरण.

या कालावधींत ज्या राज्यकर्त्यांनीं आपली अनियंत्रित राजकारणपद्धति सोडून दिली होती, त्यांना असें स्पष्ट दिसून आलें कीं १८४८ च्या मार्च महिन्यांतील प्रजेच्या उत्साहभरतीस पुष्कळशी ओहटी लागली असून सुधारणाविषयक औत्सुक्यही मंदावत होतें. प्रशिआचा चौथा फ्रेडरिक विल्यम याच्या वर्तनांत या विचारानें काय फरक पडला हें मागें नमूद केलेंच. हेसी–कॅसल संस्थानाच्या अधिपतीवरहि या गोष्टीचा असाच परिणाम झाला. हा राजा योग्य संधि साधण्याकरितां अगदीं टपून बसला होता. आतां ती आल्याबरोबर त्यानें गताधिकार परत प्राप्त करून घेण्याकरितां जोराचा प्रयत्न करण्याचा निश्चय केला. आपला हेतु सफल व्हावा म्हणून

त्यानें खालीं दिलेले उपाय योजिले:—ऑस्ट्रिआबरोबर गुप्त पत्रव्यवहार सुरू केला; आपण सुचविलेले फेरबदल प्रतिनिधि सभेस मान्य नाहींत असें पाहून, त्यानें आपलें प्रागतिक मतवादी लोकांचें मंत्रिमंडळ १८५० फेब्रुवारी २० रोजीं अधिकारच्युत केलें व पूर्व सूचना न देतां प्रतिनिधिसभा बरखास्त केली; आणि त्या वेळीं फ्रँकफार्ट येथें 'डायेट' ची बैठक चालू होती त्या सभेंत आपला प्रतिनिधि म्हणून त्यानें प्रजेला अप्रिय असा आपला मंत्री हॅसेनपफ्लग यास पाठविलें. नंतर त्यानें १८४८ मार्चपासून चालू तारखेपर्यंत उदार मताला अनुकूल अशा सुधारणा करण्याच्या [illegible] जें जें केलें होतें, तें सर्व फिरवून टाकण्याचा उद्योग आरंभिला. लोकांना जुलुमानें आपल्या म्हणण्याप्रमाणें करावयास लावण्याच्या कामीं त्याला मदत करण्याचें त्याच्या सैनिकानें साफ नाकारिलें व संस्थानांतील सनदशीर पद्धतीनें नेमलेल्या अधिकारी वर्गानें जोराचा निषेध केला अशी स्थिति असताहि त्यानें आपला दडपशाहीचा क्रम तसाच चालू ठेविला.

दरम्यान् 'डायेट' सभेंत हॅसेनपफ्लग यानें जें वर्तन केलें त्यामुळें ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यामधील मतभेदाची अगदीं परमावधि झाली. ऑस्ट्रिआ व त्याशीं सहकार करणारीं दोस्त राष्ट्रें यांचा हेसीच्या मंत्र्यास पूर्ण पाठिंबा होता. या गोष्टीचा फायदा घेऊन या मंत्र्यानें हेसी संस्थानाच्या अधिपतीची सत्ता डळमळत आहे, तिला सांवरून धरून दृढ करण्याच्या कामीं प्रयत्नांची शर्थ करणें हें 'डायेट' सभेचें आद्य कर्तव्य आहे, असा ठराव सभेकडून पसंत

करविला (सेप्टेंबर १७). परंतु संस्थानांतील प्रजाजनांच्या सनदशीर हक्कांचें संरक्षण करण्याचा पतकर नीतिदृष्ट्या प्रशिआनें घेतला होता व म्हणून ऐन प्रसंगीं आपल्या सहकाऱ्यांचा त्याग करणें प्रशिआला शक्य नव्हतें. कारण अशा रीतीनें त्यांस सोडणें म्हणजे जर्मनीचें एकीकरण करण्याच्या कामांत घेतलेलें अग्रेसरत्व सोडून देण्यासारखेंच होतें. ' डायेट ' हें नांव धारण करणाऱ्या व कायद्याला संमत नसलेल्या या सभेस संस्थानांतील कारभारांत कोणत्याहि निमित्तानें ढवळाढवळ करण्यास बिलकुल हक्क नाहीं असें एक राजकारणात्मक पत्रक प्रशिआच्या राजानें काढिलें. या पत्रकाच्या मागोमाग राजानें हेसमिध्यें प्रशिअन सैन्यानें चाल करून जावें असें जाहीर पत्रक काढिलें. या आज्ञापत्रास अनुसरून सैन्य हेसींत चाल करून गेलें व त्यानें कसेल आणि फुल्डा येथील मुख्य मुख्य ठाणीं व्यापून टाकिलीं.

स्क्वार्झेनबर्ग यास योग्य सांधे.

जर्मनींत ऑस्ट्रिआचें वर्चस्व पुनः स्थापित व्हावें म्हणून योग्य संधि साधण्यास प्रिन्स स्क्वार्झेनबर्ग टपून बसला होता. हा प्रसंग अगदीं मनासारखा आहे असें पाहून, त्यानें बव्हेरिआ व वूर्टेंबर्ग यांस हाताशीं घेऊन प्रशिआनें ' डायेट ' सभेवर जें किटाळ उठविलें होतें त्याच्या विरुद्ध बाजूनें निरसन करण्यास ' डायेट ' सभेस मदत दिली व पश्चिमेच्या बाजूनें हेसीवर चाल करून जाण्यास ऑस्ट्रिअन व बव्हेरिअन सैन्याची एक संयुक्त तुकडी रवाना केली. दोन्ही

पक्षांनीं आपआपल्या जाहीर केलेल्या धोरणाप्रमाणें चालावयाचें असा दृढ निश्चय केल्यास उत्तर व दक्षिण भाग असे दोन तट होऊन उभयतांमध्यें युद्ध खास जुंपणार हें आतां अगदीं उघड दिसून आलें.

ऑस्ट्रिआचा विजय.

या आणीबाणीच्या प्रसंगीं झार निकोलस वार्‌सा येथें येऊन दाखल झाला झार निकोलस यास यूरप खंडांतील इंग्लंडशिवाय बाकीच्या राष्ट्रांत लढा पडला असतां मध्यस्थ म्हणून मिरविण्यांत फार आनंद वाटे. या वृत्तीस अनुसरून, आस्ट्रिआनें फार गळ घातल्यामुळें त्यान अगदीं अलीकडेच हंगेरीला चीत करून टाकिलें होतें. तो वार्‌सास आल्याबरोबर ऑस्ट्रिआचा बादशहा व प्रशिआच्या राजाचा भाऊ यांची व त्याची मुलाखत झाली (ता. २९ आक्टोबर). ऑस्ट्रिआचा प्रतिनिधि स्क्वार्झेनबर्ग व प्रशिआचा प्रतिनिधि कौंट ब्रॅन्डेनबर्ग हे दोघेहि तेथें होतेच. जर्मनींतील ह्या दोन बलाढ्य संस्थानांमध्यें पडलेल्या लढ्याचा सर्व बाजूंनीं विचार करून झार निकोलस यानें सर्व मुद्याचा निकाल ऑस्ट्रिआस अनुकूल असा दिला. खरोखरच त्यानें प्रशिअन मंत्र्याशीं केलेलें वर्तन कौंट ब्रॅन्डेनबर्ग यास इतकें हृदयभेदी झालें कीं, तो सात्विक मंत्री बर्लिन येथें येऊन आपल्या कामाचा अहवाल साद्दर करतो न करतो तोंच दिवंगतहि झाला.

झार निकोलसविषयीं अत्यंत आदरबुद्धि प्रशिआच्या राजाच्या मनांत उत्पन्न झाली होती. हा त्याला मिळालेल्या शिक्षणाचा परि-

णाम होय. गेल्या चाळीस वर्षांत घडलेल्या इतिहासप्रसिद्ध गोष्टांमुळें प्रशिआ व प्रशिआचें राजघराणें यांचा व झार निकोलस याचा अगदीं जिव्हाळ्याचा संबंध जडला होता. त्यांतल्या त्यांत प्रशिआच्या राजाच्या मनाची स्वाभाविक रचनाच अशी कांहीं होती कीं, झार निकोलससारख्या राजानें दिलेला निकाल म्हणजे ईश्वरदत्त आज्ञाच आहे अशी त्याची भावना झाली त्याच्या पदरीं अजूनहि कर्तबगार व देशाभिमानी लोक होते. त्याचा सेनापति रॅडोविट्झ हा अशा देशभक्तांमध्यें अग्रेसर होता. त्यानें या वेळीं आपण प्रशिआ व प्रशिआच्या राजकारणाचीं मूलतत्त्वें यांस या आणीबाणीच्या प्रसंगी अचल एकनिष्ठेनें उचलून धरा असा मोठ्या कळकळीनें राजास सल्ला दिला. परंतु राजाच्या दुसऱ्या कानाशीं मँटाइफेल यानें अशी एक सारखी गुणगुण चालविली होती कीं प्रशिअन सैन्याची सद्यःस्थिति लक्षांत घेतां त्या सैन्याच्या अंगी कणखर व कसलेल्या ऑस्ट्रिअन सैन्याला तोंड देण्याची ताकद नव्हती व त्यामुळें आपला पराभव झाला तर त्याचे अनन्वित परिणाम प्रशिआस भोगावे लागतील, ही माहिती अर्थातच धीर येण्यासारखी नव्हती. परंतु राजानें जो या प्रश्नाचा निकाल लावला, त्याला मुख्य आधार झार निकोलस यानें दिलेल्या निर्णयाचाच होता. नोव्हेंबर ता. २ रोजीं बर्लीन येथें मंत्रिमंडळाची सभा भरल्यावर त्याच सभेंत आपण झार निकोलस याच्या निकालापुढें मान वाकवावयाची असें राजानें ठरविलें. रॅडोविट्झ यानें राजीनामा दिला व मँटाईफेल याची त्याच्या जागीं नेमणूक

झाली. प्रशिआनें अंगांकृत पुढारीपण सोडून दिलें आणि जर्मनीमध्यें दुय्यम प्रतीचा दर्जा सोळा वर्षेपर्यंत स्वीकारण्याचें पतकरिलें.

याप्रमाणें प्रिन्स स्क्वार्झेनबर्ग यास यशःप्राप्ति झाली. पूर्वी सांगितलेल्या संयुक्त सैन्य तुकडीनें हेसींत प्रवेश केला (ता. १ नोव्हेंबर). हाना ताब्यांत घेऊन तें सैन्य पश्चिम बाजूनें पुढें गेलें. फुल्डानजीक ब्रोंझेल येथें हें सैन्य व प्रशिअन सैन्य यांच्या दरम्यान् लहानशी चकमक झाली. ता. ९ रोजीं प्रिन्स स्क्वार्झेनबर्ग यानें क्रमशः पुढील गोष्टींची मागणी केली:–(१) प्रशिअन संघ मोडून टाकणें; (२) डायेट सभेस पूर्ण मान्यता देणें; (३) हेसी येथून् प्रशिअन सैन्यानें निघून जाणें. मँटाईफेल यानें पहिला मुद्दा ताबडतोब मान्य केला दुसऱ्या दोन गोष्टीबद्दल तो कांकूं करतो आहे असें पाहून स्क्वार्झेनबर्ग याने संयुक्त ऑस्ट्रिअन व बव्हेरिअन सैन्यास पुढें चाल करून जाण्याबद्दल हुकूम सोडला व प्रशिअन सैन्यानें चोवीस तासांच्या आंत हेसी संस्थान सोडून गेलेंच पाहिजे, अशी जोराची मागणी कली तदनं र मँटाईफेल यानें समक्ष भेट व्हावी अशी विनंति केली व उत्तर ची वाट न पाहतां तो आल्मट्झ येथें जाण्याकरितां निघाल.. तथें त्याला सर्व मुद्द्यांवर हार खावी लागली. हेसींतून एक तुकडी वज्य करून सर्व सैन्य काढून घेण्यास तो प्रशिआच्या वतीनें कबूल झाला आणि व्यवहारदृष्ट्या ' बंड ' सभेसही त्यानें मान्यता दिली. सन १८४८ त झालेल्या स्फोटामुळें जी भीति बसली होती तींतून मुक्त झाल्यादिवस पासून ज्या ज्या गोष्टी साधण्यासाठीं प्रशिआ व त्याचा राजा

यांनीं एकसारखीं कारस्थानें चालविलीं होतीं, त्या सर्व गोष्टी सोडून देण्यास तो तयार झाला.

प्रशिआचा अल्पकालिक लोप.

स्वार्झेनबर्ग याचा विजय म्हणजे प्रतिगामी धोरणाचा विजय होय, हें कबूल करणें प्राप्त आहे. 'बंड' संभेचीं १८१५ त ज्या तत्त्वांवर स्थापना झाली होती त्यास अनुसरून तिची पुनर्घटना झाली. इतकेंच नव्हे, तर १८५१ ऑगस्ट व १८५२ जानेवारीमध्यें निघालेल्या फर्मानाप्रमाणें ऑस्ट्रिआनें स्वत आपल्या प्रजेच्या हक्कांचें नियमन केलें. प्रशिआंत जानेवारी ३१. १८५० च्या शासनपद्धतीप्रमाणें घातलेल्या शर्तीं कायम होत्या खऱ्या, परंतु त्यांपासून जवळ जवळ अनियंत्रित राजसत्तेचा कारभार चालण्यास मुळींच अडचण नव्हती. स्लेस्विग-होलस्टीनमध्यें जर्मनींतील प्रतिगामी धोरणाचा प्रभाव जास्तच स्पष्ट दिसत होता. डेन्मार्कनें ज्या शर्तीं सांगितल्या या ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांनीं व्यवहारदृष्ट्या मान्य केल्या या शर्तीवरून प्रशिआस दोन्ही डॅनिश संस्थानांत पूर्ण अधिकार मिळाला लंडन येथें जी सभा भरली होती, त्या सभेंत गादीवर असलेल्या राजाच्या मरणानंतर या दोन डॅनिश संस्थानांचा वारसदारीचा हक्क ग्लक्सबर्ग घराण्याकडे जावा असें ठरलें. ह्या ठरावाला दोन्ही मोठ्या जर्मन संस्थानांनीं आपला रुकार दिला. शेवटीं ज्या जर्मन आरमाराबद्दल मोठा उत्साह दिसून येत होता त्याचीही आहुति प्रतिगामी

धोरणानें पेटविलेल्या होमकुंडांत देण्यांत आली दीर्घकालपर्यंत भवति न भवति झाल्यावर हें आरमार मोडून टाकण्याचें ठरलें. मोठ्या जहाजांपैकीं कांहीं जहाजें प्रशिआनें विकत घेतलीं व बाकींचीं लिलावांत जास्त किंमत देऊं करणारास विकण्यांत आलीं.

प्रशिआच्या भावी उदयाच्या कारणांचा निर्देश.

परंतु जरी १८४८ त झालेल्या राज्यक्रांतीमुळें सर्वांच्या अंतःकरणांत प्रादुर्भूत झालेल्या एकीकरणाविषयींच्या मोहक कल्पना अशा प्रकारें वितळून गेल्या; जरी एका विशिष्ट राजसत्तेनें—कीं जिच्याकडे प्रत्येक विचारी जर्मनाचे डोळे आशेनें व आतुरतेनें लागले होते, तिनें राज्यक्रांतीच्या प्रारंभकालीं ज्या महत्त्वाकांक्षांनीं ती प्रेरित झाली होती त्यांचा त्याग केला; जरी १८५१ व १८५२ या सालीं राजाधिराजपदाचीं सर्व अधिकारसूत्रें पुनः एका हातीं पडून जर्मन राजमंडळांत ऑस्ट्रिआस अग्रेसरत्व प्राप्त झालें व प्रशिआचा दर्जा दुय्यमपतीचा ठरला; आणि जरी एकीकरणाभिमानी पक्षाचा मोड होऊन सार्वत्रिक खळबळाट झाल्याशिवाय त्याच्या पुनरुज्जीवनाची आशा उरली नाहीं; तरी उंदीर व सिंह यांच्या गोष्टींची आठवण ठेवून नवीन संधि साधण्याकरितां तिची पूर्वतयारी करण्याच्या कामास, निमुटपणें व अवडंबर न माजवितां, लागलेलीं कांहीं धोरणी माणसें अजून अस्तित्वांत होतीं. हीं माणसें जातीनें प्रशिअन होतीं व त्यांनीं आपलें, वर निर्दिष्ट केलेलें काम फेडरिक विल्यम याच्या जुलमी अम-

लाखालीं व मँटाईफेल याच्या नेतृत्वाखालीं, काम करणारें मंत्रिमंडळ भित्रें व प्रतिगामी धोरणाचें असतांही तसेंच चालविलें होतें आतां आपणांस त्यांच्या हालचाली व त्यांचीं कृत्यें यांचा विचार प्रथम करणें जरूर आहे कारण प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी लक्षांत घेतल्यावर झाल्-वरीन, नीड्लगन व पुढें कांहीं दिवसांनीं झालेली लष्करीखात्याची पुनर्घटना या गोष्टीमुळेंच प्रशिआला १८६६ त जर्मनीमध्यें वर्चस्व प्राप्त होऊन सन १८७१ त अनन्यगामी प्रभुत्व मिळालें.

प्रकरण १ लें.

प्रशिआ १८५२ ते १८५७.

मुख्य मंत्री मँटाईफेल याच्या अमदानींत प्रशिआची पींच्छेहाट इतकीं झाली, कीं या कालची राजशासनपद्धति १८४८ च्या राज्यक्रांतीच्या पूर्वीच्या पद्धतीपेक्षांहि जास्त अनियंत्रित होती. प्रशिआला सुधारणा करण्याची उत्तम संधि आली होती. पण ती त्यानें व्यर्थ घालविली राजा चौथा फ्रेडरिक विल्यम याची मँटाईफेल याच्यावर फार मर्जी होती. याच मँटाईफेलनें कधीं अपयशाची भीति तर कधीं यशःप्राप्तीची आशा अशी कालगति अनिश्चित चालली असतां तिचा शेवट आलमट्झ येथें ऑस्ट्रिआ पुढें लोटांगण घालून केला; व त्याच्या हातीं आतां राजानें सर्व अधिकारसूत्रें दिलीं. या शरण जाण्यामुळें जी नैतिक अवनति उद्भवली तिची छटा या मंत्र्याच्या सर्व योजनांत स्पष्ट दिसत होती. ह्या योजना परराष्ट्रीय संबंधांत क्षुल्लक, चीड आणाऱ्या व कोत्या दृष्टीनें केलेल्या अशा होत्या त्यांवरून ज्या राजकारणानें प्रशिआस उच्च पद मिळालें होतें व ज्याच्या योगानेंच तें पद कायम ठेवतां आलें असतें त्याचें रहस्य मँटाईफेल यास मुळींच कळलें नव्हतें हें उघड होत होतें. प्रशिआस इतर राष्ट्रांच्या नजरेआड करणें, आवजाऊं न देतां हार जाणें, सर्व प्रकारची जबाबदारी टाळणें व यूरोपखंडांत प्रशिआ आहे कीं नाहीं अशी निर्माल्यवत् स्थिति झाली तरी ती पतकरणें, हेंच त्याचें ध्येय होतें कीं काय,

कोण जाणें ! ज्या कर्तृत्ववान् ऑस्ट्रिअन मुत्सद्यानें आल्मटझ येथें प्रशिआस मान वांकवावयास लाविली तो जर आणखी फक्त थोडींच वर्षे जगला असता तर ज्या कालाचें वर्णन सुरू आहे त्या कालांतच प्रशिआ अधिक नीचावस्थेस जाऊन पोहोंचला असता, हें अगदीं शक्य आहे. आपल्या जर्मनीसंबंधीं धोरणाचा अंतिम हेतु काय आहे, याविषयीं स्कार्झेनबर्ग यानें आडपडदा मुळींच ठेविला नव्हता. दुसरा फ्रेडरिक यानें जें कांहीं केलें होतें तें सर्व फिरवून टाकावयाचें असा त्याचा कृतनिश्चय होता प्रथम प्रशिआची पूर्ण मानखंडना करावयाची व मग त्याचा नाश करावयाचा असा त्याचा बेत होता. प्रशिआची मानहानि करण्याच्या कामीं त्याला कसें पूर्ण यश आलें, हें ता २९ नोव्हेंबर १८५० रोजीं भरलेल्या प्रतिनिधींच्या सभेच्या लिहून ठेवलेल्या हकीकतींवरून सिद्ध होत आहे. परंतु सन १८५२ च्या एप्रिल महिन्यांत स्कार्झेनबर्ग यास अर्धांगवायूचा झटका होऊन तो राजकारणांतून निरंतरचा नाहींसा झाला. प्रशिआच्या सुदैवानें त्याच्या मागून अधिकारारूढ झालेले पुरुष बुद्धिमत्तेनें कमी प्रतीचे होते. तथापि तो मेल्यानंतर कांहीं दिवस तो जिवंत असल्याप्रमाणें प्रशिआचा राजा व मंत्री यांच्या सभागृहांभोंवतीं घिरट्या घालून त्यांस आत्मसत्तेचा लोप करणाऱ्या धोरणास अनुमति देण्यास भाग पाडतो आहे, असें वाटलें.

झाल्वरीन.

एकीकडे प्रशिआचा राजा व त्याचा मंत्री हे परराष्ट्रसंबंधांत प्रशिआची अवनति करणाऱ्या धोरणाचाच पुरस्कार करीत होते.

20 APR 1990.

परंतु दुसऱ्यापक्षीं देशाच्या अंतर्व्यवस्थेला माजी मुत्सद्यांनीं जें धोरण लावून दिलें होतें तें बळावत चाललें होतें व त्याला उत्तम यश येणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं या धोरणाच्या वाढीचें व्यवस्थेशीर व हृदयंगम असें वर्णन फॉइफ यानें आपल्या 'यूरोपचा अर्वाचीन इतिहास' या ग्रंथांत दिलें आहे, त्यांतून पुढील उतारा घेतला आहे. सन १८२८ ते १८३६ या वर्षांतील प्रशिआच्या अंतर्व्यवस्थेविषयीं लिहितांना फॉइफ म्हणतोः–"देशांतील वसूलजमेची पद्धत मोठ्या शहाणपणानें घालून दिलेली व सशास्त्र असल्यामुळें देश उत्तरोत्तर सधन होत चालला होता, हें प्रत्यक्ष दिसत होतें व्यापारी देवघेवींस होत असलेले अडथळे दूर केले, दळणवळणाचे मार्ग खुले केले व शेजारच्या जर्मन संस्थानांशीं क्रमशः ठराव करून जकातीच्या संहतीचा पाया घातला या संहतीला 'झाल्वरीन' हें नांव पडून शेवटीं ऑस्ट्रो–जर्मन संस्थानांशिवाय इतर बहुतेक सर्व जर्मनींचा अंतर्भाव या संहतींत–झाल्वरीनमध्यें झाला. जसजसें एक एक संस्थान प्रशिआनें ठरविलेल्या योजनेंत येऊन सामील होऊं लागलें, तसतसें जर्मनीतील निरनिराळ्या प्रदेशांत उत्पन्न होणारे जिन्नस बिनहरकत सर्व देशभर इकडून तिकडे जाऊं येऊं लागले. यापूर्वी हे जिन्नस प्रत्येक लहान लहान संस्थानानें आपल्या सरहद्दीवर बसविलेल्या करामुळें जेथल्या तेथें अडकून पडत असत. परदेशांतून येणाऱ्या मालावर जकातीचा वगैरे खर्चहि पुष्कळ कमी पडूं लागला, कारण जकातीचा बोजा आतां फक्त अगदीं कडेच्या सरहद्दीवरच पडूं लागला. प्रशिआ आपल्यापेक्षां अल्प ऐपतीच्या संस्थानांपाशीं व्यवहार

करण्यांत धिमेपणानें, शहाणपणानें व उदार बुद्धीनेंही वागत असे. म्हणून पैशाच्या देवघेवीसंबंधानें संघशक्तीचीं बंधनें उत्पन्न करून प्रशिआस पुष्कळ संस्थानें आपलींशीं करून घेता आलीं. हीं संस्थानें आजपर्यंत आपला पुढारी म्हणून ऑस्ट्रिआवर अवलंबून असत, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ह्या गोष्टीला नुसतें दिसण्यातही राजकीय एकीचें रूप येऊं नये, म्हणून चांगलीच खबरदारी घेतली होती परंतु इतकें करूनहि आर्थिक हितासंबंधीं वाढत जाणाऱ्या ऐक्यभावांत राजकीय ऐक्याचें बीं पेरलें गेलेंच.

झाल्वरीनची वाढ.

ज्या कालाविषयीं फॉइफ यानें लिहिलें आहे त्या कालानंतर 'झाल्वरीन'चें क्षेत्र एकसारखें वाढतच गेलें व पुष्कळ लहान लहान संस्थानें त्यांत निरनिराळ्या सालीं सामील झालीं. सन १८४८ च्या राज्यक्रांतीनंतर वर वर्णन दिल्याप्रमाणें गोष्टी पूर्वपदावर पुनः आल्या, तेव्हां ऑस्ट्रिआनें या योजनेंत हळूच शिरण्याचा प्रयत्न केला. जीं संस्थानें मूलतः केवळ ऑस्ट्रिअन आहेत त्यांच्यापासून 'झाल्वरीन' अगदीं अलग राहिल्यास प्रशिआला असंख्य फायदे होतील, या गोष्टीची पूर्ण जाणीव असलेले गृहस्थ प्रशिआंत हयात होते, असें अनुमान या बाबतींत ऑस्ट्रिआच्या निष्फळ झालेल्या प्रयत्नावरून निःसंशय निघतें. तो प्रकार असाः—

सन १८५१ च्या नोव्हेंबर महिन्यांत प्रशिआनें 'झाल्वरीन' च्या सभासदांस कळविलें कीं, सन १८५२ च्या वसंतऋतंत बर्लिन

येथें सभा बोलाविली आहे; त्या सभेपुढें 'झाल्वरीन'चीं मूलतत्त्वें व तिचें कार्यक्षेत्र यांचें दृढीकरण करून तीं वाढविण्याबद्दल सूचना मांडण्याचा प्रशिआचा विचार आहे.

झाल्वरीनमध्यें शिरण्याकरितां ऑस्ट्रिआचे प्रयत्न.

दरम्यान् व्हिएन्ना येथें व्यापार व सार्वजनिक बांधकामें या खात्यांचा मंत्री एल्बरफील्ड येथें जन्मलेला व म्हणून जन्मतः प्रशिअन चार्लस लुई फॉनब्रक या नांवाचा होता. त्यानें कैसरच्या राज्यांत त्यावेळीं प्रचलित असलेल्या जबर जकाती बसविण्याच्या पद्धतींत फरक करणें अवश्य आहे अशी प्रिन्स स्कार्झेनबर्ग याची खात्री करून दिली. इतर जर्मन संस्थानांना परस्परांनीं व्यापारविषयक दळणवळण जास्त सलगीचें ठेवणें जरूर आहे अशी सूचना करणें ही इष्ट आहे, अशी आणखी स्कार्झेनबर्ग याचीं समजूत त्यानें करून दिली. या कल्पनेचा पूर्ण पगडा त्याच्या मनावर बसून स्कार्झेनबर्ग यानें एक 'झॉल' कॉंग्रेस बोलाविली व तिची बैठक १८५२ च्या जानेवारींत व्हावी असें ठरविलें. ह्या कॉंग्रेस सभेंत प्रशिआ, हॅनोव्हर व कांहीं किरकोळ संस्थानें खेरीज करून 'झाल्वरीन'च्या सभासदांपैकीं बहुतेकांनीं भाग घेतला "झाल्वरीन"च्या सभासदांची सभा ता. १९ एप्रिल रोजीं बर्लिन येथें भरावयाची होती. त्या सभेंत ऑस्ट्रिआच्या सूचनांचा स्वीकार व्हावा व ऑस्ट्रिआस झाल्वरीनमध्यें योग्य स्थान मिळावें, असें सर्वानुमतें ठरलें होतें. ता. ६ एप्रिल रोजीं 'डार्मस्टॅड' येथें एक प्राथमिक सभा भरली होती. ही सभा त्या कालच्या इतिहासांत 'डार्मस्टॅड संमेलन' या नांवान प्रसिद्ध आहे. या संमेल-

नांत बव्हेरिआ, सॅक्सनी, वूर्टेंबर्ग, इसींचे दोन्ही प्रांत बॅडेन व नॉसौ यांनीं ऑस्ट्रिआचा प्रवेश ' झाल्वरीन 'मध्यें व्हावा या मुद्यावर विशेष जोर देऊन आग्रह धरावयाचा असें ठरविलें.

ऑस्ट्रिआचे प्रयत्न फसले.

परंतु बर्लिन येथें भरलेल्या सभेंत प्रशिआनें या सूचनेस प्रत्यक्ष विरोध न करितां मोठ्या खुबीनें तिचा विचार लांबणीवर टाकण्याची व्यवस्था केली. प्रशिआच्या प्रतिनिधींनीं ' डार्मस्टॅड ' संमेलनानें केलेल्या सूचनेवर प्रतिसूचना आणिली, ती येणेंप्रमाणें:—आम्ही खुद्द ' झाल्वरीन ' ची रचना ज्या मूलभूततत्त्वांवर केली आहे त्या तत्त्वांची फेरतपासणी करून ' झाल्वरीन ' ची पुनर्घटना व्हावी, म्हणून कांहीं योजना तयार करून त्या सभेपुढें विचारार्थ सादर केल्या आहेत. त्या योजनांवर सभा आपला निर्णय देईपर्यंत प्रस्तुत ' डार्मस्टॅड ' संमेलनाच्या सूचनेचा विचार तहकूब ठेवावा. पुष्कळ वादविवाद होऊनही ठाम असा निकाल कांहींच लागला नाही व झाल सभेची बैठक एक महिनाभर तहकूब ठेवण्यांत आली मध्यंतरी ' डार्मस्टॅड ' संमेलन पुनः स्टॅगर्ट येथें भरलें. आणि ता. २१ आगस्ट रोजीं बर्लिन येथें सभा भरल्यावर कांहीं विवक्षित शर्तींवर सभा प्रशिआनें तयार केलेल्या योजनेचा स्वीकार करण्यास तयार आहे असें जाहीर केलें. तथापि प्रशिआच्या योजनेस मान्यता मिळेल त्याच वेळीं ऑस्ट्रिआबरोबर ' जकातीची संहति व व्यापारीतह ' करून त्यावर सह्या व्हाव्या असा आग्रह धरण्यांत आला. हॅनोव्हर, ब्रन्स्विक, आलडेनबर्ग आणि थुरिंजिआ यांच्या अनुमतीनें प्रशिआ ह्या

तहनाम्यावर सही करण्यास तयार झाला; परंतु ' झाल्वरीन 'ची पुनर्घटना झाल्यावरच ही गोष्ट करावयाची अशी अट घालण्यांत आली. यावर सभा पुनः तहकूब झाली आणि ' डार्मस्टॅड ' संमेलन म्युनिच येथें सप्टेंबरमध्यें भरलें. या पुढें झालेल्या व्यवहारावरून ' झाल्वरीन- ' मध्यें ऑस्ट्रिआचा प्रवेश होऊं द्यावयाचा नाहीं असा प्रशिआचा अंतस्थ हेतु होता हें उघड दिसून आलें. फेलिक्स स्वार्झेनबर्ग याच्या सारखा दृढनिश्चयी व योग्य मार्ग दाखविण्यांत चतुर अशा नेत्याच्या अभावीं ऑस्ट्रिआ, कांहीं कालानंतर तडजोड करण्यास तयार झाला. या तडजोडीप्रमाणें ऑस्ट्रिआचा प्रशिआबरोबर तह होऊन आस्ट्रिआला आयात व निर्यात मालावर व माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेण्याच्या बाबतींत माफक प्रमाणावर जकातीचे दर देण्याचा हक्क मिळाला. या तहाची मुदत बारा वर्षांची होती. सन १८६० त जकातींची संहती करणें शक्य आहे किंवा नाहीं याचा विचार करण्याकरितां पंचांची सभा भरणार होती हें शक्य नाहीं असें ठरल्यास दोघांनींही जकातीच्या दराचें प्रमाण दोनही बाजूंनीं कमी करणें शक्य असल्यास तसें विचारांतीं करावें असें ठरलें. ' झाल्वरीन 'मध्यें ऑस्ट्रिआचा प्रवेश होऊं द्यावयाचा नाहीं या मुख्य तत्त्वास मोठ्या शिताफीनें येणेंप्रमाणें चिकटून राहून प्रशिआनें ह्या मार्ग प्रतीक्षेच्या काळांत ऑस्ट्रिआच्या बाहेर असलेल्या संस्थानांपाशीं हिताहिताच्या बाबतींत ऐक्यभाव ठेवून आपले असंख्य फायदे करून घेतले. सन १८६६ त ज्या घडामोडी झाल्या, त्यानंतर जर्मनांच्या अंतःकरणांचा ऐक्यभाव दृढ-

तर होण्यास जीं विशेष कारणें होतीं, त्यापैकीं प्रस्तुत बाबतींत प्रशिआचें धोरण हें एक कारण होय.

नीड्लगन (सुईच्या घर्षणानें पेट घेऊन उडणारी बंदुक.)

ह्या घडामोडीचें दुसरें कारण म्हटलें म्हणजे प्रशिअन सैन्यांत एक नवीन तऱ्हेची बंदुक (नीड्लगन) वापरण्यास सुरवात झाली. सन १८१५ त तह झाल्यावर जो ३५ वर्षांचा काळ लोटला त्यांत यूरोपांतील बहुतेक राष्ट्रांनीं आपल्या सैन्यांत सुधारणा न करण्याचें व्रत पाळलें होतें. विशेषतः हा प्रकार इंग्लंडांत ढळढळीत दिसून येत होता. सैन्यसुधारणेच्या बाबतींत पहिला डयूक ऑफ वेलिंगटन् याचें मत प्रमाणभूत होऊन बसलें होतें. ज्या शस्त्रास्त्रांच्या साहाय्यानें त्यानें मोठमोठ्या लढाया जिंकल्या होत्या त्यांत मोठीशी सुधारणा करावयाची नाहीं असें त्यानें ठरविलें होतें. बंदुकींत चकमकीच्या गारेऐवजीं आघाताबरोबर स्फोट पावणाऱ्या टोपणाचा उपयोग करण्यास त्याची हरकत नव्हती. परंतु यापुढें सुधारणेच्या बाबतींत पाऊल टाकण्यास तो बिलकुल तयार नसे. स्पेनमधील युद्धाचा इतिहासकार सर विल्यम नेपिअर याचीहि विचारसरणी याच प्रकारची होती. पायदळांतील सैनिकांस " ब्राऊन बेस " या नांवानें माहीत असलेली जुनी बंदुक म्हणजे शस्त्रांचा राजाच आहे असें दोघेही म्हणत असत. या थोर मंडळीच्या प्रमाणभूत वचनांनीं मोहित होऊन सर्व राष्ट्रानें तीच कल्पना उचलून धरिली. कोणीं शोधक कांहीं सांगूं लागल्यास त्याची हेटाळणी होई. सन १८५०–५२ च्या सुमारास

वॉर्नर नांवाच्या गृहस्थानें तोफेच्यापेक्षांही जिच्या गोळीचा पल्ला बराच लांब होता अशी बंदूक तयार केली. परंतु त्या वेळच्या मंत्रिमंडळानें हा एक मेंदू बिघडलेला वेडापीर आहे असें म्हणून त्याची टर उडविली व त्यानें जो प्रयत्न करून पाहण्याची परवानगी मागितली होती ती देण्याचें साफ नाकारिलें. याप्रमाणे इंग्लडमध्यें सैनिकांच्या शस्त्रांमध्यें सुधारणा होणें अशक्य होतें. प्रचलित पद्धतींचें निरीक्षण न करण्याच्या बाबतींत अशा प्रकारचा दुराग्रह फ्रॉन्स देशांतही रूढ झाला होता हें याहिपेक्षां विलक्षण होय; कारण ज्यानें तोफखान्यांत नोकरी केली होती इतकेंच नव्हे तर त्या खात्यांत सुधारणा करणें अवश्य आहे असें प्रतिपादन करून एक पुस्तकहि लिहिलें होतें, असा माणूस त्या देशांत बादशाहा झाला होता. ऑस्ट्रिआंत, रशिआंत व एक देश शिवायकरून यूरोपांतील इतर सर्व देशांत सैनिकानीं वापरण्याच्या शस्त्रांत सुधारणा न करण्याबद्दल खुलेपणाचें मतच जिकडे तिकडे पसरलें होतें. सर्वांच्या मतें ज्या शस्त्रांनीं यूरोप खंडांतील देशांची १८१५ त पारतंत्र्यापासून मुक्तता केली. तीं शस्त्रें चालू काळांतही तशींच उपयुक्त होतील असें होतें, परंतु वर दर्शविल्याप्रमाणें या सार्वत्रिक समजाला एकच अपवाद होता.

हा अपवाद म्हणजे प्रशिआचा होय. त्याची मीमांसा अशी आहे:—सन १८८७ सालीं सेक्सनींतील सॉमरडा येथें जॉन निकोलस ड्रेसी हा जन्मला. हा एक कुलपें करणाऱ्या व्यापाऱ्याचा मुलगा असून निसर्गतःच लोखंडी वस्तु करण्याच्या कामीं याची मति फार

उत्तम चाले. हा एकोणीस वर्षांचा असतां अल्टेनबर्ग व ड्रेसडेन येथें आपल्या बापाचा धंदा चालवीत असे. ह्या ठिकाणीं आपलें काम करण्यांत त्याची इतकीं तरतरी दिसून आली कीं तो १८०९ साली पॅरिस येथें गेला; कारण यावेळीं खऱ्या बुद्धिमत्तेचा विकास करून घण्यास पॅरिस हेंच एक उत्तम स्थान होतें. तेथें पॉलीच्या लहान शस्त्रांच्या कारखान्यांत त्यास नोकरी मिळाली. हा कारखाना प्रत्यक्ष नेपोलिअनच्या आश्रयाखालीं चालला होता. ह्या कारखान्यांत त्यानें व्यापाराच्या खुब्या शिकून त्यांत पूर्ण प्राविण्य मिळविलें व त्यावेळीं जी रीत प्रचारांत होती तींत पुष्कळ सुधारणा सुचविल्या. सन १८१४ ची वाताहत झाल्यावर तो आपली जन्मभूमि सामरडा येथें परत आला, व 'ड्रेसी आणि क्रानबीगेल' या नांवानें त्यानें तेथें लोखंडाचा कारखाना काढला कांहीं दिवस लोटल्यावर सैन्यांत वापरांत असलेल्या गारीच्या चकमकीच्या बंदुका बंद करून त्यांच्या जागीं ज्यांत दाबानें पेटणाऱ्या टोपणांचा उपयोग करतात त्या बंदुका तयार करण्याचें काम या कारखान्यास देण्यांत आलें. ड्रेसी हें काम करण्यांत गुंतला असतांना त्याला कल्पना सुचली कीं, ह्या नवीन बंदुकींत आपणास सुधारणा करितां येईल. सन १८२७ त त्यानें एक बंदुक तयार केली या बंदुकींत काडतुस पूर्वीप्रमाणेंच बंदुकीच्या तोंडांतून भरावयाचें होतें. परंतु त्यानें पेट घ्यावा म्हणून एक बारीकसा पोलादी गज अथवा सुई त्यांत ठोक्याच्या आघातानें घुसवावयाची अशी योजना केली होती. ह्या शस्त्राला ड्रेसी सुईच्या घर्षणानें उडणारी बंदूक असें म्हणे सरकारानें या त्याच्या नवीन शोधांत विशेष लक्ष

घालून त्यास प्रोत्साहन दिलें. परंतु आपली ही युक्तीच अजून अपूर्णावस्थेंत आहे हें मनांत आणून त्यानें तींत आणखी सुधारणा करण्याकरितां आपली खटपट तशीच चालू ठेवण्याचा निर्धार केला सन १८३६ त त्यानें जी बंदुक तयार केली तींत बार भरण्याची योजना तिच्या घशांतून Breach केली होती. पण काडतुस पूर्वीच्या योजनें प्रमाणें सुईच्या क्रियेनेंच म्हणजे घर्षणानें पेट घेई. सरकारनें हें शस्त्र स्पँडाव लुबेन येथें मोठ्या कसोशीनें कसास लावून पाहिलें व मग तें मान्य केलें हा शोध सरकारनें गुप्त ठेवण्याचा निश्चय केला, व लहान बंदुका वापरणाऱ्या पलटणीस फक्त असल्या बंदुका वापरण्यास दिल्या. परंतु १८४८ त सामान्य दंगेखोर लोकांनीं बर्लिन येथील दारूगोळा ठेवण्याच्या जागेवर छापा घातला त्यावेळीं नव्या तऱ्हेच्या बंदुकांचा फार मोठ्या संचय तेथें होता ही गोष्ट सहजच बाहेर फुटली. अशा रीतीनें गुप्तपणा ठेवण्याचें कारण नाहींसें झाल्यावर ह्या बंदुका हळूहळू सर्व सैनिकांस देण्यात येऊं लागल्या. सन १८५१–५२ त बॅडेन येथें उद्भवलेलें बंड मोडण्याकरितां प्रिन्स ऑफ प्रशिआ सैन्याच्या तुकड्या घेऊन गेला होता. तेव्हां प्रत्यक्ष लढाईंत या बंदुकांचा कितपत उपयोग होतो याचा अनुभव लहान प्रमाणावर त्यानें घेऊन पाहिला व हाच प्रिन्स कांहीं दिवसांनीं प्रशिआचा राजा झाला व त्यास पहिला विल्यम म्हणत. आणखी कांहीं दिवस गेल्यावर यालाच पहिला जर्मन बादशहा हे पद प्राप्त झालें. ह्या प्रिन्सच्या नेतृत्वाखालीं ही मोहीम ६ आठवडे चालू होती इतक्या अवधींत प्रशिआचें हें नवें

व 363

शस्त्र यूरोपांतील कोणत्याही देशाच्या शस्त्रापेक्षां सर्वतोपरि सरस आहे अशी त्याची खात्री झाली आणि म्हणून त्याच्याच सांगण्यावरून उरलेल्या सर्व सैनिकांस या बंदुका देण्याचें काम मोठ्या झपाट्यानें संपविण्यांत आलें. सन १८६६ त ऑस्ट्रिआ बरोबर युद्ध झालें, त्या युद्धांत प्रशिआच्या धाडशी मुत्सद्यांनीं जें धोरण बांधिलें होतें त्यास पूर्ण यश आलें, तें बहुतांशीं याच शस्त्राच्या उपयोगाचें फल होतें. जर्मनींत प्रशिआला अग्रस्थना मिळवून देणें हाच या धोरणाचा मुख्य हेतु होता व तो साध्य करून घेण्याच्या प्रयत्नांत या मुत्सद्यांनीं प्रशिआचें सर्वस्व धोक्यांत घातलें होतें. तेव्हां मोठ्या आशेनें हृदयाशीं कवटाळून धरलेला हा स्वप्नासारखा वाटणारा हेतु सिद्धीस गेला त्यासंबंधीं मुख्य कारणांमध्यें या नवीन बंदुकीच्या शोधाची गणना करावयास पाहिजे.

प्रशिआचें अंतर्व्यवस्थेंतील प्रतिगामी धोरण.

याप्रमाणें बडेजाव न करितां शक्य तितक्या गुप्तपणें भविष्यकालीन युद्धाची तयारी करण्यांत प्रशिआ गुंतला असतां प्रशिअन सरकार आपल्या प्रतिगामी धोरणानें प्रजेच्या अंतःकरणांत द्वेषाची वृद्धि करीत होतें व परराष्ट्रीय धोरण आपल्या इभ्रतीस कमीपणा आणणारें ठेवून सर्व यूरोपखंडांत स्वतःस उपहासास्पद करून घेत होतें. राजाची वृत्ति उदासीन, देवाच्या साक्षात्काराविषयीं आतुर व नवीन कल्पना आणि विचार यासंबंधीं सहानुभूतिशून्य असल्यामुळें तो अनियंत्रितसत्तावाद्यांच्या कह्यांत दिवसानुदिवस अधिकाधिकच

जात होता. त्याचा धर्म व शिक्षण खात्यांच्या मंत्री रॉमर आणि अंतर्व्यवस्था खात्याचा मंत्री रेस्ट फॅलन यांनीं आपआपल्या खात्यांत नाना तऱ्हेचे निर्बंध घालून लोकांचा छळ केला. लोकांस एकसारखा त्रास देऊन त्यांना चीड आणावयाची असें त्यांचें धोरण होतें. हेरांस प्रोत्साहन मिळत असे, लोकांची नालस्ती करणारांवर बक्षिसांचा वर्षाव होई आणि जाहीर रीतीनें कोणतीहि गोष्ट बोलण्यावर कडक प्रतिबंध असे. सन १८४८–४९ सालीं जो पक्ष प्रबल होता त्यांतील लोकांवर करडी नजर ठेवून सरकार हात धुऊन त्यांच्या पाठीस लागलें होतें व अत्यंत क्षुल्लक कारणावरूनही अशा लोकांस तुरुंगाची वाट दाखविण्यांत येई. सन १८४८ च्या राज्यक्रांतीच्या चळवळींत पुढाकार घेतलेल्या एका वेस्टफॅलिआ येथील प्रोफेसराच्यां हालचालीवर १८५२ ते १८६६ पर्यंत सरकारची बारिक नजर होती. या प्रोफेसरास प्रस्तुत राजधोरणाचा शेवट काय होईल असा प्रश्न केला असतां त्यानें अगदीं हळूच उत्तर दिलें कीं, 'राज्यक्रांति'. जणूं काय भिंतीसहि कान आहेत असें त्यास खरोखरच वाटत होतें आणि १८६६ त झालेला विजय झाला नसता, तर हें उत्तर अक्षरशः खरें ठरलें असतें.

मॅटाईफेल याचें परराष्ट्रीय धोरण.

आल्मटझ येथें शत्रूच्या पुढें लोटांगण घातल्यामुळें अधिक अप्रिय झालेलें मॅटाईफेल याचें परराष्ट्रीय धोरण जसें त्या धोरणाच्या पुरस्कर्त्यास तसेंच सर्व प्रशिआस लज्जास्पद होतें. मॅटाईफेल याचा जन्म

१८०५ त झाला होता. त्याच्या सर्व व्यवहारांत तो कट्टा अनियंत्रित सत्तावादी होता. सन १८४७ तं संयुक्त प्रतिनिधींच्या सभेंत व १८४८ च्या एप्रिल महिन्यांत राज्यक्रांतीच्या समयीं त्यानें मोठ्या आवेशानें सनदशीर राज्यपद्धतीला प्रतिकूल भाषणें केलीं होतीं. सन १८४८ नंतर राजकारणाला प्रतिगामी वळण लागलें. त्यावेळीं प्रजेला मिळालेल्या सवलती मोठ्या हातचलाखीनें सरकारास काढून घेतां आल्या. त्यावरून मॅटाईफेल याचीं मतें जास्तच दृढ झालीं कौंट ब्रँडेनबर्ग याच्या मार्फत तो परराष्ट्रीय मंत्री झाला व १८५० च्या डिसेंबरांत कसेंही करून प्रशिआंत शांतता स्थापित करून घेण्याच्या मार्गास तो लागला; कारण एकदां शांतता झाली म्हणजे आपल्या राष्ट्रांत दडपशाही सुरू करण्याचा मार्ग सुगम होईल अशी त्याची दृढ समजूत होती. सन १८५०-५८ ह्या आठ वर्षांत मुख्य मंत्री व परराष्ट्रीय मंत्री या दोहोंचेहि अधिकार त्याच्याच हातीं असून प्रजाजनांवर जुल्म करण्याचीं व इतर राष्ट्रांत देशाचीं अपमानास्पद स्थिति करण्याचीं सर्व साधनें त्यास अनुकूल होतीं आणि ह्या कामगिरींत त्याला पूर्ण यशहि आलें.

मॅटाईफेल याप्रमाणें अधिकारारूढ असतां देशाच्या अंतर्व्यवस्थेंत सन १८४८ त जनतेस मिळालेले हक्क कसे हिरावून घेतले; त्याच वेळेस बंद पडलेले अन्यायप्रचुर व्यवहार पुनः कसे सुरू झाले; लोकशिक्षणाचा मर्यादा होईल तितकी आकुंचित कशी ठेविली; आणि वृत्तपत्रांनीं एक तर लांगूलचालन तरी करावें किंवा मूग गिळून तरी

बसावें अशी कदर त्यांच्यावर कशी ठेविली होती वगैरे अंतर्व्यवस्थेंतील गोष्टींची कच्ची हकीगत दिल्यास, ती ह्या पुस्तकांत अस्थानीं होईल. मॅटाईफेल याचें परराष्ट्रीय धोरण कसें होतें व क्रिमिअन युद्ध चालू असतां त्याच्या कृतींचा परिणाम प्राशिआवर काय झाला या दोन गोष्टींचेंच विवेचन मुख्यतः येथें करावयाचें आहे.

क्रिमिअन युद्ध चालूं असतां प्राशिआचें वर्तन.

सन १८५३ च्या एप्रिल महिन्यांत झार निकोलस यानें प्रिन्स मेनस्किकॉफ यास सुलतानापाशीं कांहीं मागण्याकरितां कॉन्स्टँटिनोपल येथें पाठविलें. आपल्या देशाचें स्वातंत्र्य गमावल्याशिवाय ह्या मागण्या पूर्ण करणें सुलतानास शक्य नव्हतें; आणि म्हणून ह्या मागण्यांच्या योग्यायोग्यतेचा निकाल यूरोपिअन राष्ट्रांनीं सर्वसाधारण मत देऊन लावावा अशी तुकस्तानानें विनंति केली. यावेळा प्रशिआच्या राजानें एक तोड सुचविली तीं सत्ताधिकारी राष्ट्रास व पोर्टच्या अधिकाऱ्यास मान्य झाली असती तर वैरप्रसंग बहुतकरून टळला असता रशिआच्या मागण्यांपैकीं एक मागणी अशी होती कीं सुलतातानें त्याच्या प्रजेपैकीं ख्रिश्चन धर्मीय प्रजेचें रक्षण करण्याचें काम झारकडे सोंपवावें. ही मागणी कबूल केल्यास पुढील गोष्टी उद्भवतील ह उघड होतें:—(१) सर्व तुर्की राज्यांत एक राज्यांतर्गत दुसरी राज्यस्थापना, (२) झारच्या सत्तेपुढ सुलतानाची सत्ता फिकी पडून तिला उतरती कळा लागली असती (३) सुलतानाचे सर्व हक्क पार बुडून जाण्याचा मार्ग अत्यंत सुगम झाला असता दोन टोंकांच्या मध्यवर्ती

असा उपाय काढावा अशा पुष्कळ सूचना आल्या होत्या. त्यांपैकीं एक प्रशिआचा राजा चौथा फ्रेडरिक विल्यम याजकडून आली होती. ती सूचना अशा:—सुलतानानें आपल्या ख्रिश्चन प्रजेवरील हक्क किंवा अधिकार झारच्या स्वाधीन न करितां पांच सत्ताधीश राष्ट्रांच्या स्वाधीन करावे याचा अर्थ असा कीं सुलतानाच्या ख्रिश्चन प्रजेच्या हक्काबद्दल सत्ताधीश राष्ट्रांनीं हमी घ्यावी व त्याचें संरक्षण करावें युक्तिवाद दृष्ट्या झारची सूचना व प्रशिआच्या राजाची सूचना यांत तत्त्वतः मुळींच भेद नव्हता. दोघांच्या म्हणण्याप्रमाणें सुलतानाच्या प्रजाजनांचे हक्क परकीय सत्तेच्या अंमलाखालीं जावयाचे होते. ज्या राजाला स्वाभिमान, स्वप्रतिष्ठा व स्वाधिपत्य याविषयीं खरी चाड आह अशा कोणत्याही राजाला ही सूचना मान्य होणें शक्य नव्हतें. पार्ट येथील इंग्लिश वकील लॉर्ड डी रेडक्लिफ याचें मत असेंच होतें व त्यानें सुलतानालाहि ही सूचना मान्य करूं नये असा सल्ला दिला सुलतान व त्याचे मंत्री यास हा सल्ला पूर्ण मान्य होऊन त्यांनीं ती सूचना फेंटाकून ला ली.

क्रिमिअन युद्ध.

तदनंतर ज्या गोष्टी घडल्या त्यांचा नुसता उल्लेख केल्यास आपलें काम भागेल दोन पाश्चात्य बलाढ्य राष्ट्रांचें पूर्ण पाठबळ आपणास आहे अशी सुलतानाला खात्री बाटून त्यानें रशिआ ज्या शर्तीं त्याच्यावर लादण्याचा प्रयत्न करीत होता, त्या साफ नाकारिल्या. इतकें झाल्यावर प्रिन्स मेनस्किकॉफ कॉन्स्टँटिनोपल सोडून परत गेला (२१ मे). नंतर आपण आपल्या ख्रिश्चन प्रजाजनांना

ज्या सवलती पूर्वीच दिल्या आहेत, त्या अगदीं खऱ्याखुऱ्या दिल्या आहेत असें सिद्ध करण्याकरितां सुलतानानें एक फर्मान काढलें व त्या फर्मानावरून ख्रिश्चन प्रजाजनांना दिलेले हक्क व अधिकार हे कायमचे त्यास दिले आहेत असें जाहीर झालें त्यांत रशिआनें काढलेल्या कुरापतीस आळा घालण्याच कामीं दोस्तांनीं आपणांस मदत करावी असें एक विनंतिपत्रहि काढलें. इंग ड, फ्रान्स, ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्या प्रतिनिधींची एक सभा नंतर व्हिएन्ना येथें भरली. या सर्वांनीं ता. ३० जुलई रोजीं एक लिखित सर्वानुमतें तयार केलें व त्यांतील अटी ता. ११ ऑगस्ट रोजीं झारनें मान्य केल्या. परंतु या लिखतान्वयें झारनें जें जें मागितलें होतें, तें तें व्यवहारदृष्ट्या दिल्या सारखेंच होतें, म्हणून या लिखितोस सुलतानानें हरकत घ्यावी, हें अगदीं वाजवी होतें. अटींत कांहीं योग्य असे फेरबदल होत नसतील सर माझी या पत्रिकेस हरकत आहे, असें सुलतानानें जाहीर केलें. फेरबदल व्हावा हें सुलतानाचें म्हणणें सयुक्तिक आहे असें सांगून दोस्तांनीं सुलतानास पाठिंबा दिला. सप्टेंबर ता. ७ ला झारनें सुचविलेले फेरबदल करण्याचें नाकारिलें आणि मोलडेव्हिआ येथें आपली फौजही ता २ जुलई रोजीं प्रूथा नदी उतरून गेली होती ती सज्ज केली. नंतर राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या संमतीनें सुलतानानें रशिआ विरुद्ध युद्ध पुकारलें (ता. ५ ऑक्टोबर). ता. २ नोव्हेंबर रोजीं इंग्लिश व फ्रेंच आरमारें बासफोरसमध्यें शिरलीं आणि तुर्की जहाजांचा नोव्हेंबर ता ३० ला नाश झाल्यावर तीं काळ्या समुद्रांत शिरलीं.

(ता. ४ जानेवारी १८५४ . तडजोडीचें बोलणें व्हावें म्हणून पुष्कळ प्रयत्न झाल्यावर व्हिएन्ना येथील सभेच्या बैठकी बंद झाल्या (१६ जानेवारी) इंग्लंड व फ्रान्स यांनीं झारला निर्वाणीचा खलिता धाडिला, परंतु त्यानें त्याचें उत्तर धाडिलेंच नाहीं (२७ फेब्रुवारी). तुर्कस्थानानें झारच्या मागण्याचा निषेध शस्त्रास्त्रांच्या जोरावर करण्याकरितां इंग्लंड व फ्रान्स यांच्याशीं दोस्ती केली (ता. १२ मार्च); आणि ता . २७ व २८ मार्च रोजीं त्या राष्ट्रांनीं रशिआ विरुद्ध युद्ध आरंभिलें.

प्रशिआचा आत्मलोप.

युद्धाचा पुकारा होण्यापूर्वी ज्या वाटाघाटी चालल्या होत्या, त्यांत प्रशिआला युद्धापासून अलग ठेवण्याचा आपला कृतनिश्चय ह्या त्याच्या निश्चयाचीं कारणें फारच विलक्षण होतीं—आहे इतकेंच नव्हे तर वैरभाव टाळण्याकरितां जे प्रयत्न होत आहेत त्यांतहि प्रशिआनें भाग घेऊं नये असा आपला दृढ संकल्प आहे, हें फ्रेडरिक विल्यम यानें चांगलेंच निदर्शनास आणून दिलें. त्यानें मागें सांगितलेली एकच सूचना केली होती आणि व्हिएन्ना यथील सभेंत आपल्या वकिलास हजर राहण्यास परवानगी दिली होती. त्यानें इंग्लंडच्या राणीशीं प्रत्यक्ष व इंग्लिश परराष्ट्रीय सेक्रेटरी लार्ड ॲबरडीनपाशीं नेहमींच्या पद्धतीनें पत्रव्यवहार केला होता. त्यानें या युद्धावर घेतलेले आक्षेप नानाविध आहेत. " हें युद्ध केवळ एका काल्पनिक तत्त्वाकरितां आहे. " " या युद्धाच्या व्हाइन प्रदेशांत राहणाऱ्या उद्योगी लोकांशीं व रायसेनबर्ग आणि बर्नस्टीन येथील शेतकऱ्यांशीं कांहीं संबंध नाहीं. " " या युद्धानें इंग्लंड व तिसरा नेपोलिअन यांचा मित्रभाव जडला असून मला ही

दोस्ती पाहून मोठी किळस वाटत आहे.'' ' इंग्लंडनें हा साहसी तिसरा नेपोलिअन मजवर हल्ला करणार नाहीं अशी हमी बेतल्या खेरीज मी या युद्धांत पडणार नाहीं.'' '' खिश्चन प्रजेविरुद्ध इस्लामला मदत करण्याकरितां हें युद्ध आहे, म्हणून जे या युद्धांत भाग घेतील त्यांच्यावर ईश्वराचा मोठा रोष होऊन त्या अपराधाबद्दल ईश्वर त्यांस दंडहि करील.'' ''ज्या बादशाहा विरुद्ध हें युद्ध मांडलें अशी आहे तो मोठा स्पृहणीय शेजारी आहे असा माझा अनुभव आहे; तह व्हावा त्याची उत्कट इच्छा आहे व कांहींतरी निमित्त मिळाल्याबरोबर अटी स्वीकारण्यास तो तयार होईल.'' '' मला पक्कें माहीत आहे कीं रशिअन बादशाहाची शांतता असावी अशी उत्कृष्ट इच्छा आहे. सार्वभौम राजाची इभ्रत हें त्याच्या आयुष्यक्रमाचें तत्त्व आहे त्याकरितां आपण एक पूल बांधावा. त्यावरून तो चालत येईल व ईश्वराचे गुणानुवाद गाऊन त्यास शरण जाईल. याबद्दल मी हमी घेतों'' असें त्यानें इंग्लंडच्या राणीस लिहिलें होतें.

प्रशिआची शोचनीय अवस्था.

क्रिमिअन युद्ध चालू असतां फ्रेडरिक विल्यम यानें परराष्ट्रीय धोरण, वर जीं अवतरणें दिलीं आहेत त्या ना अनुरूप असेंच होतें. ह्या धोरणाचें वर्णन एका वाक्यांतच देतां येईल. इतर राष्ट्रापासून विलग राहणें हेंच तें धोरण. अशा राजधोरणानें यूरोपांतील राष्ट्रांच्या मंत्रिमंडळांत प्रशिआचें वजन पार नाहींसें झालें. इंग्लंड व फ्रान्स पूर्वदेशीय राक्षसी राजसत्तेबरोबर झगडत असतांना पाश्चात्य राजाधिकाऱ्यांची सहानुभूतिपूर्वक मैत्री संपादून ऑस्ट्रिआ डॅनुविअन

संस्थानें व्यापून टाकीत असतां, सॅव्हाय घराण्यास आपले प्रतिनिधित्व देऊन इटली या राजाधिकाऱ्यांस मदत करीत असतां, आपल्या राजाच्या नेतृत्वाखाली प्रशिआ केवळ स्वार्थपर होऊन स्वस्थ दूर मजा पाहत राहिला होता. युद्धाचा समाप्तिकाळ संनिध आला तेव्हां तहाची वाटाघाट करण्याकरतां पॅरिस येथें मोठ्या राष्ट्रांची सभा भरली (२६ फेब्रुवारी १८५६). प्रशिआची या मोठ्या राष्ट्रांमध्यें गणना असतांना वाटाघाटीच्या प्रारंभाला प्रशिआला घेतलें नाहीं. ह्यांत नवल वाटण्यासारखें कांहींच नाहीं. तहनाम्यांतील शर्तींचा खर्डा कायम ठरल्यावर प्रशिआस या सभेला येण्याबद्दल निमंत्रण गेलें. कारण सन १८४१ च्या तहाची फेर तपासणी करणें जरूर होतें व या तहनाम्यावर सह्या करणारांमध्यें प्रशिआ होता. जेनाची लढाई झाल्यापासून जो सहा वर्षांचा काळ गेला तो काळ सोडून दिला असतां सर्व जगाच्या दृष्टीनें प्रशिआची हल्लींच्या इतकी नीचावस्था कधींही झाली नव्हती. प्रशिआच्या ह्या अवनतीच्या काळीं पुढें अवघ्या दहा वर्षांतच प्रशिआ यूरोपमध्यें पहिल्या प्रतीचें राष्ट्र म्हणून आपली प्रतिष्ठा पुनः स्थापित करील, इतकेंच नव्हे तर सन १८४९ च्या एप्रिल महिन्यांत फँकफोर्ट येथील राष्ट्रीय सभेनें देऊं केलेलें सार्वभौमपद फ्रेडरिक विल्यम यानें स्वीकारिलें असतें तर जर्मनींत प्रशिआला जें वर्चस्व मिळालें असतें, त्याहपेक्षां खरोखरीच सरस, निश्चित व टिकाऊ असें प्राबल्य प्रशिआस प्राप्त होईल, असें भविष्य वर्तविण्याचें कोणीं धाडस केलें असतें ?

दाखल नं .....

प्रकरण ४ थ.

प्रिन्स विल्यम आपल्या भावाचा राज्यकारभार तो आजारी असल्यामुळें पाहतो–जागृतीचा काल.

पॉरिसच्या तहनाम्यावर १८५६ ता ३० मार्च रोजीं सह्या झाल्या व क्रिमिअन युद्ध संपलें प्रशिआचा राजा फ्रेडरिक विल्यम यानें ता २३ ऑक्टोबर १८५६ रोजीं राज्यकारभार पाहण्याचें काम सोडून दिलें. त्याच्या मेंदूला फार दिवसापासून कांहीं व्यथा जडली होती तिनें आतां फारच जोर केल्यामुळें त्याला राज्यकारभार सोडून विश्रांति घेणें प्राप्त झालें. त्याला संतति नव्हती म्हणून त्याचें सर्व काम त्याचा भाऊ प्रिन्स विल्यम यास पहावें लागलें. मागील हकीकतींत ह्या राजपुत्राचा नामनिर्देश वारंवार आला आहे. परंतु पुढें येणाऱ्या हकीकतींत त्यानें बजाविलेली कामगिरी विशेष महत्त्वाची असल्यामुळें राजाच्या आजारीपणांत त्याच्याकडे आलेल्या अधिकाराचा स्वीकार त्यानें केला. ततपूर्वीच्या त्याच्या आयुष्यक्रमाची थोडी माहिती येथें देणें अस्थानीं होणार नाहीं.

प्रशिआचा राजा पहिला विल्यम.

प्रशिआचा प्रिन्स विल्यम, राजा तिसरा फेडरिक विल्यम याचा दुसरा मुलगा हा ता. २२ मार्च १७९७ रोजीं बर्लिन येथें जन्मला. प्रशिआ नेपोलिअनच्या मगरमिठींत सांपडला असतां ता. १

जानेवारी १८०७ रोजीं सैन्यांत अंमलदार म्हणून त्याची नेमणूक झाली. सन १८१३ ऑक्टोबर महिन्यांत त्याला कॅप्टनची जागा मिळाली व १८१४ च्या मे महिन्यांत तो आपल्या बापाबरोबर असतांना त्याला बार–सर–आब येथें आयर्नक्रॉस (विशेष शौर्य दाखविल्याबद्दल मिळणारा बिल्ला) मिळाला, व तो प्रशिअन सैन्याबरोबर पॅरिस शहरांत शिरला. दोस्त राष्ट्रांच्या राजांबरोबर थोडे दिवस इंग्लंडांत राहून तो परत आल्यावर त्याचीं गार्ड्सच्या पलटणीच्या मेजरच्या जागेवर नेमणूक झाली. मग तो बेलजम सरहद्दीवर असलेल्या सैन्याला जाऊन मिळण्याकरितां निघाला वाटरलूच्या रणभूमीवर त्यास वेळेवर जाता आलें नाहीं परंतु आपलें सैन्य बरोबर घेऊन तो पुनः पॅरिस शहरांत शिरला. बर्लिनला परत आल्यावर त्यानें आपलें सर्व लक्ष आपल्या धंद्याकडे लाविलें, व त्यांतलि सर्व खुब्या त्यानें पूर्ण अवगत करून घेतल्या. नंतर १८२५ त त्याला बढती मिळून तो गार्डाचा लेफ्टनंट जनरल व कमांडंट झाला. पुढें चार वर्षांनीं त्याचा सॅक्सीवायमरची राजकन्या ऑगस्टा इच्या बरोबर विवाह झाला सन १८४० त त्याचा बाप मरण पावला व प्रशिआच्या गादीचा वारसा पुढेंमागें त्याच्याकडे येणार अशी परिस्थिति उत्पन्न झाली. यावरून त्याला प्रिन्स ऑफ प्रशिआ अशी संज्ञा मिळाली व पॉमेरॅनिआ संस्थानचें व पायदळ सैन्याचें आधिपत्य त्याजकडे आलें.

सन १८४८ च्या मार्च महिन्यांत बर्लिन शहरीं बंडाची जबर लाट उसळल्याबरोबर प्रिन्स विल्यम यानें आपल्या भावास तुम्ही प्रथम

सर्व सामर्थ्य खर्च करून बंड चिरडून टाका व मग शस्त्र घेऊन सज्ज झालेल्या बडखारांना तुम्हांस काय सवलती देणें असतील त्या द्या असे आग्रहपूर्वक सांगितलें. दंग्याधेंड्या.चा नायनाट करा, मग लोकांची खरी गाऱ्हाणीं असतील, तीं निवारण करा आणि इमानानें, तुम्हीं द्याल, तीं वचनें पूर्ण करा, असा हें त्यानें आपल्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट करून सांगितला. राजानें त्याचें हें म्हणणें मनावर घेतलें नाहीं. परंतु लोकांचा ग्रह मात्र असा झाला कीं दडपशाहीचे उपाय योजण्याबद्दल त्यानेंच राजास भर दिली, व तो लोकांच्या मनांतून इतका उतरला कीं राजा व त्याचे मंत्री यांनीं त्यास तूं कांहीं काळपर्यंत राजकारणातून आपलें अंग पूर्णपणें काढून घे, असा उपदेश केला. तदनुसार तो पुन लंडनशहरीं जाऊन राहिला तेथें त्याची पील, रसेल, पामर्स्टन, बुनसेन आणि ग्रिन्स ऑलबर्ट (व्हीक्टोरीआचा नवरा) या सारख्या पहिल्या प्रतीच्या मोठ्या लोकांशीं चांगली ओळख झाली, व अल्प काळांतच प्रशिआला या आणीबाणीच्या प्रसंगांतून पार पाडण्यास कोणत्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे याचा आपल्या मनाशीं निश्चय त्यानें करून ठेविला. जर्मनीच्या एकीकरणाविषयीं त्या वेळीं जे प्रयत्न चालले होते ते शेवटीं सफल होतील असें त्याला मुळींच वाटत नव्हतें. परंतु जर्मनींतील संस्थानांमध्यें कोणतें स्थान मिळण्याची लायकी प्रशिआस प्राप्त करून घेतां येईल, याची त्यास अगदीं बरोबर कल्पना झाली बर्लिन येथें परत आल्यावर त्यानें राष्ट्रीय सभेंत भाषण केलें. त्यांत सनदशीर राज्यपद्धतीचा मी कैवारी

आहे असें त्यानें स्पष्ट सांगितलें त्याच दिवशीं बॅडेन व पॅलॅटिनेट येथील बंड मोडण्यास ज्या प्रशिअन सैन्याच्या तुकड्या जाणार होत्या त्यांचें आधिपत्य त्यास देण्यांत आलें या मोहिमींत नीड्लगनचा उपयोग कितपत होतो हें ठरविण्यास त्यांस पुष्कळ अवधि मिळाला, कारण ही मोहीम सहा अठवडे (दीड महिना) चालून बंडखोरांचा पूर्ण मोड झाला. बर्लिन येथें परत आल्यावर व्हेनिश प्रांत व वेस्टफॅलिआ यांच्या गव्हर्नराची जागा त्यास मिळाली पुढें हेसी प्रश्नासंबंधीं आपल्या भावाचें वर्तन आलमट्झ येथें शत्रूचें सर्व म्हणणें अगदीं मान वांकवून कबूल करणें हा त्याचा शेवट हीं पाहून त्यास पराकाष्टेचें वाईट वाटलें आणि म्हणून या पुढें शत्रूसमोर सर्वस्वी हार खावयास लावणारा तह ज्यानें घडवून आणिला तो जो पर्यंत मुख्य मंत्र्याचा अधिकार चालवीत होता, तो पर्यंत प्रिन्स विल्यम यानें राजकारणांत बिलकुल मन घातलें नाहीं हा राजपुरुष मोठा स्पष्टवक्ता असल्यामुळें जेव्हां जेव्हां प्रसंग येई तेव्हां तेव्हां मँटाईफेल व त्याचें राजधोरण विषयीं आपलें मत स्पष्टपणें बोलून दाखविण्यास तो कधीं ही चुकत नसे. हीं त्याचीं मतें जिकडे तिकडे माहीत होत गेल्यामुळें त्याची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत गेली. याच कारणामुळें प्रागतिक पक्षाच्या पुढाऱ्यांस याच्यासारख्या सत्यप्रिय, कर्तृत्ववान् व प्रजेशीं अगदीं न्याय्य वर्तन करण्यास तयार असा पुरुष केव्हां एकदां अधिकारारूढ होईल असें होऊन गेलें.

प्रिन्स विल्यम हा खरा शिपाई होता. सैन्याची संघटना या विषयाच्या अभ्यासाला त्यानें आपल्याला वाहून घेतलें होतें. प्रशिअन

सैन्यांत कोणते दोष होते, हें त्यास पक्कें ठाऊक असून ते दूर करण्यास काय उपाय योजावयाचे हे त्यानें आपल्या मनाशीं पक्कें ठरवून टाकलें होतें. तो जात्या शांतवृत्तीचा असून त्याचे विचार नेमस्त होते बड लोकांच्या बाबतींत थोरल्या भावाप्रमाणेंच हाहि पक्षपात करीत असे परंतु प्रसंगोपात्त ज्यांच्यावर त्याच्या पूर्ण विश्वास होता त्यांनीं सांगितल्यास तो तो दुराग्रह, मोठ्या मारामारीनें कां होईना, सोडूनहि देण्यास तयार असे मनुष्याची पारख करण्याचें त्याचें बुद्धि सामर्थ्य आश्चर्यकारक होतें ही गोष्ट मोठी दुर्घट आहे परंतु या राजपुत्राचा या बाबतींत अंदाज कधींहि चुकला नाहीं. एकदां त्यानें मनुष्याची पारख केली आणि त्या माणसास कसोटींला लावून पाहिले म्हणजे मग तो माणूस त्याच्या पूर्ण विश्वासांतला होई. तथापि त्याचा स्वभाव इतका निष्कपटी होता कीं त्याच्या अत्यंत विश्वासांतील सल्लागारांसुद्धां कळून चुकलें होतें कीं कांहीं मर्यादेपलीकडे त्याचें मन वळविणें शक्य नव्हतें. अशावेळीं त्यांनीं मागतलेल्या सवलती अंकीकृत धोरण यशस्वी होण्यास अत्यावश्यक आहेत अशी त्यांची पक्की खात्री असली म्हणजे ते त्यास जाणून बुजून फसविण्यास भीत नसत. यावरून त्याच्या स्वभावांतील एक दोष आपल्या नजरेस येतो. एखादी गोष्ट सामान्य सल्लागारानें सांगितल्यास तिच्याबद्दल चौकशी केल्या खेरीज तो ती खरी मानण्यास कधींहि तयार नसें पण तीच गोष्ट अगदीं जवळच्या विश्वासू सल्लागारानें सांगितल्यास तो ती सर्व ती खरी मानी व तिच्या खरेपणाबद्दल त्याच्या मनांत यत्किंचित् संशय येत नसे. इतका तो स्वतः प्रांजल असून तसाच दुसऱ्यावर

विश्वास ठेवण्यास तयार असे १८७० चें युद्ध सुरूं होण्यापूर्वीच नुकतें या प्रकारचें संस्मरणीय उदाहरण नजरेस आलें. त्याचें वर्तन नेहमीं दिलदार व सरळपणाचें असे त्याचा सुस्वभाव आणि व्यवहारज्ञान या दोन गोष्टींनीं तो जवळच्या माणसास अत्यंत प्रिय वाटे.

पहिल्या विल्यमनें आरंभाच योजलल्या उपायांचे सुपरिणाम.

प्रिन्स विल्यम हा अशा प्रकारचा मनुष्य होता खरा अधिकार हातीं आल्यावर त्यानें आरंभालाच ज्या गोष्टी केल्या त्यांवरून त्याची कारकीर्द चांगलीच होणार अशी प्रजेला आशा वाटूं लागली. मँटाईफेल या विषयीं त्याला अत्यंत तिरस्कार वाटत होता. तो यामुळें कीं मँटाईफेल राजा अंतर्व्यवस्थेंत प्रजेवर बारीकसारीक बाबतींत सुद्धां जुलुम करी, पण त्याचें परराष्ट्रीय धोरण अत्यंत तोंडपुजेपणाचें व व भ्याडपणाचें असे. सुमारें एक वर्षभर राजा बरा होईल अशी आशा होती. या अवधींत आपण आपल्या भावाबद्दल त्याचा तात्पुरता राज्यकारभार करीत आहों व म्हणून मुख्यमत्री व त्याचे सहकारी यांस अधिकारावर तसेंच राहूं दिलें नाहीं तर तें पाप होईल, असें प्रिन्स विल्यम यास वाटलें. राजाचा प्रतिनिधि म्हणून त्याची कायमची नेमणूक होण्याबरोबर प्रिन्स विल्यम यानें पहिल्या तडाख्यास या अधिकाऱ्यांस कामावरून दूर केलें. या एकाच गोष्टीवरून ते कामावर होते तो काळ त्यास किती कष्टमय झाला असेल याची कल्पना सहज होईल. मँटाईफेल व त्याचे सहकारी हे नष्टाधिकार झाले, हें ऐकून सैन्यांतील अधिकारी व प्रजाजन यांस जो आनंद वाटला तो अवर्णनीय होता. नवीन मंत्र्यांचीं नांवें जाहीर झाल्यावर

तर ह्या आनंदाला जास्तच भरतें आलें. होहेन्झोलर्न-सिगमॅरिंजेनचा प्रिन्स अँटन हा मुख्य मंत्री झाला तो धर्मानें कॅथॉलिक व स्वभावानें मोठा दिलदार असून होहेन्झोलर्न घराण्याच्या स्वॉनिअन शाखेचा मुख्य होता त्याचे सहकारी नेमस्त प्रगमनशील पक्षाचे होते परराष्ट्रीय मंत्री फॉनस्क्लीनिट्झ हा असून अंतर्व्यवस्थेचा मंत्री कौंट स्क्वेरिअनगुट्झार हा होता ता. ८ नोव्हेंबर रोजीं राजप्रतिनिधीनें थोड्या मजकुराची एक पत्रिका मंत्रिमंडळाकडे पाठविली. तीच कार्यक्रमपत्रिका म्हणून मान्य झाली या पत्रिकेंत प्रतिनिधीनें लिहून कळविलें कीं (१) नेमस्त सनदशीर मार्गानें चालणारें सरकार असावें; (२) जर्मनीच्या हितसंबंधांस पूर्ण पाठिंबा देउन ते अबाधित चालतील अशी योजना करणें हें प्रशिआचें अत्युच्च कर्तव्य आहे; (३) फौजेची सुसंघटित रचना करून बलाढ्य सैन्य तयार ठेवणें ही प्रशिआस फार जरूरीची गोष्ट आहे; प्रधानमंडळाच्या या कार्यक्रमाचाच अनुवाद करतील असेच बहुसंख्याक सभासद, लोकांनीं त्याच्या म्हणण्याला मान देऊन पार्लमेंटांत निवडून पाठविले

परंतु या पार्लमेंटची बैठक होण्याच्या अगोदरच बादशहा तिसरा नेपोलिअन यानें कुरापतीस आरंभ केल्यामुळें सगळ्या यूरपखंडाचें लक्ष इटलीसबंधानें उद्भवलेल्या प्रश्नाकडे लागून राहिलें. या बादशहानें सार्डिनिआच्या राजाचा मुख्य मंत्री कौंट कॉव्हूर याच्या बरोबर एक करार केला. त्या करारांत पुढील कलमें होतीं. कौंट कॉव्हूरनें ऑस्ट्रिआला इटलींतून काढून लावणें व तेथील ऑस्ट्रिआच्या

ताब्यांतील स्थळांचा समावेश इटलींत करून घेणें हे दोन उद्देश मनांत धरून ऑस्ट्रिआबरोबर कलह उत्पन्न करणें. फ्रान्सनें या कामीं होईल तितकी मदत कौंट कॉव्हूर यास करावी, व कॉव्हूर युद्धांत विजयी होऊन यु समाप्ति झाली म्हणजे फ्रॉन्स देशाला बक्षीस म्हणून सॅव्हाय व नीस हे दोन प्रांत मिळावे. हा करार गुप्त होता परंतु फ्रेंच बादशाहच्या हालचालींस जसजसें दृश्य रूप येत चाललें तसतसा फ्रॉन्सच्या हालचालींचा रोंख काय असावा या विषयीं लोक चाणक्षपणें तर्क करूं लागले. प्रशिआचा अधिकारी प्रतिनिधि व प्रशिअन प्रजा यांची या इटलीसबंधीं प्रश्नाविषयीं काय दृष्टि होती याचें थोडें दिग्दर्शन या ठिकाणीं करणें जरूर आहे.

विल्यम राजा, फ्रेचांनीं ऑस्ट्रिआ विरूद्ध रचलेले व्यूह फसविण्याकरितां उपाय योजतो.

ऑस्ट्रिआच्या राज्यांत जातीनें जर्मन नव्हेत असे पुष्कळ प्रांत होते. यामुळें जर्मन लोकमताप्रमाणें यां पैकीं एका किंवा अधिक प्रांतांवर परचक्र आलें असतां जर्मनी पासून लष्करी साहाय्य झालेंच पाहिजे असें म्हणण्याचा हक्क अशा प्रांतांस पोंचत नसे प्रिन्स विल्यम याचेंहि मत असेंच होतें. इटलींतील ऑस्ट्रिअन प्रांतावर दोस्त राष्ट्रांचा विजय झाल्यास ओघानें जर्मन प्रांतावरहि घाला पडण्याचा संभव होता. असा हल्ला झालाच तर त्याचा प्रतिकार अर्थात् झाला पाहिजे. म्हणून तसा प्रसंग आलाच तर त्यास तोंड देण्यास प्रशिआ नेहमीं सज्ज पाहिजे, असें प्रिन्स विल्यम यानें

जाहीर केलें. ता. २० एप्रिल रोजीं सैनिकांच्या तीन पलटणींस युद्धास सज्ज असण्याविषयीं त्यानें हुकूम सोडला. याच हिन्यांत ऑस्ट्रिआचा आर्चडयूक ऑल्बर्ट यास बर्लिन येथें प्रिन्स विल्यम यानें भेट दिली. इटलींत असलेल्या ऑस्ट्रिअन प्रांतांना धक्का लागणार नाहीं अशी प्रशिआनें हमी घ्यावी व फ्रॅन्सला दहशत पडेल एवढी मोठी फौज डॅन्यूब नदीच्या कांठीं ठेवून फ्रान्सनें सार्डिनिआला योग्य मदत देणें अशक्य होईल अशी तजवीज प्रशिआनें करावी असें बोलणें करण्याचा आर्चडयूक याचा हेतू होता व त्यानें तसें केलेंहि. अर्थात् हें म्हणणें प्रशिआला मान्य करितां आलें नाहीं, परंतु राजकारणदृष्ट्या ऑस्ट्रिआचे हेतु काय आहेत हें खात्रीलायक समजावें म्हणून प्रिन्स विल्यमनें जनरल विलिसन यास व्हिएन्नास धाडिलें. विलिसन यास शोधाअंतीं समजून आलें कीं सर्व दक्षिण जर्मनी ऑस्ट्रिआचा पक्ष घेऊन त्यास मदत करण्यास तयार आहे. आणि केवळ ऑस्ट्रिआसंबंधीं विचार केला तर ता २६ एप्रिल रोजीं सुरू झालेलें युद्ध म्हणजे ऑस्ट्रिआच्या बाजूनें तरी स्वसंरक्षणार्थच होतें. प्रसंग आलाच तर तयारी पाहिजे म्हणून सालफेरिनोची लढाई (ता २४ जून) झाल्यावर दुसरे दिवशीं प्रिन्स विल्यमनें प्रशिअन सैन्याची ७ वी व ८ वी तुकडी आणि ता. ४ जुलई रोजीं 'बड'च्या सैन्याची ९ व १० वी तुकडी ह्या युद्धास सज्ज ठेवल्या. याच वेळीं त्यानें डायेट सभेपाशीं सर्व जर्मन सैन्याच्या मुख्य सेनापतीचा अधिकार व सैन्याची सर्व प्रकारची व्यवस्था लावण्याचा अधिकार मजकडेच असावा अशी मागणी केली. डायेट सभेंतील

आपल्या प्रतिनिधीच्या मार्फत पहिली मागणी कबूल करण्यास ऑस्ट्रिआ तयार होता परंतु सैन्याच्या सर्व प्रकारच्या व्यवस्थेसंबंधीं सर्व अधिकार डायेटकडे म्हणजे सभेंतील अग्रेसराकडे अर्थात् स्वतःकडे असावा असा ऑस्ट्रिआनें आग्रह धरला हें ऑस्ट्रिआचें म्हणणें प्रिन्स विल्यम यानें नाकारलें तेव्हां ऑस्टिआच्या राजकारणांत चमत्कारिक परंतु स्वभाव वैशिष्टयदर्शक अशी परिस्थिति उत्पन्न झाली. बादशहा नेपोलिअन यास आपल्या स्वतःच्या अंगीं सेनापतीस अत्यवश्य असे गुण नाहींत व या गुणांनीं संपन्न असा सेनापतीहि आपल्या पदरीं नाहीं याची पूर्ण जाणीव होती. साल्फेरिनो येथें त्याचें बरेंच नुकसान झालें होतें, व आतां तो ज्या किल्ल्यांच्या चौकोना समोर येऊन पोंचला होता. तें किल्ले दुर्भेद्य होते. ह्या दोन्ही गोष्टी मनांत येऊन तो भयभीत झाला. आणि फ्रान्सच्या व स्वतःच्या हितास तह होणें जरूर आहे असें त्यास वाटून व्हिला फ्रँका येथें तहाच्या शर्तींची वाटाघाट करण्याचा उपक्रम त्यानें करविला. अशी स्थिति इकडे असतां त्याच वेळा दुसऱ्या पक्षीं प्रशिआचा प्रिन्स विल्यम यानें भलें मोठें जर्मन सैन्य सज्ज करून सॉलफेरिनोच्या लढाईंत बादशहा नेपोलियन यास, प्रिन्स विल्यमच्या दृष्टीनें, जे फायदे झाले होते, ते सर्व परत हिरावून घेण्याची जय्यत तयारी चालविली होती. फ्रॉस व ऑस्ट्रिआ यांच्यामध्यें होणाऱ्या तहासंबंधीं अटींची वाटाघाट व्हिलाफ्रँका येथें झाली होती आणि प्रिन्स विंडिशग्रॉट्झ त्या अटींचा कच्चा खरडा घेऊन प्रिन्स विल्यम याचे त्याविषयीं मत घेण्याकरितां बर्लिन येथें गेला होता. प्रिन्स विल्यम यानें ऑस्ट्रिआचा प्रतिनिधि विंडिशग्रॉट्झ

याच्यापाशीं या अटीविषयीं जें मत दिलें तें त्यांचा स्वीकार होण्यास सर्वथा प्रतिकूळच होतें. प्रिन्स विल्यमनें तिसरा नेपोलिअन याची स्थिति किती डळमळीत आहे; प्रशिआ व बाकीचीं जर्मन संस्थानें यांची तयारी किती जोरावर आहे व फ्रेंच बादशाहाला आपल्या हातांतील सावज सोडून देणें कसें भाग पडेल, ह्या सर्व गोष्टी बिंडिशग्रॉट्झ यास समजावून दिल्या व त्यानें सर्व गोष्टी आपल्या मालकास कळविल्या. ऑस्ट्रिआनें लांबर्डी प्रांत सार्डिनिआस येऊं द्यावा किंवा जर्मन सैन्याचें आधिपत्य व त्याची सर्व प्रकारची व्यवस्था लावण्याचा अधिकार प्रिन्स विल्यम याजकडे गेला तरी चिंता नाहीं, परंतु इटलींतील ऑस्ट्रिआचें बस्तान कायम राखावयाचें, यांपैकीं कोणती गोष्ट पत्करावी हा बिकट प्रश्न ऑस्ट्रिआपुढें उभा होता. प्रशिआविषयीं ऑस्ट्रिआच्या मत्सराचें प्राबल्य जास्त झालें आणि प्रिन्स विल्यम याच्या कर्तबगारीनें जर्मनींत प्रशिआचें वाढतें वर्चस्व पाहण्यापेक्षां लांबर्डी प्रांत सोडून देणेंच बरें असें आस्ट्रिआनें ठरविलें.

आस्ट्रिआच्या मत्सरी धोरणामुळें विल्यम राजाचा प्रयत्न निष्फळ होतो.

या सर्व खटाटोपानें लांबर्डी प्रांत सॅव्हायच्या घराण्यास मिळून इटालिअन राष्ट्रांत ऐक्यभाव उत्पन्न झाला. ह्याचा परिणाम असा झाला कीं, खुद्द जर्मनींत ऐक्य करण्याची इच्छा पुनः जोरानें उद्भवली व तिला पुष्टि येण्यास प्रिन्स विल्यम याच्या कारभाराचें धोरण प्रगमनशील असल्यानें चांगलीच मदत झाली. १६ सेप्टेंबर रोजीं फ्रँकफोर्ट येथें

राष्ट्रीय मंडळ या नांवाची संस्था स्थापण्यांत आली व तिनें (१) सर्व जर्मनीच्या कायद्यांची अम्मलबजाबणी करण्यासाठीं मध्यवर्ती सत्ता स्थापून ती प्राशिआच्या हातीं देणें; (२) जर्मन सैन्याचें आधिपत्य प्रशिआलाच देणें; (३) परराष्ट्रीय धोरणाचीं सूत्रें मध्यवर्ती सत्तेच्या हातीं ठेवणें; ह्या सूचनांच्या विचाराकरितां लोकांच्या पुढें मांडल्या. सर्व जर्मनीभर वरील सूचनांची मूलभूत कल्पना पसरली व सर्व लहान संस्थानांनीं प्राशिआच्या अग्रेसरत्वाला अनुकूल असें मत प्रदर्शित केलें तथापि अविवेकानें एखादें साहस करणें प्रिन्स विल्यम यास मुळींच आवडत नस. जर्मनींत जो उच्चाधिकार प्रशिआकडेच असणें वाजवी होतें पण ज्यापासून प्रशिआ भ्रष्ट झाला होता तो अधिकार प्रशिआला पुनः न्याय्य मार्गानें मिळवून द्यावयाचा असा तो हाडानें प्राशिअन असल्यामुळें त्याचा कृतसंकल्प होता. म्हणून ज्या चळवळीनें संस्थानाधिपतींचा आपल्यावरील विश्वास शिथिल होईल अशा चळवळींत पडण्यापेक्षां बंड सभेच्या लष्करी खात्याची व्यवस्था व पद्धत यांची सुधारणा करण्याकडेच त्यानें आपल्या सर्व प्रयत्नांचा रोंख ठेविला. जर्मनींतील राजांचा व्यक्तिशः विश्वास संपादन करण्याऐवजीं ज्या पक्षाला जर्मनीचें हित व्हावें असें अंतःकरणपूर्वक वाटत असे त्या पक्षाचा विश्वास आपल्या उपायांनीं संपादन करण्याची उत्कट इच्छा त्यास होती. त्याचा सर्व भर केवळ प्रशिअन सैन्याचीच नव्हे तर डायेट सभेच्या अधिकाराखालीं सर्व जर्मन सैन्याची पुनर्घटना भक्कम पायावर करणें या उपायावरच होता. जर्मनीच्या सैनाची व्यवस्था खात्रीनें उत्तम लागावी म्हणून फ्रँकफोर्ट येथील त्याच्या प्रतिनिधीनें १८६०

जानेवारींत पुढील सूचना केली. ज्या युद्धांत सर्व जर्मनीच्या हिता हिताचा संबंध आहे असें युद्ध सुरू झालेंच तर बंडच्या ताब्यांतील सैन्याचे बरोबर दोन भाग करावे. दक्षिण भागाकडील सैन्य ऑस्ट्रिआनें नेमलेल्या सेनापतीच्या व उत्तर भागाकडील सैन्य प्रशिआनें नेमलेल्या सेनापतीच्या हुकमतीखालीं असावयाचें, पण ऑस्ट्रिआ एक रेसभरहि मागें सरण्यास तयार झाला नाहीं, व ती सूचना एप्रिलमध्यें ऑस्ट्रिआच्या आग्रहानें नापसंत ठरली. सामान्यतः सर्व जर्मनींचें हित व्हावें म्हणून प्रिन्स विल्यम यानें ज्या योजना सुचविल्या होत्या त्यांस केवळ दक्षिण भागांतील संस्थानांचाच विरोध होता असें नसून इतरांनींहि त्यास विरोध केला. युद्ध सुरू झालेंच तर उत्तर जर्मनीचे किनारे व व्यापारधंद्यामुळें त्या किनाऱ्यावर बसलेलीं व भरभराटींत असलेलीं शहरें, यांच्यावर शत्रूच्या गलबतांनीं हल्ला के यास त्यांस स्वसंरक्षणाचें साधन बहुतेक मुळींच राहणार नाहीं, ही गोष्ट लक्षांत आणून प्रिन्स विल्यम यानें ज्यांचे प्रांत समुद्रकिनाऱ्या लगत होते अशा संस्थानांची सभा याच वर्षी बर्लिन येथें भरविली होती, त्या सभेंत सूचना आणविली कीं त्या देशांनी एकत्र प्रयत्न करून दहा मोठीं लढाऊ गलबतें व वीस शीघ्रगति लहान गलबतें बांधून तें आरमार समुद्रकिनाऱ्याचें रक्षण करण्याकरितां नेहमीं तयार ठेवावें. लहान संस्थानिकांचीं मतें अनुकूल पडून ही सूचना तर पसंत झाली. परंतु पुढें मिंडेनपासून जेडवे (उत्तर समुद्राचा उपसागर) पर्यंत आगगाडीचा रस्ता करून तो हल्लीं ज्या ठिकाणीं भरभराटींत असलेलें

विल्हेल्मशोव्हन हें आरमारी बंदर आहे त्या स्थलापर्यंत न्यावा अशी सूचना आली, तेव्हां आपल्या हद्दींतील एका तसूभर जाग्यांतूनहि हा रस्ता जातां कामा नये असें म्हणून हॅनोव्हरनें या सूचनेस विरोध केला.

सैन्याचा सुधारणा करण्याची आवश्यकता.

प्रिन्स विल्यमची ही सूचना सभेनें फेंटाळून लावल्यामुळें डायेट सभेच्या वर्तनामुळें व कमी अधिक महत्त्वाच्या इतर गोष्टींमुळें त्याची खात्री झाली कीं, मोठ्या दर्जाचीं सर्व जर्मन संस्थानें प्रगतीचा विचारहि न करणाऱ्या ऑस्ट्रिआस चिकटून राहणारीं असल्यामुळें त्यांची सहानुभूति आणि पाठिंबा हीं आपणास कधींहि मिळणार नाहींत. म्हणून प्रिन्स विल्यम यानें त्यांचा नाद सोडून दिला व त्यानें इतउत्तर आपलें सैन्य बलिष्ठ व कार्यक्षम होईल अशा तत्त्वांवर त्याची पुनर्घटना करण्याकडे पूर्ण लक्ष द्यावयाचें असें ठरविलें. त्याच्या भावाच्या कारकीर्दींत कांहीं थोड्या सुधारणा होण्यास प्रारंभहि झाला होता. 'नीड्ल्गन' हेंच पायदळाचें शस्त्र म्हणून ठरलें होतें. इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष निशाणाखालीं सैन्यांत चाकरी करणारांचींहि संख्या पुष्कळ वाढली होती; कारण सैनिकांच्या यादींत ज्याचे म्हणून नांव पडेल त्यानें तीन वर्षें प्रत्यक्ष सैन्यांत चाकरी केलीच पाहिजे. ह्या कायद्याची अम्मलबजावणी १८१५ ते १८४८ पर्यंत होत नव्हती, ती आतां सक्तीनें होऊं लागली होती. लँडवर सैन्य बेळ पडेल तेव्हां कामास जय्यत तयार ठेवण्याची जी पद्धत होती तिला फार दिवस चालना न मिळाल्यामुळें ती अगदीं निरुपयोगी झाली होती. सन

१८५९ त फ्रँको ऑस्ट्रिअन युद्धास तोंड पडल्यावर प्रिन्स विल्यम यानं प्रशिअन सैन्याची जय्यत तयारी केली. तेव्हां त्याला आढळून आलें कीं, लँडवर पलटणी प्रत्यक्ष काम करण्या-या प्रसंगीं अगदीं निरुययोगी आहेत. या पलटणींमध्यें मध्यम वयाच्या लोकांचा भरणा असून त्यांत कांहीं तर उतारवयास हि लागले होते. हे लोक आपल्या भरज्वानींत चांगले कार्यक्षम शिपाई असतील, परंतु त्यांचा प्रत्यक्ष चाकरीचा काळ व त्यांस पुनः प्रत्यक्ष कामास बोलाविलें तो काळ. यांच्या दरम्यान जो दीर्घ काळ लोटला, त्यांत जें कांहीं शिकले होते, तें सर्व पार विसरून गेले होते. आणि या काळांत त्यांना ज्या संवयी जडल्या होत्या त्यामुळें त्यांच्यापैकीं बहुतेक लोक युद्धाच्या कामास अगदीं कुचकामाचे झाल होते. सैन्याची कार्यक्षमता पूर्ववत् करावयाची असेल तर सैन्यघटनेच्या मूलतत्त्वांतच अगोदर फरक केला पाहिजे अशी त्याची दृढ समजूत होऊं लागली. ज्याच्यावर पूर्ण भरंवसा टाकतां येईल, सैन्यघटनेविषयीं ज्यांचे विचार अगदीं तंतोतंत आपल्या विचारांशीं जुळतील, प्रशिआला लढाईच्या कामांत निपुण अशा सैन्याची जरूरी आहे व प्रशिआनें आपलें योग्य स्थान जर्मनींत व यूरोपांत पुनः पटकाविलें पाहिजे अशी ज्याची पक्की समजूत असेल असाच मनुष्य आपला हेतु सिद्धीस नेण्यास प्रिन्स विल्यम यास हवा होता.

युद्धमंत्री फॉनरून.

मनुष्याची पारख करण्याची विलक्षण हातोटी प्रिन्स विल्यम यास साधली होती हें पूर्वी सांगितलेंच आहे. या कुशलतेचा उपयोग

त्यास त्या वेळेस चांगला झाला. त्याचा आज ५० वर्षे सैन्याशीं निकट संबंध जडला होता. इतक्या अवधींत त्यानें लक्षांत धरण्यासारख्या प्रत्येक माणसाची पारख उत्तम केली होती, असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ती होणार नाहीं. मँटाईफेलच्या प्रधानगिरीचा काळ औदासीन्याचा होता. त्याच वेळेस एक खरा शिपाई प्रिन्स विल्यमच्या मनांत भरला होता. प्रिन्स विल्यम याला राजप्रतिनिधीचा उच्च अधिकार मिळाल्यापासून तो शिपाई व प्रिन्स विल्यम यांच्यामध्यें चांगलेंच संघटन झालें होतें. सैन्याच्या पुनर्घटनेचा काळ संनिध आल्याबरोबर प्रिन्स विल्यमच्या मनाचा ओढा अगदीं स्वाभाविकपणें याच शिपायाकडे गेला. या शिपायाचें नांव ऑल्बर्ट थिओडर एमिल कौंट फॉनरून असें होतें. ता ५ डिसेंबर १८५९ रोजीं प्रिन्स विल्यम यानें त्यास युद्धमंत्री नेमिलें

हल्लीं यूरोपांत व जगांत प्रशिआला जी प्रतिष्ठा मिळाली आहे तिचें श्रेय पुष्कळअंशीं या नवीन युद्धमंत्र्याच्या कृतीकडे आहे. आणि म्हणून त्याची थोडी माहिती येथें दिली असतां कांहीं वावगें होणार नाहीं. त्याचे पूर्वज पोमेरेनिआंत राहणारे असून त्याचा जन्महि त्याच प्रांतांत १८०३ सालीं झाला. लहानपणीं तो स्टेटिनजवळ अल्ट–डॅम येथें रहात असे. वेस्ट प्रशिआंतील कुलम शहरच्या लष्करी विद्यार्थ्यांच्या शाळेंत त्यास १८१६ सालीं पाठविलें. पुढें दोन वर्षांनीं बर्लिन येथें लष्करी विद्यार्थ्यांच्या सैन्यांत त्याचा शिरकाव झाला. चौदाव्या पायदळ पलटणींत तो सेकंड लेफ्टनंट झाला (९ जानेवारी १८२१ ;

त्यानें लष्करी शाळांची तपासणी केली (१८२५ ते १८२७) पंधराव्या पायदळ पलटणींत त्याची बदली झाली (१८२६); बर्लिन येथील लष्करी विद्यार्थ्यांच्या सैन्यावर त्यांस शिकविणार अधिकारी म्हणून त्याची नेमणूक झाली (ऑक्टबर १८२८). त्या वेळीं प्रख्यात भूगोलशास्त्रवेत्ता कार्लरिटर हा लष्करी विद्यार्थ्यांच्या सैन्याच्या अभ्यासावर मुख्याधिकारी होता. त्याच्या सांगण्यावरून फॉनरून यानें एक भूगोलाचें छोटें पुस्तक लिहून तें १८३२ सालीं छापून प्रसिद्ध केलें. पुढें कांहीं वर्षांनीं (१८४७–५५) त्या पुस्तकाची विस्तृत आवृत्ति निघाली व तिचा खपहि पुष्कळ झाला. मिंडेन येथील आपल्या पलटणींत फॉनरून १८३२ त परत आला. परंतु पुढल्या नोव्हेंबरांत जनरल मफलिंग यानें त्यास आपल्या मुख्य ठाण्याच्या जागीं बोलावून घेतलें या वेळीं जनरल मफलिंग हा शत्रूच्या हालचालीवर नजर ठेवण्याऱ्या सैन्याचा अधिपति असून फ्रेंचांनीं अँटवर्पला वेढा घातला होता. त्यावर नजर ठेवण्याच्या कामांत गुंतला होता. सन १८३३ फेब्रुवारींत फॉनरून यानें अँटवर्पच्या किल्ल्याची पाहणी केली. नंतर स्थलवर्णन खात्यांत त्याची बदली झाली. त्याची स्थलांची पाहाणी करण्याच्या कामांत कुशलता व युद्धशास्त्रांतील विशेष खुब्यांचें ज्ञान हीं पाहून सरकारनें त्याची जनरल स्टाफच्या कॅप्टनच्या जागीं नेमणूक केली. ह्या अधिकारावर असतांना त्यास काम फार करावें लागे. तें सर्व काम संभाळून त्यानें " यूरोपचें युद्ध शास्त्राच्या दृष्टीनें भूवर्णन " या नांवाचें एक पुस्तकहि लिहिलें. त्याच वेळीं स्पेन देशांत जी यादवी माजली होती त्याकडे

मालव वा. म. ५, पाचवाऊस, खा

त्याचें लक्ष जाऊन "आयबेरिअन द्वीपकल्प" या नांवाचें आणखीहि एक पुस्तक त्यानें लिहिलें. परंतु या पुस्तकाचा फक्त पहिलाच भाग प्रसिद्ध झाला. याच अधिकारावर असतांना त्यानें १८४१ त बोहेमिआ, मोरेव्हिआ आणि हंगेरी या देशांची युद्ध-शास्त्रदृष्ट्या फार बारकाइनें पाहणी केली. ही पाहणी चालली असतांनाच त्याला जबर दुखणें आलें. तो बरा झाल्यावर दुसऱ्या पलटणीच्या जनरल स्टाफच्या मेजरच्या जागीं त्याची नेमणुक झाली (१८४२). परंतु पुढच्या वर्षी बर्लिनला परत जाऊन व्याख्यात्याचें काम करावें असा त्यास हुकूम सुटला सन १८४४ त राजपुत्र फ्रेडरिक चार्ल्स यास भूवर्णन व कवाईत अथवा सैन्यरचना हे विषय शिकविण्याच्या कामीं त्याची निवड झाली. १८४६ त राजपुत्रानें बान युनिव्हर्सिटीस—महाविद्यालयास भेट दिली. त्या वेळेस व राजपुत्र स्वित्झरलंड इटली, फ्रान्स आणि बेल्जम या देशांत फिरावयास गेला. तेव्हांहि तो त्या प्रिन्सच्या बरोबर होता. तरुण राजपुत्र फ्रेडरिक चार्ल्स व त्याचा गुरु फॉनरून यांचा असा निकट समागम झाल्यामुळें परस्परांमध्यें सख्य, भक्ति व आदरभाव हीं दृढ मूल झालीं. सन १८४८ मार्च १३ रोजीं फॉनरून आपल्या धंद्याचा प्रत्यक्ष व्यवहार करण्याच्या कामगिरीवर परत आला. मे महिन्यांत आठव्या सैन्य पलटणीच्या जनरल स्टाफवर त्याची योजना झाली व ता. २२ ऑगस्ट रोजीं त्या मंडळाचें आधिपत्य त्याच्याकडे आलें. त्या वर्षीं व त्याच्या आदल्या वर्षी जी बिकट स्थिति उत्पन्न झाली त्या स्थितींत त्याच्यां अंगचे हे गुण सर्वांच्या निदर्शनास इतके आले कीं, त्याच्या वरिष्ठ

अधिकाऱ्यांनीं त्याची फार वाखाणणी केली. सन १८४९ त बॅडेनच्या मोहिमींत कांहीं दिवस काम केल्यावर १८५० त त्याची लेफ्टनंट–कर्नलच्या जागीं बढती होऊन त्याच सालीं डिसेंबर महिन्यांत तो पायदळाच्या ३३ व्या पलटणीचा कमान्डन्ट झाला. ह्या पलटणीची छावणी प्रथम थार्न येथें होती. पण ती पुढें कोलोन येथें गेली. डिसेंबरच्या दुसऱ्या तारखेस त्याला कर्नलची पदवी मिळाली. ता. २६ जून १८५६ रोजीं पोसेन येथील पायदळाच्या विसाव्या ब्रिगेडचें आधिपत्य त्यास मिळालें. पुढें तीन महिन्यांच्या आंतच तो मेजर जनरल झाला (१५ आक्टोबर १८५६). सन १८५८ ता. २२ नोव्हेंबर रोजीं डयुसेलडार्फ येथील चौदाव्या तुकडीचा (डिव्हिजनचा) तो सेनाधिपति झाला.

फॉनरून याच्या अंगचे मोठे गुण.

फॉनरून याला लष्करी खात्यांतील निरनिराळ्या अधिकारांचीं कामें करितांना विशेषतः १८३२, ४९, ५० या वर्षीं सैन्य युद्धास केव्हांहि सज्ज राहील अशी त्याची तयारी करितांना त्याला जो अनुभव आला होता, त्यावरून प्रशिआच्या लष्करी पद्धतींतील ढोबळ दोष त्याच्या चांगले लक्षांत आले व त्यानें हे दोष प्राधान्यतः पायदळांत असणारे दोष, दूर करण्याकरितां पुष्कळ उपायांच्या योजनाहि तयार केल्या होत्या. ह्या योजना १८५८ च्या जून महिन्यांत त्यानें प्रन्सि विल्यम याच्यापुढें मांडल्या जातील अशी तजवीज केली. सन १८५९ च्या मे महिन्यांत त्याला लेफ्टनंट–जनरलचा अधिकार

मिळाला. त्या सालीं सैन्य सज्ज करण्याकरितां जो प्रयत्न झाला त्यावरून प्रिन्स विल्यमची खात्री झाली कीं, फॉनरूनचें म्हणणें अगदीं बरोबर होतें. म्हणून त्यानें फॉनरून यास बोलावून घेऊन त्याला बर्लिन येथें युद्धमंत्र्याच्या कचेरींत सैन्याच्या पुनर्घटनेच्या योजना बारीकसारीक बाबी भरून पूर्ण तयार करण्याचें काम सांगितलें. फॉनरून प्रिन्स विल्यमबरोबर ब्रेस्लॉ येथें गेला होता. नंतर कांहीं थोड्या दिवसांनीं सैन्याच्या पुनर्घटनेच्या योजनांचें काम पूर्ण करण्यासाठीं बर्लिन येथें एक प्रिन्स विल्यमच्या व दुसरें जनरल रॅंगेलच्या अध्यक्षतेखालीं अशीं दोन पंचमंडळें बसलीं होतीं. त्यांचा फॉनरून हा सभासद होताच. फॉनरून याचा प्रिन्स विल्यम याच्या बरोबर सारखा पत्रव्यवहार चालला होता. त्याचा प्रिन्स विल्यम याच्या मनावर इतका सुपरिणाम झाला कीं ता ५ डिसेंबर १८५९ रोजीं फॉनरून याची युद्धमंत्री म्हणून नेमणूक झाली. त्यानें या अधिकाराचा उपभोग १४ वर्षें घेतला (१८५९ ते १८७३). इतक्या काळांत त्यानें हें जें सैन्यरूपीं यंत्र तयार केलें होतें तें पूर्ण सुरळीत काम करतें आहे हें पाहण्याचा सुयोग त्यास मिळाला. सन १८५९ सालीं या पुनर्घटनेपासून जी फलनिष्पत्ति होईल असें त्याच्या धन्यास—प्रिन्स विल्यम यास—वाटलें होतें त्याहिपेक्षां सरस फलनिष्पत्ति या सैन्यरूपी यंत्रापासून झाली हेंहि फॉनरून यानें सुदैवानें पाहिलें. सुप्रसिद्ध प्रशिअन त्रयीपैकीं फॉनरून हा तिसरा असून या त्रयीचें अध्यक्षत्व खुद्द अधिराजाकडेच होतें. अरेबिअन नाइट्समध्यें एक तीन भावांची गोष्ट आहे. त्या पैकीं एकास दिव्य

दृष्टि होती, दुसऱ्यास वस्तु एका स्थलावरून दुसऱ्या स्थलीं अचूक नेऊन ठेवण्याचें अतिमानुष सामर्थ्य होतें, तिसऱ्यास रोगनिवारण करण्याची अलौकिक शक्ति होती. या तिघा भावांपैकीं जसें एकाचें दुसऱ्या दोघांशिवाय चालल नसतें, तसेंच या त्रयीपैकीं एकाचें दुसऱ्या दोघांशिवाय चाललें नसतें. कौंट फॉनरून याच्या अद्वितीय बुद्धि-सामर्थ्यानें तयार झालेली सर्वांग परिपूर्ण अशी ही सैन्यघटना अस्तित्वांत नसती तर बिझ्मार्कची धाडसी कृति व मोल्टकेची समरांगणावर सैन्य व व्यूह-रचना करण्याची अमोघ हातोटी ह्या दोन्ही गोष्टी निष्फल झाल्या असत्या.

सैन्याच्या पुनर्घटनेविषयीं फॉनरून याच्या योजना.

प्रिन्स विल्यमच्या विचारानें सन १८५९-६० या वर्षीं फॉनरून यानें जी सैन्यघटनेची योजना तयार केली तिचें संक्षिप्त वर्णन असें आहे:-योजनेच्या प्रस्तावनेंत अस्तित्वांत असलेल्या कायद्याप्रमाणें लष्करांत नोकरी करणें यथायावत् सर्वांस भाग आहे, ही गोष्ट प्रथम सर्वांच्या नजरेस आणून दिली आहे. यापुढें या कायद्याची सक्त अम्मलबजावणी व्हावयाची होती. ह्या वेळपर्यंत एकंदर लष्करी चाकरीची मर्याद एकोणीस वर्षांची धरिली होती. ती आतां पायदळांत तीन वर्षें, वेळेवर उपयोगांत आणण्याकरितां राखून ठेवलेल्या फौजेंत चार वर्षें व 'लँडवर' मध्यें नऊ वर्षें मिळून सोळा वर्षांवर आणून ठेविली. अशा रीतीनें शांततेच्या मंडळींतील संख्या १,५०,००० पासून सुमारें २,१३,००० पर्यंत, दरवर्षीच्या सैन्यभरतीची संख्या

४० ००० पासून ६३,००० पर्यंत; पायदळाच्या पलटणींची संख्या १३५ पासून २५३ पर्यंत व ढविण्यांत आली. १८ घोडेस्वारांच्या नव्या पलटणी उभारावयाच्या होत्या. युद्धाकरितां सैन्य सज्ज करावयाचा प्रसंग आला म्हणजे 'लँडवर' पलटणीला प्रत्यक्ष कामास सज्ज होण्यास सांगण्यांत येणार नव्हतें, परंतु पायदळ व राखून ठेवलेली फौज यांत जास्त भरती करून घ्यावयाची होती. असें करण्याचा हेतु इतकाच कीं, कसलेली व संख्येनें मोठी फौज झटकर एकत्र आणतां यावी. ह्या सुधारणांमुळें वार्षिक खर्च पूर्वापेक्षां एक कोटी डॉलर जास्त वाढेल व पहिल्या प्रथम व्यवस्था लावण्याचा खर्च सुमारें ५०,००,००० डॉलर होईल असा अंदाज होता. ता ५ फेब्रुवारी १८६० रोजीं नवीन युद्धमंत्र्यानें लोकसभेपुढें मांडलेल्या योजनेंतील मुख्य बाबी, वर सांगितल्याप्रमाणें होत्या.

लोकसभेनें योजनेंत केलेला फरक मंत्र्यानें नांवाला कबूल केला.

योजनेविषयीं लोकसभेनें अनुकूल मत दिलें नाहीं. प्रशिअन प्रांत एकमेकांपासून पांगलेले असतांहि प्रशिआनें युद्धाचा प्रसंग आल्यास युद्धाला तयार असावें, या गोष्टींचा विचार करण्यापेक्षां प्रतिनिधींनीं योजनेप्रमाणें काम होण्याकरितां लागणाऱ्या पैशाचाच जास्त विचार केला. कांहीं प्रतिनिधींना पूर्वपद्धतींत असे क्रांतिकारक फरक करणें कितपत शहाणपणाचें आहे याची जबर शंका होती. पायदळांतील नोकरीची मर्यादा दोन वर्षांवरून तीन वर्षांवर नेली होती, यामुळें विशेषत: जास्त गवगवा झाला होता. योजना आहे तशीच आहे

तशीच पसंत झाली पाहिजे, असा आपण आग्रह धरल्यास सबंध योजना फेटाळली जाईल असा धाक वाटून युद्धमंत्र्यानें मूळ योजना माघारी घेतली. आणि ता. ५ मे रोजीं दुसरी एक सूचना त्यानें सभेपुढें विचाराकरितां मांडिली. या सूचनप्रमाणें युद्धप्रसंग आलाच तर सैन्याची तयारी हल्लीं आहे त्यापेक्षां उत्तम ठेवितां यावी या विशेष कारणाकरितां ९० लाख डॉलरची रक्कम एक वर्षाच्या म्हणजे ता. ३० जून १८६१ पर्यंतच्या मुदतीनें मंजूर करून ठेवावी अशी मागणी त्यानें केली. ही सूचना पुढें मांडतांना त्यानें सभेस असेंहि निखालस सांगितलें कीं, ही सूचना पुढें सैन्यासंबंधीं जे ठराव येतील त्यांची कोणत्याहि प्रकारची हानि होऊं नये एवढाच हेतु आहे. त्यानें आणखी असेंहि सांगितलें कीं, सैन्यासबंधीं एक वर्षाची ता. ३० जून १८६१ अखेरची जी अट या ठरावांत आहे ती केवळ तात्पुरती आहे. तो असे म्हणाला खरें, परंतु तो व प्रिन्स विल्यम या दोघांचाहि पूर्ण निश्चय ठरला होता कीं कांहीं होवो—सभेची अनुमति मिळा किंवा न मिळो सैन्यासंबंधीं हा कायदा बिनशर्त कायमचा झाला पाहिजे लोकसभेनें कांहीं वेळ वादविवाद करून रक्कम मंजूर केली व घटनेच्या योजनेस एक वर्षापुरतीच म्हणजे ता. ३० जून १८६१ अखेर संमति दिली. त्या तारखेपुढें योजनेंतील कलमें अम्मलांत आणण्यास परवानगी नव्हती. तथापि प्रिन्स विल्यम यानें या निर्बंधाकडे लक्ष दिलें नाहीं. परंतु पायदळांच्या व घोडेस्वारांच्या अधिक पलटणी उभारण्याचा व त्यांस नांवें आणि निशाणें देण्याचा उपक्रम त्यानें केला.

फ्रान्सनें लावलेलें बोलणें प्रशिआ नाकारतो.

सैन्यासंबंधीं हा खर्डा पसंत होतो न होतो तोंच सर्व यूरपचें लक्ष जिनें वेधिलें अशी एक गोष्ट घडली. विशेषतः ऑस्ट्रिआवर विजय मिळविल्यापासून (१८५९) फ्रेंच बादशाहाचा फार दिवसांचा इरादा होता कीं, ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यामधील मत्सर चेतवून पहिल्या साम्राज्याच्या वेळीं आपली ऱ्हाइन नदीवरील सरहद्द होती ती आपण परत मिळवावी. सन १८५१ तच फ्रेंच बादशाहाचा बर्लिन येथील मंत्री कौंट डी पर्सिनी यानें प्रशिआ व फ्रान्स यांनीं संगनमत करून ऑस्ट्रिआचा पाडाव करावा या सूचनेविषयीं चौथा फ्रेडरिक विल्यम याच्या मनाचा ठाव घेतला होता. हें सुचवितांना फ्रान्सच्या मदतीबद्दल त्याला काय मोबदला मिळेल हा प्रश्न मुद्दामच मोघम ठेविला होता; परंतु फ्रेडरिक विल्यम यास असलें साहस करणें मनापासून आवडत नसे. इतकेंच नव्हे, तर असल्या साहसी माणसाचा तो मनापासून तिटकारा करी. इतकें झाल्यावर फ्रेडरिक आपला आपण राज्यकारभार प्रत्यक्ष करीत होता तोंपर्यंत हा प्रश्न पुन त्याच्यापुढें आलाच नाहीं. सन १८५६ फेब्रुवारींत प्रिन्स विल्यम याजकडे प्रतिनिधीचा अधिकार आल्यावर व ऑस्ट्रिआबरोबर युद्धाचा पुकारा होण्यापूर्वी नेपोलिअन बादशहानें प्रशिआला फायदेशीर अशा कांहीं सूचना बर्लिन दरबारांत केल्या. प्रिन्स विल्यमनें त्यांचा विचार करण्याचें साफ नाकारिलें व युद्धाचा वणवा आपल्या दाराशींच येऊन ठेपला तर जर्मन भूमीचा बचाव करितां यावा

म्हणून प्रशिअन सैन्य जय्यत तयार ठेवण्याचें त्यानें ठरविलें हें पूर्वी सांगितलेंच आहे. युद्ध संपल्यावर बादचाहाचें मनांत पूर्वीचे विचार अजून तसेच घोळत होते व ज्या युक्तिप्रयोगानें फ्रान्सला सॅव्हाय आणि नाइस हीं स्थळें मिळवितां आलीं त्याच युक्तिप्रयोगानें व्हाइन नदीवर आपणास फायदेशीर मुलूख मिळवितां येईल असें त्यास वाटत होतें. म्हणून त्यानें प्रिन्स विल्यम याजकडे पुनः बोलणें लाविलें आणि प्रत्यक्ष मुलाखत व्हावी अशी मागणी केली. प्रत्यक्ष भेटींत दोन गोष्टी मलाकारतां येतील असें त्याचें म्हणणें होतें. त्या गोष्टी अशाः— बादशाहाचा प्रयत्न परस्परांमध्यें सख्य भाव राहून कोणीहि कोणाची आगळीक करूं नये अशाविषयींच होता अशी प्रिन्स विल्यमची खात्री करून देणें ही एक बादशाहाचा हेतु कुरापत लावून दुसऱ्याचा मुलूख बळकावण्याचा आहे अशी जर्मन लोकांची समजूत झाली होती ती खोटी आहे, अशी त्यांची खात्री करून देणें ही दुसरी. बादशाहाच्या म्हणण्याप्रमाणें मुलाखत बॅडेन येथें झाली (१५–१७ जून १८६०) प्रिन्स विल्यम हा एकटाच मुलाखतीला गेला नव्हता. प्रशिआच्या शेजाऱ्याचें अनहित होऊन प्रशिआच्या राज्याची वृद्धि होईल अशी सूचना मान्य केली असतां तिचा ज्या संस्थानिकावर वरावर इष्ट परिणाम झाला असता, त्यांना प्रिन्स विल्यमनें आपल्या बरोबर नेण्यांत जो दूरदर्शीपणा दाखविला तो खरोखर प्रशंसनीय आहे प्रिन्स विल्यम याची ही सावधगिरी पाहून फसगत झालेल्या बादशाहानें स्वलेस्विग होल्स्टीन स्वाधीन असेल तर तें प्रशिआला फार हितकर होणार आहे हें ओझरतें म्हणण्या-

पलीकडे व कांहीं सामान्य तत्त्वें उच्चारण्यापलीकडे कांहीं एक केलें नाहीं. अशा रीतीनें या मुलाखतीपासून कोणतीच फलनिष्पत्ति झाली नाहीं.

विल्यम राजाचे सन १८६० सालांतील विचार.

या मुलाखतात घडलेल्या प्रकारावरून नेपोलिअनचे अंतस्थ विचार व प्रिन्स विल्यमची सावधगिरी यांची अटकळ चांगली होते. म्हणूनच केवळ या मुलाखतीचा उल्लेख केला आहे. प्रशिआला जर्मनींत व यूरोपांत त्याचें योग्य स्थान मिळवून देण्याच्याच हेतूनें कार्यक्षम असें सैन्य तयार करण्याच्या प्रयत्नांत प्रिन्स विल्यम याचें मन अगदीं गढून गेलें होतें. त्याला या मुलाखतीमुळें दुसऱ्याच्या हक्कावर चढाई करणाऱ्या फ्रेंच बादशाहाच्या धोरणामुळें काय प्रसंग ओढावतील याचा विचार करण्यास चांगली संधि मिळाली. दुसऱ्याचा आगळीक करणारें धोरण त्याला मुळींच पसंत नव्हतें. आपल्या जर्मन शेजाऱ्यापाशीं सलोख्यानें वागण्यांत त्याला समाधान असे परंतु या सख्यापासून प्रशिआविषयीं शेजाऱ्यांच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न होऊन जर्मनीच्या कारभारांत जें वर्चस्व प्रशिआस असणें अवश्य होतें तें त्यास नित्य असावें अशी त्याची उत्कट इच्छा होती. फ्रेंच बादशहाबरोबर गुप्त मंत्र करावा असें त्याच्या मनांत कधींहि येत नसे.

यापुढें नमूद करण्यासारख्या आणखी महत्त्वाच्या गोष्टी न घडतां १८६० साल संपलें.

राजप्रतिनिधि प्रिन्स विल्यम व त्याचा युद्धमंत्री यांनीं आपलें सर्व लक्ष सैन्याची पुनर्घटना या एका गोष्टीकडेच दिलें फ्रेडरिक विल्यम याच्या पुळपुळीत राजधोरणामुळें प्रशिआची प्रतिष्ठा कांहीं काळ नष्ट झाली होती, ती पुनः मिळविण्यास हा एकच उपाय होता.

प्रकरण ५ वें.

पहिला विल्यम याची कारकीर्द–'रक्तस्राव व तरवार' यांच्या आधारावर रचलेलें राजकारण.

चौथा फ्रेडरिक विल्यम हा ता २ जानेवारी १८६१ रोजीं मरण पावला. पहिला विल्यम हें नांव धारण करून प्रिन्स विल्यम त्याच्या मागून गादीवर बसला. त्याच्या राज्यारोहणानें प्रजेस अत्यानंद झाला. तो अत्यंत प्रामाणिक, आपल्या वचनाप्रमाणें चालणारा व एखादी ज्ञाति किंवा वर्ग यांच्या हितांची कळकळ बाळगण्यापेक्षां आपल्या देशाच्या कल्याणार्थ अंतःकरणपूर्वक झटणारा आहे असें त्याच्याविषयीं सार्वत्रिक मत होतें. त्यानें राज्यारूढ झाल्याबरोबर सर्व राजकीय गुन्हेगारांस माफी केली (ता. १२ जानेवारी) यामुळें त्याची कारकीर्द उत्तम होणार अशी लोकांस लागलेली आशा दृढ झाली. राजाच्या या वेळच्या भाषणांवरून त्याच्या अंतःकरणाचा सर्व भर कोणत्या गोष्टीवर आहे हे अगदीं उघड दिसून आलें. त्यानें राजपदाचा स्वीकार करतेवेळीं म्हणजे ता. ७ जानेवारी रोजीं जो जाहीरनामा काढला त्यांत प्रशिआसंबंधीं माझ्या कर्तव्यांचा जर्मनी-संबंधाच्या कर्तव्यांशीं अगदीं अभेद्य व निरंतरचा संबंध आहे असें म्हणून पुढें असेंहि स्पष्ट सांगितलें आहे कीं प्रशिआचा प्रतापशाली इतिहासाच प्रशिआला जर्मनींत व जर्मनीकरितां एक विशेष कामगिरी करण्यास सांगत आहे व लष्कराच्या पुनर्घटनेच्या ज्या योजना प्रत्यक्ष

हातीं घेतल्या आहेत त्यांची वाढ व पूर्तता झाली तरच ही कामगिरी यशस्वी होणार आहे. लोकसभा व उमरावसभा यांच्या बैठकीच्या प्रथम दिवशीं झालेल्या राजभाषणांत याच धोरणाची स्पष्टोक्ति आहे. लोकांच्या सभेनें राजाच्या भाषणावर जें मत प्रदर्शित केलें त्यांतच स्पष्ट ध्वनि निघाला कीं राजाचे सर्वच विचार या सभेस मान्य आहेत असें नाहीं. हें मत व्यक्त करितांना प्रतिनिधींनीं स्पष्ट शब्द वापरून असें म्हटलें कीं, सैन्याची पुनर्घटना हा एकच विषय लक्षांत घेतला, तर केलेली योजना फार उत्तम आहे, परंतु तिच्यांत सर्व गोष्टींचा अंतर्भाव झाला असें मात्र होत नाहीं. 'बंड' सभेची सुधारणा व इतर लोकप्रिय मागण्या यांच्याकडेहि लक्ष पुरविणें अवश्य आहे. त्यांनीं पुनर्घटनेच्या विशेष खर्चाला म्हणून मंजूर केलेल्या ९० लाखांत ७,५०,००० डॉलर वजा करून उरलेली रक्कम मंजूर केली. ५ जून रोजीं ही बैठक संपली.

प्राशिअन प्रागतिक पक्ष.

पुढें चार दिवसांनीं 'जर्मन प्रागतिक मंडळ' हे नांव धारण करून एक नवीन पक्ष अस्तित्वांत आला. त्याचा कार्यक्रम येणेंप्रमाणें होता:—(१) प्रशिआला अनुकूल अशा प्रकारानें 'बंड' सभेची सुधारणा; (२) जर्मन लोकांना प्रतिनिधि पाठविण्याचे हक्क; (३) मध्यवर्ती सत्तेचीं सूत्रें प्राशिआच्या हातीं देणें; (४) मंत्र्यावरील खरी जबाबदारी, राजकीय व मुद्रणसंबंधीं गुन्हाची पंच पद्धतीनें चौकशी, उमराव सभेची सुधारणा, तीन वर्षांच्या नोकरी

ऐवजीं दोन वर्षांची लष्करी नोकरीची मुदत ठेवून लष्करी खात्यांत काटकसर करणें. लोकसभेमध्यें व जनतेमध्यें ज्या माणसांचीं मनें अजून डळमळत होतीं तीं माणसें एकदम या पक्षास येऊन मिळालीं. राजा व त्याचे मंत्री यांना त्यांच्या योजना सिद्धीस नेण्याच्या बाबतींत आधीं या पक्षाशीं झटापट करणें अवश्य झालें इतका हा पक्ष प्रबल झाला ह्यावेळीं व पुढें सन १८६६ पर्यंत या पक्षाचें मत म्हणजे प्रशिआंतील बहुजनांचें मत होतें यांत बिलकुल संशय नाहीं. त्यांचीं मूलतत्वें निर्दोष होतीं खरीं; परंतु प्रतिपक्षांतील माणसांच्या अंगीं जी दूरदृष्टि व राज्यकारणांत तीक्ष्ण बुद्धि विशेषतः दिसून येत होती ती या नवीन पक्षांतील पुढाऱ्यांत एका विशेष बाबतींत दिसून येत नव्हती. ती बाब म्हणजे सैन्याची अगदीं खालपासून वरपर्यंत पुनर्घटना करण्याची अत्यंत आवश्यकता ही होय. आणीबाणीचा प्रसंग आला तेव्हां ही त्यांची उणीव त्यांच्या ध्यानीं कशी आली, हें योग्य स्थळीं सांगण्यांत येईल. परंतु ज्या तऱ्हेनें ही जाणीव त्यांस झाली तो प्रकार प्रशिआ, जर्मनी, अगर यूरोप कधींहि विसरणार नाहीं.

प्रशिआंतील लोकमत.

जर्मनीचें एकीकरण करण्याच्या कामीं अखेरीस प्रशिआलाच अग्रेसरत्व द्यावें लागेल असें प्रत्येक प्रशिअन माणसाला वाटत होतें. अशा प्रशिआचें अधिपतित्व पहिल्या विल्यमकडे आले असतां प्रशिआच्या राजास शोभेल असें थोरपणाचें वर्तन पहिला विल्यम याच्याकडून झालें नाहीं, असा समज सर्व जर्मनीभर या वेळेस पसरला

होता. सन १८४८ सालीं घडलेल्या प्रकारामुळें ज्या आकांक्षा जनतेच्या अंतःकरणांत जागृत झाल्या होत्या, त्यांचें अपयशामुळें नियमन होऊन त्यांस जरी सौम्य स्वरूप येत चाललें होतें, तरी त्या आकांक्षा पुष्कळ जर्मनांच्या अंतःकरणांत अजूनहि प्रज्वलित होत्या. सन १८४९ सालीं कोलोन येथें एक सार्वजनिक मेजवानी झाली. त्यावेळीं आर्चडयूक जॉन यानें असे उद्गार काढले:–" एकटा ऑस्ट्रिआ नको, एकटा प्रशिआहि नको, परंतु आपल्या पर्वताप्रमाणें अचल असा एकजीव झालेला जर्मन देश आपणास पाहिजे आहे" हे उद्गार जनतेच्या अंतःकरणांत अगदीं भिनून राहिले होते आणि विल्यमच्या राज्यारोहणाच्या वेळीं विशेष औत्सुक्यानें लोकांनीं त्यांची पुनरावृत्ति केली. परंतु दिवस जसजसे लोटत चालले व अविचारी जनसमूहाला सैन्याच्या पुनर्घटनेशिवाय राजाला इतर कोणत्याहि गोष्टीची फिकीर नाहींसें दिसतें असें वाटूं लागलें, तसतशी लोकांची निराशा वाढत चालली व जरी राजा बऱ्याच चांगल्या गोष्टी करील असें पूर्वी वाटत होतें, तरी आतां त्याच्या भावाप्रमाणेंच ह्याच्याहि हातून ऐक्यभाव उत्पन्न करण्याकरितां घिटाईच्या धोरणाचा स्वीकार अखेरीस होणार नाहीं असें लोक एकमेकांमध्यें बोलूं लागले. बॅडेन–बॅडेन येथें एका आस्कर बेकर या नांवाच्या तरुणानें राजाला ठार मारण्याचा प्रयत्न केला हें लोकांच्या या वरील भावनेचें निदर्शनच होय. हा आस्कर बेकर ऑडेसा येथें जन्मला होता खरा, परंतु कुळीनें तो जर्मन होता. कायदा व जमाबंदी यांचें त्यास चांगलें ज्ञान होतें. गणितांत त्याची प्रगति उत्तम असून तुर्की व अरबी भाषा त्यास अवगत होत्या. तो

लाइप्झिग येथें अभ्यासाकरितां राहात असे. तेथून आपला हेतु साध्य करण्याकरितां तो ता. १२ जुलई रोजीं बॅडेन-बॅडेन येथें गेला. तेथें लिचटेंथल आळींत राजा त्याच्या दृष्टीस पडला. तीन कदमांच्या अंतरावरून त्यानें बरोबर राजाला रोंखून खिशांतील पिस्तुलाच्या दोन्ही नळ्यांतून गोळ्या झाडिल्या. एक गोळी राजाच्या मानेवर लागली, परंतु तिनें म्हणण्यासारखी दुखापत झाली नाहीं. बेकरला पकडल्यावर 'राजपदाला योग्य असें जर्मनीचें एकीकरण हें कृत्य राजाच्या हातून झालें नाहीं म्हणून विचारपूर्वक मीं हें कृत्य केलें' असें त्यानें सांगितलें. बॅडेन येथील न्यायसभेनें बेकरला बीस वर्षे कैदेची शिक्षा दिली. मधून मधून अंधार कोठडींत त्यास ठेवावें असाहि हुकूम दिला होता. सन १८६६ त राजाच्या मध्यस्थीवरून— दरम्यान् राजाच्या कृतीवरून गुन्ह्याचीं कारणें अगदीं पोकळ होतीं हें सिद्ध झालें होतें-त्यानें जर्मनींतून कायमचें निघून जावें या शर्तीवर त्यास बंधमुक्त केलें. पुढें दोन वर्षांनीं तो अलेक्झँड्रिआ येथें मरण पावला.

'बंड' सभेची स्थिति.

सॅक्सन सरकारनें 'बंड' सभेची सुधारणा होणें अवश्य आहे अशी एक सूचना राजा विल्यम याजकडे धाडिली होती. दिसेंबर महिन्यांत राजानें या सूचनेस खालीं दिलेलें उत्तर पाठविलें. त्यावरून जर्मनींत प्रशिआला योग्य स्थान, ज्या साधनानें खास मिळणें शक्य होतें, तें साधन तयार करण्यांत तो अगदीं गढून गेला होता तरी जर्मन संस्थानांची स्थिति सुधारण्याचा प्रश्न तो अगदीं विस-

रून गेला होता, किंवा त्या विषयीं तो बेफिकीर होता, असें नाहीं, ही गोष्ट चांगली लक्षांत येते. 'बंड' समेंत ज्या संस्थानांचा समावेश झाला होता त्यांच्यामध्यें अगदीं निकट सख्यसंबंध जडल्याशिवाय 'बंड' समेची सुधारणा होणें शक्य नाहीं अशी माझी हमखास समजूत आहे असें त्यानें सॅक्सन सरकारास कळविलें होतें. हा सख्यसंबंध कसा घडवून आणावा हें स्पष्ट केलें नव्हतें, कारण 'बंड' च्या पूर्वकृतीनें या संस्थानांचे हातपाय ऑस्ट्रिआच्या हालचालीशीं अगदीं बांधून टाकले असल्यामुळें तसें करणें फार बिकट होतें. वस्तुस्थिति अशी होती कीं 'बंड'ची सुधारणा हा प्रश्न प्रत्येकांच्या अंतःकरणांत धुमसत होता. परंतु प्रत्येक जर्मन सरकारला जरी अशी पूर्ण जाणीव होती कीं लवकरच हा प्रश्न हातीं घेऊन तो सोडविणें भाग आहे, तरी प्रत्येक सरकार त्याचा ऊहापोह उघडपणें करण्याकरितां पुढें सरसावण्यास कचरत असे. या प्रश्नाचा उलगडा होण्याचा दिवस उजाडेल त्या दिवशीं प्रशिआला अगदीं तयार ठेवणें एवढेंच विल्यम राजांचें सध्याचें घोरण होतें. या वेळीं राजाला किंवा जर्मनींतील कोणत्याहि प्रमुख मुत्सद्याला केवळ एकाच माणसाच्या कृतीनें व एका वर्षाच्या आंतच हा प्रश्न अत्यंत निकडीचा होऊन इतका थराला लागेल कीं युद्धदेवीचा धांवा करणेंच प्राप्त होईल अशी अटकळ झाली नाहीं.

राजा व पार्लमेंट यांचा मतविरोध.

दरम्यान् प्रशिआंच्या परिस्थितींत मतभेदांची फोड सूक्ष्मतेनें होत चालली होती. सन १८६२ सालाच्या आरंभीं पार्लमेंट भरलें

त्यांत नवीन प्रागतिक पक्षाला जुन्या प्रागतिकांचें पाठबळ असून दोघांनीं मिळून मंत्रिमंडळावर केलेले हल्ले मोडून काढण्याचें सामर्थ्य मंत्रिमंडळांत नाहीं असें लागलीच दिसून आलें. नंतर राजानें आपली सैन्यघटनेची योजना कांहीं झालें तरी सिद्धीस नेण्याचा निश्चय केला, प्रधानमंडळाचें विसर्जन केलें, प्रिन्स फॉन होहेनलोहे यास मुख्य मंत्री करून नवें प्रधानमंडळ नेमिलें, पार्लमेंट सभा बरखास्त केली व माझ्या राजधोरणास तुह्मी पाठिंबा द्या अशी विशेष विनंति जनतेस केली. ही विनंति फुकट गेली. नवें पार्लमेंट ता. १९ मे रोजीं भरलें आणि जरी कांहीं वेळपर्यंत प्रधानमंडळीनें पुढें मांडिलेल्या योजनांना सभा अनुमति देणार असें भासलें तरी लष्करी जमाखर्चाचा खरडा विचाराकरितां पुढें आला तेव्हां सभासदांचा संकेत फिरला. राजा व फॉनरून यांच्या सैन्यघटनेस लागणारा विशेष खर्च मंजूर करितां येत नाहीं असें पार्लमेंटनें साफ सांगितलें.

निकाल असा लागणार असें राजाला पूर्वीच कळून चुकलें होतें. आणि म्हणून जो पार्लमेंटावर आपली सत्ता गाजवील व ज्याला राजाप्रमाणेंच प्रशिआचें गतवैभव पुनः प्राप्त करून घेण्याची तळमळ लागून जो आपलें सर्व सामर्थ्य तो हेतु साध्य करून घेण्याकडेच खर्च करील अशा मनुष्याच्या शोधांत राजा फार दिवस होता राजास आणखी असेंहि पाहिजे होतें कीं हा पुरुष बलवान्, दृढनिश्चयी व धैर्यवान् असावा; सर्व गोष्टी त्याला सहज अगदीं उपजत बुद्धीनें कळाव्या; त्याची बुद्धि तीक्ष्ण निश्चय अचल व जोम सर्वातिशायी असावा.

इतकेंहि असून तो एखाद्या गोष्टीकडे न डगमगतां, डोळे वटारून पाहून त्या गोष्टींतील मर्म समजून घेऊन तिला आत्मवश करून घेईल अशी त्याची धमक असावी. हे सर्व गुण ओटो एडवर्ड लिओपोल्ड, कौंट फॉन बिझमार्क याच्या अंगीं आहेत अशी राजाची खात्री पटल्यावरून त्यानें त्याला ८ ऑक्टोबर १८६२ रोजीं मुख्य मंत्री व परराष्ट्रीय मंत्री नेमिलें.

कौंट फॉन बिझमार्क.

हा नवा मंत्री इतरांच्या मानानें तरुण होता. मॅगडिबर्ग प्रांतांतील स्कॉनहासेन येथील कुलवतनाच्या जागीं १८१५ ता. १ एप्रिल रोजीं तो जन्मला. सातव्या वर्षीं त्याला बर्लिन येथें शाळेंत घातलें. तो याच ठिकाणीं कांहीं वर्षे राहिला मात्र मध्यंतरीं १८२२–२३ सालीं गटिंजेनच्या महाविद्यालयांत कायदा व जमाबंदी यांचा अभ्यास करण्याकरितां कांहीं महिने तो राहात होता. योग्य वेळीं या दोन विषयांच्या परीक्षेंत तो उत्तीर्ण झाला, न्यायसभांत धंदा करण्याकरितां लागणारा परवाना त्यास मिळाला, कायद्याप्रमाणें जें लष्करी शिक्षण त्यास घेणें जरूर होतें तें त्यानें घेतलें, पोमेरॅनिआंतील ग्रोफ-स्वॉल्ड येथें शेतकी शास्त्राचा अभ्यास त्यानें केला व मग १८३९ सालीं वडिलोपार्जित वतनवाडीची जोड वहिवाट तो करूं लागला. सन १८४५ त त्याचा बाप निवर्तल्यावर स्कॉनहासेनचा वारसा त्याच्याकडे आला व तो तेथें राहावयास गेला. त्याच वर्षी तो पोमेरॅनि-आच्या प्रांतिक पार्लमेंटाचा व १८४६ सालीं प्रशिअन सॅक्सनीच्या पार्लमेंटाचा सभासद झाला. सन १८४७ सालीं जें पहिलें संयुक्त

20 APR 1990

पार्लमेंट भरलें त्याच्या रचनेसंबंधीं वादविवादांत त्यानें प्रमुख भाग घेतला होता. त्यावेळीं प्रशिआंत सनदशीर राजपद्धतीचा आरंभ करण्याकरितां जे प्रयत्न झाले त्यांना विरोध करून जुन्या राजशाही तत्त्वाचा कैवारी म्हणून त्यानें पुढाकार घेतला होता. सन १८४८ च्या मार्च महिन्यांत राज्यक्रांतिमूलक घडामोडी झाल्यावर बर्लिन येथें जें दुसरें संयुक्त पार्लमेंट भरलें त्यांत बिझमार्कचें मुळींच अंग नव्हतें. तो आपल्या वतनाच्या ठिकाणीं राहिला व तत्कालीन मुत्सद्यांचा ज्या प्रश्नांनीं अगदीं गोंधळ करून सोडिला होता त्या प्रश्नांचा एकचित्तानें विचार करण्यांत त्यानें आपला काळ घालविला सन १८४८ च्या ग्रीष्मऋतूंत बर्लिन येथें कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या लोकांची सभा —जिला यूंकर पार्लमेंट असें नांव पडलें होतें—भरली, त्या सभेंत तो हजर होता व क्रूझ—झाफ्टंग नांवाच्या वर्तमानपत्रांत त्यानें लेख लिहिले. त्या लेखांनीं लोकांत बरीच चळवळ उडवून दिली होती. सन १८४९ ता. ७ ऑगस्ट रोजीं जी पार्लमेंट सभा भरली त्या सभेंत कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचें मताधिक्य होतें व त्याच सभेंत कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा अभिमत पुढारी हा मान त्यास मिळाला. प्रशिआचें राज्य जोरदार करून रूढमूल करावयाचें; व ऑस्ट्रिआबरोबर असा सख्यभाव ठेवावयाचा किंवा दोन्हीं सत्ताधीश राष्ट्रांना एकमेकांच्या जुटीनें सर्व जर्मनीच्या कारभाराचें योग्य नियंत्रण करितां यावें असा त्याचा मोठा हेतु होता. एर्फर्ट येथें सभा भरवून (१८५०) त्या सभेंत राजानें एकीकरणासाठीं जे प्रयत्न केले त्या प्रयत्नांना बिझमार्कनें विरोध केला तो याच अर्थानें. बिझमार्कनें ऑलमट्झ येथील प्रतिनि-

धींच्या सभेला देखील मान्यता दिली, कारण परिस्थितीकडे लक्ष देऊन असें करणें अपरिहार्य आहे असें त्यास वाटलें.

बिझमार्क.

या काळीं बिझमार्क हा अनियंत्रित राजसत्तेचा अत्यंत कार्यक्षम व हिंमतदार पुरस्कर्ता असल्यामुळें सर्व पक्षांतील पुढारी लोकांचें लक्ष त्याच्याकडे वेधलें होतें. मँटाइफेल व त्यांचे सहकारी हे प्रतिगामी धोरण ठेवणारे असल्यामुळें त्यांस अनियंत्रित राजसत्तेविषयीं इतकी सर्वश्रुत ठाममतें प्रतिपादन करणारा बिझमार्क फारच प्रिय झाला. म्हणून त्याला फ्रँकफोर्ट येथील वकील मडळींचा चिटणीस केलें (१८५१, मे); पुढें तीन महिन्यांनीं डायेट सभेंतील प्रशिअन प्रतिनिधि म्हणून त्याची नेमणूक झाली. तारुण्याच्या आरंभापासून ऑस्ट्रिआ व प्रशिआ या दोन जर्मन सत्ताधीश राष्ट्रांत निष्कपट सत्यभाव राखावा असा बिझमार्क याचा मोठा मनोरथ होता. तो मनोरथ आतां पूर्ण करावयाचा असा निश्चय करून तो फ्रँकफोर्ट येथें गेला. जवळ जवळ तान वर्षे फ्रँकफोर्ट येथें राहून तो १८५५ जानेवारींत परत फिरला. तेव्हां त्याची पक्की खात्री झाली होती कीं, ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यामध्यें असा सख्यभाव असणें शक्य नव्हतें; दुय्यम प्रतीच्या संस्थानांचा उपयोग आपली बडेजाव वाढविणें व प्रशिआची मानखंडना करणें या कामाकडे करून घ्यावयाचा हें ऑस्ट्रिआचें निश्चित धोरण होतें; सन १७४० ते ४२ या सालीं दुसरा फ्रेडरिक यानें जें धोरण ठेविलें होतें त्या धोरणाचें पूर्ण अनुसरण करून आपल्या

आपल्या भाग्योदयाचा मार्ग काढणें याशिवाय प्रशिआस दुसरा तरणोपायच नव्हता. ज्या राजसत्तेचा ऑस्ट्रिआ एके वेळीं मित्र होता व ज्या राजसत्तेबरोबर निष्कपटानें वागणें इष्ट होतें त्या राजसत्तेचा ऑस्ट्रिआ आतां त्याच्या मतानें शत्रु बनला होता आणि म्हणून त्या राजसत्तेला म्हणजे प्रशिआला, ऑस्ट्रिआला धुळीस मिळविण्याचा प्रयत्न करणें भाग होतें.

बिझमार्क फ्रँकफोर्ट सोडून सेंट पिटर्सबर्ग येथें प्रशिआचा वकील म्हणून गेला. हें वकिलीचें काम त्याला या वेळेस विशेषच आवडलें; कारण ऑस्ट्रिआचा पाडाव करण्याचा बेत त्याच्या मनांत हळूहळू बळावत चालला होता, म्हणून झारच्या मंत्र्याचें सख्य संपादन करण्याची त्याला फार आतुरता होती. त्यांतल्यात्यांत व्हिए च्या दरबाराच्या अकृतज्ञतेनें या वेळेस झारचें मन फारच खट्टू झालें होतें सन १८४९ सालच्या हंगेरिअन युद्धांत रशिआनें ऑस्ट्रिआला चांगलें साहाय्य केलें होतें. ही गोष्ट लक्षांत घेतां, क्रिमिअन युद्धांत ऑस्ट्रिआचें वर्तन, ऑस्ट्रिआनें दाखविलेला अघवट वैरभाव व पाश्चिमात्य राष्ट्रांशीं ऑस्ट्रिआनें केलेलें संगनमत, ह्या सर्व गोष्टी ऑस्ट्रिआस अत्यंत लाजिरवाण्या होत्या असा सेंट पिटर्सबर्ग येथें सर्वत्र समज झाला होता. उलटपक्षीं इंग्लंड व फ्रान्स यांनीं प्रशिआशीं जी बोलणीं लाविलीं होतीं त्यांकडे प्रशिआनें पूर्ण दुर्लक्ष केल्यामुळें झार व त्याचे मंत्री यांच्या मनांत प्रशिआविषयीं कृतज्ञताबुद्धि उत्पन्न झाली होती. या मनस्थितीचा बिझमार्क यानें पूर्ण फायदा घेतला. त्यानें तीन

वर्षे सेंट पिटर्सबर्ग येथें राहून प्रशिआ व यांच्यामध्यें मित्रत्वाचें बी उत्तम पेरलें, यांत संशय नाहीं. सन १८६६ व १८७०–७१ या सालच्या प्रशिआच्या झटापटींत या सख्याचा प्रशिआस फारच उपयोग झाला.

बिझ्मार्कचे बेत.

सन १८६१ सालच्या वसंत ऋतूंत तो सेंट पिटर्सबर्ग येथून पॅरिस शहरीं प्राशिआचा वकील म्हणून गेला तेथें फ्रेंच बादशाहाशीं त्याच्या पुष्कळ संबंध आला. या बादशाहाचें राजकारण अगम्य असल्यामुळें सर्व यूरोप खंडाचें लक्ष त्याजकडे लागून राहिलें होतें. ठेंगणा बादशाहा तिसरा नेपोलिअन याच्याविषयीं बिझ्मार्क याच्या मनाचा चांगलासा ग्रह झाला नाहीं. तिसरा नेपोलिअन म्हणजे एक कल्पना-सृष्टींत संचार करणारा वंचक आहे व त्याच्या राजनीतीचा प्रतिकार करून ती फसविण्यास उत्तम उपाय म्हणजे उघड व बेमुरवतीची भाषा वापरणें व निश्चित अशी प्रतिक्रिया करणें हाच होय असें त्याचें मत होतें. सर्व यूरोपच्या चित्तवृत्तीचा अत्यंत क्षोभ झाला असतां ज्या राजकारणानुसार फ्रॉन्सनें मेक्झिकोवर स्वारी केली त्या राजधोरणाविषयीं त्याला पराकाष्ठेचा धिक्कार वाटला. तथापि तो हें जाणून होता कीं ऑस्ट्रिआ विरुद्ध तो जी उपाययोजना करणार होता, ती सफल होण्यास फ्रॉन्सच्या असलेल्या धोरणापासून साहाय्यच होईल; कारण त्या धोरणामुळें यूरोपांतील फ्रॉन्सच्या हालचाली अगदीं लंगड्या पडतील.

बिझ्मार्क याला पॅरिस शहरीं जाऊन फार दिवस झाले नाहींत तोंच त्याच्या राजानें त्यास परत बोलाविलें (२३ सप्टेंबर) कारण मंत्रिमंडळांत मध्यंतरीं रिकाम्या झालेल्या जागेचें काम त्याला करावयाचें होतें. पुढें पंधरा दिवसांनीं तो मंत्रिमंडळाचा अध्यक्ष व पर राष्ट्रीय मंत्री झाला.

बिझ्मार्कला कसकसे अनुभव येऊन तो शहाणा झाला होता याचा विचार येथवर झाला. आतां त्याच्या स्वभावाचें विवेचन करणें अवश्य आहे.

बिझ्मार्क जातकुळीनें अस्सल प्रशिअन होता. त्याचीं मतें म व निश्चय अढळ असत. जर्मनींत प्रशिआला अग्रस्थान मिळवून दे-या- करितां त्यानें आपल्या मनांत एका याजनेची अगदीं बरोबर आंखणी करून ठेविली होती. योग्य प्रसंग साधून ह्या योजनेची उभारणी रक्तस्राव व तरवार य.च्या आधारावर केली आहे व योजनेच्या सिद्धयर्थ झटत असतां जी जी अडचण मार्गांत येईल, मग ती अडचण कोण त्याहि प्रकारची असो तिला पायाखालीं तुडवून पुढें मार्ग काढावयाचा असें त्यानें एकदांच जाहीर केलें. जरूर तर सदसद्विवेकबुद्धि, सत्यावद्दल आदर, अब्रूची चाड, याहि गोष्टी या कामीं गुंडाळून ठेवण्याची त्याची तयारी होती. केवळ उद्दिष्ट साध्य करून घेण्याच्या विचारापुढें त्याला कोणत्याहि गोष्टीची मातबरी नव्हती. अंगीकृत कार्याच्या अंतगमनासाठीं जो पुरुष बिनदिक्कत कोणत्याहि उपायांची योजना करण्यास तयार असतो त्याला ज्या ज्या साधनांचें साहाय्य

होणें शक्य असतें तीं तीं साधनें हस्तगत करून घेण्याचा त्याचा पूर्ण विश्वास होता. हें बिझ्मार्क याची नीति रक्तस्राव व तरवार यांच्या आधारावर उभारलेली होती हें जितकें खरें आहे तितकेंच तिच्या मुळाशा कपट व असत्यताहि होतीं असें म्हटलें पाहिजे. ज्या युद्धामुळें अखेरीस ऑस्ट्रिआस जर्मनीपासून अलग व्हावें लागलें त्या युद्धास आरंभ करणें बिझ्मार्कनें ऑस्ट्रिआस भाग पाडिलें तें कपट व असत्यता या दोन उपायांच्या जोरावरच असें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. बिझ्मार्कनें दुसरा फ्रेडरिक याच्या वर्तनक्रमाचा अभ्यास चांगला लक्षपूर्वक केला होता. ज्या गुणांनीं फ्रेडरिक याला जर्मनींत अग्रस्थान मिळालें होतें ते सर्वच गुण बिझ्मार्क याच्या ठिकाणीं एकवटले नव्हते परतु त्याला ज्या राजाची सेवा करावयाची होती त्या राजाच्या आयुष्यांतील या वेळचें एकच एक ध्येय प्रशिआला सर्वश्रेष्ठ पद प्राप्त करून द्यावयाचें हेंच असल्यामुळें व ज्या सहकाऱ्यांबरोबर त्याला काम करावयाचें होतें त्यां पैकीं एक त्याला पाहिजे तेवढी फौज पुरविण्यास तयार असल्यामुळें व दुसरा लढाईच्या डाव पेचांत निष्णात असल्यामुळें स्वदेशांत होणारा विरोध त्याला सहज दडपून टाकतां आला. परराष्ट्रीय धोरणाच्या आखाड्यांत मोठ्या औत्सुक्यानें उतरून सन १७४०–४२ आणि १७५६–६३ या सालीं राजनीतीचीं सूत्रें जेथें थोपून राहिलीं होतीं तेथून त्यानें तीं गोळा करून आपल्या हातीं घेतलीं. अशा रीतीनें बिझ्मार्क यानें होहेन्झोलन घराण्यांतील ज्या राजाला पापपुण्याचा विचार कधींहि

शिवला नाहीं त्यानें मोठ्या कौशल्यानें आरंभिलेली पण निरुपायानें अर्धवट पडलेली योजना तडीस नेली. बिझ्मार्कचें व त्याच्या धोरणाचें स्वरूप असें होतें. आतां त्याच्या कृतींचा विचार करावयाचा आहे.

यशःप्राप्तीचे मार्ग.

प्रिन्स फॉन होहेन्लोहे याच्या राजीनाम्यानें मध्येंच रिकाम्या झालेल्या मुख्य मंत्र्याच्या जागेवर २३ सप्टेंबर रोजीं बिझ्मार्क रुजू झाला. त्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें एकदम तो आपल्या कामास उत्साहानें लागला. ता. २९ रोजीं त्यानें सभेस कळविलें कीं, मंत्रिमंडळानें तयार केलेलें अंदाजपत्रक पसंत झाले नाहीं, तर मी तें पुढील बैठकींत सैन्याच्या पुनर्घटनेच्या मसुद्यासह पुनः मांडीन. दुसऱ्या दिवशीं अंदाजपत्रकाचा विचार करणाऱ्या मंडळास उद्देशून बोलतांना महत्त्वाच्या प्रश्नांचा निकाल भाषणांनीं व मताधिक्यानें केलेल्या ठरावांनीं लागत नसतो, तर तो रक्तस्राव व तरवार यांच्या बळावरच होत असतो,' या इतिहासप्रसिद्ध व भविष्यपूर्ण शब्दांचा उपयोग त्यानें केला. या उक्तीचा परिणाम मंडळाच्या सभासदावर मुळींच झाला नाहीं; कारण ७ ऑक्टोबर रोजीं लोकसभेनें पुनर्घटनेची योजना फेंटाळून लावली. नंतर बिझ्मार्कनें आपली योजना उमराव सभेकडून पसंत करविली व पार्लमेंट बरखास्त केलें. एखाद्या प्रश्नावर सनदशीर पद्धतीनें अस्तित्वांत असलेल्या दोन्ही सभांचें व राजाचें मतैक्य झालें नाहीं तर तिघांच्या एकत्र केलेल्या मताधिक्याप्रमाणें त्या प्रश्नाचा निकाल लागला पाहिजे अशी नवीनच क्लृप्ति यानें काढली.

दरम्यान अंदाजपत्रकाशिवाय कारभार चालविण्याचा व कर वसूल करण्याचा उपक्रम त्यानें केला. उमराव सभेनें दिलेले निकाल ठरलेल्या शासनपद्धतीच्या विरुद्ध आहेत, अतएव ते बेकायदेशीर आहेत अशी लोकसभेनें तक्रार केली, परंतु ती व्यर्थ गेली. या केवळ शाब्दिक तक्रारीचा परिणाम त्या सर्व गोष्टींचें मर्म झटकन ओळखणाऱ्या या कुशाग्रबुद्धीच्या पुरुषावर बिलकूल झाला नाहीं परराष्ट्रीय वकिलाचें काम तो पाहूं लागल्यावर पांच दिवसांनींच त्यानें प्रतिनिधींना आपआपल्या मतदारांकडे गाऱ्हाणें गात बसण्यास रवाना केलें.

मतदारांनीं प्रतिनिधींच्या स्वदेशहितदक्ष वर्तनाबद्दल त्यांचे आभार मानून अभिनंदनहि केलें. देशाचें मत उघडच त्यांच्या बाजूचें होतें. ह्या नवीन मंत्र्याला पार्लमेंटच्या कारभाराच्या पद्धतींचा अनुभव मुळींच नव्हता. असें असतां तो लोकांच्या प्रतिनिधींच्या हक्कांची पायमल्ली करण्यास तयार झाला व प्रतिनिधींच्या मंजुरी शिवाय इतकेंच नव्हे तर त्यांनीं केलेले स्पष्ट ठराव बाजूस सारून मी करवसुली करीन असें त्यानें उघड बोलून दाखविलें; तेव्हां त्याच्या धाडसी वर्तनाचा अर्थच लोकांस समजेना. पुढचे तीन महिने दोन्ही पक्षांनीं ह्या झटापटीची पुनः तयारी करण्यांत घालविले. जनतेपैकीं बहुतेकांस या झटापटीच्या अंतीं सनदशीर शासनपद्धती नाहींशी तरी होईल किंवा तिला नवीन जोर तरी येईल असें वाटत होतें. राजा व त्याचे मंत्री यांच्या मतें प्रशिआची गणना मोठ्या सत्ताधीश राष्ट्रांत राहाणार कीं तो त्यांच्यांतून गळणार याचा निर्णय या झटापटीच्या शेवटीं होणार होता.

बिझमार्क पार्लमेंटाला धाब्यावर बसवितो.

लोकसभा १८६३ ता. १० जानेवारी रोजीं पुनः भरली. तिचे सभासद आपलें काम नेटानें तसेंच चालवावयाचें असा दृढ निश्चय करून आले होते. राजमंत्र्यानें देशाचा कारभार अंदाजपत्रकाशिवाय चालविला; त्यानें मताधिक्याची अवहेलना केली व जो पैसा खर्च करण्यास मंजुरी नव्हती तो पैसा त्यानें खर्च केला. ह्या सर्व तक्रारी राजाच्या भाषणाला उत्तर देतांना सभासदांनीं केल्या. वॉरसॉन भोंवतालचा प्रदेश यांत दंगे झाले म्हणून प्रशिअन पोलंडमध्यें सैन्याची सिद्धता ठेवण्याच्या कामीं रशिआबरोबर हंगामी तह करून लोकसभेला न कळवितां सरकारनें तहनाम्यावर सही केली, हें एक नवेंच तक्रारीला कारण झालें. ह्या सैन्याच्या सिद्धतेची तारीख व सैन्याच्या पुनर्घटनेची योजना पुनः सभेपुढें आली. तिची तारीख एक आहे तेव्हां सरकार या सैन्यसिद्धतेचा उपयोग आपल्या योजनांस जबरीनें संमति मिळविण्याकडे करील अशी प्रतिपक्षाची दृढ समजूत झाली. अखेरीस फॉनरून यानें आपला सैन्यासंबंधीं कायद्याचा मसुदा ता. ८ फेब्रुवारी रोजीं सभेपुढें मांडिला. तत्त्वतः हा मसुदा म्हणजे जुन्याची पुनरावृत्ति आहे असें आढळून आलें. तो मसुदा नंतर कमिटीकडे दिला ह्या कमिटीनें आपला अहवाल ता. २४ एप्रिल रोजीं केला. त्या मसुद्यांत नमूद केलेली योजना नापसंत ठरवून शिवाय प्रत्येक भागाचा विचार करून कमिटीनें आपल्या दुरुस्त्या सुचविल्या होत्या व तो मसुदा पायदळांतील नोकरीची मर्यादा दोन वर्षांची ठरविणाराच आहे

म्हणून सभेस सादर करण्यांत येत आहे असें म्हटलेंहोतें अहवाल सभेपुढें आल्यावर कडाक्याचा वादविवाद झाला. त्यांत सभेचे उपाध्यक्ष हर फॉन बोकम–डॉल्क्स याला युद्धमंत्री फॉनरून यास तुम्ही विषयाला सोडून बोलूं नका असें वारंवार सांगावें लागलें (११ मे . उपाध्यक्षाच्या या कृतीनें बिझमार्कच्या धाष्टर्यास जास्तच चेव आला. सभेच्या अध्यक्षानें मंत्रिमंडळांतील सभासदावर आपली शिस्त चालविण्याचा अधिकार सोडून दिला नाहीं तर ते सभासद सभेच्या आवारांत सुद्धां पाऊल टाकणार नाहींत, असा निरोप दुसऱ्या दिवशीं बिझमार्कनें सभेस पाठविला. आणीबाणीचा प्रसंग गुदरला. ता. २१ रोजीं या वादांत मंत्र्यांच्या म्हणण्याला माझें पूर्ण अनुमोदन आहे असें राजानें कळविलें. दुसऱ्या दिवशीं राजाचे मंत्री व लोकांचे प्रतिनिधि यांच्यांत सध्यां उत्पन्न झालेले फार मोठे मतभेद माणसें व पद्धति बदलूनच दूर होण्याचा संभव आहे असें सभेचें मत राजास कळवावें असा सभेनें ठराव पसंत केला. यावर सरकारानें पार्लमेंट बरखास्त केलें (मे, ता. २७). पुढें तीन दिवसांनीं (१ जून) राजाचा हुकूम सुटला कीं इतउत्तर पोलिसास छापखान्याची तपासणी करण्याचा अधिकार राहील व सरकारचीहि विशेष नजर त्याच्यावर राहील.

बिझमार्कचें परराष्ट्रीय धोरण.

प्रशिआला जर्मनींत जी प्रतिष्ठा असणें वाजवी होतें व जी प्रागतिक पक्षाचे लोकहि प्रशिआला मिळावी अशी इच्छा करीत होते ती प्रशिआस मिळण्यास एकच साधन होतें. तें साधन

म्हणजे राजा व मंत्री यांनीं तयार केलेली सैन्याच्या पुनर्घटनेची योजना पार्लमेंटनें मान्य करणें. या योजनेला पार्लमेंट विरोध करीत होते, कारण त्या योजनेचें इंगित सभासदांच्या ध्यानांत आलें नव्हतें ही योजना पार्लमेंटावर लादण्याचा प्रयत्न एका बाजूनें राजा व त्याचे मंत्री यांचा चालला होता. इकडे बिझमार्कहि प्रशिआच्या परराष्ट्रीय धोरणांत कुरापत काढून दुसऱ्यावर चढाई करण्याच्या पद्धतीचा शिरकाव करून देण्याच्या प्रयत्नांत होता. ह्या पद्धतीमुळें आज नाहीं उद्यां प्रशिआचा इतर राष्ट्रांशीं बेबनाव झालाच असता. आलमट्झ येथें झालेल्या हंगामी तहानें हेसी प्रकरणाची व्यवस्था कांहीं वेळ लागली होती. परंतु त्या व्यवस्थेंत 'बंड'नें पुनः हात घालावा अशी परिस्थिति आतां उत्पन्न झाली होती. हेसीच्या अधिपतीचा अंमल प्रजेला इतका जाचक झाला कीं, प्रजेनें 'बंड'नें मध्यस्थी करावी अशी मोठी ओरड केली. सन १८५० सालीं प्रशिआनें प्रजेच्या पक्षाचा व ऑस्ट्रिआनें अधिपतींच्या पक्षाचा कैवार घेतला होता. त्यावेळीं ऑस्ट्रिआला यश आलें होतें; पण यावेळीं प्रशिआचें वजन व प्रभाव ही लोकांच्या निदर्शनास आलींच पाहिजेत असा बिझमार्क याचा कृतसंकल्प होता. म्हणून 'डायेट' सभा हेसीच्या लोकांनीं केलेल्या विनंतीचा विचार डुकल्या घेत घेत करीत असतां बिझमार्क यानें खुद्द हेसीच्या अधिपतीस लिखित पाठविलें व त्यांत तुम्ही आपल्या संस्थानांतील नियुक्त संस्थांचे हक्क त्यांचे त्यांस द्या, व ते अबाधित चालवा असें जोरानें म्हटलें. बिझमार्क पॅरिस येथें असतांना त्यानें फ्रॉन्सबरोबर व्यापारासंबंधीं तहाचें बोलणें केलें होतें. त्या तहाचा

ऑस्ट्रिआच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम झाला अशी ऑस्ट्रिआची कुरकुर होती. ह्या तहासंबंधीं कांहीं सूचना बिझमार्कनें 'डायेट' समेकडे केल्या होत्या, त्या सूचनांसंबंधीं ऑस्ट्रिआची दुसरी तकार होती. ही संधि साधून बिझमार्क यानें व्हिएन्नास एक झणझणीत खलिता पाठविला. त्या खलित्यांत त्यानें ऑस्ट्रिआनें जाणून बुजून प्रशिआशीं द्वेषभाव मांडिला आहे असा आरोप केला होता. ऑस्ट्रिआ व मध्यवर्ती जर्मन संस्थानें हा वैरभाव असाच पुढें चालू ठेवतील तर बंड समेंत फाटाफूट होईल असें स्पष्ट शब्दांनीं त्याच खलित्यांत बिझमार्कनें भविष्य वर्तविलें होतें. या बाबतींत जो पत्रव्यवहार पुढें झाला त्यांत बिझमार्क यानें त्याच्या धोरणाच्या मुळाशीं जे विचार होते व त्याचा जो अंतिम हेतु होता त्या सर्वांचें उत्तम दिग्दर्शन केलें होतें प्रशिआच्या जर्मनींत असलेल्या वजनावर वारंवार हल्ले करून आपल्या राज्याचा गुरुत्वमध्य जर्मनींत रूढमूल करण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं ऑस्ट्रिआ जर आपला गुरुत्वमध्य बुडापेस्ट येथें नेईल तर ऑस्ट्रिआनें आपल्या हिताचीच गोष्ट केली असें होईल असें त्यानें ऑट्रिआस बजाविलें. हे उद्गार ऐकून मध्यवर्ती व दक्षिणस्थ संस्थानांस ऑस्ट्रिआसच चिकटून राहणें बरें असें वाटलें व त्यामुळें प्रशिआ जरी एकटाच एका बाजूला पडत चालला तरी हे उद्गार विचारपूर्वक काढले होते हें आपण विसरतां कामा नये. आपला हेतु पूर्ण होण्यास पुढील गोष्टी अवश्य झाल्याच पाहिजेत अशी बिझमार्क याची पक्की समजूत होती. प्राशिआनें परंपरागत आचारांचा त्याग केलाच पाहिजे; जर्मनींतील इतर राष्ट्रांसमोर दंड थोपटून

उभें राहिलें पाहिजे; खलित्यांनीं आणि दप्तरीं ठेविलेल्या दाखल्यांनीं नव्हे तर रक्तस्राव व तरवार यांच्या जोरानें आपले हक्क शाबीत करण्यास तयार असलें पाहिजे. प्रशिअन राजाच्या अत्यंत विश्वासांतील मंडळीमध्यें ज्या कृतीचा प्रत्यक्ष खल झाला त्या कृतीची ह उद्गार म्हणजे प्रस्तावना होती

बिझमार्क रशिआशीं मैत्री करतो.

त्याच दिशेनें आणखी एक उपाय म्हणून बिझमार्कनें रशिआ बरोबर जो संबंध जोडिला त्याचा आतां विचार करणें आहे. बिझमार्क सेंटपिटर्सबर्ग येथें असतांना त्यानें झारच्या मुत्सद्यांचें मित्रत्व संपादन करण्याकरितां किती काळजी घेतली हें पूर्वी सांगितलेंच आहे. तो परराष्ट्रीय मंत्री झाल्यावर लवकरच एक गोष्ट घडली व त्यामुळें मागें त्यानें जें सख्य व हितसंबंध जोडलें होतें त्यांचें दृष्टीकरण करण्यास त्याला उत्तम संधि आली. सन १८६३ जानेवारी २२ रोजीं वॉर्सा येथें बंड उद्भवलें व तें सर्व रशिअन पोलंडपर्यंत पसरलें. पॅरिस व लंडन येथील लोकांची पूर्ण सहानुभूति पोल्स प्रजेकडे होती प्रशिआंत पोल्स होतेच. बंडापासून बंड उद्भवतें. पोल्सलोकांच्या आकांक्षा विषयीं बिझमार्कला मुळींच सहानुभूति नव्हती. आणखी असें कीं. रशिअन सरकाराशीं पूर्ण संगनमत करण्यास ही संधि फार उत्तम होती. उत्तरस्थ शेजारी रशिआ यानें सख्य संबंध मनांत आणून तटस्थवृत्ति धरावी अशी प्रशिआस लवकरच गरज पडेल असें बिझमार्कला वाटत होतें म्हणून बिझमार्क यानें बंडखोरांनीं प्रशिअन सरहद्द

ओलांडिलींच तर त्यांच्यावर संयुक्त हल्ला चढवावा असा हंगामी तह रशिआबरोबर केला. पळपुट्यांना सरहद्द ओलांडण्याची मनाई केली. आणि फॉनहून याच्या मार्फत सैन्याची एक जबर तुकडी सज्ज करवून ज्या हालचाली होतील, त्या लक्षपूर्वक पाहण्याचें काम त्या तुकडीस दिलें. ऑस्ट्रिआचीहि पोल्स प्रजा होतीच, परंतु ऑस्ट्रिअन सरकारानें झारच्या इच्छेनुरूप त्याला मदत करण्याची अशी आतुरता मुळींच दाखविली नाहीं. तर मग एका बाजूला प्रशिआचें हें सहानुभूतिपर वर्तन व दुसऱ्या बाजूला मोठ्या पाश्चात्य राष्ट्रांचा विरोध आणि ऑस्ट्रिआची बेफिकिरी यांच्यांत जी तफावत दिसली असेल, तिचा सेंटपिटर्सबर्गच्या मुत्सद्यांच्या मनावर काय परिणाम झाला असेल व प्रशिआच्या मदतीबद्दल योग्य वेळीं परतून प्रशिआला मदत करण्याची त्यांच्या मनाची अगोदरच कशी तयारी झाली असेल हें वाचकांच्या सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

या व पुढल्या वर्षीं आणखी दोन प्रश्नांस महत्त्व आलें हे दोन प्रश्न उपस्थित झाल्यामुळें मतभेदांस तीक्ष्णतर रूप आलें व अखेरीस प्रशिआ व बाकीचीं जर्मन राष्ट्रें यांच्यांत उघड फूट पडली. 'बंड'ची सुधारणा व स्क्लेस्विग–होलस्टीन प्रकरण हे ते दोन प्रश्न.

ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यांत दोन प्रश्नांचा लढा.

या दोन प्रश्नांपैकीं पहिला प्रश्न सोडवून घेण्याच्या कामीं आतां दिरंगाई करण्याची ऑस्ट्रिआस मुळींच इच्छा नव्हती. ऑस्ट्रिआचा बादशहा फ्रॅन्सिस जोसेफ अत्यंत एकनिष्ठ व संभावित होता. त्याच्या

नेतृत्वाखालींच या वेळीं ऑस्ट्रिआंत सनदशीर शासनपद्धतीस आरंभ झाला होता; सरकारी कामें व्यवस्थेशीर रीतीनें चाललीं होतीं व राजमंत्री मोकळ्या मनानें आणि सरळपणानें सहकार करून राज्यकारभार करीत होते. या परिस्थितीची व प्रशिअन राज्यकारभारांतील परिस्थितीची तुलना केल्यास या कालच्या ऑस्ट्रिआच्या राजनीतिविषयीं मनाचा अनुकूल ग्रह होतो. बिझमार्कनें चालविलेलें शिरजोरपणाचें वर्तन व व्यवहारांत दुसऱ्यास दडपून टाकण्याची त्याची शक्ति हीं पाहून ऑस्ट्रियन मंत्र्यांनीं थोडी कच खाल्ली व पूर्वी ते जितके माघार घेण्यास तयार नव्हते तितकेच ते आतां मिळवून घेण्यास तयार झाले. याच वर्षी शरद्ऋतूंत गॅस्टाइन यथें या दोघा बाद शाहांची गांठ पडली. जर्मनींतील राजांची सभा फ्रँकफोर्ट येथें भरावी व तींत 'बंड'ची सुधारणा कशी करावी याचा विचार व्हावा, या विषयीं एक योजना मध्य व दक्षिण जर्मनीच्या राजांच्या अनुमतीनें फ्रँसिस जोसेफ यानें तयार केली होती त्या योजनेला प्रशिआचा राजा पहिला विल्यम याची संमति मिळविण्याचा प्रयत्न वरील भेटींत फ्रॉन्सिस जोसेफ यानें केला होता. परंतु बिझमार्क गॅस्टाइन येथें हजर नव्हता, आणि ही योजना मला पसंत आहे असें सध्यां जरी मी म्हणतों तरी बिझमार्कची भेट झाल्या शिवाय मी वचनबद्ध होणार नाहीं असें विल्यम यानें सांगितलें. या गोष्टीचा अखेर निकाल लागण्यापूर्वीच विल्यम राजा गॅस्टाइन येथून निघून गेला. पुढें कांहीं दिवस गेल्यावर 'डायेट' सभेंत प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क ज्या देशास होता त्यांना आमंत्रणपत्रिका पाठविण्यांत आल्या. यांपैकीं

सोळा संस्थानांनीं आमंत्रण स्वीकारलें. सतरावें संस्थान प्रशिआ त्यानें आमंत्रण स्वीकारलें नाहीं व येथें राजाचा व बिझमार्कची भेट झाली; व राजानें या सभेशीं आपणास कांहीं कर्तव्य नाहीं असें ठरविलें. पुढ फ्रँकफोर्ट येथें जमलेल्या राजांनीं आपल्यापैकीं सॅक्सनीचा राजा जॉन–विल्यमला विशेष प्रिय होता त्यास विल्यमचें मन वळविण्या करितां त्याजकडे पाठविलें. परंतु राजानें आपला निश्चय कायम ठेविला व सभा भरविण्याचा प्रयत्न फुकट गेला.

बिझमार्क यानें आपल्या राजाला आमंत्रण पतकरूं नये असा सल्ला कां दिला हें समजणें अवघड नाहीं. त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, पुढें दिलेल्या शर्तांवरच केवळ बंड 'ची पुनर्घटना शक्य आहे (१) डायेट सभेंत ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांना बिनशर्त अगदीं समसमान हक्क असले पाहिजेत. (२) लढाई पुकारण्याच्या बाबतींत प्रत्येकाला नाहीं म्हणण्याचा अधिकार असावा व (३) सर्व संस्थानांतून मत देण्याचा हक्क सारखा करावा व त्या प्रमाणें निवडलेल्या जर्मन लोकांच्या प्रतिनिधींची सभा असावी. हे तीन मुद्दे देऊन त्यानें असा युक्तिवाद केला कीं, राजांच्या सभेकडून यांतील एकाहि मुद्यावर अनुकूल निकाल लागणें शक्य नाहीं. कदाचित् त्याचें हें अनुमान बरोबरहि होतें.

डेन्मार्कबरोबर वितुष्ट.

सभा भरविण्याचा बेत असा फसल्यावर लागलाच स्लेस्विग-होल्स्टीन प्रश्न पुनः जोरानें पुढें आला. लंडन येथें झालेल्या तहांत

डॅनिश राज्य पूर्ण एकसत्ताक आहे व ग्लक्सबर्गचा प्रिन्स क्रिश्चन चालू राज्यकर्त्याच्या यच्चयावत् मुलुखाचा पुढें मागें वारसदार होणार ही गोष्ट कबूल केली असून ऑस्ट्रिआ व प्रशिआ या दोघांनाहि ते मान्य होते तथापि जर्मन 'बंड'चे होल्स्टीनमधील अधिकार अबाधित राहावे अशी व्यवस्था करण्यांत आली होती; व राजा सातवा फ्रेडरिक यानें दोन्हीहि संस्थानांतील प्रजेस वागविण्याच्या बाबतींत कांहीं विशेष नियम पाळण्याचें कबूल केलें होतें; आपल्या अंम खालीं असलेल्या सर्व मुलुखांत एकी घडवून आणण्याच्या भरांत राजानें ही शर्त एकसारखी हट्टानें मोडली होती ह्या डचींतील जर्मन प्रजेनें पुष्कळवेळां आपल्या वतीनें 'डायेट' सभेनें मध्यस्थी करावी म्हणून तिला विनंति केली. या बाबतींत पुष्कळ पत्रव्यवहार झाला होता, धमक्याहि दिल्या होत्या, परंतु प्रजेचीं गाऱ्हाणीं दूर झालीं नाहींत. परंतु सन १८६३ मार्च महिन्यांत यापुढें स्वस्थ हात जोडून बसावयाचें नाहीं असा 'डायेट'नें निश्चय केला सभेनें राजा फ्रेडरिक याला स्वच्छ कळविलें कीं तुम्ही जर नुकतेंच निघालेलें शासन-पत्र त्यांतील डचीज वर दिलेल्या अनधिकृत करासह मागें घेणार नाहीं तर सभा संयुक्त संस्थानसंघाच्या अधिकारान्वयें या प्रकरणाचा निकाल लावील. याचें जणूं काय उत्तर म्हणूनच फ्रेडरिक राजानें स्लेस्विग आपल्या बाकीच्या राज्यांत सामील केलें. हें राजाचें कृत्य पाहून 'डायेट' सभेनें ता. १ आक्टोबर रोजीं संघाच्या अधिकाराची अंमलबजावणी केली म्हणजे होल्स्टीनचा ड्यूक या नात्यानें डेन्मार्कच्या राजावर सशस्त्र सैन्य पाठवून स्वारी करण्याचें ठरविलें.

डायेट सभा युद्ध पुकारते.

अंमलबजावणी होण्याच्या पूर्वी डेन्मार्कचा राजा वारला (१५ नोव्हेंबर). ग्लक्सबर्गचा प्रिन्स क्रिश्चन यानें फ्रेडरिकच्या मागून गादीवर आल्यावर, जर या राजाचे चीड आणणारे हुकूम परत घेतले असते तर कदाचित् जर्मनीनें मध्यस्थी करण्याचा हा प्रसंग टळला असता असें वाटत होतें. परंतु डॅनिश लोकांच्या मनोभावना इतक्या उद्दीपित झाल्या होत्या कीं, ह्या प्रश्नाचा निकाल शांततेनें लागणें अशक्य झालें होतें. नव्या राजाला लोकांच्या इच्छेपुढें मान वांकवावी लागली. स्क्लेस्विग डॅनिश राज्याचा एक घटकावयव आहे व होल्स्टीनपासून युद्धाच्या खर्चाकरितां करवसुली करणें वाजवी आहे असें ठरविणाऱ्या शासनपद्धतीस रुकार देणें राजास भाग पडलें परंतु जर्मन राष्ट्राच्या मनोभावना सन १८४८ पासून आजपर्यंत कधींहि क्षुब्ध झाल्या नव्हत्या इतक्या त्या या वेळीं क्षुब्ध झाल्या होत्या. राजा क्रिश्चन यानें नव्या शासनपद्धतीस रुकार दिल्याचें समजल्या बरोबर आतां ठरल्याप्रमाणें स्वारी करणें अपरिहार्य आहे अशी एकच ओरड झाली. लंडन येथील तहाच्या अटी आतां बाजूला सारा व स्क्लेस्विग होल्स्टीन ड्यूक ऑफ ऑगस्टनबर्ग याच्या ताब्यांत द्या व जर्मनीच्या संस्थानसंघांत त्यांना अगदीं पक्कें स्थान द्या अशी जर्मनींत सर्व बाजूंनीं ओरड होऊन ती फ्रँकफोर्टपर्यंत येऊन ठेपली. ओरड करणारांस यश आलें. डायेट नें आपल्या हुकुमाची अंमलबजावणी करण्याचें काम सॅक्सनी व हॅनोव्हर यांस सांगितलें.

'पाण्याचा बांध काढिला असतां त्याचा प्रवाह जसा लांबवर जातो तीच गत एकदां सुरू केलेल्या भांडणाची होते.' या राजा सालोमन याच्या म्हणीची सत्यता यूरोपच्या सर्व इतिहासांत या प्रसंगीं जितकी प्रत्ययास आली तितकी पूर्वी कधींहि आली नव्हती. जरी 'डायेट'नें आपल्या हुकुमाची अंमलबजावणी करण्याचें काम उघड उघड सॅक्सनी व हॅनोव्हर यांच्यावर सोंपविलें होतें आणि जरी स्क्लेस्विग–होल्स्टीन ह्या दोन्ही 'डचीज' त्यांच्याच अधिपतींच्या स्वाधीन करून देऊन त्यांचा समावेश संस्थानसंघांत करावा हा एकच सर्वाभिप्रेत हेतु साधून घेण्याकरितां सॅक्सनी व हॅनोव्हर यांचीं सैन्यें होल्स्टीनमध्यें शिरलीं होतीं, तरी बिझमार्कनेंही 'डायेट'ची सर्वमान्य व अंशतः अंमलांत आलेली योजना हाणून पाडण्याचा निश्चय केला होता, इतकेंच नाहीं तर ह्या 'डचीज' मुख्यतः प्रशिअन सैन्याच्या शौर्यानें फक्त प्रशिआकरितां म्हणून जिंकाव्या व मग त्यांचा समावेश प्रशिआच्या राज्यांत करावा असा कपटव्यूह त्यानें रचिला होता.

बिझमार्क युद्धाचीं सूत्रें आपल्या हातांत घेतो.

त्याचा स्वभाव अत्यंत धीट असून त्याला पापपुण्याची क्षिति नसे. म्हणून धाडस, कपट व दडपेगिरी यांची शर्थ करून त्यानें आपलें कारस्थान पार पाडिलें. ऑस्ट्रिआला नजरबंदी करून फसविणें ही गोष्ट त्यानें प्रथमतः केली. ऑस्ट्रिआंत जर्मनांचा भरणा मोठा होता. परंतु निरनिराळ्या परराष्ट्रीय जातींचा भरणा त्याहिपेक्षां मोठा होता. हें लक्षांत घेऊन राजू या दृष्टीनें ऑस्ट्रिआच्या गरजा काय आहेत,

या गोष्टींचा व्यापक दृष्टीनें विचार करणारा मुत्सद्दी फेलिक्स स्कार्झेनबर्ग याच्या मरणानंतर आतांपर्यंत झालाच नव्हता. ज्या कालाची हकीकत चालली आहे, त्याकाळीं कौंट रेशबर्ग याच्यावर परराष्ट्रीय धोरणासंबंधीं ऑस्ट्रिअन राजाचा पूर्ण विश्वास होता. हा मुत्सद्दी राजकारणांत मेटार्निक याच्या मताचा होता. त्याला लोकतंत्राभिमानी लोकांच्या मतप्रसाराइतकी राज्यांत दुसरी कोणतीहि गोष्ट घातुक नाहीं असें वाटत असे. फ्रँकफोर्ट येथें बिझ्मार्क याचा कौंट रेशबर्ग याच्याशीं बराच परिचय झाला होता. बिझ्मार्कला त्याच्या स्वभाववाची पूर्ण ओळख झाली होती त्याचे दोष व त्याप्रमाणेंच त्याचे उत्तम गुण बिझ्मार्क यास चांगले माहीत झाले होते. मांजर जसें उंदराशीं लीला करितें, त्याप्रमाणें राजकारणांत बिझ्मार्कनें कौंट रेशबर्ग यास खेळविलें. स्क्लेस्विग व होल्स्टीन या दोन डचींचा समावेश जर्मन संस्थान–संघांत करावा ही लोकप्रिय मागणी मान्य केल्यास प्रजासत्तात्मक राज्यपद्धतीच्या अभिमानी लोकांच्या मतांना अत्यंत चेव येऊन तीं मतें सर्व जर्मनींत जिकडे तिकडे बोकाळतील, अशी बिझ्मार्कनें कौंट रेशबर्ग याची दृढ समजूत करून दिली. ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांची दोस्ती झाल्यामुळें युद्ध उत्पन्न झाल्यास ऑस्ट्रिआच्या ताब्यांतील मुलुखास धक्का लागणार नाहीं अशी हमी बिझ्मार्कनें घेतली. इतकें झाल्यावर ' डायेट ' सभेचा ठराव बेकायदेशीर अतएव निरुपयोगी आहे या आपल्या मतास पाठिंबा देण्यास बिझ्मार्कनें कौंट रेशबर्ग याचें मन सहज वळविलें. मग आपण ऑस्ट्रिआची व प्रशिआची फौज यांचा मिलाफ करून शिस्तीचे कैवारी म्हणून

'डचीज' मध्यें शिरूं व आह्मी 'बंड'चे आज्ञाधारी नसून दोन स्वतंत्र व दोस्त राष्ट्रांचे प्रतिनिधि आहोंत असें प्रजेस सांगूं या बिझमार्क याच्या सूचनेसहि अनुमति देण्यास कौंट रेशबर्ग तयार झाला.

ऑस्ट्रिआ डोळे मिटून बिझमार्कचा अनुयायी होतो.

बिझमाकनें ऑस्ट्रिआस तुम्ही आपल्या राज्याचा गुरुत्वमध्य बूडापेस्ट येथें न्या असें सांगितलें व त्यानें ऑस्ट्रिआच्या योजना निरंतर व उघडपणें विफल केल्या; असें असूनहि बिझमार्कनें जें उघड उघड आमिष ऑस्ट्रिआ पुढें ठेविलें त्याला ऑस्ट्रिआनें नि शंकपणें बळी पडावें आणि आपलें वर्तन आपल्या कुलक्रमागत शत्रूच्या पथ्यावर पडावें एवढ्याच हेतूनें लहान संस्थानांवर असलेलें आपलें वजन गमावण्यास ऑस्ट्रिआनें तयार व्हावें, हें सर्व अविश्वसनीय दिसतें 'बंड' सभेनें लोकच्छंदानुवर्ति वर्तन केल्यानें राज्यक्रांतीचीं द्वारें खुलीं होतील व १८४८ सालच्या भयंकर दिवसांची पुनरावृत्ति होईल असें बिझमार्क यानें अतिशयोक्तिप्रचुर काढलेलें चित्र कौंट रेशबर्ग यास खरें वाटून तो भयभीत झाला असें मानलें, तरच यावरील गूढ प्रश्नाचा उलगडा होतो. अगोदर परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतींत ऑस्ट्रिअन मुत्सदी फारसे प्रख्यात नाहींत. परंतु १८६३ सालच्या आरंभापासून ते १८६६ सालाच्या अंतापर्यंतच्या अवधींत ऑस्ट्रिअन मुत्सदीगिरीस अगदीं पार ओहोटी लागली होती, असें पुढील हकिकतविरून सहज ध्यानांत येईल. सन १८६६ सालीं ऑस्ट्रिआची मुत्सदीगिरी अगदीं बेवकूबपणाची तर होतीच. परंतु स्लेस्विग-होल्स्टीन प्रक-

रणाचा जो वणवा पेटला होता त्यांतून या दोन्ही 'डचीज' सोडविण्याचे श्रम ऑस्ट्रिआनें करावे व त्या अचूक प्रशिआनें गिळंकृत कराव्या अशा प्रकारच्या सूचनेस कौंट रेशबर्ग यानें अनुमति देऊन जी घोडचूक केली, तिचे भयंकर परिणाम लक्षांत घेतले असतां, ती चूक ऑस्ट्रिआच्या इतिहासांत अपूर्व होती. या सूचनेस कौंट रेशबर्ग वश झाला तेव्हांच जर्मनातील बाकीच्या सस्थानांचा ऑस्ट्रिआस असलेला आधार त्यानें गमाविला रेशबर्ग याच्या या कृतीचा दुसरा अति भयंकर परिणाम असा झाला कीं स्वार्थ साधण्याकरितां बिनदिक्कत पापाचरण करणाऱ्या बिझ्मार्कच्या अंतःकरणांत फार दिवस धुमसत असलेला द्वेषाग्नि त्याला ऑस्ट्रिआवर फेंकण्यास उत्तम संधि मिळाली. रेशबर्गनें 'बंड'शीं बेइमान होण्याचें नाकारिलें असतें तर ऑस्ट्रिआची परिस्थिति किती दुर्भेद्य झाली असती व त्याला केवढें उच्च पद प्राप्त झालें असतें आणि बिझ्माकच्या अंतस्थ हेतूंचें कसें पूर्ण आविष्करण झालें असतें हें आतां आपणांस समजणें सोपें आहे. परंतु ऑस्ट्रिआच्या दुर्दैवानें कौंट रेशबर्ग यास हे सर्व विचार त्यावेळीं मोहोरबद केलेल्या पुस्तकांत लिहून ठेविल्यासारखे होते.

बिझ्मार्क आपले बेत उघड करितो.

ऑस्ट्रिआचा सहकार असा गुप्तपणें मिळविल्यावर बिझ्मार्क पुढच्या तजविजीस लागला. त्यानें आतां तहांच्या पवित्रतेचा कैवारी म्हणून मिरविण्यास आरंभ केला. लंडनच्या तहांत क्रिश्चन हा डेन्मार्कचा राजा व 'डचीज'चा अधिपति आहे अस मान्य केलें होतें. प्रशिआ या तहान्वयें आपलें वर्तन ठेवणार असें बिझ्मार्कनें जाहीर

केलें. ह्या त्याच्या जाहीर म्हणण्यामुळें फसगत झालेल्या ऑस्ट्रिआ-शिवाय इतर सर्व जर्मन देश प्रशिआवर उलटून पडले. यावेळीं प्रशिआ-अथवा प्रशिआचा मंत्री असेंच म्हटलें पाहिजे-लोकांच्या मर्जीतून इतका उतरला कीं, त्याच्यावर लोकांची इतकी इतराजी पूर्वी कधींच झाली नव्हती. प्रशिअन जनता व जर्मन जनता यांचें म्हणणें तंतोतंत एकच पडलें. बर्लिन पार्लमेंटच्या लोकसभेनें 'डचीज' वर हल्ला करण्याकरितां मागितलेली पैशाची मदत साफ नाकारली. 'डायेट' सभेंतहि प्रशिआनें भुलविलेला ऑस्ट्रिआ खेरीज करून प्रशिआची कृति उचलून धरण्यास एक जणहि पुढें आला नाहीं. गेल्या नोव्हेंबरमध्यें ठरलेली राज्यव्यवस्था रद्द करावी असा निकराचा खलिता 'डायेट'नें राजा क्रिश्चन यास धाडावा व त्यानें तो मानला नाहीं तर आपण स्क्लेस्विगमध्यें शिरून तेथें तळ द्यावा अशी सूचना बिझ्मार्कनें केली व ती बहुतेक एकमतानें नापसंत झाली. नंतर बिझ्मार्कनें आपला सर्व डाव उघड पुढें केला. 'डायेट' कांहींहि करो मी आपलें म्हणणें तडीस नेणारच असा निश्चय त्यानें व्यक्त केला. नोव्हेंबरमध्यें ठरलेली राज्यव्यवस्था तुम्ही रद्द केलीच पाहिजे असा निर्वाणीचा खलिता बिझ्मार्कनें ऑस्ट्रिआचा रुकार घेऊन कोपेनहेगन येथें रवाना केला. किंग क्रिश्चन यानें तो मान्य केला. इतकें झाल्यावर प्रशिअन व ऑस्ट्रिअन सैन्य स्क्लेस्विगमध्यें शिरलें आणि डॅनिश युद्धाला आरंभ झाला. बिझ्मार्कनें कलहाग्नि पेटवून दिला होता. तो त्याचा हल्लींचा दोस्त जो आस्ट्रिआ त्याची जर्मनींतून हकालपट्टी होईपर्यंत शमणार नव्हता.

प्रकरण ६ वें.

स्क्लेस्विग-होल्स्टीनवर ऑस्ट्रो-प्रशिअन स्वारी व तिचे परिणाम.

प्रशिअन पार्लमेंटचा विरोध.

मागील भागांत सांगितल्या प्रमाणें प्रशिआचें परराष्ट्रीय धोरण बिझमार्क आपल्या मर्जीप्रमाणें चालवीत होता; तर इकडे राजा व फॉनरून यांनीं सैन्याच्या पुनर्घटनेची योजना प्रागतिकांच्या विरोधास न जुमानतां तशीच मोठ्या झपाट्यानें पुढें चालविली होती. बिझमार्कनें कायदेशीर म्हणून नवीनच एक क्लृप्ति लढविली होती व तिला राजानें आपली अनुमतिहि अगदीं उघडपणें दिला होती. या तिला अनुसरून राजा व उमरावांची सभा यांनीं मंजुरी दिलेले पण लोकांच्या सभेनें नाकारलेले कर बसवून, वसुली करण्याचें काम चालूच होतें. परंतु लोकांचें असमाधान फारच वाढत होतें. शहरांच्या शांततप्रधान भागांतून 'राज्यक्रांति' हा शब्द दांतओठ खाऊन उच्चारलेला कानीं पडत होता. प्रागतिक पक्षांतील पुढारलेल्या लोकांस, लष्करी शिपाई बहुतेक सामान्य लोकांपैकींच असल्यामुळें हवेंतच गोळ्या सोडतील, असें वाटत होतें. नवीन निवडणूक झाल्यावर पार्लमेंटची सभा ता. ९ नोव्हेंबर १८६३ रोजीं भरली होती त्या सभेंत वरच्या सारखे विचार व्यक्त करण्यांत आले. सरकारानें या पार्लमेंटांत आपलें मताधिक्य व्हावें म्हणून विशेष खटपट केली होती, परंतु लोकांच्या मनोवृत्ति इतक्या कोपल्या होत्या की, सरकारास

यश आलें नाहीं. ड्यूक ऑफ ऑगस्टनबर्ग याचे हक्क मान्य करून स्लेस्विग होल्स्टीन प्रश्नाचा निकाल लावावा असा विनंतिअर्ज राजाकडे करण्याचा ठराव पसंत करणें ही गोष्ट सभासदांनीं प्रथम केली. या अर्जांत आणखी असेंहि म्हटलें होतें कीं सुचविलेल्या मार्गाशिवाय दुसरा एखादा उपाय योजला तर दोन्ही ' डचीज 'च्या जुटीस धक्का बसून जर्मनींत यादवी माजेल. या ठरावाच्या विरुद्ध बिझमार्कनें भाषण केलें; परंतु व्यथ. अर्जाला उत्तर देतांना त्यांतील विनंति मान्य करण्याची टाळाटाळ करून १,२०,००,००० डॉलरचें, सरकारचें धोरण पार पाडण्यास, राजानें कर्ज मात्र मागितलें. सभा अत्यंत संतापून जाऊन तिनें कर्ज देण्याचें नाकारिलें. इतकेंच नाहीं तर अंदाजपत्रक, सैन्याच्या पुनर्घटनेचा मसुदा, छापखान्यांच्या मुसकटदाबीचा कायदा यांसहि पण अनुमति देण्याचें नाकारिलें. विरोधाची पर्वा न बाळगितां सरकारानें उमरावांच्या सभेकडून अंदाजपत्रक पसंत करून घेतलें व तारीख २५ जानेवारी रोजीं लोकसभा बरखास्त केली. सभाबरखास्तीच्या वेळच्या राजाच्या भाषणांत लोकसभेस सडकून नावें ठेविलीं होतीं. हें भाषण बिझमार्कनें लिहून काढलें होतें व त्यानेंच तें वाचून दाखविलें त्याच्या मतें सभेनें खऱ्या देशाभिमानाविरुद्ध घोर पातक केलें होतें त्याचें हें म्हणणें पुष्कळ अंशीं खरें होतें. कारण प्रशिआला गतवैभव परत मळविण्यास राजा व युद्धमंत्री यांनीं ठरविलेल्या नमुन्याबरहुकुम तयार केलेल्या सैन्याची अत्यंत जरूरी होती, ही गोष्ट प्रशिअन प्रजेच्या चांगली ध्यानांत आली नव्हती. पुढें सात दिवसांनीं ऑस्ट्रिअन व प्रशिअन

सैन्य स्क्लेस्विगमध्यें शिरलें व त्याचा तळ एकेनफोर्ड येथें पडला. दुसऱ्याच दिवशीं सैन्यांनीं डेनवर्कवर हल्ला चढविला. डेनवर्क ही जुन्या तटबंदीची फार जाड भिंत असून तिची उंची ३०–४० फूट आहे. ही तटबंदी उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्र यांच्या दरम्यान असून डचीच्या दक्षिण सरहद्दीच्या बाजूनें इचा विस्तार जवळ जवळ १० मैल आहे. या तटबंदीवर हल्ला चढविला त्यांत एक गोष्ट घडली, तिच्यामुळें ऑस्ट्रिअन लोकांच्या मनांत विशेष आत्मविश्वास आला आणि प्राशिअन सैनिक विशेषसे कार्यक्षम नाहींत असें जें मत पसरलें, तें १८६६ पर्यंत कायम राहिलें.

डॅनिश युद्ध.

या डेनबर्कच्या अगदीं डाव्या बाजूकडील टोंक मिसंडी या शहराला येऊन भिडलें आहे. बाल्टिक समुद्राच्या अरुंद फांट्याला स्क्ली नदी म्हणतात. त्या नदीवर हें शहर आहे. फ्रीहर फॉन गॅब्लेंझ हा एक हुशार सेनानी असून त्यानें रॅडेट्झको याच्या हाताखालीं काम केलें होतें. गॅब्लेंझ यानें ऑस्ट्रिअन सैन्य घेऊन मध्यावर हल्ला करावा व राजाचा चुलत भाऊ प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स–हा रेड (रक्तवर्ण) या नांवानें प्रसिद्ध होता–यानें प्राशिअन सैन्य घेऊन मिसंडी येथें डाव्या बाजूवर हल्ला करावा अशी व्यवस्था ठरली होती, त्याप्रमाणें हल्ले चढविले. प्राशिअन सैन्यांतील प्रत्येक सैनिकास ' नीड्ल्–गन ' दिलेली होती तरी रेड प्रिन्स यास मागें हटावें लागलें. गॅब्लेंझ मध्यावर केलेल्या हल्ल्यांत विजयी होऊन आपलें सैन्य संरक्षण करणारांच्या

म्हणजे प्रतिपक्षाच्या संमुख आणीपर्यंत फ्रेडरिक चार्ल्स यास आंत प्रवेश करितां आला नाहीं. मोठ्या सैन्य जमावाबरोबर टिकाव धरितां येईना म्हणून डेन्स, डयूपेल येथें माघारे गेले. मुख्य किनारा व अल्सेन बेट यांच्यामध्यें जी अरुद खाडी आहे त्या खाडीवर डयूपेल हें तटबंदी असलेलें खेडेंगांव आहे. प्रशिअन सैन्य, फ्रेन्सबर्ग नांवाच्या ओढ्याच्या पश्चिम टोंकास, फ्रेन्सबर्ग येथें डयूपेल येथील हालचालीवर नजर ठेवण्यास तळ देऊन बसलें असतां उत्तरेकडे कूच करून जाऊन गॅब्लेंझ यानें ता. ६ फेब्रुवारी रोजीं स्क्लेस्विग शहरीं तळ दिला. डॅनिश पिछाडीच्या रक्षकांना गांठून इव्हर्सी येथें पुष्कळ रक्तस्राव झाल्यावर त्यांचा पराभव केला व ता. ८ मार्च रोजीं तो जटलंडमध्यें शिरला. पुढें एका महिन्यानें फ्रेडरिक चार्ल्स त्याला येऊन मिळेपर्यंत गॅब्लेंझ जट्लंड येथेंच राहिला.

फ्रेडरिक चार्ल्स याला गॅब्लेंझपेक्षां जास्त अडचणींस तोंड देऊन आपला मार्ग काढावा लागला. डयूपेल हें तटबंदीचें गांव निसर्गानेंच बळकट स्थळीं होतें व कृत्रिम उपायांनीं ह्या स्थळाला जास्तच बळकटी आणली होती. त्याच्या पुढच्या बाजूचीं बांधकामें तीन हजार मिटर इतक्या क्षेत्रावर पसरलेलीं होतीं व त्यांची मजबुती अगदीं अलीकडच्या साधनांनीं व पद्धतीनें केली होती. हीं कामें पठारावर बांधलीं असल्यामुळें त्यावरून पुढील प्रदेशावर चांगली दृष्टि ठेवून मारा करितां येत असे. या स्थळाच्या बाजू समुद्राला जाऊन भिडल्या होत्या व त्यामुळें एका बाजूचें रक्षण डॅनिश आरमा-

रानें व दुसऱ्या बाजूचें रक्षण अल्सेन येथील तोफखान्यानें होत असे. ह्या जागेसमोर फ्रेडरिक चार्ल्स ता. ११ फेब्रुवारी रोजीं आला. पुष्कळ चकमकी झाल्यावर ता. १६ मार्च रोजीं त्यानें तोफा सुरू करून त्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं तोफांचा भडिमार चालूं ठेवला. परंतु इच्छित फळ न आल्यामुळें ता. २९ रोजीं त्यानें चक्र वेढ्यास सुरुवात केली ता १७ एप्रिल रोजीं त्याच्या एंजिनिअरांनीं तटबंदींतील भगदाडें उपयोगांत आणण्यासारखीं झालीं आहेत अशी बातमी दिली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यानें सैन्य घेऊन हल्ला चढविला व थोड्याच वेळांत तें स्थळ काबीज केलें. तटबंदींतील लष्करी अल्सेन येथें माघारी गेलें. खाडी अत्यंत अरुंद असल्यामुळें आणि अल्सेनचें रक्षण करणारा तोफखाना सन्मुख असल्यामुळें निघून गेलेल्या लष्कराचा पाठलाग फ्रेडरिक चार्ल्स यास करितां आला नाहीं, म्हणून पुढें जाऊन जट्लंड येथें ऑस्टिअन सैन्याला मिळणेंच बरें असें त्यास वाटलें. या संयुक्त सैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून डेन लोकांनीं जटलंड प्रांत सोडून दिला (२९ एप्रिल). दोस्तांनीं उत्तर समुद्र व कॅटेगॅट यांचा दरम्यानचा व लॅफोर्डपर्यंतचा मुख्य भूभाग ताब्यांत घेतला.

प्रत्यक्ष लढाईच्या प्रसंगाचाच विचार केला तर आतां डॅनिश युद्ध संपलें. ज्या तहनाम्यावर केवळ ११ वर्षांपूर्वीच सर्व मोठ्या राष्ट्रांनीं सह्या केल्या त्या तहनाम्याची अशी हेटाळणी चालली असतां यूरोप हात पाय जोडून स्वस्थ मौज पाहात बसला होता. या तहना-

म्यांत स्लेस्विग व होल्स्टीन सुद्धां सर्व डॅनिश स्थळें ग्लॅसबर्ग घराण्याकडे चालू राहातील अशी हमी दिली होती. (ड्यूक ऑफ ऑगस्टेनबर्ग यानें पैशाच्या रूपानें मोबदला घेऊन आपले हक्क सोडून दिले होते) या तहनाम्यावर सह्या करणाऱ्या पैकीं दोन राष्ट्रांनीं पुढें होऊन हा तह प्रथम मोडला हें खरें आहे. बाकी राहिलेल्या तीन राष्ट्रांपैकीं प्रशिआचें धोरण उचलून धरण्यास रशिआ वचनबद्ध झाला होता तथापि इंग्लंड आणि फ्रान्स यांनीं असें वतन कां केलें. याचा खुलासा करणें जरूर आहे.

फ्रान्स कां स्वस्थ बसला ?

यूरोपांत या मोठ्या महत्त्वाच्या प्रश्नावर रण माजलें असतां पाश्चात्य राष्ट्रें स्वस्थ बसलीं, याबद्दल पुढील दोन कारणें देण्याची पद्धत पडून गेली आहे:—(१) इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें परस्परांविषयीं औदासिन्य वाढत चाललें होतें; (२) सन १८६३ सालीं पॅरिस शहरीं सभा भरणार होती. त्या सभेला फ्रान्सच्या बादशाहान इंग्लंडास आमंत्रण दिलें असतां इंग्लंडनें अनादर केला; आणि म्हणून डेन्मार्कच्या संबधाच्या सूचना फ्रान्सनें नाकारिल्या. या सूचनांचा स्वीकार झाला असता तर डेन्मार्कचा बचाव झाला असता. परंतु तिसऱ्या नेपोलिअननें इंग्लंडबरोबर सहकार करण्याचें नाकारिलें. याच्या मुळाशीं असलेलीं कारणें वरच्यापेक्षां अगदीं भिन्न रूपाचीं होतीं. ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यामध्यें वाढत जाणारा गैरविश्वास उत्तरोत्तर वृद्धिंगत होईल अशी खटपट नेपोलिअननें जितकी केली तितकी इतर कोणींहि केली नाहीं. इटलीला सॅव्हाय व नाइस सोडून देण्यास भाग पाडल्या-

पासून अशाच प्रकारचा डाव या दोन जर्मन राष्ट्रांबरोबर खेळावयाचा, अशी त्याची प्रबल इच्छा होती. ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांचें परस्पर भांडण लावून देणें, सर्व प्रकारें तीं दोन राष्ट्रें हळूहळू क्षीण होत चाललेलीं पाहणें व मग आपणच मध्यस्थी करून आपल्या श्रमाचा मोबदला म्हणून ऱ्हाइन सरहद्द मिळविणें, अथवा बेल्जम खालसा करण्यास परवानगी मिळविणें या गोष्टी कसेंही करून घडवून आणण्याचा निश्चय त्यानें केला होता. हे मनोरथ अगदीं हृदयाशीं बाळगून ठेवून त्यानें आपलें परराष्ट्रीय धोरण असें ठेविलें कीं, ते मनोरथ भग्न होतील. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ऑस्ट्रिआला आपलें नुकसान करून युद्धांत पडणें अवश्य होईल अशा एकामागून एक मसलती करण्यास बिस्मार्कनें आरंभ केला होता. अशा वेळीं मेक्सिको प्रकरण उपस्थित करण्याचें नेपोलिअननें धाडस केलें, हा त्याचा शुद्ध वेडेपणा होता. सन १८१२ सालीं कांहीं झालें तरी स्पेन सोडावयाचा नाहीं असा त्याच्या चुलत्यानें हट्ट धरून जो वेडेपणा केला त्याचीच एक उपमा या वेडेपणाला साजण्यासारखी आहे नेपोलिअनाच्या या कृतीचा परिणाम असा झाला कीं, जो काल यावा म्हणून त्याला मोठी आशा होती व तो मसलती करीत होता, तो काल प्राप्त झाला तेव्हां त्यापासून आपलें हित साधून घेण्याचीं साधनें त्याच्या हाताशीं राहिलीं नाहींत.

तर मग सन १८६४ सालीं नेपोलिअननें इंग्लंडच्या म्हणण्यास होकार भरला नाहीं त्याचें कारण असें होतें कीं, ऑस्ट्रिआला त्याच्या उच्च स्थानापासून भ्रष्ट करावें हा जो बिस्मार्क याचा खरा हेतु

त्याच्याशीं नेपोलिअनची सहानुभूति होती. डेन्मार्कचें काय होईल याबद्दल त्याला मुळींच फिकीर नव्हती; जर्मनींमध्यें यादवी माजावी अशी मात्र त्याची उत्कट इच्छा होती. इंग्लंडास पाठविलेलें त्याचें उत्तर त्यानें विचारपूर्वक चालविलेल्या धोरणास अगदीं अनुरूप असेंच होतें. इंग्लंडवर त्याचा रुसवा झाला होता या गोष्टीचा त्याच्याशीं बिलकुल संबंध नव्हता. त्यानें आपल्या पैसा उभारण्याच्या साधनांची बेताबातानें व्यवस्था करून आपलें धोरण पैशाचा योग्य पुरवठा करून जर चालू ठेविलें असतें, तर तें धोरण फ्रान्सला फार हितावह झालें असतें. मुत्सद्दीगिरीच्या अभावामुळें पैशाचा तुटवडा पडला व त्याचें हुशारीचें धोरण कोयत्यानें वाळू कापण्याच्या प्रयत्ना प्रमाणें निष्फळ झालें.

इंग्लंडच्यासंबंधानें इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, वृद्ध लॉर्ड पामर्स्टन व वयोवृद्ध लॉर्ड रसेल यांच्या सल्लयाला अनुसरून चाललेलें इंग्लंडचें धोरण म्हणजे नुसता शब्दांचा खेळ होता वापरलेले शब्द कितीहि धिटाईचे असले तरी त्या शब्दांमागून अनुरूप अशी कृती होईल असा त्या शब्दांचा मुळींच अर्थ नव्हता. "लॉर्ड रसेल याचे खलिते व रद्दी कागद यांची किंमत मी सारखीच समजतों" असें एकदां फ्रँकफोर्ट येथील बव्हेरिअन प्रतिनिधि बॅरन फॉनडर फार्डटेन हा इंग्लिश वकील सर अॅलेक्झँडर मॅलेट यास म्हणाला.

वादग्रस्त प्रांत सोडून दिले

तटस्थ राष्ट्रें या भांडणांत प्रत्यक्ष पडलीं नाहींत तरी त्यांनीं राष्ट्रीय प्रतिनिधींच्या मध्यस्थीनें मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला.

डयूपेल तोफांच्या भडिमारानें पडल्यावर दोन दिवसांनीं लंडन येथें ता. २० एप्रिल रोजीं एक सभा भरली. तीन आठवडे वाटाघाट झाल्यावर लढणारांचीं मनें सभेनें तात्पुरता तह स्वीकारण्याबद्दल वळविलीं. ह्या वेळीं स्क्लेस्विग, होल्स्टीन आणि जटलंड हीं स्थळें दोस्तांच्या हातीं गेलीं होतीं. डेन्मार्क हतवीर्य झाला होता. सभेंत इंग्लिश व फ्रेंच प्रतिनिधि यांच्या मुखांतून जे उद्गार निघाले त्यांनीं डेन्मार्कचा गैरसमज झाला, व डेन्मार्कनें होल्स्टीन सोडून द्यावें म्हणजे डेन्मार्ककडे स्क्लेस्विगचा उत्तर भाग राहील ही सूचना डेन्मार्कनें नाकारिली, म्हणून युद्धास पुनः सुरुवात झाली (२६ जून). युद्धाचा शेवट सर्वांस वाटत होतें तसाच झाला. दोस्तांनीं अल्सेन तोफांच्या भडिमारानें स्वाधीन करून घेतलें, डेन्स लोकांना मुख्य भूमीच्या उत्तरेच्या टोंकाकडे घालवून दिलें व अखेरीस मे महिन्यामध्यें त्यांनीं ज्या अटी नाकारल्या होत्या त्यांच्यापेक्षां फारच जबर अशा शर्तीं त्यांना पतकाराव्या लागल्या. ता. १८ जुलाई रोजीं तात्पुरता तह मान्य झाला. ता. ३० ऑक्टोबर रोजीं कायमच्या तहनाम्यावर सह्या झाल्या. ह्या तहान्वयें होल्स्टीन, स्क्लेस्विग आणि लॉनबग दोस्तांस मिळालीं. लढाईच्या खर्चाबद्दल बरीच मोठी रक्कम देण्याचें डेन्मार्कनें कबूल केलें.

बिस्मार्क याचे बेत.

युद्धांत विजय मिळाल्यावर जेत्यांमध्यें लुटीच्या वांटणीचा प्रश्न पुढें येतो. स्वारी करणाऱ्या राष्ट्रांनीं डेन्मार्कमध्यें प्रवेश करण्या-

पूर्वी जिंकावयाच्या प्रांतांची वांटणी कशी करावयाची याबद्दल नक्की असें कांहींच ठरविलें नव्हतें. राष्ट्रांनीं परस्परांच्या समजुतीनें डचीजची भावी व्यवस्था लावावयाची एवढेंच कायतें ठरलें होतें. ही परस्परांची समजूत म्हणजे काय हें ठरविण्याचा समय आतां आला होता. कारण बिझमार्कचा अंतस्थ व पूर्ण हेतु परस्परांच्या समजुतीनें घ्यावयाचें असा नसून ' परस्परांत असा गैरसमज उत्पन्न करावयाचा कीं पाहिजे त्यावेळीं ऑस्ट्रिआनें कलहास आरंभ केला तर त्याचा दोष सर्वस्वी ऑस्ट्रिआच्या माथीं आहे ' असें बिझमार्क यास म्हणतां यावें.

डचीज डेन्मार्कपासून काढून घेऊन प्रशिआच्या ताब्यांत द्यावा असा बिझमार्कचा दृढ निश्चय होता. प्रशिआला जें जें पाहिजे होतें तें सर्व या डचीजमधून मिळणार होतें:—कीलचें सुंदर बंदर मिळून द्वीपकल्पाच्या अरुंद पट्टींत कालवा खणून उत्तर व बाल्टिक समुद्र जोडून घेतां घेणार होता व कालव्यामुळें सरहद्दीचें संरक्षण करणें सुगम होणार होतें. असा सोईवार प्रांत आत्मसात् करून घेणें इतकें महत्त्वाचें होतें कीं, असत्य भाषण व कपटाचरण हीं एखाद्या उलट्या काळजाच्या माणसास न्याय्य वाटलीं असतीं इतकेंच नाहीं तर असें करण्यांतच खरा देशाभिमान आहे अशीहि त्याची समजूत झाली असती. डेन्स लोकांची हकालपट्टी करण्याच्या कामीं ऑस्ट्रिआनें त्याच्याबरोबर सहकार केला इतकी भुरळ त्याला ऑस्ट्रिआस घालतां आली. ही त्यानें कारस्थानाची एक अजब चीजच करून दाखविली यांत शंका नाहीं. परंतु त्यानें जो महाव्यूह

रचला होता त्याचें हें केवळ उपांग होतें. लुटीची वांटणी करण्याची वेळ आली म्हणजे ऑस्ट्रिआचे डोळे उघडतील. परंतु सुव्यवस्थित व दुर्धर शस्त्रांनीं सज्ज अशा मोठ्या सैन्याच्या साहाय्यानें ऑस्ट्रिआ बरोबर कुरापत सहज काढितां येईल हें त्यास ठाऊक होतें या कुरापतीच्या निकालानें एक, जर्मनींत प्रशिआला अग्रेसरत्व तरी मिळेल किंवा सन १८०१–७ सालीं यूरोपांत उठलेल्या प्रबल वावटळीनें पडलेल्या अति खोल खड्यापेक्षां जास्त भयंकर खड्यांत प्रशिआ गाडला तरी जाईल हेंहि तो जाणून होता.

बिझ्मार्कचें धोरण हें असें होतें. हें धोरण साहसाचें होतें. फल पक्व होऊन हातांत पडेपर्यंत ऑस्ट्रिआची जाणूनबुजून फसवणूक करण्यानेंच बिझ्मार्कला यश येणार होतें. या धोरणाला–योग्य वेळीं जबरदस्तीचें पाटबळ याला मिळावयाचें–कपट व असत्यता यांचें धोरण असें म्हटलें आहे तें अगदीं बरोबर आहे. याची रचना दोन निराळ्या पायावर झाली होती:–ऑस्ट्रिआची वंचना व दुर्धर्ष अशा सैन्याची कडेकोट तयारी.

या धाडसी धोरणाचा पुरस्कार करण्याच्या कामीं पुढील चार पांच महत्त्वाच्या गोष्टींनीं बिझ्मार्क यास मोठें प्रोत्साहन मिळालें. रशिआची सहानुभूति त्यास मिळावयाची यांत काडीमात्र शंका नव्हती. हॅब्स्बुग घराण्यांतील राजांचें अंधत्वाचें वर्तन व त्यांचा गर्व ह्या गर्वाचें प्रदर्शन ते राजे नेहमीं अयोग्य वेळीं करीत व त्या पासून राष्ट्राचें अनहित होत असे. यांचा योग्य उपयोग करून घेतां येईल

20 APR 1990

असा बिझमार्कला पूर्ण विश्वास होता. फ्रान्सच्या बादशाहाची गुप्त सहानुभूति व त्याची तटस्थ वृत्ति यांचेंहि साहाय्य आपणास पूर्ण होणार अशी बिझमार्कला पक्की खात्री होती. फ्रान्सच्या बादशाहाला वाटे कीं, प्रशिआ व ऑस्ट्रिआ यांची झटापट फार दिवस चालून ते अगदीं टेंकीस येतील व अखेरीस प्रशिआचें अत्यंत नुकसान होईल. अशा वेळीं सशस्त्र मध्यस्थाचें काम आपण करूं व आपल्या खटपटीचा वांटा म्हणून आपण ऱ्हाइन नदीची सरहद्द हक्कानें घेऊं. परंतु त्याच्याहि हातावर बिझमार्कनें तुरी दिल्याच कारण फ्रान्सचा बादशाहा व बिझमार्क यांच्या वर्तनांत असा फरक होता कीं, बिझमार्क कारस्थानें करीत असतांनाच शस्त्रास्त्रादि सर्व साधनांची तयारी करीत असे व बादशाहा मसलती करी, परंतु साधनांची सज्जता ठेवण्याची काळजी घेत नसे.

बिझमार्क नेहमींप्रमाणें मायावीपणा व धाष्टर्य यांचा अंगीकार करून आपले बेत सिद्धीस नेण्याच्या कामाला लागला. लुटीची विभागणी कशी करावी हाच प्रश्न प्रथम विचारांत निघाला. या बाबतींत दोन्हीहि राष्ट्रांना युद्धारंभाच्या पूर्वी स्पष्ट अशी कांहींच कल्पना नव्हती. आपल्या दोस्ताला आपले हेतु क्रमाक्रमानें व युक्तीनें समजावून देणें बिझमार्क याला प्राप्त होतें. तदनुसार जित मुलुखाचा ताबा घेण्याचें काम पुढें दिल्याप्रमाणें करण्याचें ठरलें:—पायदळाच्या पांच पलटणी, घोडेस्वारांच्या दोन पलटणी, तोफांची (आठ) एक तुकडी एवढ्या ऑस्ट्रिअन सैन्यानें होल्स्टीनमध्यें तळ दिला; आणि

पायदळाच्या अठरा पलटणी, घोडेस्वारांच्या अठरा पलटणी, तोफांच्या तीन तुकड्या एवढ्या प्रशिअन सैन्यानें स्क्लेस्विगचा ताबा घेतला. कांहीं विवक्षित व आवश्यक शर्तींना डयूक ऑफ ऑगस्टेनबर्ग याची संमति मिळेपर्यंतच हें दोस्तांचें ठाणें होल्स्टीन व स्क्लेस्विग येथें राहणार होतें अशी ऑस्ट्रिआची समजूत झाली. कारण ह्या राजाचे हक्क लंडन येथें नुकत्या झालेल्या समेंत सर्व राष्ट्रांनीं कबूल केले होते. यांत प्रशिआचा प्रतिनिधीहि हजर होताच.

बिझमार्क स्वतःच्या योजनेस मूर्तस्वरूप देतो.

परंतु डयूक ऑफ ऑगस्टेनबर्ग यास डचीज परत करणें हें बिस्मार्कच्या धोरणांत मुळींच कलम नव्हतें. म्हणून त्यानें बर्लिनच्या सरकारी कायदेपंडिताचें मत मागितलें. त्याच्या मतानें किंग क्रिश्चनचे हक्क कायदेशीर होते. याच्यापासून त्यानें हीं स्थळें नुकतींच हिरावून घेतलीं होतीं व डयूक ऑफ ऑगस्टेनबर्ग यास स्क्लेस्विग–होल्स्टीन-वर कोणत्याहि प्रकारें हक्क सांगतां येत नव्हता. आपल्या धोरणाची ही दिशा ऑस्ट्रिआस कळावी म्हणून डयूक ऑफ ऑगस्टेनबर्गचा हक्क ज्या शर्तीवर प्रशिआ मान्य करण्यास तयार होता त्या शर्ती व्हिएन्ना येथें त्यानें १८६५ फेब्रुवारी ता. २२ रोजीं कळविल्या. त्या शर्ती अशा होत्याः–वसूलमहसूली, टपाल, रेल्वे हीं सर्व खातीं प्रशिआच्या अनुक्रमें त्याच खात्यांत पूर्णपणें सामील करावीं; प्रशिअन कायदा, लष्करांत अवश्य नोकरी करण्याचा सुद्धां सुरू करावा; लष्करानें राजनिष्ठेची शपथ प्रशिअन राजासंबंधीं घ्यावी; छावणीस

योग्य अशीं स्थळें प्रशिआच्या ताब्यांत असावीं. या शर्तींवरून डचीज प्रशिआच्या ताब्यांत देण्याकरितां घेतल्या होत्या हा बिस्मार्कचा निश्चय गुप्त न राहतां उघडच झाला. त्या शर्तींचा परिणाम डयूकची स्थिति केवळ बाहुल्यासारखी करणें व नांवाखेरीज डचीजना सर्व प्रकारें प्रशिआंत सामील करणें हाच झाला असता. या शर्ती बाहेर पडल्यावर सर्व बाजूंनीं मोठा गिल्ला उसळला, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ऑस्ट्रिआनें त्या अमान्य केल्या, डयूकनें तर त्यांकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं, स्क्लेस्विग–होल्स्टीन येथील बहुतेक सर्व लोकांनीं त्यांचा जोरानें निषेध केला. बिस्मार्कचें खरें धोरण आतां ऑस्ट्रिआच्या अंशतः ध्यानांत येऊन ऑस्ट्रिआनें दोन्हीं डचीजचें स्वातंत्र्य पुनः स्थापित करावें अशी पद्धतशीर मागणी केली. डचीज व प्रशिआ यांच्यांतील पुढील संबंध संयुक्त संस्थानसंघाच्या नियमान्वयें नियमित करण्यांत यावेत असा ऑस्ट्रिआनें आपला अभिप्राय दिला. बव्हेरिआ, सॅक्सनी आणि हेसी यांच्या सूचनेवरून डायेट सभेनेंहि प्रस्तुत प्रश्नाचा अखेर निकाल लागेपर्यंत होल्स्टीन, डयूक ऑफ ऑगस्टेनबर्ग याच्या ताब्यांत द्यावें असा ठराव केला.

आपली युद्धाची पूर्ण तयारी होण्याच्या अगोदरच प्रशिआच्या हक्काची आपण जी मांडणी केली आहे तिच्या विरुद्ध सर्व जर्मनीचा वारा वाहतो आहे, ही गोष्ट बिस्मार्क याच्या नजरेस आली. म्हणून त्यानें या वाहत्या वाऱ्यास पाठ देणें जरूर आहे असें ठरविलें. थोडा पत्रव्यवहार झाल्यावर त्यानें गॅस्टीन येथें ऑस्ट्रिअन मंत्री कौंट ब्लोम

याची भेट घेतली; आणि १८६५ ऑगस्ट ता. १४ रोजीं गॅस्टीन येथें ठरलेल्या तहनाम्यावर कौंट ब्लोम व बिझ्मार्क यांनीं सह्या केल्या. या तहान्वयें होल्स्टीन ऑस्ट्रिआच्या व स्लेस्विग प्रशिआच्या ताब्यांत गेले यापासून 'दोन्ही राष्ट्रांच्या दोन्ही डचीजवरील हक्कांना कोणताहि बाध येत नाहीं' असें या तहनाम्यांत म्हटलें होतें. दुसऱ्या कलमामध्यें जर्मन आरमार स्थापन करण्याजी तजवीज केली असून संयुक्त संस्थानसंघाचें बंदर कील हेंच ठरलें होतें. यांतील शर्ती अशा होत्या कीं, सर्व ताबा प्रशिआकडेच रहावा तिसऱ्या कलमाप्रमाणें रेंटसबर्ग हा संघाचा किल्ला ठरून त्यावरील शिबंदी पाळीनें ऑस्ट्रिअन व प्रशिअन असावी असें ठरलें होतें. चौथ्या कलमाप्रमाणें पहिल्या कलमांत म्हटल्याप्रमाणें विभागणी होईपर्यंत, लुबेक ते कील व हॅम्बर्ग ते रेंट्सबर्ग ह्या दोन होल्स्टीन मधून जाणाऱ्या लष्करी रस्त्यांवर प्रशिआचा ताबा असावा असें होतें. पांचव्या कलमांत पुढील हक्क प्रशिआस दिले होते:—कील व रेंट्सबर्ग यांच्या दरम्यान् तारायंत्र उभारणें व त्याचा उपयोग करणें, होल्स्टीन मधून दोन्ही रेल्वेच्या मार्गानें प्रशिआच्या टपालगाड्या त्यांच्या नोकरासह जाऊं देणें, प्रशिआचा लुबेक ते कील हा रेल्वे-रस्ता होल्स्टीन प्रदेशांतून जाऊं देणें; सहाव्या कलमाप्रमाणें दोन्ही डचींचा समावेश झाल्व्हेरीनमध्यें व्हावयाचा होता; सातव्या कलमाप्रमाणें योजिलेल्या उत्तरसमुद्राचा कालवा होल्स्टीनच्या भागांतून नेण्याचें काम फक्त प्रशिआच्या देखरेखी खालींच करण्याच्या हक्क प्रशिआस देण्यांत आला होता व याच कलमान्वयें लॉएनबर्ग डचीला

युद्धाच्या खर्चाला हातभार लावण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. आठव्या कलमानें लॉएनबर्ग डची प्रशिआला द्यावी व प्रशिआनें त्याबद्दल ऑस्ट्रिआला मोबदला म्हणून २५,००,००० डॅनिश रिक्स डॉलर तह कायम झाल्यापासून चार आठवड्यांच्या आंत द्यावे. दहाव्या कलमांत प्रस्तुत तह मुकर झाल्यावर होईल तितकी जलदी करून पहिल्या कलमांत म्हटल्याप्रमाणें संयुक्त राजाधिकाराची विभागणी होऊन त्याप्रमाणें अंमलबजावणी व्हावी असें म्हटलें होतें हें सर्व दोन्ही राजांनीं उशिरांत उशिरां म्हणजे ता. १५ सेप्टेंबरपर्यंत करावयाचें होतें.

बिझमार्क आपल्या धन्यास चकावितो.

ह्या तहाचा मथितार्थ एवढाच आहे कीं स्क्लेस्विग व लॉएनबर्गहीं स्थळें प्रशिआच्या अंमलाखालीं बिनशर्त आलीं ब होल्स्टीनच्या कारभारांत कांहींतरी सबब काढून हात घालण्याचा अधिकार प्रशिआस मिळाला. ता. २० ऑगस्ट रोजीं ऑस्ट्रिआचा बादशाहा आपला चुलता प्रशिआचा राजा यास तह मुकर करण्याकरितां साल्झबर्ग येथें भेटला व तेथें तहनाम्यावर सह्या होऊन मोर्तबहि झालें. दोन्ही राजांनीं युद्धांतःकरणानें सह्या केल्या होत्या. प्रशिआच्या राजाला तहांतील शर्ती प्रशिआला फारच अनुकूल आहेत असें वाटलें. ऑस्ट्रिआच्या बादशाहाला वाटलें कीं कौंट रेशबर्ग यानें बिझमार्कचें घोरण लक्षांत न आल्यामुळें आपणास ज्या जाळ्यांत गोंवून टाकलें होतें त्यांतून बऱ्याच चांगल्या रीतीनें आपली सुटका झाली. यावेळीं व या वेळे-

पासून पुढें प्रशिआचा राजा व त्याचा मंत्री यांचा परस्परावर पूर्ण विश्वास नसे. बिझमार्क यानें जर आपलें अंतःकरण राजाला उघडें करून दाखविलें असतें व 'तुमच्या पुतण्याला फसविणें, योग्य वेळीं त्याला जमीनदोस्त करणें आणि युद्धाची तयारी पूर्ण होईपर्यंतच (या वेळीं बहुतेक तयारी झालीच होती) त्याला खुष ठेवणें जरूर आहे' असें जर बिझमार्क यानें राजास कळविलें असतें, तर राजा सरळ अंतःकरणाचा असल्यामुळें बिझमार्कपासून दचकून तेव्हांच दूर झाला असता. हा तह ऑस्ट्रिआला फारच घातुक होता. गोष्टी एवढ्या वरच थांबत्या. तर या दोन राष्ट्रांमध्यें एकसारखी धुसपुस चालून गैर-समजहि फार वाढला असता. परंतु गोष्टी येथवरच थांबल्या नव्हत्या. ऑस्ट्रिआला जर्मनींतील त्याच्या उच्च पदावरून खालीं ओढण्याच्या कामीं व त्याचें वजन पार नाहींसें करण्याच्या कामीं एक चांगलें साधन म्हणून या तहाचा उपयोग करण्यांत येणार होता.

बिझमार्क व इटली.

आपण आपल्या कारस्थानाचा वार इतका उत्तम भरला आहे कीं, तो केव्हांहि चुकविला तरी भडका खास होईल अशी बिझमार्क यास खात्री वाटत होती. म्हणून तो गॅस्टीन येथील तह मुकर झाल्या बरोबर बिआरिट्झ येथें त्वरेनें गेला. तेथें जाऊन फ्रेंच बादशाहापाशीं पुढील विनंति त्यानें केली:—(१) इटली बरोबर सक्रिय दोस्ती मी करणार आहे, त्याला आपली परवानगी असावी व (२) मी जें युद्ध उपस्थित करणार आहे त्या संबंधांत आपण पूर्ण तटस्थ वृत्ति बाळगावी

इटॅलिअन सरकारला दोन गोष्टींचा अगदीं ध्यास लागून राहिला होता. रोम व त्याचप्रमाणें व्हेनेशिआ सोडवून घेणें. रोम तिसऱ्या नेपोलिअनच्या हातांत होतें व त्याचें सैन्य त्या शहरांत तळ देऊन बसलें होतें; व्हेनेशिआ सर्वस्वी ऑस्ट्रिआच्या स्वाधीन होता. बिझमार्क यानें असा युक्तिवाद केला:—व्हेनेशिअन प्रांत परत मिळविण्याची इटॅलिअन लोकांची इतकी उत्कट इच्छा होती कीं, मनगटाच्या जोरावर तो प्रांत परत मिळवावा म्हणून इटली ऑस्ट्रिआवर चढाई करण्याच्या हेतूनें प्रशिआबरोबर दोस्ती करण्यास तयार होईल. नेपोलिअनच्या अनुमतीशिवाय इटली या बाबतींत पाऊल टाकण्यास तयार होणार नाहीं हें बिझमार्क जाणून होता. तो रुकार मिळाला, व प्रशिआ आणि इटली यांची दोस्ती झाली तर ऑस्ट्रिआच्या सैन्याचे दोन भाग होऊन एक भाग इटलींत ठेवणें ऑस्ट्रिआला प्राप्त होईल. त्यानें मोठ्या सावधगिरीनें या संबंधीं इटली जवळ बोलणें काढलें होतें; पण त्याचा अनुकूल विचार झाला नाहीं. गॅस्टीन येथें झालेला तह ऐकून इटॅलिअन मंत्रीला मारमोरा याला डॅनिश युद्धांत मिळालेल्या लुटींची वाटणी मोठ्या सलोख्यानें झाली असें वाटलें. म्हणून त्यानें व्हिएन्नास विश्वासांतला वकील पाठवून बादशाहाला विनंति केली कीं, आपण इटलीपासून मोठी खंडणी घेऊन व ऑस्ट्रिअन सरकारच्या कर्जाचा योग्य अंश इटलीस उचलावयास सांगून व्हेनेशिआ सोडून द्यावा.

बिझमार्क बिआरिट्झ येथें जातो.

बिझमार्क बिआरिट्झ येथें पोंहोचला तेव्हां वर लिहिलेली परिस्थिति होती. ह्या प्रसिद्ध भेटींत काय झालें याची विश्वसनीय

हकीगत प्रसिद्ध झाली नाहीं. परंतु येथील एकंदर प्रकाराची कल्पना वाचकांस सहज करितां येईल. एका बाजूला बर्लिनचा ठक होता. त्याला फ्रेंच बादशाहाची मनोवृत्ति व स्वभाव यांची पूर्ण ओळख पटली होती आणि पुढें होऊं घातलेल्या युद्धाबद्दल नेपोलिअनच्या मनांत काय विचारतरंग उठतील याचीहि त्याला पूर्ण कल्पना होती. नेपोलिअन मौनव्रत धरून दृश्य अशी कोणतीहि हालचाल या संबंधांत न करील तरच आपला अभिप्रेत हेतु साध्य होईल अशी त्याला पक्की जाणीव होती. नेपोलिअनाची मनधरणी करावी, वचनें द्यावीं, तो म्हणेल त्यास तोंडी अनुमति द्यावी म्हणून तो समक्ष त्याच्या पुढें हजर झाला; मात्र त्याच्या सहीनिशीं बादशाहास लेख द्यावयाचा नाहीं व तोंडी वचन दिलेंच तर तें पाळावयाचें नाहीं, असा त्याचा निश्चय होता. बिझमार्कला कळून चुकलें होतें कीं, नेपोलिअन इटलीवर असलेलें आपलें वजन व आपणास पाळावी लागणारी तटस्थ वृत्ति यांबद्दल कांहींतरी मोबदला मागेल. नेपोलिअन ऱ्हाइन सरहद्द तोडून मागेल, किंवा बेल्जम मागेल, किंवा कदाचित् दोन्हीहि मागेल, असा त्याचा अजमास होता. नेपोलिअनकडून बिझमार्कला जी कामगिरी करून घ्यावयाची होती त्याबद्दल हवीं तेवढीं मोठमोठीं वचनें देण्यास व नेपोलिअनला आपली इच्छा अगदीं पूर्ण होणार असें वाटून तो आनंदानें उड्या मारूं लागेल, इतकी त्याची खुशामत करण्यास बिझमार्क तयार होता. असें करून आपण नेपोलिअनला खुळ्यांच्या बाजारांत नेऊन सोडीत आहों याविषयीं बिझमार्कला कांहींच वाटत

नव्हतें. आपला हेतु तडीस जाऊन आपला विजय झाल्यावर नेपोलि अन खडबडून जागा होईल याबद्दलहि तो अगदीं बेफिकीर होता. जय मिळाल्यामुळें प्रशिअन सैन्य जास्त वीरश्रीनें व विश्वासपूर्वक लढेल आणि फ्रेंच सैन्य तर मेक्सिकोंत गुंतून राहील, हीं गोष्ट बिझमार्कच्या ध्यानांत आली होती.

बिझमार्क तिसऱ्या नेपोलिअनलाहि फसवितो.

दुसऱ्या बाजूला तिसऱ्या नेपोलिअनसारखा खलबतें व कारस्थानें करणारा माणूस होता व त्यानें ऑस्ट्रिआच्या विरुद्ध कारस्थानें करण्याच्या कामीं बिझमार्कला नेहमीं प्रोत्साहन दिलें होतें. ज्याला आपल्या बाजूला वळवून घ्यावयाचें असेल त्यांच्यापाशीं बिझमार्क फारच प्रांजळपणें वागत असे. तिसऱ्या नेपोलिअनला आपल्या मनाचा मोकळेपणा विशेषच दाखविला होता व त्याच्या सरळपणामुळें नेपोलिअनच्या कांहीं भलत्याच समजुती होऊन बसल्या होत्या. बिझमार्क यांच्या अंगीं खरोखरी असणारी बुद्धिमत्ता त्याच्या अंगीं आहे असें सन १८६६ पर्यंत नेपोलिअनला उमगलें नव्हतें. बिझमार्कची महत्त्वाकांक्षा अनिवार असून तो एक लांब लांब बाता मारणारा अहंमन्य माणूस आहे व त्याच्या स्वसामर्थ्याविषयीं कल्पनाहि भलत्याच आहेत, अशी नेपोलिअनची समजूत होती. असो धोपटमार्गी व आपले बेत उघड कोणास दाखविणारा माणूस सहज फसला जाईल, असेंहि नेपोलिअन समजत असे. लष्करी सामर्थ्य लक्षांत घेतां प्रशिआ ऑस्ट्रिआचा जोडीदार शोभेल असा विचार त्याच्या मनाला क्षणभरहि शिवला

नाहीं. म्हणून इटलीनें प्रशिआशीं सहकार करावा अशी इटलीस तुह्मी भर द्या अशी बिस्मार्कनें बिआरिट्झ येथें विनंति केली, ती नेपोलिअननें सहज मान्य केली. वरील प्रमाणें इटलीला भर देणें व फ्रान्सनें स्वतः तटस्थ राहणें या कामगिरीबद्दल तुह्मांस ह्राईन सरहद्दीवर मुलुख मिळेल किंवा बेल्जमबरोबर तुह्मांस मर्जीनुरुप वागतां येईल असें उडत उडत किंवा कदाचित् स्पष्टहि वचन नेपोलिअनला त्याच्या मनानें प्रांजल व मोकळ्या मनाचा मित्र बिस्मार्क यानें दिलें असेल, तेवढ्यावरच नेपोलिअन खुष झाला. परंतु एकंदरींत हें वचन केवळ शाब्दिकच होतें. युद्ध फार दिवस चालेल व प्रत्यक्ष संधि येण्याच्या पूर्वी फ्रान्सला सज्ज राहतां येईल असें खात्रीपूर्वक नेपोलिअनला वाटत असल्यामुळें त्याला यापेक्षां बिस्मार्कला जास्त बांधून घेण्याची आवश्यकता वाटली नाहीं.

नेपोलिअनला त्यानें कॅव्हूरबरोबर जो व्यवहार केला होता त्याची आठवण होती. परंतु त्या वेळची परिस्थिति व या वेळची परिस्थिति यांत जमीनअस्मानाचें अंतर होतें, हा विचार बहुतकरून त्याच्या मनांत आला नाहीं. सन १८५९ सालीं त्यानें कॅव्हूरला सैन्य पुरवून मदत केली होती व ठराव्याच्या शर्ती अंमलांत आणण्याचें सामर्थ्य त्याला होतें. सन १८६५–६६ सालीं त्याची स्थिति सैन्यहीन सेनाधिपतिप्रमाणें होती.

बिस्मार्क डचीजमधून ऑस्ट्रिआची हकालपट्टी करतो.

आपल्या सर्व योजनांना फ्रेंच बादशाहाचें अनुकूल मत मिळवून बिस्मार्क बिआरिट्झ मधून परत फिरला. बर्लिन येथें आल्या-

बरोबर जीं तीन कामें त्याच्या अगदीं डोळ्यासमोर होतीं तीं त्यानें हातीं घेतलीं:—ऑस्ट्रिआला टोंचून टोंचून कलहाला आरंभ करण्यास लावणें; चढाईच्या किंवा स्वसंरक्षणाच्या कामाकरितां इटली बरोबर बळकट दोस्ती करणें; खऱ्या स्थितीचा विपर्यास करून ऑस्टि आचें वर्तन व हेतु प्रामाणिक प्रशिअन राजाच्या मनाला विपरित भासतील अशी त्यांची मांडणी करणें. ह्या त्याच्या तिन्ही आवश्यक योजना सिद्धीस गेल्या. सन १८६६ मार्च महिन्यांत ऑस्ट्रिआस युद्धाची तयारी करून स्वसंरक्षणार्थ सज्ज होण्यास उद्दीपित केल्यावर बिझमार्कने इटलीशीं चढाई व संरक्षण या कारितां तहाची योजना करून ता. ८ एप्रिल रोजीं तहनाम्यावर सह्या सुद्धां करून घेतल्या. ह्या तहाची मुख्य शर्त अशी होतीं कीं, प्रशिआनें तीन महिन्यांच्या आंत जमन संयुक्तसंस्थानसंघाची शासनपद्धति सुधारण्याकरितां शस्त्र उचलेलें तर इटली ऑस्ट्रिआबरोबर विलंब न लावतां युद्ध पुकारील. दोन्ही राष्ट्रांनीं आपलें सर्व सैन्य रणांगणांत आणावें व ऑस्ट्रिआ व्हेनेशिआ इटलीला देण्यास तयार होईपर्यंत तह करण्यास राजी व्हावयाचें नाहीं असें ठरलें होतें.

प्रशिआंत शांतताभंग व्हावा या हेतूनें प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या अभिमानी लोकांची खुशामत होईल असें होल्स्टीनमध्यें ऑस्ट्रिआचें धोरण आहे असें राजाच्या मनांत भरवून देऊन बिझमार्कनें त्याला आपलासा करून घेतला. गॅस्टीनच्या तहाच्या कलमांची रचनाच बिझमार्कनें अशी केली होती कीं, त्या साधनांनीं व्हिएन्नांत अडचणी

उत्पन्न करून त्या जास्तच चेतवून देतां येतील असें करणें त्यास सोपें व्हावें. लांडगा व कोंकरू या गोष्टींत कोंकराशीं वर्तन करितांना लांडग्यानें ज्या तत्त्वाचा अवलंब केला होता त्याच तत्त्वावर बिझमार्कनें आपलें धोरण रचिलें होतें. स्क्लेस्विगचा राज्यकारभार मंत्री मेंटाईफेल याचा मुलगा जनरल् मेंटाइफेल याजकडे दिला होता. त्याला तूं आपल्या डचींत अत्यंत कडक शिस्त ठेव, सभा भरविण्यास परवानगी देऊं नकोस, सार्वजनिक मतप्रदर्शन बिलकूल होऊं देऊं नकोस अशी आज्ञा होती. दुसऱ्या पक्षीं होल्स्टीनच्या ऑस्ट्रिअन गव्हर्नरला असें सांगण्यांत आलें होतें कीं, सनदशीर शासनपद्धतीचा अभिमानी ऑस्ट्रिआ यानें आपल्या जर्मन प्रजेशीं जो सहिष्णु वर्तनक्रम ठेविला होता तसाच तूं आपल्या डचींत ठेव. उघडच आहे कीं, व्यवस्थेशीर रीतीनें काम करणाऱ्या सभा होल्स्टीनमध्यें सुरू दिल्या जात. यांपैकीं कांहीं सभांत या दोन डचीजमध्यें असणाऱ्या भिन्न भिन्न राजशासनपद्धतीवर कांहीं जणांनीं टीका केली असेल. तसेंच कदाचित् ह्या दोन डचीजचें ऐक्य करून त्यांचा कारभार ड्यूक ऑफ ऑगस्टनबर्ग याजकडे दिला नाहीं याबद्दल खेदहि प्रदर्शित करण्यांत आला असेल. तें कसेंहि असो. या होल्स्टीन प्रजाजनांच्या उद्गारांचा उपयोग बिझमार्कनें सर्व दोष ऑस्ट्रिआच्या माथीं मारण्यांत व ऑस्ट्रिआवर, त्याचे वर निर्दिष्ट केलेले दोषारोप यथार्थ होते असा राजाचा पक्का ग्रह करून देण्याकडे केला यांत संशय नाहीं.

बिझमार्क ऑस्ट्रिआला युद्धांत पडणें भाग पाडतो.

अशा रीतीनें राजाला आपल्या मुठींत आणल्यावर ऑस्ट्रिआनें

जर्मनीची शांतता भंग केल्याचा उघड दोषारोप बिझमार्कनें ऑस्ट्रिआवर केला. आह्मी अगदीं सद्हेतूनें प्रेरित झालों होतों असें ह्हिएन्ना सरकारानें म्हटलें, पण व्यर्थ. डचींच्या कारभारासंबंधीं दुसरी एक योजना 'डायेट' सभेनें पुढें केली. तीहि धुडकावून लाविली. बिझमार्कला संमत अशी एकच गोष्ट होती. ती म्हणजे दोन्ही डचीज एकदम प्रशिआच्या अंमलाखालीं देणें. हें सुद्धां त्यानें नाकारिलें असतें, कारण त्याच्या हातांतलें ऑस्ट्रिआला टोंचणारें व क्षुब्ध करणारें शस्त्र त्याला खालीं ठेवावें लागलें असतें. बिझमार्कनें ऑस्ट्रिआ विरुद्ध गिल्ला करण्याची अगदीं कमाल केली. हें असह्य झाल्यामुळें बर्लिन येथील ऑस्ट्रिआचा वकील कौंट कॅरोली याला हुकूम आला कीं, "गॅस्टीनचा तह मोडण्याचा प्रशिआचा बेत ठरला आहे कीं काय?" असें तुम्हीं बिझमार्कला त्याच्या तोंडावर विचारा. यावेळीं बिझमार्कची युद्धाची तयारी अगदीं पूर्ण झाली नव्हती. कारण इटलीशीं ठरलेल्या दोस्त तहनाम्यावर अद्याप सह्या झाल्या नव्हत्या. म्हणून त्यानें निखालस 'नाहीं' असें उत्तर दिलें. "माझा हेतु तसा असताच तर मी तुह्मांस तो सांगितला असता असें तुह्मांस वाटतें काय"? असें त्यानें विचारलें असेंहि म्हणतात. कौंट कॅरोली हा मोठा धूर्त व मसलती वकील होता त्यानें ह्या म्हणण्याचा गर्भितार्थ तेव्हांच ताडला. हें भाषण लिहून काढून त्यानें आपल्या सरकाराला एक लिखित पाठविलें त्यावरून युद्धप्रसंग अपरिहार्य आहे असें आपल्या वकिलाचें मत आहे, ही गोष्ट ऑस्ट्रिआच्या ध्यानांत आली. त्या क्षणापासून

ऑस्ट्रिआनें हक्क व संशयवृत्तीनेंच परंतु प्रत्यक्ष युद्धाची तयारी करण्यास आरंभ केला.

प्रशिआ पांच वर्षे युद्धाला सज्ज होण्याची तयारी करीत होता. राजा व त्याचे मंत्री यांनीं आपल्या उत्तम सहकारानें, राष्ट्रीय पार्लमेंटचें मत एका बाजूस सारून, फार मोठें सैन्य तयार केलें होतें. ऑस्ट्रिआला दोन महिने सतत उद्योग करून जें सैन्य समरांगणांत आणितां आलें असतें. त्याच्यापेक्षां पुष्कळ पटीनें कार्यक्षम असें सैन्य तीन आठवड्यांतच तयार करून प्रशिआला रणांगणांत आणतां येणें अगदीं सुगम झालें होतें. असें असतांहि ऑस्ट्रिआ थबकत थबकत पण अनिश्चयानें सैन्य सज्ज करीत आहे असें बिस्मार्कनें ऐकिलें. तेव्हां ऑस्ट्रिआ बळजबरीनें युद्धप्रसंग घडवून आणीत आहे असा ऑस्ट्रिआवर दोषारोप करण्यास तो कचरला नाहीं. या अर्थाचें एक सर्वसाधारण लिखित बिस्मार्कनें संयुक्तसंघांतील सर्व संस्थानांस पाठविलें. त्यांत त्यानें ऑस्ट्रिआ मोठ्या युद्धाची तयारी करण्यांत गुंतला आहे, हें पाहून मला आश्चर्य वाटतें, असें म्हटलें होतें. " युद्धास सज्ज असा हा सैन्यभार गोळा करण्यांत ऑस्ट्रिआचा संकल्प तरी काय असावा? " असा सवालहि बिस्मार्कनें केला होता. त्याला तोडीस तोड म्हणून प्रशिआनें थोडाहि सैन्यभार अजून तयार केला नाहीं असें त्यांस बजाविलें होतें. " इतकी ऑस्ट्रिआची जय्यत तयारी चालली असतां आम्हां प्रशिअनांस असतां स्वस्थ बसतां येत नाहीं " असेंहि एक वाक्य त्यांत होतें. लिखिताचे शेवटीं पुढील प्रश्न संयुक्त संस्थानांस

निरनिराळे विचारले होते:—" ऑस्ट्रिआनें प्रशिआसंबंधीं असें भीमरूप धरिलें आहे, तरी तुम्हांला प्रशिआविषयीं सहानुभूति वाटते असें प्रशिआनें समजावें काय ? तुम्ही प्रशिआला मदत करणार असाल तर किती व कोणत्या प्रकारची ? "

हे बिझ्मार्कचे प्रत्यक्ष उद्गार सर ॲलेइक्ँडर ग्रँट यानें दुसऱ्या शब्दांत दिले आहेत ते असे:—" प्रशिआ व ऑस्ट्रिआ यांचा निरंतरचा बेबनाव आहे. ऑस्ट्रिअन सरकारनें भीमरूप धारण केलें आहे. पण प्रशिआला याचा निकाल काय होतो तें पाहावयाचें आहे, व प्रशिआची युद्ध करण्याची तयारी आहे. ऑस्ट्रिआ विरुद्ध सर्व जर्मनी प्रशिआची बाजू उचलून धरील अशी आशा आहे. संयुक्त संघ जुनाट झाला आहे व त्याची पुनर्घटना केली पाहिजे. जर्मनींत सज्ज फौज जेवढी असेल त्या सर्व फौजेवर प्रशिआची हुकमत अवश्य असली पाहिजे. "

या सर्वसामान्य लिखितावर तारीख २४ मार्च आहे. पुढें पंधरा दिवसांनीं इटलीबरोबर ठरलेल्या तहावर सह्या झाल्या. प्रशिअन सैन्य एका पंधरवड्यांत तयार होणार होतें. जर्मनींतील जे भाग ऑस्ट्रिआच्या अंमलांत नव्हते त्यांचा पाठिंबा मिळविण्याकरितां हें लिखित काढलें होतें. त्यांचीं उत्तरें अनुकूल येवोत वा प्रतिकूल येवोत, प्रशिआ युद्धाच्या आखाड्यांत एकदम उतरणार हें निश्चित होतें. प्रशिआनें रणसंग्रामांत उडी कशी टाकली याचें वर्णन ऐकण्यापूर्वी

व्हिएन्ना येथें ऑस्ट्रिअन मुत्सद्यांनीं कोणत्या उपायांची योजना केली होती हें वाचकांस समजणें जरूर आहे. तें समजल्यावर वाचकांना दोन्ही बाजूंच्या सैनिकांची थोडीबहुत ओळख करून घेणें व त्यांच्या पुढाऱ्यांची विशेष माहिती समजणें जरूर आहे. इतकी तयारी झाल्यावर युद्धाच्या अथपासून इतिपर्यंतच्या क्रमाचा विचार वाचकांस निर्विकार बुद्धीनें करितां येईल.

———

प्रकरण ७ वें.

ऑस्ट्रिआचें परराष्ट्रीय धोरण-युद्धाची तयारी-जर्मनींतील लहान लहान संस्थानांचें वर्तन-दोन्ही बाजूंची तयारी-सेनाधिपति मोल्टके, प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स, कौन प्रिन्स, हरवर्थ फॉन बिटेन्फील्ड, बेनेडिक-युद्धास सुरुवात.

बिआरिट्झ येथें फ्रेंच बादशाहा व बिस्मार्क यांची भेट होण्याच्या थोडे अगोदर इटॅलिअन मुख्य मंत्री जनरल ला मारमोरा यानें व्हिएन्ना येथें बादशाहाकडे वकील पाठवून आपणास फायदेशीर होतील अशा शर्ती इटलीनें कबूल केल्यास आपण व्हेनेशिआ इटलीस परत द्याल काय ? असें विचारिलें होतें त्या शर्ती येणेप्रमाणें:-(१) इटलीनें ऑस्ट्रिआला भली मोठी रक्कम देणें. (२) ऑस्ट्रिआच्या कर्जापैकीं प्रमाणशीर भाग इटलीनें आपल्या अंगावर घेणें सन १८९७ सालीं कांहीं शर्तींवर व्हेनेशिआ ऑस्ट्रिआकडे आला, तेव्हांपासून सत्ताधीश राष्ट्रांनीं आजपर्यंत केलेल्या व्यवहारांत हा व्यवहार अत्यंत लाजिरवाणा होता असा शिक्का इतिहासलेखकांनीं त्याजवर मारला आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन व स्वतःवर मोठा बिकट प्रसंग गुदरला आहे असा विचार करून ऑस्ट्रिआनें या वेळीं व्हेनेशिआ इटलीच्या स्वाधीन केला असता तर त्यांत अपमानास्पद असें कांहीं झालें नसतें. व्हेनेशिआ ऑस्ट्रिआच्या ताब्यांत होता तोंपर्यंत प्रजेच्या मनांत आपल्याविषयीं प्रेम उत्पन्न करण्याचें काम ऑस्ट्रिआकडून मुळींच

झालें नाहीं. उलट समुद्रकांठीं राहणारे हे लोक आपल्या परकीय धन्याचा अत्यंत द्वेष करीत, हें ते लोक राज्यकर्त्या जातीशीं कोण ताहि सामाजिक व्यवहार करीत नसत यावरून उघड दिसे. व्हेनेशिअन लोकांचा द्वेष, राज्यकारभारास लागणारा खर्च व व्हेनेशिआ परराष्ट्राच्या अंमलाखालीं आहे ही प्रत्येक इटॅलिअन माणसाच्या अंतःकरणांत निरंतर चिघळणारी जखम या गोष्टी विचारांत घेतां व्हेनेशिआ ठेवण्यापासून ऑस्ट्रिआचा नफ्यापेक्षां तोटाच जास्त होता, असें एक वेळ वाटतें. अशा परिस्थितींत ऑस्ट्रिआनें ला मारमोराची सूचना मान्य केली असती तर ऑस्ट्रिआवर असलेलें एक ओझें आयतेंच नष्ट झालें असतें. ऑस्ट्रिआची तटस्थ राष्ट्रांनीं मोठी वाखाणणी केली असती आणि बिस्मार्क व तिसरा नेपोलिअन यांच्यासारख्यांचीं कारस्थानें साफ फसलीं असतीं.

ऑस्ट्रिआचे मंत्री

आपल्या राजकार्यधुरंधरांचा ऑस्ट्रिआला मोठा गर्व आहे. परंतु कॉनिट्झच्या कालापासून पुढें ह्या मुत्सद्यांनीं ऑस्ट्रिआच्या राज्यविस्तारांतील पुष्कळसे प्रांत गमाविले तरी आहेत किंवा मेटर्निक प्रमाणें ऑस्ट्रिआवर मोठा बोजा तरी घालून ठेविला आहे. कौंट रेशबर्गनें स्क्लेस्विग–होल्स्टीन प्रश्नाचा ब्रह्मघोंटाळा केल्यावर त्याच्या मागून कौंट मेन्सडार्फ पूली हा बादशाहाचा मुख्य मंत्री झाला. हा शिपायाचा मुलगा असून स्वतः शिपाई होता. मॅजेंटा आणि सोल्फेरिनो येथें लढल्यावर व इटॅलिअन मोहीम संपल्यावर राजकीय वाकिलाचें

काम त्यानें केलें. राजदरबारांत त्याची चहा होती, परंतु त्याला त्याच्या कारभाराचा अनुभव बहुतेक नव्हताच. ला मारमोरा याच्या मागणीचा खलिता व्हिएन्ना येथें आला तेव्हां हाच बादशाहाचा मुख्य मंत्री होता. पुढें ज्या हकीकतीचें वर्णन येणार आहे त्यांत स्वबुद्धीनें आंखलेलें धोरण चालविणारा मंत्री अशी त्याची ख्याति असण्याच्या ऐवजीं राजदरबारांतील अंतस्थः मंडळीचें मुख असेंच त्याला लोक समजत असत. म्हणून सन १८६६ सालीं ऑस्ट्रिआनें जें धोरण ठेविलें होतें त्याची जबाबदारी बादशाहावरच आहे.

ऑस्ट्रिआ, इटली व फ्रान्स.

बादशाहा फार सरळमार्गी होता. परंतु बिझ्मार्क अथवा फ्रेंच बादशाहा यांच्याबरोबर राजकारणाच्या डावांत त्याला यश येण्याचा संभव नव्हता. अर्थातच या धूर्त मसलतगारांचें कारस्थान फसाविण्याचा जो एकच उपाय होता, तो त्यानें नाकारला. मी आपल्या राज्यविस्तारांतील कोणत्याहि भागाचा क्रयविक्रय करण्यास तयार नाहीं, असें उत्तर ला मारमोरा याच्या सूचनांस त्यानें मोठ्या ताठ्यानें दिलें. परंतु ता. ८ एप्रिल रोजीं प्रशिआ व इटली यांच्या मध्यें तहनाम्यावर सह्या झाल्या आहेत अशी पॅरिसहून आलेल्या खलित्यांतील बातमी फ्रॅन्सिस जोसेफ यास समजतांच ज्या नाजुक मनोभाववेनें प्रेरित होऊन त्यानें वरील उत्तर दिलें होतें ती मनोभावना अगदीं जिरून गेली नंतर आतां आपलें प्रशिआबरोबर जें युद्ध अपरिहार्य आहे त्यांत इटलीनें तटस्थ वृत्ति धरावी म्हणून त्यानें व्हेनेशिआ देण्याचा एकदम निश्चय

केला. फ्रॅन्सिस जोसेफच्या वतीनें ही गोष्ट पॅरिस येथील इटॅलिअन वकील कौंट नायग्रा यास फ्रान्सच्या बादशाहानें कळविली, ती कौंट नायग्रा यानें फ्लॉरेन्स येथें कळविली. ही मागणी या पूर्वीच जर आली असती तर इटलीच्या मुख्य प्रधानानें मोठ्या आनंदानें तिचा स्वीकार केला असता. कारण असें करण्यानें युद्धाचा खर्च न होतां युद्धापासून होणारा फायदा इटलीस मिळत होता परंतु प्रशिआबरोबर जो ठराव होऊन चुकला आहे त्याच्याशीं बेइमान झाल्याखेरीज असें इटलीला करतां येत नाहीं असें त्यास वाटून त्यानें फ्रॅन्सिस जोसेफचें म्हणणें नाकारिलें. दिरंगाईच्या घातुक संवर्याचा ही दुसरी अडल ऑस्ट्रिआस घडली.

युद्धाच्या जरा अगोदरची स्थिति.

ला मारमोराचें नकारार्थी उत्तर गेल्यावर फ्रान्सच्या बादशाहानें केलेली सूचना पुढें आली. सन १८१५ सालीं झालेला तह एका बाजूला सारण्याचा समय आतां आला आहे, असें या बादशाहाचें मत होतें प्रशिआ जर व्हॅनिश प्रांत फ्रान्सला देईल तर फ्रान्स ३,००,००० सैन्यानिशीं प्रशिआला येऊन मिळेल असें मे महिन्याच्या अखेरीस नेपोलिअन यानें बिझ्मार्क यास कळविलें. यापुढें कांहीं आठवडेपर्यंत निरनिराळ्या रूपांत अशाच प्रकारच्या सूचना करण्याचा क्रम त्यानें चालू ठेविला. ही सूचना एखाद्या वाटमाऱ्यानें केलेली सूचना आहे असा फार भास होई. कारण फ्रान्सचें ऑस्ट्रिआ बरोबर मुळींच भांडण नव्हतें. तीवरून फ्रान्सची मुत्सद्दीगिरी अगदी

कमी प्रतीची होती असेंहि दिसलें कारण बिझमार्क याला आपल्याशीं सहकार करावयास लावून आपलें बक्षीस सुरक्षित करून घेण्याचे अन्य मार्ग नेपोलिअन यास होते; उदाहरणार्थ, इटॅलिअन तह मोडणें. या वेळस आपल्या शेजाऱ्यास गोंजारणें व त्याची अपेक्षित वृत्ति उत्तेजित ठेवणें अवश्य आहे हें ध्यानांत आणून नेपोलिअनच्या सूचनांपैकीं कोणतीहि सूचना बिझमार्कनें साफ अशी नाकारली नाहीं. दरम्यान् इंग्लिश सरकारनें फ्रान्स व रशिआ यांच्याशीं बोलणें चालविलें होतें; आणि ता. २८ मे रोजीं या राष्ट्रांनीं सर्व राष्ट्रांची एक परिषद भरवावयाची असें ठरविलें. त्या परिषदेंत सर्व वादग्रस्त मुद्यांचा निकाल लावणें व जर्मनीची संयुक्त शासनपद्धति सुधारणें हीं कामें व्हावयाचीं होतीं. आमंत्रण पाठविलेल्या तीन राष्ट्रांपैकीं इटली व प्रशिआ या दोघांनीं बिनशर्त आमंत्रण स्वीकारलें पण ऑस्ट्रिआनें आमंत्रण स्वीकारण्याच्या बाबतींत एक अट घातली. ती अट अशी कीं, ज्या योजनेमुळें आमंत्रित संस्थानांपैकीं एखाद्याच्या मुलुखाची किंवा अधिकाराची वाढ होईल अशा योजनेचा विचार या परिषदेंत होऊं नये स्वाभाविकतः ही अट घालणें म्हणजे आमंत्रण न पतकरणेंच आहे असा अर्थ सर्वांनीं केला. बहुतकरून ऑस्ट्रिअन सरकारास वाटलें असावें कीं, परिषदेंत रशिआ, इटली, फ्रान्स आणि प्रशिआ आपल्याविरुद्ध गेल्यावर आपल्याला प्रत्यक्ष लढून पाहण्यापूर्वीच हत्यारें खालीं ठेवण्याशिवाय दुसरा मार्गच उरणार नाहीं. ऑस्ट्रिआनें पुढें स्वीकारलेल्या मार्गावरून याच मताचें

भारत इ. स. १, पाचवा [illegible]

दृढीकरण होतें. तटस्थ राष्ट्रांना हें उत्तर ऑस्ट्रिआनें दिलें त्याचवरोबर स्लेस्विग–होल्स्टीनची व्यवस्था 'डायेट'नें आपल्याकडे घ्यावी असा संदेश 'डायेट' सभेला पाठविला व होल्स्टीनच्या लोकसभा बोलाविल्या. युद्ध खास सुरू होण्यास ह्या ऑस्ट्रि आच्या हालचालीचा उत्तम उपयोग करून घेतां येईल असें मनांत आणून बिझमार्कनें गॅस्टीनचा तह आतां मोडला असें जाहीर केलें व प्रशिअन सैन्याला होल्स्टीनमध्यें शिरण्यास हुकूम सोडला.

ऑस्ट्रिअन सेनापति फॉन गॅब्लेंझ यानें, 'बलिष्ठ सैन्यालाच केवळ हार जाईन' असें म्हणून आपल्या हाताखालची पलटण मागलीच आलटोना येथें नेली व पुढें मोठ्या कुशलतेची व्यवस्था करून, मोठें सैन्य समुख असतांहि तो आपलें सैन्य हॅनोव्हर येथें घेऊन गेला. प्रशिआनें तहाचा भंग केल्यामुळें ऑस्ट्रिआला अत्यंत संताप आला व त्यानें 'डायेट' सभेनें सयुक्तसंघाच्या सैन्यांनीं युद्धास सिद्ध व्हावें असा हुकुम सोडावा अशी मागणी केली. ही सूचना ९ विरुद्ध ६ मतांनीं पसत होऊन त्याप्रमाणें हुकूमहि सुटला ह्या सभेच्या कृत्यानें संयुक्तसंघाचें विसर्जन झालें असें म्हणून फ्रँकफोर्ट येथील प्रशिअन प्रतिनिधीनें जर्मनोच्या पुनर्घटनेच्या योजनेचा खर्डा सभेस सादर केला व तो फ्रँकफोर्ट सोडून परत गेला (जून १४). दुसऱ्या दिवशीं बिझमार्कनें हॅनोव्हर, सॅक्सनी व हेसी-कॅसल यांच्या अधिपतींनीं युद्धाची तयारी बंद करावी व प्रशिआची योजना मान्य करावीं असा खलिता धाडला. त्यांनीं तें अमान्य केल्या-

वर त्यानें प्रशिअन सैन्यास त्यांच्या मुलुखावर स्वारी करण्यास आज्ञा दिली. आतां युद्धास आरंभ झाला. बिस्मार्कच्या अरेरावी वर्तनाची अगदीं किळस आल्यामुळें बहुतेक जर्मनी ऑस्ट्रिआच्या पक्षास मिळाला. डचीजसंबंधानें उद्भवलेला प्रश्न सोडवितांना ऑस्ट्रिआ कमकुवतपणानें प्रशिआच्या नादीं लागला. हा प्रसंगखेरीज करून ऑस्ट्रिआ आपल्या शेजारच्या संस्थानांचे संयुक्तसंघापासून प्राप्त झालेले हक्क पाळण्यास तत्पर असे. परंतु प्रशिआनें बिस्मार्कचें धोरण पतकरल्यापासून त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या आड येणाऱ्या हक्कांची पायमल्ली करावयाची असा प्रशिआच्या राजकारणाचा रोख उत्तरोत्तर वाढतच गेला.

१८६६ च्या युद्धास आरंभ.

एकंदरींत सर्वातिशायी वर्चस्वाकरितां प्रशिआला जर्मनींत संयुक्त बलाच्या व मतैक्याच्या विरुद्ध लढणें प्राप्त होतें कारण मेक्लेन्बर्ग, वीमर व उत्तरेकडील कांहीं लहान संस्थानें याच्याशिवाय प्रशिआला कोणाचेंहि पाठबळ नव्हतें. परस्थ दोस्तांच्या साहाय्याशिवाय प्रशिआ युद्धास हात घालता तर 'नीड्ल गनचा' उपयोग करूनहि युद्धाचा शेवट प्रशिआस प्रतिकूल लागण्याचा संभव होता आपण जें युद्ध करणार आहों त्यानें आपणास जर्मनींत अग्रस्थान तरी मिळेल किंवा तें युद्ध आपणांस रसातळास तरी नेईल हें प्रशिआ पक्कें जाणून होता. जयप्राप्ति झाल्यास वर्चस्व खास पदरांत पडणारच होतें परंतु युद्धांत कोणत्याहि गोष्टीची खात्री देतां येत नाहीं;

आणि पराभव झाला तर सायलेशिआ ऑस्ट्रिआला मिळणार, सन १८१५ सालीं प्रशिआनें सॅक्सनीचे उपटलेले भाग सॅक्सनीस पुनः मिळणार व बहुतकरून एल्व डचीज हॅनोव्हरला मिळणार हें दिसतच होतें इटलीशीं सख्य करून ही मोठी आपत्ति टाळण्याचा अत्युत्तम उपाय प्रशिआनें योजिला होता. ह्या इटली व प्रशिआ यांच्या सख्यसंबंधामुळें इटलीला एकाग्रतेनें जें सैन्य रणांगणांत आणतां येईल त्याच्याशीं झुंजण्यास समर्थ एवढें मोठें सैन्य इटलींत ठेवणें ऑस्ट्रिआस भाग होतें. त्यामुळें ऑस्ट्रिआच्या लष्करी सामर्थ्याचा एक-तृतीयांश तुरी प्रशिआच्या संबंधानें निरुपयोगी होऊन पडला.

प्रशिआंतील लोकमत

प्रशिआंत उच्च वर्गांतील लोक खेरीजकरून इतर सर्व लोकांना हें युद्ध आवडलें नाहीं. तसेंच राज्याच्या सन्निध असणाऱ्या लोकांत मात्र हें युद्ध प्रिय होतें. अगोदर वस्तुस्थितीचा विपर्यास करून मग त्यावर कुशलतेनें युक्तिवाद करून राजाच्या मनांत हें युद्ध करणें आवश्यक होतें, असें भरवून दिलें होतें. शांतता स्थापित करण्याकरितां स्वतः राजानें जे प्रयत्न केले त्यांचा जो परिणाम झाला त्यावरून हा युक्तिवाद अगदीं बरोबर होता असेंच राजास वाटलें. राजा आपलें समाधान पुढील प्रश्न करून करी:—" मेन नदीच्या पलीकडील भाग मी ऑस्ट्रिआला देऊं केला नव्हता काय ? तो त्याने नाकारिला नाहीं काय ? उत्तर भागहि आपणाकडेच असावा असा ऑस्ट्रिआचा विचार असल्याशिवाय ऑस्ट्रिआ दक्षिण भाग कां नको



म्हणेल ? " परंतु पार्लमेंट, लोक सामान्य लोकांतून घेतलेले सैनिक युद्धा केवळ बिझमार्क याचें धोरण उचलून धरण्याकरितां आपल्या देशबांधवांशी आपणांस लढावयास लागणार हा विचार मनांत येऊन क्रोधाविष्ट होत. हा नुसता विचार द्वेषार्ह आहे असें त्यांस वाटे. यावेळीं राजा व त्याच्या भोंवतालचे दरबारी लोक यांशिवाय प्रशिआंत एकाचीहि श्रद्धा बिझमार्क याचें ठिकाणीं नव्हती. जनतेचा त्याच्यावर गैरविश्वास होता इतकेंच नाहीं तर ती त्याचा द्वेष करी. बिझमार्क हा एक पोकळ महत्त्वाकांक्षा बाळगणारा, मागला पुढला विचार नसलेला व मनोराज्यांत गुंग असणारा असा मुत्सद्दी आहे असा लोकांचा त्याच्याविषयीं ग्रह होता. जरी शत्रूच्या सन्मुख आल्यावर प्रशिअन सेनेचें वर्तन अत्यंत सोज्ज्वल असेंच होतें तरी प्रतिपक्षाकडून पहिली सलामी झडण्याच्या पूर्वी बहुतेक सैनिकांचे बिझमार्कविषयीं विचार वर सांगितल्याप्रमाणेंच होते. सैनिक युद्धाला नाखुषीनें प्रवृत्त झाले होते. नुसत्या मनवळवणीपेक्षां त्यांनीं सीमोल्लंघन करण्यास तयार व्हावें म्हणून दुसऱ्याच साधनांचा उपयोग लागे.

जर्मनीच्या इतर संस्थानांतील लोकमत.

जर्मनीच्या इतर भागांत हें युद्ध लोकप्रिय होतें. प्रशिआनें संयुक्त संस्थानांना इतका धाकदपटशा दाखविला होता कीं व त्यांची पायमल्ली इतकी केली होती कीं, असा उपमर्द सहन करून राहण्यापेक्षां युद्ध पुरवलें असें संस्थानांस होऊन गेलें होतें. युद्धांत प्रशिआचा अगदीं चक्काचूर होऊन जाईल अशी जर्मनींत बहुतेकांची समजूत

होती. जर्मन लोकांच्या इच्छेनुरूप त्यांचीं मतें बनलीं होतीं. पांच वर्षें प्रशिअन सैन्याची जी शिस्तवार पुनर्घटना चालली होती तिचें त्यांनीं निरीक्षण केलें नव्हतें. नीड्ल गनविषयीं त्यांना फारच थोडी माहिती होती. प्रशिअन सैन्यापेक्षां ऑस्ट्रिअन सैन्यानेंच डेन्स लोकांचीं जास्त त्रेधा उडविली होती असें त्यांस सांगण्यांत येत असे. त्यांनीं फॉन मोल्टके याचें नांवहि ऐकिलें नव्हतें, परंतु बेनेडिक हें नांव घरोघरीं ठाऊक होतें. इटली प्रशिआशीं सहकार करणार आहे याचा त्यांनीं कधींहि फारसा विचारच केला नाहीं.

या लोकांनीं ऑस्ट्रिअन सैन्यरचनेंत एक मोठें व्यंग होतें, त्याकडे पुरेसें लक्ष पोहोंचविलें नव्हतें. ऑस्ट्रिआनें अजून हंगेरिअन लोकांपाशीं जितकें मिळतें घ्यावयास पाहिजे होतें तितकें घेतलें नव्हतें. परंतु दोन्ही देशांच्या सुखसंवर्धनास दोघांचा अगदीं एकजीव झाला पाहिजे ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. असें अनुभवांतीं कळून आलें, आपणांस आत्मसत्ताक राज्यपद्धति मिळावी म्हणून हंगेरिअन पुढाऱ्यांनीं कंटाळा येईपर्यंत प्रयत्न केले होते परंतु ऑस्ट्रिआनें त्यांस मुळींच दाद दिली नव्हती. यामुळें प्रस्तुत युद्धांत जय मिळविला तरी आपली इच्छा पूर्ण होण्याचा संभव नाहीं असें त्यांस वाटत होतें. अर्थात्च ऑस्ट्रिआच्या इतर ठिकाणच्या सैनिकाइतकें हंगेरिअन सैनिक औत्सुक्यानें या युद्धांत चाकरी बजावण्यास तयार नव्हते. ऑस्ट्रिआला तयारी करण्यास जास्त वेळ मिळाला असता किंवा लष्करी खात्याच्या कारभारांत साध्या व्यवहारज्ञानाचा जास्त उपयोग केला

असता तर ह्या अनिष्ट गोष्टीचा घातुक परिणाम बराचसा कमी झाला असता. त्यांतल्यात्यांत यावेळीं सहज करतां येण्यासारखी गोष्ट म्हणजे हंगेरिअन पलटणींचा जास्त भरणा इटलींत पाठवावयाच्या सैन्यांत करणें ही होती. परंतु असाहि प्रयत्न झाल्याचें दिसून येत नाहीं.

ऑस्ट्रिआविषयीं जर्मनीची सहानुभूति.

फ्रँकफोर्टच्या संरक्षणाकरितां ठेवलेले या दोन राष्ट्रांचे सैनिक शहर सोडून निघाले, त्या वेळेस युद्धाभिमुख अशा ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्याबद्दल सर्व जर्मनीस काय वाटत होतें, हें अगदीं उत्तम दृष्टोत्पत्तीस आलें

ऑस्ट्रिअन सैन्य कूच करून बाहेर पडलें तेव्हां रस्त्यांत रहिवाशांची गर्दीच गर्दी झाली व ही गर्दी सैनिकांच्या मागें रेलवे स्टेशनपर्यंत गेली. खिडक्यांतून स्त्रीवर्गानें त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला. आगगाडीच्या डब्यांत सिगार्स व नानाविध उपहाराचे जिन्नस लोकांनीं फेंकफेंकून दिले. समाआंतील व व्यापारी वर्गांतील ठळक ठळक लोकांनीं त्यांस आशिर्वादपूर्वक निरोप देतांना " तुमचें लवकर व सुखानें पुनरागमन होवो " या उच्चारानें सर्व दिशा दणाणून सोडल्या. प्रशिअन सैनिक शहरांतून बाहेर पडले तेव्हां " ईश्वर तुमचें कल्याण करो " असें म्हणण्यास एकहि व्यक्ति पुढें आली नाहीं किंवा सहानुभूति बाळगून चिटपांखरूंहि त्यांस पोंचविण्यास गेलें नाही.

प्रशिअन सैन्य.

फॉनरून यानें तयार केलेल्या सैन्यपुनर्घटनेला राजाचा संमति मिळाल्यावर ती पूर्ण अंमलांत आणण्याचें काम, पार्लमेंटनें मोठ्या चिकाटीनें विरोध केला असतांहि तितक्याच दृढनिश्चयानें व दीर्घ प्रयत्नानें पार पाडण्यांत आलें. सन १८६१ जानेवारींत पार्लमेंट उघडलें तेव्हा दोन्ही मंडळामधील मतभेद कमी होऊन दोघांच्या सलोख्यानें कांहीं तोड निघेल अशी आशा राजानें प्रदर्शित केली; परंतु व्यर्थ लोकसभेनें पुनर्योजनेचा मसुदा व अंदाजपत्रक नापसंत केलीं, डेन्मार्कबरोबर झालेल्या युद्धाच्या खर्चाला मंजुरी देण्याचें नाकारिलें व जो पैसा खर्च करण्यास पार्लमेंटची परवानगी नव्हती तो पैसा खर्च करणें सनदशीर शासनपद्धतीला सोडून होतें असें स्पष्ट मत दिलें. सन १८६६ जानेवारींत पार्लमेंट पुनः उघडलें तेव्हांहि पार्लमेंटचें तेंच धोरण तितक्याच निश्चयानें कायम होतें फक्त आठ दिवसच पार्लमेंटची बैठक झाल्यावर राजानें तें बरखास्त केलें व गेलीं कांहीं वर्षें करवसुली करण्याचा जो क्रम त्यानें चालविला होता तोच व तसाच चालू ठेविला. खजिन्यांत मागील शिल्लक सुमारें २,००,००,००० डॉलर होती. कोलोन ते मिंडेनपर्यंतच्या सरकारी आगगाडीच्या फाट्याचा हक्क विकल्यानें बरीच मोठी शिल्लक राजाच्या हातीं आली व इकडे लोकसभेनें अंदाजपत्रक पसंत केलें नसतांहि त्याला आपल्या स्वतःची व उमराव सभेची मंजुरी मिळाली होती तिच्या जोरावर राजानें अंदाजपत्रकाप्रमाणें अंमलबजावणी करण्याचा क्रम चालविला होता. शांतता कायम राहील अशीच व्यवस्था ठेवावी,

असे विनंतिअर्ज पाठविण्याचा धडाका लोकांनीं ठेविला होता. ही लोकांची इच्छा व पार्लमेंटचें मत गुंडाळून ठेवून बिझमार्कनें आंखून दिलेली योजना तडीस नेण्याचा निश्चय राजानें ढळूं दिला नाहीं प्रशिआला जर्मनींत आद्यस्थान मिळण्याचा प्रश्न 'रक्तस्राव व तरवार' यांच्या बळावरच सुटेल अशी राजाची कल्पना होती. दरम्यान् फॉनरून यानें आपल्या दक्षतेनें सैन्य पराकाष्ठेचें कार्यक्षम करून सोडलें होतें. सैनिकांची संख्या ३,२६,६०० वर येऊन ठेपली होती. सर्वांचें पोषण व लष्करी शिक्षण उत्तम झालें होतें. पायदळांतील लोकांना नवीन अचुक नेम लागणाऱ्या बंदुकींचा मुबलक पुरवठा केला होता. घोडेस्वारांचीं वाहनें व इतर सामग्री हीं अत्युत्तम होतीं. तोफखान्याची व्यवस्था पूर्ण टापटिपीची होती. ता. ३ व ता. १२ मे यांचें दरम्यान वित्रक्षित अंतरानें युद्धास सज्ज होण्याचे हुकूम सुटले होते. ता १२ पासून चौदा दिवसांचे आंत सर्व सैन्य सज्ज होऊन केवळ कूच करण्याच्या हुकुमाची मार्गप्रतीक्षा करीत बसलें होतें.

मोल्टके.

पूर्वी सांगितलेल्या त्रयींपैकीं तिसरा सर्वविश्रुत पुरुष फॉन मोल्टके हा होय. आज जगांत प्रशिआला जी प्रतिष्ठा आहे तिचें सर्व श्रेय या पुरुषाकडेच आहे. फॉनरून यानें यशःप्राप्ति होण्यास योग्य अशी सैन्याची कडेकोट तयारी करून दिली. बिझमार्क यानें प्रशिआच्या भावी स्थितीच्या प्रश्नाला, आपल्या निर्भय चढाईच्या धोरणानें असा रंग चढविला कीं, तो प्रश्न फक्त 'रक्तस्राव व तरवार' यांच्या जोरावरच सुटावा. परंतु प्रत्यक्ष क्रिया करण्याची वेळ आली

तेव्हां हेल्मथ कार्ल बर्नहार्ड फॉन मोल्टके यानें ज्या स्थानांवर निश्चयानें प्रहार करावयास पाहिजे होते तीं स्थानें अनन्यसाधारण अशा अचूक संधानानें ठरवून दिलीं. फॉन मोल्टके हा सैन्यरचनेच्या कामांत पहिल्या प्रतीचा पटाईत होता. त्याचा पूर्ववृत्तांत थोडक्यांत असा होता:—मेक्लेनबर्ग—स्केरिन प्रांतांत पार्चिम येथें सन १८०० ऑक्टोबर ता. २६ रोजीं याचा जन्म झाला त्याचें बहुतेक शिक्षण कोपेनहेगन येथें झालें. तो प्रशिअन पायदळांत सेकंड लेफ्टनट म्हणून ता. १२ मार्च १८२२ रोजीं शिरला. ऑक्टोबर १८२३ ते ऑक्टोबर १८२६ पर्यंत तो बर्लिन येथें सरकारी लष्करी शिक्षणाच्या शाळेंत जात असे व तेथें त्याची प्रख्याति झाली. १८२८ ते १८३१ तो जमिनीची पाहणी करण्याच्या कामांत गुंतला होता. ता. ३० मार्च १८३२ रोजीं त्याची जनरल स्टॉफमध्यें नेमणूक झाली; १८३३ त तो पहिला लेफ्टनंट झाला व १८३५ त कॅपटन झाला त्याच वर्षीं तो कांस्टँटिनोपल येथें गेला व सेरास्कीर महमद कासरेफ पाशा याच्या विनंतीस मान देऊन तुर्कस्तानच्या हितसंबंधाकरितां कांहीं दिवस तेथें राहिला. पूर्ण अधिकारस्वातंत्र्य असल्यामुळें त्यानें तुर्की सैन्याची पुनर्घटना करण्याचें काम विशेष प्रामुख्यानें केलें. पुढें तो सुलतान दुसरा महमद याच्या समागमें बल्गेरिआंत प्रवासास गेला व रस्ट्चक, सिलिस्ट्रिआ, व्हर्ना, स्कुला व पुढें कांहीं दिवसांनीं डार्डेनल्स येथील तटबंदीचीं कामें त्यानें हुकुमाप्रमाणें पार पाडलीं ह्याच सुमारास तुर्की सरकारनें मोल्टकेची रजा बर्लिनहून आणखी तीन वर्षे वाढवून घेतली व त्यानें जें काम आपल्या शिरावर

वेतलें होतें त्यांत त्याला मदत करण्यास तीन अधिकारी मागवून वेतले. सन १८२८ त मोल्टके एशिआ मायनर येथील सैन्याकडे गेला आणि त्याच्या मदतीस जे अधिकारी आले होते त्यांच्या मदतीनें लष्करी रस्ते बांधण्याचें काम त्यानें केलें. कूर्डस् व सीरिआंतील इजिप्शिअनस् यांच्यावर स्वाऱ्या झाल्या त्यांतहि मोल्टकेनें साहाय्य केलें. ता. १ जुलई १८३९ रोजीं सुलतान महमद मरण पावल्यावर मोल्टके प्रशिआस परत आला; एप्रिल १८४० त चौथ्या पलटणींच्या वर्गांत त्याची नेमणूक झाली; १८४२ त त्याला मेजर केलें व ऑक्टोबर १८४५ त अधिकारी वर्गांतील त्याची नेमणूक कायम झाली व त्याच वर्षी तो प्रिन्स हेन्री ऑफ प्रशिआ याच्याबरोबर ॲडज्यूटंट म्हणून रोम शहरीं गेला. रोम येथें असतांना मोल्टकेनें त्या शहराभोंवतालच्या स्थलांची बारकाईनें पाहणी केली. प्रिन्स हेन्री परलोकवासी झाल्यामुळें तो परत आला व आठव्या पलटणींच्या अधिकारी वर्गांत डिसेंबर १८४६ त त्याची नेमणूक झाली. मे १८४८ त वरिष्ठ अधिकारी वर्गांतील प्रांताचा मुख्य अधिकारी म्हणून त्याला जागा मिळाली व ता. २२ ऑगस्ट रोजीं त्याच सालीं चौथ्या पलटणीचा तो मुख्य अधिकारी झाला. ह्या अधिकारावर तो असतांना २६ सेप्टेंबर १८५० रोजीं त्याला प्रथम लेफ्टनंट कर्नल व नंतर डिसेंबर १८५१ त कर्नल अशी बढती मिळाली. पुढें तो मेजर जनरल झाला व क्रौन प्रिन्सच्या-जो पुढें फ्रेडरिक बादशाहा झाला-फर्स्ट ॲडज्यूटंटच्या जागेवर ता. १ सेप्टेंबर १८५५ रोजीं त्याची नेमणूक झाली. क्रौन प्रिन्सच्या लंडन, पिटर्सबर्ग, मास्को व

पॅरिसि या ठिकाणच्या प्रवासांत मोल्टके या राजपुत्राच्या बरोबर होता. प्रवास संपवून परत आल्यावर ता. २९ ऑक्टोबर १८५७ रोजी सैन्याच्या जनरल स्टाफच्या मुख्याच्या जागीं त्याची हंगामी नेमणूक झाली व पुढल्या वर्षी सप्टेंबरांत तो कायम झाला. सन १८५९ च्या मे महिन्यांत तो लेफ्टनंट जनरल झाला.

सन १८६४ च्या डॅनिश युद्धांत फ्रेडरिक चार्ल्स हा मुख्य सेनानायक असून मोल्टके हा जनरल स्टाफचा मुख्य म्हणून काम करीत होता. हें युद्ध संपल्यावर तो सैन्याच्या जनरल स्टाफच्या मुख्याचें काम पुनः करूं लागला. ऑस्ट्रिआबरोबर युद्धप्रसंग घडल्यास प्रशिआला यश येण्याचा संभव कितपत आहे, याविषयीं विचार करण्याकरितां बर्लिन येथें एक सभा १८६६ च्या वसंत ऋतूंत भरली होती त्या सभेंत मोल्टके हजर होता राजाच्या अध्यक्षत्वाखालीं वरिष्ठ अधिकाऱ्यांची सभा भरली त्या वेळीं युद्धव्यापाराच्या हालचालींच्या योजना त्यानें सभेपुढें मांडल्या. या योजनांप्रमाणें नेटानें व हिंमतीनें काम केल्यास यश येणारच असें त्याचें मत होतें. ता ८ जून रोजीं पायदळाच्या मुख्य अधिकाऱ्याच्या जागीं त्याची नेमणूक झाली व सैन्याच्या हालचालींचा सूत्रधार म्हणून राजाच्या छावणींत यानें काम करावें, असा हुकूम सुटला.

युद्धकलेंतील नैपुण्यानें जो पुरुष यूरोपखंडाला लवकरच थक्क करून सोडणार होता, त्या पुरुषाच्या पूर्वचरित्राचें सार्धे व थोडक्यांत वर्णन हें असं आहे. अचाट बुद्धिसामर्थ्याच्या परंतु कर्तृत्ववान् सेना-

नायकांच्या ठिकाणीं सैनिकांची विशेष श्रद्धा असते. अशी श्रद्धा, हॅनिबॉल, अॅलेक्झँडर, सीझर, क्रॉम्वेल, ट्यूरेन, ल्काइव्ह, यूजेन, मार्ल्-बरो, व्हिलर्स फ्रेडरिक, लौडन व विशेषतः नेपोलिअन यांच्याविषयीं त्यांच्या सैनिकांत फारच वसत असे तशीच श्रद्धा मोल्टके याच्याविषयीं त्याच्या सैनिकांस वाटे. वर सांगितलेल्या सेनानायकांपैकीं सर्वश्रेष्ठ सेना-नायकाच्याच योग्यतेचा मोल्टके होता असें इतिहासकार म्हणतील, असा या म्हणण्याचा इरादा नाहीं. कारण सामान्य बुद्धीच्या वरच्या पायरीच्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर मोल्टकेची कधीं गांठच पडली नाहीं. परंतु सैन्यरचनाविशारद, युद्धकलापारंगत, धाडसी परंतु दूरदर्शित्व-पूर्ण असें धोरण लढविणारा, शत्रूचीं छिद्रें बिनचूक हुडकून काढणारा, आपल्या सैनिकांच्या हृदयांत स्वतःच्या नेतृत्वाविषयीं पूर्ण विश्वास उत्पन्न करणारा असा सेनानी म्हणून स्वर्गांतील ज्या ठिकाणीं जगां-तील प्रसिद्ध योद्ध्यांचे आत्मे वास करीत असतील, त्या ठिकाणीं प्रवेश करण्याचा हक्क मोल्टके यास खास मिळेल. तो स्वतः निर-भिमानी असून कोणत्याहि गोष्टींत आपला मोठेपणा मिरविण्यास कधींहि उत्सुक नसे. स्वतःच्या गुणांचें चीज करून घेण्याची खटपट करण्यापेक्षां तो दुसऱ्यांच्या गुणांचें चीज करण्याच्या कामांत तत्पर असे. म्हणून त्याच्या मोठेपणाविषयीं कोणासहि असूया अथवा द्वेष वाटत नसे. अंगीं गुणवैशिष्ट्य असून महत्त्वाकांक्षेचा अभाव या अपूर्व योगाचें मोल्टके हें एकच उदाहरण होतें. ड्यूक ऑफ वेलिंग्टन याच्याप्रमाणें कर्तव्यावर अढळ दृष्टि ठेवून तो आपलीं सर्व कामें करीत असे.

युद्धाला आरंभ झाला तेव्हां प्रशिअन सैन्याचे जे नायक होते त्यांच्याविषयीं चार शब्द लिहिणें जरूर आहे. प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स प्रशिआचा क्रौन प्रिन्स व जनरल हर्वार्थ फॉन बिटेनफील्ड असे तीन सेनानी या वेळीं होते.

प्रिन्स फ्रडरिक चार्ल्स.

विल्यम राजाचा धाकटा भाऊ प्रिन्स चार्ल्स याचा प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स हा एकुलता एक मुलगा होता. ता. २० मार्च १८२८ रोजीं बर्लिन येथें याचा जन्म झाला होता. त्याच्या बाल्यावस्थेपासून त्यास लष्करी शिक्षण देण्यांत आलें होतें. त्याच्या वयाला वीसहि वर्षे ज्यांनीं नव्हतीं तेव्हांच त्याला मेजर फॉनरून–हाच पुढें युद्धमंत्री झाला– याच्या नजरेखालीं ठेविला व तो बॉन येथें महाविद्यालयांत असतांना फॉनरून त्याच्या बरोबर होताच (१८४६–४८) कॅपटन या हुद्यावर असतांना त्यानें सन १८४८ च्या डॅनिश युद्धांत भाग घेतला होता व त्यावेळीं घोडेस्वारांच्या पलटणीच्या नेत्याच्या अंगीं लागणारे विशिष्ट गुण त्याच्या ठिकाणीं आहेत ही गोष्ट उत्तम तऱ्हेनें दृष्टोत्पत्तीस आली होती. सन १८४९ सालीं त्याचा चुलता बॅडेन येथील बंड मोडण्याच्या कामांत गुंतला होता तेव्हां त्याच्या हाताखालच्या कामगारांमध्यें हाहि कामावर होता. वीसेनथालच्या संग्रामांत त्याला दोनदां जबर जखमा झाल्या, परंतु त्या युद्धांत त्यानें युद्धशास्त्राचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. शिपाइगिरीच्या धंद्याची त्याला खरी खरी आवड असल्यामुळें दुसरा फ्रेडरिक व नेपोलिअन यांच्या

मोहिमींच्या इतिहासाचीं त्यानें पारायणें केलीं युद्धकलेच्या ज्ञानांत तो चांगला निपुण झाला व सन १८६० सालीं त्यानें एक पत्रक लिहिलें आणि तें खासगी रीतीनें लोकांत वांटिलें. या पत्रकांत सन १८५९ सालच्या इटॅलिअन युद्धांत फ्रान्सच्या बादशाहानें जे डावपेंच केले होते त्यांच्यावर त्यानें स्वरमरीत टीका केली होती. याच पत्रकांत जर्मन व फ्रेंच सैन्यांची तुलना करून जर्मन सैन्य फ्रेंच सैन्यापेक्षां सरस आहे असें त्यानें दाखविलें होतें. सन १८६१ सालीं त्याला घोडेस्वारांच्या पलटणीचा जनरल हा हुद्दा मिळाला. सन १८६४ सालीं डचीजवर स्वारी झाली त्यावेळीं प्रशिअन सैन्याच्या उजव्या बाजूचें आधिपत्य त्याच्याकडे होतें. तो कोणत्याहि गोष्टीचा निकाल झटकर करी, त्याच्या हालचाली अगदीं त्वरित होत व त्याचे बेत अत्यंत विचारपूर्वक ठरलेले असत, या सर्व गुणांमुळें या युद्धांत सेनानायकाला अवश्य असे पुष्कळसे गुण त्याच्या अंगीं असल्याचें चांगल निदर्शनास आलें. तह झाल्यावर त्यानें आपला युद्धशास्त्राचा अभ्यास पुनः सुरू केला. प्रशिआमध्यें त्याची वरींच कीर्ति झाली होती व पुष्कळ अधिकाऱ्यांना हा पुढें चांगलाच उदयास येऊन मोठ्या उच्च पदास पोहोंचणार असें वाटू लागलें होतें. तो आपल्या हाताखालच्या लोकांस फारच प्रिय झाला होता.

क्रौन प्रिन्स.

दुसरा सेनापति, प्रशिआचा क्रौन प्रिन्स फ्रेडरिक हा होता. हा गादीवर असलेल्या राजाचा एकुलता एक मुलगा होता. त्याचा जन्म ता. १८ ऑक्टोबर १८३१ रोजीं झाला व तो आपल्या चुलत भावा-

पेक्षां तीन वर्षांनीं लहान होता. ह्याला लष्करी शिक्षण मिळालें होतें, परंतु हा गादीचा वारस असल्यामुळें तो उत्तम राजकार्यक्षम होईल असें शिक्षण त्यास देण्याची जास्त काळजी घेतली होती. तो निष्कपटी, दानशूर, निश्चयी, न्याय्यमताभिमानी व सदाचारप्रिय असा होता व यामुळें त्याचें सर्व चरित अत्यंत उदार बनलें होतें विरोधाची नांगी काढून घेणें व लोकमताशीं जुळतें घेणें या कामांत त्याचा हात कोणींहि धरूं शकला नाहीं. तो यापूर्वी डॅनिश युद्धांतच काय तो प्रत्यक्ष रणांगणांत गेला होता. परंतु त्या वेळेसहि विशेष जबाबदारीचें असें काम त्याच्याकडे नव्हतें. एवंच, साक्षात् युद्धाचा अनुभव त्यास मुळींच नव्हता असें म्हटल्यास हरकत नाहीं. ज्या सैन्याच्या शिरावर एक विशिष्ट कामगिरी बजावण्याचा मोठा भार टाकला होता त्या सैन्याचें धुरीणत्व या क्राउन प्रिन्सकडे देण्यांत प्रशिआ एक मोठा प्रयोग करून पाहत होता असें म्हटलें पाहिजे. या युद्धांत असा एक प्रसंग आला कीं, त्यांतून निभाव लागणें किंवा न लागणें हें सर्वस्वीं हा राजपुत्र जसें वर्तन करील, त्यावर अवलंबून होतें. या ऐनप्रसंगीं त्यानें जी कार्यक्षमता व निर्णयबुद्धि दाखविली, त्यांवरून त्याची निवड सर्वथैव योग्य झाली होती असच ठरलें.

फॉन बिटेनफील्ड.

तिसरा सेनापति हर्वर्थ फॉन बिटेनफील्ड, याचा जन्म १७९६ त झाला होता. तो आपल्या दोन्ही साथीदारांपेक्षां वयानें मोठा होता. तो १८११ सालीं लष्करांत शिरला व १८१३–१४ च्या स्वाऱ्यांत रणांगणांत हजर होता. १८१५ त तह झाल्यावर

त्यानें पांच वर्षें अॅडज्यूटंटचें काम केलें. पुढें १८२१ त तो कॅप्टन झाला व या प्रमाणें त्यानें आपल्या पलटणींतच वीस वर्षें नोकरी केली. १८३९ त त्याला मेजर हा हुद्दा मिळाला व १८४८ त त्याला पायदळ पलटणीचा कर्नल केलें. आलमट्झ येथें प्रशिआनें हार खाल्ल्यावर तो फ्रँकफोर्ट येथील प्रशिअन सैन्याचा सेनानी होऊन त्याला १८५२ त मेजर जनरल हा किताब मिळाला. १८५६ सालीं ऑगस्ट महिन्यांत तो सातव्या तुकडीचा सेनापति झाला व पुढें दोन महिन्यांनीं त्याची लेफ्टनंट जनरलच्या जागेवर बढती झाली. १८६४ त डॅनिश युद्धाला आरंभ होईपर्यंत निरनिराळ्या सेनाधिपत्याच्या महत्त्वाच्या जागा त्याला मिळाल्या होत्या. डॅनिश युद्धांत सज्ज झालेल्या पहिल्या तुकडीचा सेनाधिपति होऊन त्यानें आलसेन बेट हस्तगत करून घेऊन मोठी कीर्ति मिळविली. सैन्य कितीहि मोठें असलें तरी तें हुकमतींत ठेवण्याचें अद्वितीय कौशल्य, लायक सेनानायकाच्या अंगीं असणारें धाडस व बिकट प्रसंगीं डोकें शांत ठेवणें या सर्व गुणाबद्दल त्याची फार ख्याति होती. हे गुण लक्षांत आणूनच त्याच्या वयाच्या सत्तराव्या वर्षींहि तीन चढाई करणाऱ्या प्रशिअन सैन्यापैकीं एका सैन्याचें नायकत्व राजानें त्यास दिलें.

बेनेडिक

ऑस्ट्रिआनें समरांगणांत आणलेलें सैन्य व ऑस्ट्रिआचे दोस्त यांच्याविषयीं माहिती त्यांच्या पराक्रमाच्या वर्णनाच्या वेळीं देण्यांत येईल. परंतु ऑस्ट्रिअन सैन्याचा जर्मनींतील सेनाधिपति लड्विग फॉन बेनेडिक याची थोडक्यांत माहिती येथें देणें अवश्य आहे.

बेनेडिक हा हंगेरिअन असून त्याचा जन्म १८०४ जुलई महिन्यांत ओडेन्बर्ग येथें झाला. तथापि त्याचें शिक्षण वीनर–न्यूस्टॅड येथील लष्करी विद्यालयांत होऊन तेथून तो लेफ्टनंटची सनद घेऊन सन १८२२ त बाहेर पडला. त्याला १८४० त मेजर, १८४३ त लेफ्टनंट कर्नल व १८४६ त कर्नल असे हुद्दे अनुक्रमें मिळाले तो कर्नलच्या अधिकारावर असतांना गॅलिशिआंतील बंड मोडण्याच्या कामीं धैर्य व सेनानायकाचें कौशल्य हे दोन गुण त्यानें लोकांच्या चांगलेच नजरेस आणून दिले. सन १८४८–४९ च्या इटॅलिअन युद्धांत तो हजर होता. १८४९ च्या हंगेरिअन युद्धांत त्याला पुष्कळ जखमा झाल्या खऱ्या, परंतु त्याला त्यावेळीं मेजर–जनरल हा हुद्दा मिळाला. हंगेरी शरण आल्यावर मार्शल रॅडेटझ्कीच्या अधिकारिमंडळांत मुख्य अधिकाऱ्याची जागा त्याला मिळाली. १८५३ त तो फील्ड मार्शल लेफ्टनंट झाला. क्रिमिअन युद्धांत गॅलिशिआ येथें निरीक्षण करणाऱ्या सैन्याचें नायकत्व त्याजकडे दिलें. १८५९ त फ्रान्स व इटली यांच्या युद्धांत रणांगणावर त्यानें चांगली कामगिरी केली सालफेरिनोच्या लढाईंत ऑस्ट्रिअन सैन्याच्या उजव्या बाजूचें आधिपत्य त्याच्याकडे होतें. त्यानें इटॅलिअन लोकांचा हल्ला पूर्णपणें परतवून लाविला आणि म्हणून ज्या तुकडीचा पराभव झाला नाहीं अशी ही त्या सैन्याची एकच तुकडी होती. नोव्हेंबर १८५९ त तो तोफखान्याचा इन्स्पेक्टर–जनरल झाला. पुढें दोन महिन्यांनीं सर्व लष्कराच्या स्कार्टर–मास्टर जनरलची जागा त्याला मिळाली. एप्रिल महिन्यांत हंगेरीच्या मुलकी व लष्करी भागाच्या गव्हर्नराच्या जागेवर त्याची नेमणूक झाली.

ह्या जागेवरून त्याची बदली इटलींतील ऑस्ट्रिअन सैन्याच्या व व्हेरोनाच्या उत्तरभागीं आल्पाइन प्रदेशांत संरक्षणार्थ राखून ठेवलेल्या सैन्यांच्या मुख्य सेनापतीच्या अधिकारावर झाली. प्रशिआबरोबर लवकरच युद्ध जुंपणार असें वाटल्यावर जर्मनींतील ऑस्ट्रिअन सैन्याचें आधिपत्य स्वीकारण्याचा हुकूम त्याला झाला व इटलींतील त्याच्या जागेवर आर्च ड्यूक आल्बर्ट याची नेमणूक झाली. सैनिकांना तो अत्यंत प्रिय होता व सर्व लष्करांत त्याच्यासारखा कार्यक्षम सेनाधिपति दुसरा कोणाहि नाहीं अशी त्याची प्रख्याति होती, या दोन मुद्यांवर ही त्याची निवड झाली होती. तज्ज्ञांना त्याच्या अंगीं सेनाधिपतीला अवश्य अशी बुद्धिमत्ता कितपत होती हें अजमावण्यास कांहीं साधन नव्हतें त्याच्यावर त्याच्या सैनिकांचा पूर्ण विश्वास होता हें खरें परंतु त्यानें मुख्य सेनापतीचें काम आजपर्यंत केलें नव्हतें युद्धांत जो सेनापति क्वचित्च चुकतो त्यास जयश्री माळ घालते. एकमेकांशीं भगडणाऱ्या दोन्ही पक्षांकडील सैन्यांच्या मुख्य अधिपतींपैकीं चुकींतून एकहि सुटला नव्हता असें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल, परंतु बेनेडिक याची चूक मोल्टकेच्या चुकीपेक्षां फार ढोबळ होती त्यांतहि ही चुकी मोठ्या विकट प्रसंगी घडल्यामुळें तिचा परिणाम अत्यंत घातुक झाला.

येथवर दोन्ही पक्षांतील प्रधान सेनानायकांची थोडी ओळख करून दिली. ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांपैकी कोणाचें वर्चस्व जर्मनींत होणार याचा निकाल ज्या रणांगणांवर लागणार होता त्याचें वर्णन पुढील प्रकरणांत येईल.

प्रकरण ८ वें.

सन १८६६ सालचें युद्ध—हॅनोव्हर व इलेकटोरलहॅसी—लॅजेन्सालझा आणि विल्हेल्मशाहे.

तारेनें प्रथम सूचना मिळाल्याबरोबर पुढें चालूं लागण्यास अगदीं सज्ज असावें असा हुकूम प्रशिअन सरकारनें पलटणी व तुकड्या यांच्यावरील निरनिराळ्या अधिकाऱ्यांना ता. १३ व १५ जूनलाच सोडून ठेविला होता. ता. १५ ला हॅनोव्हर, इलेकटोरलहेसी आणि सॅक्सनी यांच्या विरुद्ध ता १८ रोजीं प्रशिआनें युद्ध पुकारलें या पैकीं प्रथम ता. १३ रोजीं प्रशिअन सैन्याची मांडणी अशी होती:— प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या हाताखालचें पहिलें सैन्य सॅक्सन सरहद्दीवर गार्लिट्झपर्यंत पसरलें होतें. या सैन्यांत एकंदर ९३,००० सैनिक होते; म्हणजे यांत दुसरी, तिसरी व चौथी इतक्या पलटणी आल्या होत्या. क्रौन प्रिन्सच्या हाताखालच्या दुसऱ्या सैन्यात एकंदर १,१५,००० सैनिक होते व यांत पहिली, पांचवी व सहावी या पलटणींचा व गार्ड पलटणीचा समावेश होता. हें सैन्य सायलेशिआंत नीसी येथें एकत्र जमा होऊन बसलें होतें. तिसऱ्या सैन्याला आर्मी ऑफ एल्ब (एल्ब नदीचें सैन्य) अशी संज्ञा होती, व तें एल्ब नदीच्या डाव्या कांठावर सॅक्सनीच्या संमुख तळ देऊन बसलें होतें. यांत सातव्या व आठव्या पलटणीचा प्रत्येकीं एक एक विभाग आला असून त्याची एकंदर सैनिक संख्या ४६००० होती. या सैन्याचा

मुख्य सेनानायक हर्वर्थ फॉन बिटेनफील्ड हा होता. या शिवाय या सैन्याचे दिमतीस २४,३०० लँडवरची राखून ठेवलेली पलटण होती, परंतु तीस अजून सज्ज केलें नव्हतें. राखून ठेवलेल्या सैनिकांत सुद्धां या तीन सैन्यांत एकंदर २,७८,००० सैनिकांचा भरणा होता. परंतु एकदम उपयोगांत आणितां येईल असा जो प्रशिअन सैन्याचा मोठा भरणा त्याचाही रणांगणांत ठाकलेलीं सैन्यें म्हणजे फक्त भाग एक होता. बाकी सज्ज असलेल्या सैन्याची व्यवस्था अशी होती —

स्थल	सैनिक संख्या	सेनानी
मिंडेन	१४,३००	जनरल फॉन फॉल्केन्‌ह्यीन
हँबर्ग	१४,१००	मँटाइफेल
वेट्झ्लर	१९,६००	बेयर-ही पलटण इलेकटोरल हेसींत घुसण्यास अगदीं तयार होती.

ह्या सर्वांचें एकीकरण केल्यास तत्क्षणीं उपयोगांत आणितां येईल अशी प्रशिअन सैनिकांची एकंदर संख्या ३,२६,६०० होती.

ऑस्ट्रिअन सैन्य.

ऑस्ट्रिआच्या सैनिकांची एकंदर संख्या यापेक्षां थोडी जास्त होती खरी, परंतु ऑस्ट्रिअन सैनिकांची स्थिति तत्क्षणीं युद्धास आरंभ करण्यासारखी नव्हती; त्यांचा मिलाफहि प्रशिअन सैनिकां सारखा नव्हता; त्यांची शस्त्रास्त्रांची सामुग्रीहि इतकी उत्तम नव्हती व त्यांच्यावर इतक्या कडक्या शिस्तीचा दाबहि नव्हता. ऑस्ट्रिआला आपलें सैन्य द्विधा करावें लागलें हें ऑस्ट्रिआचें

दुर्दैव होय. ऑस्ट्रिआला सैन्याच्या एका भागाला 'उत्तर भागचें सैन्य' असें नांव देऊन त्याची स्थापना जर्मनींत बेनेडिक याच्या हुकमतीखालीं करावी लागली. दुसऱ्या पक्षीं इटलीच्या प्रतिकूल वर्तनामुळें दुसरा सैन्यभाग 'दाक्षिण भागचें सैन्य' या नांवाचा इटलीच्या चार किल्ल्यांनीं बनलेल्या चौकोनांत किंवा त्याच्या समंतात स्थापित करणें ऑस्ट्रिआला प्राप्त झालें. हा सैन्यभाग आर्चडयूक ऑल्बर्ट याच्या आधिपत्याखालीं होता त्याची माहिती पुढें योग्य स्थळीं येईल. उत्तर भागच्या सैन्यांत पलटणींतील, तोफखान्यांतील व घोडेस्वारांच्या तुकड्यांतील सर्व मिळून २,४७,००० सैनिक होते; परंतु यांना २४,००० सॅक्सन सैनिक येऊन मिळाल्यामुळें सैनिकांची एकंदर संख्या २,७१,००० पर्यंत गेली. या शिवाय क्रॅको, आलमट्झ, थेरेसीन स्टॅड, जोसेफ स्टॅड व कॉर्निग्रॅट्झ या ठिकाणीं ठेवलेली शिबंदी ५,४००० होती. ऑस्ट्रिआनें 'बंड'च्या सैन्याला ७,००० लोकांची भर दिली होती. 'बंड'च्या सैन्याला निरनिराळ्या संस्थानांनीं मदत दिली होती ती अशी:—बव्हेरिआ ५२,०००, वर्टेंबर्ग १६,२५०, बॅडेन १०,८५०. हेसी डार्मस्टॅड ९,४००, नॉसा ५,४००, हॅनोव्हर १८,४०० हेसीकासल (इलेकटोरलहेसी) ७०००. परंतु प्राशिआनें युद्ध पुकारलें तेव्हां हीं सर्व सैन्यें तयार नव्हतीं व त्यांचा एक मिलाफहि झाला नव्हता.

हॅनोव्हरचा परिस्थिति.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्राशिआनें ऑस्ट्रिआला युद्धाला तयार होण्याला आव्हान जरी ता. २१ जून रोजीं पाठविलें तरी सॅक्सनी,

हॅनोव्हर आणि इलेक्टोरलहेसी यांपैकीं एकहि राज्य प्रशिआच्या पक्षाला येऊन मिळणार नाहीं, असें प्रशिआला समजण्याबरोबर प्रशिअन सरकारानें आपल्या सेनापतीस अगोदरच म्हणजे ता. १५ जून रोजीं इशारत देऊन ठेविली कीं सूचना होईल त्या क्षणींच तुम्ही संस्थानांवर चाल करून जाण्यास सिद्ध असलें पाहिजे जो शत्रु म्हणून खास ठरला, त्याच्यावर त्याच्या साधनसामुग्रीची पूर्तता होण्यापूर्वी चालून जाऊन तुटून पडणें हा राजनीतींतील पहिला धडा दुसरा फ्रेडरिक यानें १८५६ त घालून दिला. तोच धडा प्रशिआनें या वेळेस गिरविला.

प्रशिआचा डोळा हॅनोव्हरवर फार दिवस होता; म्हणून हॅनोव्हवरलाच पहिला तडाका सोसावा लागला. ह्या पूर्वी युद्धाच्या तयारीस लागणें हॅनोव्हरला शक्य नव्हतें. कारण तशी थोडी हालचाल जरी हॅनोव्हरनें केली असती तरी त्याच्या बलवान् शेजाऱ्याला त्याच्यावर एकदम हल्ला करण्यास तेवढेंच खुसपट पुरें झालें असतें. अर्थात्च ह्या वेळपर्यंत हॅनोव्हरची युद्धाची तयारी म्हणून कांहींच नव्हती. हॅनोव्हेरिअन शिपाई आपल्या उन्हाळ्यांतील शांततेच्या काळाच्या कवाइती करण्यास जमण्याच्या तयारींत होते परंतु प्रशिआनें चढाई करण्याच्या हेतूनें सैन्याची मांडणी चालविली आहे व प्रशिअन सैन्याला कूच करण्याचे हुकमहि सुटले आहेत असें ता. १५ रोजीं हॅनोव्हरच्या राजाच्या कानीं आलें. त्याबरोबर राजानें आपल्या सर्व सैनिकांस अति त्वरा करून गाटिंजेन येथें जमावें, असा

17 JAN 1994

हुकूम सोडला. सैनिकांनीं राजाज्ञा विलंब न लावितां मान्य केली व ता. १८ रोजीं बहुतेक सर्व सैनिक राजा व क्रौन प्रिन्स यांस संकेत-स्थानीं येऊन मिळालें.

त्यांची कांहींच तयारी नव्हती. पोषाख, शस्त्रास्त्रें वगैरे युद्ध-साहित्य, सामान वाहून नेण्याचीं साधनें व दारूगोळा यांचा फार तुटवडा होता. या सेनेजवळ १५,००० पायदळ–यांपैकीं दोन हजाराची भरती फक्त दोन महिन्यापूर्वीच झाली होती–२,२०० घोडेस्वार व ४२ स्त्रारीच्या तोफा एवढींच सामग्री होती. तोफ-खान्याच्या साहित्यांत ४० गाडे व राखून ठेवलेल्या ० तोफा होत्या राजा, सेनानायक व प्रजाजन यांनीं साहित्याची कमतरता भरून काढण्याकरितां सतत परिश्रम केले परंतु वेळ फार थोडा होता व देशाचीं साधनें फार अपुरीं होतीं. यामुळें शत्रू संनिध आला तरी हॅनोव्हेरिअन लष्करांत कूच करण्याच्या सामग्रीचा अत्यंताभावच होता सैनिकांची मनःस्थिति मात्र अत्युत्तम होती आपल्या शेजाऱ्याच्या फार दिवस दबा धरून बसलेल्या अतितृष्णेला आपण बळी पडण्याचा बिकट प्रसंग जवळ येऊन ठपला आहे अशी त्यांस पुरी जाणीव असल्यामुळें शत्रूस न डगमगतां तोंड देणें हें काम जसें राजाचें तसेंच आपलेंहि आहे अशी त्यांची दृढ भावना होती व त्यांनीं आपला उत्साहभंग मुळींच होऊं दिला नाहीं

फ्रेंच सैन्याच्या झुंडीच्या झुंडी हॅनोव्हरमध्यें शिरतात.

याप्रमाणें हॅनोव्हेरिअन सैन्याची तयारी चालली होती. दुसरी-कडे शत्रूचें पाऊल यशःपूर्वक व अव्याहत पुढें पुढें पडत होतें. हॅनो-

PRIMARY

व्हरमध्यें शिरून तें हस्तगत करण्याचें काम ६९ वर्षांचा व युद्धांत कसलेला सेनापति व्होजेल फॉन फाल्केनस्टीन याजवर सोंपविलें होतें. त्याला तुम्हीं तारेनें सूचना मिळतांक्षणींच कूच करण्यास तयार असावें असा हुकूम ता. १३ रोजींच मिळाला होता. ता. १५ रोजीं एल्ब नदी उतरून त्यानें त्याच दिवशीं रात्रीं मँटाइफेल यास हार्बर्ग घेण्याकरितां पाठविलें. नंतर निरनिराळ्या तुकड्या पुढें पाठवून त्यानें १६ ला लुनेबर्ग व ब्रन्शॉसेन हीं हस्तगत केलीं. १७ ला मँटाइफेल यानें स्टेड किल्ला सर केला. प्रशिअन आरमारी सैन्यानें एम्डेन व एम्स नदीवरील आणि पश्चिम किनाऱ्यावरील तटबंदी यांवर हल्ला चढवून ता. १९ ते २२ या अवधींत तीं हस्तगत करून घेतलीं. इकडे सेनापति गोबेन—हा स्वतः हॅनोव्हेरिअन होता—यानें मिंडन येथील सैन्याची एक तुकडी घेऊन थेट हॅनोव्हर शहरावर चाल केली व ता १७ रोजीं संध्याकाळीं शहरांत शिरून तेथें तळ दिला. तेथें मँटाइफेलच्या पलटणींपैकीं कांहीं सैनिक येऊन ता. १९ रोजीं त्यास मिळाले व ता. २० रोजीं एक ब्रिगेड सेल नगरांत शिरली.

हॅनोव्हेरिअन्स मागें फिरतात.

ता २० लाच गॉटिंजेन येथील हॅनोव्हेरिअन सैन्याची इतकी तयारी झाली कीं, त्याला आतां पुढें कूच करण्यास हरकत नव्हती. कोणत्या दिशेनें कूच करीत जावें याविषयीं बरीच भवति न भवति झाली. अशा परिस्थितींत मतवैचित्र्य फार असतें. तोच प्रकार येथेंहि झाला. जेन येथें व्हेरिअन सैन्य जमत चालल होतें. ज्या दिशेनें जाऊन तो

सैन्याला त्वरित मिळतां येईल त्या बाजूनें कूच करणें हाच मार्ग उघड उघड श्रेयस्कर होता. प्रथम सॅक्झे-वीमर प्रांतांतील ईसेनाँच येथें जावें व तेथून थुरिंजिआंतून मजल करीत ज्या ठिकाणीं प्रिन्स चार्ल्स याच्या हाताखालच्या बव्हेरिअन सैन्याशीं मिळतां येईल तेथपर्यंत जावें हा निश्चय ता. २० संध्याकाळपर्यंत ठरलाच नाहीं.

राजानें आपल्या या लहानशा सैन्याचें आधिपत्य जनरल फॉन ॲरेंट्स्टिकल्ड यास दिलें होतें. या सैन्यांत नसेबेक, डीव्हॉक्स, ब्यूलो व बॉथमर यांच्या हुकमतींखालीं चार ब्रिगेड्स व याशिवाय राखून ठेवलेले सैनिक असे सर्व मिळून १८००० सैनिक होते. या सैन्यानें ता. २१ रोजीं सकाळीं प्रयाणास आरंभ केला. त्याच दिवशीं संध्याकाळीं ब्यूलोची अघाडीची तुकडी हेल्म्सडार्फ येथें व पिछाडीची तुकडी गॅस्मार येथें पोहोंचली. हें लहानसें सैन्य असेंच मनःपूर्वक पुढें कूच करीत गेलें असतें तर त्याच्या पुढाऱ्यांचा हेतु बहुतांशीं सिद्धीस जाण्याचा संभव होता. कारण या सैन्याला जाऊन गांठण्याचें ठिकाण व त्याचें हल्लींचें ठिकाण यांच्या दरम्यान् सुमारें ९००० सैनिकांची सेनापति फ्लीस याची एकच प्रशिअन ब्रिगेड गोथा येथें तळ देऊन बसली होती. दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २२ रोजीं अघाडीची तुकडी हेरोल्डशासेन येथें पोहोंचली; परंतु आसपास प्रशिअन सैन्याचा मोठा तळ आहे अशी बातमी आल्यामुळें ॲरेंट्स्किल्ड यानें रोखलेला मार्ग थोडा बदलला व ईसेनॉचवर न जातां लँजेन्सालझाकडे जाण्याचें असा निश्चय केला. तदनुरोधानें ता. २३ रोजीं

सैन्याचें मुख्य ठाणें लँजेन्साल्झा येथें झालें. अघाडीच्या चौक्या हेर्निंग्जलेबेन व मर्क्सलेबेन येथें व पिछाडीच्या मल्हॉसेन येथें स्थापिल्या. प्रशिअन्स आतांपर्यंत दृष्टीसहि पडले नव्हते, आणि ह्या सैन्यानें दुसऱ्या दिवशीं थुरिंनिआ ओलांडून जाण्याचा मनापासून प्रयत्न केला असता तर त्या कामांत त्यास बहुतकरून यश आलें असतें कारण गोथा येथें जें प्रशिअन सैन्य होतें त्याच्या व या सैन्याच्या संख्येचें प्रमाण १ स २ असें होतें. हीच काय ती हॅनोव्हेरिअन सैन्याला सुसंधि आली होती, परंतु प्रशिआच्या धूर्तपणामुळें त्यांना तिचा उपयोग करून घेतां आला नाहीं

प्रशिअन मसलतीचा परिणाम

हॅनोव्हेरिअन्स लँजेन्साल्झाकडे चालले असतांना प्रशिअन्स त्यांच्या वाटेवर व भोंवतालीं जमत चालले होते. सेनापति गोबन हा ता २२ ला गार्टिजेन येथें पोहोंचला; मँटाइफेलची तुकडी त्याच्या मागें एका दिवसाच्या चालीनें होतीं; फॉन फाल्केनस्टीन त्याच शहरीं ता २३ रोजीं आला. ह्या ठिकाणीं प्रशिअन सेनापतींना सुगावा बरोबर न लागल्यामुळें त्याचा गोंधळ झाला. हाइलिजेन्सटेड्च्या दिशेनें रॅंगलच्या तुकडीनें केलेली टेहळणी व्यर्थ गेली, तसेंच जनरल बेयर यास सैनिकांसह वेरा नदीच्या उतारावर नजर ठेवण्यास पाठविलें तेंहि व्यर्थ गेलें, कारण शत्रूनें तेथून नदी उतरून जाण्याचा प्रयत्नच केला नाहीं. बर्लिन येथून गार्डाच्या दोन पलटणी पेंझेनाच हस्तगत करण्यासाठीं पाठविल्या, कारण हॅनोव्हेरिअन्स

झपाट्यानें येत आहेत असें वाटल्यावरून प्रशिअन लँडवर तेथून गोथाकडे परत गेले होते, परंतु त्या पलटणी ता. २३ रोजीं रात्रौ तेथें पोहोंचल्या. गोथा येथें ९००० प्रशिअन्स होते हें पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. युद्धांत निश्चयानें कांहींच अगोदर सांगता येत नाहीं. परंतु गणितावरून पाहिल्यास लँजेन्साल्झा येथील १८००० हॅनोव्हेरिअन सैन्य ता. २३ लाच ऐझेनोचच्या बाजूनें अथवा गोथाच्या बाजूनें पुढें निघून गेलें असतें तर ता. २४ रोजीं तें प्रशिअन लोकांच्या जाळ्यांत सांपडलें नसतें.

परंतु हॅनोव्हेरिअन्स पुढें सरकले नाहींत. प्रशिअन लष्करानें आपल्या शत्रूची परिस्थिति पक्की जाणली होती. हॅनोव्हेरिअन्स आपल्या हातांतून निसटतील अशी प्रशिअन सैनिकांना भीति वाटून त्यांनीं शिळीच परंतु हटकून लागू पडणारी अशी युक्ति योजिली. हॅनोव्हेरिअन सैन्याला थोपवून धरण्याकरितां प्रशिअन सैनिकांनीं तहाचीं बोलणीं लावलीं. " तुमच्या पुढील वांटावर मोठमोठ्या पलटणींचा पाहरा आहे " हें प्रशिअन सैनिकांचें म्हणणें राजास खरें वाटलें. " तुह्मी तहाचें बोलणें लावाल तर तुम्हांस अनुकूळ अशा अटी मिळून हॅनोव्हेरिअन सैन्य पूर्णपणें शाबूत राहील " असें प्रशिअन सैनिकांनीं मोठा खात्रीचा आव आणून राजास कळविलें. राजा या भुलथापांनीं सपशेल फसला. लागलीच राजा व त्याचा मुख्य सेनापति यांनीं ऐझेनाचकडे कूच करून जाण्याचा हुकूम परतबला. या पुढें जो प्रकार घडला तो प्रशिआ व त्याचा मुख्य मंत्री

यांची माहिती असलेल्या लोकांना अटकळ करितां येईल असाच होता. बर्लिनहून आलेल्या अटी कबूल करणें शक्यच नव्हतें. दुपारपर्यंत ऐझेनाचवर कुच करून जाण्याचें थांबलें इतक्या वेळांत तेथील रक्षकांना चांगलीच कुमक येऊन मिळाली. संध्याकाळीं हॅनोव्हेरिअन्स ऐझेनाचच्या संमुख येतात तों तेथें प्रशिअनांचा फार मोठा तळ पडला आहे असें त्यांस दिसलें. म्हणून ग्रास–वेहरिंजेन येथें मुख्य ठाणें ठेवून हॅनोव्हेरिअन्स लॅंजेन्साल्झा व एझेनाच यांच्या दरम्यान् होते तेथेंच राहिले. दुसऱ्या दिवशींहि त्यांचा तळ तेथेंच राहिला, तो कां हें बरोबर सांगतां येत नाहीं. अजूनहि तहाचीं बोलणीं चाललीं होतीं, त्यामुळें राजा फसला; परंतु हीं बोलणीं केवळ आपला घात करण्याकरितां आहेत, हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं.

हॅनोव्हेरिअन्स प्रशिआच्या जाळयांत सांपडतात.

प्रशिअन सैनिकांनीं हा वेळ फुकट न घालवितां त्याचा चांगला फायदा करून घेतला. शत्रु निश्चयानें आपल्या तंडाक्यांत सांपडावा म्हणून प्रशिअन सेनानींनीं जेवढी म्हणून फौज उपयोगांत आणितां येईल तेवढी आणिली. मग त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं अशा रीतीनें तळ दिला कीं, त्यानें शत्रूस आयताच वेढा पडावा. ता. २५ रोजीं संध्याकाळीं त्यांच्या सैन्याची व्यवस्था अशी होती:—

ठिकाण.	सैन्यसंख्या.	सेनापति.
गोथा	९०००	क्लीस
ऐझेनाच	९०००	फॉन गोबेन

क्रूझबर्ग व ट्रेफर्ट	६०००	फॉन ग्लमर
कॅसेल	१२०००	रॅंगेल.

गॉटिंजेन व मिंडेन याच्या भोंवतालच्या प्रदेशांत मॅंटाइफेल आपलें सैन्य घेऊन होता. मुख्य छावणी ऐझेनाच येथें होती व याच ठिकाणीं फालकेनस्टीन ता. २५ रोजीं आला व त्याच्याकडे सर्वांचें आधिपत्य आलें.

याच दिवशीं संध्याकाळीं हॅनोव्हरचा राजा व त्याचा मुख्य सेनापति ह्यांच्या ध्यानांत आपल्या भोंवतीं शत्रूचा वेढा पडला आहे ही गोष्ट प्रथमच आली. आंतां लढण्याशिवाय दुसरा उपायच नव्हता. लागलींच ॲरेंट्स्किल्ड यानें आपलें सर्व सैन्य ग्रॉस व ऑस्टर–बेह्रिंजेन यांच्यामध्यें जमविलें. माघार खावी लागलीच तर लॉंजेन्साल्झा येथें परत जातांना संरक्षणार्थ हेन्निग्स्लेबेन येथें नेसेबेकची तुकडी ठेविली होती. नेसेबेकच्या तुकडीचा तळ कोठें व कां होता ही गोष्ट विशेष विचार करण्यासारखी आहे. कारण त्यावरून हॅनोव्हेरिअन पुढाऱ्यांच्या ध्यानांत त्यांच्या परिस्थितीचें चित्र अजून बरोबर आलें नव्हतें असें सिद्ध होतें. परत फिरण्यानें त्यांचा निभाव लागणार नव्हता. आपलें सर्व सैन्य झाडून एकाच ठिकाणीं गोळा करून आपल्या समोरील शत्रूची फळी फोडून जाण्याचा प्रयत्न करणें एवढाच एक मार्ग त्यांना खुला होता. केवळ स्वसंरक्षणाकरितां केलेल्या उपायांनीं अखेर त्यांचा नाशच होणार होता.

20 APR 1930

हॅनोव्हेरिअन सैन्याची परिस्थिति.

प्रशिअन लोकांनीं पुष्कळ वल्गना केल्या पण त्यांनीं त्या दिवशीं हल्ला चढविला नाहीं. यावरूनही वरील गोष्ट हॅनोव्हेरिअन सैनिकांच्या ध्यानांत चांगली यावयास पाहिजे होती त्यांना कुमक यावयास निघाली होती ती येऊन पोहोंचण्याचीच फक्त प्रशिअन लोक वाट पाहात होते. ह्या अवधींत राजानें दुसऱ्या दिवशीं सकाळीं हल्ला चढविण्याची तयारी चालविली. राजानें ता. १९ व २१ रोजीं बव्हेरिआचा प्रिन्स चार्ल्स व हेसीचा प्रिन्स ॲलेक्झँडर यांच्या कडे खरी स्थिति कळवून मदत मागण्याकरितां जासूद पाठविले होते ते कुमक घेऊन येतील अशी राजास आशा लागली होती.

बव्हेरिआ पुढें चाल करून येणार आहे अशी बातमी प्रशिअन छावणींत लागली होती त्यावरून मुख्य सेनापतीच्या मनांत एकदम हल्ला चढवावा असें आलें दरम्यान् हॅनोव्हेरिअन सैन्यानें अनस्ट्रट नदीच्या डाव्या तीरावर तळ दिला होता. त्या सैन्याची मांडणी अशी होती:--व्यूलोची तुकडी राखून ठेवलेल्या तोफखान्या सह उजव्या बाजूस; मर्स्लेबेन येथें मध्यभागीं डी व्हॉक्स याची तुकडी असून तिचें थॅम्स्त्र खेड्याच्या वाटेनें व्यूलोच्या ठाण्याशीं व हेलिंग्स्लेबेन ह्या खेड्याच्या वाटेनें डाव्या बाजूशीं दळणवळण होत. पहिल्या खेड्यावर एक सैन्यभाग ठेविला होता व दुसऱ्यावर केंब्रिज पलटणीचे घोडेस्वार होते. बाथमर याची तुकडी डाव्या बाजूला नॅजेल्स्टॅडकडे पसरली होती त्याची एक पलटण अनस्ट्रट नदीच्या पुलापाशीं ठेविली

होती व घोडेस्वारांच्या तीन कंपन्या टेनस्टेड व ब्रकस्टेड बाजूच्या रक्षणाकरितां ठेवल्या होत्या. नेसबेकची तुकडी राखून ठेविली होती मुख्य ठाणें मर्स्केबेन येथें होतें. व राजा थॅम्ब्रक येथें होता सर्व छावणीच्या पुढल्या बाजूला अनस्ट्रट नदी होती. नदीचे कांठ उभ्या चढणीचे होते; नदी सहज उतरून जाण्यासारखी नव्हती व पुलांच्या अभावीं घोडेस्वारांना नदी ओलांडणें अशक्य होतें. नदीच्या पलीकडून नैर्ऋत्य दिशेला जाणाऱ्या रस्त्याच्या ८० यार्ड लांबीपर्यंत एका बाजूला १० ते १५ फूट उंचीची दरड व दुसऱ्या बाजूला साल्झा ओढा असल्यामुळें येण्याचा मार्ग फारच बिकट झाला होता. या स्थळाची किल्ली मॅर्क्सलेबेन व त्याच्याच दक्षिणेला असलेली कर्चबर्ग टेकडी होती

लँजेन्साल्झाची लढाई.

मिळालेल्या हुकुमाप्रमाणें सेनापति फ्लीस आपले २,००० सैनिक घेऊन ता २७ रोजीं सकाळीं साडेसात वाजतां वाझा येथून निघून लँजेन्साल्झावर चाल करून गेला. त्याच्या बिनीचे सैनिक त्या शहराच्या वेशीपाशीं ११ वाजतां पोहोंचले व त्यांनीं वेशीचें रक्षण करणाऱ्या हॅनोव्हेरिअन शिपायांना तेथून हांकून लाविलें. हॅनोव्हेरिअन सैनिक परत जात असतांना त्यांची व नेसबेकच्या त्यांच्या मदती करितां म्हणून निघालेल्या ब्रिगेडची गांठ पडली. नेसबेकनें लागलेंच स्वसंरक्षण करण्यास अत्यंत मजबूत असें स्थळ पाहून तेथें तळ दिला. ज्या हॅनोव्हेरिअन सैनिकांना अनस्ट्रट नदीच्या उजव्या

तीरावर ठेविलें होतें ते सर्व मक्स्लेबेनकडे जाणाऱ्या अरुंद रस्त्यानें निघून जाईपर्यंत नेसबेक यानें या नव्या ठिकाणीं प्रशिअन सैनिकांना साडे अकरा वाजे पर्यंत त्यांच्याशीं लढत राहून अडवून धरिलें. नंतर प्रशिअन सैनिक ज्यूडेन्ह्यूजेल नांवाच्या टेंकडीवर तळ देऊन व राहिले. परंतु कर्चबर्ग या उंच माऱ्याच्या ठिकाणावर असलेल्या हंगेरिअन तोफांचा मारा त्यांच्यावर होऊन त्यांचें इतकें नुकसान झालें कीं, त्यांना कुमक आणवूनच त्या ठिकाणीं पुढें ठिकाव धरितां आला.

इतकें होतें तों फ्लीस याचें सर्व सैन्य या जागीं येऊन थडकलें. या सेनाधिपतीनें नंतर मक्स्लेबेन येथील हंगेरिअन सैन्याच्या मध्यावर जोराचा हल्ला केला हा हल्ला परतवून लाविल्याबरोबर डाव्या बाजूनें बाथमर व उजव्या बाजूनें ब्यूलो यांनीं प्रशिअन बगलांवर हल्ला करण्याकरितां अनस्ट्रट नदी ओलांडली. डी व्हॉक्सची फौज या हल्ल्यांत मदत करण्याकरितां पुढें सरसावली व राखून ठेविलेले सैनिक मध्याच्या जवळ आले जमिनीच्या प्रतिकूलतेमुळें बाथमरचा हल्ला फसला, परंतु एक वाजण्याच्या सुमारास ब्यूलो नदी उतरून गेला. त्यानें प्रशिअन सैनिकांना माघारी फिरवून लाविलें. नंतर त्यान अनस्ट्रट व साल्झा यांच्यामध्यें सोईची जागा पाहून तेथें तळ दिला. या स्थळीं अर्ध्या तासानंतर गार्डांची पहिली व दुसरी तुकडी येऊन त्याला मिळाली. नंतर ब्यूलो पुढें चाल करून गेला व कॅलेनबर्गची मिल या नांवाच्या भक्कम स्थानावर त्यानें जोराचा हल्ला चढविला.

आणखी पुढें जाऊन त्यानें ज्यूडेनह्यूजेलपासून प्रशिअन सैनिकांना घालवून दिलें. त्यानें इतर स्थलांवरहि हल्ला चढविला व सुमारें दोन वाजतां प्रशिअन लोकांना लँजेन्साल्झा येथून हांकून लाविलें.

फ्लीसचा हल्ला फसला खरा, परंतु हल्ला करण्याचा अंतःस्थ हेतु मात्र साध्य झाला होता. तो हॅनोव्हेरिअन लोकांना आणखी एक दिवस येथेंच थोपवून धरणें हा होय. फार मोठी कुमक कुच करीत येत आहे हें त्यास माहीत होतें. ती कुमक प्रत्यक्ष येऊन पोंचपर्यंत हॅनोव्हेरिअन्स जर तेथेंच अडकून पडले, तर दुसऱ्या दिवशीं सकाळाला ४०,००० लोकांचा गराडा त्याच्या भोंवतीं एकदा पडल्यावर त्यांस निसटून जाणें शक्य नव्हतें. तथापि आपल्या सैन्याची आणखी खराबी होणें चांगलें नाहीं असा विचार करून फ्लीस सुमारें साडेतीन वाजतां परत फिरला व अशा रीतीनें हॅनोव्हेरिअन लोकांना जय मिळाला. त्यांनीं प्रशिअन सैन्याचा पाठलाग सुमारें एक तास केला. मृत व जखमी झालेल्या हॅनोव्हेरिअन सैनिकांची संख्या जास्त होती; परंतु त्यनीं ९०७ प्रशिअन सैनिकांस कैद केलें होतें व त्यांपैकीं दहा अधिकारी होते. पुढें झालेल्या घडामोडींत हे सर्व लोक सुटले; इतकेंच नाहीं, तर दोन तोफा व दोन हजार बंदुका ठेवण्याचे सच हॅनोव्हेरिअन लोकांच्या हातीं पडले त सर्व प्रशिअन लोकांना परत मिळाले.

हॅनोव्हेरिअन्स शरण जातात.

सुमारें साडेचार वाजतां पाठलाग थांबला. नंतर तळ होता तेथेंच ठेवावा किंवा सर्व रात्रभर मजल करून थुरिंजिआंत शिरावें

असा हॅनोव्हेरिअन लोकांस विचार पडला ब्रॉक्हॉस नांवाचा एक प्रशिअन लेखक आहे. त्याचे लेख बहुतकरून सत्याला धरून लिहिलेले असतात. या वेळच्या परिस्थितीविषयीं थोडक्यांत त्याचें म्हणणें असें आहे:—" विजयश्री हॅनोव्हेरिअन लोकांच्या बाजूला होती यांत बिलकुल शंका नाहीं. यावेळीं यांना दक्षिणेकडे निघून जाऊन बव्हेरिअन लोकांना मिळण्याची उत्तम संधि आली होती. परंतु त्यांनीं त्या संधीचा उपयोग करून घेतला नाहीं ते पार निसटून गेले असतें किंवा नाहीं याची शंका आहे सैनिक थकले होते; मृतांना मूठमाती द्यावयाची होती; एका जोराच्या लढाईला पुरेल इतकाच काय तो दारूगोळा त्यांच्याजवळ हाता; अन्नाचा भरपूर पुरवठा करणें अशक्य होतें; निरनिराळ्या दिशांनीं प्रशिअन लोक त्यांच्याभोंवतीं वेढा घालण्यास येत होते; व या पुढें रक्तस्राव झाल्यापासून कोणतेंहि हित साध्य होणार नव्हतें असें वरिष्ठ अंमलदारांचें मत होतें. ह्या कारणांमुळें राजा व त्याचे अधिकारी यांनीं असलेलें स्थान सोडावयाचें नाहीं व दुसऱ्या दिवशीं तेथूनच तहाचें बोलणें करावयाचें असा निश्चय केला ता. २८ रोजीं ऐझेनाच यथील मुख्य सेनाधिपति फान फॉलकेनस्टीन यानें तहाच्या शर्ती तयार केल्या व त्या प्रशिआच्या राजाकडे मंजुरीकरितां पाठविल्या. त्यांत फेरफार होऊन राजाची मंजुरी आल्यावर हॅनोव्हेरिअन सेनाधिपतीनें त्या कबूल केल्या. शर्ती पुढील आशयाच्या होत्या:-(१) हॅनोव्हरचा राजा व क्रौन प्रिन्स यांनीं त्यांना पाहिजे तो परिवार घेऊन हॅनोव्हर खेरीज करून बाटेल त्या ठिकाणीं वसतिस्थान करावें; (२) हॅनोव्हेरिअन

सैन्यांतील लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांनीं प्रशिआच्या विरुद्ध पक्षांत नोकरी करणार नाहीं असें वचन द्यावें; त्यांचीं शस्त्रें त्यांच्या जवळ ठेवण्यांत येतील व त्यांचा पगारहि त्यांस मिळेल, परंतु हॅनोव्हरच्या स्वतंत्र कारभाराशीं त्यांचा जो संबध होता तोच त्यांनीं प्रशिआ हॅनोव्हरचा कारभार करील त्याच्याशीं राखिला पाहिजे; (३) खालच्या दर्जाच्या शिपायांनीं आपलीं हत्यारें खालीं ठेवून व प्रशिआच्या विरुद्ध आम्ही लढणार नाहीं अशी शपथ घेऊन घरोघर निघून जावें; (४) शस्त्रास्त्रें, घोडे व लढाईचें इतर सामान प्रशिआच्या स्वाधीन करावें.

हॅनोव्हरच्या वर्तनाविषयीं विचार.

ह्या शर्तींचा अर्थ अगदीं उघड आहे. ह्या पुढें जर्मनींत ग्यूल्फच्या घरण्याचें राज्य संपलें हाच त्यांचा अर्थ. आपल्यापेक्षां पुष्कळ पटीनें मोठ्या सैन्यांशा गांठ पडून आपला प्रत्येक माणूस कापला गेला तरी बेहेत्तर असा मनाचा धडा करून या प्राचीन घराण्यांतील राजानें सैन्यासह थुरिंजिआंतून परत जाण्याचा प्रयत्न केला असता तर फार बरें झालें असतें. बिस्मार्कच्या छंदानें चालणारा राजा आपणावर कशी कृपादृष्टि करणार याची वाट पाहात बसण्यापेक्षां कुच करून जाण्याचा प्रयत्न करणेंच बरें होतें जबरदस्ती विरुद्ध हक्क यांतलाच हा प्रकार होता. ज्या पक्षाची राजा व त्याची प्रजा यांना अंतःकरणपूर्वक मोठी चीड येत होती त्या पक्षाला येऊन तरी मीळ किंवा होणाऱ्या हल्ल्यास तोंड दे असें हॅनोव्हरच्या राजास सांगण्यांत आलें होतें. चोरी करण्यांत तरी सामील हो किंवा

तुझें सर्वस्व गमविण्यांस तरी तयार हो असा धाक घातलेल्या खासगी माणसाची जी स्थिति असते ती स्थिति या राजाची झाली होती. हॅनाव्हरच्या राजानें त्यास रास्त वाटलें तें केलें व त्याचें फळ त्यास भोगावें लागलें.

प्रशिआला फार मोठा लाभ होतो.

ज्या युद्धाच्या हालचालींमुळें हॅनोव्हरला प्रशिआस शरण जावें भाग पडलें त्याची हकीकत जरा सविस्तर रीतीनें दिली. कारण युद्धांतील अति महत्त्वाच्या गोष्टींपैकीं ही एक गोष्ट होती. युद्धांत हा पहिलाच मोठा आघात हॅनोव्हरवर झाला व त्यापासून प्रशिआला लाभहि फार मोठा झाला. ऑस्ट्रिआ विरुद्ध उघड रीतीनें युद्ध पुकारण्याला एक आठवडा होतो न होतो तोंच आपल्या शत्रूपैकीं एकाला हतवीर्य करून प्रशिआनें ज्याचें क्षेत्रफळ २३०० मैल होतें व ज्याची लोकसंख्या ४०,००,०० होती अशा देशाच्या सांपत्तिक साधनांवर स्वामित्व मिळवून आपला अतोनात फायदा करून घेतला. हॅनोव्हरची ही स्थिति पाहून प्रशिआच्या लहानसहान शत्रूंच्या मनांत धडकी भरली. प्राशिआचे सैनिक जास्त पराक्रमी होते म्हणून प्रशिआनें हा देश जिंकला असें म्हणतां येणार नाहीं कारण धर्मयुद्धांत प्रशिआचा पराभव झाला होता, हें खरें आहे. परंतु यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, ज्या ठिकाणच्या लढाईवरून सोक्ष किंवा मोक्ष व्हावयाचा असतो त्या ठिकाणीं सर्व सैनिकांचा भार गोळा करणें हें लढाई जिंकण्याचें अनादि तत्त्व प्रशिआच्या मुख्य सेनाधिपतीला पूर्ण समजलें होतें.

इलेक्टोरल हेसीचा प्रश्नहि प्रशिआनें असाच निकालांत काढण्याची त्वरा केली सेनापति बेयर आपली १९,००० फौज घेऊन व्हीट्झलर येथून ता. १६ रोजीं निघाला व हेसीच्या सैन्याची व्यवस्था लागून तें प्रत्यक्ष युद्धक्षम होण्याच्या पूर्वीच तो कॅसेलमध्यें शिरला व त्यानें तें ता १९ जून रोजीं हस्तगत करून घेतलें. इलेक्टर आश्चर्यचकित झाला, पण आपल्या सैन्याला कूच करून हैना व फुल्डावर जाण्यास हुकूम सोडण्यास त्याला वेळ मिळाला. सैनिकांनीं ही त्याची आज्ञा अमलांत आणण्याचा प्रयत्न केला. त्यांपैकीं पुष्कळांना अखेरीस फ्रँकफोर्ट व मेयन्स येथील आपआपल्या तुकड्यांस जाऊन मिळतां आलें. परंतु दुर्दैवी इलेक्टरनें विल्मेल्मशोहे येथील आपल्या राजवाड्यांतच रहाण्याचा हेका धरला. त्यामुळें तो प्रशिअन लोकांच्या हातीं सांपडला व त्यांनीं त्याला कैद केलें व त्यांनीं त्याचा फार छळहि केला. अखेरीस प्रशिअन राजाच्या खास हुकुमावरून त्याला ब्रेमेन येथें कैदखान्यांत ठेविलें. इलेक्टोरेटला कोणी वाली नसल्यामुळें प्राशिआला इलेक्टोरेट सहज खालसा करितां आलें.

युद्धाला आरंभ होऊन पंधरा दिवस होण्यापूर्वीच जर्मनसंघाचे दोन अवयव कसे तुटले गेले याचें वर्णन येथवर झालें. आतां बाकीच्या घटकावयवांनीं कसें वर्तन केलें व प्राशिआनें त्यांस कसें वागविलें हें पाहणें आहे.

प्रकरण ९ वें.

सन १८६६ चें युद्ध-बोहेमियावरील स्वारी—लायबेना, पोडोल, म्यूंचेन्ग्रॉट्झ, गिट्स्किन, ट्रॉटेनॉ, सूर, नॅचोड, स्कॅलिट्झ आणि स्क्वीनशॉडेल येथील झटापटी.

युद्धाच्या वेळीं तडफेनें काम करणेंच किती श्रेयस्कर आहे हें प्रशिअन पुढाऱ्यांच्या चांगलेंच लक्षांत होतें. प्रशिआची तयारी अगदीं पूर्ण होती ज्या शत्रूशीं त्याला तोंड द्यावयाचें होतें. त्याची तयारी अर्धवटच होती. परंतु शत्रूच्या राज्याचा विस्तार फार मोठा असून त्याचा कांहीं भाग तर प्रशिआच्या हद्दींतहि घुसला होता. तेव्हां निरनिराळे शत्रू आपल्या स्वाभाविकतः हितकर साधनांचा उपयोग करून एक जुटीनें प्रशिआस विरोध करण्यास येण्याच्या पूर्वीच प्रशिआनें त्याच्यावर व्यक्तिशः शस्त्र धरणें यावरच प्रशिआचें जीवितसर्वस्व अवलंबून होतें. उदाहरणार्थ, हें अगदीं शक्य होतें कीं प्रशिआनें जर आपल्या चढाईच्या धोरणाचा आरंभ करण्यांत थोडी दिरंगाई केली असती तर बेनेडिक सारखा एखादा कार्यक्षम ऑस्ट्रिअन सेनापति 'बंड' सैन्याची एखादी तुकडी बरोबर घेऊन पूर्व व पश्चिम प्रशिआ यांच्यामध्यें एकदम येऊन बसला असता, व अशा रीतीनें त्यानें त्या दोन्हीं प्रांतास एकत्र होऊन एखादी हालचाल करणें अशक्य करून सोडिलें असतें; दुसरीकडे एखादें बव्हेरिअन सैन्य जलदीनें हॅनोव्हर व हेसी येथें जाऊन आपल्या दोस्तांचीं सैन्यें बरोबर घेऊन बर्लिनवर चालून

गेलें असतें. हें या ठिकाणीं सांगण्याचें कारण एवढेंच कीं ह्या गोष्टींचा विचार प्रशिअन सेनापतींनीं केला होता.

हॅनोव्हर व हेसी यांना हतवीर्य करून प्रशिआनें वरील संभवनीय विघ्नांचा कसा परिहार केला हें मागल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे

वस्तुतः दोस्तांपैकीं कोणासही धडाडी म्हणजे काय हें मुळीं माहीत नव्हतें त्यांचा मंत्री बेजबाबदार नव्हता. त्यांची युद्धाची तयारी बहुतेक पूर्ण होत आली होती असेंहि नाहीं. हॅनोव्हर व हेसी यांच्या बाबतींत मँटाइफेल, फॉन फॉलकेनस्टीन व बेयर यांना जें धडाक्यासरशीं यश आलें त्यावरून या गोष्टी अगदीं निर्विवाद ठरल्या. तर मग ऑस्ट्रिआ, बव्हेरिआ, सॅक्सनी व त्यांचे लहानसहान दोस्त यांच्या संबधानें तेंच धोरण धरणें प्रशिआस क्रमप्राप्तच होतें. प्रशिआची खात्री झाली होती, कीं धिटाई म्हणजेच दूरदर्शीपणा व हॅनोव्हर प्रकरणी जसें यश आलें तसें यश येण्यास शत्रूला क्षणभरही विसावा मिळतां कामा नये. हें तत्त्व प्रशिआनें किती नेटानें अंमलांत आणलें हें पुढें दिसून येईल.

दोस्तांचें वर्तन.

युद्ध पुकारलें नव्हतें, परंतु युद्ध संनिध आहे खास असें वाटत होतें, तेव्हांच बव्हेरिआ, सॅक्सनी वूर्टेंबर्ग, हेसी–डार्म्सस्टॅड, बॅडेन व नॉसौ यांचे प्रतिनिधि म्यूनिच येथें जमले होते व त्यांनीं व्यक्तिश

कोणत्या राष्ट्रानें किती सैन्य पुरवावें हें ठरविलें. तथापि ता. १४ जून-पर्यंत त्या सैन्यांना ' डायेट 'नें प्रत्यक्ष कामगिरी करण्यास बोलाविलें नाहीं. त्याच वेळीं आणखी असेंही ठरलें कीं, शेवटीं सांगितलेल्या चार राष्ट्रांचीं सैन्यें व ऑस्ट्रिआ आणि सॅक्सनी पाठवितील तीं सैन्यें फ्रँकफोर्ट येथें पाठवावीं. ऑस्ट्रिअन सैन्यांत काम करून नांव मिळविलेला अधिकारी प्रिन्स ॲलेक्झँडर हेसी हा ह्या एकत्र झालेल्या सैन्यांचा अधिपति होता. बव्हेरिअन सैन्य अप्पर मेन नदीवर जमणार होतें त्याचें आधिपत्य बव्हेरिआचा प्रिन्स चार्ल्स याजकडे द्यावयाचें ठरल होतें. या वेळीं प्रिन्स चार्ल्स याचें वय ७१ वर्षाचें होतें तरी गेल्या पंचावन्न वर्षांत युद्धावर जाण्याचा त्याला प्रसंग आला नव्हता. ह्या दोन्ही सैन्यांचा मुख्य सेनापति प्रिन्स चार्ल्स हाच असावा असें ठरलें होतें.

ता. १८ व १९. रोजीं ह्या दोन्ही सैन्यांची कूच करण्याची तयारी होती. त्यांच्या मुख्य सेनापतीला यांतून एक पुरेशा सैनिकांची तुकडी वेगळी करून तिला हॅनोव्हरचें सैन्य बाचविण्यास पाठवितां आलें असतें परंतु त्या सस्थानांच्या अधिपतीनें मोठ्या काकुळतीनें केलेल्या विनंतीस उत्तर म्हणून कुमक न पाठवितां प्रिन्स चार्ल्स यानें फक्त उपदेशपर संदेशच पाठविला. हॅनोव्हरचा निकाल लागलाच होता. आतां प्रत्यक्ष कृति करण्याची हॅनोव्हिअनची पाळी आली. कारण हॅनोव्हर व हेसी–कॅसल यांचा निकाल लागल्यामुळें प्रशिअन सैन्याच्या तीन तुकड्या मोकळ्या झाल्या होत्या. त्या आतां बव्हेरिअन प्रिन्सच्या मागें लागल्या. या तुकड्यांचें आधिपत्य फॉन गोवन,

बेयर व फ्लीस यांजकडे होतें व त्यांचा बेत त्याला शक्य तितक्या लौकर लढाई करण्यास भाग पाडावें असा होता.

प्रशिअन सैन्याच्या हालचाली.

हे तीन सेनापति व त्यांचे प्रतिस्पर्धी यांच्या हालचालींची हकीकत देण्यापूर्वी प्रशिआच्या मुख्य तीन सैन्यांचें काय चाललें होतें इकडे थोडें लक्ष देणें जरूर आहे. बोहेमिआमध्यें ऑस्ट्रिआच्या विरुद्ध युद्ध करण्याचें काम या तीन सैन्यांकडेच यावयाचें होतें. हीं तीन सैन्यें अनुक्रमें प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स, क्रौन प्रिन्स व जनरल फॉन बिटेनफील्ड यांचा हुकमतीखालीं होतीं. या तिन्ही सैन्यांवर मुख्य अधिकार फॉन मोल्टके–जनरल स्टाफचा मुख्य–याचा होता.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें क्रौन प्रिन्स याच्या हाताखालचें दुसरें सैन्य सायलेशिआंत नीसे जवळ तळ देऊन बसलें होतें. सहावी तुकडी नीसे येथें ठेवून बाकीच्या सैन्यासह तुह्मी बोहेमिआंत जावें व तेथें पहिल्या सैन्याला जाऊन मिळावें असा क्रौन प्रिन्स यास ता. १९ रोजीं हुकूम मिळाला. तें सैन्य प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या हुकमती खालीं होतें. त्यालाहि याप्रमाणेंच तुह्मी अप्पर लॉसिटझ नदीच्या बाजूनें कूच करून बोहेमिअन सरहद्दीच्या पलीकडे सात मैलांवर रायसेनबर्ग येथें जाऊन प्रागच्या ईशान्येस पन्नास मैलाच्या अंतरावर गिटसचिन येथें दुसऱ्या सैन्यास मिळावें असा हुकूम मिळाला होता. कोनिंगस्टीन येथें सॅक्सन सैन्याचा तळ होता, म्हणून

फॉन बिटेनफील्डच्या 'एल्ब आर्मीला' एल्ब नदीच्या दरीतून जाणें शक्य नव्हतें. सबब या सैन्याला तुम्ही ड्रेसडेन येथून निघून प्रागच्या ईशान्येस पन्नास मैलांचें अंतरावर गॅबेलकडे कूच करून जा असा हुकूम झाला होता.

मॉल्टके आघाडी मारतो.

दरम्यान् ऑस्ट्रिअन सैन्याचा सेनाधिपति बेनेडिक यानें ऑस्ट्रिअन राज्यांत जेवढे सैनिक निरनिराळ्या ठिकाणीं होते त्यांच्या पलटणी बनवून त्यांची सुव्यवस्थित मांडणी करण्याकरितां अविश्रांत श्रम केले होते. काय काय होतें तें हात जोडून पहात बसावें असें धोरण बेनेडिक यास मुळींच पसंत नव्हतें. तिन्ही प्रशिअन सैन्यांची मांडणी त्याच्या चांगली लक्षांत आली होती. दुसरें, प्रशिअन सैन्य निरनिराळ्या पलटणी करून बोहेमिआंत जाणाऱ्या अरुंद वाटांनीं कूच करून जात असतांना आपण अगोदरच झटपटीनें आपलें सैन्य हालवून त्यांच्यावर हल्ला चढविल्यास आपणास त्या पलटणींची चांगलीच खराबी करितां येईल असा विचार त्याच्या मनांत आला. असा विचार करून ता. १७ जून रोजीं तो ऑलमट्झ येथून निघाला तो फारसा दूर गेला नाहीं तोंच त्याला बातमी आली कीं, पहिलें व तिसरें प्रशिअन सैन्य बोहेमिआंत शिरलें, तरी तेवढ्यावरून त्यानें आशा सोडिली नाहीं. त्याला पक्क्या शोधाअंतीं कळलें कीं, क्राउन प्रिन्स व प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स त्यांच्या सैन्यांत जवळ जवळ १३९ मैल अंतर होतें. आणि म्हणून आपणांला आपला बेत अजूनही सिद्धीस नेतां येईल

असें त्यास वाटलें. दुसरें सैन्य अरुंद वाटांनीं कूच करीत चाललें असतां बेनेडिक मोठ्या सैन्यानिशीं त्याच्यावर घाला घालून त्याची दुर्दशा करण्याचा प्रयत्न करण्यास चुकणार नाहीं ही गोष्ट मॉल्टकेच्या सूक्ष्म दृष्टींतून सुटली नव्हती. असा हल्ला होणें सर्वथैव असंभवनीव व्हावें म्हणून क्रौन प्रिन्सची सेना निघण्यापूर्वी पहिल्या व तिसऱ्या सैन्यानें तीन मजला वाट चालून जावें, अशी योजना त्यानें केली होती. या योजनेचा असा उद्देश होता कीं. क्रौन प्रिन्सचें सैन्य दुर्घट वाटांतून कूच करीत असतां ऑस्ट्रिअन सैन्याला त्याच्यावर घाला घालण्याच्या ऐवजीं पहिल्या व तिसऱ्या सैन्यावर लक्ष ठेवणें भाग पडावें. मॉल्टकेच्या बेताप्रमाणें या दोन सैन्यांना आरंभींच आघाडी मारितां आली असती तर तीं सैन्यें अगदीं समोर आल्यामुळें त्यांच्याकडेच पूर्ण लक्ष देण्याशिवाय बेनेडिकला गत्यंतर उरलें नसतें.

पुढें घडलेल्या वृत्तांतावरूनहि मॉल्टके याची पूर्व दृष्टी अगदीं बिंनचूक ठरली. सॅक्सनीचा क्रौन प्रिन्स आलबर्ट याच्याकडे २४,००० सॅक्सन सैनिकांचें आधिपत्य होतें. या प्रिन्स ऑलबर्टच्या सैनिकांच्या साहाय्यानें कौंट क्लॅमगॅलॅस याच्या सैन्यानें सायलेशिअन सरहद्दीचें संरक्षण करावें असा बेनेडिक यानें हुकूम सोडला होता प्रागच्या बहुतेक थेट उत्तरेस ५० मैलांच्या अंतरावर ऐसर नदीच्या कांठीं म्युंचेनगॅटझ येथें क्लॅमगॅलॅस याचें मुख्य ठाणें होतें, त्यानें आपली एक तुकडी–ब्रिग्रेड–रायसेनबर्ग येथें ठेविली होती. रायसेनबर्ग हें बोहेमिआंत दुसऱ्या प्रतीचें प्रांतिक शहर आहे. तें त्याच्या छावणीपासून

उत्तर दिशेस ३२ मैलांच्या अंतरावर व सॅक्सनींतील झिट्टॉपासून आग्नेय दिशेस १७ मैलांवर होतें. म्युंचेनग्रॅटझ व रायसेनबर्ग यांच्यामध्यें पोडोल येथें त्यानें दुसरी एक टुकडी–डिटॅचमेंट ठेविली होती. पोडोल हें एक खेडें असून म्युंचेनगॅटझपासून तीन किंवा चार मैल आहे. ह्या ठिकाणीं ऐसर ओलांडण्यास एक रेलवेचा पूल आहे. त्याच नदीला दुसरा एक पूल लायबेनॉ येथें आहे. लायबेनॉ रायसेनबर्गच्या दक्षिणेस ११ मैलांवर आहे. बाहमिस्कलायपाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या उत्तरेस खडकाळ प्रदेशांतील हूहनर–वॉसर खेडें आहे. त्या खेड्यांत ड्रेसडेनच्या बाजूनें येणाऱ्या रस्त्यावर टेहळणी ठेवण्याकरितां त्यानें अशीच एक पलटण (ब्रिगेड) ठेविली होती.

प्रिन्स फ्रेडरिक चार्लस पुढें सरसावतो.

दरम्यान् प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यानें ता. २२ मे रोजीं गारलिट्झ येथून तळ उठविला; त्याच दिवशीं संध्याकाळीं तो सायडेनबर्गला पोहोंचला; ता. २३ रोजीं सकाळीं स्कॉनबॉल्ड आणि न्यूस्टॅडल यांतील अरुंद मार्गांनीं त्यानें सरहद्द ओलांडिली; रायसेनबर्गच्या थेट उत्तरेला १६ मैलांवर फ्रॉइडलँडकडे तो चालून गेला. याच वेळीं फॉन बिटेनफील्ड यानें आपलें सैन्य (एल्ब आर्मी) ड्रेसडेन येथून स्क्लूकेनॉ ते रंबर्गकडे जाणाऱ्या राजमार्गानें नेलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं फ्रेडरिक चार्ल्स रायसेनबर्गवर चाल करून गेला. रायसेनबर्गच्या उजव्या बाजूला १२ मैलांवर गॅबेल आहे, त्यावर बिटेनफील्ड चाल करून गेला, दोघांनाही वाटलें हात कीं

रायसेनबर्ग स्वाधीन करून घेण्याकरितां आपणास लढावें लागेल; कारण गॅब्रेल, ग्रोटॉ, फ्राइडलँड व हर्स्कफेल्ड यांच्यावरून डोंगर उतरून जाण्यास जे रस्ते आहेत ते मिळतात त्या ठिकाणाचें रक्षण करण्याचें रायसेनबर्ग हें स्थान आहे. परंतु क्लॅमगॅलेस याच्याजवळ फार थोडें सैन्य असल्यामुळें, दोन सैन्यांना एकदम तोंड देण्याच्या प्रयत्न करणें चुकीचें होईल हें मनांत आणून क्लॅमगॅलॅस यानें शत्रु संनिध येऊं लागला म्हणजे तुम्हीं लायबेनाकडे परत जा असा हुकूम रायसेनबर्ग येथील सैनिकांस दिला होता. हें सैनिकांनीं अत्यंत व्यवस्थेशीर पद्धतीनें केलें. त्या दिवशीं रात्रीं व दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रशिअन सैन्यानें रायसेनबर्गवरच तळ ठेविला.

लायबेनाची लढाई.

लायबेना हें खेडें रायसेनबर्ग व टर्ना यांच्या मध्यावर आहे. टर्ना म्युंचेनबर्गपासून ९॥ मैलांवर आहे. खेड्याकडे जाणाऱ्या दक्षिण बाजूच्या रस्त्यावर ऑस्ट्रिअन सेनापतीनें तळ दिला होता. तेथें तळ देण्यांत त्याचा मुख्य उद्देश शत्रूच्या सामर्थ्याची थोडी चाचणी करावी असाच होता. आपल्या चिमुकल्या सैन्यबळावर आपण शत्रूचा पराभव करूं अशी फारशी आशा त्याला नव्हती; कारण त्याच्याजवळ चार घोडेस्वारांच्या पलटणी, घोड्यावरील तोफखान्याच्या दोन रांगा व फारच थोडें पायदळ एवढें काय तें सैन्य होतें. तथापि एवढ्यानेंच शत्रूला वचक बसेल अशी त्यानें थाटाची मांडणी केली. ज्या टेंकडीवरून दक्षिणेच्या बाजूचा खालचा प्रदेश चांगला दृष्टीस

पडतो, त्या टेंकडीवर त्यानें आपल्या तोफा लावल्या व हालचाली करीत असतांना सैन्याचें संरक्षण व्हावें म्हणून घोडेस्वारांच्या पलटणी अगदीं सज्ज ठेविल्या. खालपासून टेकडीच्या माथ्यापर्यंत सारखी चढण असलेल्या भूभागावर प्रशिअन सैन्य आल्याबरोबर ऑस्ट्रिअन गोलंदाजांनीं तोफांचा भडिमार सुरू केला. त्याला प्रशिअन गोलंदाजांनीं तसेंच प्रत्युत्तर दिलें व थोडक्याच वेळांत दाट धूर जिकडे तिकडे पसरल्यामुळें लढणारे शिपाई एकमेकांस दिसेनासे झाले. शत्रूची दारूगोळ्यांचा भडिमार करण्याची जी ताकद आहे तिच्यापुढें आपल्या तोफखान्याच्या दोन रांगांचा निभाव लागणार नाहीं, हें ऑस्ट्रिअन सेनापतीच्या लक्षांत तेव्हांच आलें. म्हणून तो तोफा आवरून माघारा फिरला जातां जातां कोझिट्झच्या दिशेला गोळीबाराच्या फेर सोडण्याकरितां मात्र एक दोन वेळां ता थांबला. प्रशिअन घोडेस्वार त्याचा पाठलाग मोठ्या झपाट्यानें करूं लागले, परंतु व्यर्थ. जमिनीची ठेवण त्यांना अत्यंत प्रतिकूळ होती व त्यामुळें शत्रूस मारितां येईल इतकें अंतर तुटण्यापूर्वीच ऑस्ट्रिअन सैन्यानें कोसिट्झ टेंकडीवर जाऊन व्यवस्थित रीतीनें तळ दिला. या टेंकडीवरून ऑस्ट्रिअन सैन्यानें प्रशिअन घोडेस्वारांवर जे राचा व नेमका गोळीबार सुरू केला, व प्रशिअन घोडेस्वारांना मागून तोफांची मदत येईपर्यंत त्यांनीं आपला भडिमार थांबविला नाहीं. नंतर अगदीं व्यवस्थित रीतीनें ऑस्ट्रिअन लोक पोडोलकडे परत गेले. एवढा वेळ झाली ती केवळ चकमकच झाली; परंतु ती पासून दोन्ही पक्षांना समाधान वाटलें. शत्रूची सैन्य

संख्या फार मोठी असतांहि ऑस्ट्रिआच्या सैन्यानें त्याच्या समोर आपला थंडपणा व शिस्त हीं कायम राखिलीं–हें ऑस्ट्रिआच्या समाधानाचें कारण. ऑस्ट्रिअन तोफाचा भडिमार जितकी हानि करील असें वाटलें होतें तितकी झाली नाहीं, कारण त्यांचे पुष्कळ गोळे फुटल्याशिवाय जमिनींत घुसले आणि त्यांना सराव नसल्यामुळें नेम मारण्याचें काम अगदीं भिकार झालें–हें प्रशिआच्या समाधानाचें कारण. त्याच दिवशीं संध्याकाळीं प्रशिअन सैन्यानें टर्ना हस्तगत केलें. ऑस्ट्रिअन लोकांनीं परत जातांना ऐसर नदीवरचा ह्या ठिकाणचा पूल मोडून टाकला होता. ह्याच दिवशीं ' आर्मी ऑफ दी एल्ब ' ह्या सैन्याच्या आघाडीच्या पलटणीनें बॉहमिस्क–ऐक या प्रमाणेंच घेऊन तेथें वळ दिला.

पोडोलची लढाई.

पोडोल टर्नाच्या दक्षिणेला आहे. कांहीं थोडें ऑस्ट्रिअन सैन्य आतां ह्या ठिकाणीं तळ देऊन बसलें होतें. ह्या ठिकाणीं ऐसर नदीचें पात्र सुमारें शंभर यार्ड रुंद आहे. त्याच जागीं ऐसर नदीला एक लकडी व दुसरा रेलवे असे दोन पूल आहेत. या ठिकाणीं कौंट ब्लूमगॅलॅस यानें सहा पायदळाच्या तुकड्या (बॅटॅलिअनस्) ठेविल्या होत्या आपल्या सर्व सैन्याला म्युंचेनग्रॅट्झ येथें एकत्र होण्यास वेळ मिळावा म्हणून तो हें स्थळ हा आपला हेतु सिद्धीस जाईपर्यंत धरून बसणार होता. म्युंचेनग्रॅट्झ येथें सर्व सैन्य गोळा झाल्यावर अखेरीस गिटिस्कन येथें सर्वांनीं परत जावें असा त्याचा बेत होत होता. मोठी

लढाई देण्याचा त्याचा इरादा नसून प्रशिअन सैन्याला जागजागीं विरोध करून त्याची प्रगति शक्य तितक्या वेळ थांबवून धरावयाची एवढाच त्याचा हेतु होता. कारण ह्या करण्यानें बेनेडिक यास पूर्ण तयारी करण्यास अवसर सांपडेल असें त्यास वाटत होतें. हा त्याचा हेतु अंशतः सिद्धीस गेला.

प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या सैन्याच्या आघाडीची तुकडी पोडोलच्या लकडी पुलापासून सुमारें १४०० यार्ड अंतरावर ता. २६ रोजीं आली, तेव्हां रात्रीं ८ वाजले होते. त्या पलटणींची व दूरच्या ऑस्ट्रिअन मोर्चांतील शिपायांची गांठ लागलीच पडली. ऑस्ट्रिअन सैन्याच्या सहा पलटणींनीं पोडोलचें खेडें असें व्यापून टाकिलें होतें; व तेथून त्यांना घालवून देण्याला पुष्कळ वेळ लागून परिश्रमहि फार करावे लागले असते. खेड्याच्या वेशीबाहेर एक शेतकऱ्याचें खोपट होतें. या ठिकाणीं ऑस्ट्रिअन सैन्याची छावणी असून त्यानें तेथें चांगला बंदोबस्त करून ठेविला होता. ही प्रशिअन सैन्याच्या मार्गांतील पहिली अडचण टेहळणी करून या छावणीचें संरक्षण करणाऱ्या सैनिकांची पलटण रस्त्याच्या एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत उभी होती. छावणींतून व या लोकांच्या पलटणींतून पुढें चाल करून येणाऱ्या शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव चालला होता व त्यामुळें प्रशिअन सैन्याची फार खराबी झाली संरक्षण करणाऱ्या ऑस्ट्रिअन सैन्यार्चाहि पुष्कळ हानि झालीच; कारण ऑस्ट्रिअन सैन्याच्या बंदुकीच्या टप्प्याबाहेर राहून प्रशिअन सैन्याला त्याच्या

नवीन नीड्लगन या शास्त्रानें गोळीबार करितां आला व जरी क्षणोक्षणीं वाढत जाणाऱ्या अंधःकारामुळें प्रशिअन सैनिकांना अचूक नेम धरण्याची अडचण पडूं लागला होती तरी त्यांचा भाडिमार एकाच ठिकाणीं इतका रोखून होत कीं, त्याचा शत्रूवर घातुक परिणाम व्हावयास चुकला नाहीं हळू हळू प्रशिअन सैन्याच्या संख्याबळामुळें ऑस्ट्रिअन सैन्याला आतां आपला निभाव लागत नाहीं असें जास्त जास्त भासूं लागलें व त्यांनीं मागें पाऊल घेण्यास आरंभ केला. होतां होतां त्या खेड्यांत जाणाऱ्या रस्त्यावर घाईघाईनें झाडें लोटून टाकून त्यांचा एक तट बनविला होता, त्याच्या मागें सैनिकांनीं आश्रय घेतला व शत्रूस तोंड दिलें प्रशिअन सैनिक या तटापासून कांहीं थोड्या फुटांच्या अंतरावर आले व थांबले. आतां लढणारांच्यामध्यें तीन कदम अंतर असेल नसेल इतकें एकमेकां जवळ ते आले व त्यांनीं परस्परांच्या छातीवर अचूक नेम धरून गोळ्या झाडिल्या. प्रशिअन सैनिकांजवळ नरड्यांतून बार भरण्याच्या नवीन नमुन्याच्या बंदुका होत्या त्यामुळें त्यांना गोळ्या सटासट झाडितां आल्या व ऑस्ट्रिअन सैनिकांना पुनः हळू हळू माघार घेणें प्राप्त झालें अशा स्थितींत ही ऑस्ट्रियन लोकांना समाधान मानण्याला थोडी जागा होती. ती अशी:—प्रशिअन सैन्य पुढें चाल करीत येत असतांना तेथील घरांच्या वरच्या मजल्यांच्या भिंतींच्या भोंकांतून व सज्जांतून त्याच्यावर गोळ्यांचा वर्षाव होत असून त्यांचा फडशा उडत होता. कारण रस्ते अरुंद होते, सैन्याच्या रांगाच्या रांगा एकसारख्या चालल्या होत्या व प्रत्येक

गोळी आपला बळी घेण्यास चुकत नव्हती, तथापि प्रशिअन सैन्य न डगमगतां सारखें रेटून पुढें येत होतें. प्रशिअन सैनिकांना ठाऊक होतें कीं, आपल्या शत्रूच्या पाठीमागच्या बाजूला नदी आहे व आपण आपल्या समोरच्या शत्रूला पुलावरून पुढें रेटून दिला कीं घरांतून बसलेले सर्व लोक आपल्या हातांत आयतेच कैदी होऊन सांपडणार. परंतु ऑस्ट्रिअन लोकांची या वेळची लढण्याची तऱ्हा त्यांच्या आजपर्यंतच्या कीर्तीला अगदीं अनुरूप अशीच होती. शत्रू मोठ्या संख्येच्या व उत्तम शस्त्रांच्या जोरावर ऑस्ट्रिअन सैनिकांस काळोखांतूनच (चंद्र अजून उगवला नव्हता) मागें रेटीत होता, तरी ऑस्ट्रिअन लोकांनीं धीर सोडिला नाहीं किंवा ते सैरावैरा पळूं लागले नाहींत. लढल्याशिवाय एक पाऊलभरही जमीन त्यांनीं शत्रूस दिली नाहीं. अखेरीस त्यांना पुलापर्यंत मागें हटावें लागलें. ह्या ठिकाणीं ते वळले व त्यांनीं शत्रूस तोंड दिलें. शत्रूचा धुव्वा उडविण्यांत त्यांनीं जितका जोर दाखविला तितक्याच जोरानें व हट्टानें त्यांनीं पुनः शत्रूला विरोध केला. त्यांच्या मडिमारापुढें प्रशिअन अधिकारी व शिपाइ पटापट पडूं लागले. जेव्हां शत्रु अगदीं जवळ आला तेव्हां ऑस्ट्रिअन सैनिकांनीं त्याच्यावर संगिनीचा हल्ला चढविला. परंतु सैनिकांची मोठी संख्या व सुधारलेलीं उत्तम शस्त्रें याचा प्रभाव पुनः अनुभवास आला. या झटापटींत भयंकर मनुष्यवध झाल्यावर ऑस्ट्रिअन लोकांना माघारी फिरावें लागलें. सुदैवानें वेळींच ऐसर नदीच्या दुसऱ्या तीरीं जाऊन ते आपल्या संरक्षणाच्या मिळाले. त्यांनाही याच प्रमाणें पराक्रम गाजविल्यावर रेल्वे पुलावरून माघारीं यावें

लागलें होतें. दोन्ही सैन्यभाग एकत्र होऊन पाव मैल माघारीं गेल्या वर एका घरांत शिरले, हें घर उंचवट्यावर असल्यामुळें एक मोठा रस्ता यावरून चांगला दिसत होता. ह्या ठिकाणीं अंधेरांत वाट चुकून गेलेलीं माणसें त्यांनीं पुनः जमविली व ते पुनः शत्रूस तोंड देण्यास तयार झाले. परंतु प्रशिअन लोक थोडेच कच खाणार होते! प्रशिअन लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन ऑस्ट्रिअन सैन्याला दडपीतच चालल्या. अखेरीस आपल्या सेनापतीचा कार्यभाग झाला असें पाहून ऑस्ट्रिअन सैन्य मोठ्या व्यवस्थितपणें सकाळीं चार वाजतां म्युंचेन-ग्रॅट्झ येथें माघारें गेलें. प्रशिअन लोकांनीं त्यांचा पाठलाग करण्याचा फक्त आव घातला. दोन्ही बाजूंचें नुकसान अतोनात झालें. पण पोडोल येथें घरांतून व सज्जांतून बसलेले ५०० ऑस्ट्रिअन लोक मात्र कैदी म्हणून प्रशिअन लोकांच्या हातीं लागले.

त्याच दिवशीं फॉन बिटेनफील्ड याच्या हाताखालचीं आठवी पलटण गॅबेलहून कूच करून निघून न्यायमीजच्या वाटेनें हूहनर-वॉसर येथें आली व तिनें टेहळणी करणाऱ्या हंगेरिअन घोडेस्वारांना तेथून घालवून दिलें. हूहनर-वॉसर येथून हांकून लावलेले ऑस्ट्रिअन लोक म्युंचेनग्रॅट्झ येथें परत गेले व त्यांनीं प्रशिआची 'आर्मी ऑफ दी एल्ब' समरांगणावर येऊन पोहोंचली अशी बातमी कौंट क्लॅमगॅलॅस यास दिली.

क्लॅमगॅलॅस याची परिस्थिति.

लायबेना व पोडोल येथें दिवसा व रात्रीं ज्या चकमकी झाल्या त्याच्यामुळें अखेरीस ऐसर नदीची उजवी सर्व बाजू प्रशिअन

सैन्याच्या ताब्यांत आली. आतां क्लॅमगॅलॅस याचें सर्व सैन्य लागलींच नदीच्या डाव्या बाजूस म्युंचेनग्रॅट्झ येथें जमलें. दोन्ही प्रशिअन सैन्यें सर्व सैनिक एकत्र करून ता. २७ रोजीं आपल्यावर खास हल्ला चढवितील असें क्लॅमगॅलॅस यास वाटत होतें. एवढ्या मोठ्या सैन्यांपुढें म्युंचेनग्रॅट्झचें संरक्षण आपल्या हातून होणार नाहीं, हें ही तो जाणत होता. म्हणून म्युंचेनग्रॅटझ येथें शत्रूला लढाई देणें हा क्लॅमगॅलॅस याचा उद्देश होता असें जें प्रशिआचे कैवारी म्हणतात तें सर्वथैव चुकीचें आहे. त्याचा बेत एवढाच होता कीं, आपलें बहुतेक सैन्य फारसा अडथळा न येतां गिट्स्किन येथें घेऊन जातां यावें व त्यासाठीं त्यान म्युंचेनग्रॅझट्चें चांगलें नेटानें संरक्षण करण्याकरितां पिछाडीच्या एक दोन पलटणी ठेवून दिल्या. हा त्याचा बेत सिद्धीस गेला हें आपल्याला लौकरच दिसून येईल.

क्लॅमगॅलॅस गिट्स्किनला परत जातो.

ता. २७ रोजीं जी चकमक झाली तिची वरील कारणाकरितां सविस्तर हकीकत देणें अवश्य नाहीं. बहुतेक सैन्याला सुरक्षितपणें परत जातां यावें म्हणून केवळ पिछाडीच्या ऑस्ट्रिअन सैन्यानें शत्रूशीं ही झटापट केली. ता. २७ रोजीं सकाळीं सुमारें दहा वाजतां पुढें चालून येण्यास प्रशिअनांनीं आरंभ केला तेव्हां ऐसर नदीच्या लाकडी पुलास ऑस्ट्रिअनांनीं आग लावून दिली. थोड्याच अवधींत आघाडीच्या प्रशिअन घोडेस्वारांनीं नदीचा उतार हुडकून काढिला व त्यानें कांहीं सैनिक नदीपलीकडे गेलेही. ह्या स्थळीं बिटेनफील्ड हजर

होता. त्यानें बाकीच्या सेनिकांसाठीं होड्यांचा पूल तयार करण्यास आरंभ केला. तें काम एक वाजतां संपलें व मगच त्याच्या सैन्याला नदी उतरून पुढें कुच करून जातां आलें. ऑस्ट्रिअन सैनाच्या मुख्य भागानें यापूर्वीच गिट्स्किनकडे कुच करून जाण्यास आरंभ केला होता. दरम्यान् पिछाडीच्या सैन्यानें पुढें चाल करून येणाऱ्या प्रशिअन सैन्यावर तोफांचा सारखा भडिमार चालविला होता. होड्यांचा पूल पूर्ण झालेला पाहून ऑस्ट्रिअन सैन्य पदोपदीं लढत लढतच हळू हळू मागें सरूं लागलें. परंतु असें करितांना त्यांनीं मोठी लढाई जुंपून देण्याविषयीं फार खबरदारी ठेविली. जें कांहीं म्हणून करणें शक्य होतें तें केल्यावर ऑस्ट्रिअन्स गिट्स्किन येथें परत गेले. मृत व जखमी मिळून १९३ माणसें व १००० कैदी इतकें ऑस्ट्रिअन सैन्याचें नुकसान झालें. ह्या कैद्यांपैकीं बहुतेक लोक इटॅलिअन होते. ह्या इटॅलिअन लोकांनीं लढण्याची मेहनत न घेतांच शस्त्रें खालीं ठेविलीं. कारणया लढायांत त्यांस आपलेपणा असा कांहीं वाटतच नव्हता. त्या दिवशीं मृत व जखमी मिळून ३४१ मनुष्यांची प्रशिअन सैन्याची नुकसानी झाली.

गिट्स्किन-स्थलवर्णन.

वॅलेन्स्टाइन जन्मण्यापूर्वी गिट्स्किन हें एक भिकार खेडें होतें. त्याची वस्ती अवघी २०० असून त्यांतील लोकांच्या राहवयाच्या खोपट्या सुद्धां अतिदरिद्री दिसत. परंतु वॅलेन्स्टाइन् या योद्ध्याच्या औदार्यानें तें खेडें भरभराटीस चढून त्याचें आतां शहर बनलें होतें.

ह्याच्या दक्षिण दिशेस थोड्याच अंतरावर सिड्लिना नदीचे दोन भाग होतात. अशा रीतीनें नदीच्या कांठीं हें शहर असल्यामुळें त्याच्या व्यापाराची वाढ झाली. शिवाय त्याच्या आसपास भरभराटींत असलेलीं चार खेडीं आहेत. गिट्स्किन प्रांतांतून लोक येऊन या खेड्यांत बाजारहाट करतात. या सर्व गोष्टींनीं गिट्स्किन शहरास मोठें महत्त्व आलें होतें. हें शहर म्युंचेनग्रॅट्झच्या आग्नेयीस १२ मैलांच्या व कोनिग्रॅट्झच्या वायव्येस २९ मैलांच्या अंतरावर आहे. हीं तीन्हीं शहरें एका सरळ रेषेंत आहेत. म्युंचेनग्रॅट्झपासून निघून प्रवासी गिट्स्किन शहरीं पोहोंचण्यापूर्वी तीन मैलांचे अंतरावर त्याला अर्धवर्तुळाकार तुटक तुटक टेंकड्यांवरून जाणारा रस्ता लागतो. टेंकड्यांवरील या रस्त्यांत कोठें कोठें पांढऱ्या फर झाडांचीं बेटें आहेत व मधून मधून १०।१२ खोपट्यांचीं खेडीं आहेत. ह्या खोपट्यांच्या भोंवतीं फळझाडांचे बागही आहेत. या टेंकड्यावरच क्लॅमगॅलॅस त्यानें आपल्या ऑस्ट्रो–सॅक्सन सैन्याची व्यवस्थित मांडणी केली होती. त्यानें सैन्याची उजवी बाजू ईसेन–स्टॅड खेड्यांत व खेड्याभोंवतीं ठेविली होती. सोबाट्कापासून गिट्स्किनकडे जाण्याऱ्या रस्त्यांच्या दक्षिणेस ॲनाबर्ग टेंकडी आहे. त्या टेंकडीवर डावी बाजू ठेविली होती. त्याच्या सैन्याचा मध्यभाग ब्रॅडाच्या माथ्यावर व राखून ठेविलेलें सैन्य गिट्स्किन येथें ठेविलें होतें. प्रशिअन सैन्याच्या नवीन नीड्ल्–गनपेक्षां ऑस्ट्रिअन सैन्याच्या जुन्या तऱ्हेच्या बंदुकांचा उपयोग कमी परिणामकारक होता. ही उणीव दूर करण्याच्या हेतूनें क्लॅमगॅलॅस यानें पुढील उपाय योजिला होता:–पूर्वी

सांगितलेल्या फर झाडांच्या बेटांत अचूक निशाण मारणारे ठेविले होते व प्रत्येक निशाण मारणारा जवळ भरलेली बंदूक घेतलेले दोन दोन शिपाई उभे केले होते. हें उघडच आहे कीं या योजनेनें गोळ्यांचा भडिमार सारखा ठेवितां आला असता, पण त्यांत प्राणहानीही फार होणार होती. ऑस्ट्रिअन तोफखान्याची मांडणी अशा खुबीनें केली होती कीं, मुख्य रस्त्यानें पुढें येणाऱ्या शत्रूवर तोफांचा मारा दोन्ही तिन्ही बाजूंनीं व्हावा.

गिर्‌स्किनची लढाई.

ता. २९ जून रोजीं जनरल फॉन स्किमटची पलटण ऑस्ट्रिअन छावणीच्या डाव्या बाजू जवळ आली तेव्हां तीन प्रहरांवर दिवस गेला होता. तो टप्प्यांत आल्याबरोबर अदृश्य शत्रूकडून त्याच्या सैन्यावर गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला व त्यानें त्याचे लोक अगदीं हैराण झाले. स्किमटची खात्री झाली कीं, आपल्या शत्रूचें सैन्य चांगल्या माराच्या जागीं बसलेलें असून शत्रूचा निकरानें लढण्याचा विचार आहे. फर झाडांच्या बेटांत लपून बसलेल्या निशाण मारणारांच्या अंगावर त्यानें लढवय्ये पाठविले, पण व्यर्थ. त्यांचा बिनचूक भडिमार व ऑस्ट्रिअन बंदुकांच्या गोळ्यांचा आडवा तिडवा होणारा वर्षाव या खालीं प्रशिअन सैन्याचा चुराडा होऊं लागला तेव्हां कुमक येईपर्यंत वाट पाहाण्याचा त्यानें निश्चय केला. लवकरच सेनाधिपति फॉन वरूडर कुमक घेऊन आला. ह्या निपुण सेनापतीनें खूप सैन्य घेऊन ऑस्ट्रिअन सैन्यावर हल्ला चढविला व त्याला आपलें लपणींचें

आश्रयस्थान सोडणें भाग पाडिलें. नंतर प्रतिस्पर्धी योद्धे परस्परांच्या इतके जवळ आले कीं, त्याच्यामध्यें एक ओहोळच काय तो राहिला व ते एकमेकांवर अचूक नेम धरून गोळीबार करूं लागले. हा संग्राम ह्या युद्धांतील अति भयंकर प्रसंगांपैकीं एक होता. इकडे हें हातघाईचें युद्ध चाललें असतां ऑस्ट्रिअन सैन्याच्या मध्यभागीं व उजव्या बाजूकडे काय चाललें होतें याकडे थोडी नजर टाकणें जरूर आहे.

तिकडे ऑस्ट्रो–सॅक्सन सैन्यांनीं ब्रॅडाची टेंकडी व ईस्टॅडला टेंकून असलेल्या सखल टेंकड्या आणि ब्रॅडा खेड्याच्या समोर व टेंकड्याच्या उताराच्या पायथ्याच्या पलीकडच्या बाजूला असलेलीं पोडल्ट्झ व डायलेट्झ हीं खेडीं व्यापून टाकलीं होतीं. ह्या ठिकाणींहि खेड्यांच्या घड्याळांत पांचाचा ठोका पडतो न पडतो तोंच प्रशिअन सैन्यानें जोराचा हल्ला चढविला. पोडल्ट्झ व डायलेट्झ या खेड्यांवर प्रशिअन सैन्याच्या पायदळानें हल्ला केला. हल्ला करणारे व संरक्षण करणारे यांनीं आपआपल्या प्रयत्न सामर्थ्याची सारखींच कमाल केला व या मुळें या खेड्यांच्या स्वामित्वाबद्दलच्या झटापटी फार निकराच्या झाल्या. अखेरीस सुमारें ७–३० वाजतां प्रशिअन लोकांचा जोर कमी पडण्यास आरंभ झाला ऑस्ट्रो–सॅक्सन सैन्यास विशेष उमेद आल्यामुळें शत्रूला आपण मागें परतविलें आहे, तो पुनः परतून येण्यास असमर्थ आहे असें सुद्धां वाटूं लागलें इतक्यांत एक प्रकार घडला, त्यानें त्या दिवसाच्या युद्धाचा कायमचा निकाल लागून प्रशिअन सैन्यास विजय आपला आहे, असें म्हणण्यास सवड मिळाली

क्लॅमगॅलॅस यास बेनेडिक परत बोलावतो.

ऑस्ट्रिअन सैन्याचा मुख्य सेनाधिपति, जनरल बेनेडिक यानें सरहद्दीवर टेहळणी करण्याकरितां निरनिराळ्या तुकड्या पाठविल्या होत्या. त्यांची शत्रूच्या फार मोठ्या सैन्याशीं गांठ पडून त्यांचा व्यक्तिशः पराभव व्हावा असा त्याचा बेत असणें अर्थात्च शक्य नव्हतें. शत्रूला थोपवून धरण्याकरितांच केवळ त्याच्याशीं दोन हात करावयाचे व जीवरून निश्चित जयापजय होईल अशी मोठी लढाई करावयाची नाहीं, असें धोरण धरून टर्नाब म्युंचेन ग्रॅट्झ येथें क्लॅमगॅलॅस यानें आपल्या सेनाधिपतीचा हुकूम कसा पाळला, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. परंतु गिट्स्किनचें संरक्षण करणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे असें त्यास वाटत होतें, म्हणून आदल्याच दिवशीं त्यानें गिट्स्किन निरुपाय होईपर्यंत लढविणार असें जनरल बेनेडिक यास कळविलें होतें. पण आपल्या निरोपांत त्यानें असेंहि म्हटलें होतें कीं, आपला हुकूम या उलट आल्यास मात्र माझा निरुपाय होईल. आतांपर्यंत आपणास यश येऊन आपण हें काम पार पाडूं अशी त्यास आशा वाटण्यासारखी परिस्थितीहि होती. इतक्यांत साडेसात वाजतां बेनेडिककडून त्यास खलिता आला कीं तुम्हीं कोठेंहि विशेष जोरानें मोठीशी लढाई न करितां मुख्य सैन्याकडे परत जावें.

हा खलिता आल्यामुळें दोन्ही बाजू व मध्य या ठिकाणच्या होत चाललेल्या अनुकूल परिस्थितीनें उलट खाल्ली. प्रत्यक्ष हल्ला

चढवीत असलेल्या शत्रूच्या समोर माघारी फिरणें प्राप्त झालें खरें. परंतु प्रशिअन लोक या माघार घेण्याचा अर्थ ऑस्ट्रिअन लोकांचा मोड होऊन आपला जय झाला असाच करणार हें निर्विवाद होतें; व तें प्रत्यक्ष अनुभवासहि आलें. ऑस्ट्रिअन सैन्य मागें फिरलें, पण तें मोठ्या नाखुषीनें व धिमेपणानें मागें फिरलें. कॅप्टन् हॉझीर यानें त्यांची याबद्दल मोठी वाहवा केली आहे. " आपला पराभव झाला नाहीं; निदान आपण आपली बाजू ह्या वेळपर्यंत तर उत्तम संभाळली होती; आपण आपल्या वरिष्ठाची आज्ञा मानून मागें फिरत आहोंत " हेच विचार ते परत जातांना त्यांच्या मनांत घोळत असावे अर्से त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट होतें. तें कसेंही असो. बेनेडिक यानें ' परत फिरा ' असा हुकूम जर सोडला नसता तर सॅक्सनींचा क्रौन प्रिन्स व कौंट गॅलॅस यांनीं प्रशिअन सैन्याला खास मागें हटवून लाविलें असतें असा ऑस्ट्रिअन सैन्यांत आजपर्यंत पक्का समज आहे.

गिट्स्किन येथें लढाईचा खरा इतिहास हा असा आहे. क्रॅम गॅलॅस यानें ज्या योजना केल्या होत्या त्या अमलांत आणण्याच्या कामांत असा खलिता पाठवून बेनेडिक यानें हात घातला नसता तर उत्तम झालें असतें. कारण गिट्स्किन असें सहज हातीं आल्यामुळें दुसऱ्या सैन्याला प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या सैन्याला जाऊन मिळणें सुगम झालें. हें दुसरें सैन्य काय करीत होतें याकडे आतां वाचकांनीं लक्ष देणें जरूर आहे.

क्रौन प्रिन्सच्या हालचाली.

दुसऱ्या सैन्याचें आधिपत्य प्रशिआच्या क्रौन प्रिन्सकडे होतें. ता १९ जून रोजीं संध्याकाळीं असा हुकूम मिळाला:—" तुम्ही एक पलटण घेऊन लँडशट येथें कूच करून जा, एक पलटण नीसी येथें ठेवा, तिसरी व चौथी अशा ठिकाणीं ठेवा कीं, त्यांना तुमच्या तुकडीशीं किंवा नीसी येथील तुकडीशीं मिळतां येईल-हें ऑस्ट्रिअन सैन्याची हालचाल होईल त्याप्रमाणें करावयाचें." सायलेशिआंतील प्रशिअन सैन्याच्या बगलेवर घाला घालून बेनेडिक युद्धास आरंभ करील असा पुष्कळ संभव होता. प्रशिआची चढाई करण्याची जशी तयारी होती तशी ऑस्ट्रिआची नव्हती. ज्या पक्षाची युद्धास आरंभ करण्याची तयारी झांगलीशी झाली नाहीं त्या पक्षावर चढाई करण्याची जय्यत तयारी आहे त्या पक्षास अशा स्थितींत झटकन युद्धास आरंभ करण्यांत किती फायदे असतात हें प्रशिअन स्टाफचा मुख्य अधिकारी उत्तम जाणत होता; म्हणून त्यानें जून ता. २० रोजीं तुह्मी तुमच्यापासून अगदीं जवळ जो ऑस्ट्रिअन सेनापति असेल त्याला ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यामध्यें युद्ध पुकारलें आहे असें कळवा असा हुकूम सोडला. लागलीच ता. २२ ला त्यानें पुनः हुकूम सोडला कीं तुह्मी बोहेमिआवर स्वारी करून गिट्स्किनकडे जा.

क्रौन प्रिन्सनें हे हुकूम बरोबर पाळले. ता. २५ जून रोजीं त्यानें पुढें दिल्याप्रमाणें सैन्य हालविलें:—स्वतःची पहिली पलटण लायबॉ व स्कोबर्गकडे, गार्डस स्क्वेजेल येथें पांचवी तुकडी ग्लॅट्झ व रानर्ड

त्यांच्यामध्यें, सहाव्या पलटणीची पहिली तुकडी ग्लॅट्झ येथें, त्या पलटणीचा बाकीचा भाग पॅटस्का येथें घोडेस्वारांची पलटण वालडेनबर्ग येथें व त्यानें स्वतःचें मुख्य ठाणें एकर्सडार्फ येथें केलें. त्याच्या हुकमतीत एकंदर १,२५ ००० चांगली तयार झालेली फौज होती. ग्लॅटझ प्रदेशांतून प्रशिअन सायलेशिआपासून निघून बोहेमिआकडे जाणाऱ्या सहा दुर्घट वाटा आहेत. ह्या वाटांपैकीं एकीचा किंवा अधिक वाटांचा उपयोग करून आपलें सैन्य बोहेमिआंत न्यावें व गिट्स्किनच्या आसपास पहिल्या सैन्याला मिळावें असा त्याचा बेत होता. योग्य विचारांतीं ज्या तीन वाटा अनुक्रमें ट्रॉटेनॉ, ब्रॉनॉ व नॅचोड येथें जातात त्या वाटांनीं कूच करून जावयाचें; नॅचोड येथें पोहोंचल्यावर नॅचोड व स्कॅलिटझ यांचा मध्यवर्ती खुंट्याप्रमाणें उपयोग करून सर्व सैन्यासह डाव्या बाजूस वळावयाचें; नंतर जोसेफ स्टॅडपासून टर्नापर्यंत जाणारा रेलवे रस्ता हस्तगत करावयाचा व अशा रीतीनें पहिल्या सैन्याच्या अगदीं निकट जाऊन भिडावयाचें असा त्याचा बेत होता. ह्या कार्यक्रमास त्यानें ता. २६ रोजीं संध्याकाळीं आरंभ केला.

ऑस्ट्रिअन लोक माघार घेतात.

त्याच तारखेला बेनेडिकच्या सैन्याची मांडणी अशी होती:— चौथी पलटण लँझो येथें; दहावी—पिनिका येथें; सहावी—ओपिनो; तिसरी—कोनिंगग्रॉट्झ व आठवी—टिनिस्ट येथें. ह्यावरून लक्षांत येईल कीं, कौन प्रिन्सनें ठरविलेला मार्ग धोक्याचा होता व ऑस्ट्रि-

अन सेनाधिपतीला त्याच्या हेरांनीं जर काळजीपूर्वक शोध करून बरोबर माहिती दिली असती, तर वरील सर्व पलटणी एकत्र जमवून त्याला वाटांच्या तोंडापाशीं टपून बसतां आलें असतें. मग प्रशिअन पलटणी जसजशा वाटांतून बाहेर पडतील तसतसा त्यांच्या आघाडीच्या लोकांवर भडिमार करितां आला असता.

परंतु उघड आहे कीं, त्याच्या हेरांनीं आपली कामगिरी चोख केली नाहीं. पांचव्या पलटणीच्या आघाडीच्या लोकांना एखादाहि बार न उडवितां ता २६ रोजीं संध्याकाळीं नॅचोड घेतां आलें; कारण ऑस्ट्रिअन लोकांच्या घोडेस्वारांच्या दोनच टोळ्या व दोन हलक्या तोफाच तेवढ्या ह्या ठिकाणीं होत्या सेनापति फॉन बोनिन याच्या हाताखालची पहिली प्रशिअन पलटण आपा नदीच्या काठावरील ट्रॉटेना या उद्योगधंद्याच्या शहरावर चाल करून गेली. विन्डिसकाट्झच्या पलटणींतील कांहीं घोडेस्वार व फारच थोडे ज्यागर पायदळांतील शिपाई एवढाच काय तो ऑस्ट्रिअन सैन्याचा भाग येथें होता, व त्याच्यानें संरक्षणाचें काम होणें अगदीं शक्यच होतें. त्यांनीं तसा प्रयत्न केलाहि नाहीं. शहराच्या बाहेरच्या बाजूसच ऑस्ट्रिअन घोडेस्वार व प्रशिअन घोडेस्वार यांची अगदीं एकमेकांस भिडून चकमक झाली. प्रशिअन पायदळ झपाट्यानें येत आहे असें पाहून ऑस्ट्रिअन घोडेस्वारांनीं लढण्याचें सोडून दिलें व मूठभर ज्यागर पायदळासह ते निघून गेले. त्यांचा प्रशिअन सैन्यानें पाठलागहि केला नाहीं.

ट्रॉटेनॉची लढाई.

परंतु त्या दिवशीं लढाईही होणारच होती. ड्रॅनिश युद्धांत जनरल फॉन गॅब्लेंझ याचें नांव आपल्या कानीं आलेंच आहे. यावेळीं दहावी ऑस्ट्रिअन पलटण त्याच्याच हुकमतींत होती. प्रशिअन सैन्य चाल करून पुढें येत आहे असें ऐकिल्या बरोबर त्यानें एक तुकडी ट्रॉटेनाकडे रवाना केली. मुख्य दळभार घेऊन होईल तितक्या लवकर आपणहि तिकडे जाण्याचा त्याचा बेत होता. ही तुकडी तेथें पोहोंचण्यापूर्वी ट्रॉटेनॉ शत्रूच्या हातीं लागलें होतें. परंतु ट्रॉटेनॉच्या दक्षिणेस कॅपेलेनबर्ग नांवाची एक टेंकडी आहे, त्या टेंकडीवर या तुकडीनें तळ दिला. ह्या ठिकाणीं फॉन बोनिनच्या पलटणीनें तिच्यावर हल्ला चढविला त्यापुढें निभाव लागेल म्हणून तुकडी ऑपेर नदीच्या बाजूनें झाडीनें आच्छादित अशा टेंकड्या आहेत त्यांकडे माघारी गेली त्या तुकडीचा पाठलाग करण्याचें काम अटकळी बहेर त्रासदायक आहे असें पाहून होहेनब्रुक खेडें व रागनिट्झच्या बाजूच्या टेकड्या या ताब्यात घेऊन बोनिन तेथेंच विश्रांति घेत बसला. बोनिन याप्रमाणें तळ देऊन बसतो न बसतो इतक्यांत गॅब्लेंझ आपल्या पहिल्या तुकडीला येऊन मिळाला व लागलीच चढाई करून त्यानें प्रथम होहेनब्रुक येथून प्राशिअन सैन्यास हांकून लाविलें. नंतर कॅपेलेनबर्ग हस्तगत करून घेऊन तो पुढें चाल करीत गेला. अखेरीस त्यानें प्राशिअन सैन्याला ट्रॉटेनॉ सोडून देणें भाग पाडलें.

दोन्ही बाजूचे डावपेंच.

ट्रॉटेनॉच्या पलीकडे गॅब्लेंझनें प्रशिअन सैन्याचा पाठलाग केला नाहीं. ट्रॉटेनॉ येथें पिछाडीचे संरक्षक म्हणून त्यानें पलटण ठेविली; व तो स्वतः आग्नेय दिशेनें जाऊन न्यू–रागविट्झ या लहानशा शहराजवळ उघड्या हवेंत तळ देऊन राहिला. आपल्याला कुमक म्हणून पाठविलेल्या तुकडीस मिळण्याकरितां दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्यू रागविट्झ येथून कूच करून डयूट्स्क प्रॉसनिट्झ येथें जाण्याचा त्याचा इरादा होता. दरम्यान् त्या दिवशीं ट्रॉटेनॉ येथें काय प्रकार झाला आहे याची प्रशिअन गार्डांना कांहींच दाद नव्हती परंतु त्याच दिवशीं संध्याकाळीं ते ऑपा नदीच्या कांठच्या ईपेल नांवाच्या खेडेगावीं व ईपेलच्या आग्नेय दिशेस पांच मैलावर असलेल्या कोस्टेलेटझ शहरीं जाऊन पोहोंचले होते. रात्रीं त्यांचा सेनापति प्रिन्स ऑफ ब्यूर्टेंबर्ग यास प्रशिअन सैन्याच्या पराभवाची बातमी लागली, व त्यानें गॅब्लेंझवर हल्ला करून या नाचक्कीबद्दल ऑस्ट्रिअन सैन्याचा चांगला सूड काढावयाचा असा निश्चय केला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच ऑस्ट्रिअन सेनापति गॅब्लेंझ हा कोठें आहे याचा तलास काढून आणण्याकरितां त्यानें गस्तवाले पाठविले. गस्तवाल्यांनीं आपलें काम फार गैरदिपणानें केलें, कारण त्यांनीं आपल्या सेनापतीला गॅब्लेंझ कोनिजिन हॉफ तेथून ट्रॉटेनॉकडे जात आहे अशी भलतीच बातमी दिली. त्यावरून प्रिन्स ब्यूर्टेंबर्ग यानें ईपेलपासून ट्रॉटेनॉकडे पाठविलेली आहलर पलटण परत बोलाविली व आणखी काय बातमी येते याची तो वाट पाहात



बसला. पुढें दोन तासांनीं न्यू–रागविट्झ पासून डयूटस्क प्रासनिट्झ-कडे गॅब्लेंझ कूच करीत जात आहे ही खरी वार्ता त्याला समजली. नंतर गॅब्लेंझ ज्या मार्गानें कूच करीत होता त्या मार्गावर तीन ठिकाणीं त्याच्यावर हल्ला करण्याची योजना त्यानें केली.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं, ऑस्ट्रिअन सैन्याच्या चौथ्या पलटणीची फ्लीस्काशर याच्या हाताखालची तुकडी आपल्याला कुमक म्हणून पाठविली आहे अशी गॅब्लेंझ यास माहिती होतींच. तेव्हां तिला मिळवून घ्यावी हाच डयूटस्क प्रॉसनिट्झकडे कूच करीत जाण्यांत गॅब्लेंझ याचा हेतु होता. परंतु युद्धांत कधीं कधीं चुका होतात व पुष्कळ वेळां त्या चुका यशाची हानि करतात. बोहेमिन सरहद्दीवर प्रासनिट्झ नांवाचीं दोन खेडीं आहेत; एकाच्या मागें 'डाइश' असें व दुसऱ्याच्या 'ओबर' असें उपपद आहे शेजा-रच्या प्रदेशांत दोन्ही खेड्यांचाहि फक्त प्रासनिट्झ या नांवानेंच निर्देश होत असतो. म्हणून सेनापति फ्लीस्काशर याला जो हुकूम मिळाला त्यांत उपपदाशिवाय फक्त प्रासनिट्झ एवढेंच नाव पडलें असेल ही गोष्ट फार संभवनीय आहे. निदान एवढें तरी निश्चित आहे कीं, फ्लीस्काशर ओबर–प्रासनिट्झकडेच चाल करून गेला व सर्व दिवसभर तो रणांगणाजवळ मुळींच आला नाहीं.

प्रशिअन गार्ड्स जवळपासच आहेत हें गॅब्लेंझ यास समजलें, तेव्हां तो सूर खेड्याच्या अगदीं सनिध होता. नंतर गॅब्लेंझनें न्यू–रागनिट्झ व बर्जर्सडाफ यांमधील टेकड्यांवर आपल्या तोफखान्याची

मांडणी केली; सैन्याची उजवी बगल प्रासनिट्झपर्यंत लांबविली व ट्रॉटेर्ना येथें त्यानें जी तुकडी ठेविली होती तिच्याशीं मिळवून घेण्याकरितां त्यानें डावी बगल तेथपर्यंत नेली. या रीतीनें त्यानें खरा शिपाई करील अशी व्यवस्था ताबडतोब केली. एकंदरींत त्याची परिस्थिति बिकट होती, कारण तो आपल्या तुकडीची सुटका करून घेईपर्यंत त्याला संख्याबलानें मोठ्या शत्रूस मागें हटविण्याचें काम करीत राहावयाचें होतें.

गॅब्लेंझ यास मागें हटावें लागलें.

फ्लीस्काशर यानें आपली पलटण जर इच्छित प्रासनिट्झ येथें नेली असती, तर प्रशिअन फौजेचा हल्ला निदान मागें तरी रेटला गेला असता हें चांगलेंच संभवतें. कारण जीं ठाणीं प्रशिअन सैन्यानें धरून ठेविलीं होतीं तेथून जर त्या सैन्यानें गॅब्लेंझवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांची बगल व डावीकडील पिछाडी याजवर 'डॉइश' प्रासनिट्झ येथील शत्रूनें सहज हल्ला केला असता. परंतु प्रशिअन सैनिकांना आतां या बाजूकडून भीति राहिली नव्हती म्हणून ऑस्ट्रिअन लोकांच्या ठाण्यावर त्यांना फार जोरानें व निश्चितपणें हल्ला करतां आला. याचा परिणाम असा झाला कीं, गॅब्लेंझ याला एक एक ठाणें सोडीत सोडीत जावें लागलें प्रत्येक ठिकाणीं त्याचे सैनिक शौर्यानें लढत पण अखेरीस त्यांचे सर्व प्रयत्न फुकट जाऊन गॅब्लेंझ याला ट्रॉटेनांत अडकलेली पलटन सोडविण्याची आशा सोडून द्यावी लागली. प्रशिअन लोकांना जय मिळाला खरा पण तो

मिळवितांना त्यांची चांगलीच खरारी झाली. त्यांनीं ऑस्ट्रिअन सैन्याचें ठाण्यामागून ठाणें उडवून दिलें खरें; परंतु प्रत्येक ठिकाणीं त्यांचें भयंकर नुकसान होई, क्षणोक्षणीं सैनिकामागून सैनिक गळून पडत व अधिकारीही इतके झपाझप मारले जात कीं जेथें त्यांचा कॅप्टन ठाणें धरून होता तेथपर्यंत जाण्यास पुरते शंभर सैनिकहि उरले नाहींत परंतु अखेर निकालाची वेळ एकदाची आली. गॅब्लेंझ हळू हळू न्यूस्क्लॉ येथें परत गेला व आतां त्याचा पाठलागहि करण्याचें शत्रूनें टाकून दिलें. मुख्य सैन्यापासून तुटून पडलेली ट्रॉटेनॉ येथील पलटन शहरांत शिरली व जिवावर उदार होऊन लढल्यावर तिनें शहर शत्रूच्या स्वाधीन केलें.

ह्या ठिकाणीं यश आल्यामुळें आतां दोन्ही प्रशिअन सैन्यांस पुढच्या हालचाली करणें फार सुगम झालें. ता. २९ रोजीं गार्ड पलटणीनें एल्ब नदीच्या डाव्या तीरावरील कोनिजिन हॉफ, तेथील संरक्षकांस घालवून देऊन ताब्यात घेतलें. ही हकीगत इतकीच ठेवून दुसऱ्या प्रशिअन सैन्याच्या बाकीच्या पलटणींचें काय चाललें होतें हें आतां आपण पाहूं

नॅचोड

ग्लॅट्झपासून नॅचोडकडे जाण्यास जो अरुंद मार्ग आहे त्या मार्गानें कूच करून जाण्याचा हुकूम पांचव्या प्रशिअन पलटणींस झाला होता. हें स्थल संरक्षण करण्यास फार सोईचें आहे. म्हणून प्रशिअन सैन्यास चांगलाच विरोध करण्याची तयारी ह्या ठिकाणीं

करून ठेवावयास पाहिजे होती; परंतु पूर्वी सांगितलेंच आहे कीं, तशी कोणतीच तयारी नसल्यामुळें नॅचोड शहर व किल्ला सर करतांना कोणाताच व्यत्यय प्रशिअन सैन्याला आला नाहीं. सरहद्दीकडील आगगाडीच्या मार्गावर जोसेफ स्टॅडपासून आठ मैलांवर स्कॉलिट्झ आहे. त्या ठिकाणीं सेनापति रॅमिंग याची चौथी ऑस्ट्रिअन पलटण होती. ह्या पलटणीच्या व जोसेफ स्टॅड यांच्यामध्यें आर्च डयूक लिओपॉल्ड याची आठवी पलटण होती प्रशिअन सैन्य नॅचोड येथून स्कॉलिट्झकडे असतांना त्याच्यावर तुटून पडावें अशा बेनेडिक यानें फॉन रॉमिंग यास हुकूम सोडला होता. रॉमिंग यास पाठिंबा देण्याचें काम आर्चडयूक यास सांगितलें होतें.

नॅचोडची लढाई.

सेनापति रॉमिंग यानें याप्रमाणें अंमलबजावणी करण्यास ता. २७ रोजीं सकाळीं आठ वाजतां आरंभ केला. त्यानें आपलें सैन्य बेंझेलबर्गच्या पठरावर ठेविलें होतें—नॅचोडचा अरुंद रस्ता ज्या ठिकाणीं उघड्या जागेवर बाहेर पडतो त्या ठिकाणाच्या किंचित् पश्चिमेस वेंझेलबर्ग आहे; त्यानें आपल्या तोफा उंचवट्यावर ठेविल्या होत्या, व त्यांचा रोख ज्या ठिकाणीं प्रशिअन्स बाहेर पडलेच पाहिजेत असा अजमास होता त्या स्थळावर होता. त्यांच्यापुढें साहाय्यार्थ दोन पायदळ पलटणी ठेविल्या होत्या. तिसरी एक पायदळ पलटण राखून ठेविली होती. अगदीं उघड्या मैदानांत उरलेल्या घोडेस्वारांच्या दोन पलटणी शत्रूचा पुनः एकत्र होण्याचा बेत फस-

विण्याकरितां सज्ज ठेविल्या होत्या. ह्या ठिकाणची ही ऑस्ट्रिअन सैन्याची मांडणी बरीचशी वाखाणण्यासारखी होती. त्या वेळीं नॅचोड-कडून येणारा रस्ता आगगाडीच्या रस्त्याला ज्या ठिकाणीं मिळत होता त्या ठिकाणीं विसोकौ हें खेडें आहे. तें खेडेंही आर्चडयूक लिओ-पोल्ड यानें व्यापून टाकिलें असतें तर ही ऑस्ट्रिअन सैन्याची मांडणी अगदीं निर्दोष झाली असती.

प्रशिअन सैन्याचें आधिपत्य फॉन स्टीनमेट्झ याजकडे व आघा-डीच्या पलटणींचें आधिपत्य फॉन लाबेनफील्ड याजकडे असून कौन प्रिन्स त्यांच्या बरोबरच होता. दहा वाजून गेल्यावर थोडक्याच वेळानें प्रशिअन सैन्याच्या रांगा अरुंद रस्त्यांच्या तोंडांतून बाहेर पडणार तोंच त्यांच्या नायकांस तेथील प्रकार पाहून मोठें आश्चर्य वाटलें. पुढच्या रांगांचा ऑस्ट्रिअन तोफखान्याच्या भडिमारानें फन्ना उडूं लागला. रस्त्याचें तोंड फारच अरुंद होतें, त्यामुळें झपाझप बाहेर पडतां येईना व मागें फिरावें तर वाट सैनिकांनीं अगदीं खच्चून भरली होती. यामुळें आतां तरणोपाय नाहीं असें वाटूं लागलें. लाबेनफील्ड यानें न डनमगतां प्रसंगाला यथायोग्य तोंड दिलें. होईल तितकी झटापट करून त्यानें आपलें सैनिक अरुंद वाटेंतून बाहेर काढले व त्यांना तो एका झाडींत घेऊन गेला. ह्या ठिकाणीं शत्रूच्या तोफांच्या भडिमारापासून त्यांचा अंशतः बचाव झाला. हे सैनिक घोडेस्वारांच्या दोन पलटणी खिंडींतून बाहेर पडेपर्यंत तेथेंच बसून राहिले. लाबेनफील्ड यानें या घोडेस्वारांच्या पलटणींना उरखाण घालून

सज्ज असलेल्या ऑस्ट्रिअन सैनिकांवर हल्ला करण्याचा हुकूम दिला. त्यांनीं मोठ्या शौर्यानें हल्ला चढविला. प्रथम त्यास जय झालासें वाटलें; परंतु लवकरच त्यानें नुकसान होऊन त्यास माघार घ्यावी लागली. ह्या झटापटीनें ऑस्ट्रिअन पायदळाचा मार्ग खुला झाला व तें पायदळ झपाट्यानें प्रशिअन पायदळाला त्या झाडींतून हुसकावून लावण्याच्या इराद्यानें पुढें सरसावलें. हें जर त्याला साधलें असतें तर दोन्ही प्राशिअन पलटणींचा पुरा मोड होऊन त्यांचा तोफखाना ऑस्ट्रिअनांच्या हातीं पडला असता. पण झाडींत प्रशिअन अशा कमालीच्या शौर्यानें लढले, कीं ऑस्ट्रिअनांना त्यांना तेथून हुसकून लावितां येईना. गर्दीतून मार्ग काढून क्रौन प्रिन्स पुढें गेला व त्यानें आपल्या शब्दांनीं व कृतीनें पायदळास उत्तेजन दिलें. अरुंद रस्त्यांतून बाहेर पडून सैनिकांची कुमक त्यास वरचेवर मिळत होती, म्हणून प्रशिअन पायदळ झाडींत आपली जागा धरून राहिलें. परंतु त्यांस झाडींतून बाहेर पडतां येईना, कारण उघड्या मैदानांत उरल्याण घातलेले ऑस्ट्रिअन घोडेस्वार ते पुढें आले तर त्यांच्यावर घाला घालण्यास टपून बसले होते. ह्या उरल्याणधारी घोडेस्वारांस जर आपणाला मागें रेटतां आलें नाहीं, तर आपला आज पराभव खास होणार हें क्रौन प्रिन्सच्या लक्षांत आलें. इतकें त्याच्या मनांत आलें तों घोडेस्वारांची आठवी पलटण व उल्हान पहिली पलटण अरुंद रस्त्यांतून बाहेर पडली. आजचें यश किंवा अपयश केवळ तुमच्या प्रयत्नावर अवलंबून आहे असें क्रौन प्रिन्सनें त्यांस समजावून देऊन 'हल्ला चढवा' असा हुकूम सोडिला. त्यांनीं मोठ्या औत्सुक्यानें हुकूम मान्य केला. ऑस्ट्रि-

अन घोडेस्वार एका जागेवरच उभे होते, परंतु प्रशिअन घोडेस्वार दौडत आल्यामुळें त्यांना वेगाचा फायदा मिळाला. क्रौन प्रिन्सचे शब्द ऐकून त्यांच्या अंगांत वीरश्रीहि आली होती. ह्या दोन कारणांनीं त्यांना उरखाणधारी ऑस्ट्रिअन घोडेस्वारांना उघळून लावितां आलें. त्यांना पुनः एकत्र जमण्यासहि प्रशिअन घोडेस्वारांनीं संधि मिळूं दिली नाहीं. अशा रीतीनें प्रशिअन पायदळाचा मार्ग निष्कंटक झाला. इतक्या वेळांत तोफखाना व पायदळ घेऊन स्टीनमेट्झ त्या स्थळीं आला होता. तो मोठ्या वेगानें पुढें गेला व त्यानें विसोकौ खेडें आपल्या ताब्यांत घेतलें. (हें खेडें ऑस्ट्रिअन लोकांनीं आपल्या ताब्यांत घ्यावयास पाहिजे होतें. परंतु तसें त्यांनीं केलें नव्हतें) प्रशिअन सेनापतीनें विसोकौ येथें तळ दिल्यावर बेनझेलसबर्ग आपल्या ताब्यांत ठेवणें रॅमिंग यास अशक्य झालें. म्हणून रॅमिंगला तें सोडून देऊन घाईघाईनें स्कॉलिट्झ येथें परत जाणें प्राप्त झालें. उरखाणधारी घोडेस्वारांनीं जयश्रीस पुनः आपलीशी करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांस यश आलें नाहीं. स्कॉलिट्झ येथें आर्चडयूक लिओपोल्ड यानें जय मिळविण्याचा कसून प्रयत्न केला. स्टीनमेट्झ चाल करून पुढें गेला होता. त्याचें सैन्य व आर्चडयूक याचें सैन्य यांच्यांत इतका भयंकर संग्राम झाला कीं, जय कोणाचा होणार हें बराच वेळ अनिश्चित होतें; पण कांहीं तास असें युद्ध चालल्यावर आर्चडयूक लिओपोल्ड यास माघार घ्यावी लागली. तो स्कॉलिट्झ सोडून ऑपा नदीच्या पाठीमागें गेला व तेथें नवीन ठाणें देऊन राहिला पुढें तेथूनहि त्यास विजयी प्रशिअन सैन्यानें हांकून लाविलें.

भारत इ., पं. पं, पाचनाउर, मो

स्कॉलिट्झची लढाई.

परंतु या बिकट वाटांच्या ताब्याकरितां आणखी एक लढाई व्हावयाची होती. ता. २९ रोजीं फॉन बोनिन याच्या पलटणींनें व प्रशिअन 'गार्डा'नीं कोनिजिन हॉफ कसें ताब्यांत घेतलें हें मागें सांगितलेंच आहे. पहिलें सैन्य बरोबर घेऊन युद्धाच्या हालचाली करूं लागण्याच्या पूर्वी या महत्त्वाच्या जागीं त्या सैन्यास मिळण्याचा निश्चय क्रौन प्रिन्सनें केला होता म्हणून त्यानें फॉन स्टीनमेट्झ यास त्याच दिवशीं (ता. २९) तुम्हीं कोनिजिन् हॉफच्या दिशेनें कूच करावें असा हुकूम दिला होता.

दरम्यान् सेनापति फॉन रॉमिंग याजवर सोपविलेलें काम फार महत्त्वाचें आहे ही गोष्ट मनांत आणून बेनेडिक यानें सेनापति फेस्टेटिक्स यास चौथी तुकडी घेऊन तुम्ही रॉमिंग याचे मदतीस जा असा हुकूम दिला होता. ता. २६ रोजीं फेस्टेटिक्स लँझ्हो येथें पोंहोचला, व त्याच दिवशीं रात्रीं तीन पलटणी बरोबर घेऊन सहाव्या तुकडीला मदत करण्याकरितां तो डॉलॉकडे निघाला. ता. २९ रोजीं तो स्कीन स्कॉडेल या लहानशा खेड्यांत होता. हें खेडें स्कॉलिट्झच्या पश्चिमेस नैऋत्य कोपऱ्यांत तीन मैल अंतरावर आहे. ह्या जागीं स्टीनमेट्झ यानें त्याच्यावर हल्ला केला. तीन तास तोफांनीं लढाई खेळल्यावर फेस्टेटिक्स यास जोसेफ स्टॅड किल्ल्यावर माघारीं जावें लागलें. नंतर स्टीनमेट्झ यानें पुनः कूच केलें व ग्रॅडलिट्झ येथें जाऊन त्यानें तळ दिला. ग्रॅडलिट्झ कोनिजिन्हाफच्या पूर्वेस दोन मैलांवर आहे.

नॅचोडच्या अरुंद मार्गातें पांचव्या तुकडी मागून सहावी तुकडी निघाली होती, तीहि ग्रॅडलिड्झ येथें ता. ३० ला येऊन पोंहोंचली.

क्रौन प्रिन्स दुसरें सैन्य बोहेमिआंत घेऊन गेला होता. त्यानें आतां सैन्याच्या सर्व तुकड्या कोनिजिन्हाफच्या संनिध एकत्र जमविल्या. त्याची पहिली तुकडी आर्ना येथें होती. ह्या ठिकाणीं एल्ब नदीचा एक पूल आहे. ता. २३ रोजीं ह्याच ठिकाणाहून, पहिलें सैन्य या वेळीं गिट्स्किन येथें होतें, त्याच्या बरोबर दळणवळण सुरूं झालें.

प्रशिअन्स विजयी कां झाले ?

युद्धप्रसंगीं सैनिकांच्या मोठ्यांत मोठ्या संख्येचा निश्चत जागीं उपयोग करावा हें एक मोठें तत्त्व आहे. आतांपर्यंत या युद्धांत ज्या हालचाली झाल्या त्यांत प्रशिअन लोकांनीं हें तत्त्व अंमलांत आणिलें व ऑस्ट्रिअन लोकांनीं तें अंमलांत आणिलें नाहीं ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. नॅचोडच्या लढाईंत ऑस्ट्रिअन सेनापतीनें आठवी तुकडी ऐन प्रसंगाच्या वेळीं उपयोगी पडावी म्हणून नुसती राखून ठेविली होती. ती तुकडी रिकामी न राहतां तिनें जर विसोकौ ताब्यांत घेऊन तेथें छावणी केली असती तर प्रशिअन लोकांच्या पांचव्या व सहाव्या तुकड्यांचा ऑस्ट्रिअन सैन्याला खास पराभव करितां आला असता. एवढी गोष्ट होती, तर मग ऑस्ट्रिअन सैन्याला क्रौन प्रिन्सच्या सैन्याचा मोड प्रथम करितां आला असता. तदनंतर त्याना प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या सैन्याचाहि चांगला समाचार घेतां येणें शक्य झालें असतें.

प्रकरण १० वें.

कोनिग्रॅट्झची लढाई.

बोहेमियांत संरक्षण करण्यास सोपीं पण काबीज करण्यास अवघड अशीं पुष्कळ स्थळें आहेत. मागील भागांत सांगितल्याप्रमाणें ऑस्ट्रिअन लोकांचा पराभव ठिकठिकाणीं झाला होता. तरीहि अजून बेनेडिक यास आपलें २०,५०,०० लोकांचें सर्व सैन्य एकत्र करून अशा एखाद्या ठिकाणीं छावणी ठेवून राहाणें शक्य होतें कीं त्या ठिकाणावर हल्ला करण्याचें काम शत्रूस दुरापास्त व धोक्याचें झालें असतें आपल्या सैन्याची उजवी बाजू कोनिग्रॅट्झवर टेंकून व डावी बाजू आल्टवासर प्रांतांत ब्रिस्टिट्झ नदीच्या खालच्या भागांतील डबक्यांपर्यंत नेऊन जर त्यानें सर्व सैन्य एल्ब नदीच्या उजव्या तीरावर तळ देऊन ठेविलें असतें तर त्याची नाकेबंदी बरच्यासारखी झाली असती. अशा प्रकारचें ठाणें कोणत्याहि शत्रूला दुर्भेद्य झालें असतें. कदाचित् अशा स्थळीं त्याचा पराभव झाला असता तरी त्याला निदान सुरक्षितपणें परत तरी जातां आलें असतें. परंतु बेनेडिक यानें जास्त आघाडीची जागा पसंत केली तिचें वर्णन खालीं दिलें आहे.

पश्चिमेकडून येऊन हारिट्झपासून कोनिग्रॅट्झकडे जाणारा रस्ता ब्रिस्टिट्झ नदीच्या दगडी पुलावरून सॅडोना नांवाच्या खेड्याला लागूनच पलीकडे जातो. नदीच्या उगमाकडे मायलेटीनपर्यंत व तिच्या

मुखाकडे नेकॅनिट्झपर्यंत चाल करून येणाऱ्या शत्रूला म्हणण्यासारखा प्रतिबंध होतो असें नाहीं परंतु नदी एका रुंद व दलदलीच्या दरीतून वाहते, वारंवार पूर येतात त्या पुरांमुळें रस्ते व पूल नेहमीं पाण्यांत बुडालेले असतात. बिस्ट्रिट्झच्या डाव्या तीराकडील प्रदेश वांकडातिकडा व खडकाळ आहे टेंकड्या व टेंकड्यांच्या रांगा यांच्यामध्यें ओहोळ पडलेले आहेत. त्यामुळें सैनिकांना—विशेषतः राखून ठेवलेल्या सैनिकांना—लपून बसण्यास ही जागा फार सोईची आहे. ह्या प्रदेशांत मोठाल्या झाडें, जंगलें, झुडपें व शिकारीस योग्य अशीं रानें फार आहेत. नेकॅनिट्झ व प्रिस्म यांच्या आसमंतांत तर यांची अगदीं गर्दीच आहे. हा खडकाळ प्रदेश जरी अगदीं उंच सखल आहे तरी एखादा शिपाई बिस्ट्रिट्झच्या उजव्या तीरावरून अगर डब टेकडीच्या माथ्यावरून जर याचें निरीक्षण करील तर या प्रदेशाच्या ठेवणीची कल्पना त्याला एकंदरींत बरीच चांगली होईल. त्याला हा प्रदेश अर्धचंद्राकार रंगभूमीसारखा दिसेल, व त्या भूमींतून कोनिग्रेट्झकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील क्रम नांवाचें खेडें हें त्या भूमीचें अत्युच्च स्थान होय असें त्याच्या लक्षांत येईल. ह्या खेड्यापासून मोठ्या रस्त्याला दोन फाटे फुटतात. एक उत्तरेकडे ग्रास-वर्गिलिट्झ व तेथून हारिट्झकडे जातो व दुसरा दक्षिणेस प्रोलसवरून नेकॅनिट्झकडे जातो.

बेनेडिक याची छावणी.

ह्या भूभागाच्या पुढून बिस्ट्रिट्झ नदी वाहत जाते व बेनेडिक यानें याच भूभागाची, आपलें सर्व सैन्य एकत्र जमविण्याचें केंद्र म्हणून

निवड केली होती. या भूभागाची किल्ली व केंद्र क्रुम हें खेडें होतें. बेनेडिकच्या सैन्याची मांडणी या प्रमाणें होती:—स्याडोना व क्रुम यांच्यामध्यें जो राजमार्ग आहे त्याच्या उजव्या व डाव्या बाजूस चौथी तुकडी; त्या तुकडीच्या उजव्या बाजूला हारझेनाव्हीस व ट्राटिनूका येथें तिसरी व दुसरी; गॅब्लेंझ याच्या हुकमती खालील नेकॉमिट्झपर्यंत पसरेली तुकडी (ही आठवी व दहावी या तुकड्या एकत्र करून बनलेली होती) चौथ्या तुकडीच्या संनिध तिच्या डाव्या बाजूस; राखून ठेविलेल्या पहिली व सहावी या तुकड्या क्रुमच्या कांहींशा उजव्या बाजूस रॉसबेरिट्झ येथें; या तुकड्यांच्या पिछाडीस घोडेस्वारांच्या पलटणी.

ट्राटिनूका नदीपासून हारझेनाव्हीसला अगदीं लागून क्रुम व न्यूप्रिझमपासून व्हाडिनला जाणाऱ्या रस्त्यापर्यंत बेनेडिकच्या सैन्याच्या छावणीच्या आघाडीच्या बाजूची लांबी ७ मैलांपेक्षां कांहीं थोडी जास्त होती. यामुळें आघाडीच्या बाजूवर असलेल्या सैनिकांची संख्याहि फार मोठी होती; इतकी कीं, ५ फुटांत २४ सैनिक असें प्रमाण पडलें.

बेनेडिकच्या छावणीच्या सोई व त्यंगें.

समोरून हल्ला आल्यास त्यापासून रक्षण करणारास या जागेच्या स्वाभाविक ठेवणीनें फार मोठी मदत आपोआप होण्यासारखी होती. बेनेडिक यानें या ठिकाणीं पायदळहि अतोनात आणून ठेविलें होतें. इतकें असूनहि शिवाय शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून या जागेच्या

संरक्षणास जास्तच बळकटी आणिली होती. सँडोआकडून किंवा उत्तरेकडून चाल करीत येणाऱ्या शत्रूवर तोफांचा मोठ्या जोराचा भडिमार सारखा करितां यावा अशा रीतीनें आपल्या दांडग्या तोफखान्यांतील ६०० तोफांची रचना करण्याच्या कामीं बेनेडिक यानें विशेष खबरदारी घेतली होती. ह्या इराद्यानें क्रुम व लिपा यांच्या आसपास एका मागें एक जास्त जास्त उंच अशा तीन पठारांवर सँडोआकडे तोंडें करून त्यानें तोफा लाविल्या होत्या. त्यांत वेळेस तोफांचीं तोंडें उत्तर दिशेकडेहि वळवितां येतील अशी युक्ति केली होती सँडोआच्या दिशेनें शत्रूवर होणाऱ्या तोफांच्या भडिमाराच्या आड कांहीं येऊं नये म्हणून मधलीं झाडेंझुडपें त्यानें कापून काढिलीं होतीं. ह्या तोडलेल्या झाडांचा त्यानें एक प्रकारचा तटच बनविला होता. हा तट दुरून शत्रूला दिसण्यासारखा नसल्यामुळें त्याला पुढें चाल करून येतांना त्याचा अडथळा होणार होता. तोफांचा भयंकर भडिमार होत असतांना तर या पासून शत्रूला फारच त्रास होणार होता.

ही बेनेडिकच्या छावणीची जागा शत्रूला हल्ला चढविण्यास निःसंशय फार कठीण होती. परंतु प्रत्यक्ष परिस्थिति लक्षांत घेतली तर या बेनेडिकच्या योजनेंत व्यंगेंहि राहिलीं होतीं हें आपल्यास समजून येईल. ह्या वेळीं क्रौन प्रिन्सच्या सैन्याचें मुख्य ठाणें कोनिजिनहॉफ येथें होतें. ऑस्ट्रिअन सैन्याच्या उजव्या बगलेचें टोंक व कोनिजिहॉनफ, यांच्या मधील फार थोडें अंतर हें पहिलें व्यंग. हें अंतर जेमतेम ८॥ मैल होतें. जून ३० व जुलई ३ यांच्या दरम्यान्

गिट्स्किन येथील अधिकारी व क्रौन प्रिन्सच्या उजव्या बगलेचे अधिकारी यांच्यामध्यें कांहीं पत्रव्यवहार झाला असावा असें गृहीत धरण्यास बेनेडिक यास सबळ कारणें होतीं आणि आपल्या सैन्याच्या उजव्या बाजूपर्यंत येऊन पोहोंचण्यास क्रौन प्रिन्स यास फक्त तीन तास बस्स होते हें त्यास निःसंशय माहीत होतें. यामुळें आपल्या बगलेवर केव्हांहि हल्ला अगदीं सहज होईल हें त्याच्या चांगलें लक्षांत आलें असलें पाहिजे. क्रौन प्रिन्स यास निघण्यास उशीर झाला असता व वाटेने त्याचा थोडाबहुत खोळंबा झाला असता असें जरी आपण धरून चाललों तरी त्याला कूच करून या जागीं येऊन पोहोंचण्यास सहा तासांपेक्षां जास्त वेळ लागला नसता. त्याच्या मदतीला येणाऱ्या पलटणीहि त्याच्या मागून कांहीं अंतरानें तेथें येऊन दाखल झाल्या असल्याच. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे पुढल्या बाजूनें हल्ला सुरू झाल्याबरोबर थोड्याच अवधींत आपल्या बगलेवर हल्ला खास होईल असें माहीत असूनहि बगलेच्या रक्षणाची कांहीं तरतूद न करितां बेनेडिक पुढल्या बाजूनें हल्ला येण्याची वाट पहात कां बसला हें मुळींच समजत नाहीं. दुसरें सैन्य येण्यापूर्वीच पहिल्या सैन्याचा आपण पराभव करून टाकूं या उमेदीनें त्यानें असें केलें असेल हें संभवतच नाहीं. तर्कशास्त्राच्या निष्ठुर नियमांनीं वरील कल्पनेची छाननी केल्यास ती कल्पना तेव्हांच विरघळून जाते. कारण त्यानें पहिल्या सैन्याचा पराभव केल्यावर मिळालेल्या संधीचा चांगला उपयोग करून घेण्याचा प्रयत्नच केला नाहीं; त्याला दुसरें सैन्य आपल्या अगदीं इतकें संनिध आहे हें माहीतच नव्हतें. बेनेडि-

कच्या दुसऱ्या एका कृतीमुळें क्रौन प्रिन्सच्या निकट सांनिध्यापासून उद्भवणाऱ्या अनर्थाचा संभव चांगलाच दुणावला लढाईच्या दिवशींच सकाळीं त्यानें आपल्या अधिकारीवर्गाचा मुख्य फॉन हेनेक्स्टीन यास कामावरून दूर करून कैदेंत ठेविलें व जनरल बाँगारटेन याची नेमणूक त्याच्या जागीं केली. बाँगारटेन हा जरी अवतारी पुरुष असता तरी सुद्धां त्याला एक अर्ध्या तासात हेनेक्स्टीननें आदले दिवशीं करून ठेविलेल्या योजनांचें रहस्य समजून घेतां आलें नसतें. आणि बाँगारटेन हा अवतारी पुरुष तर खास नव्हता; एवढेंच नव्हे तर त्याच्या अंगीं विशेषशी कर्तबगारी सुद्धां नव्हती. अत्यंत महत्त्वाच्या जागीं त्याची एकदम नेमणूक झाल्यामुळें अनर्थ गुदरणार हें ठरल्यासारखें होतें व त्याप्रमाणें पुढें झालेंच

येथवर ऑस्ट्रिअन सैन्याच्या छावणीच्या जागेचें निरीक्षण केलें. आतां त्या छावणीवर हल्ला करण्याकरितां जें सैन्य ता. ३ जुलई रोजीं सकाळीं कूच करून निघालें त्या सैन्याच्या हालचालीकडे आपण वळूं.

प्रशिअनांच्या हालचाली

प्रशिआच्या राजानें ता. १ जुलई रोजीं आपल्या पलटणींच्या व तुकड्यांच्या सेनापतींस पुढील हुकूम दिले.

जनरल हॉर्नच्या चौथ्या पलटणीपैकीं आठव्या तुकडीनें अशा बेतानें कूच करावें कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं दोन वाजतां तिला मिलोविट्झ येथें जाऊन तळ देतां यावा. फ्रॅन्सेकीच्या सातव्या

पलटणीनें ग्रासजरासिट्झ येथें बिस्ट्रिट्झ नदी उतरून वरच्याच वेळीं सेरेकिट्झच्या किल्ल्यापाशीं जावें जनरल फॉन मॅन्स्टीन याच्या पांचव्या व सहाव्या पलटणींनीं हारिट्झच्या दक्षिण दिशेस राखून ठेवलेली फौज म्हणून तळ देऊन बसावें. पांचवी पलटण ही उजवी बगल असावी. सहावीनें डावी बगल म्हणून हारिट्झपासून कोनिग्रॅट्झकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पूर्वेस तळ देऊन बसावें.

ता ३ रोजीं दुसऱ्या पलटणीनें हॉर्नच्या तुकडीच्या उजव्या बाजूस सकाळीं दोन वाजतां तळ द्यावा—एका तुकडीनें ब्रझुकिकरस्टॅन येथें व दुसरीनें प्स्क्यानेक येथें. राखून ठेवलेल्या घोडेस्वारांच्या पलटणीनें बॅरस्कनिट्झच्या आसपास रात्रीं उघड्या हवेंत तळ दिला होता. त्यानें दिवस उगवण्याच्या पूर्वी घोड्यावर सामान वगैरे घालून दिवस उगवतो तों अगदीं सज्ज असावें. राखून ठेविलेल्या तोफखान्यानें हारिट्झकडे जावें—तिसऱ्या पलटणींच्या तोफखान्यानें मायलेटीनचा रस्ता रोखावा, चौथ्या पलटणीच्या तोफखान्यानें गिट्स्किन रस्त्यावरील लायबोनिट्झ येथें तळ द्यावा.

ता. १ रोजीं सेनापति बिटेनफील्ड यानें त्याला जितके सैनिक मिळतील तितके घेऊन अगदीं सकाळींच स्मिडारपासून निघून नेकॅनिट्झ येथें जावें. दुसऱ्या पलटणीनें बिटेनफील्डच्या डाव्या बाजूस संनिध असावें. सेरेकिट्झ येथील फ्रेन्सेकी तुकडीनें दुसऱ्या पलटणीच्या शेजारींच असावें. बिटेनफील्डच्या सैन्यानें कोन

प्रिन्सच्या सैन्याच्या संनिध यावें. क्रौन प्रिन्सनें आपली उजवी बगल ग्रास–बर्ग्लिट्झपर्यंत पसरावी अशी त्यास विनंति केलीच होती.

प्रशिअनांचे बेत फिरतात.

प्रशिआचा राजा ता. १ जुलई रोजीं दुपारीं गिट्स्किन येथें आला व तिन्ही सैन्यांचें आधिपत्य त्यानें आपल्याकडे घेतलें. ता. २ रोजीं राजानें तेथें युद्धमंडळाची सभा भरविली. त्या सभेला सर्व सैन्याचे अधिपति बोलाविले होते. ह्या सभेंत असें ठरलें कीं, ता. ३ रोजीं प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यानें कोनिग्रॅट्झकडे टेहळणी करण्याकरितां कांहीं सैनिक धाडावे; व बेनेडिकच्या सैन्याशीं जोसेफस्टॅड किल्ल्यांतील लोकांचें दळणवळण बंद पाडण्याच्या हेतूनें क्रौन प्रिन्सनें बरीच मोठी तुकडी जोसेफस्टॅडकडे पाठवावी. परंतु हे बेत सिद्धीस गेले नाहींत. ते कां, याचें वर्णन पुढें दिलें आहे.

ता २ रोजीं गिट्स्किन येथें भरलेल्या युद्धमंडळाच्या सभेला प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स हा गेला होता. इकडे त्यानें दोन अधिकारी परिस्थितीची टेहळणी करण्याकरितां पाठविले होते. त्यांची व ऑस्ट्रिअन घोडेस्वारांच्या एका टोळीची गांठ बिस्ट्रिट्झ नदीच्या प्रशिअन छावणीच्या बाजूला हारिट्झपासून कोनिग्रॅट्झकडे जाणाऱ्या रस्त्यावर पडली. त्या टोळीनें या दोन अधिकाऱ्यांचा पाठलाग मोठ्या जोरानें केला. परंतु त्यांपैकीं एकाला थोडीशी दुखापत झाली तरी दोघेहि कसेबसे सुरक्षितपणें आपल्या छावणींत येऊन पोहोंचले.

त्यांनीं सांगितलेल्या बातमीवरून प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याचा असा समज झाला कीं, आपण आपल्या सैन्याला जाऊन मिळण्याच्या अगोदर दुसऱ्या दिवशीं सकाळीं बेनेडिक आपल्यावर हल्ला करणार. म्हणून त्यानें आपणच हारिट्झच्या पलीकडे पुढल्या बाजूनें पुढें सरकून शत्रूवर अगोदर हल्ला करावा व बिटेनफील्ड यानें शत्रूच्या डाव्या बगलेवर हल्ला करावा व अशा रीतीनें शत्रूचा बत फसवावा असा निश्चय केला ह्या ठिकाणाहून कौन प्रिन्सकडे घोडा दौडींत जाण्यास तीन तास लागले असते, इतक्या अंतरावर कौन प्रिन्स होता. त्याला आपला बेत कळवून तुम्ही या कामीं माझ्याशीं सहकार करावा अशी आपल्यातर्फे विनंति करण्याकरितां प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यानें एक अधिकारी पाठविला कौन प्रिन्स चार्ल्स व त्याचा सेनापति फौन ब्लुमेंथाल यांनीं प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या म्हणण्याप्रमाणें करण्याचें साफ नाकारिलें, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. त्या दोघांना ऑस्ट्रिअन सैन्य चाल करून पुढें येईल ही बातमी बहुतेक असंभवनीय वाटली असावी. अशा स्थितींत राजास मध्यें पडणें भाग पडलें प्रत्यक्ष राजाकडून निरोप घेऊन तो सांगण्याकरितां कौंट फिंकेनस्टीन आला तेव्हांच " आम्ही त्याप्रमाणें करूं " असें वचन या दोघांनीं दिलें.

प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स पुढें कुच करतो.

त्याच दिवशीं संध्याकाळीं प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यानें मागें सांगितलेल्या स्थळीं जाण्याबद्दल आपल्या सैन्यास हुकूम दिला.

20 APR 1990

या स्वारींत ज्यांच्या शौर्याची पारख झाली होती असे ८७,००० लढाऊ लोकांचें सैन्य त्याच्या हाताखालीं होतें. बेनेडिक आपणावर हल्ला करणार ही कल्पना अजूनही त्यानें सोडिली नाहीं. ता. ३ रोजीं सकाळीं साडेपांच वाजतां त्याच्या पलटणी नेमलेल्या ठिकाणीं, शत्रूशीं गांठ न पडतां किंवा शत्रु नुसता दृष्टीसहि न पडतां, गेल्या तरी सुद्धां त्याच्या मनांतून शत्रु चढाई करणार आहे ही कल्पना जाईना आपली कल्पना आणखी कसाला लावून पाहण्याच्या उद्देशानें त्यानें त्याच-वेळीं हॉर्नची तुकडी डनपर्यंत व दुसऱ्या पलटणींच्या तुकड्या अंटर–डोहलिट्झपर्यंत पुढें नेल्या. तरी सुद्धां शत्रु दृष्टीस पडेना नंतर ढबपासून सेंडोआपर्यंत पुढें कूच करा असा हुकूम हॉर्न यास मिळाला. हॉर्न त्या जागेजवळ आला तोंच लिपा येथील ऑस्ट्रिअन तोफांचा मारा त्याच्या सैन्यावर होऊं लागला व सरते शेवटीं आतां शत्रुसंनिध आपण आलों अशी त्याची खात्री झाली. हें शत्रूचें सैन्य म्हणजे पिछाडीचे सैनिक आहेत अगर सैन्याचा मुख्य भाग आहे, हें त्यास निश्चयात्मक कळेना. परंतु थोडा वेळ निरीक्षण केल्यावर शत्रूचें सर्व सैन्य आपल्या समोर आहे याबद्दल त्याच्या मनांत तिळमात्र संशय राहिला नाहीं.

लढाईच्या पूर्वीची वेळ.

एक क्षणही विलंब न करितां शत्रूवर हल्ला करण्याचा निश्चय प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यानें केला. जोराचा तोफांचा मारा करून ऑस्ट्रिअन सैन्याच्या मध्यभागाचें सर्व लक्ष आपणाकडे ओढून

ध्यावयाचें व प्रशिअन सैन्याच्या उजव्या बाजूनें फॉन बिटेनफील्ड यानें आणि कोनिजिन्ग्रॉफच्या बाजूनें, क्रौन प्रिन्स यानें ऑस्ट्रिअन सैन्याच्या बगलांवर हल्ला चढवावयाचा, असा प्रिन्स फ्रेडरिक याचा बेत होता. याप्रमाणें त्यानें आठ वाजतां तोफखाना अग्रभागीं ठेवून हॉर्नची तुकडी थेट सॅडोआ व बिस्ट्रिट्झ नदीचा पूल यांकडे रवाना केली; बाकीची व्यवस्था पुढें दिल्याप्रमाणें होती. या तुकडीच्या उजव्या बाजूला चौथी तुकडी अंटरडालिट्झकडे; पुनः या तुकडीच्या उजवे बाजूस वरडरची तिसरी तुकडी, डोहलिट्झ व माक्रोवूसकडे. याच वेळीं त्यानें केरेक्विट्झ येथें सातवी तुकडी घेऊन फ्रेन्सेकी बसला होता त्याला तुम्ही प्रथम बेनॅटेककडे कूच करून जा व मग सॅडोआ व मोक्रोवूस यांच्या दरम्यान आघाडीकडे लढाई जुंपली म्हणजे तेथून दक्षिणेकडे व्हा असा हुकूम दिला होता. तिसऱ्या पलटणीची पांचवी व सहावी तुकडी यांनीं आठवी, तिसरी व चौथी या तुकड्या हारिट्झ येथें होत्या त्यांस मदत करण्याकरितां एकदम कूच करावें असा हुकूम त्यांसहि सुटला होता

याप्रमाणें प्रशिअन फौजा मिळालेल्या हुकुमान्वयें नेमलेल्या ठिकाणीं जाण्याकरितां कूच करीत असतां ज्या ऑस्ट्रिअन सैन्यावर आतां हल्ला होणार होता त्याच्या मांडणीकडे आपण पुनः एकदां दृष्टी फेंकल्यास कांहीं वावगें होणार नाहीं. ऑस्ट्रिअन लोकांच्या बहुतेक सर्व तोफा मध्यभागीं आणिल्या होत्या. हा मध्यभाग म्हणजे लिपा व क्रम यांच्या समोरचा भूभाग, व क्रम हें खेडें त्या ठिकाणाचें

अत्युच्चस्थान. तोफांच्या रांगा कशा रचिल्या होत्या व तोडलेल्या झाडांझुडपांनीं एक प्रकारचा तट करून वाटा कशा अडविल्या होत्या हें मागें सांगितलें आहेच. उजवी बाजू सेंड्रूसिट्झ या खेड्यापर्यंत पसरली होती. तिच्या बरोबरचा एक पलटण (ब्रिगेड) एल्ब नदीला मिळणारी एक नदी ट्रॉटिना इच्यापर्यंत गेली होती. डाव्या बगलेचा मध्य प्रोब्लस, नंडि आणि ओबर–प्रिम या खेड्यावर होता, व या बगलेचें टोंक हॅड्रेक झाडी व किल्ला याच्यावर जाऊन ठेपलें होतें. या बगलेचे आघाडी–रक्षक नेकॅनिट्झ येथें होते लिपा व क्रम या ठिकाणच्या तोफखान्याला आधारभूत जो मध्य त्यांत पुढील पलटणी होत्याः–लँजेनहॉफ येथें दहावी, सिस्टोज जवळ तिसरी व तिच्या उजव्या बाजूस मॅस्लोवीड येथें चौथी. उजव्या बगलेंत घोडेस्वारांची दुसरी पलटण व दुसरी तुकडी होती; डाव्या बाजूच्या मध्यावर सॅक्सन घोडेस्वार होते. रासनिट्झ, सेस्टर व स्मेटी या खेड्यांच्या आसपास राखून ठेवलेल्या सैन्याच्या रक्षणार्थ घोडेस्वारांची आठवी पलटण ठेविली होती.

लढाईला आरंभ होतो.

तोफांची लढाई आठ वाजण्याच्या कांहींशीं अगोदर सुरू झाली व अर्ध्याच तासानें तिला अत्यंत उग्र स्वरूप आलें. या भयंकर संग्रामांत ऑस्ट्रिअन सैन्याच्या तोफांची मांडणी फारच उत्तम साधली असल्यामुळें त्या सैन्याला मोठा फायदा झाला. सकाळीं पाऊस पडत असल्यामुळें हवेंत ओलसरपणा असून जिकडे तिकडे धुकें पसरलें

होतें; पण ऑस्ट्रिअन सैन्याच्या तोफांची रचना अत्युत्तम असल्यामुळें त्याच्या तोफांचे गोळे जसे नेमके पडत तसे नुकतेच तेथें आलेल्या प्रशिअनांचे पडेनात. शत्रूकडून होणारा तोफांचा भडिमार फारच जोरांत आला, त्या सुमारास प्रशिअन राजा प्रत्यक्ष संग्रामाच्या जागीं आला व त्यानें सर्व अधिकार आपल्याकडे घेतला. रणांगणावर त्याला ऑस्ट्रिअन सैन्याचा गोळीबार किती बिनचूक होत होता याचा प्रत्यक्ष अनुभव लवकरच आला. तो घोड्यावर बसून उभा होता त्या जागेच्या जवळच घोडेस्वारांच्या टोळीच्या बरोबर मध्यावर एक गोळा पडून फुटला, व त्यानें चार बळी घेतले ह्या पुढें लवकरच, सकाळ पासून धो धो पाऊस पडत होता तो थांबला व आकाश स्वच्छ झालें, तथापि ऑस्ट्रिअन तोफा इतक्या सोईच्या ठिकाणीं ठेवल्या होत्या कीं त्यांचा भयंकर भडिमार चालू होता तरी घुरा-शिवाय प्रशिअन सैन्याला दुसरें कांहींच दिसत नव्हतें. त्यांचें पाय-दळ कोठें होतें हें अजूनहि प्रशिअनांस समजेना. जमिनींचे खांच खळगे व लहानसहान झाडेंझुडपें यांच्यामुळें ऑस्ट्रिअन सैनिकांचीं शस्त्रें प्रशिअन सैनिकांच्या दृष्टीआडच राहिलीं. ह्या अदृश्य शत्रूचे सर्व सैनिक एकदां दृष्टीस पडतील अशी कांहीं तरी युक्ति करणें अत्यंत अवश्य आहे असें प्रशिअनांस वाटूं लागलें. नंतर सुमारें नऊ वाजतां हॉर्नच्या तुकडीनें व दुसऱ्या पलटणींच्या दोन तुकड्यांनीं आपल्या पायदळसह बिस्ट्रिट्झ नदी उतरून जावें असा राजानें हुकूम दिला. हा हुकूम मान्य करून पहिल्या तीन तुकड्यांनीं बिस्ट्रि-

रुझ नदी ओलांडिली दलदलीच्या जागेच्या पलीकडे त्या नदीच्या दक्षिण तीरावर झुडपानें आच्छादित अशा टेंकड्या आहेत त्या टेंकड्यांत या सर्व सैनिकांना नीट वाट सांपडेना, तथापि कांहीं वेळानें ते कसे तरी तेथून बाहेर पडले व डोहलिट्झव व मोक्रोवूस ह्यांच्यामध्यें ज्या टेंकड्या आहेत त्यांवर त्यांनीं तळ दिला. ह्या ठिकाणावरून तोफांचा मारा त्यांनीं सुरू केला; परंतु पहिला दारूगोळा संपल्यावर दोनदां नवीन दारूगोळा आणून तोफा सारख्या चालू ठेविल्या तरीसुद्धां शत्रूवर या माऱ्यामुळें म्हणण्यासारखा कांहींच परिणाम झाला नाहीं असें प्रशिअन सेनापतींना आढळून आलें दुसरीकडे फ्रेन्सेकीच्या तुकडीला घोडेस्वारांची मदत चांगली होती. ही तुकडी बरोबर घेऊन तो बेनॅटेकवर चाल करून गेला तथापि त्याचें पाऊल फार सावकाशीनेंच पुढें पडत होतें. त्यानें मोठ्या नेटानें पुढें सरकण्याचा क्रम तसाच चालू ठेवल्यावर एक ऑस्ट्रिअन घोडेस्वारांची तुकडी त्याला जिंकता आली. या तुकडीचें निशाणहि त्याच्या हातीं लागलें. पुढें मोठ्या निकराची झटापट करून त्यानें बेनॅटेक व मॅस्लॉवीड यांच्यामधील झाडींतून एक पायदळ पलटण हांकून लाविली. नंतर त्यानें बाराबी पलटण हॉर्न याला मदत करण्याकरितां सॅडोआकडे पाठविली. परंतु ऑस्ट्रिअन सैन्य स्वसंरक्षण मोठ्या शौर्यानें करीत होतें, त्यामुळें फ्रेन्सेकी याचें पाऊल फार हळू हळू पुढें पडलें व त्याचें नुकसानहि फार झालें. वर सांगितलेल्या या झाडींच्या ताब्याकरितां झालेली ही लढाई या युद्धांतल्या अति भयंकर लढायांपैकीं एक होती, असें पुष्कळांचें मत आहे.

प्रशिअन लोकांचें पाऊल पुढें पडत नाहीं.

सॅडोआ व डोहॅलिट्झ यांच्यामधील झाडीच्या ताब्याबद्दल हि अशीच निकराची झटापट झाली व अखेरीस प्रशिअन सैन्यानें त्या झाडीचा ताबा घेतला. परंतु ह्या झाडीच्या जागा अशा रीतीनें जरी प्रशिअन लोकांच्या ताब्यांत आल्या तरी तो ताबा तसाच राखून ठेवण्याचें जबाबदारीचें काम त्याबरोबरच त्यांच्याकडे आलें. प्रशिअन सैन्यावर अजून हि तोफांचा भडिमार होत च होता, कारण शत्रूनें धरलेली जागाच मुळीं चांगली माऱ्याची होती. यामुळ ताबा कायम राखण्याचें काम प्रशिअन सैन्याला फारच जड जाऊ लागलें अखेरीस डोहॅलिट्झ येथील झाडींत बसलेल्या दुसऱ्या पलटणास तोफांचा मारा असह्य झाला. म्हणून या पलटणीच्या जागेंतून ती पलटण बाहेर पडली व तिनें मोठ्या त्वेषानें लिपा व लँजेनहॉफ या ऑस्ट्रिअन ठाण्यावर हल्ला चढविला परंतु लिपा येथील तोफांच्या भडिमारानें व लँजेनहॉफ येथील पायदळानें केलेल्या गोळीबारानें प्रशिअन सैनिकांचा फार संहार होऊं लागला व अत्यंत नुकसान झाल्यामुळें राहिलेल्या सैनिकांना मागें फिरावें लागलें.

ऑस्ट्रिअन आपली जागा धरून राहतात

या वेळीं प्रशिअन सेनापतींपैकीं निदान कांहींच्या तरी मनांत इतक्यांत कौन प्रिन्स येऊन हजर झाला नाहीं तर आपला मोड खास होणार असा विचार खात्रीनेंच आला असेल. हें ह्या वेळपर्यंत म्हणजे बहुतेक मध्याह्नापर्यंत ऑस्ट्रिअन लोकांना त्यांच्या

खऱ्या बळकटीच्या जागेवरून हालविण्याच्या कामीं प्रशिअन लोकांना यत्किंचित्हि यश आलें नव्हतें. इतकेंच नव्हे तर फ्रॅन्सेकी यनें मिळविलेले जय जरी वर्णनीय होते तरी त्यांच्या योगानें प्रशिअन लोकांचा मुख्य हेतु सिद्ध होण्यास बिलकुल मदत झाली नाहीं. कारण लढण्याच्या भरांत फ्रॅन्सेकी हा नेमलेल्या मर्यादेच्या फारच पुढें गेला होता. आपलें मुख्य काम थोडेसें डाव्या बाजूकडे वळून इतक्यांत क्रौन प्रिन्सचें सैन्य येईल त्याच्याशीं मिळणें हें आहे, याचें त्याला अगदीं विस्मरण झालें असावें.

डाव्या बाजूकडे व मध्यावर झालेल्या झटापटीपासून प्रशिअन सैन्याला जसा फायदा झाला नाहीं तसेंच उजव्या बाजूकडेहीं त्यांनीं अजून विशेषसें कांहींच केलें नव्हतें जनरल ब्रिटेनफील्ड यानें सैन्य रणांगणांत सुमारें दहा वाजतां आणिलें. केनर्स्टीनच्या पंधराव्या तुकडीला ब्रिस्ट्रिट्झ नदीच्या पलीकडे नेकॅनिट्झ येथें उतरवून तिला हॅड्रेककडे जाण्यास सांगितलें; तिच्या पाठीमागून १४ व्या तुकडीनें जाऊन शत्रूला प्रोब्लस येथून हांकून लावावें. असा हुकूम दिला होता. सेळावी तुकडी व एल्ब आर्मीची राखून ठेवलेली घोडेस्वारांची तुकडी या दोहोंनीं वरील हालचाली करितां सर्व तुकड्यांना अगोदर मदत करावयाची होती व मग त्यांनीं चॅरबुसिट्झच्या बाजूनें ब्रिझा येथें जावयाचें होतें. ह्या सर्व ठिकाणीं ऑस्ट्रिअन लोकांनीं बचावाचें काम मोठ्या शौर्यानें केलें. अखेरीस प्रशिअन लोकांनीं जरी पाऊल पुढें टाकिलें तरी त्यांची

ति फारच सावकाश झाली, व ते पुढें आल्याचा मुख्य हल्ल्याच्या व बचावाच्या कामावर कांहींच परिणाम झाला नाहीं.

कारण मध्यभागीं हॉर्नची तुकडी व तिच्याबरोबर तिच्या मदतीस असलेल्या दोन पलटणी यांची फारच खराबी झाली होती; आणि शत्रूला आंवरून धरण्याकरितां तिसऱ्या पलटणीच्या ९ व्या तुकडीला स्पॅंडोवाच्या पलीकडे सरकण्यास सांगणें अवश्य झालें आतां मध्यान्हकाळ झाला होता. ५ व्या तुकडीचा तोफखाना पुढें पाठविला होता त्यानें उत्तम कामगिरी करून पूर्ण यश संपादिलें होतें, हें सर्वांस कबूल आहे. प्रशिअन लोकांना मागें हटावें लागलें यांत संशय नाहीं. पण ऑस्ट्रिअन लोकांना त्याचा फायदा घेतां आला नाहीं. याचें सर्व श्रेय ते (प्रशिअन) या तुकडीच्या तोफखान्यानें केलेल्या वर्णनीय प्रयत्नांस देतात. तें कसेंहि असो—कारण, ऑस्ट्रिअन लोकांना असें वाटत नाहीं—प्रशिअन तोफखाना आपली आघाडीची जागा धरून होता; इतक्यांत कोनिजिन्हाफपासून कूच करीत येणाऱ्या क्रौन प्रिन्सच्या सैन्यास फ्रॅन्सेकी तुकडीच्या बाजूचें टोंक भिडलें ही बातमी राजास समजली. आतां आपणांस क्रौन प्रिन्सच्या हालचालीकडे वळलें पाहिजे.

क्रौन प्रिन्स कूच करून येतो.

" तुम्ही ऑस्ट्रिअन लोकांच्या छावणीवर हल्ला करण्याच्या कामांत सहकार करण्याकरितां कूच करून जा " असा राजाचा हुकूम क्रौन प्रिन्सला ता. ३ जुलाई रोजीं चार वाजतां मिळाला. त्यानें आपल्या सेनापतींस लागलीच पुढील हुकूम सोडिले.

बोनिनच्या पहिल्या पलटणीनें ऑर्ना व बोहमिस्क–प्रास्निट्झ-पासून दोन रांगा करून कूच करावें, उजव्या बाजूनें ग्रास–ट्रेटिन कडून व डाव्या रांगेनें झॅब्रझीजकडून ग्रास–बर्ग्लिट्झ येथें जावें. राखून ठेविलेल्या घोडेस्वारांच्या पलटणीनें त्यांच्यामागून जावें. गॉर्डच्या पलटणीनें कोनिजिन्हॉफपासून जेरिसेक व ल्होटा यांच्या दिशेनें कूच करावें असा हुकूम होता. सहाव्या पलटणीनें प्रथम वेलचौ येथें जावें, तेथून एक तुकडी जोसेफ स्टॅडवर लक्ष ठेविण्याकरितां पाठवावी व बाकीच्या लोकांनीं ट्रॉटिंकापाशीं जावें व ती ओलांडून दुसऱ्या सैन्याच्या डाव्या बाजूस जाऊन मिळावें. पांचव्या पलटणीनें, बाकीच्या पलटणींनीं कूच करावयास लागून दोन तास झाल्यावर कूच करण्यास आरंभ करून चोटेबेरिक येथें राखून ठेविलेली पलटण म्हणून तळ देऊन बसावें सामानाचे गाडे जेथल्या तेथेंच राहावयाचे होते.

प्रशिअन 'गार्ड्स' पुढें चाल करून जातात.

नकाशा पाहिला असतां या योजनेप्रमाणें 'गार्ड्स' पलटण संग्रामामध्यें प्रथम येणार होती असें लक्षांत येईल. 'गार्ड्स' कोनिजिन्हॉफ येथें होते. तेथून जेरिसेक ल्होटा हीं सुमारें ७ मैलांच्या अंतरावर आहेत. पाऊस पडला होता व देश डोंगराळ होता ह्यामुळें हें अंतर तोडण्यास फारतर तीन तास कूच करावें लागलें असतें. ह्या स्थानांपासून हार्झेनावीसपर्यंत जाण्यास एक सबंध तास व बदाचित् येथें थोडी झटापट झाल्यास दोन तास लागले असते.

यावरून गार्ड्स निघाल्यापासून संग्रामभूमीवर जाऊन लढाईंत प्रत्यक्ष मदत करूं लागेपर्यंत निदान पांच तास तरी वेळ लागेल असा कौन प्रिन्सचा अजमास असला पाहिजे.

'गार्ड्स' ना ज्या वाटांनीं मजल करावयाची होती त्या वाटा बिकट होत्या. पावसाचें पाणी सांचून जागजागीं चिखल झाला होता व सर्व वाटभर चढउतर करावी लागली. 'गार्ड्स'-ला हुकूम सहा वाजतां मिळाला व चोटेबोरेकच्या माथ्यावर आघाडीच्या रांगा पोहोंचतात तों ११ वाजले. या स्थलांवरून समरांगणाचें निरीक्षण करणें शक्य होतें लढण्यास उत्सुक असलेल्या या सैनिकांस मुख्य घोर संग्राम सावेटिट्झ व सँडोवा यांच्या दरम्यान्च जणूं काय चालला आहे, असें वाटलें. ब्रिस्ट्रिट्झ नदीच्या खालच्या बाजूला असलेलीं संग्रामस्थानें मध्यें असलेल्या टेंकड्यांमुळें त्यांस दिसेनात. ऑस्ट्रिअन सैन्याच्या छावणीपासून चोटेबोरेक फार दूर असल्यामुळें लढाईवर परिणाम होईल अशी एखादी गोष्ट करणें त्यास शक्य नव्हतें. म्हणून झाय झेलोवीस व सेरेक्विट्झ यांच्या दरम्यान् ट्राटिंका नदीच्या उजव्या तीरावर ज्या टेंकड्या आहेत त्यांच्या बाजूनें 'गार्ड्स' पलटण जाण्याचें ठरलें. असें करतां यावें म्हणून जेरिक आणि लुझिआन या दोन ठिकाणीं नदी उतरून 'गार्ड्स' पलीकडे गेले. झायझेलोविसच्या माथ्यावरून दूर अंतरावर असलेलें एकच एक झाड त्यांस दिसलें व या झाडाकडे कूच करीत जाण्याचें त्यांनीं ठरविलें. पहिली तुकडी त्या दिशेनें पुढें गेली व मध्यान्हाचे सुमारास ती अशा जागीं आली कीं, त्या

ठिकाणीं तोफखाना लावून शत्रूवर त्याचा मारा करतां आला असता. नंतर त्यांनीं तोफा उभ्या करून मॅस्लोवीड, हार्झेनावीस आणि अगदीं त्यांच्या उजव्या बाजूचें शेवट यांच्यामध्यें जें ऑस्ट्रिअन सैन्य उभें होतें त्याच्यावर भडिमार करण्यास आरंभ केला. बराच वेळ तोफांनी युद्ध झाल्यावर गार्डांची पहिली तुकडी व त्याच पलटणींतील बोडेस्वार यांनीं पुढें चाल केली. कांहीं वेळ त्यांचा मोठ्या शौर्यानें प्रतिकार केल्यावर ऑस्ट्रिअन लोक मागें सरले व मॅस्लोबीड आणि संड्रेसिट्झ यांमधील उंच टेकड्यांवर त्यांनीं तळ दिला. हें स्थान शत्रूस चढाई करण्यास फार विकट होतें.

दुसरें गार्ड सैन्य पुढें चाल करून येतें.

गार्डांची पहिली तुकडी या नव्या जाग्यावरील ऑस्ट्रिअन सैन्यावर हल्ला करण्याची तयारी करीत होती त्याच वेळीं तिच्या उजव्या बाजूस येऊन तिला मदत करण्याकरितां गार्डांची दुसरी तुकडी कूच करीत निघाली होती. ही दुसरी तुकडी पहिल्या तुकडीच्या मागून निघून याच मार्गानें झायझेलोवीस टेंकडीपर्यंत तिच्या पाठीमागून आली. तेथून तिनें मैदानांत असलेलें एकच एक झाड पाहिलें व त्या झाडाकडे चाल करून येऊन पहिल्या तुकडीला योग्य जागीं जाऊन मिळण्याकरितां ती तुकडी थोडीशी उजव्या अंगाला वळली होती. ही तुकडी पहिल्या तुकडीला येऊन मिळण्याकरितां येत असतां दुसरीकडे काय हकीकत घडली होती तें आपण पाहूं या. सहाव्या तुकडीपैकीं कांहीं सैनिक गार्डांची पहिली तुकडी ज्या मार्गानें गेली त्या मार्गाशीं सहजगत्या

समांतर मार्गानें चालले होते. त्यांनीं येऊन या तुकडीच्या डाव्या बाजूस जागा धरिली; अगदीं सकाळीं १२ वी तुकडी ग्रॅडलिट्झ तेथून निघाली, तिनें कुकुसपाशीं होड्यांचा पूल करून एल्ब नदी ओल डिली व जोसेफ स्टॅडच्या समोर तळ दिला स्टीनमेट्झच्या पांचव्या तुकडीची उजवी बाजू येऊन तिला सोडवीपर्यंत ती तेथेंच तळ देऊन बसणार होती. झॅट्रोच्या ११ व्या तुकडीला ग्रॅडलिट्झ येथून कूच करून पुढें जाण्याचा हुकूम सहा वाजतां मिळाला. स्कर्झन स्टॅजेंडार्फच्या येथील पुलावरून ती तुकडी एल्ब नदीच्या पलीकडे गेली. स्टॅजेंडार्फच्या पुलाची पडझड झाली असल्यामुळें त्याची दुरुस्ती करावयास पाहिजे होती. कूच करितांना या तुकडाला पुष्कळच त्रास पडला व ती एकदांची वेलचो येथें जाऊन पोहोंचली. तेथें रणभूमीकडून येणाऱ्या वाऱ्यानें त्या सैनिकांच्या कानीं तोफांचे आवाज पडल्याबरोबर त्यांनीं पुनः मोठ्या घाईनें कूच केलें. प्यासिट्झच्या जवळ ट्राटिंका नदीच्या उजव्या तीरावर ते सैनिक सुमारें बारा वाजतां पोहोंचले. त्या ठिकाणीं ऑस्ट्रिअन रक्षकांच्या उजव्या बगलेवर हल्ला चालला होता, त्यांत ते लागलींच जाऊन मिळाले. ऑस्ट्रिअन सैन्याच्या मध्य व डाव्या बाजूवर हार्झेनावीस येथील 'गार्डा'नीं हल्ला चढविला होता. हा हल्ला झाल्यावर ऑस्ट्रिअन सैन्यास माघार घ्यावी लागून त्या सैन्यानें मॅस्लोवीड व सॅड्रॅसिट्झ यांच्या दरम्यान् नव्या जागीं तळ दिला होता हें मागें सांगिलेंच आहे.

ह्या नव्या ठाण्यावर हल्ला करण्याची तयारी प्रशिअन सैन्यानें आतां केली. मॅस्लोबीडच्या आग्नेयीस असलेल्या टेंकड्यांच्या माथ्यावर

गार्डची पहिली तुकडी, क्लम व रास्वेरिट्झ या ठिकाणी ऑस्ट्रिअन सैन्याचा जो मध्य होता त्याच्यासमोर तळ ठेवून उभी होती. नेडे-लिस्टकडे तोंड करून या पहिल्या तुकडीच्या डाव्या बाजूस ११ वी तुकडी होती, तिच्या उजव्या बाजूस लिपाकडे तोंड करून गार्डची दुसरी तुकडी होती फ्रेन्सेकीची ७ वी तुकडी अजूनहि बेनॅटेक आणि सॅडोवो यांच्यामध्यें नेटानें लढत होती बोनिनची पहिली तुकडी बेनॅटेककडे चाल करून येत होती; तिला थोडक्यांच वेळांत आपल्या उजव्या बाजूनें ७ वी तुकडीला व डाव्या बाजूनें गार्डना मदत करितां आली असती.

लढाईच्या दिवसांतील आणिबाणीचा प्रसंग.

आतां दोन वाजले होते. ह्या वेळपर्यंत प्रशिअन सैन्यानें आस्ट्रिअन सैन्याच्या तळावर कोठेंहि म्हणण्यासारखा बिघाड केला नव्हता मध्यस्थानीं ऑस्ट्रिअन सैन्यानें प्रशिअन हल्ला मागें परतवून लावलाच होता; फ्रेन्सेकीच्या पहिल्या तुकडीच्या डाव्या बगलेची फारच खराबी झाली होती; फॉन विटेनफिल्ड याच्या हाताखालच्या या तुकडीच्या उजव्या बगलेनें अजून म्हणण्यासारखें कांहीं केलें नव्हतें व तिचा पुढें मार्ग खुंटला होता. ऑस्ट्रिअन अधिकारीवर्गांत कांहीं बेफाम तरुण होते, त्यांनीं तुम्ही सर्व सैन्यास पुढें चाल करून जाण्याचा हुकूम करून मागे हटविलेल्या प्रशिअन सैन्याच्या पाठीस लागून त्याला पिटाळून उधळून लावा असा बेनेडिक यास सल्ला दिला होता. टाइम्स पत्राचा बातमीदार रसेल हा ऑस्ट्रिअन सैन्याच्या बाजूकडील

श्रीमंत सौ. सं. सं. वाचनालय, सो
17 JAN 1994

एका उंच ठिकाणावरून ही लढाई प्रत्यक्ष पाहात होता. त्याचें असें म्हणणें आहे कीं, ह्या वेळीं ऑस्ट्रिअन सैन्यानें लढाई जिंकल्यासारखीच होती; व त्या सैन्यानें पुढें सरसावून हल्ला चढविण्याचाच काय तो अवकाश होता कीं ऑस्ट्रिआच्या जयाविषयीं शंकाच उरली नसती बेनेडिक यास अखेरीस आपला जय होईल अशी खात्री होती. परंतु आपल्या उजव्या बगलेवर हल्ला होण्याची भीति आतां उरली नाहीं अशी खात्री पटेपर्यंत सैन्याला पुढें जाऊन हल्ला करावयास सांगण्याची जोखीम पतकरण्यास तो तयार नव्हता. कोनिजिन्हॉफकडून शत्रु चाल करून येऊन आपल्या उजव्या बाजूवर हल्ला होण्याचा संभव आहे, हें त्यास माहित होतें. क्रौन प्रिन्सची हालचाल कशी व कोठें चालली आहें हें बरोबर कळेपर्यंत जाग्यावरून सैन्य पुढें हालवावयाचें नाहीं असा त्याचा बेत होता. क्रौन प्रिन्सच्या हालचाली सुरू होत्याच; परंतु त्याविषयीं बेनेडिक यास बातमी मिळूं नये हें विलक्षण असून त्यावरून ऑस्ट्रिअन अधिकाऱ्यांचें काम हुशारीनें चाललें नव्हतें असें म्हणावें लागतें.

प्रशिअन लोकांनाहि काय होईल काय नाहीं अशी मोठी काळजी वाटत होती. प्रशिअन लोक जयाविषयीं अगदीं निश्चित होते असें सिद्ध करण्याकरितां एक गोष्ट सांगण्यांत येते. परंतु त्या गोष्टीवरून या उलटच अनुमान निघतें. असें सांगतात कीं, लढाईचा ओघ असा वाहात होता त्यावेळीं बिझमार्कनें आपला चिरूटांचा करंडा ' मोल्टके याच्यापुढें केला व आपणास पाहिजे तसा चिरूट

निवडण्याकरितां मोल्टके चिरूट खालीं वर करीत बसला. लढाईंत अगदीं आणीबाणीचा प्रसंग असतांना मोल्टके आपला चिरूट निवडींत बसला हें त्याला जयाबद्दल पूर्ण खात्री होती याचेंच निदर्शक आहे असें सांगण्यांत येतें. पण यांत कांहीं विशेष तथ्य नाहीं. कसाहि प्रसंग असो जे अट्टल तंबाखू ओढणारे आहेत ते आपल्या मनाजोगा चिरूट निवडणारच. ही गोष्ट बाजूला ठेवली तरी या वेळीं बिझ्मार्क, मोल्टके लढाईबद्दल आपलें कांहीं तरी मत दर्शवील, अशी मोठ्या आतुरतेनें वाट पाहात होता ही गोष्ट कांहीं नाहींशी होत नाहीं. निदान बिझ्मार्कला तरी काळजी वाटत होती.

तीन व चार यांचे दरम्यान् ऑस्ट्रिअन सैन्याच्या उजव्या बाजूशिवाय इतर ठिकाणीं लढाईला खळ पडला होता. दोन्ही पक्ष विश्रांति घेत होते. पहिल्या सैन्याच्या पलटणी निकालाची लढाई करण्याकरितां विसावा घेऊन पुनः ताज्यातवान्या होत होत्या. जलद चाल करून आल्यानें दुसऱ्या सैन्यांतील शिपाई थकले होते. तेहि दम खाऊन पुनः पूर्ववत् तरतरीत होत होते; ऑस्ट्रिअन सैन्यावर आतां आघाडीकडून हल्ला होत नव्हता व आपण पुढें सरकून लढाई करावयाची नाहीं असा बेनेडिकचा निश्चय होता, म्हणून ऑस्ट्रिअन सैनिकहि विसावा घेत होते.

तथापि ऑस्ट्रिअन सैन्याच्या उजव्या बाजूकडे लढाई चालू होती. तिकडे ट्रॉटिंका नदी ट्रॉटिंकाच नांवाच्या खेड्यापाशीं एल्ब नदीला मिळते. त्या खेड्याजवळ उजव्या बाजूस टोंकापाशीं

'स्कार्झजेल्ब' पलटण ठेविली होती या पलटणीवर बाराव्या प्रशिअन तुकडीपैकीं बहुतेक सैनिकांनीं हल्ला केला. बरीच कसून लढाई झाल्यावर ऑस्ट्रिअन पलटणीला लाचेनिट्झ येथें परत जावें लागलें. पण तेथूनहि तिला प्रशिअन सैनिकांनीं वालवून दिलें

बेनेडिक याची चुकींची हालचाल.

ही पलटण अशी मागें फिरविल्यामुळें आपल्या उजव्या बाजूला प्रशिअन सैन्याकडून मोठा धोका आहे असें बेनेडिक यास वाटून त्यानें आपल्या कांहीं सैन्यास तिकडे जाण्याबद्दल हुकूम दिला व त्यामुळें अखेरीस लढाईनें उलट खाल्ली. मागें सांगितलेंच आहे कीं, लिपा व क्रम येथें ऑस्ट्रिअन सैन्यानें तोफा लाविल्या होत्या, त्यांच्या मदतीस पुढील पलटणी होत्याः—१० वी, लँजेन्हॉफ येथें; ३ री सिस्टौज येथें; ४ थी मॅस्लोवीड येथें, तिच्या उजवीला २ री व ३ री घोडेस्वारांची पलटण उजव्या बाजूकडे होती. आपल्या डजव्या बाजूवर मोठा घाला पडत आहे अशी बातमी बेनेडिक यास मिळाल्याबरोबर त्यानें दुसऱ्या व तिसऱ्या पलटणींतील सैनिकांस तिकडे जा व क्रमपासून नेडेलिस्टपर्यंत जागा धरून उभे राहा असा हुकूम दिला. या पलटणींनीं हुकुमाप्रमाणें जागा धरल्या नाहींत. कारण चुकीनें हुकुमाविषयीं गैरसमज होऊन तिसरी पलटण सिस्टौज येथेंच राहिली व तेथेंच चौथ्या पलटणीची फिस्कबाकर याची तुकडी (ब्रिगेड) हि राहिली ह्या सैन्याच्या फेरफारामुळें क्रम व लिपा येथील तोफखान्यास मदत नाहींशी झाली.

बेनेडिक नेटाचा प्रयत्न करतो.

प्रशिअन गार्डांनीं दोन वाजतां मुक्काम केला तेव्हां ते क्रमकडे तोंड करून उभे होते हें मागें आलेंच आहे त्यांनीं जर एकदम पुढें जाऊन हल्ला चढविला असता तर लढाईचा परिणाम झाला त्यापेक्षां निराळाच होणें शक्य होतें. परंतु विश्रांति घेण्याकरितां व पुढच्या व्यवस्था ठरविण्याकरितां प्रशिअन सैन्य थांबलें होतें; त्यावरून बेनेडिक यास क्रौन प्रिन्स एल्ब नदीच्या खालच्या बाजूनें कोनिग्रॅट्झपाशीं असलेलें आपलें दळणवळण बंद करण्याच्या उद्देशानें जात आहे असें वाटलें असावें; व म्हणून त्यानें क्रम वरील सैन्य काढून घेतलें. याचा परिणाम असा झाला कीं, तीन आणि चार यांच्या दरम्यान् जेव्हां गार्डांच्या पलटणींची पहिली तुकडी क्रमवर चाल करून गेली व पहिल्या पलटणीचें कांहीं पायदळ बरोबर घेऊन दुसरी तुकडी लिपाकडे गेली तेव्हां त्यांचें काम त्यांस फार सहज करितां आलें. प्रशिअन सैनिक आपल्या कामांत फार तरबेज होते व त्यांची संख्याहि फार होती. ह्या दोन्ही कारणांमुळें ऑस्ट्रिअन गोलंदाजांना त्यांच्या पुढें टिकाव धरवेना. तशांत पायदळाची मदतहि त्यास नव्हती. प्रशिअन गार्डांनीं क्रम तेव्हांच ताब्यांत घेतलें क्रम म्हणजे ऑस्ट्रिअन लोक धरून बसलेल्या जागेची किल्लीच होती. मग हें प्रशिअन सैन्य आग्रेयीस गेलें व रासबरिट्झवर त्यानें हल्ला केला. येथेच बेनेडिक यानें आपल्या राखून ठेविलेल्या सैनिकांची छावणी केली होती. या खेडेगांवीं मोठा दारुण युद्ध संग्राम झाला ऑस्ट्रिअन सैन्याचा तोफखाना मोठ्या

सोयींच्या जागीं लावला होता. त्यानें पुढें येणाऱ्या गाडींच्या तुकडीच्या उजव्या बाजूवर जोराचा भडिमार करून त्या तुकडीचें भयंकर नुकसान केलें. लढाई अगदीं ऐन भरांत आली होती. इतक्यांत लँजेन्हॉफ व वेस्टर येथून बेनेडिक यानें पायदळाची मोठी तुकडी त्या जागीं आणविली. पायदळानें झटपट योग्य अशी रचना करून घेतली; व ज्या जागा प्रशिअन्स बहुतेक काबीज करण्याच्या बेतांत होते तेथून त्यांस हांकून लाविलें.

बेनेडिक याचें मन धाकधूक करीत होतें, तरी त्यास अजूनहि सैन्य घऊन व्यवस्थित रीतीनें मागें हटून जाणें शक्य आहे असें वाटत होतें इतक्यांत प्रशिअन गाडींना अनपेक्षित अशी मदत येऊन दाखल झाली इयास्टौज पलटणीच्या ११ व्या तुकडीचा सेनापति फौन म्यूटिअस हा नेडेलिस्ट येथें जाऊन पोहोंचला होता. त्या ठिकाणीं त्याच पलटणीची बारावी तुकडी त्याला येऊन मिळेपर्यंत राहाण्याचा त्याचा बेत होता. परंतु क्लम व लिपा येथें होत असलेल्या तोफांच्या भडिमाराचा आवाज जास्त जास्तच त्याच्या कानीं येऊं लागल्याबरोबर त्यानें पुढें कूच केलें. स्मेटीच्या बाजूनें कूच करून जातां जातां तो एकदम रासबेरिट्झ येथें बचाव करणाऱ्या ऑस्ट्रिअन सैन्याच्या उजव्या बाजूवर येऊन धडकला. त्यानें लागलीच त्या बाजूवर हल्ला चढविला व त्यावेळीं गॉर्ड्स रासबेरिट्झवर पुनः हल्ला चढवीत होते. या दोन्ही कारणांमुळें ऑस्ट्रिअन सैन्याला तें स्थळ सोडून जाणें भाग पडलें. प्राशिअन सैन्यानें मागें हटत जाणाऱ्या ऑस्ट्रिअन सैनिकांचा पाठलाग एकसारखा मोठ्या नेटानें चालविला व त्यामुळें

ऑस्ट्रिअन सैन्याला धांवण्यास संधि न मिळतां झपाझप मागेंच सरकावें लागलें. पांच वाजण्याच्या सुमारास सॅडोवापासून कोनिग्रॅट्झपर्यंतचा राजमार्ग ऑस्ट्रिअन लोकांच्या ताब्यांतून पूर्णपणें गेला

पहिल्या सैन्याच्या हालचाली.

आतां ६ व्या पलटणीची एक तुकडी व ५ वी पलटण या खेरीज क्रौन प्रिन्सच्या सर्व पलटणी एकत्र आल्या होत्या. या सर्व सैन्याला वरील राजमार्गानें क्रौन प्रिन्स मोठ्या झपाट्यानें कूच करीत पुढें नेत असतांना, राजा व पहिलें सैन्य यांचें काय चाललें होतें याकडे लक्ष देणें आपणांस आवश्यक आहे

प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या सैन्याच्या डाव्या बाजूचें टोंक क्रौन प्रिन्सच्या सैन्याच्या उजव्या बाजूच्या टोंकाजवळ जवळ येत चाललें होतें, अशी बातमी राजा व प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यांच्या कानीं दुपारी आली, येथवर हकीकत मागें आली आहे. तथापि अंतर बरेंच होतें म्हणून परिस्थिति लक्षांत घेऊन जितक्या झपाट्यानें पुढें कूच केलें पाहिजें होतें तितक्या झपाट्यानें क्रौन प्रिन्स कूच करीत पुढें येऊं लागला हें राजाला खात्रीलायक समजेपर्यंत दोन वाजले. दरम्यान् शक्य तितकी तजवीज अगोदरच केलेली असावी म्हणून राजानें आपल्या राखून ठेविलेल्या सैनिकांस सिस्टौ व लिपा यांच्या अगदीं समोरच्या जागीं तुम्ही जाऊन वाट पहात बसा, असा हुकूम सोडिला होता नंतर डबच्या उंच जागेवरील पठारावरून त्यानें आपली

दृष्टि मोठ्या आतुरतेनें ईशान्य दिशेकडे फेंकली. हळू हळू त्याच्या लक्षांत आलें कीं, क्लम व लिपा येथील तोफांपैकीं कांहीं तोफांचा रोख त्याच दिशेकडे होता राजा व त्याच्या सनिध असलेले त्याचे कर्तबगार सेनापति यांना क्रौन प्रिन्स चाल करून येत असल्यामुळेंच हा तोफांचा रोंख शत्रूनें बदलला असें खात्रीनें म्हणतां येईना; कारण फ्रेन्सेकी यानें इतका जोर केला असेल कीं, ऑस्ट्रिअन लोक त्याला जागच्या जागींच दडपून ठाकण्याचा प्रयत्न करीत असावे हेंहि शक्य होतें. क्रौन प्रिन्स येत असल्यामुळेंच असा बदल शत्रूनें केला हेंच अनुमान बरोबर असें राजानें मोठ्या शहाणपणानें ठरविलें व त्याप्रमाणें त्यानें आपल्या पुकड्या व पलटणींवरील निरनिराळ्या अधिकाऱ्यांस कळविलें. दोन वाजतां क्रौन प्रिन्स जवळ येऊन पोहोंचला याबद्दल बिलकुल शंका उरली नाहीं. पुढें एकाच तासानें क्लम व लिपा यांवर हल्ला चढविण्यांत आला. डबच्या टेंकडीवरून क्लम व लिपा हीं ठाणीं प्रशिअन सैन्यानें घेतलीं असें दिसतांच सर्वांनीं राजास हटणाऱ्या शत्रूचा पाठलाग करण्याकरितां घोडेस्वारांची पलटण पाठवा अशी विनंति केली. नंतर विल्यम राजा आपली राखून ठेवलेली घोडेस्वारांची पलटण घेऊन सँडोआपासून आघाडीपर्यंत गेला. प्रत्येक ठिकाणीं जय होत चालला आहे असें त्यास दिसून आलें. सर्व ठिकाणीं महाराजांचा जयजयकार असो या शब्दांनीं त्याचें स्वागत झालें. तो कोनिग्रॅट्झच्या किल्लयाला पोहोचेपर्यंत थांबला नाहीं. शत्रु कोनिग्रॅट्झ, पार्डुबिट्झ व होहेन्माथ

या ठिकाणापर्यंत हटत गेला होता. त्याला आतां समाधान वाटण्यास चांगली जागा झाली होती, कारण ही लढाई जिंकल्यामुळें फार दिवस अपेक्षित असें वर्चस्व त्यास जर्मनींत प्राप्त होणार होतें एवढेंच तर काय, पण युरोपांत सुद्धां प्रशिआला महत्त्व येणार होतें.

बेनेडिक मागें फिरतो.

कारण क्रम, लिपा व ससबेरिट्झ हीं शत्रूनें जोराचे हल्ले करून घेतल्यावर आतां आपला पराभव निःसंशय झाला अशी बेनेडिक याची खात्री झाली. दुर्दैवानें आपल्या उजव्या बगलेवर शत्रूनें मुख्य हल्ला चढविला होता अशी गैरसमजुत होऊन त्यानें आपल्या दोन पलटणींस तिकडे जाण्यास सांगितलें. यामुळें त्याचा नाश झाला होता. परंतु ह्या भयंकर आपत्तीच्या वेळीं त्याचें वर्तन उत्साही व कर्तबगार योद्ध्याला शोभेल असेंच होतें. शत्रूनें त्याच्या सैन्याचा पाठलाग हवा तसा चालविला होता. तरी कोनिग्रॉट्झ व पार्डुब्रिट्झ यांच्या दरम्यान त्यानें जे पूल बनविले होते त्यावरून घोडेस्वारांच्या पलटणींच्या मदतीनें तो एल्ब नदी उतरून गेला पुढें आल्याबरोबर मागला पूल पाडून टाकावयाचा क्रम त्यानें ठेविला होता. त्या नंतर तो होहेन्माथ येथें परत गेला मारले गेल्यामुळें व जखमी झाल्यामुळें जवळ जवळ १८,००० सैनिक कमी झाले व १९,३०० सैनिक शत्रूच्या हातीं कैद होऊन लागले; १६१ तोफा व ५ निशाणेंहि शत्रूस सांपडलीं. याप्रमाणें ऑस्ट्रिअन सैन्याचें फार मोठें नुकसान झालें होतें. प्रशिअन लोकांचेंहि मृत व जखमी मिळून १०,००० सैनिकांचें नुकसान झालें होतें. प्राशिअन लोकांच्या तिन्ही

फौजांतील एकंदर सैनिकांची संख्या ऑस्ट्रिअन सैनिकांपेक्षां जास्त असतांहि निश्चयात्मक ठिकाणीं ऑस्ट्रिअन लोकांचीच कर्तबगारी जास्त दिसून आली तिन्ही प्रशिअन फौजा मिळून २,३०,९८४ सैनिक होते व एकंदर ऑस्ट्रिअन सैनिक २,५०,००० होते. केवळ एका चुकीमुळें ऑस्ट्रिअन लोकांचा या लढाईंत पराभव झाला. ऑस्ट्रिअन सेनाधिपतीनें आपल्या दोन पायदळाच्या पलटणी क्रमजवळ एकत्र जमवून ठेविल्या असत्या तर त्याला क्रौन प्रिन्सच्या थकलेल्या सैन्यास मागें हटवितां आलें असतें, हें तरी निदान शक्य दिसतें पण असें व्हावयाचें नव्हतें. ह्या लढाईंत नीड्ल–गनचा कितीसा उपयोग झाला याविषयीं विशेष लिहिण्यासारखें असें कांहीं नाहीं. लढाईच्या आरंभीं दोन्ही बाजूंकडे तोफखान्यालाच प्राधान्य होतें. लढाईच्या शेवटीं शेवटीं सुद्धां तोफा व संगिनी यांनीं कैलेला हल्ला यांचाच विशेष उपयोग होत होता. प्रत्यक्ष झपाट्याचा पाठलाग असा फारसा झाला नाहीं, हेंहि आपण पाहिलेंच आहे. कारण जेते पूर्णपणें थकून गेले होते

यापुढें उभय पक्षांच्या सैन्यांनीं कोणत्या हालचाली केल्या याची हकीकत पुढच्या भागांत येईल. "आज ऑस्ट्रिआचा पूर्ण मोड झाला असून जर्मनीच्या कारभारांत गेलीं ६०० वर्षें ऑस्ट्रिआनें अनुभवलेलें वर्चस्व आतां निरंतरचें लयास गेलें" अशी पराभूत झालेल्या ऑस्ट्रिअन सैन्यांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची खात्री होऊन चुकली एवढें येथें सांगून ठेवण्यास हरकत नाहीं.

प्रकरण ११ वें.

कस्टोझाची लढाई–बन्हेरिआंतील–प्रशिअन्स हिएन्नावर चाल करून जातात–निकोल्सबर्ग येथील तात्पुरता तह आणि प्रागचा तह.

प्रशिआच्या एकंदर राजकारणाचा 'जर्मन साम्राज्याची पुनः संस्थापना' हा मुख्य हेतु होता. तो सफल होण्यास ज्या निश्चित स्वरूपाच्या घडामोडी कारणीभूत झाल्या त्या लक्षांत घेणें व त्यांच्या महत्त्वाचें यथायोग्य वर्णन करणें हें जर्मन साम्राज्याच्या संस्थापनेचा इतिहास लिहिणारास अत्यंत अवश्य आहे ह्या घडामोडींपैकीं कोनिग्रॉट्झची लढाई एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. 'मुख्य' सैन्य हालचाली करूं लागण्याच्या पूर्वीच ह्या लढाईचा बहुतेक निकाल लागला होता ऑस्ट्रिअन लोकांनीं प्रशिआचा दोस्त इटली याच्या बरोबर केलेली लढाई मात्र कोनिग्रॉट्झच्या लढाईच्या अगोदर झाली होती. परंतु ही ऑस्ट्रिआनें इटली बरोबर केलेली लढाई व मुख्य सैन्याच्या किसेंजेन व इतरत्र झालेल्या झटापटी या गोष्टी केवळ दुय्यम प्रतींच्या आहेत व मुख्य मुद्याच्या गोष्टीशीं त्यांचा असलाच तर फार थोडा संबंध आहे म्हणून युद्धाचा खरा निकाल ज्या कोनिग्रॉट्झच्या लढाईनें लागला तिच्या हकीगती इतकी या गोष्टीची हकीगत विस्तारानें दिली नाहीं तरी चालण्यासारखें आहे.

या किरकोळ गोष्टींपैकीं पहिली गोष्ट कस्टोझाची लढाई ही आहे. पूर्वी सांगितलेंच आहे का ऑस्ट्रिआच्या विरुद्ध प्रशिआशीं

दोस्ती करण्याचा निश्चय इटलीनें केला. पुढें प्रशिअन राष्ट्राला दिलेलें वचन पाळणें आमच्या इभ्रतीस अवश्य आहे असें म्हणून इटलीनें ऑस्ट्रिआच्या बादशहानें फार उशिरां देऊं केलेला व्हेनेशिअन प्रांत स्वीकारण्याचें नाकारलें. इतकें झाल्यावर इटलीनें दोन सैन्यें तयार केलीं. जनरल ला मारमोरा यानें प्रशिआशीं तह ठरविला होता, त्याच्या ताब्यांत एक सैन्य दिलें. या सैन्याला व्हेरोना–पेस्कीरा या नांवाच्या मार्गावर हल्ला करावयाचा होता. दुसऱ्या सैन्याचा अधिपति जनरल सिआलडिनी हा असून त्यानें आपलें सैन्य घेऊन पो नदी, खालच्या बाजूला ओलांडावी व व्हेनेशिअन प्रांतांत शिरावें असें ठरलें होतें. ऑस्ट्रिआच्या इटलींतील प्रांतांचें संरक्षण करण्याचें काम व्हिएनाच्या मंत्रिमंडळानें प्रख्यात आर्च डयूक चार्ल्स याचा मुलगा आर्च डयूक ऑल्बर्ट याजकडे सोपविलें होतें. त्याची छावणी प्यासट्रेगो आणि सॅनबोनिफेशिओ यांच्यामध्यें अशा जागीं ठेविली होती कीं, त्याला त्या जागेवरून अडायगी नदीच्या कोणत्याहि तीरावर असलेल्या शत्रूबरोबर रणसंग्राम सहज करितां यावा. त्याच्या सैन्यांत पांचवी, सातवी आणि नववी या पलटणी, चार राखून ठेविलेल्या पायदळाच्या पलटणी या सर्व मिळून ७३००० सैनिक व २७२ तोफा होत्या. आर्च डयूक ऑल्बर्ट ४९ वर्षांचा होता. त्याचें शिक्षण ग्याडेट्झकी याच्यापाशीं झालें होतें. त्याला पुष्कळ लढायांचा अनुभव होता, परंतु मुख्य सेनापतीचें काम त्यानें ह्या वेळपर्यंत केलें नव्हतें.

राजा व्हिक्टर इम्मान्युएल हा युद्धाला आरंभ होण्याच्या सुमारास रणांगणावर दाखल झाला व सैन्याचा सर्व अधिकार त्यानें घेतला. या सैन्यांत १,४६,००० सैनिक व २७२ तोफा होत्या. जर्मनीमध्यें युद्ध पुकारल्याचें त्याला समजल्याबरोबर मिनशिओ नदी ओलांडून जाण्याचें असा त्यानें निश्चय केला होता. जर्मन युद्ध पुकारल्याची बातमी त्याला ता. २३ जून रोजीं मिळाली व त्यानें लागलीच ती नदी ओलांडण्याविषयीं हुकूम आपल्या सैनिकांस दिला.

ऑस्टिऍन्स युद्धास आरंभ करतात.

त्याच दिवशीं दुपारीं इटॅलिअन सैन्यानें मिनशिओ नदी ओलांडल्याची बातमी आर्च डयूक ऑल्बर्ट यास दोन वाजतां समजली. व्हिक्टर इमॅन्युअल याचा विचार व्हिला फ्रँका व आयसोला डेला-स्काला या मार्गानें जाऊन ॲडीज नदी उतरून पुढें गेलेल्या सिआल-डिनीच्या फौजेस मिळण्याचा असावा, असा तर्क आर्च डयूक ऑल्बर्ट यानें केला. टेहळणी करण्याकरितां पाठविलेल्या अंमल-दारांनीं आणलेल्या बातमीवरून त्याचा तर्क खरा ठरला. मग आर्च डयूकनें सोमाकँपॅग्ना, सोना व सॅनगिस्टीना हीं एका बाजूला व व्हॅलेग्गिओ, मांझँवॅनो आणि पेस्कीरा हीं दुसऱ्या बाजूला असून त्यांच्यामधील उंच प्रदेशाभर तळ द्यावयाचा व तेथून इटॅलिअन सैन्य ॲडायगी नदीकडे जात असतांना त्याच्या डाव्या बगलेवर हल्ला करावयाचा, असा त्यानें निश्चय केला. अवश्य ते हुकूम सोडल्यावर

फ्रीहर फॉन बॉन यास मार्ग दाखविण्याकरितां बरोबर घेऊन त्याच दिवशीं संध्याकाळीं आर्च डयूक सॅनमॅसिमोकडे गेला. हेरांकडून जास्त बातमी मिळाल्यावर सँड्रा, सॅनगिस्टीना, सोना आणि सोमाकँपॅम्पा यांनीं बनविलेल्या रेषेवर सैन्यानें दुसऱ्या दिवशीं सकाळीं तळ देऊन बसावें व सोमाकँपॅम्पा येथून डाव्या बाजूला वळण घ्यावें, अशा रीतीनें सैन्य कॅस्टेल्न्यूओव्हो, सॅन गिजोर्गिओ, झर्वेअर आणि बेरेट्टारा यांनीं बनलेल्या रेषेपर्यंत आणून भिडवावें असा हुकूम आर्च डयूक यानें सोडिला होता. ही सैन्यरचना करितांना सोमाकँपॅम्पा याचा मध्यवर्ती खुंटीप्रमाणें उपयोग करावयाचा होता. या सर्व हालचाली करण्याला त्याच्या जवळ सुमारें ५७,००० सैनिक व २७२ तोफा होत्या. बाकीचें सैन्य पेस्कीरा व इतर किल्ले यांचें संरक्षण करण्यांत गुंतलें होतें.

इटॅलिअन सैन्याच्या मुख्य भागांत सैनिकांची संख्या जास्त होती. तथापि राजा ज्या मार्गानें जी मजल करणार होता ती त्यानें केली तरी त्याला सर्व सैन्य एका रांगेंत आलें नसतें. त्याला लवकरच जी लढाई करणें प्राप्त होतें त्या लढाईंत त्याला ९०,००० सैनिक व १९२ तोफा यांपेक्षां जास्त साधनांचा उपयोग करितां आला नाहीं. तथापि येथें हें सांगितलें पाहिजे कीं, लढाई चालू असतां मध्येंच पिस्किरा किल्ल्यांतील रक्षक ऑस्ट्रिअन सैन्याच्या बाजूनें लढले. ही गोष्ट आपण लक्षांत घेतली तर या दोन्ही सेन्यांच्या संख्येंत दिसते तितकी मोठी तफावत नव्हती, असें कळून येईल.

ऑस्ट्रिअनांची सर्व ठिकाणीं सरशी होते.

ता. २३ रोजीं रात्रीं वादळ होऊन पाऊसहि पडला होता. परंतु ता. २४ जून रोजीं सकाळीं तीन वाजतां ऑस्ट्रिअन सैन्याच्या तुकड्या त्यांना ज्या जागा नेमून दिल्या त्या जागीं जाण्याकरितां कूच करून निघाल्या. ऑस्ट्रिअन सैन्याची ५ वी पलटण कॅस्टेल न्यूओव्होकडे जात असतांना तिची गांठ इटॅलिअन सैन्याची राखून ठेवलेली घोडेस्वारांची तुकडी, कौन प्रिन्स हंबर्ट याची तुकडी व बिग्झिओ तुकडी यांच्याशीं पडली तेव्हां ऑस्ट्रिअन व इटॅलिअन सैन्यामध्यें पहिली चकमक झाली. ही चकमक फार जोराची असून ती दिवसभर चालली होती. दरम्यान् सुमारें ७ वाजतां अलझॅरी जवळ ऑस्ट्रिअन सैन्याच्या राखून ठेवलेल्या तुकडीनें इटॅलिअन लोकांच्या आघाडीच्या पलटणीचा सेनापति जनरल सीरेल याजवर हल्ला केला व त्यामुळें जनरल सीरेल याला ओलिओसोमध्यें परत जाणें भाग पडलें. ह्या खेड्यावर ऑस्ट्रिअन सैन्याचा हल्ला फार जोराचा होता. आपल्या राखून ठेविलेल्या सैनिकांच्या मदतीकरितां ५ पलटणींची एक तुकडी आणवून आर्च ड्यूक यानें कांहीं वेळपर्यंत या ठिकाणाच्या हल्ल्याचें काम स्वतःच्या देखरेखीखालीं केलें, याच-वेळीं त्यानें सॅन् टोक्कोडी पॅलॅझ्यूओलो याचा ताबा घेण्याकरितां दुसऱ्या दोन तुकड्या रवाना केल्या. त्याचप्रमाणें ह्या ठिकाणीं लढाई चालू असतांनाच आपल्या निरनिराळ्या पलटणी व तुकड्या यांच्या-मधील दळणवळण चालू राहील अशी व्यवस्था करणाच्या कामांत

त्याला पूर्ण यश आलें. ऑस्ट्रिअन लोकांनीं ओलीओसीवर जोराचा तोफांचा भडिमार केल्यावर त्या खेड्याला आग लागली व सीरेल याला तें सोडून देऊन मॉंटेव्हिटो येथें परत जावें लागलें. तरी सुद्धां मागें हटत असतांना प्रत्येक ठिकाणीं त्यानें लढण्याची शिकस्त केली. त्याहि ठिकाणीं त्याच्या दृढ निश्चयी शत्रूनें त्याचा पाठलाग केला, व त्याला झटापटींत इतकी जबर जखम झाली कीं, आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याच्या हवालीं त्यानें सैन्याची हुकमत केली. पण तो अधिकारीहि रणांत पडला व कांहीं वेळपर्यंत त्या सैन्याला नेत्याशिवाय शत्रूचा जोराचा हल्ला सहन करणें भाग झालें.

इटॅलिअन लोकांचें शौर्य.

कारण इकडे सीरेलच्या तुकडीवर असा निकराचा हल्ला चालला असतां दुसरीकडे ऑस्ट्रिअन लोक इतर ठिकाणच्या इटॅलिअन सैन्याचा असाच चांगला समाचार घेत होते. तथापि अखेरीस सरटोरी तुकडी सीरेल तुकडीच्या मदतीला आली व ती आपली रांग बरोबर करून सीरेल तुकडीच्या उजव्या बाजूस उभी राहून लढूं लागली. परंतु हा त्या नव्या तुकडीचा सर्व प्रयत्न व्यर्थ झाला. दोन वाजतां ऑस्ट्रिअन सैन्यानें मांटेव्हेंटोवर जोराचा हल्ला करून तो किल्ला घेतला. मिनसिओ नदीच्या उजव्या तीरावर जनरल पायओनिली याची तुकडी तळ देऊन होती. सीरेल तुकडीची अशी दुरवस्था पाहून ती तुकडी एकदम समरांगणावर आली व त्यामुळें एक क्षणभरच ऑस्ट्रिअन सैन्याची प्रगति थांबली. तोंच



वाजण्याच्या सुमारास इटॅलिअन सैन्याची डावी बाजू ऑस्ट्रिअन सैन्यानें रणांगणांतून पार हांकून लाविली.

दरम्यान् टायो नदीच्या पूर्वतीरावर उंच टेंकड्यांवर मोठी भयंकर लढाई चालली होती. ह्या ठिकाणीं तुम्ही सोमाकॅंपॅन्ना हें ठाणें धरून राहा, असा हुकूम ९ व्या ऑस्ट्रिअन पलटणीला मिळाला होता. ता. २४ रोजीं सकाळीं या पलटणीचा सेनापति फील्ड मार्शल लेफ्टनंट हार्टंग यानें मॅडोनाडेलाक्रोसी या मार्गानें एक इटॅलिअन सैन्याची तुकडी व दुसरी मांटेटोरेमधून अशा दोन तुकड्या कूच करीत येतांना पाहिल्या. लागलीच त्यानें कॅसाडेलसेल व बेरेटेरा यांवर तोफखाना लाविला व असा चांगला बंदोबस्त करून तो शत्रूची वाट पाहत राहिला. इतक्यांत सर्व सैन्य घेऊन तुम्ही कस्टोझ्झावर हल्ला करावा असा त्याला हुकूम आला. त्यानें हुकुमाप्रमाणें केलें; परंतु क्रौन प्रिन्स हंबर्ट याची तुकडी, यूजिआ तुकडीच्या मदतीला येऊन तिच्या उजव्या बाजूस उभी राहिली व या दोन्ही तुकड्यांनीं कॅस्टोझ्झा येथें हार्टंग याला फार जोराचा विरोध केला. आर्चडयूक यानें क्रौन प्रिन्स हंबर्ट याच्याशीं लढण्याकरितां आपल्या दोन घोडेस्वारांच्या तुकड्या धाडिल्या. ह्या घोडेस्वारांनीं पुनः पुनः हल्ला चढविला. परंतु इटॅलिअन पायदळाचा चौकोन त्यांना फोडितां आला नाहीं त्यच्या राजाला त्यांच्या मध्यभागीं राहून आपला बचाव करणें प्राप्त झालें होतें; व अशा रीतीनें ते प्रत्यक्ष राजाच्या नजरेखालीं लढत होते.

याप्रमाणें कॅस्टोझा येथें मोठ्या नेटानें लढाई होत असतांना ब्रिग्रोन तुकडी, यूजिआ व सरटोरी या दोन तुकड्यांच्या मध्येंच एका जागीं येऊन लढाईंत शिरली. ब्रिग्रोन तुकडीचे दोन भाग असून एक जनरल गोझ्यानी डीट्रीव्हाइल याच्या हुकमतींत व दुसरा प्रिन्स ॲमॅडयूस याच्या हुकमतींत होता. हे दोन भाग आतां लढत असलेल्या दोन पलटणींच्या मदतीकरितां म्हणून राखून ठेविले होते. आदल्या दिवशीं संध्याकाळीं त्यांनीं मिनाशिओ नदी ओलांडिली होती व ता. २४ रोजीं सकाळीं ते व्हॅलेजिओकडे कूच करीत असतां टायोनी नदी उतरून तुम्ही कॅस्टोझाकडे जा असा हुकूम त्यास मिळाला होता. कॅस्टोझा येथें ला मारमोरा स्वतः त्यांना घेऊन लढूं लागला. कॅस्टोझा येथें जात असताना त्याच्यावर ऑस्ट्रिअन सैन्याच्या ७ व्या पलटणीनें हल्ला केला. ला मारमोरा याच्या हाताखालचे लोक इटॅलिअन सैन्यांपैकीं अगदीं निवडक सैनिक होते व ते सार्डिनिआ आणि लांबार्डीचे ग्रेनेडिअर म्हणून प्रसिद्ध होते ह्या ठिकाणीं त्यांनीं केलेल्या वर्तनासारखें धैर्य हीं क्वचित्च दृष्टीस पडतात. त्यांच्याशीं लढण्याकरितां आणखी दुसरें ऑस्ट्रिअन सैन्य आलें तरी दुपारपर्यंत त्यांनीं मांटेमोडिओवरील आपली जागा सोडिली नाहीं. नंतर त्यांचे दोन्ही सेनापति जखमी होऊन पडल्यामुळें त्यांना कस्टोझाकडे परत जाणें भाग पडलें

इटॅलिअन लोकांचा पूर्ण मोड

सीरेलच्या तुकडीचा पराभव झाल्याची हकीकत मागें आलीच आहे. त्यांत आतां या दोन तुकड्यांना याप्रमाणें मागें हटावें

लागलें. ह्या दोन्ही गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, इटॅलिअन युद्धाची रेषा संकुचित होऊं लागली. आतां इटॅलिअन लोक ला बॅगोलिना, स्टेफॅलो, आसीकस्टोझा हीं ठाणीं धरून बसले. ह्या ठिकाणीं त्यांनीं शत्रूचा फार जोराचा प्रतिकार केला. परंतु आर्च डयूक ऑल्बर्टला आतां अति मोठा सैन्यभार महत्त्वाच्या जागीं आणणें शक्य होतें व त्याच्या सैन्याला शत्रूला मागें दडपून पुढें चालून जाणें हें सहज करितां येई; यामुळें या जागा धरून बसणें इटॅलिअन सैन्याला यापुढें अशक्य होऊं लागलें. पांच वाजतां इटॅलिअन सैन्याच्या डाव्या बाजूचा पूर्ण मोड झाला व आघाडीवरहि शत्रूनें फार रेटा दिला; यामुळें इटॅलिअन सैन्य हळूहळू माघार घेऊं लागलें. तथापि मागें हटतांना त्यांनीं आपली शिस्त बिलकुल बिघडूं दिली नाहीं व ऑस्ट्रिअन सैन्याला फार वेळ संरक्षण चाललेल्या कस्टोझा-मध्यें शिरण्यास सात वाजले.

चालू भागाच्या आरंभीं म्हटल्याप्रमाणें या लढाईची गणना किरकोळ गोष्टींत केली आहे. असें असतां तिच्या वर्णनाचा विस्तार बराच केला आहे. याचें कारण एवढेंच कीं, दोन्ही बाजूंच्या सैनिकांचें धैर्य व शिस्त हीं चांगल्या प्रकारें दृष्टोत्पत्तीस आलीं; परंतु सेनानायकाच्या कसबाचा विजय ऑस्ट्रिआच्या बाजूला होता. ऑस्ट्रिआच्या सैनिकांची संख्या कमी होती. परंतु सेनापतीनीं त्यांच्यावर हुकमत उत्तम प्रकारें चालविली व लढाई चालूं असतां सैन्याच्या निरनिराळ्या भागांमधील संबंध तुटूं

दिला नाहीं. ऑस्ट्रिअन सेनापतींनीं शत्रूला आघाडीकडून रेटलें व डाव्या बाजूनें त्याच्यावर जोराचा हल्ला करून अखेरीस त्यास रणांगणांतून पार हांकून दिलें. इटॅलिअन सैन्याच्या सेनापतींच्या अंगीं सैन्याच्या निरनिराळ्या भागाशीं उत्तम सहकार करणें हा गुण मुळींच दिसून आला नाहीं. त्यांच्या हालचालींत एकविचाराचा पूर्ण अभाव होता. प्रत्येक पलटण व प्रत्येक तुकडी फक्त स्वतः करितांच व स्वतःच्या बलावरच लढते आहे असें दिसलें. याप्रमाणें ऑस्ट्रिअन लोक एकंदरींत संख्येनें जरी कमी होते तरी प्रत्येक महत्त्वाच्या जागीं युद्धकौशल्यांत ते भारी होते व म्हणूनच त्या दिवशीं त्यांनीं लढाई जिंकली. ऑस्ट्रिअन लोकांच्या मतें या दिवसाच्या जयाचें सर्व श्रेय मुख्य सेनापति जनरल फॉन जॉन यासच दिलें पाहिजे; आणि कोनिग्राट्झ येथें बेनेडिकचा पराभव झाल्याची बातमी जिकडे तिकडे पसरली तेव्हां त्या बाजूला गेलेलें यश फॉन जॉनच पुनः प्राप्त करून घेईल अशी सर्व ऑस्ट्रिअन लोकांस आशा वाटली.

बंडचें सैन्य.

आतां आपण बव्हेरिआंतील स्वारीचें थोडक्यांत वर्णन करण्याच्या प्रयत्नाला लागूं. ता. १४ जून रोजीं फ्रँकफोर्ट येथें जमावें असा डायेट सभेनें हुकूम सोडिला होता. या सैन्यांत वरटेंबर्ग, बॅडेन, ग्रँड डची ऑफ हेसी, सॅक्सनी, नॉसा व ऑस्ट्रिआ इतक्या ठिकाणच्या सैनिकांचा समावेश व्हावयाचा होता. हें सैन्य हेसीचा प्रिन्स

अॅलेक्झँडर याच्या हुकमतींत यावयाचें होतें. प्रिन्स अॅलेक्झँडर यानें ऑस्ट्रिआनें केलेल्या लढायांत बरीच कीर्ति संपादन केली होती. या डायेट सभेचा हुकूम बहुतेक सर्व संस्थानांनीं मान्य केला व ता. १८ जून रोजीं प्रिन्स अॅलेक्झँडर याच्या हाताखालीं ५५,९०० सैनिक युद्धास तयार होऊन आले.

दरम्यान् बव्हेरिआनेंहि ५२००० सैनिकांचें राष्ट्रीय सैन्य रणांगणांत घाडण्यास तयार केलें. बव्हेरिआचा प्रिन्स चार्ल्स हा या सैन्याचा सेनापति होता. त्याचें वय ७१ वर्षांचें असून सन १८१५ सालापासून त्यानें तोफेचा गोळा सुटलेला कधीं पाहिला नव्हता संयुक्त संधाची ८ वी पलटण हेसीचा प्रिन्स अॅलेक्झँडर याच्या हाताखालीं होती. तिच्या हालचाली ठरविण्याचेंहि काम प्रिन्स चार्ल्स याजकडेसच होतें. प्रिन्स चार्ल्स याच्या सैन्याचा तळ अप्पर मेन नदीच्या दरींत होता, व त्याचें मुख्य ठाणें बँबर्ग येथें होतें.

युद्धारंभ करण्यास योग्य संधि आल्याबरोबर जर त्या संधीचा उपयोग प्रिन्स चार्ल्स यानें केला असता तर युद्धाचा ओघ बराच बदलण्याचा संभव होता. परंतु ती संधि फुकट दवडल्यावर त्यानें आपल्या हालचालीस आरंभ केला. हॅनोव्हरच्या राजाला शत्रूचें फार मोठें सैन्य आघाडीवरून जोरानें मागें सारीत होतें व त्याच्या मागें सरण्याच्या मार्गावर बरोबर ९००० लोकांचें सैन्य तळ देऊन बसलें होतें. अशा कचाट्यांत तो सांपडला असतां त्यानं अॅलेक्झँडर व प्रिन्स चार्ल्स ह्या दोघांसहि तुम्ही एकदम पुढें चाल करून येऊन

मला सोडवा अशी आग्रहपूर्वक विनंति करून निरोप पाठविला होता, हें ७ व्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. आपण संग्रामभूमीकडे थोडी नजर टाकल्यास आपल्या लक्षांत सहज येईल कीं, प्रिन्स चार्ल्स यानें हिंमत धरून कामास हात घातला असता, हॅनोव्हरच्या राजाला आपल्या एका अंगास घेऊन व प्रिन्स ॲलेक्झँडर यास दुसऱ्या बाजूस ठेवून त्यानें जर बराचसा सैन्यभाग थुरंजिआमध्यें धाडला असता तर फार मोठ्या सैन्यानिशीं त्याला प्रशिअन स्वारीला तोंड देतां आलें असतें, व प्रिन्स चार्ल्स हा त्याचे चहाते समजत तसा मोठा कर्तबगार सेनापति असता तर त्यानें प्रशिअन सैन्याला त्याच्या हद्दींत लांबवर मागें रेंटून लाविलें असतें. परंतु असें कांहींएक न करितां त्यानें हॅनोव्हरच्या राजाला जो थेट निरोप पाठविला तो अत्यंत उपमर्दकारक होता, असेंच सर्वांस वाटलें. इतकें झाल्यावर त्यानें एक घोडेस्वारांची तुकडी मीनिंजेन येथें साधी मजल करीत पाठविली. हें त्याचें करणें तर अगदीं वायफळ होतें, ह्याबद्दल त्याला तात्कालिक व कडक शिक्षा व्हावयाची होती.. त्याची अशी खोड मोडावयास पाहिजेच होती.

प्रशिअन आर्मी ऑफ दी मेन.

हॅनोव्होरिअन सैन्य ता. २८ जून रोजीं शरण गेलें. त्यानंतर ज्या प्रशिअन सैन्यानें त्याचा पुरता पाठलाग केला होता त्या सैन्याला अप्पर मेन नदीवरील व फ्रँकफोर्ट येथील संयुक्त संस्थानसंघाच्या सैन्याच्या मागें लावण्यास चांगला वेळ फावला. प्रशिअन सेनापतींनीं

आपल्या हालचाली सुरू करण्यांत जी झटपट तडफ दाखविली, ती सर्वस्वी प्रशंसनीय होती. जनरल व्हाजेल फॉन फॉलकेन्स्टाइन याच्या हाताखालीं एकदर ५३००० सैनिक गोळा झाले होते. प्रिन्स चार्लस यानें योग्य वेळीं मागितलेली मदत पाठवून ह्या हॅनोव्हो-रिअन सैन्याला मागें जाण्याचा मार्ग जर खुला करून दिला असता, तर या ५३००० प्रशिअन सैनिकांना, १,२५,००० शत्रु सैन्याला तोंड द्यावें लागलें असतें. मग त्यांची स्थिति कशी झाली असती याचा विचार वाचकांनींच करावा. पण आतां प्रत्यक्ष स्थिति अशी होती कीं, त्यांच्या पुढें दोन सैन्यें होतीं व प्रत्येक सैन्याचें बल निदान त्या प्रशिअनांच्या सैन्यबलाइतकेंच होतें, आतां त्यांना यश किंवा अपयश येणें त्यांच्या सेनापतींच्या कौशल्यावर अवलंबून होतें.

डर्म्बक व किर्सिजेन येथील झटापटी.

ता. १ जुलई रोजीं फॉन फॉलकेन्स्टाइन यानें मानटाइफेल, गोव्हेन व बेयर यांच्या तुकड्या ईसेमाक येथें पाठविल्या होत्या. आपण पुढें चाल करून जाऊन अप्परमेनवरील प्रिन्स चार्ल्स याचें सैन्य व फ्रँकफोर्ट येथील प्रिन्स फ्रेडरिक याचें सैन्य, या दोन सैन्यां-मध्यें तळ द्यावा असा फॉन फॉलकेस्टाइन याचा विचार होता. असा धोका आहे असें प्रिन्स चार्ल्स याच्या मनांत आल्यावर त्यानें प्रिन्स ॲलेक्झॅंडर यास तुम्ही हॅना, फुल्डा व हनफेल्ड या मार्गानें येऊन मला मिळा असा हुकूम दिला; व प्रिन्स ॲलेक्झॅंडर याच्या ८ व्या पलटणीशीं मिळण्यांत चूक होऊं नये म्हणून त्यानें डम्बॅक-

कडे दोन तुकड्या व डाव्या बाजूला घोडेस्वारांची मोठी तुकडी अशा तुकड्या पुढें पाठवून दिल्या व तो स्वतः आपलें सैन्य घेऊन फलडॅथल प्रांतांत गेला. ता. ४ जुलई रोजीं ह्या घोडेस्वारांच्या पलटणीची बेयरच्या प्रशिअन तुकडीच्या आघाडीच्या संरक्षक शिपायांशीं मोठ्या निकराची चकमक हनफेल्ड येथें झाली. बेयरची तुकडी मोठ्या रस्त्यानें 'गेट्सा' कडे चालली होती. याच वेळीं डर्म्बेक येथें बव्हेरिअन सैन्याला गांठण्याच्या हेतूनें गोबेन हा डाव्या बाजूनें चालला होता व या दोन्ही तुकड्यांच्या मागून आपली राखून ठेवलेली तुकडी घेऊन मान्टाइफेल येत होता. बव्हेरिअन घोडेस्वारांच्या तुकडीची बेयरच्या तोफखान्याच्या भडिमारानें दाणादाण होऊन ते घोडेस्वार भराभर मागें हटूं लागले. दरम्यान गोबेननें दोन बव्हेरिअन तुकड्यांना डर्म्बेक येथें गांठलें, व मोठ्या नेटानें त्यांच्यावर हल्ला केला; पण बव्हेरिअन सैनिकांची संख्या फार मोठी असल्यामुळें गोबेनच्या हल्ल्याचा त्यांच्यावर म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं. संध्याकाळच्या सुमारास गोबेन तेथून दूर अंतरावर गेला. प्रत्येक पक्ष आपला जय झाला असें म्हणूं लागला. परंतु यांत कांहीं फायदा झाला असला तर तो बव्हेरिअन सैन्याचा होता असें खास कारण त्यानें जंगी हल्ला परतवून लाविला होता. दुसऱ्या दिवशीं प्रिन्स ॲलेक्झँडर याच्या सैन्याशीं जाऊन मिळण्याच्या हेतूनें सर्व बव्हेरिअन सैन्य दक्षिण दिशेकडे निघून गेलें. या दोन बव्हेरिअन सैन्यांशी गांठ पडूं द्यावयाची नाहीं अथवा पडलीच तर बव्हेरिअन सैन्याचा यापासून होणारा फायदा होईल तितका कमी करावयाचा, ह्या उद्दे-

शानें गोबेन, फुल्डाच्या बाजूनें जलदीनें पुढें गेला; व ता. १० रोजीं किर्सिजेन येथें त्यानें बव्हेरिअन सैन्यास गांठलें. बव्हेरिअन सैन्य २५ मैल लांब अशा टप्प्यावर पसरलें होतें, पण गोबेनच्या मदतीस येण्याला दोन तुकड्या जवळपासच होत्या. त्यामुळें ही संधि त्याला अनुकूल होती व तिचा त्यानें पूर्ण उपयोग केला. बव्हेरिअन सैन्याला शहरांत व शेजारच्या टेंकड्यावर जागा खरोखर सोईची मिळाली होती, परंतु गोबेनचा हल्ला अति जोराचा असल्यामुळें बव्हेरिअन सैन्याचा त्याच्या पुढें तग निघाला नाहीं गोबेनचे सैनिक शहराच्या रस्त्यांत घुसले व त्यांनीं शहरांतून आणि टेंकड्यावरून बव्हेरिअन लोकांना हाकून दिलें. अखेरीस बव्हेरिअन सैनिकांना हॅरफर्ट, स्क्वीनफर्ट व मेन नदीवरील बूइर्बर्ग येथें परत जावें लागलें. त्याच दिवशीं बेयरच्या तुकडीनें बरीच चांगली चकमक झाल्यावर किर्सिजेनपासून १२½ मैलांच्या अंतरावर हॅम्मेलबर्ग आहे तें घेतलें व मान्टाइफेलच्या तुकडीनें वॅलडासेक्याक व हॉसेन येथून शत्रूस हांकून लाविलें. किर्सिजेन येथून परत आल्यावर प्रिन्स चार्ल्स यानें आपलें मुख्य ठाणें स्क्वीनफर्ट येथें केलें. त्याच्या सैन्याची व संयुक्तसंघाच्या सैन्याची गांठ पडूं नये म्हणून फॉलकेनस्टाइन यानें ॲस्काफेनबर्गवर एकाएकीं छापा घातला. ता. १३ जुलई रोजीं त्यानें प्रिन्स ॲलेक्झँडर यानें फ्रान हाफेन व लाफेंक येथें पाठविलेल्या हेसिअन तुकडीचा अगदीं चूर करून टाकिला. ता. १४ रोजीं त्याच सैन्याच्या एका तुकडीचा त्यानें ॲस्काफेनबर्गच्या समोर पराभव केला. नंतर

प्रशिअन सैन्यानें त्या शहरावर जोराचा हल्ला करून तें शहर घेतलें. ह्याप्रमाणें प्रशिअन सैन्याचा जय झाल्यामुळें संयुक्तसंघाच्या सैन्याला फ्रँकफोर्ट सोडून द्यावें लागलें व ता. १६ जुलई रोजीं फॉलकेन्स्टाइन त्या शहरांत शिरला. फ्रँकफोर्टच्या पाठोपाठ बिबेरिक व डार्म्स्टॅड हीं शहरें प्रशिअन सैन्यास शरण आलीं.

प्रशिअन लोकांचा पूर्ण विजय व या स्वारीचा शेवट.

कोनिग्रॅटझ येथें लढलेल्या तिन्ही सैन्यांनीं बोहेमिआपासून पुढें कूच केल्यामुळें त्या प्रांतांवर प्रशिअन गव्हरनर–जनरल नेमणें अवश्य आहे असें राजास वाटलें. त्या अधिकाराच्या जागेकरितां विजयी सेनापति व्होजेल फॉन फॉलकेन्स्टाइन याची निवड राजानें केली होती. सैन्यांतील त्याच्या जागीं मान्टाइफेल याची नेमणूक झाली. त्या सैन्यांतील लोकांची संख्या आतां ६५००० पर्यंत वाढविली होती. दरम्यान् बव्हेरिअन सैन्य व संयुक्तसंघाचें सैन्य हीं बर्झबर्ग येथें एकमेकांजवळ जवळ आलीं होतीं. तीं खरोखरच एकमेकांस भिडलीं असतीं, परंतु ही गोष्ट घडून येऊं नये म्हणून मान्टाइफेल संयुक्तसंघाच्या सैन्यावर चाल करून गेला. त्यानें ता. २४ जुलई रोजीं टॉबर नदी ओलांडिली. ही नदी तो, हेसिअन तुकडी वरथीम येथें असतांना, वरटेंबर्गची तुकडी टॉबर बिस्काफ्शीम येथें असतांना, व बॅडेनची तुकडी वरबॅक येथें असतांना त्यांना न जुमानितां उतरून गेला. याचवेळीं त्याच्या एका तुकडीनें होछासेन व वरबॅक यांजवर मोठ्या धिटाईनें हल्ला केला व दुसरी एक तुकडी टॉबर बिस्काफ्शीममध्यें घुसली.

ह्या ठिकाणीं लढाई फार भयंकर झाली. कार्यक्षम फॉन हार्डेंबा हावर्टेंबर्गच्या सैन्यांचा सेनापति असून तें खेडें परत घेण्याकरितां तो पांच वेळां आपलें सैन्य घेऊन पुढें सरसावला. परंतु प्रशिअन शिपायांनीं त्याच्या पांचहि हल्ल्यास दाद दिली नाहीं. नंतर संयुक्तसंघाचें सैन्य गर्कस्टीन येथें बचाव करण्यास सोपें, अशा ठिकाणीं गेलें व तेथें त्यानें तळ दिला. हेल्मस्टॅड व युर्टिजेन येथें बव्हेरिअन सैन्य होतें त्याच्याशीं या सैन्याची उजवी बगल जाऊन भिडली. या जागेवर मान्टाइफेल यानें ता. २५ रोजीं हल्ला केला. त्यानें गोबेन याला गर्कस्टीन येथील संयुक्तसंघाच्या सैन्यावर व बेयर याला हेल्मस्टॅड येथील सैन्यावर हल्ला करण्याकरितां पाठविलें. फ्लीस ज्या तुकडीचा सेनापति होता ती तुकडी त्यानें राखून ठेवली. दोस्तांचे अधिकारी जर थोडके तरी एकविचारानें वागले असते अगर त्यांच्यापैकीं एखाद्याचे अंगीं तरी खऱ्या सेनापतीचें कसब असतें तर हल्ला करणाऱ्या प्रशिअन सैन्याला त्यांना चांगलाच मार देतां आला असता. कारण दोस्तांनीं धरिलेलीं ठिकाणें शत्रूस हल्ला करण्यास फार विकट असून त्यांच्याजवळ सैन्यभारहि मोठा होता. परंतु बव्हेरिआचा प्रिन्स चार्ल्स हा ज्या ज्या हालचाली करी त्यांत त्याच्या मनाचा नेभळेपणाच दिसून येई. या वेळेस तर त्याच्या मानसिक दुबळेपणाची कमालच झाली. शत्रु मागें हटत जाई व हल्ला केलेल्या खेड्यांत प्रशिअन लोक आपलें बस्तान चांगलें बसवीत. आणि जरी दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रिन्स चार्ल्स हल्ला करण्याचे मोठमोठे बेत करीत होता, तरी पुनः विचार केल्यावर

येन नदी उतरून परत जावयाचें असा त्यानें निश्चय केला. परंतु प्रशिअन लोकांनीं त्याला चैन पडूं दिलें नाहीं. ता. २६ रोजीं त्यांनीं त्याच्या पिछाडीच्या संरक्षकांवर हेल्मस्टॅड येथें हल्ला करण्याचा घाट घातला तथापि प्रिन्स चार्ल्स यानें आपलें सैन्य घेऊन वर्झबर्गपाशीं मेन नदी ओलांडिली व वर्झबर्गच्या पूर्वेस जाऊन तळ दिला. परंतु प्रशिअन लोक जबर मेहनती असल्यामुळें त्यांनीं प्रिन्स चार्ल्स याचा चांगलाच पिच्छा पुरविला. ता. २७ रोजीं प्रशिअन सैन्य वर्झबर्गच्या समोरील टेकडीवर गेलें व तेथून त्यानें मॅराइन्बर्गच्या किल्ल्यावर तोफांचा भडिमार केला. इकडे अशी परिस्थिति होती, इतक्यांत प्रतिस्पर्ध्यांना बातमी आली कीं, हंगामी तह झाला आहे, व युद्धाच्या हालचाली बंद ठेवावयाच्या आहेत.

हाइन्रिक व्लँकेन्बर्ग या जर्मन लेखकानें सन १८६६ च्या युद्धाचा इतिहास लिहिला आहे. त्यांत त्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं " हेसीचा प्रिन्स अॅलेक्झॅन्डर याच्या शौर्याचा सन्मान जर त्याला पुष्पमाला अर्पण करून केला तर बव्हेरिआचा प्रिन्स चार्ल्स याच्या आळसाबद्दल त्याच्यावर अफूचीं बोंडें उधळावयास हवींत. " दोघांच्याहि हाताखालचे लोक उत्तम शिपाई होते, याचा अनुभव पुढें चार वर्षांनीं फान्समध्यें आला. प्रिन्स चार्ल्स व प्रिन्स अॅलेक्झॅंडर यांचें सैन्यबल शत्रूच्या सैन्यबलापेक्षां दुप्पट होतें, परंतु सेनापतींना आपणांस काय कर्तव्य आहे हें पक्कें ठाऊक असून तें करण्याचा त्यांचा दृढ निश्चय होता. अशा शत्रूशीं आपल्याच प्रांतांत लढून या दोघांनीं,

सेनापति जर मनानें दुबळे असतील तर सैनिक सिंहासारखे शूर असूनहि त्यांना कोणताच पराक्रम करितां येत नाहीं, हें जगाच्या प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिलें. प्रिन्स चार्ल्स व त्याचे सहकारी यांनीं ज्या ज्या योजना केल्या त्या सर्वांवर 'ह्या योजनेचा कशा फसतील' हा मंत्र जणूं काय लिहून ठेविला होता.

मागें तात्पुरता तह ठरला असें म्हटलें आहे. हा तह कसा घडून आला? ता. ३ जुलई रोजीं संध्याकाळीं बेनेडिक कोनिग्राट्झच्या रणांगणांतून मागें हटूं लागला इतकें सांगितलेंच आहे. पुढें तो आलमट्झकडे जाणाऱ्या रस्त्यानें निघाला व गॅब्लेंझ, १० वी पलटण, तीन मोठीं शस्त्रें व एक हलकीं शस्त्रें धारण करणाऱ्या अशा चार घोडेस्वारांच्या तुकड्या बरोबर घेऊन थेट व्हिएन्नाकडे जाणाऱ्या रस्त्यानें निघाला हेंहि मागें सांगितलेंच आहे. पिछाडीच्या सैनिकांत सॅक्सनांची व आठवी पलटण होती. हे सैनिक मुख्य सेनेच्या मागें एका मजलेनें राहिले. चौथ्या तारखेच्या दुपारपर्यंत प्रशिअन सैन्याला बेनेडिकचा पाठलाग करणें शक्य झालें नाहीं. याचा अर्थ असा कीं, ऑस्ट्रिअन सेनापतीला जाऊन जवळ जवळ चोवीस तास झाल्यावर प्रशिअन्स त्याचा पाठलाग करण्यास निघाले.

व्हिएन्ना येथें कोनिग्राट्झच्या लढाईचा परिणाम.

या लढाईचे परिणाम व्हिएन्ना येथें लागलीच दिसून आले. बेनेडिक याला त्याच्या अधिकारावरून दूर केलें. परंतु कस्टोझाचा जेत्ता फॉनजॉन परत येईपर्यंत मुख्य सेनापतीचा अधिकार त्याच्याकडे

राहावयाचा होता. व्हेनेशिआ फ्रेंच बादशहास देऊन टाकला तर इटलींतील युद्ध संपेल असें वाटून ऑस्ट्रिआनें तो प्रांत फ्रान्सच्या बादशहास दिला. कस्टोझा येथें लढलेलें सैन्य व्हिएन्ना येथें परत बोलाविलें. कोनिग्राट्झ येथील लढाई-या दिवशीं सकाळीं ज्या तीन सेनापतींना बेनेडिक यानें कैद केलें होतें त्यांना व्हिएन्नास, त्यांची चौकशी व्हावी म्हणून पाठवून द्यावें असा बेनडिक यास हुकूम सुटला.

प्रशिअन्स व्हिएन्ना समोर येतात.

पराजित व विजयी सैन्यें पूर्वेकडे जात असतांना त्यांनीं कसकशा मजला केल्या हें विस्तारानें अशा प्रकारच्या ग्रथत सांगण्याची आवश्यकता नाहीं. ता. ७ जुलई रोजीं ऑस्ट्रिअन सैन्याच्या ३ री व ५ वी अशा दोन्ही पलटणी आगगाडीनें व्हिएन्नाहा पाठवून दिल्या. ता. १२ रोजीं आर्चड्यूक आलबर्ट यानें मुख्य सेनापतीचा अधिकार आपणाकडे घेतला. डॅन्यूब नदीच्या उत्तर तीरावर फ्लारिट्झडार्फ शहरापासून तीन मैल अंतरावर त्यानें तळ देऊन आपल्या सैन्याभोंवतीं खंदक खणविला. आलमट्झ येथें अजूनहि बेनेडिक याच्या ताब्यांत जें सैन्य होतें त्याला त्यानें आपल्याकडे बोलावून घेतलें. इतकें सांगितलें म्हणज पुरें आहे. ता. १४ जुलई रोजीं बेनेडिक यानें या हुकुमाप्रमाणें करण्याचें योजिलें. तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं, प्रशिआचा राजा ब्रून येथें होता व त्याच्या दुसऱ्या सैन्याचा तळ अशा रीतीनें पडला होता कीं, त्यानें आलमट्झपासून थेट व्हिएन्नाकडे जाणारा रस्ता आडविला होता. ता. १४ रोजीं बेनेडिकनें

वरील दिशेनें जाणाचा प्रयत्न केला परंतु त्याला या कामांत टॉबिटस्का येथें चांगलीच थप्पड बसली परंतु ता. १६ रोजीं 'लिंटल कारप्याथिअन्स' या डोंगरांमधून त्यानें प्रेसबर्गकडे आपला रस्ता सुधारला. रस्त्यांची खराबी भयंकर झाली होती, पण अशा रस्त्यांनीं मोठ्या परिश्रमानें मोठमोठ्या मजला त्यानें केल्या तेव्हांच त्याला एवढें तरी करितां आलें. दरम्यान् प्रशिअन सैन्यहि मोठ्या झपाट्यानें कूच करीत चाललें होतें. प्रशिआच्या राजानें मोरोव्हिआंत व्हिएन्ना पासून १५ मैल अंतरावर निकोल्सबर्ग येथें आपलें मुख्य ठाणें ता. १८ जुलई रोजीं केलें. त्याच्यापाशीं या वेळेस १,९४००० कसलेले सैनिक होते. ह्याशिवाय गरज पडल्याबरोबर त्यांना मदत करण्याकरितां ४९,६०० लोक त्यांच्या मागें होते

हें युद्ध थोड्या दिवसांत संपलें यामुळें फ्रान्सच्या बादशाहाची जितकी निराशा झाली, तितकी निराशा बहुतकरून दुसऱ्या कोणाचीहि झाली नसेल. युद्धाला आरंभ झाल्याला कोठें पंधरा दिवस झाले तोंच त्याचा निकालहि लागला. यांत दोन्ही राष्ट्रें पैशाच्या व्ययान अगदीं खराबीला येऊन व अगदीं थकून दमून जाऊन एखाद्या मध्यस्थाचा उपयोग करून घेण्यास फार आतुर व्हावीं अशी तिसऱ्या नेपोलिअनच्या इच्छेप्रमाणें स्थिति आली नाहीं. तथापि जर्मनीची व्यवस्था लावण्यांत शक्य तर आपल्यास थोडें महत्व प्राप्त करून द्यावें असा फ्रान्सचा तिसरा नेपोलिअन याचा मानस होता. म्हणून कोनिग्रॉट्झ येथील महत्त्वाच्या लढाईचा निकाल त्याला समजल्याबरोबर तीन दिवसांच्या तात्पुरत्या तहाला आपण संमति द्या अशी विनंति करण्या-

करितां त्यानें एक प्रतिनिधि किंग विल्यम याच्या मुख्य ठाण्यावर पाठविला होता. कांहीं विशेष अटींवर त्याच्या म्हणण्याला प्रशिआच्या राजानें संमति दिली होती, परंतु ऑस्ट्रिआच्या राजाच्या मतें त्या अटी केवळ प्रशिआलाच फायदेशीर अशा असल्यामुळें ऑस्ट्रिआच्या बादशादानें त्या मान्य केल्या नव्हत्या, म्हणून युद्ध तसेंच पुढें सुरू राहिलें. फ्रान्सचा वकील कौंट बेनेडेटी हा निकोल्सबर्ग येथें अगोदरच जाऊन बसला होता. तो प्रशिआचा राजा निकोल्सबर्गच्या विछायत आल्याबरोबर त्याच्या भेटीस गेला व त्यानें तात्पुरत्या तहाविषयीं नवीनच बोलणें सुरू केलें. ह्या नव्या सूचनांप्रमाणें तहाचें बोलणें करण्यास मी तयार आहें असें लिहून राजानें स्कोन्ब्रून्ना व्हिएन्ना येथें पाठवून दिल्या.

ऑस्ट्रिआ तात्पुरत्या तहास रुकार देतो.

या वेळीं ऑस्ट्रिआची स्थिति फार बिकट होती व्हिएन्नाच्या समोर ऑस्ट्रिआचें दुसरें सैन्य भोंवतालीं खंदक खणून तळ देऊन बसलें होतें. पहिल्या सैन्याचा बहुतेक भाग आपल्याबरोबर घेऊन बेनेडिक प्रेसबर्ग येथें अजूनहि व्हिएन्नापासून ४० मैल अंतरावर होता. ह्या दोघांच्या मागल्या बाजूस हंगेरी प्रांत होता, यांतील प्रजा अजून हॅब्सबर्ग घराण्याशीं राजनिष्ठ झाली नव्हती. सायलेशिआत नीसी येथें प्रख्यात क्लॅप्का याच्या नेतृत्वाखालीं हंगेरिअन सैन्याची उभारणी होऊन लोकांचा चित्तक्षोभ होण्याचा संभव फार होता. क्लॅप्का हा जॅब्लुंकाच्या अरुंद रस्त्यानें हंगेरीमध्यें येऊन ऑस्ट्रिआच्या

विरुद्ध बंड उभारण्यास अगदीं उद्युक्त होता फ्लारिडस्डार्फ येथें कदाचित् होणारा पराभव; फ्लारिडस्डार्फ व प्रेसबर्ग यांच्यामध्यें प्रशिअन सैन्य येऊन बसणार हें कठीण होतें खरें, पण अशक्य नव्हतें. हंगेरी येथें बंड उद्भवण्याचा संभव—ह्या सर्व धोक्यांचा विचार व्हायवास पाहिजे होता. बादशहानें त्यांचा विचार केला व अखेरीस तो तात्पुरता तह पत्करण्यास तयार झाला या तहावरून ज्या अटी प्रशिआ घालील त्या मान्य करणें हें युद्ध चालू ठेविल्यास जे अपाय होतील, त्यापेक्षां ज्यास्त अपायकारक आहे कीं काय हें अजमावण्यास बादशहास सवड होणार होती ता. २१ रोजीं त्यानें या आशयाचें उत्तर पाठविलें आणि दुसऱ्या दिवशीं तहाच्या वाटाघाटीस आरंभ झाला.

निकोल्सबर्ग येथील तात्पुरत्या तहाचीं कलमें.

पांच दिवस संपण्याच्या पूर्वीच अटींचा कच्चा मसुदा तयार होऊन त्याच्यावर सह्याहि झाल्या. अटी पुढील आशयाच्या होत्या. (१) व्हेनेशिअन प्रांताची विल्हेवाट बादशहानें अगोदरच लाविल्यामुळें त्या प्रांताशिवाय ऑस्ट्रिआच्या बादशाहाच्या अंमलांतील मुलुख जशाचा तसाच असावा. २ जर्मनसंघ आतां विसर्जन पावला हें बादशहानें मान्य करावें, जर्मनीशीं ऑस्ट्रिआचा संबंध जोडणारीं नवीन बंधनें ठरतील तीं ऑस्ट्रिआनें पत्करावीं व उत्तर जर्मन संघ व दक्षिण जर्मन संघ हे दोन्ही संघ कबूल करण्याचें व त्यापैकीं कोणाच्याहि कामांत हात न घालण्याचें ऑस्ट्रिआनें वचन द्यावें. (३)

बादशहानें स्क्लेस्विग व होलस्टीन यावरील आपले हक्क प्रशिआच्या राजास द्यावे. (४) २०,००,००० टालर रक्कम रोख, १,५०,००,००० टालर एल्ब डचीज ऑस्ट्रिआनें सोडल्या त्यांची किंमत म्हणून व ५०,००,००० टालर प्रशिअन सैन्य आस्ट्रिआच्या हद्दींत आहे तोंपर्यंत त्याच्या खर्चाला म्हणून, याप्रमाणें ऑस्ट्रिआनें एकंदर ४,००,००,००० टालर खंडणी द्यावी. (५) युद्धाला आरंभ होण्याच्या पूर्वी सॅक्सनीच्या मुलुखाच्या हद्दीच्यासंबंधानें जी स्थिति होती ती ऑस्ट्रिआच्या इच्छनेनुरूप प्रशिआ कायम घरण्यास तयार आहे. सॅक्सनीबरोबर युद्धाच्या खर्चाची प्रशिआला देण्याची रक्कम ठरविणें व उत्तर जर्मन संघामध्यें सॅक्सनीनें कोणत्या अटीवर यावें हें ठरविणें, ह्या दोन्ही गोष्टी प्रशिआच्या मर्जीवर आहेत. उत्तर जर्मनींत हद्दीसंबंधानें जे फरक प्रशिआ करण्याचें ठरवील त्यांना ऑस्ट्रिआनें संमति द्यावी.

सहावें कलम वरील अटीस इटलीच्या राजानें अनुमति देण्याविषयीं होतें. सातवें कलम हा तह दोन महिन्यांच्या आंत कायम झाला पाहिजे असें होतें; नववें, तात्पुरता तह ता. २ ऑगस्टपासून दोन महिने चालावा असें होतें.

ता. २३ ऑगस्ट रोजीं ज्या पक्क्या तहावर प्राग येथें सह्या झाल्या त्या तहाच्या शर्तींवरील अटींच्या आधारानेंच ठरविल्या होत्या हें ह्या ठिकाणीं सांगून ठेवणें सोईचें आहे.

ह्या युद्धापासून प्रशिआला काय मिळालें ?

सन १८६६ च्या ऑस्ट्रिआ व प्रशिआ यांच्यामधील युद्धाचा शेवट ज्या तहानें झाला त्यांतील अटी या अशा होत्या. पुढील गोष्टी वाचकांनीं विशेष लक्षांत घेण्यासारख्या आहेत. दुसऱ्या अटीनें बाकीच्या जर्मन राष्ट्रांशीं ऑस्ट्रिआचा कांहीं संबंध ठेविला नाहीं. परंतु त्याच अटीवरून प्रशिआला मात्र निरनिराळ्या राज्यांशीं व संस्थानांशीं वाटतील त्या अटी ठरविण्याचा हक्क प्राप्त झाला. हीं राज्यें व संस्थानें १८६६ पर्यंत ऑस्ट्रिआच्या बादशाहाला आपला अधिराज म्हणून मानीत असत व उत्तरेकडील संस्थानांनीं दक्षिणेकडील संस्थानांना जें युद्ध करणें भाग पाडिलें, त्या युद्धांत या लहान मोठ्या संस्थानांनीं ऑस्ट्रिआलाच पाठबळ दिलें होतें. पांचव्या कलमानें प्रशिआचा हॅनोव्हर, इलेक्टोरल हेसी, नासा व फ्रँकफोर्ट हीं खालसा करण्याचा अधिकार दिल्यासारखा कारण ह्या संस्थानांचा उल्लेख जरी तहांत नाहीं तरी प्रांशिआ आपल्या मर्जीनुरूप जी सरहद्दींची व्यवस्था लावील तींत हात घालण्याचा हक्क ऑस्ट्रिआनें सोडून दिला होता आणि अटकळीप्रमाणें आपल्याला फायदेशीर अशी सरहद्दींची वांटणी बिनदिक्कत करण्यास प्रशिआ चुकला नाहीं.

वर जो तहाच्या कलमांचा गोषवारा दिला आहे तो केवळ वरवर वाचल्यानें प्रशिआला या युद्धापासून झालेल्या फायद्याची बरोबर कल्पना येणार नाहीं. प्रशिआचा एवढा मोठा फायदा काय झाला, हें आतां आपण पाहूं.

तिसऱ्या नेपोलिअनची पुनः फजिती होते.

कौंट बिझमार्क यानें सन १८६६ चें युद्ध दोन हेतू पूर्ण करून घेण्याच्या उद्देशानें मुद्दाम कांहींतरी कुरापत काढून उत्पन्न केलें होतें. जर्मनींतून ऑस्ट्रिआला काढून वेगळा करणें हा एक व बाकीच्या जर्मन संस्थानांचा एक नवीन संघ करणें, हा दुसरा हेतु या संघात प्रशिआला आद्यस्थान देणें, त्याचीं सर्व सूत्रें प्रशिआच्या हातांत देणें व कोणत्याहि वादांत प्रशिआला सरपंच नेमणें इतक्या गोष्टी या संघाची स्थापना करण्यांत साधून घ्यावयाच्या होत्या पहिला हेतु प्रागच्या तहानें सिद्धीस गेला हें आपणांस दिसलेंच आहे दुसरा हेतु साध्य करून घेण्यास फ्रान्सच्या बादशाहाची अनुमति मिळविणें अवश्य होतें. युद्धारंभाच्या पूर्वी निरनिराळ्या प्रसंगीं बिझमार्क याच्याबरोबर आपलीं जीं जीं भाषणें झालीं त्यांत बिझमार्कनें गोड गोड बोलून आपणांस फसविलें ही गोष्ट ध्यानांत आल्यामुळें नेपोलिअनचे डोळे अजूनहि पूर्णपणें उघडले नव्हते. त्याला अजूनहि आशा होती; नव्हे, अजूनहि त्याला भरंवसा होता कीं, आपण प्रशिआकरितां जें जें केलें होतें, इटलीबरोबर प्रशिआची दोस्ती दृढ करण्याकरितां आपण जें आपलें वजन खर्च केलें होतें, ऑस्ट्रियाविषयीं आपण जी बेफिकिरीची वृत्ति धरिली होती, त्या सर्वांबद्दल आपणांस लुटीचा इच्छित असा कांहीं तरी भाग मिळेल. लवकरच त्याचा हा भ्रम दूर झाला. निकोलसबर्ग व प्राग या ठिकाणीं तहाचीं बोलणीं चालू असतां बिझमार्कनें जेव्हां ऑस्ट्रिअन प्रांत खेरीज करून बाकी सर्व जर्मनीचें

एकीकरण प्रशिआच्या नेतृत्वाखालीं करण्याचा आपला बेत हळूच बादशहास सांगितला. तेव्हां बादशहानें त्या बेतास माझें अनुमोदन नाहीं असें साफ सांगितलें. नंतर अजूनहि आपणास कांहीं मिळालें तर पाहावें अशा आशेनें बादशहानें आपलाच एक दुसरा बेत सुचविला. यांत जो अधिकार मिळविण्यास प्रशिआ फार आतुर झाला होता त्या अधिकाराचें पुष्कळ नियमन करण्याचा घाट घातला होता. आपण कोणाशीं व्यवहार करतों आहों हें बिस्मार्क याच्या पूर्ण ध्यानांत होतें व म्हणून त्यानेंहि बादशहानें केलेली सूचना नाकारिली. परंतु हें करतांना बिस्मार्क यानें सहज असें सुचविलें कीं, बेलजिअम खालसा करून फ्रान्सनें आपल्या मेहनतीचा मोबदला घ्यावा. एक क्षणभर बादशहा काचकूच करतोसें दिसलें. बिस्मार्कच्या म्हणण्याचा जास्त विचार केल्यावर त्याच्या ध्यानीं आलें कीं, बिस्मार्कच्या म्हणण्यांत अशी एक गोष्ट आहे कीं, तिचा फायदा फ्रान्सला पूर्णपणें करून घेतां येईल. असें वाटल्याबरोबर बादशहानें बिस्मार्कच्या म्हणण्यास केलेला विरोध काढून घेतला. अखेरीस बादशहाच्या अनुमतीनें असें ठरलें कीं, हॅनोव्हर, इलेक्टोरल हेसी, नासा व फ्रँकफोर्ट हीं खालसा करण्याच्या कामीं प्रशिआला प्रतिबंध अजूं नये व मेन नदीच्या दक्षिणेस जीं संस्थानें आहेत त्यांना उत्तर संघाशीं स्वतंत्र राष्ट्र म्हणून दळणवळण ठेवण्याचा हक्क देण्याचा अधिकार प्रशिआस असावा.

प्रशिआ व दक्षिणेचीं संस्थानें यांच्यामधील होणाऱ्या वाटा-

घाटीत तिसरा नेपोलिअन याचें मुळींच अंग नसतें तर तें त्यास फार फायदेशीर झालें असतें, असें पुढच्या भागांत सिद्ध करण्यांत येईल. नेपोलिअन या भानगडींत पडला व बिझमार्क यानें मोठ्या युक्तीनें त्याचा फायदा घेतला. यामुळें फ्रान्सच्या विरुद्ध उपयोग करण्यास अति उत्तम शस्त्र प्रशिआच्या हातांत आयतेंच पडल्यासारखें झालें. असें शस्त्र शार्लमेनच्या वेळेपासून कधीं कोणास मिळालें नव्हतें.

प्रकरण १२ वें.

तिसरा नेपोलिअन व बिझमार्क–पॅरिस व बर्लिन शहरीं कल-हाग्नि धुमसतो–होहेन्झोलर्न घराण्याची उमेदवारी–एझ येथें किंग विल्यम व बेनेटी पॅरिस शहरीं क्षोभ–बर्लिंग शहरीं उठविलेल्या खोट्या बातम्यांमुळें युद्ध अपरिहार्य होतें.

सन १८६६ चें युद्ध उद्भवण्याच्या सुमारास फ्रान्सच्या बादशाहानें युद्ध जुंपण्याच्या: कारणाविषयीं व त्याप्रमाणेंच त्या युद्धाचा शेवट काय होणार याविषयीं आपली कल्पना उघड बोलून दाखविली होती. त्याच्या मतानें इटली व प्रशिआ यांच्या आकांक्षा स्वाभाविक व न्याय्य होत्या. इटलीच्या राज्याची स्वाभाविक मर्यादा व्यंग न राखतां कायम व्हावयास पाहिजे होती व हे काम ऑस्ट्रिआनें व्हेनेशिआ इटलीला दिला म्हणजे साधणार होतें प्रशिआच्या राज्याच्या आजपर्यंत मानलेल्या स्वाभाविक हद्दींत पुष्कळ दोष होते यामुळें प्रशिआला आपल्या योजना चांगल्या रीतीनें पार पाडण्यास मोठी पंचाईत पडे, म्हणून हे दोष काढून टाकावे व जर्मनींतील संयुक्त संस्थानांची स्थिति सुधारून त्यांची पुनर्घटना करावी असा प्रशिआचा उद्देश होता. प्रशिआचा उद्देश, जर्मनीच्या उत्तर भागांत प्रदेशांच्या मर्यादेची नवीन आखणी करून व दुय्यम प्रतीच्या जर्मन संस्थानांमध्यें एकी घडवून आणून साध्य होईल असें नेपोलिअन बाद-

शाहानें आपलें मत जाहीर केलें. ऑस्ट्रिआनें व्हेनेशिआ इटलीस दिल्यास जर्मनींतील ऑस्ट्रिआच्या सामर्थ्यास अपाय होणार नाहीं व युद्धानें अशी व्यवस्था लाविता आल्यास फ्रान्सला आपल्या सरहद्दी बदलण्याची जरूर पडणार नाहीं. कारण वरील व्यवस्था म्हणजे देशांतल्या देशांतलीच व्यवस्था होती असेंहि त्यानें सांगण्यास कमी केलें नाहीं.

तिसऱ्या नेपोलिअनची स्थिति.

युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी बाह्यात्कारीं उघड बोलून दाखविलेले बादशाहाचे विचार असे होते. नेहमींच बादशाहा जेव्हां जेव्हां आपला विचार अशा रीतीनें जाहीर करण्याचा बाहणा करी, तेव्हां त्याचे गुप्त विचार, उच्चारलेल्या शब्दांच्या पांघरुणाखालीं बेमालूम झांकून ठेवलेला असे. हा गुप्त विचार काय होता हें मागें पुष्कळदां सांगितलें आहे. तेव्हां त्याची आतां पुनरावृत्ति करण्याची जरुरी नाहीं. हा गुप्त विचार बिआरिट्झ व पॅरिस येथें बिझमार्क याला कळविला होता. पुढें निकोल्सबर्ग व प्राग येथें फ्रेंच वकिलानें तो बोलून दाखविला होता. बिझमार्कला स्वतःचे बेत सिद्धीस जाण्यास फ्रान्सची तटस्थ वृत्ति कायम राहावी असें जोंपर्यंत वाटत होतें, तोंपर्यंत बादशाहाच्या विचाराप्रमाणें कांहीं तरी घडून येणारच असा बिझमार्कनें त्याचा चांगला समज करून दिला होता. मागल्या प्रकरणाच्या शेवटीं ज्या गोष्टी ठरल्या म्हणून सांगितलें आहे त्यांच्या करारनाम्यावर सह्या व शिक्का मोर्तब झाल्याबरोबर बिझमार्क याला

आतां तिसऱ्या नेपोलिअनचा कोणताहि उपयोग करून घ्यावयाचा राहिला नाहीं. त्याच्याशीं दोस्ती करून बिझ्मार्कला जें कांहीं संपादन करावयाचें होतें, तें त्यास मिळालें होतें. आतांपर्यंत फ्रान्सच्या बादशाहाला आपण चुचकारिलें व नानातऱ्हेचीं आमिषें दाखवून त्याची मनधरणी केली. परंतु आतां त्याला जाणूनबुजून झिटकारणें आपणांस प्राप्त आहे व त्यामुळें फ्रान्सबरोबर युद्ध करण्याच्या तयारीस आपण लागलें पाहिजे हें बिझ्मार्क पूर्णपणें जाणून होता.

सॅम्सन आणि डेलीला.

आज कित्येक वर्षें तिसरा नेपोलिअन हा यूरोपांतील राष्ट्रांचें आपण मध्यस्थ आहों असा बाहणा करण्याचा प्रयत्न करीत होता व त्यांत त्याला बरेचशें यशहि आलें होतें. म्हणून सन १८६६ च्या पावसाळ्यांत त्याची जी स्थिति झाली होती, ती त्याच्या मनाला मोठी लागून राहिली. त्याच्या १५ वर्षांच्या अवधींत त्यानें पुष्कळ कार्य केलें होतें. उदाहरणार्थ, रशिआचा पाडाव करण्यांत त्यानें बरीच मदत केली होती, इटलीची प्रतिष्ठा त्यानें वाढविली होती, इंग्लंडच्या हातांत हात घालून त्यानें कामें केलीं होतीं, फ्रान्सच्या राज्याची नैर्ऋत्येच्याकडील सरहद्द वाढविली होती, प्रशिआची राज्य-मर्यादा वाढविण्याच्या कामीं तटस्थ वृत्ति ठेवून बिझ्मार्क याच्या बरोबर सहकार केला होता. पहिलीं चार कामें केवळ काळजीपूर्वक नव्हे तर मोठ्या दूरदर्शीपणानें त्यानें पार पाडला होतीं. परंतु पांचव्या कामांत मात्र त्यानें अगदीं गबाळपणा केला. बिझ्मार्क

तयारी करण्यांत गुंतला असतांना तो सर्वथैव नशिबावर हवाला ठेवून बसला होता. त्याचें उत्तम सैन्य अजूनहि मेक्सिकोमध्यें होतें व फ्रान्समध्यें जें सैन्य उरलें होतें त्याची युद्धाची तयारी मुळींच नव्हती सन १८६६ चें युद्ध दीर्घकालपर्यंत चालू राहील व अखेरीस त्या युद्धाचा निकाल असा होईल:—जर्मनीचे उत्तर संघ व दक्षिण संघ असे परस्पर विरुद्ध दोन भाग होतील, हॅनोव्हरचा समावेश प्रशिअ त होऊन प्रशिआला बळकटी येईल; ह्यानिश सरहद्द फ्रान्सला मिळून त्याला श्रमाबद्दल मोबदला मिळेल, या सर्व गोष्टी होतीलच होतील असें त्याला वाटलें होतें; परंतु या आशा सफल होतील अशी कोणतीहि तयारी त्यानें केली नव्हती. जेव्हां युद्ध इतकें एकाएकीं थांबलें तेव्हां प्रशिआ व ऑस्ट्रिआ यांच्यांत जे करारमदार होऊन तंटा मिटणार त्यांत आपणाला कोणींहि विचारणार नव्हतें हें त्याला लवकरच समजणार होतें. तिसरा नेपोलिअन आतां, त्याच्या शक्तीचें जें स्थान तीं झुलपें हिरावून घेतलेल्या सॉसनप्रमाणें, निर्माल्यवत् झाला होता सॅम्सन याला नादीं लावून डेलीलानें फसविलें, त्याप्रमाणें जर्मनीच्या बिझ्मार्कनें तिसऱ्या नेपोलिअनास फसविलें होतें. आतां बिझ्मार्क याचाच वरचष्मा होता व तो म्हणेल ती पूर्वादिशा होती. दारुण युद्धांतून प्रशिआ सर्वस्वी विजयी होऊन बाहेर पडत होता व त्याचें आर्थिक सामर्थ्य कमी न होतां कांहींसें सुधारलेंच होतें. अशा वेळीं प्रशिआची बरोबरी करण्याच्या कामीं कारस्थानीपणाला जर तरवारीच्या बलाची जोड नसेल तर नुसता कारस्थानीपणा कवडीमोल आहे हें या भोळ्या फ्रेंच सॅम्सनच्या लक्षांत

20 APR 1990

लवकरच आणून द्यावयाचें, असा या प्रल्यात पुरुषानें—बिझमार्कनें—निश्चय केला होता.

नेपोलिअनच्या कारस्थानाचा फ्रान्सवर दुष्परिणाम.

कारण ऑस्ट्रिआ व दक्षिण जर्मनींतील संस्थानें यांच्याबरोबर ठरलेल्या व्यवहाराची पूर्तता होतांक्षणींच जे प्रांत प्रशिआनें नवीन मिळविले होते ते आपल्या राज्यांत एकजीव करून टाकण्याच्या कामास प्रशिआनें आरंभ केला. या देशांची साधनसंपत्ति व सैन्य हीं आतां प्रशिआचींच होतीं. अशा रीतीनें प्रशिआच्या साधनसंपत्तींत व सैन्यांत भर पडल्यामुळें सन १८६६ सालीं युद्धांत पडलेल्या प्रशिआपेक्षां हल्लींचा प्रशिआ पुष्कळ पटीनें सामर्थ्यवान् होता.

तिसरा नेपोलिअन यानें १५ वर्षे कारस्थानें करून त्यांत आपले हेतु साधून घेतले होते. त्यामुळें १८६६ च्या शरद्ऋतूत झालेली हीनावस्था त्याच्या मनाला लागून राहिली, हें मागें एकदां सांगितलेंच आहे. पण लवकरच नेपोलियनची उघड उघड नाचक्की होणार होती. तो ज्या मागण्या करीत होता त्या हटकून प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य त्याला नव्हतें असें असतांना जर्मनी किंवा बेलजियम यांचें नुकसान करूनहि फ्रान्सला कांहीं तरी सबलती प्रशिआनें द्याव्या अशी मागणी त्यानें एकसारखी आग्रहानें सुरू ठेविली. प्रशिआच्या मुलुखांत नवीन भर पडली होतीच. तेव्हां त्याचा मोबदला म्हणून प्रशिआनें हें म्हणणें मान्य केलेंच पाहिजे, असा त्यानें आग्रह धरिला. ह्या नेपोलिअनच्या मागण्या बिझमार्क याच्या फारच पथ्यावर पडल्या.

प्रशिआला सरहद्दींची आंखणी विशेष प्रकारची करणें जरूर आहे असें वाटत होतें; परंतु बव्हेरिआ व त्याच्याच स्थितींतील आणखी कांहीं संस्थानें यांचीं मनें ही आंखणी स्वीकारण्यास वळविण्याचें काम थोडें कठीण आहे असें या प्रस्थात मुत्सद्द्यास वाटूं लागलें होतें. या संस्थानांचा विरोध अगदीं विकोपास जाणार होता. इसक्यांत बव्हेरिआच्या प्रांतांपैकीं कांहीं भाग फ्रान्सला मिळावा अशी मागणी फ्रान्सच्या बादशाहानें बिझमार्क याजकडे केली. ही मागणी विस्तारानें पुढें देण्यांत येईलच. ती कानीं पडतां क्षणींच जर्मनीच्या अभिमानानें पेट घेतला. लहान संस्थानांनीं आपआपल्या हरकती मागें घेतल्या, इतकेंच नाहीं, तर त्यांनीं शत्रूवर चढाई करण्याकरितां, एकामागून एक गुप्त तह स्वसंरक्षणार्थ करून प्रशिआशीं दोस्ती केली; आणि फ्रान्स बरोबर लढाई जुंपलीच तर आम्हीं आपलें सर्व सैन्यबल राजाच्या दिमतीस देण्यास तयार आहोंत, असें अभिवचन दिलें. ह्याप्रमाणें प्रत्यक्ष युद्धानें जें जर्मनीचें एकीकरण पूर्ण झालें नव्हतें तें तिसऱ्या नेपोलिअनच्या कारस्थानानें घडून आलें.

नेपोलिअन आपलीं कारस्थानें आरंभ्या वकिलास वकूब देत नाहीं.

फ्रान्सच्या कोणत्याहि राजाच्या हातून यापेक्षां मोठी चुकी होणें शक्य नव्हतें. परंतु ही एक चुकी नेपोलिअनच्या हातून झाली असें मुळींच नाहीं. युद्ध उद्भवण्याच्या अगोदर बेलजिअम फ्रान्सला जोडून

मिळावा म्हणजे बाबद्दलची वाटाघाट बिस्मार्क बरोबर कधीं तोंडीं तर कधीं अनधिकृत गुप्त हेरांच्या मार्फत चालली होती. तोंडीं झालेली वाटाघाट केव्हांहि नाकारणें शक्य होतें व गुप्त हेर हे आमचे नव्हते असेंहि म्हणतां आलें असतें. परंतु सन १८६६ च्या युद्धाच्या निकालानें नेपोलिअनची निराशा झाली, तेव्हां जास्त घिटाईचे व त्याच्या अंगावर येण्यासारखे उपाय योजण्याचें धाडस करण्याकडे त्याची प्रवृत्ति झाली. सन १८६४ पासून बर्लिन येथें कौंट व्हिन्सेंट बेनेडेटी हा फ्रेंच वकील होता हा कार्सिकन कुलांत जन्मला असून कर्तृत्ववान् पुरुष होता. सन १८६६ च्या युद्धाचा शेवट होईपर्यंत तिसरा नेपोलिअन यानें मुलुख खालसा करण्याच्या संबंधानें ज्या मसलती केल्या त्या सर्व बेनेडेटीच्या पश्चात् केल्या होत्या. नेपोलिअनच्या या मसलतींची माहिती बेनेडेटी यास मुळींच नसल्यामुळें युद्ध सुरू होणार इतक्यांत बिस्मार्कबरोबर जें त्याचें संभाषण झालें होतें, त्याची कच्ची हकीकत बेनेडेटी यानें बादशाहास लिहिली होती, ती हकीकत अशी:— फ्रान्स तटस्थ राहिला तर ट्रेव्हीज प्रांत, लक्झेंबर्ग व बेल्जिअम अथवा स्विट्झर्लंड हीं प्रशिआच्या राजाच्या संमतीनें फ्रान्सला देतां येतील; त्या योगें फ्रान्सची सरदद इतकी उत्तम होईल कीं, त्या पासून फ्रान्सचें समाधान होईल. पण व्होनिश प्रांताबद्दल बिस्मार्कनें स्वच्छ सांगितलें कीं, " जरी मला राजीनामा द्यावा लागला तरी हे प्रांत द्यावयास मी कधींहि कबूल होणार नाहीं. " बेनेडेटी यानें आणखी असें म्हटलें होतें. कीं, " फ्रान्सला कोणता तरी एखादा प्रांत देण्यास

तयार असा सर्व प्रशिआंत बिझमार्क हा एकच पुरुष होता. परंतु उघड रीतीनें फ्रान्सनें जर अशा तऱ्हेची मागणी केली तर सगळकिडे फ्रान्सविरुद्ध मोठा गवगवा होईल. " " बेलजिअम किंवा स्विट्झर्लंडचा भाग फ्रान्सला द्यावा अशी एखादी योजना पुढें आल्यास ती पॅरिस येथें पसंत पडेल अशी बिझमार्कची कल्पना होऊं नये म्हणून मी आमचें भाषण एकदम बंद केलें " असें बेनेडेटी यानें आपल्या खलित्याच्या शेवटीं लिहिलें आहे. त्यावरून आपल्या बादशाहाच्या मसलतींची कांहींच कल्पना त्यास नव्हती असें पूर्णपणें सिद्ध होतें.

नेपोलिअन यानें बिझमार्कपाशीं केलेल्या मागण्या.

या नंतर युद्ध सुरू झालें. युद्ध संपून दोन्ही पक्षांची निकोलसबर्ग व प्राग येथें तहाचीं बोलणीं चालू असतांच बादशाहाच्या आज्ञेवरून बेनेडेटी यानें पुढील प्रांत तोडून मागितले:—बव्हेरिअन पॅलेटिनेट, व्हाईन नदीच्या पश्चिमकडे हेसी—डार्मस्टॅडच्या मेयन्स सुद्धां भाग, आणि १८१५ सालीं फ्रान्सपासून घेतलेली सार नदीच्या कांठची प्रशिअन प्रांताची पट्टी ही मागणी प्रशिआनें नाकारल्यास फ्रान्सला युद्ध करावें लागेल असा धाकहि या मागणी बरोबरच बेनेडेटी यानें घातला होता, असें बिझमार्क याचें म्हणणें होतें परंतु तें अत्यंत असंभवनीय दिसतें. तथापि ही मागणी बिझमार्क यानें साफ नाकारिली यांत तिळमात्र संशय नाहीं. नंतर बिझमार्क बरोबर आपलें झालेलें भाषण बादशाहास स्वतः सांगण्याकरितां बेनेडेटी पॅरिसला येण्याकरितां निघाला. त्याच्या परत येण्यामुळें मंत्रिमंडळांत घडामोड होण्याचा

प्रसंग आला फ्रान्सचा परराष्ट्रीय मंत्री ड्यूइन डी ल्हूई याचें मत असें होतें कीं, अशी मागणी एकदा केल्यावर, जरूर तर तरवारीच्या बळावर ती पुरी करून घेण्यास आपल्या इभ्रतीकरितां फ्रान्सनें तयार असलें पाहिजे. तथापि अशा कारणावरून आपण युद्ध पुकारल्यास सर्व यूरोप आपणांस नांवें ठेवील अशी बादशहास भीति वाटून त्यानें युद्ध पुकारण्याचें नाकारिलें. म्हणून ड्यूइन डी ल्हूई यानें राजीनामा दिला. मग बादशाहानें बेनेडेटी यास तुम्ही पुनः बर्लिन येथें जाऊन व्हाइन सरहद्दीच्या ऐवजीं बेल्जिअम तोडून मिळविण्याचा प्रयत्न करा असें सांगितलें. बेनेडेटी परत गेल्यावर ज्या गोष्टी घडल्या त्यांची खरी खरी हकीकत खालीं दिली आहे.

फ्रान्सच्या राज्यांत बेल्जिअम मिळवून घेण्यास प्रशिआनें संमति द्यावी अशी सूचना बादशाहाच्या वतीनें बेनेडेटी यानें १८६६ च्या पावसाळ्यांत पुढें मांडिली. इतर कांहीं गोष्टींच्या हकीकती बरोबरच या प्रकरणाची हकीकत १८७० सालीं जुलई महिन्यांत बिझमार्क यानें प्रसिद्ध करून यूरोपाची सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें १८७० सालीं झालेल्या युद्धांत ज्या इंग्लिश लोकांनीं विशेष लक्ष घातलें त्यांच्या ध्यानांत असलीच पाहिजे. बेनेडेटीच्या हस्तलिखित तहनाम्याच्या खर्ड्यावरून बिझमार्क यानें आपल्या म्हणण्याचें समर्थन केलें. त्या तहनाम्यांत पुढील कलमें होतीं:—(१) युद्धांत जे प्रांत प्रशिआनें मिळविले ते फ्रान्सनें मान्य करणें; (२) फ्रान्सला लक्झेंबर्ग मिळण्याचा मार्ग सुगम करून

देण्याविषयीं प्रशिआचें अभिवचन; (३) ऑस्ट्रिआला वेगळा टाकून जर्मनीच्या उत्तर व दक्षिण संस्थानांच्या संयुक्त संघाच्या स्थापनलो विरोध न करण्याविषयीं बादशाहाचें अभिवचन; (४) बादशाहाला जर बेलजिअममध्यें शिरावें लागलें अगर बेलजिअम जिंकावें लागलें व त्या कामीं एखाद्या राष्ट्रानें त्याला विरोध केला तर लढाईंत सैन्य पुरवून प्रशिआचा राजा बादशाहाला मदत करील; (५) तह करणाऱ्यापेक्षां मध्यें शत्रूवर चढाई करण्याकरितां व स्वसंरक्षणाकरितां दोस्ती असावी.

बिझमार्कचा कावा.

अशा प्रकारची सूचना बेनेडेटी यानें केली यावद्दल संशय नाहींच; परंतु त्या वेळची परिस्थिति लोकांना जशी भासावी अशी बिझमार्कची इच्छा होती त्यापेक्षां ती फारच निराळी होती यांतहि संशय नाहीं. बिझमार्कनें बेलजिअम खालसा करण्याच्या बेताचें आमिष पुष्कळ वेळां नेपोलिअनच्या पुढें लोंबत धरलें होतें. बेल्जिअम देतों देतों म्हणावयाचें, पण तें कधींहि द्यावयाचें मात्र नाहीं, असा त्याचा बेत होता. निकोलसबर्ग येथें तहाची वाटाघाट चालली होती तेव्हां त्यानें हें आमिष दाखविलें होतें. १८६६ सालच्या पूर्वी कांहीं वर्षे नेपोलिअन यास चुचकारण्याचा क्रम त्यानें चालविला होता. आपल्याला बादशहाच्या मदतीची गरज अगदीं नाहींशी होईपर्यंत अथवा जर्मनीचें पूर्ण दृढीकरण होण्यास जें युद्ध आवश्यक आहे असें त्याला तेव्हांहि वाटत होतें त्यायुद्धाची आपली पूर्ण तयारी

होईपर्यंत आपण नेपोलिअन याला असेंच चुचकारीत राहूं असा त्याला आत्मविश्वास होता. तर मग बेलजिअम खालसा करण्याचें नेपोलिअन यानें बोलणें लाविलें ही एक त्याला माहीत असलेली जुनी बाबच होती.

बेनेडेटी आणि बिझमार्क.

बेनेडेटीची स्थिति अशी नव्हती. ह्या बाबतीसंबंधानें बादशाहानें बेनेटेडीला आपल्या विश्वासांत कधींहि घेतला नव्हता बिआरिट्झ व पॅरिस येथें बादशाहा व बिझमार्क यांच्यामध्यें कानगोष्टी बगैरे काय झाल्या याची बेनेडेटी याला मुळींच कल्पना नव्हती. कांहीं दिवसांमागें बेलजिअमला चट्टा बसवून फ्रान्सला आपला नफा करून घेणें शक्य आहे असें बिझमार्क म्हणाला, तेव्हा बादशाहा अशा प्रकारचें म्हणणें नुसतें ऐकून सुद्धां घेणार नाहीं असें म्हणून बेनेडेटीनें बिझमार्कच्या म्हणण्याचा निषेध केला होता, हें आपणांस माहीत आहेच. ह्या बाबतीसंबंधानें बेनडेटी नुकताच पॅरिसला गेला तेव्हां त्याचा भ्रम दूर झाला, आपला बादशाहा कसें तरी करून जास्त मुलुख मिळविण्याला अगदीं हपापला आहे, मग तो मुलुख संपादन करितांना कोणाचेंहि नुकसान झालें तरी त्याला त्याची फिकीर नव्हती, असें त्याच्या नजरेस आलें होतें वर निर्दिष्ट केलेल्या प्रसंगीं बिझमार्कनें वापरलेले शब्द बेनेडेटीनें बादशाहास निःसंशय सांगितले असतील आणि " तुम्ही बेलजिअम संबंधानें बिझमार्कला जाव विचारा " असा बादशहाचा हुकूम घेऊनच बेनेडेटी बर्लिनला परत गेला होता.

तर मग या इतिहासप्रसिद्ध भेटीच्या वेळीं "पूर्वी झालेलें संभाषण ध्यानांत आणा" अशी प्रशिआच्या परराष्ट्रीस मंत्र्यास विनंति करून बेनेडेटीनें बोलण्यास आरंभ केला होता. त्या वेळीं मुळांत जी गोष्ट सुचविली असेल तिच्या आधारावर आतां पुढचें बोलणें बोलण्यास फ्रान्सच्या बादशाहाची तयारी आहे असेंहि बेमेडेटीनें सांगितलें होतें. हें ऐकून बिझमार्कनें आश्चर्य किंवा राग मुळींच दाखविला नाहीं. परंतु त्यानें सुचविलेलें तत्त्व एकदम मान्य केलें व ज्या तहनाम्याच्या खर्ड्याचा उल्लेख मागें केला आहे त्यांतील कलमांचा गोषवारा सांगण्यास त्यानें आरंभ केला. बिझमार्कच्या सांगण्याप्रमाणें बेनेडेटीनें मसुदा लिहून काढला; व त्यानें आपल्या अहवालांत आणखी पुढील गोष्टी नमूद केल्या होत्या:—मेन नदीच्या दक्षिणेला जीं जर्मन संस्थानें होतीं त्यांना संयुक्त संघाचें तत्त्व लागू करण्यास बिझमार्क उद्युक्त होता; व त्या बाबतींत त्यानें केलेल्या योजना पार पाडण्याच्या कामीं फ्रान्सचा पाठिंबा मिळावा म्हणून तर त्याची अत्युत्कट इच्छा होती; बेलजिअमसंबंधानें त्याचें जें म्हणणें होतें तें अगदीं प्रामाणिकपणाचें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं बेनेडेटीनें लिहिलें कीं, दक्षिण जर्मनींतील किल्ले ज्या त्या संस्थानिकांकडेच असावेत असा आग्रह बादशहानें धरल्यामुळें फ्रान्सनें प्रशिआशीं चालविलेलें बोलणें सिद्धा-गेलें नाहीं. रशिआशीं उत्तम दोस्ती ठराविण्याकारितां जनरल मान्टस इफेल यास सेंटपीटर्सबर्ग येथें पाठविलें होतें. तो ह्या वरील मुद्याचा निकाल लागण्यापूर्वीच राशिआ व प्रशिआ या दोन राष्ट्रांमधील ठरलेल्या तहनाम्यावर सह्या व शिक्का मोर्तब करून घेऊन परताहे

आला. या नंतर फ्रान्सच्या मदतीची गरज उरली नाहीं. बेलजिअमच्या संबंधानें चाललेलें बोलणें आतां मुळींच सुटलें व रस काढून घेतलेलें लिंबू जसें फेंकून द्यावें त्याप्रमाणें नेपोलिअनला झुगारून देण्यास बिस्मार्क तयार झाला.

नेपोलिअन याची उतरती कळा.

फ्रान्समधील तिसऱ्या नेपोलिअनच्या शत्रूनीं म्हटलें आहे—आणि हें त्याचें म्हणणें खरें आहे कीं, "या बादशाहाला जी जी म्हणून चुकी करिता येणें शक्य होतें ती तीं त्यानें १८६६ सालीं केली." त्याच्या चुक्यांचें व मसलतींचें प्रायश्चित्त आतां त्याला भोगणें प्राप्त होतें सन १८६५ सालच्या अखेरीस अथपासून इतिपर्यंत प्रिन्स बिस्मार्क यानें आपणांस चांगलेंच चकवलें असें नेपोलिअनच्यो ध्यानांत निःसंशय आलें. प्रत्येक बाबतींत त्याची फजिती झाली होती. मागें त्यानें फ्रान्सच्या नैर्ऋत्येस एकवट झालेलें इटलींचें राष्ट्र स्थापण्याच्या कामीं मदत केली होती. यावेळीं फ्रान्सच्या ईशान्येच्या सरहद्दीवर एकजीव होणाऱ्या जर्मन राष्ट्राची स्थापना, आपल्या हिताविरुद्ध व आपल्या अतिप्रबल इच्छेविरुद्ध करण्याच्या कामीं त्यानें मदत केली होती त्याची मानहानी येथेंच संपली असें नाहीं. अमेरिकेतील यादवी व युनायटेड स्टेट्स सरकारचा फ्रान्सच्या बादशाहास तुम्हीं आपलें सैन्य मेक्झिकोतून परत घेऊन जा अशी हुकुमवजा विनंति केली. हा युनायटेड स्टेट्स सरकारचा हुकुम बादशाहास उशिरांत उशिरा म्हणजे १८६७ च्या वसंत ऋतुपर्यंत अमलांत

आणावयास पाहिजे होता. उत्तम तयार असलेलें २५००० सैन्य या वेळेस फ्रान्सांत परत आणणें खरोखरच फायदेशीर होतें, परंतु ही गाष्ट परराष्ट्राच्या हुकुमानुरूप करावी लागली हीच त्यांत मोठी नाचक्की होती. मेक्झिकोंत जाऊन मोठ्या धाडसाची कामगिरी करण्याकरितां ज्या राजाचें मन त्यानें वळविलें होतें त्याला दिलेलें वचन मोडणें नेपोलिअन यास प्राप्त झालें. याचा परिणाम असा झाला कीं, त्यानें आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तीस मोठा बट्टा आला व लोक ज्याला आज पधरा वर्षें राजांमध्यें अत्यंत धूर्त असें मानीत असत तोच आज लोकांना धरसोड करणारा, शेख महमदी मनोराज्यें करणारा, अब्रूचा चाड नसलेला व व्यवहारचातुर्यशून्य असा वाटूं लागला. त्याला अकालींच म्हातारपण येऊं लागलें त्याला एक अशी व्याधि जडली कीं, तीमुळें त्याला मेहनतीचें काम होईनासें झालें, व त्याच्या पक्षाचे लोक त्यास सोडूं लागले. त्याला चोहोंकडे अपयश आलें, त्याची प्रतिष्ठा डळमळली, व त्याची प्रकृति खालावली. यामुळें देशांतील लोकांचीं मनें अस्वस्थ झालीं. ज्या घराण्यांत तो दुसरा संस्थापक होता त्या घराण्याची पुढें काय वाट होणार याबद्दल स्वतः बादशहालाच काळजी वाटूं लागली. फ्रेंच प्रजेच्या मनांत स्वतःविषयीं व आपल्या घराण्याविषयीं पूर्ववत् आदर राहावा असें आपणास कांहीं तरी केलें पाहिजे असें त्यास वाटूं लागलें. खळबळ उडवून देणारें एखादें काम हातीं घ्यावें म्हणून तो तें शोधूं लागला. त्याची दृष्टि लक्झेंबर्गकडे गेली. लक्झेंबर्ग हा प्रांत हालंडच्या राजाचा होता. लक्झेंबर्गचा किल्ला सर्व यूरोपांत अत्यंत बळकट आहे. हाहि हालंडच्या

राजाचाच, परंतु जर्मन संयुक्त संस्थानसंघाचा हा एक भाग म्हणून या किल्ल्याचें संरक्षण सन १८६६ पर्यंत प्रशिअन सैन्य करीत असे. ह्या डचीचें क्षेत्रफळ ९९८ चौरस मैल होतें. ही डची फ्रान्सा-कडे द्यावी अशाविषयीं फ्रान्सच्या बादशाहानें हालंडच्या राजाशीं बोलणें सुरूं केलें.

बिझमार्क फ्रान्सला लक्झेंबर्ग मिळण्याच्या आड येतो.

सौदा तर ठरला, बिझमार्कला हा बादशाहाचा बेत ठाऊक होता व त्याला त्यानें विरोधहि केला नव्हता. तथापि ठरल्याप्रमाणें ती डची फ्रान्सच्या ताब्यांत जाण्याच्या अगोदर बिझमार्क यानें बादशा-हास अवचित् कळविलें कीं, ही गोष्ट होणार नाहीं. गतवर्षी बोलणीं चाललीं असतांना बिझमार्कनें स्वतः लक्झेंबर्ग फ्रान्सला तोडून देऊं असें सुचविलें होतें, हें अगदीं खरें. १८६६ सालीं उत्तर जर्मन संस्थानसंघांत लक्झेंबर्गचा किल्ला प्रशिअन शिपायांच्या संरक्षणाखालीं होता प्रशिअन शिपाई काढावयाचे नाहींत व नेपोलिअन बादशा-हाचा बेत साधूं द्यावयाचा नाहीं, असा बिझमार्क यांचा निश्चय होता. त्याप्रमाणें त्यानें पॅरिस येथें कळविलें कीं, लक्झेंबर्ग फ्रान्सला जोडला जाणें अगदीं अशक्य आहे आणि आपल्या म्हणण्याला बळकटी यावी म्हणून प्रशिआनें जर्मनीच्या दक्षिण संस्थानांबरोबर जे तह केले होते ते बिझमार्क यानें त्याच वेळीं प्रसिद्ध केले. या तहांप्रमाणें फ्रान्स बरोबर युद्धप्रसंग आल्यास या संस्थानांना आपलीं सैन्यें प्रशिआच्या मदतीस देणें भाग होतें.

ज्या योजनेची गेल्या वर्षी बिझमार्कनें स्वतः अंतःकरणपूर्वक शिफारस केली होती व जिला त्यानें खासगी रीतीनें संमति दिली होती ती अशा रीतीनें हाणून पाडून बिझमार्कनें नेपोलिअनची व आपली मैत्री साफ तुटली आहे असें प्रत्यक्ष जगाच्या नजरेस आणून दिलें. त्याला फ्रान्सपासून आतां जास्त कांहींएक मिळवावयाचें नव्हतें. जर्मनींतील संस्थानांचे हितसंबंध दृढ झाले नव्हते ते चांगले दृढ करण्या-करितां प्रशिआला लवकरच आपल्या 'तरवार व रक्तपात' या आवडत्या तत्त्वाचा अंगीकार करावा लागेल या गोष्टीची त्याला जाणीव होती. लक्झेंबर्ग फ्रान्सला तोडून द्यावें या पुढें आलेल्या सूचनेनें जर्मन लोकांच्या मनाचा अत्यंत क्षोभ होईल व फ्रान्स असें करण्यांत प्रशिआवर चढाई करूं पाहात आहे तेव्हां काय होईल तें होवो, या कामांत फ्रान्सला मागें हटविलेंच पाहिजे, असा लोकांचा निश्चय होईल हेंहि तो जाणून होता फ्रान्सची तयारी नाहीं हें त्याला माहीत होतें. जर्मन सैन्य एका पंधरवड्यांत युद्धास अगदीं सज्ज करणें शक्य होतें. बिझमार्कनें स्वतःशीं असा युक्तिवाद केला:—"मीं काय वाटेल तें म्हटलें असेल; ती परिस्थिति आतां राहिली नाहीं. त्या परिस्थितींत वाटेल तीं वचनें दिलीं असतील; परंतु लक्झेंबर्गचा किल्ला सर्व यूरोपांत अत्यंत बळकट आहे. फ्रँको—जर्मन सरहद्दीवर तो असल्यानें सैन्याच्या योजनेच्या कामीं अत्यंत महत्त्वाचा आहे. असा किल्ला ज्याच्याशीं लवकरच युद्धप्रसंग येणार अशा आपल्या शेजा-ऱ्या राष्ट्राच्या ताब्यांत जाऊं न देणें शक्य असल्यास तो जाऊं देणें

गैरमुत्सद्देगिरीचें होणार नाहीं काय ? किल्ल्याची जागा फार महत्त्वाची आहे ह्या विचार मनांत येऊन या योजनेला राजानें संमति देऊं नयेच असा सल्ला त्याला देण्याच ठरविलें. त्यांतल्यात्यांत राजा कोणत्याहि रीतीनें वचनबद्ध नव्हता.

ऑस्ट्रिआ आणि हंगेरी.

अशी एकंदर स्थिति असतां यूरोपच्या राजकारणांत भाग घेण्यास ऑस्ट्रिआ पुनः पुढें आला. इच्छेविरुद्ध करावया लागलेल्या युद्धाची जी अखेर झाली तीमुळें बादशाहा फ्रान्सिस जोसेफ याची मोठी निराश झाली होती, तरी युद्ध संपल्यावर ऑस्ट्रिआ व हंगेरी यांच्यामधील भांडणाचें मूळ अगोदर काढून टाकावयाचें, असा बादशाहानें निश्चय केला होता. कारण युद्धाच्या अगदीं आणीबाणीच्या वेळीं या भांडणाच्या पायीं हंगेरिअन प्रजेनें जसें मनःपूर्वक साहाय्य करावें तसें केलें नव्हतें. म्हणून फ्रान्सिस जोसेफ यानें ता. ३० आक्टोबर १८६६ रोजीं कौंट बेऊस्ट यास परराष्ट्रीय मंत्री केलें व मॅग्यार्स लोक अगदीं स्वच्छ मनानें आपले मित्र बनतील अशी वाटेल ती तोड काढण्यास तुम्हांस पूर्ण मुभा आहे असें त्यास सांगितलें. कौंट बेऊस्ट हा पूर्वी सॅक्सनीच्या राजाचा मंत्री होता व त्याच्या बुद्धिसामर्थ्याबद्दल त्याची सर्व युरोपांत ख्याति होती. त्यानें या नव्या कामांत आपल्या सर्व सामर्थ्याचा उपयोग केला. प्रथम त्यानें फ्रान्सबरोबर व्यापारी तह केला, नंतर निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांबरोबर खल करून

ता. २ फेब्रुवारी १८६७ रोजीं डायेटची खास सभा बोलाविली. ता. ७ रोजीं हंगेरीला स्वतःचा कारभार पाहाण्याचा हक्क दिला आहे असे त्यानें जाहीर केलें. ता १७ रोजीं बादशहानें हंगेरीकरितां निराळेंच एक मंत्रिमंडळ करून कौंट अँड्रेसी यास मुख्य प्रधान नेमिलें सर्व कांहीं उत्तम रीतीनें पार पडलें. लोकांच्या उत्साहाला अमर्याद भरतें आलें, दिलसफाई अगदीं पूर्ण झाली ता. ७ जून रोजीं बादशहा व बादशहीण यांस प्रेस्ट येथें राजा व राणी म्हणून राज्याभिषेक झाला.

लक्झेंबर्गविषयीं उपस्थित झालेला प्रश्न सुटला.

या सलोख्याची उभारणी कोणत्या पायावर केली होती हें १८६७ सालच्या प्रारंभींच समजलें असल्यामुळें, १८६६ सालच्या पावसाळ्यात नुकती मानहानि झाली असतांहि, ऑस्ट्रिआ ताजीतवाना होऊन १८६७ च्या वसंतऋतूंतच युरोपच्या राजकारणांत आपली योग्य जागा पटकावण्यास कसा पुढें सरसावला हें सहज लक्षांत येईल. लक्झेंबर्ग बेल्जिअमला द्यावा व त्याबद्दल बेल्जिअमच्या रस्त्यांतील एक लहानसा भाग फ्रान्सला द्यावा एवढीच व्यवहार्य सूचना ऑस्ट्रिआनें केली. ह्या योजनेनें अडचितखोर फ्रान्सचें समाधान होऊन बर्लिन येथेंहि ती मान्य झाली असती. ह्या व्यवहारानें बेल्जिअमच्या राजाचा सर्वांत जास्त फायदा झाला असता; परंतु त्यानेंच अगदीं ऐनवेळीं "मी फ्रान्सला माझ्या रयतेचा कोणताहि प्रांत देण्यास तयार नाहीं" असें म्हणून या योजनेच्या मुळावरच घाव घातला. बिस्मा-

कैंच्या दुटप्पी वर्तनानें चवताळून जाऊन तिसरा नेपोलिअन यानें आपणास यूरोपची सहानुभूति मिळेल असे आधार पुढें करून बर्लिन येथून केलेलें आव्हान स्वीकारण्याची तयारी केली. लक्झेंबर्गच्या किल्ल्यावर आपले शिपाई ठेवून त्याचें संरक्षण करण्याचा हक्क प्रशिआस नव्हता यांत बिलकुल संशय नाहीं. लक्झेंबर्ग या नांवाच्या प्रांताचा संबंध जर्मनीशीं कसा आला असेल तो असो. या प्रांताची बहुतेक प्रजा जर्मन नव्हती; इतकेंच नाहीं, तर त्या लोकांना जर्मन राहणीहि मुळींच आवडत नव्हती. म्हणून प्रशिअन शिपायांनीं लक्झेंबर्गचा किल्ला खालीं केलाच पाहिजे असा तिसरा नेपोलिअन यानें आग्रह धरिला व आपल्याप्रमाणें अंमलबजावणी व्हावी म्हणून युद्धाच्या तयारीसहि तो लागला. हें त्याचें करणें अगदीं वाजवी होतें. नंतर या प्रश्नाचा निकाल लंडन येथें एक राष्ट्रांची सभा भरून तिनें लावावा अशी सूचना पुढें करून सेंटपीटर्सबर्गचें सरकार या लढ्यांत पडलें. ज्या दोन राष्ट्रांचा मुख्य संबंध या प्रश्नाशीं होता, त्यांनीं ही नवीन सूचना कांहीं विशेष अटींवर मान्य केली. ता. ७ मे रोजीं ही सभा लंडन येथें भरली. ता.११ रोजीं वादविवाद संपला व तहनाम्यावर सह्या झाल्या. यावरून लक्झेंबर्ग हा तटस्थ प्रांत आहे असें यूरोपांतील मुख्य राष्ट्रांची हमी मिळून जाहीर झालें. प्रशिआनें आपलें सैन्य काढून घ्यावयाचें होतें व हालंडच्या राजानें किल्ल्याचा तट जमीनदोस्त करून लक्झेंबर्ग शहर तटबंदी शिवाय ठेवण्याचा पतकर घेतला होता. ह्या अटींची यथायोग्य रीतीनें अंमलबजावणी झाली.

मित्र जोडण्याच्या कामीं नेपोलिअनचे प्रयत्न.

लक्झेंबर्ग संबंधानें वर लिहिल्याप्रमाणें निकाल लागला. हा राजकारणदृष्ट्या फ्रान्सला थोडासा विजयच होता. लष्करीदृष्ट्या तर हा फ्रान्सचा मोठा फायदाच झाला. कारण या निकालामुळें फ्रान्सबरोबर युद्ध सुरू झालें असतां प्रशिआला चांगलाच उपयोगी पडला असता असा किल्ला त्याच्या ताब्यांतून गेला. तथापि बिस्मार्कनें आपणांस किती कमालीचें फसविलें होतें हें आतां, बहुतकरून प्रथमच, तिसऱ्या नेपोलिअनच्या चांगलें ध्यानांत आलें. दुसऱ्यानें आपणांस फसवावें हें कोणालाहि आवडत नाहीं. व आपली फसवणूक झाली असें समजल्यावर फ्रान्सच्या बादशाहापेक्षां जास्त उघड रीतीनें मनाचा संताप व्यक्त करणारेच लोक पुष्कळ. परंतु नेपोलिअनच्या अंगीं पुष्कळसे दोष होते तरी मितभाषीपणा ही एक त्याला देणगी होती आणि त्या बेळेपासून पुढें फ्रान्सला ज्यांच्या मैत्रीपासून मदत होईल अशांची दोस्ती संपादण्याच्या कामास तो लागला. ह्याच उद्देशानें त्यानें राणीस बरोबर घेऊन साल्झबर्ग येथें ऑस्ट्रिआचा बादशाहा व त्याची राणी यांची भेट घेतली आणि नोव्हेंबरमध्यें त्याच बादशाहाच ट्युलेरीज येथें स्वागत केलें. याच भेटींत ऑस्ट्रिआचा वकील प्रिन्स मेटर्निक याच्यावर नेपोलिअनची फार मर्जी बसली. प्रिन्स मेटर्निक यानें नेपोलिअनच्या बेताला अंतःकरणपूर्वक मदत करण्याचें कबूल केलें. फ्रान्स व ऑस्ट्रिआ या उभयतांचीहि इच्छा ऑस्ट्रिआला जर्मनींतील पूर्वप्रतिष्ठा पुनः प्राप्त व्हावी अशी होती.

या धोरणाच्या मार्गांत येणारी एकच अडचण होती ती अडचण म्हणजे हंगेरिअन मंत्रिमंडळाचा विरोध. हंगेरिअन मंत्रिमडळाच्या विरोधाचीं कारणें अशीं होतीं:—ऑस्ट्रिआला आतां जर्मन राष्ट्र असें म्हणणें यथार्थ नव्हतें. ऑस्ट्रिअन राज्याच्या मंत्रिमडळांत हंगेरीला आतां ऑस्ट्रिआच्या बरोबरीचा दर्जा मिळाला होता; आणि ऑस्ट्रिआच्या संयुक्त राज्याकरितां जर्मनींतील ऑस्ट्रिआचा पूर्वीचा दर्जा पुनः मिळविण्यांत हंगेरीचा फायदा नव्हता व तें करण्याची हंगेरीची इच्छाहि नव्हती. कारण तसें घडून आलें असतें, तर हंगेरीचें वजन कमी झाल्याशिवाय कधींहि राहिलें नसतें. हंगेरीचा असा विरोध असतां दोन्ही बादशाहा व त्याचे मंत्री यांची मैत्री जास्त जास्त दृढ होत गेली व प्रशिआशीं युद्ध उद्भवल्यास मदतीविषयीं परस्परांनीं वचनेंहि दिलीं. हे स्नेहसंबंध इतके निकट झाले कीं, १८७० च्या हिवाळ्यांत कस्टोझाचीं लढाई जिंकलेल्या आर्चडयूक आलबर्टनें पॅरिस शहरास भेट दिलीं व युद्ध सुरू झालें तर स्वारीची योजना तयार ठेवलेली असावी, म्हणून एका फ्रेंच सेनापतीनें व्हिएन्नाला भेट दिली.

फ्रान्सच्या बादशाहाचें रोमबंसंधीं धोरण.

इटलीशीं सख्य करण्यासहि नेपोलिअन तितकाच उत्सुक होता. सन १८६७ च्या नोव्हेंबरांत गॅरिबाल्डी यानें हुकुमाशिवाय रोम हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. तो केला तो नसता तर फ्रान्स व इटली यांची उत्तम समजूत होऊन तह ठरणें शक्य होतें. परंतु मेंटनाची लढाई, नेपोलिअनच्या अत्यंत वाईट सेनापतींपैकीं एक डयू

फेली, यानें वापरलेली उपमर्दकारक भाषा, फ्रेंच असेंब्लींत एम्. रुहर यानें काढलेले उद्गार, आणि फ्रेंचांचा रोम येथें पुनः शिरकाव ह्या सर्व गोष्टींनीं एकमेकांच्या मनांत अप्रीति वाढून उभय राष्ट्रांचा सलोखा होणें फार दिवस असंभाव्य झालें. तथापि अखेरीस ऑस्ट्रिअन मंत्री कौंट बेऊस्ट हा मध्यें पडला व त्याच्या मदतीनें फ्रान्स व प्रशिआ यांच्यामध्यें युद्ध जुंपल्यास, ऑस्ट्रिआ व इटली यांनीं एकमेकांच्या विचारानें वागून स्वसंरक्षण करावें अशी तोड निघाली. ही योजना फ्रान्सच्या बादशाहास ठाऊक झाली होती

यावरून असें दिसून येईल कीं, १८७० साल लागलें तरी फ्रान्सला दोस्तराष्ट्राचा आधार म्हणजे नुसता पोकळ आधारच होता. फ्रान्सनें रोम शहरावर तावा तसाच चालू ठेवल्यामुळे इटलीशीं चढाईकरितां व स्वसंरक्षणार्थ दोस्ती होणें आजपर्यंत घडलें नाहीं व पुढेंहि ही स्थिति अशीच राहणार होती. दुसरीकडे ज्या गोष्टींना हंगेरीचा विरोध होता त्या गोष्टी मिळण्याकरितां युद्धास हात घालण्यास ऑस्ट्रिआहि माघार घेणारच म्हणून फ्रान्सची या वेळची स्थिति म्हणजे एकलकोंड्या राष्ट्राच्या स्थितीसारखी होती. ऑस्ट्रिआचा बादशाहा व त्याच्या दरबारचे लोक यांची व इटलीच्या राजाची फ्रान्सविषयीं सदिच्छा हाच काय तो फ्रान्सला इतर राष्ट्रांचा आधार होता.

बिझमार्क याचें धूर्ततापूर्ण धोरण.

दरम्यान् आपल्या धोरणामुळें सन १८६६ सालीं प्रशिआला जी प्रतिष्ठा मिळाली होती ती दृढ करण्याच्या कामांत बिझमार्क गुंतला

होता. युद्धानंतर गेल्या साडेतीन वर्षांत त्यानें सर्व जर्मनीकरितां एक 'जकात पार्लमेंट' स्थापिलें होतें. या पार्लमेंटाचें रूपांतर पुढें मेन नदीच्या दक्षिणेकडील व उत्तरेकडील संस्थानांच्या प्रतिनिधींच्या राष्ट्रीय सभेंत होईल अशी त्याला आशा होती. बव्हेरिआ, सॅक्सनी, वर्टेंबर्ग आणि बॅडेन यांची लष्करी व्यवस्था त्यानें प्रशिआच्या लष्करी व्यवस्थेशीं मिळवून घेऊन अगदीं एक जीव करून टाकली होती. बिस्मार्कचा प्रख्यात सहकारी व प्रशिआचा युद्धमंत्री फॉनरून यानें ज्या बुद्धिबलानें प्रशिअन सैन्य सर्व यूरोपांत मोठें भयंकर करून सोडलें होते तें बुद्धिबल रून यानें नव्या जर्मन सैन्याची सुव्यवस्थित रचना करण्याकडे खर्च केलें होतें. सन १८६६ च्या मोहिमींत जे दोष आढळून आल होते ते काढून टाकले होते; नवीं शस्त्रेंही नीड्ल गनपेक्षांहि सुधारलेलीं होतीं. संस्थानांच्या सैन्यांत वापरण्यास सुरुवात केली होती. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, युद्धाला सैन्य फार झटपट सज्ज व्हावें या गोष्टीकडे फॉनरून यानें फार काळजीपूर्वक लक्ष दिलें होतें फ्रान्स बरोबर युद्ध सुरू झाल्यास त्या राष्ट्राचें सैन्य प्रथम रणांगणांत उतरेल, त्याला फार मोठा फायदा होणार होता फ्रेंच सरहद्दीला फारच जवळ अशा जागावर खूप सैन्य जमविण्याची आवश्यकता पडेल ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारी रेलवे मार्गाची मांडणी करून त्याचें काम चालविलें होतें. तावडतोब युद्ध करावयाचें असतें तर जेवढी सिद्धता असावयास पाहिजे होती तेवढी १८७० सालच्या आरंभाला जर्मनीची झाली होती.

फ्रान्स व जर्मनी यांची तुलनात्मक परिस्थिति.

जर्मनींतील संस्थानांची चांगली एकी होऊन ती टिकण्याकरितां कांहीं बाबतींत युद्ध होणें जवळ जवळ अवश्य झालें होतें, निदान इष्ट तरी खास होतें. ज्या गोष्टींत एकजीव करून टाकला होता असें वर म्हटलें आहे तो एकजीव बरीचशी घासाघिस झाल्याशिवाय झाला नव्हता. प्रशिआशीं नमतें घेणें, अगदीं नव्या अशा चालीरीति स्वीकारणें, ज्या लोकांशीं आपण १८६६ सालीं लढलों त्यांच्याशीं पूर्णपणें मिसळून जाणें–ह्यांत त्यांच्या मतें केवळ राज्य करणारांचाच फायदा होता. ह्या गोष्टी लहान संस्थानांच्या अंगवळणीं पडल्या नव्हत्या प्रशिआचे व आपले हितसंबंध अगदीं एक आहेत, ही गोष्ट अजून त्यांना चांगली पटली नव्हती. ही त्यांची समजूत फक्त युद्धानेंच दूर होईल असें बर्लिन येथें वाटत होतें. हें युद्ध करण्यांत सर्वांचें हित सारखेंच आहे व तें सर्वांचाच जो शत्रु त्याच्याविरुद्ध करावयाचें आहे अशी जर्मन जनतेची, व हें युद्ध केवळ स्वरक्षणार्थ आहे अशी इतर देशांची समजूत करून देण्याचा आटोकाट प्रयत्न बर्लिन येथील कूट करणार होतें. अशा प्रकारच्या युद्धानें ज्या लहानसहान दुराग्रहांमुळें एकमेकांमध्यें घासाघीस होत होती ते दुराग्रह व परस्परांविषयींचा मत्सर पार नाहींसा होणार होता. या युद्धांत जर्मनी विजयी झाल्यास प्रत्येक जर्मन संस्थानाची कीर्ति सारखीच होणार होती; व केवळ नांवाला नव्हे तर प्रत्यक्ष एक राष्ट्र झाल्यानें सन १८४८ पासून ज्या भावनामय आकांक्षांनीं प्रत्येक जर्मनाचें अंतःकरण प्रेरित झालें होतें त्या आकांक्षा सफल होणार होत्या.

प्रशिआचा शास्ता पहिला विल्यम याच्याविषयीं विशेष कांहीं सांगावयाचें नाहीं. तो मोठा प्रामाणिक होता. त्यानें जागूनबुजून अप्रामाणिक मसलतींना कधींहि उत्तेजन दिलें नसतें परंतु बिझमार्क, फॉनरून, आणि मोल्टके हे ज्या कूटाचे सूत्रधार होते त्या कूटाच्या आधीन तो असल्यामुळें त्याला स्वमतानें एखादी गोष्ट करण्याची संधीच मिळणार नव्हती. कसेंहि करून त्याला आपलासा करून घ्यावयाचा हाच या त्रयीचा प्रयत्न होता सन १८७० चें युद्ध या कूटाच्या कृतीमुळें नव्हे तर फ्रान्सच्या महत्त्वाकांक्षेमुळें करणें प्राप्त झालें असें राजाच्या मनांत कसें भरवून दिलें याची हकीगत आतां द्यावयाची आहे

सन १८६६ सालापासून तिसऱ्या नेपोलिअनची इतकी नापत झाली असतांहि फ्रान्सची इभ्रत अबाधित आहे असें तो म्हणतच होता. जणूं काय फ्रान्स हें राष्ट्रच असें होतें कीं, त्याच्या म्हणण्याविरुद्ध चकार शब्द काढण्याची कोणाचीहि छाति नव्हती. आपली आजपर्यंतची प्रतिष्ठा कायम ठेवण्याचा हाच एक मार्ग आहे असें त्यास वाटलें. त्यानें ज्या घराण्याची स्थापना केली होती त्याचें पुढें काय होणार याची त्याला मोठी चिंता लागली होती. आपली राजकारणामध्यें कशी व किती फजिती झाली होती हें आपल्या चाणाक्ष प्रजेपासून छपवून ठेवणें त्याला अगदीं अशक्य होतें. युनायटेड स्टेट्स व प्रशिआ या दोघांनींहि त्याची चांगली फजिती केली होती व ही गोष्ट त्याच्या व फ्रेंच लोकांच्या मनाला लागून राहिली होती. त्याला

अकालीं म्हातारपणाचें दौर्बल्य आलें, त्याचा त्रासदायक रोग जडला होता आणि गादीवर आल्यावर तो आरंभीं राज्यकारभारांत जसें स्वतः मन घालीत असल्याबद्दल त्याची ख्याति होती तसें तो आज बरेच दिवस घालीनासा झाला होता, ह्या गोष्टी पुनः एकदा सांगणें जरूर आहे. सन १८६९ च्या मे महिन्यांत फ्रान्सांत झालेल्या निवडणुकींच्या वेळीं पॅरिस, लायन्स, मार्सेल्स व इतर मोठ्या व्यापारी शहरांनीं नेपोलिअनच्या एकतंत्री राज्यकारभाराच्या पद्धतीबद्दल अगदीं स्पष्ट नापसंती व्यक्त केली होती. सन १८६९ च्या नव्या पार्लमेंटांत पक्षभेद ठेवून मह त्वाच्या प्रसंगीं एकाच बाजूला मतें दिलीं असतीं अशाच सभासदांची संख्या अधिक होती. एकजुटीनें वागणाऱ्या या निराळ्या पक्षांतील सुप्रसिद्ध मुत्सद्यांच्या फार मोठ्या समुहापुढें नेपोलिअन याला मान वांकवावी लागली. ता. २७ जुलई रोजीं आजपर्यंत त्यानें आपलीं मंत्रिमंडळें ज्या तत्त्वावर बनविलीं होतीं, तें तत्त्व कायद्याच्या अर्थाला अनुसरून बदलेलें. आगस्ट व सप्टेंबर या महिन्यांत सेनेटच्या मदतीनें मंत्र्यावर असणाऱ्या जबाबदारीचें तत्त्व त्यानें सुरूं केलें.

राष्ट्रमताची गणति.

ता. २९ नोव्हेंबर रोजीं राजा या नात्यानें त्यानें केलेल्या भाषणांत 'मला स्वतंत्रतेचें तत्त्व कबूल आहे, पण ही स्वतंत्रता व्यवस्थेच्या पायावर रचलेली असली पाहिजे' असें जाहीर केलें. ता. २७ डिसेंबर रोजीं सनदशीर पद्धतीप्रमाणें त्यानें आपलें पहिलें

मंत्रिमंडळ नेमून उदारमतवादी पक्षांतील पुढारी एमिल आलिव्हायर यास मुख्य प्रधान केलें. सन १८७० मार्च ता २८ रोजीं नवीन मंत्रिमंडळानें सेनेट सभेपुढें आपल्या नवीन शासनपद्धतीची योजना मांडली. ही योजना अखेरीस सर्व राष्ट्रापुढें पसंतीकरितां जावयाची होती. ता. २० एप्रिल रोजीं ही योजना सेनेटनें पसंत केली आणि ता. ८ मे रोजीं फ्रान्सच्या लोकांना नवीन शासनपद्धतीवर व १८६० पासून प्रागतिक धोरणानें केलेल्या सुधारणांवर अनुकूल अगर प्रतिकूल मतें देण्याविषयीं विनंति केली ७३,५०,१४२ अनुकूल व १५,३८, ८२५ प्रतिकूल अशीं मतें पडून राष्ट्राचें मत नवीन योजनेला निश्चितपणें अनुकूल आहे असें दिसून आलें. परंतु बादशाहाच्या अंतःकरणांत वाटलेलें समाधान क्षणिक होतें. मतपत्रिकांची निवडानिवड केली तेव्हां असें दिसून आलें कीं, ५०,००० शिपाई व खलाशी यांनीं योजनेच्या विरुद्ध मतें दिलीं होतीं ही गोष्ट बाहेर पडल्यावर बादशहाच्या मनांत आपलें सिंहासन कायम राहाणार किंवा नाहीं याविषयीं नानाप्रकारच्या शंका येऊं लागल्या व धाडसाच्या धोरणाचा अवलंब करण्याकडे त्याची प्रवृत्ति होऊं लागली.

होहेंझोलर्न घराण्याची उमेदवारी.

फ्रान्सचा अधिकार गाजविण्यास व राजकारणांत जय मिळविण्यास नेपोलिअनच्या मतानें योग्य अशी संधि लवकरच आली. जवळ जवळ दोन वर्षें जनरल प्रिम हा स्पेन देशांचा मुख्य अधिकारी

होता. दुसरी इसाबेला स्पेन देश सोडून गेल्यावर रिकामी पडलेली गादी यूरोपांतील मोठ्या घराण्यांपैकीं एखादा पुरुष स्वीकारण्यास तयार झाला तर पहावें, म्हणून जनरल प्रिम प्रयत्न करीत होता त्याला एकामागून एक अशीं नकारार्थी उत्तरें आलीं. सन १८६९ च्या उन्हाळ्यांत होहेंझोलर्न घराण्याच्या सिग्मॅरिजेन शाखेचा रुमानिआच्या त्या वेळच्या राजाचा भाऊ प्रिन्स लिओपोल्ड याच्यापाशीं जनरल प्रिम यानें ती गोष्ट काढून पाहिली. जातां जातां येथें हें सांगितलें पाहिजे कीं, हें बोलणें लावण्यांत फ्रान्सची अवमानना करण्याची प्रिम याची इच्छा नव्हती. कारण जरी प्रिन्स लिओपोल्ड हा होहेंझोलर्न घराण्यापैकीं होता तरी त्याचा प्रशिआच्या राज्यकर्त्यांशीं असलेला संबंध फारच जुना व दूरचा होता; व अलीकडे बॉहार्ने घराण्याच्या बाजूनें त्याचा तिसऱ्या नेपोलिअनशीं संबंध येऊन भिडला होता. दुसऱ्या पक्षीं हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, सिग्मॅरिजेन शाखेची मैत्री प्रशिआच्या हल्लींच्या राज्यकर्त्या कुटुंबाशीं जास्त प्रेमाची होती. प्रिन्स लिओपोल्ड याचा बाप किंग विल्यम याचा पहिला मुख्य मंत्री होता; व असें म्हणतात कीं, त्यानेंच बिझमार्क याला मुख्य प्रधानाची जागा द्यावी असें प्रथम राजास सुचविलें. जरी जनरल प्रिम याची १८६९ सालीं प्रिन्स लिओपोल्ड याच्याशीं चाललेली वाटाघाट गुप्तपणें चालली होती, तरी ती वार्ता फ्रेंच बादशाहाच्या कानीं लवकरच गेली व १८६९ च्या उन्हाळ्यांत बेनेडेटी यास ह्या वार्तेंत तथ्य किती आहे याची बर्लिन येथें चौकशी करावी असें सांगण्यांत आलें. कौंट बिझमार्क यानें

सरळ उत्तर असें दिलें कीं, स्पेनच्या गादीला प्रिन्स लिओपोल्ड हा एक उमेदवार आहे असें बर्लिन येथें कधींहि बोलण्यांत आलें नव्हतें. हें उत्तर समाधानकारक वाटलें; व पुढें बारा महिने या गोष्टीचा खल न झाल्यामुळें तो बेत रहित झाला असें वाटलें.

तथापि १८७० च्या वसंतऋतूंत पूर्ववत् गुप्त रीतीनेंच ही वाटाघाट पुनः सुरू झाली. या वाटाघाटीस यावेळीं दृश्यरूपहि आलें, तें असें:—स्पेनच्या रिकाम्या पडलेल्या गादीवर होहेंझोलर्न—सिग्मॅरिंजेनचा प्रिन्स लिओपोल्ड यानें बसावें. या सूचनेस कार्टीज यांची अनुमति असेल तर तो गादी स्वीकारण्यास तयार आहे, अशी ता. ३ जुलई रोजीं पॅरिस शहरीं बातमी पसरल्यामुळें सर्व लोक आश्चर्यचकित झाले. साहजिक पॅरिस शहरांत रागाचें दळ उठलें सन १८६६ सालापासून फ्रेंच मुत्सद्यांचे प्रयत्न हाणून पाडण्याचा प्रशिआनें एकसारखा सपाटा चालविला होता, त्यामुळें प्रशिआच्याविरुद्ध फ्रेंच लोक पूर्णपणें चवताळून गेले होते. तशांत हा आपला शेजारी प्रशिआ लॅटिन जातीच्या लोकांनीं भरलेल्या देशाच्या गादीवर एक शत्रू आणून बसणार आहे ही बातमी आली. तिचा फायदा घेऊन फ्रेंच लोकांनीं ह्या नवीन उपक्रमाबद्दल प्रशिआची सपाटून नालस्ती केली. ह्या वेळीं ड्यूक ऑफ ग्रॅमांट हा फ्रान्सचा परराष्ट्रीय मंत्री होता. तो व्हिएन्ना येथील आपलें राजकारणासंबंधीं काम संपवून नुकताच परत आला होता. तेथें त्याला फ्रान्स व ऑस्ट्रिआ यांची दोस्ती दृढ होणार अशी बळकट आशा वाटून तो अगदीं हुरळून गेला होता.

या मंत्र्यानें दिलेल्या सल्ल्यावरून ता. ६ जुलई रोजीं फ्रेंच सरकारानें कायदेमंडळाला असें जाहीर केलें कीं, " स्पेनच्या पांचव्या चार्लसच्या गादीवर आपल्या संस्थानिकांपैकीं एकास बसविण्याचा प्रयत्न सिद्धीस गेल्यास तें फ्रान्सच्या हितसंबंधास व इभ्रतीस मोठ्या धोक्याचें होणार आहे." बादशाहाच्या अध्यक्षत्वाखालीं मंत्रिमंडळाची एक सभा भरली होती, तींत खल होऊन हें अविचारी भाषण तयार केलें गेलें, व तें केल्यामुळें शांतता राखणें कठीण झालें. या भाषणानें दोन्ही राष्ट्रांचा क्षोभ सारखाच वाढणार होता व त्यामुळें प्रशिआच्या राजाला माघार घेणेंहि कठीण झालें होतें.

मार्शल लेबूफ.

तिसऱ्या नेपोलिअनला युद्ध पाहिजे होतें असें आपण क्षरभरहि मनांत आणितां कामा नये; परंतु त्याच्या मनाची स्थिति अशी कांहीं झाली होती कीं, हळू हळू तो युद्ध करा असें म्हणणाऱ्यांच्या तडाक्यांत सांपडणार होता. ह्याचीं कारणें पुढें लवकरच सांगण्यांत येतील. प्रशिआची युद्धाची तयारी किती जय्यत होती व फ्रान्सची युद्धाची तयारी कशी नव्हती याविषयीं त्याची फसगत झाली असेल असें म्हणणें मनास पटणें फार कठीण आहे. कर्नल स्टोफेल हा बर्लिन येथें फ्रान्सचा लष्करी वकील म्हणून होता. त्याच्या अहवालावरून प्रशिआची तयारीची कल्पना त्याला असलीच पाहिजे. फ्रान्सच्या तयारीची माहिती करून घेण्यास त्याच्या खरोखरीच मनांत असतें तर त्याच्याजवळ पुष्कळ साधनें होतीं, अलीकडे कांहीं दिवस

बादशहा राज्यांतील निरनिराळ्या खात्यांच्या कामांत पूर्वीप्रमाणें मन घालीत नसे, हें मागें एकदां सांगितलेंच आहे. त्याचा ज्यांच्यावर पूर्ण विश्वास होता असे अधिकारी त्यानें नेमिले होते व ते त्यास जें सांगण्याचें ठरवितील तें तो खरें मानीत असे. त्याचा युद्धमंत्री मार्शल लेबूफ हा बादशहापेक्षां एकाच वर्षानें लहान होता व तो अत्युत्तम अधिकारी आहे असा त्याचा लौकिक होता. जनरल स्टॉफवर याची दोन वर्षे चाकरी झाल्यावर सन १८३२ त त्याला तोफखान्यावर नेमिलें; १८३७ त कान्स्टन्टाइनवर केलेल्या पहिल्या स्वारींत त्यानें जनरल स्टॉफमध्यें चाकरी केली होती व १८४१ पर्यंत तो आफ्रिकेंत राहिला होता. नंतर त्यानें फ्रान्समध्यें वेगवेगळ्या जबाबदारीच्या जागांवर १८५२ पर्यंत काम केलें आणि मग त्याची कर्नलच्या जागेवर बढती झाली. क्रिमियन युद्धांत प्रथम तोफखान्यावरील प्रमुख अधिकारी व मग सेवॅस्टपूल येथें तोफखान्यावरील ब्रिगेडिअर जनरल यांचीं कामें करून त्यानें चागली कीर्ति मिळविली होती. तें युद्ध संपल्यावर त्यास गार्डाच्या तोफखान्यावरील मुख्य केलें व तुकडीचा जनरल हा हुद्दाहि त्यास मिळाला. सालफेरिनो येथील तोफखान्यावर त्याची हुकमत होती आणि ऑस्ट्रिअन सैन्याच्या मध्यावर त्यानें कुशलतेनें हल्ला चढविला म्हणूनच त्या दिवशीं फ्रेंच लोकांची फत्ते झाली. सन १८६६ च्या सप्टेंबरांत बादशहानें व्हेनेशिआ इटॅलिअन वकिलांच्या स्वाधीन करण्याचें काम त्याच्यावर सोंपविलें होतें सन १८६९ च्या जानेवारींत त्यास पहिल्या पलटणीचा सेनापति नेमिलें.

त्यावेळीं या पलटणीचें मुख्य ठाणें ट्रुइस येथें होतें व आगष्टांत मार्शल नील वारल्यावर युद्धमंत्र्याच्या जागेवर त्याची नेमणूक झाली. याप्रमाणें त्याच्या कामगिरीचा आजपर्यंतचा लौकिक चांगला होता. परंतु प्रत्यक्ष क्रियेची आवश्यकता उत्पन्न झाली म्हणजे तिच्या कसाला मोठे म्हणून नांवाजलेले लोक फार थोडे उतरतात असें इतिहासावरून दिसून येतें. वर सांगितलेंच आहे कीं, मंत्रिमंडळाची सभा जुलई ता. ६ रोजीं भरली होती. त्या सभेत लेबूफ यानें गंभीरपणें सांगितलें कीं, संख्याबल, शस्त्रास्त्रें, व्यवस्था आणि इतर सामग्री या सर्व बाजूंनीं फ्रेंच सैन्याची युद्धाची तयारी आहे. खरा प्रकार याच्या उलट होता व त्याची जाणीव लेबूफ यास तरी निदान असावयास पाहिजे होती.

ड्यूक ऑफ ग्रॅमांट.

आपण लेबूफ हा जर फ्रान्सच्या मंत्रिमंडळाचा हात होता असें मानिलें तर ह्या महत्त्वाच्या प्रसंगीं ड्यूक ऑफ ग्रॅमांट हा मंत्रिमंडळाचें डोकें होता असें समजलें पाहिजे. लेबूफ यानें युद्धाची तयारी आहे, असें जोरानें सांगितल्यामुळें व ग्रॅमांट यानें युद्धांत आपण खास यशस्वी होणार असा पूर्ण विश्वास वाटत असल्याचें सांगितल्यामुळें मुख्य प्रधान आलिन्हायर हा आपल्या पोक्त विचाराच्या विरुद्ध त्या दोघांच्या बाजूला वळला. ग्रॅमांट हा सर्वस्वी युद्धाला अनुकूल होता. त्याला पूर्ण भरंवसा होता कीं, एकदां फ्रान्सला यश आलें म्हणजे ऑस्ट्रिआ जर्मनींतील आपलें गतवर्चस्व पुनः मिळविण्याकरितां युद्धास

खास तयार होईल. नेपोलिअन याला स्वतःला युद्ध नको होतें, परंतु आपल्या वंशाकडे गादी राहील कीं नाहीं, याची त्याला मोठी काळजी पडली होती. आपण भितरेपणानें वागलों तर आपल्या मुलास आपल्या मागें गादी मिळण्यास मोठी पंचाईत पडेल असें त्यास वाटत होतें. आपली गेलेली लोकप्रियता युद्धानें परत मिळवून १८६५–६६त नष्ट झालेली इभ्रतहि पुनः प्राप्त होईल अशी त्याला आशा होती. स्वतःच्या अंगीं सेनापतीचे गुण मुळींच नाहींत हें तो पूर्णपणें जाणत होता. परंतु आपला सेनापति बेझेन हा युद्धांत चांगला कसलेला व कर्तबगार असून तो सैन्यरचनेच्या विद्येंत कुशल अशा प्रख्यात जर्मन सेनापतींच्या तोडीचा आहे अशी त्याची दृढ समजूत होती. शांततेपेक्षां, विशेषतः नामुष्कीच्या शांततेपेक्षां, युद्धानेंच आपलें पुढचें काम उत्तम साधणार आहे, असें त्याच्या दुबळ्या मनास वाटलें अ[illegible]. फ्रान्सचे लोक, त्यांतल्यात्यांत पॅरिसचे अडाणी लोक याना युद्धाशिवाय दूसरें कांहींच नको होतें.

बर्लिन येथील कपटव्यूह.

सन १८७० त जुलईच्या प्रारंभीं पॅरिसमध्यें जर अशी स्थिति होती तर बर्लिनमध्यें तरी काय प्रकार होता हा प्रश्न सहजच उद्भवतो व त्याकडेच आतां आपण वळूं.

आज नाहीं उद्यां प्रशिअन व फ्रान्स यांचें युद्ध जुंपणें अपरिहार्य आहे; ऑस्ट्रिअन युद्धामुळें उत्तरेकडील संस्थानांची दक्षिणेकडील संस्थानांशीं एकी होण्यास आरंभ झाला होता,

ती एकी ह्या युद्धांत यश आलें तर चांगली दृढ होईल; होहेंझोलर्न घराण्यांतील पुरुष स्पेनच्या गादीला उमेदवार म्हणून पुढें आल्यानें युद्ध फ्रान्सकडून पुकारलें जाणें श्रेयस्कर आहे; जर्मनीची युद्धाची तयारी आहे; परंतु फ्रान्सची नाहीं, या गोष्टी पूर्णपणें माहीत असलेले तीन पुरुष बर्लिनमध्यें होते. युद्ध पुकारण्याच्या कामीं फ्रान्स वांकूं करील तर त्याला डवचून डवचून त्याच्या अंगीं त्वेष आणण्याचीं व जर्मन लोकांचाहि राग चेतविण्याचीं साधनें त्यांच्याजवळ होतीं; त्याचप्रमाणें निदान तात्पुरती तरी यूरोपाची सहानुभूति संपादण्याचा उपाय त्यांना ठाऊक होता. परिस्थितीला वाटल तस वळण देण्याचें सामर्थ्य या तिघांच्या अंगीं होतें, कारण फॉनरून यानें सैन्य शिकवून तयार ठेविलें होतें. मॉल्टके याला लष्करी स्थितीचें ज्ञान परिपूर्ण होतें. आणि कौंट बिझमार्क, सन १८६६ च्या युद्धाचा जनक, यानें त्यावेळीं जें काम सिद्ध झालें होतें त्याची पूर्णता, राजकारणांतील मतभेद मिटवण्यास गुणकारी आढळून आलेल्या ' तरवार व रक्तस्राव ' या उपायानें करण्याचा निश्चय केला होता. त्याच्या मार्गांत एकच अडचण होती, ती राजाची. पहिला विल्यम हा अत्यंत प्रामाणिक व सरळ असल्यामुळें जें काम उघडपणें केलें असतां दोषार्ह ठरेल त्या कामाला या राजाची संमति मिळणें अशक्य होतें. परंतु नेपोलियनचे उद्देश व त्याचें धोरण यांवर विल्यम राजाचा परम आविश्वास होता आणि म्हणून या गोष्टीचा फायदा घेऊन त्याची कशी तरी समजूत करून त्याला आपला करणें या तिघांना शक्य होतें.

बेनेडेटी एम्स येथें जातो.

येथवर पॅरिस व बर्लिन येथील परिस्थितीचें वर्णन झालें. आतां या पुढें एकामागून एक घडलेल्या गोष्टींची हकीकत देणें एवढेंच करावयाचें आहे.

डयूक ऑफ ग्रॅमांट, फ्रान्सचा परराष्ट्रीय मंत्री व प्रशिआशीं युद्ध करावें असें म्हणणाऱ्या पक्षाचा जहाल अभिमानी यानें फ्रान्सच्या मंत्रिमंडळावर आपली पूर्ण छाप बसाविली होती, हें मागें सांगितलेंच आहे. जुलई ता. ६ रोजीं ग्रॅमांटनें, बेनेडेटी हा फ्रान्सचा वकील म्हणून अजूनहि बर्लीन येथें होता–त्याला तुम्ही राजा एम्स येथें आहे तेथें जाऊन त्याची गांठ घेऊन पुढील गोष्टींची त्याच्यापाशीं मागणी करा असा हुकूम दिला. युद्ध टाळण्याला राजानें प्रिन्स लिओपाल्ड यास तूं स्पेनची गादी स्वीकारण्याचें कबूल केलें आहेस, तें आपलें वचन माघारी घे असा हुकूम देणें हा एकच उपाय आहे, तो राजानें अंमलांत आणावा व पुनः लिओपोल्ड ती गादी मिळविण्यास उमेदवार म्हणून पुढें येणार नाहीं, असें राजानें अभिवचन द्यावें. बेनेडेटीनें ह्या हुकुमाप्रमाणें राजाची गांठ घेतली व पुढील गोष्टी त्यास समजावून सांगितल्या. प्रिन्स लिओपोल्डनें गादी स्वीकारण्याचें कबूल केलें ही बातमी पॅरिसमध्यें आल्यावर तेथें उडालेली खळबळ; त्या परिस्थितीपासून उत्पन्न झालेला धोका; प्रशिआ व फ्रान्स यांच्यामधील तह कायम राहण्यापासून होणारे फायदे; लिओपोल्ड यानें आपली संमति मागें घेतली नाहीं तर शांतता कायम ठेवण्याची अशक्यता; आपल्या मंत्रिमंडळास राजापासून काय पाहिजे आहे हें आदरानें व

अदबीनें समजावून सांगून बेनेडेटीनें आपलें भाषण संपविलें. बेनेडेटी कोणत्या मागण्या करणार याची सूचना राजाला बर्लिनहून अगोदरच मिळाली होती व प्रिन्स लिओपोल्डनें स्पेनची गादी स्वीकारण्याचें कबूल केल्यामुळें झालेले परिणाम पाहून राजाला बहुतकरून चिंताच उत्पन्न झाली होती. म्हणून बेनेडेटीची भेट होण्यापूर्वीच त्यानें लिओपोल्ड आपली अनुमति मागें घेईल व त्यामुळें शांतताभंग होणार नाहीं अशा उपायांची योजना केली होती. होहेंझोलर्न घराण्याच्या मुख्याच्या इश्रतीस शोभेल अशा रीतीनें राजानें बेनेडेटीस उत्तर दिलें कीं, " मी, प्रिन्स लिओपोल्ड व त्याचा बाप यांस या बाबतींत अगोदरच लिहिलें आहे व सिग्मॅरिंजेन येथून लवकरच अनुकूल असा जबाब येईल अशी मला अपेक्षा आहे. " हीं गोष्ट बेनेडेटीच्या अधिकारांतलीच असती तर हें प्रकरण येथेंच थांबलें असतें. युद्ध टाळण्याचा प्रयत्न राजानें आपण होऊन व मनःपूर्वक केला होता अशी बेनेडेटी याची खात्री झाली त्यानें प्रॅमांटकडे भेटींत काय घडलें याची हकीगत लिहून कळविली. तींत त्यानें वरील मुद्यावर विशेष जोर दिला व दोन्ही बाजूंनीं थोडा नेमस्तपणा धरला तर युद्धाचा अनिष्ट प्रसंग टळून फ्रान्सच्या मुत्सद्दीगिरीचा मात्र या कामीं विजय होईल, असें त्यानें आपलें मत दिलें होतें.

बिझमार्क याच्या व्यूहरचना.

या बेनेडेटीच्या खलित्यावरून पॅरिसमधील बड्या मंडळींत शांतता राखणेंच चांगलें असें मत झालें. युद्ध करावें अशी इच्छा नेपो-

लिअनची मानपासून नव्हतीच, म्हणून तो शांतताभंग होऊं नये असें म्हणणाऱ्या पक्षास उघड जाऊन मिळाला. ता. ११ रोजीं युद्धाच्या तयारींत खंड पडला. तथापि ग्रॅमांट याचा 'युद्धच झालें पाहिजे' हा हेका अजूनहि कायम होता. त्यानें बेनेडेटी याच्या खलित्यास एखादा वेडावलेला मनुष्य उत्तर देईल असें उत्तर दिलें. प्रिन्स लिओपोल्ड यानें स्पेनच्या गादीबद्दल आपली उमेदवारी मागें घेतली अशी तार लिओपोल्डच्या बापाची मॅड्रिड येथें पोहोंचली. अशी बातमी ता. १२ रोजीं पॅरिस शहरांत आली तरी पुनः हें उमेदवारीचें प्रकरण उद्भवणार नाहीं अशी प्रशिआच्या राजापासून तुम्ही हमी मागा असें बेनेडेटीला ग्रॅमांट यानें आग्रहपूर्वक लिहिलें, एवढाच काय तो या बातमीचा उपयोग त्यानें केला. कांहीं जहाल व ग्रॅमांट याखेरीज सर्वांना आतां शांतता मोडत नाहीं असें वाटलें. मुख्य प्रधान आलिव्हायर यानें प्रिन्स लिओपोल्डनें आपली उमेदवारी काढून घेतली असें कायदेमंडळास कळविलें व सर्वांनीं त्याचें अभिनंदन केलें. परंतु युद्ध घडवून आणावयाचें असा ग्रॅमांट याचा उघड उघड बेत दिसला. बॅरन वर्थर पॅरिस येथील प्रशिअन वकील याची भेट घेऊन तींत पुढील आशयाचें पत्र किंग विल्यम यानें बादशहास लिहावें असें ग्रेमांट यानें ठरविलें:— 'प्रिन्स लिओपोल्डच्या उमेदवारीला संमति देण्यांत माझा फ्रान्सला दुखविण्याचा मुळींच हेतु नव्हता आणि प्रिन्स लिओपोल्ड यानें आपली उमेदवारी मागें घ्यावी असा सल्ला देण्यांत माझी इच्छा अशी आहे कीं, फ्रान्स व प्रशिआ

या दोन राष्ट्रांमधील परस्परांविषयीं असलेले गैरसमज दूर व्हावे." बॅरन वर्थर यानें हें पत्र लागलींच एम्स येथें पाठवून दिलें.

बर्लिन येथें युद्धाला अनुकूल असलेल्या पक्षाच्या हातांत त्याला होतें असेंच शस्त्र या खलित्यानें मिळालें. राजाचें मन वळविण्यास व त्याला आपल्या कह्यांत ठेवण्यास त्या पक्षाला ही एक शक्तीच मिळाली. तो खलिता ज्या दिवशीं एम्स येथें आला त्या दिवशीं सकाळींच, परंतु तो पावण्याचे पूर्वी बेनेडेटीनें राजाची भेट घेतली होती. भेटीत " सिग्मॅरिंजेन येथील अपेक्षित पत्र माझ्या हातीं पडल्याबरोबर मी तुम्हांला बोलावून घेईन असें अभिवचन बेनेडेटी यास मिळालें होतें. ह्या नंतर थोड्याच वेळानें बॅरन वर्थर याचा खलिता त्याच्या वरील बिझमार्क याच्या टीकेसह राजाच्या हातीं आला. त्यांतील मजकूर पाहून राजा अगदीं संतापून गेला. राजा इतका संतापला होता कीं, पुढें. एक तासानें सिग्मॅरिंजेन येथील पत्र आल्यावर बेनेडेटीस भेटीस न बोलावितां राजानें त्यास जासुदा हातीं पुढील निरोप धाडिला:– 'मुलानें उमेदवारी मागें घेतली आहे असें प्रिन्स ॲन्थनी याचें पत्र सिग्मॅरिंजेन येथून आलें व हें प्रकरण आतां संपलें. मला आलेल्या हुकुमाप्रमाणें हें उमेदवारीचें प्रकरण पुनः उद्भवणार नाहीं अशी हमी आपणांपासून मागून घेणें मला प्राप्त आहे, असें तूं राजास सांग " असा परत निरोप बेनेडेटीनें जासुदाबरोबर राजास पाठविला.

होहेंझोलर्न घराण्यानें आपला उमेदवार माघारी घेतला

अजूनहि शांतताभंग टाळणें शक्य होतें पॅरिस येथील शांतता-पक्ष दिवसेंदिवस जोरावत चालला होता. ग्रॅमांट यानें मागितलेली हमी देण्याचें अथवा त्यानें ज्या पत्राचा मसुदा तयार करविला होता त्याच्यावर सही करण्याचें राजानें नाकारिलें हें खरें आहे. परंतु उमेदवारी बिनशर्त मागें घेण्यांत आली होती. येथवर झालेल्या कामांत फ्रेंचांचा मोठेपणा दिसून आला होता व त्यांच्या मुत्सद्दीगिरीचा पूर्ण विजय झाला होता. ही गोष्ट येथेंच थांबली असती तर होहेंझोलर्न घराण्याच्या उमेदवारीमुळें युद्ध उद्भवलें असें झालें नसतें. पॅरिस व बर्लिन येथेंहि असेंच लोकमत झालें जर बर्लिन येथून कांहींच बाहेर आलें नसतें तर पॅरिस येथील युद्धपक्ष जागाच्याजागींच जिरला असता. "युद्ध, युद्ध" अशी ओरड करण्यास जागाच नव्हती. फ्रान्सनें होहेंझोलर्न घराण्याच्या उमेदवारानें माघार घ्यावी अशी मागणी केली होती व त्या उमेदवारानें तें मान्यहि केलें होतें. मग आतां भांडण व्हावें असें कारण उरलेंच नाहीं.

बिझमार्क कलहाग्नीच्या आगींत तेल ओततो.

ही गोष्ट जर पॅरिसच्या मुत्सद्यांना स्पष्ट दिसत होती तर ती बर्लिन येथील त्रिकुटाला जास्तच स्पष्ट दिसत होती. त्या त्रिकुटाला वाटलें कीं, आतां युद्ध होणें नाहीं, आलेली सुसंधि फुकट जाणार, पॅरिस येथील बाजारबुणग्यांच्या शमत चाललेल्या क्षोभाची पुनः परमावधि

होईल असें आपण कांहीं केलें नाहीं, तर आलेली संधि फुकट जाणार व ती पुनः आलीच तर आजच्या इतकी अनुकूल स्थिति त्या वेळेस असणें फार दुरापास्त. परंतु ज्या मुत्सद्यानें हॅनोव्हर खालसा केलें व जर्मनींतून ऑस्ट्रिआला बाहेर काढलें त्याचें डोकें इतकें सुपीक होतें कीं, त्यानेंहि प्रसंगाला तोड हुडकून काढलीच. नंतर कांहीं तासांनीं बर्लिन येथें एक तार सरकारी रीतीनें प्रसिद्ध झाली. त्या तारेंत अशी भाषा वापरली होती कीं, तीवरून फ्रेंच वकिलानें दांडगाईनें राजाची गांठ घेण्याचा प्रयत्न केला, त्यानंतर राजानें गांठ घेण्याचें नाकारून 'मी जें कांहीं बोललों आहें त्यापेक्षां जास्त मला कांहींएक सांगावयाचें नाहीं' असा निरोप जासुदाकडून बेनेडेटी यास कळविला, असा लोकांचा समज व्हावा. ही तार यूरोपिअन दरबारीं असलेल्या बहुतेक प्रशिअन प्रतिनिधींकडे व जर्मनींतील संस्थानांच्या राजधान्यांत असलेल्या आपल्या हस्तकांकडे पाठविली होती सर्व महत्त्वाच्या जर्मन वर्तमानपत्रांतून बिझमार्कनें जे लेख मुद्दाम लिहविले त्यांत याच गोष्टी विस्तारानें पण अतिशयोक्तीनें वर्णिल्या होत्या. हे लेख पॅरिसच्या वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनीं आपल्या वर्तमानपत्रांना पाठवून दिले. ह्या लेखांत सर्व कच्ची हकीकत देऊन असें भासविलें होतें कीं, एम्स येथील सहल करण्याच्या वाटेवर बेनेडेटी यानें राजाची मुद्दाम भेट घेण्याचा प्रयत्न केला व प्रशिआच्या राजानें पुष्कळ मंडळीच्या देखत त्याच्याकडे आपली पाठ फिरविली. ज्यांच्याकरितां हे लेख लिहिले होते त्या लोकांच्या भावना लेखकांस पूर्ण अवगत

हात्या. त्या लेखांवरून जर्मन लोकांना वाटलें कीं, फ्रेंच वकिलानें राजाचा उपमर्द केला; तसेंच फ्रेंच लोकांस वाटलें कीं, प्रशिआच्या राजानें फ्रेंच वकिलाचा अपमान करून त्यायोगें जाणूनबुजून फ्रान्सचाच अपमान केला.

पिकविलेल्या कंड्यांचा पॅरिसवर परिणाम.

फ्रेंच लोकांच्या अंतःकरणप्रवृत्तीचा ठाव बिझमार्क यानें अगदीं तळापर्यंत घेतला होता. दारूच्या राशीला आगकाडी लाविली तर जो परिणाम होतो तसाच फ्रेंच लोकांच्या अंतःकरणावर या अर्धवट सरकारी लेखांच्या उतार्‍यांचा झाला. सन १८७० सालचें युद्ध ग्रॅमांट याच्या पोकळ डौली भाषणांनीं, राजाच्या अनिश्चित स्वभावानें अगर राणीच्या मोहक वाणीनें झालें असें मुळींच नसून बर्लिन येथील परराष्ट्रीय कचेरींत तयार करविलेल्या लेखांनीं तें युद्ध झालें. लेखांच्या जनकास त्यांचा जो परिणाम व्हावयास पाहिजे होता तोच झाला. ते लेख ता. १४ रोजीं सकाळीं पॅरिस येथें पोहोंचले. बर्लिन येथें उठविलेल्या या मनःकल्पित गोष्टी पॅरिसला येण्याच्या अगोदर प्रथम त्याच दिवशीं मंत्रिमंडळ ११ वाजतां भरलें होतें. या सभेंत शांतता-वादी पक्षाचा पुढाकार वादशहानें घेतला होता व त्याच पक्षाचें मताधिक्य तींत निश्चितपणें होतें. परंतु एम्स येथें झालेल्या फ्रान्सच्या वकिलाच्या उपमर्दाविषयीं मुद्दाम उठविलेल्या बातम्या दोनप्रहरच्या डोकेनें येऊन धडकल्यावर बर्लिन येथील धूर्त सूत्रधाराच्या अदमासा-प्रमाणें लोकमतानें चांगलीच उलट खाल्ली. त्या दिवशीं मंत्रिमंडळाची

सभा पुनः भरली आणि बादशहानें अजूनहि शांतता राखणेंच चांगलें असें स्वच्छ म्हटलें, तरी सभेंत मोठी खळबळ उडून राहिली. राखलेल्या सैन्यास तयार होण्यास सांगावयाचें असेंच फक्त ठरवून सभा बरखास्त झाली. परंतु या उपमर्दाच्या बातमीचा पॅरिसमधील सहज चेतणाऱ्या जनतेवर फार विलक्षण असा परिणाम झाला. सर्व सार्वजनिक जागीं लोकांचे थवेच्या थवे जमले "सूड, सूड व बर्लिन-वर चाल करण्यास निघा" अशा आरोळ्या ठोकीत लोकांच्या मोठमोठ्या टोळ्या रस्त्यांतून गस्त घालूं लागल्या. अंशतः या प्रदर्शनांत भाग घेणारांची संख्या व त्यांचा दंगाधोपा वाढत गेल्यामुळें व अंशतः बादशहाच्या सन्निध असलेल्या लोकांनीं गळ घातल्यामुळें अखेरीस त्याला आपलें म्हणणें सोडून द्यावें लागलें. मध्यरात्रीच्या थोडा वेळ अगोदर मंत्रिमंडळाची सभा पुनः भरली व या सभेंत युद्ध पुकारण्याचें ठरलें.

एम्स येथें असलेल्या फ्रेंच वकिलाचा उपमर्द झाला नसतांहि उपमर्द झाला अशा बनावट बातम्या उठल्या, हेंच सन १८७० च्या फ्रँको–जर्मन युद्धाचें तात्कालिक कारण झालें व केवळ फ्रान्सला युद्धाला चेतविण्याच्याच हेतूनें ह्या काल्पनिक बातम्या बर्लिन येथें उठविण्यांत आल्या. हा सर्व प्रकार आतां वाचकांच्या ध्यानांत आला असेलच.

पॅरिस युद्ध झालेंच पाहिजे असा आग्रह धरितें.

दुसऱ्या दिवशीं मुख्य प्रधान आलिव्हायर यानें असेंब्लीस कळविलें कीं, फ्रान्सनें प्रशिआ विरुद्ध युद्ध पुकारलें आहे आणि तें

चालविण्याच्या खर्चाला पैसे मंजूर करा अशी त्यानें मागणी केली. असेंब्लींत एकतंत्री साम्राज्याला जन्मभर विरोध केलेलीं एम थायर्स सारखीं समजूतदार माणसें पुष्कळ होतीं. परंतु ज्या बेडानें जनतेस पछाडलें होतें त्या बेडानें कायदेमंडळाच्या सभासदांसहि घेरलें, असें लवकरच दिसून आलें. " हें युद्ध अकालिक आहे, युद्धाला ही वेळ अगदीं वाईट शोधून काढली आहे " एवढाच काय तो आक्षेप थायर्सनें घेतला. परंतु ' हें युद्ध मुळींच अन्यायाचें आहे ' असा आक्षेप एकानेंहि घेतला नाहीं व फक्त दहाच सभासदांनीं पैसे मंजूर करण्याच्या विरुद्ध मतें दिलीं.

लोकांचा उत्साह पाहून विचारमूढ झाल्यानें म्हणा, किंवा ' युद्ध, युद्ध ' या ओरडीस विरोध करणें शक्य नाहीं अशी खात्री पटून म्हणा, मुख्य मंत्री आलव्हायर यानें " मी आनंदानें युद्धाला आरंभ करीन " असें जाहीर केलें. दुसरीकडे ' सैन्य युद्धाला तयार आहे काय ? ' असा युद्धमंत्री लेबूफ यास प्रश्न केला असतां त्यानें रंगेलपणानें उत्तर दिलें कीं, " सुतळीच्या तोड्याची सुद्धां उणीव पडणार नाहीं. "

परंतु युद्ध पुकारलें गेलें आहे. दोन्ही पक्षांकडील सैनिकांची संख्या, त्यांचें आर्थिक सामर्थ्य, त्यांचे सेनापति आणि त्यांच्या युद्धाच्या योजना या सर्वांचा विचार पुढच्या भागांत करण्यांत येईल.

प्रकरण १३ वें.

फ्रँको–जर्मन युद्ध–दोन्हीं पक्षांच्या सैनिकांची संख्या–दोघांचे सेनापति–ऑस्ट्रिआ व इटली–सार्बूकेन, वर्थ, स्पिकेरेन.

ता. १४ जुलई रोजीं मध्यरात्रीं प्रशिआबरोबर फ्रान्सनें युद्ध करण्याचें ठरविलें होतें. ता. १५ रोजीं सकाळीं युद्धाला सर्व सैन्यानें सज्ज असावें व त्यानें प्रशिअन सरहद्दीवर जमावें असा हुकूम सुटला.

'आर्मी ऑफ दी व्हाइन' या नांवानें माहीत असलेल्या युद्धोपयोगी फ्रेंच लोकांच्या सैन्यांत नांवाला ३,३६,००० सैनिक व ९२४ तोफा होत्या. यापैकीं ३,००,००० लोक आरंभालाच युद्धाच्या हालचालीला उपयोगीं पडतील असें वाटलें. सैन्यांतील पायदळाला नरड्यांतून बार भरण्याच्या बदुंका दिल्या होत्या. ही बंदुक चॅसेपो यानें प्रथम तयार केली व त्याचें नांव तिला दिलें होतें. प्रशिअन सैन्य अजूनहि आपली 'नीड्ल्–गन'च वापरीत होतें. फ्रेंच चॅसेपो ही बंदुक सर्व तऱ्हेनें 'नीड्ल्–गन'पेक्षां जास्त चांगली होती. सैन्याच्या तुकड्याबरोबर असलेल्या तोफखान्यांत मिट्रेल्यू या नांवाच्या मशीन–गन्स वापरीत असत या तोफांनीं चांगलेंच काम होईल अशी अपेक्षा होती. ही तोफ परराष्ट्राला सुगावा लावूं नये इतक्या गुप्तपणें तयार केली होती खरी; परंतु ज्या शिपायांना ती वापरावयाची होती त्यांना तिच्या यांत्रिक रचनेची मुळींच माहिती करून दिली नव्हती. म्हणून समरांगणांत या तोफेचा बिलकुल उपयोग झाला नाहीं.

भोर

फ्रेंच सैन्याची अवनती.

क्रिमिअन व ऑस्ट्रिअन युद्धाच्या वेळेपासून यूरोपिअन राष्ट्रांच्या सैन्यांत सुधारणा होऊन त्यांची प्रगति झाली होती, परंतु इकडे फ्रेंच सैन्याच्या गुणांचा ऱ्हास होत चालला होता. दरबारांत नांव मिळणें तें गुणग्रहणानें न मिळतां पक्षपातानें मिळत असे. ह्या ऱ्हासाचें कारण ज्या अधिकाऱ्यांनीं प्रशिअन शिपायांना मिळणाऱ्या शिक्षणाकडे बोट दाखवून फ्रेंच सैन्याची प्रगति होण्यास तसेच कांहीं तरी उपाय योजले पाहिजेत असें म्हटलें त्यांची टर उडाली व त्यांच्या म्हणण्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, १८७० च्या पूर्वीच्या दहा वर्षांत फ्रेंच सैनिकांना केवळ दिखाऊ शिक्षणच मिळालें होतें. सैनिकांना कवाइतीच्या जाग्यावर चांगला देखावा करितां येईल इतकें शिक्षण मिळालें कीं बस्स, असा समज झाला होता. यापेक्षां जास्त त्यांनीं कांहीं केलें पाहिजे अशी अपेक्षाच धरिली जात नसे लढाईच्या वेळीं हालचाली करण्याचें शिक्षण व गोलंदाजांचें शिक्षण यांची सारखीच हयगय झाली होती. अधिकाऱ्यांनीं युद्धशास्त्राचा अभ्यास करण्याचें टाकून दिलें होतें व सरकारानें त्यांना शिक्षण देण्याची कोणतीहि तजवीज केली नव्हती. ह्यापेक्षांहि जास्त अनिष्ट परिणाम असा होता कीं, सन १८५९ च्या युद्धांत अधिकारी व त्यांच्या हाताखालचे शिपाई यांच्यामध्यें जो वेब नाव दिसून आला होता तो आतां जास्तच वाढला होता. शिपाई छावणींत असतांना किंवा बराकींत असतांना अधिकारी बहुतकरून

त्यांच्या सुखसोयीविषयीं अत्यंत बेफिकीर असत. ह्या गोष्टी कमिशन नसणाऱ्या अधिकाऱ्यांवर सोंपविल्या जात व म्हणून पुष्कळ वेळां त्यांची चांगली काळजी घेतली जात नसे, हें सांगावयास नकोच. ब्रेन्हेट–मेजर हेंडरसन, एक इंग्लिश टीकाकार–याच्या विस्तृत ग्रंथांतून पुढें बरेच वेळां उतारे घेण्यांत येतील–यानें यापासून झालेल्या परिणामाचें वर्णन केलें आहे, तें असें:–" गार्ड व आलजिरिअन पलटणी खेरीज करून सनदी अधिकाऱ्यांना लष्करी शिपायांविषयीं माहिती किंवा सहानुभूति मुळींच नव्हती, तसेंच लष्करी शिपायांनाहि आपल्या अधिकाऱ्यांविषयीं आदर अथवा प्रेम मुळींच वाटत नसे. " कवाईत शिकविण्याची पद्धत अशी ठेवली होती कीं, तिच्यांत अधिकाऱ्याला आपल्या विचारशक्तीचा उपयोग करण्यास मुळींच वाव राहात नसे, हेंहि सांगून ठेविलें पाहिजे. अधिकारी म्हणजे एक यंत्रच, जास्त कांहीं नाहीं अशी स्थिति होती.

फ्रेंच शिपायांची नीतिमत्ता व काटकपणा कमी होण्यास वर सांगितलेल्या कारणांत आणखीहि इतर कारणांची भर पडली होती. या इतर कारणांपैकीं दुसऱ्या साम्राज्याचा प्रारंभ हें एक होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सन १८५०–५१ सालीं सॅटोरीच्या मैदानावर सैन्याची तपासणी होत असे, त्या वेळीं शिपायांस सॉसेज (एक पक्वान्न) व शँपेन दारू यांची रेलचेल होत असे; अधिकाऱ्यांना कर्तव्यभ्रष्ट करण्याकरितां होत असलेले प्रयत्न; शिपायांच्या छंदाप्रमाणें बादशहाची वागणूक, कारण हे शिपाईच आपल्या

अधिकाराचा पाया आहेत असें बादशहास वाटत असे. शिपायांना त्यांच्या कामांत तरबेज ठेवण्यापेक्षां त्यांचा ऐषआराम कसा साधेल याविषयीं बादशहाचे सतत प्रयत्न—या सर्व कारणांनीं सरकाराला शिपायांवर चांगली हुकमत चालविण्याची धमक नाहीं असा समज उत्पन्न होऊन सरकारहि तिरस्कारास्पद झालें आणखी असें कीं, आलजीरिआंत चाकरी करणाऱ्या सैनिकांस बेसुमार मोकळीक मिळाल्यामुळें शिस्तीचीं बंधनें अगदीं ढिलीं पडलीं होतीं व इकडे मेक्झिकोच्या घातुक स्वारींत ज्या शिपायांनीं नोकरी केली त्यांच्या अंगीं, हिंदुस्तानांत अगर आयर्लंडांत चाकरी करून इंग्लिश शिपायांच्या अंगीं जसा कणखरपणा येतो, तसा कणखरपणा मुळींच आला नाहीं; पण उलट पूर्वीच्या शिपायापेक्षां या शिपायांच्या सामानाच्या मागण्या मात्र अगदीं बेताल झाल्या. हेंडरसन लिहितोः—" डोक्यावर आच्छादन असलेंच पाहिजे, त्या शिवाय चालावयानें नाहीं, असेंच या शिपायांस वाटत असे. म्हणूनच भर उन्हाळ्यांत व वस्ती पातळ असलेल्या प्रांतांत हिन्हाईन सैन्याच्या बरोबर तंबूचें निरुपयोगी ओझें असे, असें आपणांस आढळून येतें.

बेझेन आणि मॅक्महन.

फ्रेंच शिपायांच्या अंगीं ज्या उणिवा होत्या त्या भरून काढण्यासारखे विशेष गुण फ्रेंच सेनापतींच्या ठिकाणीं चांगले दिसून येत होते असेंहि नाहीं. स्वतः तिसऱ्या नेपोलिअननें रणांगणांत सेना नेऊन तिचें आधिपत्य पतकरिलें, अशी गोष्ट फक्त एकदांच सन १८५९ च्या

स्वारींत झाली. त्या स्वारींत त्याची पक्की खात्री झाली कीं, यशस्वी सेनाधिपति होण्यास जे गुण अवश्य लागतात ते आपल्या अंगीं मुळींच नाहीं. बादशहाच्या मतानें त्याच्या स्वतःच्या अंगीं जे गुण नव्हते ते मार्शल बेझेन याच्या अंगीं होते. बेझेन दोन वर्षे मेक्झिको-मध्यें युद्ध चालविलेल्या सैन्याचा अधिपति होता, परंतु त्या युद्धांत त्याच्या अंगीं कांहीं लोकोत्तर गुण असल्याचें दिसून आलें नाहीं. त्याच्या नोकरीचीं आरंभींचीं १८३३ ते १८४९. हीं वर्षे आलजिरिआंत कचेरींत कागद नाचविण्यांत गेलीं. या कामावर असतांना मोठा हुशार अधिकारी अशी त्याची ख्याति होती. कपटनीति हा जो आरब लोकांचा विशेष गुण त्यांत सुद्धां बेझेन हा आरब लोकांच्या वर ताण करणारा होता. सन १८५० पासून क्रिमिअन युद्ध सुरू होईपर्यंत एका तुकडीचा सेनापति होऊन तो आफ्रिकेंत गेला होता क्रिमिअन युद्धांत प्रथम तो ब्रिगेडिअर जनरल होता व १८५५ ता २ सप्टेंबर रोजीं त्याला एका तुकडीचा सेनापति नेमिलें हें युद्ध संपल्यावर त्याला इन्स्पेक्टरची जागा मिळाली व या जागीं असतांना त्याला सैन्याच्या मुख्य मुख्य अधिकाऱ्यांच्या स्वभावाची चांगली माहिती झाली. सन १८५९ च्या युद्धांत तो पुनः एका तुकडीचा सेनापति झाला व सालफेरिनो येथें देवळाच्या आवारावर जो मोठा जोराचा हल्ला झाला त्यांत त्यानें मोठी कीर्ति संपादन केली. सन १८६२ त फ्रेंच सैन्य मेक्झिकोच्या मोहिमीवर गेलें. तेव्हां तो प्रथम जनरल फेरो याच्या हाताखालीं एका तुकडीचा मुख्य होता,

व पुढें त्या सर्व सैन्याचा तो अधिपति झाला, या वेळची त्याची मोठी कामगिरी म्हणजे आपल्या हाताखालचें सैन्य जसेंच्या तसें फ्रान्सला त्यानें परत आणिलें. यावरून असें दिसून येईल कीं, मार्शल बेझेन याच्या अंगीं मोठ्या सेनानायकाचे गुण होते असें मानण्यास सर्व महशूर असा भक्कम पुरावा नव्हता आणि त्याच्या अंगीं मोठ्या सेनापतीचे गुण आहेत ही बादशहाची समजूत तरी 'आपल्या वंशाच्या ठिकाणीं बेझेन याची अचल भक्ति आहे' हें बादशहाला माहित असल्यामुळें झाली असावी हेंच बहुधा खरें.

मार्शल मॅक्मेहन, 'ड्यूक ऑफ मॅजेंटा,' हा बादशहाच्या मतानें गुणांनीं बेझेनच्या खालोखाल होता व सर्व यूरोपच्या मतानें तो बेझेनपेक्षां श्रेष्ठ होता. सन १८५९ ता ४ जून या महत्त्वाच्या दिवशीं तो सैन्य घेऊन एका बाजूनें निघून गेला यामुळें–यांतहि ऑस्ट्रिआचा सेनापति कौंट गायले यानें विलक्षण दिरंगाई केली याची मदत त्यास झाली–फ्रेंच सैन्याचा अपजय होण्याची पाळी टळली व बादशहावर पकडला जाण्याचा आलेला प्रसंगहि चुकला. ह्या एका पराक्रमानें फ्रान्समध्यें त्याची मोठी कीर्ति झाली होती, परंतु कितीहि मोठी जबाबदारी अंगावर पडली तरी न कचरणारा शूर सेनापति या पेक्षां त्याच्या अंगीं कांहीं विशेष गुण होते असें म्हणण्यास जागा नाहीं. एखाद्या स्वारीची योजना करून व तिचें आधिपत्य हातीं घेऊन ती पार पाडण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं नव्हतें. तथापि युद्ध सुरू झालें तेव्हां फ्रेंच सैन्याच्या वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांमध्यें बहुतकरून त्याच्या इतका उत्तम सेनाधिपति नव्हता.

कॅन्राबर्ट, लेबूफ, डी फेली.

मार्शल कॅन्राबर्ट याच्याविषयीं विशेष कांहीं सांगण्याची जरुरी नाहीं. कारण क्रिमिअन युद्धांत इंग्लिश लोकांना व सर्व जगाला हा शूर शिपाई मुख्य सेनापतीचें काम करण्यास किती लायक होता हें ठरविण्याला इंग्लिश लोकांना व सर्व जगाला चांगली संधि आली. मार्शल लेबूफ याच्याविषयीं मागें थोडी हकीकत आलीच आहे. जनरल डी फेली हा फ्रेंच दरबाराच्या फार मर्जीतला होता. यानें केलेल्या हालचालींचा युद्धाच्या आरंभींच्या मोहिमेवर फार घातुक परिणाम व्हावयाचा होता. याच्याबद्दल एवढेंच सांगितलें असतां पुरे होईल कीं, कर्तृत्वशक्ति व धैर्य हीं त्याच्या अंगीं होतीं; परंतु त्याचा नैतिक अधःपात इतका झाला होता कीं, तो युद्धाच्या कामाला अगदीं निरुपयोगी झाला होता. दुसऱ्या पक्षीं दुसऱ्या पलटणीचा सेनापति जनरल फ्रासार्ड हा युद्धशास्त्रांत प्रवीण असा अधिकारी होता. परंतु आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड देऊन त्याच्यांतून पार पडण्याचें सामर्थ्य त्याच्याहि अंगीं नव्हतें.

फ्रेंच तोफखान्याविषयीं हें सांगितलेंच पाहिजे कीं, जर्मन तोफखान्यापेक्षां तो फार कमी प्रतीचा होता व फ्रेंच युद्धखात्याला ही गोष्ट माहीत होती. राखून ठेविलेल्या सैनिकांविषयीं पाहिलें तर फ्रान्सजवळ जर्मनीच्या मानानें असें सैन्य नव्हतेंच म्हटलें तरी चालेल.

जर्मन सैन्यें.

फ्रेंच सैन्यांत जितकी ढिलाई तितकीच प्रशिअन सैन्यांत कडेकोट तयारी होती. प्रशिआच्या जर्मन दोस्तांच्या सैन्यांची तयारीहि तशीच

चांगलीच होती. जर्मन अधिकारी फ्रेंच अधिकाऱ्यांपेक्षां फार कर्तबगार होते जर्मन सैनिकांची शिस्त व धमक फ्रेंचांच्यापेक्षां उत्तम होती. युद्ध आरंभण्यास प्रत्येक बाबतींत प्रशिआची व जर्मन संस्थानांची तयारी फ्रान्सपेक्षां जास्त चांगली होती. युद्धांत जय मिळेपर्यंत तें चालविण्यास त्यांच्या जवळ सामग्रीची सिद्धताहि फ्रान्सपेक्षां जास्त होती.

जर्मन पायदळाची घटना फार दूरदृष्टि ठेवून केली होती. कोणतीहि हालचाल करण्याचा हुकूम सोडितांना प्रत्येक अधिकाऱ्याला आपल्या स्वतंत्र बुद्धीचा उपयोग करणें अवश्य असे, व त्याच्या हाताखालच्या सैनिकांनाहि त्या हालचालींचें मर्म कळत असे जर्मन घोडेस्वारांच्या पलटणींस टेहळणी करणें, पायदळाला योग्य विश्रांति देणें, बातम्या काढणें, सैन्याचें कूच कोणीकडे होत आहे तें शत्रूला समजून देणें, जयाचा पूर्ण फायदा घेणें, अपजयाच्या वेळीं आपण पुढें होऊन पायदळाचें संरक्षण करणें या कामांत विशेष शिक्षण दिलें जात असे. सन १८६६ सालच्या युद्धांत पायदळाच्या पलटणींना ज्या अडली घडल्या त्यापासून त्यांनीं चांगला धडा घेऊन फार सुधारणा केली होती.

त्याचप्रमाणें १८६६ च्या युद्धापासून जर्मन तोफखान्याची हालचालींच्या व रचनेच्या पद्धतींत इतकी प्रगति झाली होती कीं, जर्मन तोफखाना फ्रेंच तोफखान्यापेक्षां प्रत्येक बाबतींत आपल्या कामांत जास्त तरबेज झाला होता.

निकोलसबर्ग येथें तात्पुरता तह झाल्यावर ज्या प्रशिअन व दक्षिण जर्मन संस्थानांच्या सेनापतींचीं नांवें आपणांस ऐकूं येईनाशीं झालीं

तेच सेनापति आपल्या दृष्टी समोर लवकरच येतील, त्यांच्यावर कोणतीं कामें सोपविलीं होतीं व तीं त्यांनीं कशीं पार पाडलीं याची हकीकत पुढें येणारच आहे. नुसत्या संख्याबलाचा विचार केला तरी आपणांस असें दिसून येईल कीं, याहि बाबतींत फ्रेंच सैन्यापेक्षां प्रशिअन राजाच्या सैन्याची सरशीच होती. कारण जरा प्रशिअन राजाला दक्षिण जर्मन संस्थानें कांहीं मदत करणार नव्हतीं असें आपण धरून चाललों व ऑस्ट्रिआ आणि डेन्मार्क यांच्यावर नजर ठेवण्यास तीन पलटणी राखून ठेवणें जरी राजाला अवश्य होतें तरी त्याला युद्धाला आरंभ ३,५०,००० सैनिकांनिशीं करितां आला असता. पण दक्षिण जर्मन संस्थानें आपणांस खास मदत करतील व आरंभींच फ्रेंचांना बरेचसें यश मिळालें नाहीं तर ऑस्ट्रिआ आणि डेन्मार्क यांनीं फ्रेंचांना काडीभरहि मदत करणें शक्य होणार नाहीं असा प्रशिआच्या राजाला पूर्ण विश्वास होता.

सर्व जर्मन संस्थानें प्रशिआस मिळतात.

आपण प्रशिआ बरोबर युद्ध मांडिलेंच तर बव्हेरिआ आणि सॅक्सनी यांचा फ्रान्सबरोबर असलेला जुना स्नेहसंबंध बहुतकरून आपल्या उपयोगीं पडेल व ऑस्ट्रिआ व इटली यांची आपणांस विशेषच मदत होईल अशी पोकळ आशा फ्रेंच बादशहाला वाटत होती. म्हणून प्रशिअन सैन्य आपल्या सैन्यापेक्षां संख्येनें मोठें असलें तरी आपणांस भिण्याचें कांहीं कारण नाहीं, अशी बादशहाची समजूत होती. सॅक्सनी आणि बव्हेरिआ यांच्याविषयींचा त्याचा हा भ्रम लवकरच दूर

झाला. बिस्मार्कनें जर्मन संस्थानांचा मिलाफ करण्याचें काम इतकें बेमालूम करून टाकलें होतें कीं, भावनाप्रधान गतगोष्टींच्या आठवणीनें जर्मनीचें संरक्षण करण्याच्या वेळीं लहान संस्थानें माघार घेतील अशी गोष्ट कदापि होऊं नये. प्रशिअन मंत्री बिस्मार्क यानें संस्थानांची पक्की खात्री करून दिली होती कीं, तिसरा नेपोलिअन हाच मूळ कुरापती काढणारा होता व जर्मनीला हतवीर्य करून आपल्या राज्याचें स्तोम माजविण्याचा त्याचा मुख्य हेतु होता. सन १८६६ च्या युद्धांतील ऑस्ट्रिआच्या दोस्तांच्या स्थितीपेक्षां ऑस्ट्रिआची स्थिति सर्व प्रकारें भिन्न होती. कपट व खोटेपणा यांचा अवलंब करून प्रशिआनें १८६६ सालीं ऑस्ट्रिआस युद्ध करणें भाग पाडिलें. या युद्धाचा परिणाम असा झाला कीं, ऑस्ट्रिआवर राज्य करणाऱ्या घराण्याचें जर्मनींतील अति प्राचीन वर्चस्व तर नाहींसें झालेंच; परंतु जर्मनींतून ऑस्ट्रिआचीहि हाकालपट्टी झाली. ऑस्ट्रिअन साम्राज्याचा चॅन्सेलर कौंट बेयूस्ट हा सॅक्सनीचा मंत्री असतांना त्यानें बिस्मार्कचें धोरण हाणून पाडण्याचा प्रयत्न केला होता. चॅन्सेलर या नात्यानें, शक्य तर, प्रागचा तह मोडून टाकण्याची त्याची प्रबल इच्छा होती; म्हणून ऑस्ट्रिआ धोक्यांत न येतां फ्रान्सशीं दोस्ती घडवून आणितां आली तर ती तशी घडवून आणण्याकडे बेयूस्ट याचा कल होता. ह्या प्रश्नाचा खल त्यानें डयूक ऑफ ग्रॅमांट याच्यापाशीं केला असला पाहिजे हें खास. डयूक ऑफ ग्रॅमांट याची अंतःकरणप्रवृत्ति आशापूर्ण असल्यामुळें सदरच्या वाटाघाटीवरून त्याच्या मनावर फ्रान्सनें

प्रशिआशीं युद्ध आरंभिल्यास ऑस्ट्रिआ नुसत्या सहानुभूतीपेक्षां जास्त जोराची म्हणजे सैन्याची मदत फ्रान्सला करील असाच परिणाम झाला असावा. तिसऱ्या नेपोलिअननें जर इतकी घाई केली नसती, स्पेनच्या गादीसंबंधानें होहेंझोलर्न घराण्यानें आपली उमेदवारी काढून घेतल्यावर नेपोलिअननें जर तें प्रकरण तेथेंच संपवितें असतें व मग आज नाहीं उद्यां जें युद्ध आपणांस करावें लागणार हें त्यास ठाऊक होतें, त्या युद्धाकरितां दोस्त मिळविण्याच्या कामास तो लागला असता तर वर सुचविलेली ऑस्ट्रिअ ची मदत त्यास संपवितां आली असती. ऑस्ट्रिआची युद्धाची तयारी नव्हतीच; त्यांतहि ऑस्ट्रिआच्या दोनअंगी राज्यापैकीं एका संपूर्ण व महत्त्वाच्या अंगाचा युद्धाला विरोध होता. अज्ञा स्थितींत एकदम या युद्धांत शिरण्याचा नुसता विचार सुद्धां मनांत आणण्याची ऑस्ट्रिआची सोय नव्हती कदाचित् या युद्धांत पडण्यास ऑस्ट्रिआ तयार झालाच तर त्याचा प्रतिकार करण्याची तजवीज आपल्या बिनचूक दृष्टीनें बिझमार्क यानें करून ठेविली होतीच. ऑस्ट्रिआ फ्रान्सच्या मदतीस पुढें सरसावल्यास रशिआ ऑस्ट्रिआवर चाल करून येईल असा धोका होता आणि आपण पहिली गोष्ट होऊ दिली तर रशिआची स्वारी खास होणार असें मानण्यास बेयूस्ट यास चांगलेंच कारण होतें.

तूर्त ऑस्ट्रिआ तटस्थ राहतो.

ता. १८ जुलई रोजीं हिएन्ना येथें मंत्रिमंडळाची सभा भरून तींत या गोष्टींचा विचार झाला. या समेंत असें ठरलें कीं, रशिआ

प्रत्यक्ष प्रशिआशीं सहकार करूं लागेपर्यंत ऑस्ट्रिआनें तूर्त तटस्थ राहावें; परंतु जर फ्रेंच सैन्याला जोरानें दक्षिण जर्मनींत प्रवेश करण्याच्या कामीं यश आलें तर मात्र ऑस्ट्रिआनें आपल्या सर्व सैन्यानिशीं फ्रान्सच्या मदतीस यावें. पॅरिस येथें प्रिन्स मेटर्निक यास बेयूस्टनें खलिता पाठवून त्यांत असें म्हटलें होतें कीं, एकदम युद्ध जाहीर केल्यास रशिआ समरांगणांत येण्यास चुकणार नाहीं; परंतु ऑस्ट्रिआची तयारी होईपर्यंत रशिआची जर नजरभूल करतां आली व दरम्यान ऑस्ट्रिआनें युद्धांत पडण्यास अनुकूल अशी स्थिति उत्पन्न झाली तर ऑटिआ युद्ध पुकारील. आपण शस्त्रास्त्रांनीं सिद्ध होऊन या तंट्यांत पडूं असें ऑस्ट्रिआनें इटलीशीं ठरविलेंहि आहे व म्हणून रोम सोडून देऊन इटलीची सहानुभूति व साहाय्य संपादन करण्याविषयीं फ्रेंच बादशहास आग्रह करा असेंहि बेयूस्ट यानें मेटर्निक यास त्या खलित्यांत लिहिलें होतें.

इटली.

याच वेळेस तिसरा नेपोलिअन हा इटलीच्या राजापाशीं ऑस्ट्रिआ, इटली व फ्रान्स या तीन ह्यांमध्यें दोस्ती घडवून आणण्याची वाटाघाट करण्यांत गुंतला होता. याच वाटाघाटीवरून ता. २ आगस्ट रोजीं फ्रेंच सैन्यानें पोपचीं संस्थानें सोडून दिलीं प्रारंभींच फ्रेंच सैन्यास यश मिळाल्यास, ऑस्ट्रिआप्रमाणें, इटलीहि लागलीच फ्रेंचांबरोबर सहकार करण्यास तयार होता. ता. १५ सेप्टेंबरला जर दक्षिण जर्मनींत फ्रान्सची सरशी असली तर ऑस्ट्रिआ व इटली

दोघे मिळून प्रशिआच्या विरुद्ध युद्ध पुकारतील असें तोंडी ठरलें. इतकेंच नव्हे, तर ह्या ठरावांचा प्रत्यक्ष लेखी मसुदाहि तयार होता. परंतु युद्धास एकदम आरंभ होऊन एकामागून एक गोष्टी घडूं लागल्यामुळें पक्का तहनाम्यावर सह्या होण्याचें राहून गेलें.

या अटींवरून असें स्पष्ट ध्यानांत येईल कीं, संनिध आलेल्या युद्धांत अखेरीस जयश्री त्या पक्षास वरणार होती कीं ज्या पक्षास आरंभींच चांगला जय मिळेल.

जर्मनीची अनुकूल वेळ.

युद्धारंभीं जय मिळाल्यानें जे फायदे होण्यासारखे होते ते जर्मनीच्याच पदरांत पडणार. कारण या महायुद्धांत फक्त प्रशिआ शिरला असें नसून सर्व जर्मनी या युद्धांत शिरला हें बहुतेक निश्चित होतें. कांहीं दिवसांपूर्वीपासूनच फ्रान्सशीं होणाऱ्या युद्धांतील सैन्यासंबंधीं योजनांचा विचार करण्यांत कौंट मोल्टके गुंतला होता. सन १८६८ सालीं, म्हणजे दोन वर्षांपूर्वीच, उपयोगांत आणावयाच्या सैन्याची रचना, धरून ठेवावयाच्या जागा, सामग्री वाहून नेण्याचीं साधनें या सर्व गोष्टींच्या व्यवस्थेसंबंधीं मुद्दे त्यानें लिहून ठेविले होते. निरनिराळ्या पलटणींचे अधिपति व त्यांच्या हाताखालचे अधिकारी यांनीं हे मुद्दे व त्याविषयींचे हुकूम यांचा काळजीपूर्वक अभ्यास केला होता. कोणतीहि गोष्ट, मग ती कितीहि क्षुल्लक असो, त्याच्या विचारांतून सुटली नव्हती. म्हणून ता. १६ जुलई रोजीं युद्धास सज्ज होण्याबद्दल हुकूम सुटला तेव्हां प्रत्येक सैन्यभागानें

कोणत्या दिवशीं व कोणत्या तासाला कूच करण्यास आरंभ करावा एवढेच कायते हुकूम पत्रांत घालावयाचे उरले होते. फ्रेंच बादशहा आपलें मुख्य सैन्य दक्षिण जर्मनींत होईल तितकी घाई करून घेऊन येईल असें मोल्टके याच्या अगोदरच मनांत येऊन त्यानें दक्षिण संस्थानां-तून येणाऱ्या कुमकीनें उत्तरेकडे चाल करून येऊन व्हाईन नदीच्या मध्यावर प्रशिअन सैन्यास मिळावें, व मग अशा जागेवर तळ द्यावा कीं तेथून, चाल करून येणाऱ्या शत्रुसैन्याच्या बगलेवर व पिछाडी वर घाला केव्हां पडेल याचा नेम नाहीं, अशी शत्रूस दहशत राहावी. फ्रेंच सैन्यानें दक्षिण जर्मनीवर स्वारी केली नाहीं, तर या जागेच्या छावणीचा दुसऱ्या हालचालीस जास्तच चांगला उपयोग होणार होता. मग हें सयुक्त सैन्य सार्ब्रुकेनपासून लँडापर्यंत पसरलेलें असल्यामुळें त्यास फ्रान्सवर चाल करून जाऊन सरहद्दीवरील फ्रेंच सैन्याचा व पॅरिसचा संबंध सहज तोडून टाकितां आला असता. ज्या जर्मन सैन्यानें फ्रेंच सरहद्द ओलांडून जावी अशी योजना होती त्या सैन्याला ४ आगष्टच्या सुमारास पुढें सरकतां येईल असा कौंट मोल्टके याचा अंदाज होता. दक्षिण जर्मनीच्या संबंधीं फ्रेंच सैन्याच्या कशा हालचाली होत आहेत हें नक्की समजे-पर्यंत दक्षिणेकडून येणाऱ्या सैन्याचें कूच थोपवून धरणें हेंच जास्त विचाराचें आहे असें मोल्टके यास वाटलें. असें केल्यानें सैन्याचा एखादा भागच शत्रूच्या मोठ्या सैन्याच्या तडाक्यांत सांपडण्याची भीति रहणार नाहीं हें निश्चित होतें. टेहळणी करण्याकरितां व पाठीमागून मदत येऊन पोंचेपर्यंत शत्रूनें चाल करून येण्यास आरंभ

केल्याबरोबर त्यास हटकतां यावें म्हणून मोल्टके यानें प्रत्यक्ष सरहद्दी-वर बेताबाताचीं शस्त्रें धारण करणारें थोडेसेंच सैन्य ठेविलें.

फ्रान्सला अनुकूल वेळ.

अगदीं वेळ न घालवितां आपण दक्षिण जर्मनीवर स्वारी केल्यास तें आपणास फार फायदेशीर होईल असें फ्रेंच बादशाहा चांगलें जाणून होता. मेट्झ येथें १,५०,००० सैन्य व १,००,००० सैन्य स्ट्रॅस्बर्ग येथें एकत्र करावें आणि या दोन्ही सैन्यासह बॅडेनमध्यें शिरावें, व याच वेळीं चॅलन्स येथें जाणाऱ्या तिसऱ्या सैन्यानें जर्मन सैन्यापासून सरहद्दीचें संरक्षण करावें असा बादशाहाचा बेत होता. हा बादशाहाचा बेत त्याला जर अंमलांत आणतां आला असता तर अत्युत्तम झालें असतें खरेंच. कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें फ्रान्सला युद्धाच्या आरंभींच यश मिळणें याचा अर्थ ऑस्ट्रिआ व इटली हीं दोन्ही राष्ट्रें त्याच्या मदतीस सैन्यासह लागलींच आलीं असतीं असा होता. परंतु युद्धारंभींच फ्रान्सची तयारी त्याच्या कडक टीकाकारांना वाटत होती त्याहिपेक्षां फार कमी होती व फ्रेंच सैन्याची सर्वतोपरी अत्यंत अवनति झाली होती यांत संशय नाहीं. मेट्झ व स्ट्रॅस्बर्ग ह्या ठिकाणीं खूप सैन्य गोळा झालें होतें खरें. परंतु मोदीखाना व सामानवाहक हीं दोन खातीं अत्यंत शोचनीय स्थितींत होतीं व तीं सुधारून घेण्याचीहि आशा नव्हती. सैन्याला हलतां येईना. हे अनिष्ट प्रकार दूर करण्यास वेळ पाहिजे होता व वेळ ही अशी एक चीज होती कीं, तिच्यावर सेनापतींची हुकमत मुळाचें

चालणार नव्हती. या सावळ्या गोंधळांतून थोडीबहुत व्यवस्था लावण्यांत एक एक दिवस फ्रेंच सैन्याचा जसजसा जात चालला तसतसें जर्मन सैन्य आपल्या उद्दिष्ट स्थानाजवळ जवळ येत चाललें. तीं स्थानें त्या सैन्यानें एकदां गांठल्यावर बादशाहाला आपल्या बेताप्रमाणें स्वारी करणें अशक्यच झालें असतें. ता. २८ जुलई रोजीं बादशहा राजपुत्रास बरोबर घेऊन मेट्झ येथें जाण्यास निघाला. तो त्याच दिवशीं तेथें पोहोंचला व त्यानें सर्व सैन्याचें आधिपत्य आपल्या हातीं घेतलें. दुसऱ्या दिवशीं त्याचे सेनापति त्यास सेंट ॲन्ह्रॉइड येथें भेटले व त्यानें त्यांस आपले बेत कळविले युद्ध पुकारल्यापासून बादशहाचे पुष्कळ भ्रम दूर होत चालले होते. आपण एकवटलेल्या जर्मन सैन्यबलाबरोबर झगडत आहों; आपल्या पूर्वसंकल्पनेप्रमाणें आपण दक्षिण जर्मनीवर चढाई केल्यास ट्रेव्हीज व मॅन्हीम यांच्यामध्यें जें जर्मन सैन्य येऊन बसलें आहे, तें पॅरिसवर हल्ला करण्यास कधींहि चुकणार नाहीं, ती रेषा आपणास धरून बसणें भागच आहे; ह्या सर्व गोष्टी आतां त्याच्या स्पष्टपणें ध्यानांत आल्या. तथापि चढाई करण्यास तो अत्यंत उत्सुक होता, म्हणून त्यानें आपल्या सेनापतींस पुढील हुकूम दिले. दुसरी, तिसरी व पांचवी पलटण घेऊन बेझेन यानें सार्ब्रुकेन येथें सार नदी ओलांडावी; त्याच्या डाव्या बगलेला चौथ्या पलटणीनें आधार देऊन आपण सार्लुईवर हल्ला करण्यास जातों आहों असें मिष करावें; व इकडे मॅकमेहन यानें स्ट्रॅस्बर्गच्या जवळील आपल्या ठाण्यापासून पुढें सरकून बेझेनच्या उजव्या बगलेस आधार द्यावा सार नदीच्या संरक्षणाची

शत्रूची तयारी बेताबाताची आहे असें बादशहास वाटण्यास कांहीं कारण होतें

बादशहाची योजना सिद्धीस नेणें अशक्य होतें.

परंतु बादशहाच्या सेनापतींनींच त्याचा बेत अशक्य होता असें त्यास समजावून सांगितलें. सेनापति बाहशहास म्हणाले कीं, "पॅरिस येथील लोकांच्या उत्साहातिरेकाच्या बरळण्यावरून आपणांस युद्धोपयोगी असे २,००,००० सैनिक तयार असतील असें वाटलें होतें परंतु तीन लाखांच्या ऐवजीं मोठ्या मारामारीनें १,८६,००० लोकच काय ते जाग्यावर मिळतील. सैन्य हलविण्यास लागणाऱ्या गोष्टींपैकीं प्रत्येक गोष्ट अपुरी आहे. ज्या खात्यांत अव्यवस्था नाहीं असें आज एकहि खातें नाहीं." म्हणून बादशहाला निखालसपणें चढाई करण्याचा विचार सोडून द्यावा लागला. आपला मूळ उद्देश सोडून देण्यास बादशहा फार नाखुषीनें तयार झाला. कारण कसेंहि करून पाऊल पुढें टाकण्याचें केलें नाहीं तर त्याच्या पाठीशीं पॅरिसचे लोक दंगा करण्यास अगदीं एका पायावर तयार होते. युद्धासंबधीं एखादी गोष्ट साधण्यापेक्षां राजधानींतील प्रक्षुब्ध लोकांस शांत करण्याकरितांच ता. २ ऑगस्ट रोजीं तो ६०००० लोक येऊन सार्ब्रुकेनच्या दिशेनें पुढें गेला. त्या ठाण्याचे संरक्षक ४०० पेक्षां कांहीं कमीच होते व त्यांच्याजवळ फक्त ६ च तोफा होत्या. फ्रासार्ड याची पलटण, पायदळ तुकड्या व चार तोफांच्या रांगा इतक्यांच्या मदतीनें बादशहानें सार्ब्रूकेनवर हल्ला चढविला. ह्यांनीं त्या जागेच्या मठ-

भर संरक्षकांस जागा सोडून देणें भाग पाडिलें. परंतु सारनदीच्या पुलावरहि संरक्षक नाहींत असें पाहूनहि फ्रासार्ड यानें नदी उतरून जाण्याचा प्रयत्न केला नाहीं. जर्मन सैनिक मोठ्या शौर्यानें आपलें रक्षण करीत मागें हटले त्यावरून फ्रासार्ड यास त्यांची संख्या वास्तविक होती त्यापेक्षां जास्त आहे असें वाटलें व त्यांच्यामागें फार मोठें सैन्य त्यांच्या बचावार्थ आहे, असाहि त्याचा समज झाला.

तथापि ह्या युद्धांत एवढाच हा एक प्रसंग कीं, त्यावेळीं बादशहाला लोकांना धीर येईल अशी तार पॅरिस येथें पाठवितां आली. " आपल्या सर्वांच्या आशांची मदार आतां राजपुत्रावरच असणार. त्याला युद्धांतील गोलंदाजीची दीक्षा आज मिळाली आहे. फ्रेंचांनीं चालून जाण्याच्या मार्गापैकीं आज पहिला टप्पा गांठला आहे " असा बादशहाच्या तारेचा आशय होता.

फ्रेंचांचे भ्रम दूर होऊन ते जागे होऊं लागतात.

लवकरच बादशहास समजलें कीं, शत्रूनें आपला सर्व सैन्यभार सरहद्दीच्या रेषेवर गोळा केला आहे व तो आंत पहिली झप टाकण्याच्या बेतांत आहे. वास्तविक मोल्टके यानें नुसते घोडेस्वार चोहींकडे पाठवून शत्रूच्या हालचालींची इत्थंभूत बातमी ठेविली. इतकेंच नाहीं, तर फ्रेंचांच्या धरसोडीच्या वर्तनाची व अनिश्चितपणाची त्यास पूर्ण माहिती असून त्यांची ठरीव अशी योजना कांहींच नाहीं हेंहि त्यानें ओळखिलें होतें. हे घोडेस्वार कोणीकडच्या कोणीकडून एकाएकीं पुढे आलेले दोनतीन वेळां दिसले.

तेव्हां फ्रेंच सैनिकांना आपली स्थिति मोठी धोक्याची आहे असें वाटूं लागलें व हीच स्थिति त्यांच्या अधिकाऱ्याच्याहि मनाची लवकर झाली. फ्रेंच सैन्याला एवढें स्पष्ट कळून चुकलें कीं, आपल्यावर वाटेल त्याक्षणीं हल्ला होणार परंतु तो कोठून व हल्ला करणांची संख्या किती असेल ह्याची मात्र त्यांस कांहींच कल्पना होईना. ह्यामुळें सैनिकांच्या मनाची घरसोड वाढत जाऊन त्यांची फारच चलबिचल उडाली. परस्परविरोधी असे हुकूम इतक्या झपाट्यानें सुटूं लागले कीं, हें पाहून मन अगदीं चकित होई. शिपाई अनिश्चित धोरणामुळें फार त्रासून गेले व त्यांचा आत्मविश्वास कमी होत चालला; अधिकाऱ्यांनाहि मुकर अशी योजना झटपट अंमलांत आणण्याचा धीर होईल.

वायसेनबर्ग व त्यापुढें फ्रेंच सैन्याची उडालेली त्रेधा.

फ्रेंच सैन्याची धरसोड व पुढें मागें कूच करीत जाणें व येणें असा घोटाळा चाललाच होता. इतक्यांत फ्रेंचांना पुढील खरी बातमी मिळाली. मोठ्या शत्रुसैन्यानें वायसेनबर्ग येथें मॅक् मेहच्या सैन्याच्या आघाडीच्या तुकडीवर छापा घालून तिचा मोड केला. लागलीच नेपोलिअन यानें पांचव्या पलटणीनें बिटस्के येथें जमावें असा हुकूम सोडला व तिसऱ्या पलटणीची एक तुकडी सार्जेमंड येथें पाठविली. या मागून दुसरेहि हुकूम सुटले. ता. ५ आगष्टच्या हुकुमाप्रमाणें ऱ्हाइन सैन्याचे दोन भाग केले गेले. आलसेस येथील सैन्य मॅक् मेहन याच्या हुकमतींत दिलें व लोरेन येथील सैन्य

वेझेन याच्या हाताखालीं दिलें, आणि बादशाहानें गार्ड पलटण आपल्याच हाताखालीं ठेविली. ता. ७ च्या हुकुमांत दुसऱ्या पलटणीनें बिटस्के येथें, तिसरीनें सार्म्यूमंड येथें, चौथीनें हॉल–हॉम्बर्ग येथें व गार्डांच्या पलटणीनें सेंट ॲन्हॉइड येथें जावें असें होतें. ह्या हुकुमांवरून शत्रूचें मोठें सैन्य समोर असतां फ्रेंच बादशहाचा बेत बाजूनीं चाल करून जावयाचें असा होता हें उघड दिसतें फ्रेंच सैनिकांची संख्या जर्मन सैनिकांच्या संख्येपेक्षां कमी होती, पुष्कळ तुकड्या अजून पूर्ण बनल्या नव्हत्या सर्व सामग्री मागेंच होती, व ती हळू हळू हातीं येत होती अशी सैन्याची स्थिति असतां बादशहाला एकच तरणोपाय होता; तो उपाय म्हणजे अशा एका जागीं सर्व जमवावयाचें कीं तेथून पाठीमागच्या रस्त्यांवर चांगली नजर ठेवितां यावी व हल्ला करणें अवश्य झाल्यास तेथून तो करण्यासहि ती जागा सोईची असावी. परंतु खरा प्रकार असा होता कीं, बादशहाला जर्मन लोकांच्या हालचालींची निश्चित माहिती मुळींच नव्हती. व पुढें सरण्याविषयीं तो फार उत्सुक असतांहि पलटणींची घटना पूर्ण होईपर्यंत तसें करण्याची त्याची छाती होईना. या दोन्ही गोष्टींमुळें बादशहाचा फार गोंधळ उडून गेला व नेटानें कोणताहि गोष्ट त्याच्या हातून होईना. एका बगलेच्या सेनापतींना त्यानें जे सर्व साधारण हुकूम काढिले ते दुसऱ्या बगलेच्या सेनापतींस धाडण्याचेंहि तो विसरला. उदाहरणार्थ मॅक. मेहन याला काय हुकूम देण्याचा बादशहाचा विचार होता हें वेझेन यास ता. ५ रोजींहि माहीत

नव्हतें. बादशहानें बगलेनें कूच करावें असें ठरविलें आहे, हें खालच्या सेनापतींपैकीं एकासहि ठाऊक नव्हतें. फ्रासार्ड, स्पिकेरेन येथें परत गेला होता, त्याला आपल्या ठिकाणाला सुरक्षितपणा नाहीं असें वाटल्यावरून मला सार्ब्रूकेन रांगेपासून परत जाण्याची परवानगी असावी असें त्यानें लेबूफ यास सुचविलें. तुम्ही फोर्ब्याककडे परत जा असें उत्तर त्याला आलें, परंतु त्याच्यावर हल्ला झाल्यास त्यानें कसें धोरण धरावें याविषयीं कोणताहि हुकूम त्यास देण्यांत आला नव्हता; व बादशहानें कोणत्या हालचाली करण्याचें योजिलें आहे हेंहि त्यास कळविलें नव्हतें. सुटलेल्या प्रत्येक हुकुमावरून हुकूम सोडणाऱ्याच्या मनाचा अगदीं गोंधळ उडून गेला आहे असें स्पष्ट दिसून येत होतें.

मॅक्. मेहन, डयूए, वायसेनबर्ग.

आतां आपण मॅक्. मेहन आणि त्याच्या व त्याच्या सेनापतींच्या हालचालींचा विचार करूं. युद्धाला आरंभ झाला तेव्हां मॅक्. मेहन हा ४५००० सैनिकांसह स्ट्रॅस्बर्गच्या आसपास व जनरल डयूए हा १२,००० सैनिकांसह वायसेनबर्ग येथें होता. मेट्झ येथें जो घोटाळा उडाला होता तसाच घोटाळा येथेंहि झाला होता. मॅक्. मेहन यास मिळालेले हुकूम अत्यंत मोघम स्वरूपाचे होते; डयूएला तर मुळीं हुकूमच सुटले नव्हतें. तथापि त्याच्या समोरच जर्मन सैन्यें जमत चाललीं होतीं. ता. ४ ऑगस्ट रोजीं जर्मन सैन्याच्या डाव्या बाजूचा सेनापति, प्रशिआचा क्रौन प्रिन्स, यानें सरहद्दीवरील लाटेर नदी

20 APR 1990

ओलांडली; व दुसरी बव्हेरिअन आणि पांचवी प्रशिअन अशा दोन पलटणी मिळून ४०,००० सैन्य होतें, त्यासह जो वायसेनबर्गवर चाल करून गेला, त्याच्या आघाडीचे रक्षक शहराजवळ आल्याबरोबर फ्रेंच संरक्षकांनीं त्यांच्यावर तोफांचा भडिमार सुरू केला. क्रौन प्रिन्सनें त्या ठिकाणावर एकदम जोराचा हल्ला चढविण्याचें ठरविलें. डयूए यानें आपलें सैन्य शत्रूला हल्ला करण्यास कठीण अशा जागीं उभें केलें होतें. या सैन्यापैकीं एक लहान भाग शहराचें संरक्षण करीत होता. या शहरामोंवतीं साधी भिंत मात्र होती. बाकीचें सैन्य शहराच्या दक्षिणेस दोन मैल अंतरावर गाइस्बर्ग टेकडीवर लढाईच्या तयारीनें ठेविलें होतें. ह्याच जागेवर क्रौन प्रिन्सनें मुख्य हल्ला चढविला. लढाई फार जोराची झाली. हल्ला करणारें सैन्य व संरक्षण करणारें सैन्य यांच्यामध्यें निश्चय बल व धैर्य हीं कोणत्या बाजूला जास्त आहेत हे दाखविण्याची जणूं काय स्पर्धाच लागली होती. परंतु जर्मन सैन्य फ्रेंच सैन्यापेक्षां फार भारी असल्यामुळें अखेरीस आपलाच जय होईल असें मनांत आणण्यास डयूए यास जागाच नव्हती. फ्रेंच सैन्यानें पांच तास शत्रूस नेटानें तोंड दिलें. परंतु अखेरीस जर्मन सैन्य विजयी झालें स्वतः डयूए लढाईत पडला, पण त्याच्या शिल्लक राहिलेल्या लोकांनीं धैर्य सोडलें नाहीं. जर्मन सैन्यानें या उरलेल्या सैनिकांस परत जातां येऊं नये म्हणून प्रयत्न केला; परंतु फ्रेंच सैन्यानें त्यास न जुमानतां वायसेनबर्गच्या दक्षिणेस दहा मैल अंतरावर मॅक्. मेहन याच्या सैन्याचा तळ होता तेथें जाऊन त्यास मिळण्याचा प्रयत्न केला, व हा त्यांचा प्रयत्न सफळ झाला.

मॅक्. मेहनवर्थ येथें लढाई देण्याकरितां तळ देऊन बसतो.

ज्या दिवशीं क्रौन प्रिन्स यानें वायसेनबर्गवर हल्ला करून तें घेतलें त्याच दिवशीं तिसऱ्या जर्मन सैन्याची बॅडेन–वर्टेंबर्गची पलटण क्रौन प्रिन्स याच्याच हुकमतींत होती, तिनें पुढें चाल करून जाऊन लॉर्टेबर्ग येथें तळ दिला होता. त्याच दिवशीं संध्याकाळीं सर्व तिसऱ्या जर्मन सैन्यानें फ्रेंच सरहद्दींत शिरून उघड्या मैदानांत तळ दिला. दरम्यान डयूएचा पराभव झाल्याचें वर्तमान ऐकून मॅक्. महनरीक्शोफेन येथें गेला व तेथें डयूएच्या तुकडींतील पराभूत होऊन उरलेलें सैन्य त्यानें आपल्या सैन्यांत मिळवून घेतलें. कांहीं झालें तरी शत्रूस लढाई देण्याचें टाळावयाचें नाहीं असा त्याला बादशहाचा हुकूम होता, म्हणून त्यानें ज्या टेकड्याचे वर्थ, फ्रास्कीलर, एल्साशासेन हीं खेडीं मध्यबिंदु आहेत त्या टेकड्यांवर तळ दिला. त्याच्या बरोबर ४७,००० सैन्य होतें, परंतु डी फेली याच्या हाताखालची पांचवी पलटण रीक्शाफेनपासून १७ मैल अंतरावर बिट्स्के येथें होती. मॅक्. मेहन यानें डीफेली यास तुम्ही विलंब न लावतां मला येऊन मिळाव असा निकडीचा हुकूम पाठविला होता. परंतु डीफेली यानें हा हुकूम अमान्य केला.

ज्या जागेवर मॅक्. मेहन यानें आपल्या सैन्याची मांडणी केली होती त्या जागीं संरक्षण करणारांस पुष्कळ सोई होत्या. त्याच्या तळाची पुढची बाजू साऱ्र्याक या लहानशा नदीनें सुसंरक्षित होती. याच नदीवर वोर्थ हें खेडेगांव होतें व हेंच खेडें या जागेचा मध्य

गंडर्शोफेनपासून येणाऱ्या रस्त्यावर व वोर्थच्या उजव्या बाजूच्या पिछाडीस एल्साशासेन हें खेडें होतें. ह्या खेड्याच्या उजव्या बाजूला नीडर्वाल्ड नदीचा आधार होता, व त्याच्या पलीकडल्या बाजूला एबर्ब्याक हें खेडें होतें. या जागेच्या उजवेकडील टोंकाला मार्सब्रोन हें खेडें आहे, तें एल्साशासेनच्या आग्नेयीस येतें. वोर्थच्या पाठीमागें रीक्शाफेनकडे जाणाऱ्या रस्त्यावर व दोन मैलापेक्षां कांहीं थोड्या जास्त अंतरावर फ्रास्कीलर हें खेडें आहे. हें खेडें या जागेची किल्ली होय. या जागेपासून फ्रेंच सैन्याची डावी बाजू एका दरडीपर्यंत मागें पसरली होती. ह्या दरडीवर पुष्कळ झाडी असून ही रीक्शाफेन याच्या समोर आहे.

वर्थची लढाई.

ता. ५ ऑगस्ट रोजीं क्रौन प्रिन्स यानें आपलें सैन्य हालविण्यास आरंभ केला व त्या दिवशीं रात्रीं त्यानें सल्झ येथें विश्रांति घेतली. या ठिकाणीं मॅक् मेहन यानें वर सांगितल्याप्रमाणें तळ ठेविल्याची बातमी त्यास मिळाली. आपल्या सैन्यानें एकत्र जमून दुसऱ्या दिवशीं सकाळीं फ्रेंच तळाकडे जाण्यास कूच करावें असा क्रौन प्रिन्स यानें ताबडतोब हुकूम दिला. थेट वर्थकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रूस्कडार्फ हें खेडें आहे. हें खेडें या हालचालीचा मध्यबिंदु होतें. परंतु आदल्या दिवशीं संध्याकाळीं सेनापति फॉन वाल्डर हा आपली पांचवी प्रशिअन पलटण बरोबर घेऊन गार्सडार्फ येथें पोहोंचला होता. ही जागा सार्न्याक नदी उतरून जाऊन वर्थच्या बाजूवर

हल्ला करण्यास फार सोईची होती. सकाळीं चार वाजतां कूच करून वाल्दर यानें ही योजना अंमलांत आणण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्याला यश येऊन सात वाजतां त्यानें फ्रेंच सैन्य वर्थ येथून हाकून लाविलें. नंतर मॅक्. मेहन यानें आपली आघाडी बदलली. वर्थ पुनः हस्तगत केलें व ११ वी प्रशिअन आणि पांचवी बव्हेरिअन या पलणींनीं फ्रास्क्वीलरवर मध्यंतरीं हल्ला केला होता तो त्यानें परतविला. क्षणभर असें वाटलें कीं, मॅक्. महन आपली जागा आतां सोडणार नाहीं. परंतु ११ व बारा यांचे दरम्यान् शत्रूनें पुनः हल्लयास आरंभ केला. एका पलटणीनें वथवर हल्ला केला व तें घेतलें; इतक्यांत दुसरीकडे ११ व्या प्रशिअन पलटणीनें गन्स्टेट टेकडीवर लावलेल्या ६० तोफांच्या मदतीनें मॅक् मेहन याच्या उजव्या बंगलेवर हल्ला केला. ह्या ठिकाणीं फ्रेंचांनीं त्यास कसून विरोध केला व फ्रेंच घोडेस्वारांनीं पुढें चालून येणाऱ्या जर्मन पायदळावर मोठ्या नेटानें हल्ला चढविला. फ्रेंच लोकांनीं निकरानें लढण्याची इतकी शर्थ केली कीं, त्यांच्यापैकीं $\frac{3}{4}$ लोक रणांगणावर मरून किंवा जखमी होऊन पडले, परंतु त्यांचा हा दीर्घ प्रयत्नहि व्यर्थ झाला. प्रशिअन्स नेटानें पुढें पाऊल टाकीत चालले, नीडर्वाल्ड नदींतून जोरानें त्यांनीं आपला मार्ग काढिला व एल्सासासेनवर चढाई करण्याचा त्यांनीं घाट घातला. उजव्या बाजूकडे फ्रेंच सैन्याची अशी दुर्दशा होत असतां मध्यभागीं याहिपेक्षां त्यांच्यावर दुर्धर प्रसंग लोटला. वर्थ हस्तग करून घेतल्यावर जर्मनांनीं वर्थ व फ्रास्कीलर यांच्यामधील खडकाळ अशा उतरत्या प्रदेशावर हल्ला करून तो हस्तगत केला,

व फ्रास्कीलरवर फारच भयंकर हल्ला चढविला. फ्रास्कीलरला फ्रेंच जागेची किल्ली म्हणून आतां इतकें महत्त्व केल्हांच आलें नव्हतें. कारण फ्रास्कीलर हा फ्रेंचांचा मध्य असून त्यांची उजवी बाजू मागें एल्साशासेन व नीडर्वाल्डन नदीपर्यंत व डावी बाजू रीक्शाफेनपर्यंत गेली होती. अकरावी प्रशिअन पलटण नीडर्वाल्ड नदींतून तिच्या पलीकडल्या बाजूवरील एल्साशासेनवर हल्ला करण्याकरितां चालली असतांना तिकडे पांचवी प्रशिअन व दुसरी बव्हेरिअन ह्या पलटणी फ्रास्कीलरवर हल्ला करण्याकरितां चालल्या होत्या. यापुढें शत्रूचा प्रतिकार करणें अशक्य होतें असें मॅक्. मेहन यास स्पष्ट दिसून आलें. अद्यापिहि तो फ्रास्कीलर धरून बसला, एल्साशासेन त्यानें सोडून दिलें, व उजवी बाजू रीक्शाफेनपर्यंत त्यानें मागें घेतली. मॅक् मेहनच्या सैन्य. ची सुरक्षितता फ्रास्कीलरचें संरक्षण चिकाटीनें करण्यावर अवलंबून होती. फ्रास्कीलरचा बचाव करण्यांत फ्रेंच लोकांचें अढळ शौर्य जसें दृष्टोत्पत्तीस आलें तसें या सर्व युद्धांत इतर कोठेंहि तें दिसून आलें नाहीं असें म्हणणें अगदीं यथार्थ आहे. त्यांच्यावर फार मोठ्या शत्रु सैन्यानें हल्ला केल्यामुळें प्रत्येक घराकरितां लढत लढत त्यांनीं त्या जागेचा बचाव करण्याचा प्रयत्न केला पण अखेरीस फ्रेंचांचा नाइलाज झाला. नंतर प्रथमच शिस्तीचीं बंधनें शिथिल झालीं व फ्रेंच सैनिकांच्या पोटांत दहशत उत्पन्न होऊन ते सैरावैरा सॅव्हर्नच्या दिशेनें पळत सुटले टेकड्या ओलांडून जाऊन ते सैनिक दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं सॅव्हर्न येथें पोहोंचले. ते सॅव्हर्नकडे

चालले असतांना त्यांची डी फेली याच्या तुकडीशीं गांठ पडली व त्यामुळें त्यांना मागें हटत असतां मोठा आश्रय मिळाला.

वर्थ येथील पराभवाचा परिणाम.

जर्मन सैनिकांची संख्या फ्रेंच सैनिकांच्या संख्येपेक्षां अमर्याद मोठी होती ही गोष्ट आपण विचारांत घेतली असतां, फ्रेंच लोकांच्या पराभवानें सुद्धां त्यांच्या कीर्तींत भरच पडली असें आपणांस म्हटलें पाहिजे. तथापि या त्यांच्या पराभवामुळें त्यांची हानि मात्र दुप्पट झाली. कारण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें झालेल्या मनाच्या घोटाळ्यामुळें फ्रेंच शिपायांची हिंमत अगोदरच खचली होती व त्या मागोमाग हा पराभव झाला. वर्थ येथें जय झाला असता तर गतकालीं झालेल्या चुक्यांचें उट्टें पुष्कळसें निवून आलें असतें. पराभवामुळें चुक्यांचे दुष्परिणाम किती तरी पटीनें जास्त वाटले. जर्मन लोकांनीं ९००० फ्रेंच लोक कैद केले, ह्यासुद्धां फ्रेंच लोकांचें २४००० सैन्य कामास आलें, असा अदमास होता. जर्मनांचें नुकसान अजमासें १०००० सैनिकांपर्यंत झालें. त्यांना २२ तोफा, दोन निशाणें व ६ यांत्रिक बंदुका इतकें शत्रूचें साहित्य मिळालें.

लढाईचा निकाल ऐकून बादशहाला अत्यंत दुःख झालें. ता. ७ रोजीं संध्याकाळीं आपल्या पक्षाच्या लोकांची उमेद खचूं नये म्हणून त्यानें अपजयाची बातमी कळवितांना तारेंत पुढील वाक्य घातलें होतें:–"सर्व कांहीं सुरळीत होईल." परंतु त्याची ही समज अगदीं चुकीची होती. वर्थ येथें क्राउन प्रिन्स भॅक्. मेहमचा

धुव्वा उडवीत असतांना ज्या ठिकाणीं फ्रान्सचा राजपुत्र गोलंदाजीची दीक्षा घेत होता, त्या ठिकाणीं जवळच एक वृत्तांत घडून येत होता. हा वृत्तांत ह्या युद्धांत घडलेल्या महत्त्वाच्या गोष्टींपैकींच एक होता असें मानणें जरूर आहे.

जर्मन आणि फ्रासार्ड तुकडी.

ता. २९ रोजीं मॅन्हीम आणि मेयन्स यांच्यामधील भागावर प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या हुकमतींतील दुसऱ्या जर्मन सैन्यानें ठरलेल्या जागीं तळ दिला होता. तेथून मेयन्सच्या पलीकडे २६ मैलांवर अल्सेन्झ–ग्रनस्टॅड रेषा होती, तिच्यावर आपलें सर्व सैन्य जमवावें, असा प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याला हुकूम होता. ह्या रेषेच्या पलीकडे कूच करण्याच्या मार्गांत कांहीं अडचणी होत्या. कारण ह्या रेषेचा नैर्ऋत्य व आग्नेयीकडे न्युन्कर्चेन–इवीब्रूकेन यांच्यामध्यें व्होजेस पर्वतांच्या शिखरांची ४० मैल रुंदीची ओळच्या ओळ होती. ही ओळ ओलांडून जाण्यास फक्त खडकाळ अशाच वाटा होत्या; आणि जरी या वाटांपैकीं प्रशिअन सैन्याच्या खऱ्या उजव्या बाजूकडील दोन वाटा सैन्याला चाटून जाण्यासारख्या होत्या, तरी बाकीच्या वाटा टेकड्यांतून अर्ध्या मार्गावर कैसर्स्लाटर्न येथें एकाच वाटेस जाऊन मिळाल्या होत्या व अशा रीतीनें ह्या वाटा हॉम्बर्गपर्यंत गेल्या होत्या. येथून सैन्याची आघाडी २ मैलांवर होती. ह्यामुळें दुसऱ्या जर्मन सैन्याला न्युन्कर्चेन–इवीब्रूकेन या रेषेवर येऊन आपली आघाडी लांबवर पसरण्यास बराच वेळ लागणार होता आणखी असेंहि होतें

कीं फ्रेंच सैन्य फोर्ब्याक येथें आहे हें माहीत होतें, आणि तें सैन्य जर झपाट्यानें चाल करून पुढें सरसावलें तर दुसऱ्या जर्मन सैन्याला आपल्या बचावाकरितां जागा धरून बसणेंच प्राप्त होतें. त्यांतहि ही नवी रेषा व फोर्ब्याक आणि सार्जेमंड यांच्यामध्यें २० मैलाचें अंतर होतें, व ह्या दोन ठिकाणीं फ्रेंच सैन्याचे काय बेत होते ते कळेपर्यंत जी पर्वताच्या शिखरांची ओळ जर्मन सैन्याचा ओलांडण्याचा विचार होता ती ओलांडण्यास तें सैन्य आरंभ करील हें शक्य नव्हतें. जर्मन सैन्य त्या डोंगराळ वाटांत शिरल्यावर हिंमतवान व हुशार अशा फ्रेंच सेनापतीनें फोर्ब्याक व सार्जेमंड येथील सैन्य घेऊन भराभर कूच करून येऊन जर त्याला गांठलें असतें, तर त्याची अत्यंत खराबी झालीच असती.

जर्मन सैन्य पुढें आल्याची कच्ची हकीकत.

तथापि ता. १ ऑगस्ट रोजीं आरंभादाखल व ता. २ पासून झपाट्यानें दुसऱ्या जर्मन सैन्यानें वर सांगितलेलें कठीण काम करण्यास आरंभ केला. तें सैन्य असें कूच करण्यांत गुंतलें होतें, इतक्यांत प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यास बातमी मिळाली कीं, फोर्ब्याक व सार्ग्यूमंड येथून पुढें येऊन फ्रेंच सैन्यानें सार्ब्रूकेनच्या टेकड्या सर केल्या. जर्मन सैन्याच्या हालचालींचा मुख्य चालक फॉन मोल्टके याच्या-सारख्या चलाख बुद्धीच्या माणसाच्या ध्यानांत तेव्हांच आलें कीं, या स्थानाच्या पलीकडे पुढें जाण्याचा शत्रूचा विचार नाहीं. म्हणून मोल्टके यानें त्याच दिवशीं संध्याकाळीं रेड प्रिन्स यास

तारेनें कळविलें कीं, तुम्ही अशा बेतानें पुढें जावें कीं कैसर-लाटर्न जवळच्या जंगलाच्या पट्टीसमोर म्हणजे न्यून्कर्चेन-इवीब्रूकेन रेषेवर तुम्हांस दुसऱ्या सैन्याची आघाडी विस्तृत करून मांडितां यावी; इकडे पहिलें सैन्य थोले येथें व तिसरें वीझेनबर्ग येथें जाईल. रेड प्रिन्स यानें हा हुकूम बरोबर अंमलांत आणिला. ता ४ पासून आपल्या सैन्याची मांडणी बरोबर करून तो युद्धाला अगदीं सज्ज होऊन राहिला. ता. ५ रोजीं रात्रीं त्याच्या पांचव्या व गार्ड पलटणींनें न्युन्कर्चेन, सेंट वेंडेल, इवीब्रूकेन, हाँबर्ग, कूसेल, लँड-स्टूहूल, आटबर्ग व मंक्वीलर हीं ठाणीं धरिलीं-हीं ठाणीं पहिल्या सैन्याच्या उजव्या बगलेशीं येऊन मिळालीं होतीं. तिसरें सैन्य लोरे-नमध्यें शिरून त्यानें कांहीं तरी विशेष कामगिरी केल्याचें कळल्या बरोबर पहिल्या व दुसऱ्या सैन्यांतील ३,२०,००० लोकांनीं एकदम मोठ्या थाटानें अलसेसमध्यें शिरावें, असा मोल्टके याचा इरादा होता. तथापि पहिल्या सैन्याचा सेनापति फॉन स्टाइन्मेट्झ याच्या कृतीमुळेंही मोल्टके याची योजना त्याला पाहिजे होती तशी सिद्धीस गेली नाहीं.

फ्रेंच सैन्याचा बेत दुसऱ्या प्रशिअन सैन्यावर हल्ला करण्याचा आहे असें स्टाइन्मेट्झ यास वाटल्यावरून दुसऱ्या सैन्याचें पुढें चाल करून जाण्याचें काम सुगम व्हावें म्हणून, शत्रूच्या सैन्याचें सर्व लक्ष आपणांकडे लागेल असें करावयाचें, असा स्टाइन्मेट्झ यानें ता. ३ रोजीं निश्चय केला. ह्या उद्देशानें प्रथम सार्लुइ-हेलेन हॉसेन या रेषेत

जाऊन तेथून दुसऱ्या दिवशीं सैन्यासह बौझान्व्हिले, बोले आणि सेंट ॲन्व्हाइड या रस्त्यांपर्यंत पुढें सरकून सैन्यासह टेहळणी करावयाची असें स्टाइन्मेट्झ यानें ठरविलें. याच रात्रीं मिळालेल्या हुकुमाप्रमाणें त्याला या योजनेंत फरक करावा लागला; आणि पहिलें सैन्य ता. ४ रोजीं थोले येथें एकत्र जमलें. ता. ५ ला तें तेथेंच राहिलें. परंतु बेन्डेल–सार्ब्रूकेन रस्ता दुसऱ्या सैन्याला पुढें येण्याकरितां तुम्ही खुला करून द्यावा असा इशारा स्टाइन्मेट्झ यास मिळाल्यावर सार नदी आपणास एका मजलींत गांठतां येईल अशा ठिकाणावर जाऊन तळ देण्याच्या हेतूनें तो पुढें निघाला. फ्रेंचांनीं दुसऱ्या सैन्यावर हल्ला केलाच, तर त्यांच्या बगलेवर ह्या ठिकाणावरून आपणास मारा करितां येईल अशी त्याची समजूत होती. त्याच्या सैन्याच्या १४ व्या तुकडीच्या आघाडीच्या रक्षकांनीं पुढें जाऊन, फ्रेंच सैन्यानें सार्ब्रूकेनच्या टेकड्या सोडून दिल्या होत्या त्यावर तळ दिला. ह्या ठिकाणीं आपण सुरक्षित आहोंत असें त्यास वाटलें. कारण जरी त्यांच्या समोरच्या उघड्या शेतांच्या पलीकडच्या बाजूला स्पिकेरेन टेकड्यावराल उताराच्या लोंबत्या झाडींत शत्रूचें २८००० लोक ९० तोफा ठेवून बसले होते. तरी त्या टेकड्यांवर इतक्या मोठ्या सैन्याचा तळ होता, असें कोणतेंहि चिह्न दिसत नव्हतें. राथबर्गच्या उतारावर फ्रेंच सैन्याच्या पायदळाच्या कांहीं तुकड्या दिसत होत्या खऱ्या व त्याप्रमाणेंच फोर्ब्याकच्या खोऱ्यांत लहान लहान टोळ्याहि दिसत होत्या खऱ्या. ह्या खुणांवरून प्रशिअन सैन्याच्या १४ व्या

तुकडीचा सेनापति फॉन कॅमेक याचा असा अंदाज झाला कीं, आपल्या समोर फारतर ७००० शत्रुसैन्य असावें.

या नंतर जी भयंकर लढाई झाली, तिचें वर्णन या स्थळीं थोडक्यांतच देणें भाग आहे. हेंडरसन या मेहनती व बुद्धिमान् लेखकानें या लढाईच्या वर्णनाचें एक लहानसें पुस्तक लिहिलें आहे. ज्या वाचकांना या लढाईची हकीकत माहीत करून घेण्याची व दोन्ही पक्षांच्या नायकांच्या या दिवशींच्या वर्तनावर टीका करण्याची इच्छा असेल त्यांनीं हेंडरसन याचें वरील पुस्तक वाचावें.

स्पिकेरेन पठार.

एका बाजूला सार नदीचें खोरें व दुसऱ्या बाजूला फोर्ब्याक यांच्यामध्यें चौरस आकृतीची एक डोंगर सपाटी आहे. त्या सपाटीचा स्पिकेरेन पठार हा एक पुढें आलेला ठळक भाग आहे. ही डोंगर सपाटी व सार्ब्रूकेन टेकड्यांची ओळ यांच्यामध्यें सेंट आर्नाल हें खोरें आहे. सेंट आर्नाल खेड्यापाशीं पूर्वेच्या बाजूची या खोऱ्याची रुंदी १००० कदम आहे. पश्चिमेच्या बाजूला राथबर्ग आणि रेट्पर्ट्सबर्ग यांच्यामध्यें ह्या खोऱ्याची रुंदी २०००० कदम आहे. ज्या ठिकाणीं राथबर्ग टेकडीचा भाग उत्तरेच्या बाजूला पुढें आलेला आहे, त्या ठिकाणच्या डाव्या बाजूच्या कोपऱ्याखेरीज करून या पठाराच्या वरंगळीवर दाट झाडी आहे व प्रत्येक बाजूला ह्या वरंगळी इतक्या उभ्या चढाच्या व तुटक आहेत कीं, ज्याच्या जवळ ओझें मुळींच नाहीं अशा माणसाला सुद्धां त्या चढून जाण्यास मोठे

आयास पडतात. पायथ्यापासून तों माथ्याच्या कडेपर्यंत डोंगराचे सुळके ओक व बीच या झाडांनीं पूर्ण आच्छादित आहेत. या झाडांच्या मधून झुडपें इतकीं विपुल वाढतात कीं, शस्त्रास्त्रानें सज्ज असलेल्या व रांगा न मोडितां जाणें जरूर असलेल्या सैनिकांस या ठिकाणीं हालचाली करितांना बऱ्याचशा अडचणी येतात. खोऱ्यापासून या डोंगरांच्या शिखराची उंची ३०० फूट आहे.

सार्ब्रूकेन डोंगराच्या ओळीवरून राथबर्ग शिखराकडे दृष्टि टाकल्यास या शिखराची उंची अगदींच थोडी आहे व त्यावर चढून जाणेंहि सोपें आहे असें वाटतें. परंतु पठाराची कडा दिसत नाहींशी होते, त्या ठिकाणीं पायथ्याच्या खोऱ्यापासून वर दृष्टि टाकल्यावर हें प्रस्थात शिखर भयंकर उंच आहे असें आढळून येतें. पातळीपासून या शिखराच्या माथ्यापर्यंत सुमारें १५० फूट उंची आहे. पूर्व-पश्चिम आणि उत्तर या बाजूंना हा उतार अगदीं उभ्या सुळक्यासारखा आहे व उंच उताराच्या टेकडीच्या बाजूला ज्या ठिकाणीं तांबूस खडक पुढें आलेला होता त्या ठिकाणीं हा उतार पराकाष्ठेचा उभाच्या उभाच आहे. या शिखराच्या पृष्ठभागाची रुंदी १५० फूट असून त्याच्यावर झाडझुडूप कांहीं नाहीं. हा पृष्ठभाग उंच सखल आहे व दक्षिणेकडे त्याचा चढ असून तो एका अरुंद कड्यानें पठाराशीं जाऊन भिडलेला आहे.

स्पिकेरेन सार्ब्रूकेन रस्ता नस्बर्गपासून निघून पुढें खोऱ्यांतून जातो व मग शिखराच्या पूर्व बाजूला वळसा घालून लाकडी ओंड-

क्याच्या पुलावरून पुढें जातो. या रस्त्यावरून तोफखाना नेणें शक्य होतें.

फ्रासार्डच्या सैन्याचा तळ-बेझेन.

जनरल फ्रासार्ड याचें सैन्य तीन तुकड्यांनीं बनलें होतें. ता. ६ ऑगस्ट रोजीं सकाळीं या तीन तुकड्या पुढें दिल्याप्रमाणें ठेविल्या होत्या:—पहिल्या तुकडीची—जोलिव्हेट याची ब्रिगेड स्टरिंग—वेंडेलच्या ईशान्येस; व्हॉलँझेची ब्रिगेड फोर्व्याकच्या पश्चिमेस; दुसरी तुकडी स्पिकेरेनच्या दक्षिणेस तीन मैलांवर आक्विंटजेन येथें, तिसरी तुकडी स्पिकेरेन येथें. त्याच दिवशीं सकाळीं लेबूफ यानें फ्रासार्ड यास तार करून कळविलें होतें कीं, आज तुमच्यावर हल्ला होण्याचा संभव आहे. फ्रासार्ड यानें कांहीं महत्वाच्या जागीं मोर्चेबंदी करण्यापलीकडे कांहींएक तयारी केली नाहीं. तथापि बेझेन बरोबर तारेनें त्याचें बरेंच बोलणें झालें. " मी तुमच्या मदतीकरितां दोन तुकड्यांना तुमच्याकडे जाण्यास हुकूम दिला आहे, परंतु तुमच्यावर फारच जोराचा हल्ला झाल्यास तुम्ही कॅलेंब्रान येथें मागें जावें, हें बरें " असा बेझेनच्या म्हणण्याचा आशय होता. पहिल्या जर्मन सैन्याची बरोबर परिस्थिति काय आहे हें घोडेस्वारांस टेहळणीस पाठवून समजून घेणें शक्य असतांहि तसें करणें अवश्य आहे ही गोष्ट बेझेन याच्या मनांत आली नव्हती असें उघड दिसतें. याच दिवशीं सकाळीं बेझेन स्वतः सार्लुई रस्त्यावर टेहळणी करीत असतां प्राशिअन ड्रूझार्सपैकीं एखाद दुसऱ्या घोडेस्वारांच्या टोळीनें त्याच्यावर गोळ्या

झाडल्या होत्या परंतु त्यांचा पाठलाग न करितां त्या रस्त्यावर चांगली नजर ठेवण्याकरितां बरेंचसें सैन्य घाडणें चांगलें, एवढेंच त्यानें फ्रासार्ड यास सुचविलें होतें.

तुमच्यावर जोराचा हल्ला झाला तर तुम्ही कॅलेंब्रान येथें मागें जाणें चांगलें, असें जरी बेझेन यानें फ्रासार्ड यास कळविलें होतें, तरी पूर्वी सांगितल्याप्रमाणें बेझेननें फ्रासार्ड यास कळविलें होतें कीं, "कॅलेंब्रानकडे जाणें अशक्य झाल्यास मी तुमच्या मदतीकरितां दोन तुकड्या तयार ठेवल्या आहेत." फोर्व्याक येथें युद्धाची सामग्री पुष्कळ होती ती लढाई न करितांच सोडून देणें फ्रासार्ड यास योग्य वाटलें नाहीं व आपणास कुमक खास येणार अशी त्याची ठाम समजूत झाली होती. या दोन कारणांमुळें लढाई दिल्याखेरीज जागा सोडावयाची नाहीं असा फ्रासार्ड यानें निश्चय केला. त्याची एक तुकडी स्पिकेरेनच्या टेकड्यावर व दुसरी राथबर्गवर होती. त्याच्या डाव्या बाजूला मदत करणारी ब्रिगेड स्टरिंग–वेंडेल येथें होती; दुसरी एक त्याच्या उजव्या बाजूच्या फ्याफेन झाडींत बसली होती. त्याच्या छावणीची लांबी ४७०० यार्ड होती व त्याच्या ताब्यांतील सैनिकांची एकंदर संख्या २७००० होती. त्यानें धरून ठेवलेल्या जागेंत कांहीं ठिकाणें शत्रूस हल्ला करण्यास कठीण होतीं परंतु त्याची जागा संरक्षण करण्यास मोठी भक्कम किंवा हल्ला करणारास दुर्भेद्य अशी नव्हती. शिवाय उलटून हल्ला करण्यासहि ती सोईची नव्हती. ज्या खोऱ्यानें प्रशिअन सैन्यास यावयास पाहिजे होतें, त्या खोऱ्यावर फक्त राथबर्गवरूनच तोफा चालविणें शक्य होतें.

फॉन कॅमेक राथबर्गवर हल्ला करतो.

सार्ब्रूकेन टेकडीवर प्रशिअन सैन्याच्या १४ व्या तुकडीच्या आघाडीच्या गार्डाच्या पलटणीसह तळ देऊन समोरच्या प्रदेशाची पाहणी करीत जनरल कॅमेक बसला होता, हें मागें सांगितलेंच आहे. त्याच्यापाशीं किंवा जवळपास १०,७५० संगिनीवाले सैनिक होते. तो ज्या टेकड्यांच्या माथ्यावर होता त्यांचा ताबा कायम राहण्यास राथबर्ग हस्तगत करून घेणें जरूर होतें. त्याच्या नजरेस ज्या गोष्टी आल्या त्यावरून त्याला वाटलें कीं, राथबर्ग टेकडीवर शत्रूचे लोक फार थोडे आहेत. पुष्कळ वेळ होय नव्हे करून नंतर फ्रेंच लोकांस घालवून देण्याचा निश्चय त्यानें केला.

बारा वाजण्याचे सुमारास कॅमेक यानें राथबर्ग टेकडीवरून फ्रेंच तोफखाना घालवून द्यावा, असा हुकूम सोडिला. मोठ्या शौर्यानें केलेल्या या उजव्या बाजूवरील हल्ल्यास फ्रेंच सैन्यानें मोठ्या नेटानें तोंड दिलें, कारण या ठिकाणीं हल्ला करणारापेक्षां फ्रेंच सैनिकांची संख्या बरीच जास्त होती. फ्रेंच तोफांच्या भडिमारानें प्रशिअन सैन्याचा फडशा पडूं लागला, व एकदां असें वाटलें कीं, प्रशिअन्स आतां मागें हटण्याच्या बेतांत आहेत. अडीच तास भयंकर युद्ध झाल्यावर दोन हजाराला कमी नाहीं इतकें प्रशिअन सैन्य फ्रेंचांकडे तोंड करून १४०० यार्ड लांबीच्या आघाडीवर सज्ज आहे व डाव्या बाजूवर व मध्यावर चढविलेल्या हल्ल्यांत प्रशिअन सैन्याचें पाऊल पुढें पडेल त्या मानानें हें उजव्या बाजूवर हल्ला करणारें २००० सैन्य पुढें सरकेल असें दिसून आलें.

याच अडीच तासांच्या अवधींत डाव्या बाजूवर हल्ला करणारे लोक बहुतेक सर्व वाटभर त्यांच्यावर तोफांचा मारा होत असतांहि एक तास कूच करून राथर्बर्ग टेकड्यांच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचले. या ठिकाणीं ह्या टेकड्यांचा चढ अगदीं उभा असून त्यांच्या पायथ्यापासून सपाट मैदान लागतें. तेथून हल्ला करणारे लोक आपल्या उजव्या बाजूच्या झाडींत शिरून रांगा मोडल्याची फिकीर न करतां झपाट्यानें पुढें सरले. ते अशा एका जागीं येऊन थडकले कीं, तेथचा चढ चढून जाण्यास सुगम आहेसा दिसला व त्यांनीं लागलींच तो चढून जाण्यास आरंभ केला. लवकरच ते बचाव करणाऱ्या फ्रेंच सैन्याच्या समोर आले. पुढें थोड्या अंतरावर आपल्यावर स्पिकेरेनवरील फ्रेंच सैन्याच्या तोफांचा भडिमार होत आहे असें त्यांस आढळून आलें. कांहीं वेळ त्यांची परिस्थिति अत्यंत बिकट झाल्याचें दिसलें उजव्या बाजूवर हल्ला करणाऱ्या सैन्यास मदत करण्याचें दूरच राहिलें, पण आपण होऊन धाडस केल्यामुळें अडचणींत सांपडलों, तेव्हां यांतून आपण निसटलों तर मिळविली असें त्यांस झालें. या प्रसंगांतून ते कसे पार पडले हें समजण्यास दोन्ही बाजूंकडे पुढें काय काय घडून आलें हें आपणांस अगोदर पाहिलें पाहिजे.

फॉन कॅमेक नवीन हल्ला चढवितो.

फ्रेंच सैन्य थोडें आहे व त्याला मागें जातां आलें तर त्याचा मागें हटण्याचा विचार आहे असें फॉन कॅमेक यास अजूनहि वाटत

होतें. म्हणून त्याच्या जवळ उरलेल्या दोन पायदळ पलटणी व तीन तोफांच्या रांगा यांसह आघाडीवर हल्ला करून काय परिणाम होतो हें पाहण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें आपल्या तोफा अशा ठिकाणीं लावल्या कीं, तेथून शिखरांचा बचाव करणारांवर थेट सारखा भडिमार व्हावा; व त्याच्यापुढें सरण्याच्या ठिकाणापासून स्पिकेरेनपर्यंत १५०० कदम जागा होती तीवरून आपलें पायदळ घेऊन तो पुढें गेला. या सैनिकांवर जोराचा मारा होत होता व त्यामुळें त्यांचे लोकहि पडत होते, तरी मोठ्या शौर्यानें तें सैन्य तसेंच पुढें गेलें व ज्या टेकड्या निकराचा हल्ला चढवून हस्तगत करण्याचा त्यांचा विचार होता, त्याच टेकड्यांचा आश्रय त्यांनीं केला. टेकड्यांच्या तुटकपणामुळें शत्रूच्या तोफांच्या माऱ्यापासून त्यांचा बचावहि ह्या ठिकाणीं झाला. इतकें करूनहि दुपारीं २–३० वाजतां एकंदर परिस्थिति आणीबाणीची होती. मध्यावर केलेल्या हल्ल्यापासून स्वतःच्या बचावापेक्षां प्रशिअन सैन्याची मजल पुढें गेली नाहीं. डाव्या बाजूवर हल्ला केलेल्या सैन्यानें पुढें जाऊन अडचणींतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनाहि मागें हटावें लागलें. उजव्या बगलेवर हल्ला केलेलें सैन्य शत्रूच्या फार मोठ्या सैन्याच्या संमुख तोंड देऊन उभें होतें, पण त्या मोठ्या सैन्याच्या मागें त्याला मदत करण्यास तयार असें आणखी मोठें सैन्य होतेंच. आपण आपल्या सैन्याला अडचणीच्या जागेंत आणून सोडलें आहे असें आतां प्रशिअन सैन्याच्या सेनापतीस बहुधा प्रथमच वाटूं लागलें असावें. या

महत्त्वाच्या जागीं फ्रेंचांचें मोठें सैन्य होतें, म्हणून त्यांनीं जर यावेळीं चढाई केली असती, तर प्रशिअन सैन्यावर मोठा अनर्थ ओढवला असता, असें पुष्कळ अंशीं निश्चित दिसतें.

दुर्दैवानें ज्या ठिकाणीं शत्रूनें हल्ला चढविला होता त्या ठिकाणीं फ्रेंच सेनापति फ्रासार्ड हजर नव्हता. तो फोर्बक येथें असून बेझेन-बरोबर तारेनें बोलणें करण्यास आपणास येथेंच असणें अवश्य आहे अशी त्याची समजूत असावी. स्वतंत्र विचार करून आपल्या मतानें रणांगणावर सैन्य हुकमतींत ठेवण्याचा हा त्याला प्रथमच प्रसंग होता. आपल्या ठाण्यावर हल्ला करणाऱ्या प्रशिअन सैन्याच्या मागें त्याच्या मदतीस येणारें फार मोठें सैन्य आहे अशी बातमी प्रत्येक तासाला जास्त जास्तच खरी ठरत चालली आहे असें वाटून तो गोंधळून गेला. नेपोलिअन, क्राइन्ह, फ्रेडरिक व त्याच्या चलतीच्या दिवसांत मॅसेना यांना जशी दैविक स्फूर्ति होत असे, तशी याला होत नसल्या-मुळें एखादें धाडसाचें किंवा जोखमीचें काम स्वतःच्या हिंमतीवर करण्यास तो भीत असे. आपल्या हाताखालच्या सेनापतींनीं उघड उघड शत्रूचा हल्ला मागें परतविला आहे, एवढ्यानेंच समाधान मानून बेझेनकडून अपेक्षित कुमक येण्याची वाट पाहत बसण्याचा त्यानें निश्चय केला. कुमक आलींच पाहिजे असें मानण्याचा त्याला हक्क होता हें त्याच्या बाजूनें सांगणें अगदीं न्याय्य आहे. कारण दोन वाजून २५ मिनिटांनीं मुख्य सेनापतीकडून निरोप आला होता, त्यावरून २५,००० सैन्य चांगल्या वाटांनीं आपल्या मदतीस

यावयास निघालें आहे, याबद्दल त्याच्या मनांत बिलकूल शंका उरली नाहीं. तथापि ज्या सेनापतींना मदतीस जाण्याविषयीं बेझेन यानें हुकूम दिला होता, त्यांनीं आपल्याच सैन्यांतील पुढें गेलेल्या सैनिकांविषयीं अत्यंत दोषार्ह असा बेफिकीरपणा दाखविला व त्यांच्या मदतीस जाण्याचा कांहींच प्रयत्न केला नाहीं, असें दिसतें.

राथर्बर्ग टेकडीवर जर्मनांचा शिरकाव होतो.

अडीच वाजतां उभय पक्षांची स्थिति पुढीलप्रमाणें होती:— फ्रेंच लोक आपलीं ठाणीं धरून बसले होते, फ्रेंचांनीं जोरानें उलट हल्ला केला असता तर चढाई करणाऱ्या जर्मनांस मोठा धोका होता. पहिलें व दुसरें जर्मन सैन्य आपल्या संरक्षणगड्यांस मदत करण्याकरितां जलदीनें जात होतें. ज्या दोन फ्रेंच तुकड्यांस फ्रासार्डच्या मदतीस जावयास सांगितलें होतें त्या आयत्या वेळेस आपल्या संरक्षणगड्यास दगा देण्याच्या बेतांत होत्या; शत्रूवर मोठ्या जोराचा उलट हल्ला करण्याची योजना फ्रासार्ड यानें करावयास पाहिजे होती, तींच या वेळीं थोड्याशा प्रमाणावर करण्याचें राथर्बर्गवरील फ्रेंचांचा सेनापति लाव्हाकूप यानें ठरविलें. लागलीच अडीच वाजतां प्रशिअन सैन्याची डावी बगल हाकून देण्याचा त्यानें प्रयत्न केला. प्रथम त्याला थोडें यशहि आलें, परंतु हल्ला झालेल्या या प्रशिअन सैन्याच्या डाव्या बाजूला अगदीं योग्य वेळीं कुमक येऊन मिळाली, यामुळें सैन्याची प्रगति होईनाशी झाली. हें पाहून खऱ्या शिपायाच्या स्वाभाविक प्रवृत्तिप्रमाणें प्रशिअन सेनापति फॉन कॅमेक

यानें राथबर्ग घेण्याचा धिटाईनें प्रयत्न करण्याचा निश्चय केला. पुष्कळ प्राणहानि झाली खरी, परंतु त्यानें मोठें धाडस केल्यामुळें त्याच्या प्रयत्नाला अंशतः यश आलें. तें असें कीं, या उत्तम सुरक्षित जागीं जर्मन सैन्याचा चांगलाच शिरकाव झाला.

फ्रेंच सैनिक राथबर्गवरील लढाईंत हार जात नाहींत.

दरम्यान् फ्रेंच सैन्याच्या उजव्या बगलेनें झालेला बिघाड सुधारून घेऊन पुजः प्रशिअनांच्या डाव्या बाजूवर हल्ला चढविला व त्या बाजूकडील सैन्याला तिनें हाकूनहि लाविलें. परंतु प्रशिअन अधिकाऱ्यांच्या समयसूचकतेनेंही प्रशिअन सैन्याची पीछेहाट उलटी फ्रेंच सैन्यालाच बाधली. कारण रणांगणाच्या इतर भागांत झालेल्या धडामोडीमुळें फ्रेंच सैन्याला त्याच्या उजव्या बाजूनें मिळाविलेल्या जयाचा पुरता फायदा घेतां आला नाहीं. ही संधि साधून डाव्या बाजूकडील पराभूत झालेलें प्रशिअन सैन्य लढाईंत उठणाऱ्या अवाजांच्या अनुरोधानें खोऱ्यांतून पलीकडे मोठ्या जोरानें गेलें व त्यानें आपल्या संवगड्यांस मदत केली. ज्या गोष्टींचा लपून छपून जाण्यास उपयोग करितां आला त्यांच्या आश्रयानें पुढें जाऊन या सैन्यानें फ्रेंच सैनिकांवर छापा घातला व ह्या वेळपर्यंत ज्या खंदकाचा उत्तम बचाव फ्रेंच सैनिकांनीं केला होता तो सोडून देण्यास त्यांस भाग पाडिलें.

स्टरिंग–वेंडेल येथें प्रशिअन हल्ल्याचें पाऊल थोडें पुढें पडलें होतें, परंतु साडेतीन वाजेपर्यंत निश्चित स्वरूपाचें असें कांहींच झालें

नाहीं. साडेतीन वांजतां फ्रेंच लोकांना कुमक मिळून त्यांच्या सैनिकांची संख्या ६००० झाली. हें सर्व सैन्य व ५००० जर्मन सैन्य हीं आतां एकमेकांसमोर युद्धास उभीं राहिलीं.

तीन वाजतां प्रशिअन सैन्याच्या आठव्या पलटणीचा सेनापति जनरल फॉन गोबेन हा रणांगणांत येऊन पोहोंचला व त्यानें लढाईचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. राथबर्गवर असलेल्या आपल्या सैनिकांच्या मदतीकरितां राखून ठेविलेल्या सैनिकांपैकीं जितके सांपडतील तितके सैनिक फ्रेंच लोक आणीत असून त्यांचा उद्देश त्या महत्त्वाच्या जागीं ज्या १८०० जर्मन सैनिकांनीं शिरकाव केला होता असें मागें सांगितलें आहे, त्यांना त्या शिखरावरून घालवून देण्याचा होता ही गोष्ट गोबेन याच्या लक्षांत तेव्हांच आली. तात्काळ त्याला ही जागा हातची जाऊं द्यावयाचा नाहीं असा निश्चय करून हा निश्चय सिद्धीस जाईल अशी योजना अंमलांत आणिली. साडेतीन वाजल्यापासून साडेचार वाजेपर्यंत राथबर्ग शिखरावरील ही लढाई मोठ्या आवेशानें चालली होती. गॅलेंबर्ग व फालस्टर या टेकड्यांवर ज्या ब्रोफा विचारपूर्वक लावून ठेविल्या होत्या त्याच्या भाडिमाराचें साहाय्य पुढें चालू करून जाणाऱ्या प्रशिअन सैन्यास फार चांगलें झालें. प्रशिअन लोकांनीं हा तोफांचा भडिमार मोठ्या हुशारीनें केला व त्यामुळें वर चढून येणाऱ्या प्रशिअन पायदळाला मागें ढकलून देण्याकरितां पुढें चालून येण्याची फ्रेंच पायदळाची—जरी ती संख्येनें फार होतें तरी—छाती झाली नाहीं. दोन्ही बाजूच्या सैनि-

कांची हानि फार झाली तरी फ्रेंच लोक आपली जागा सोडीनात. साडेचार व पांच यांच्या दरम्यान् बाराव्या प्रशिअन सैन्याच्या पायदळांतील सैनिक टोळीटोळीनें ऐनवेळीं आल व त्यांनीं महाप्रयासानें या प्रसिद्ध शिखरावर फ्रेंच लोकांनीं जी जागा बळकाविली होती ती जागा त्यांस सोडावयास लावून शिखराच्या आणखी थोडे वरच्या बाजूला जाण्यास भाग पाडिलें. याचा परिणाम असा झाला कीं, राथर्बर्गची किनार म्हणजे गायफर्ट झाडीच्या वायव्येकडील कोपरा व डाव्या बाजूला झाडींतील टेकाडांची ओळ ह्या जागा अजूनहि म्हणजे पांच वाजतां प्रशिअन सैन्याच्या ताब्यांत राहिल्या. गायफर्ट झाडी व वायव्येकडील कोपरा या दोहोंच्या दरम्यान् एक ओहळ होता. फ्रेंचांची युद्धरेषा शिखरावर या बाजूकडून त्या बाजूकडे जाऊन टोंकाशीं कोन करून मागें फिरली होती. या रेषेवर पुष्कळ सैन्य युद्धाच्या तयारीनें होतें. रणांगणाच्या इतर भागांत फ्रेंच लोकांनीं निदान आपल्या जागा तरी सोडिल्या नव्हत्या, परंतु प्रशिअन लोकांना कुमक मात्र भराभर येत होती. साडेचार व पांच यांच्या दरम्यान् सैन्य घेऊन आलेल्या सेनापतींपैकीं ७ व्या पलटणीचा सेनापति जनरल फॉन झॅस्ट्रौ हा एक होता; व त्यानें सैन्याच्या नोकरींत सर्वांत जुना अधिकारी म्हणून सर्व सैन्याची हुकमत आपल्याकडे घेतली.

गायफर्ट झाडीच्या ताब्याबद्दल झटापट.

आतां दोन्ही पक्षांचा मुख्य हेतु गायफर्ट झाडीचा तावा मिळविणें हा होता. प्रशिअन लोकांना घालवून देण्याकरितां—यांची संख्या आतां फ्रेंच लोकांच्या संख्येपेक्षां थोडी जास्त झाली होती -

फ्रेंचांनीं ह्या ठिकाणीं ९००० सैन्य जमविलें होतें. मग पांच व सहा यांच्या दरम्यान् दोन्ही बाजूंकडे नवीन कुमक जसजशी येऊन पोहोंचे व त्या मानानें जशी प्रगति किंवा पीछेहाट होई तसतशी लढा. ईची आघाडी पुढेंमागें होई. ह्या ठिकाणीं झाडीची रुंदी ५०० यार्डा. हून अधिक नव्हती. लढाई अगदीं हातघाईवर आली होती, व धुरा. मुळें कांहींच दिसेनासें झालें. अधिकाऱ्यांना आपल्या पिस्तुलांचा उपयोग करणें भाग पडलें. प्रशिअन सैन्याला मिळालेलें उच्च प्रतीचें लष्करी शिक्षण, अडचणीच्या वेळीं स्वतःची बुद्धि चालवितां यावी म्हणून अधिकारी व शिपाई यांच्याकडून प्रत्यक्ष व्यवहारानें करून घेतलेला अभ्यास, हाताखालचे शिपाई व अधिकारी यांच्यामध्यें असलेला निकट स्नेहसंबंध—या सर्व गोष्टींचा यावेळीं हल्ला करणाऱ्या प्रशिअन सैन्यास चांगला फायदा मिळाली. ह्या एकाच तासाच्या लढाईंत या गोष्टींपासून झालेले फायदे उत्तम प्रकारें दृष्टीस पडले. शौर्य व मनाचा धडा हीं जरी दोन्हीकडील सैनिकांचीं सारखींच होतीं, तरी प्रशिअनांचें विशेष शिक्षण व परस्परांचा मित्रभाव यांचा उपयोग जास्त होऊन लढाईचें पारडें प्रशिअनांच्या बाजूला झुकलें. सहा वाजतां फ्रेंचांनीं शिखर सोडून दिलें व घोटाळा होऊं न देतां ते स्पिकेरेनकडे परत फिरले. येथें सोडून दिलेल्या जागेपेक्षां संरक्षण करण्यास उत्तम अशा जागेवर त्यांनीं सैन्याची मांडणी केली.

स्पिकेरेन यथें फ्रेंच सैन्य नवीन जागा धरितें

फ्रेंच सेनापतीनें धरिलेल्या जागेची आघाडी स्पिकेरेनच्या टेकडी-वर ठेविली होती व उजवी बाजू एका ओहळानें सुरक्षित होती. डावी

बाजू स्पिकेरेन झाडीशीं जाऊन टेकली होती. या जागेवरून फ्रेंचांना हाकून देण्याचा जर्मन सेनापतीचा विचार सहा वाजतां ठरला. ह्या ठिकाणीं आपणास यश मिळालेंच पाहिजे, असें जर्मन सेनापतीस वाटत होतें. कारण त्याच्या उजव्या बाजूला स्टरिंग–वेंडेल येथें फ्रेंचांना मोठी कुमक आल्यामुळें जागा धरून बसणेंच काय, पण चढाई करणेंहि शक्य झालें होतें. एकदां तर असें वाटलें कीं फ्रेंचांनीं जर मोठ्या नेटानें प्रयत्न केला असता, तर त्यांचें पाऊल इतकें पुढें पडलें असतें कीं, प्रशिअनांनीं राथबर्ग येथें जीं फायदेशीर ठाणीं पटकाविलीं होतीं तीं त्यांस सोडून देणें भाग झालें असतें.

फ्रेंच पायदळाचें शौर्य.

सहा आणि सात यांच्या दरम्यान् फ्रेंचांना स्पिकेरेन टेकडीवरून घालवून देण्याच्या प्रयत्नाला प्रशिअन लोकांनीं प्रथम आरंभ केला. यांत यश आल्यावर स्पिकेरेन झाडीजवळील फ्रेंचांच्या डाव्या बगलेवर हल्ला करून तिला हाकून लावण्याचा त्यांचा विचार होता. परंतु फ्रेंच सैन्यानें स्वसंरक्षण इतक्या जोरानें केलें व त्यांच्या शास्पो बंदुकांचा मारा इतक्या झपाट्याचा होता कीं, प्रशिअन सैन्याला त्याची फार हानि झाल्यामुळें या टेकडीवरील पहिल्या हल्ल्यांत माघार घ्यावी लागली. एका उंच जागेवरून ह्या ठिकाणावर रोंखलेल्या तोफांचा सपाट्याचा मारा अर्ध्या तासावर झाला व त्यामुळें फ्रेंचांस ही टेकडी सोडून देणें भाग झालें; परंतु ६–४–५ ला लढाई अगदीं थांबली; फ्रेंचांच्या आघाडींत अजून फूट पडली नव्हती; झाडींतून पुढें येण्याचा

प्रशिअन सैन्यानें केलेला प्रत्येक प्रयत्न फ्रेंच सैन्य आपल्या बंदुकांच्या गोळ्यांच्या भयंकर वर्षावानें तेथल्या तेथेंच जिरवून टाकी व सीमेवर तोफांचे कुलपी गोळे टाकण्याचा क्रम फ्रेंचांनीं चालू ठेविला होता आपल्यास मिळालेल्या कायदेशीर जागा तशाच धरून ठेवण्यास अ पणास फारच निकराचा प्रयत्न केला पाहिजे व शत्रूची आघाडी अशीच गुंतवून ठेवून खूप सैन्यभारानें शत्रूच्या बगलेवर हल्ला चढविणें एव ढाच यश मिळविण्याचा मार्ग आहे असें प्रशिअन सेनापतींस वाटलें. दोन तोफांच्या रांगा व सहा पायदळ पलटणी घेऊन त्यांनीं हा प्रयत्न केला हें सैन्य, ज्या रस्त्यानें पूर्वी एकदां प्रशिअन सैनिक गेले होते, त्याच मार्गानें स्पिकेरेन पठाराच्या पश्चिम बाजूच्या माथ्याच्या कडेवर जाऊन पोंहोंचलें; त्या ठिकाणीं फ्रेंच सैन्याच्या जागेशीं काटकोन होईल अशी या सैन्यानें आपली मांडणी केली. शत्रूच्या हलकीं शस्त्रें वापरणाऱ्या सैनिकांस मागें हाकलून देऊन व मोठ्या निकराची लढाई करून या प्रशिअन सैन्यानें शत्रूच्या डाव्या बाजूवर फार सोईची जागा व्यापिली. या जागेवरून संरक्षण करणाऱ्या फ्रेंच सैन्याच्या अगदीं बरावर मध्यावर मोठा घाला होईल अशी दहशत उत्पन्न झाली. ह्याच वेळीं प्रशिअन सैन्यानें केलेल्या या फ्रेंच बगले-वरील हालचालीमुळें आघाडीच्या संरक्षकांच्या मनांत थोडी अस्वस्थता उत्पन्न झाली व संरक्षणाच्या कामांत कशी तरी ढिलाई झाली व सर्व प्रशिअन सेनापतींनीं मिळून एकदम प्रयत्न केल्यास प्रशिअन सैन्याचा जय होईल असें दिसलें. परंतु रणांगणांत पुष्कळ वेळां मोठ्या निकरानें लढून मिळविलेल्या उज्ज्वल कीर्तीस योग्य असेंच वर्तन फ्रेंच पायद-

त्यानें या महत्त्वाच्या प्रसंगीं केलें. हे फ्रेंच पायदळांतील सैनिक सात तास लढत होते. फार भयंकर युद्ध झाल्यावर कांहीं लढण्यास उत्तम अशीं स्थळें सोडून देणें त्यांस भाग पडलें होतें. तथापि "तुम्ही जिवावर उदार होऊन एकदां विजय व्हावा म्हणून शेवटला प्रयत्न करा, समोर असलेल्या शत्रूवर सर्व शक्तिसामर्थ्य खर्च करून हल्ला करा," असें मोठें कळकळीचें भाषण फ्रेंचाचा कुशल व पराक्रमी सेनापति लेव्हाकूप यानें यावेळीं केलें. त्यानें उद्दीपित होऊन फ्रेंच सैनिकांनीं हिंमतीनें, धाडसानें व निश्चयानें अशी कामगिरी केली कीं, ती १७२६ सालीं इटली जिंकलेल्या त्यांच्या थोर देशबांधवांसहि भूषणासह झाली असती. त्यांनीं अत्यंत त्वेषानें हल्ला केला; यांच्या समोरील शत्रूस त्यांनीं मोठ्या प्रयत्नानें मागें हटविलें व आतां गेलेली जयश्री ते परत आणणार असें दिसलें.

फ्रेंच पायदळ मागें हटतें.

इतक्यांत वर वर्णन केल्याप्रमाणें सहा प्रशिअन पायदळ पलटणींनीं त्यांच्या बाजूवर हल्ला चढविल्यामुळें या लोकांना आपली जागा सोडून देणें अवश्य झालें. काळोख जास्त जास्त पडत चालला; त्यांना शत्रूचें सैन्यबळ किती आहे व शत्रूची परिस्थिति काय आहे हेंहि बरोबर दिसेना. शत्रू जवळ फार सैन्य असेल तर आपण जितके जितके पुढें जाऊं तितके तितके शत्रूच्या तावडींत जास्त सांपडूं एवढें मात्र त्यांस निश्चयानें वाटत होतें. म्हणून अव्यवस्था अगदीं होऊं न देतां ज्या जागा त्यांनीं मिळविल्या होत्या त्या सोडून दिल्या व त्यांचे संवगडी शत्रूचा बाजूवरील हल्ला परतवीत असतां ते पाठलाग न होतां

स्पिकेरेनकडे परत गेले. आपल्या शत्रूची आपण फार खराबी केली आहे, आपली अब्रू आपण बचावली आहे प्रशिअन सेनापतींनीं दाखविलेल्या हिंमतीच्या $\frac{१}{२}$ इतकी हिंमत जर आपल्या सेनापतींनीं धरिली असती तर आपणांस जय मिळाला असता, असें निदान त्यांची मनोदेवता त्यांस सांगत होती.

फ्रासार्ड याला कुमक येऊन कां मिळाली नाहीं ? नऊ वाजतां त्यानें आपला मुख्य सेनापति बेझेन यास पुढील तार धाडिली होती:—आघाडीवर होत असलल लोकांचे आवाज मला ऐकूं आले आहेत; ग्रास्व्लीडर्स्ट्रॉफ येथें मान्टाडॉन यानें एक पलटण पाठवावी व डेकीन यानें मर्लेबॅक व रास्ब्रुक येथें पुढें जावें असें मी सुचविलें आहे." सुमारें १०—४० ला वरील दोन्ही ठिकाणीं शत्रू दृष्टीस पडला असें फ्रासार्डनें कळविलें. मी एक तुकडी बेनिंग येथें व दुसरी थेडिंग येथें पाठविली आहे असें बेझेनकडून ११—१५ ला उत्तर आलें होतें. रास्ब्रुकवर नजर ठेवण्याकरितां एक ब्रिगेड पाठवा व तुमच्यावर मोठा हल्ला झाल्यास तुम्ही कॅलेन्ब्रोन येथें सर्व सैन्य जमा करून बसा, असें बेझेन यानें फ्रासार्ड यास कळविलें होतें.

ह्या सुमारास बेझेन स्वतः कार्लिंगच्या बाजूनें टेहळणी करीत होता तेव्हां त्याच्यावर प्रशिअन हेरांनीं गोळ्या झाडिल्या.

बेझेनच्या चुका.

"ग्रास्व्लीडर्स्ट्रॉफ येथें तुम्ही जा, असा मी तारेनें मांटाडान यास हुकूम सोडला आहे" असें बेझेन यानें २—२५ ला कळविलें.

तुमच्यावर जोराचा हल्ला झाल्यास तुम्ही कॅलेंब्रान येथें परत जावें असा फ्रासार्ड यास बेझेननें जो सल्ला दिला होता, त्याच्याशीं आतां पर्यंत बेझेन यानें केलेल्या व्यवस्थेचा मेळ बसतो. परंतु इतकें करून तेथेंच न थांबतां त्यानें आपला क्रम पुढें तसाच चालविला असता तर त्याच्या हुकुमांना जोम व बळकटी येऊन त्यांचा योग्य परिणाम झाला असता. बेझेन यानें सार्लुईच्या बाजूला टेहळणी केली नाहीं, परिस्थिति कशी आहे हें समजून घेण्यासाठीं त्यानें एकहि अधिकारी इकडे तिकडे पाठविला नाहीं, आपण निरनिराळ्या अधिकाऱ्यांना सोडलेले हुकूम कितपत अंमलांत आणले जात आहेत, हें समजावें म्हणून त्यानें कांहींच केलें नाहीं, फ्रासार्ड हा कॅलेंब्रान येथें परत गेला कीं नाहीं, अथवा मांटाडान अथवा डेकीन त्याला मदत करण्याकरितां पुढें गेला किंवा नाहीं, याचीहि त्यानें कांहीं चौकशी केली नाहीं. बादशहाचा सल्ला घेणें व त्याला बातमी कळवणें या कामाकरितां मला त्याच्या छावणी संनिध असणें जरूर होतें, यामुळें मला वरील गोष्टी करितां आल्या नाहींत असें म्हणून तो जबाबदारींतून मोकळा झाला. ही त्याची सबब मान्य करण्यासारखी नाहीं व त्याच्या या वर्तनांत व प्रतिपक्षांतील त्याच्याच दर्जाच्या सेनापतींच्या वर्तनांत किती मोठी तफावत होती हें तेव्हांच या पोकळ सबबीवरून ध्यानांत येतें. आघाडीकडून दोन वाजल्यानंतर मुळींच कांहीं बातमी आली नाहीं, तेव्हां कोठें पांच वाजतां त्यानें 'मला धीर येण्यासारखी कांहीं तरी बातमी पाठवावी' अशी तार

केली. यावेळीं फ्रासार्ड याचे लोक अगदीं जिवावर उदार होऊन लढत होते. अर्थात्च बेझेनला समाधानकारक अशी बातमी येईना; परंतु जवळ जवळ एका तासानें त्याला असें कळलें कीं, फ्रासार्डच्या उजव्या बगलेला मागें हटणें भाग पडलें आहे व मदत पाहिजे आहे. फ्रासार्डची गरज भागविण्याची तजवीज करण्याच्या ऐवजीं त्यानें ज्या तुकड्यांना त्याला मदत करण्याकरितां पुढें जा असा हुकूम सोडिला होता त्यांची नुसती माहिती सांगून तो स्वस्थ बसला. पुढें कांहीं मिनिटांनीं बातमी आली कीं, फार जोरांत चाललेली लढाई शमत चालली आहे. या बातमीबरोबरच आणखी एक रेजिमेंट पाहिजे म्हणून मागणी आली होती. दोन गाड्यांतून एका रेजिमेंटचें सामान घालून गाड्या एकदम फोर्बेककडे रवाना झाल्या. आठ वाजण्याच्या सुमारास सैन्य मागें हटल्याची बातमी त्यास कळली व " मला जें करणें शक्य होतें तें मीं केलें आहे व मजजवळ सेंट-ॲन्हाइड येथील जागेचें रक्षण करण्यास फक्त तीनच रेजिमेंट्स आहेत " असें त्यानें उत्तर दिलें, व तुमच्या मतानें कोणती जागा धरून बसणें बरें ? " असें त्यानें फ्रासार्ड यास विचारिलें.

निरनिराळ्या तुकड्यांवरील फ्रेंच सेनापतींचे दोष.

बेझेन याचें स्वतःचें वर्तन कितीहि दूषणीय असलें तरी, आणखी थोडा जास्त विचार आपण केल्यास, आपणांस असें आढळून येईल कीं, बेझेनच्या हाताखालच्या तुकड्यांच्या सेनापतींचें वर्तन त्याहिपेक्षां जास्त दोषार्ह होतें. अडीच वाजल्यानंतर फ्रासार्ड यानें

आपली परिस्थिति काय आहे याची कांहींच बातमी बेझेनला कळविली नाहीं व आपल्या मदतीला येण्याविषयीं ज्या सेनापतींना बेझेन यानें हुकूम सोडिले होते त्यांना आपल्याकडे बोलावून आणण्याचा प्रयत्नहि त्यानें केला नाहीं. पुढें कूच करून जाण्याबद्दलचा बेझेनचा हुकूम मांटाडान याच्या तुकडीला तीन वाजतां मिळाला, परंतु त्यावेळीं मांटाडान टेहळणीवर बाहेर फिरत होता, तो पांच वाजतां परत आला. तोंपर्यंत त्याची तुकडी स्वस्थच बसून होती. सात वाजेपर्यंत हें सैन्य नेमलेल्या ठिकाणीं पोहोंचलें नाहीं. फ्रासार्ड याला बातमी देण्यास एखादा अधिकारी पाठविलेला नाहीं किंवा फ्रासार्ड यानेंहि मांटाडान याच्याशीं बातमी कळविणें किंवा आणणें वगैरे व्यवहार केला नाहीं. अकरा वाजतां कॅस्टॅनी यास थेडिंगकडे जाण्याविषयीं हुकूम मिळाला व तो लागलीच स्पिकेरेनच्या दिशेनें जावयास निघाला. पण तो ज्या रस्त्यानें गेला त्या रस्त्यानें तो खऱ्या रेषेच्या कांहींसा उजव्या बाजूस झुकला. अर्थात्च पांच मैल कूच केल्यावर तोफांचे आवाज ऐकूं येईनासे झाले व तो तेथेंच थांबला. कांहीं वेळानें फ्रेंचांचा जय झाला असें कांहीं शेतकऱ्यांनीं त्यास सांगितल्यावरून तो परत आला. पुनः पांच वाजतां त्यानें पुढें चाल केली, परंतु नऊ वाजेपर्यंत स्पिकेरेनपासून फोकलिंग तीन मैल आहे तेथेंहि तो पोहोंचला नाहीं. मेटमन याचें वर्तन याहिपेक्षां जास्त दोषार्ह आहे. बेझेनच्या हुकुमाप्रमाणें तो बेनिंग येथें तीन वाजतां पोहोंचला. तेथून स्टरलिंग—वेंडेल ७ मैल आहे. त्याला तोफांचे आवाज ऐकूं आले व जर त्यानें पुढें कूच केलें असतें तर त्याला प्रशिअन सैन्याचा जोर फार कमी

होता त्या ठिकाणीं फ्रेंच सैन्याला कुमक पोंचवितां आली असती. ह्या ठिकाणीं फ्रेंचांनीं जर धिटाईनें पुढें चाल केली असती तर मेटमन याच्या साहाय्याशिवाय सुद्धां फ्रेंचांना जय मिळाला असता. परंतु मेटमन यानें कांहींच केलें नाहीं. तोफांच्या आवाजावरून काय सुगावा लागतो हेंहि त्यानें पाहिलें नाहीं. घोडेस्वारांची पलटण त्याच्याजवळ नव्हती खरी, पण "पायदळाच्या बातमीदाराच्या घोड्याला झालें तरी पाय असतात हेंहि तो विसरला असावा" असें हेंडरसन लिहितो.

या लढाईसंबंधानें टीका.

फ्रेंच शिपायांचें वर्तन फार दाखाणण्यासारखें होतें व स्पिकेरेन येथें झालेल्या पराभवाबद्दलचा दोष त्यांच्याकडे मुळींच येत नाहीं. यासारख्या प्रसंगीं जरी मॅसेना, लॅनीज, डेव्हूस्ट, यासारख्या एखाद्या पुरुषानें अशी कर्तबगारी स्वतःच्या जबाबदारीवर दाखविली असती कीं फ्रेंचांस यश हटकून आलेंच असतें, तरी या अपजयाचा दोष सर्वस्वीं बेझेनकडे आहे असें म्हणतां येणार नाहीं. फ्रेंच अधिकाऱ्यांच्या अंगीं असावा तसा जोम नव्हता. त्यांच्या ठिकाणीं एकमेकांविषयीं असावा तसा विश्वास नव्हता; त्यांना लष्करी शिक्षण मिळावें तितकें चांगलें मिळालें नव्हतें, त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं बेफिकीरपणा फार आला होता, साधारतः साध्या प्रसंगीं जी खबरदारी ठेवावी लागते तीहि घेण्याची ते हयगय करीत; या सर्व गोष्टींमुळें फ्रेंचांचा या वेळीं पराभव झाला. हेंच थोड-

क्यांत सांगावयाचें म्हणजे फ्रेंच सैन्यांतील खालचे अधिकारी त्यांच्याच दर्जाच्या जर्मन सैन्यांतील अधिकाऱ्यांपेक्षां कर्तबगारीनें कमी असल्यामुळें हा फ्रेंच लोकांचा पराभव झाला. परंतु फ्रेंच शिपायांची तारीफ करावी तेवढी थोडीच, असें पुनः एकदां सांगितलें पाहिजे. फ्रेंच शिपायांचें सैन्य म्हणजे सिंहांचेंच सैन्य होतें परंतु असे प्रसंग पुष्कळ असतात आणि सिपकेरेनची लढाई ही त्यांतलाच एक प्रसंग आहे—कीं त्यावेळीं सिंहाच्या सैन्याला सुद्धां यशःप्राप्ति होत नाहीं.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें लढाई सरल्यावर फ्रेंचांना कोणताहि उपद्रव न पोहोंचता मागें हटतां आलें. त्यांचीं पायदळें अजून जशींचीं तशींच होतीं 'त्यांची दाणादाण उडाली म्हणून ते मागें फिरले असें मुळींच नव्हतें; ते इतके सावकाश व बिनधोक मागें हटत होते कीं, पिछाडीच्या उघड्या मैदानांतील पेटलेल्या आगट्या प्याफेनबर्ग वर दिसत होत्या.' हेंडरसन लिहितो कीं, " प्रशिअन सैन्य इतकें थकलें होतें, व प्रत्येक ठिकाणीं त्याचा इतका घोटाळा झाला होता कीं, पुढें चाल करण्यास आरंभ करणें व तें काम शेवटास नेणें हीं दोन्ही आतां सारखींच कठीण होतीं.

प्रकरण १४ वें.

कोलोंबे–व्हाअनव्हाइल-ग्रॅव्हेलाट.

फ्रेंचांचा चांगलाच पराभव झाला तर फ्रान्सची गादी बादशहाच्या वारसाकडे राहण्यास मोठी पंचाईत पडेल अशी भीति बादशहा व त्याचे वरिष्ठ सेनापति यांच्या समोर दत्त म्हणून उभी होती. वर्थ व स्पिकेरेन येथें फ्रेंच सैन्याचा मोड झाल्यावर दुसऱ्या दिवशीं नेपोलिअन यानें पॅरिस येथें पांच तारा पाठविल्या त्यांत पराभव झाल्याचें कबूल करून " बर्लिनवर हल्ला करण्यास चला ! बर्लिन वर हल्ला करावयास चला ! " अशी एकच ओरड करून ज्या लोकांनीं युद्ध उपस्थित होण्यास इतकी भर दिली, त्यांच्या देशाभिमानाची तारीफ केली होती. यापैकीं शेवटल्या तारेंत फ्रान्स व पॅरिस यांनीं देशाभिमान धरून महाप्रयत्न करण्यास तयार असणें अवश्य आहे असें त्यानें लोकांस स्पष्ट बजाविलें होतें एखाद्याच्या कानशिलावर झणझणीत प्रहार केला असतां माणसावर जो परिणाम होतो तसाच परिणाम या बातमीचा पॅरिस शहराच्या रहिवाशांवर झाला. शहरांत जिकडे तिकडे पूर्ण स्तब्धता होती; सामान्य जनांची विचारशक्ति अगदीं बधिर झाल्यासारखी दिसली. ज्या उत्साहातिरेकानें वेडावून जाऊन अडाणी लोक " युद्ध युद्ध " अशा आरोळ्या ठोकीत रस्त्यांतून फिरले होते त्या वेडांतून ते आतां शुद्धीवर आले होते. या जागृतीनें खरी स्थिति काय आहे याचा त्यांना बोध झाल्यामुळें

त्यांची हिंमत अगदीं खचून गेली. लोकांच्या मनाला धीर येण्यासारखा एक जाहीरनामा राणीनें प्रसिद्ध केला, परंतु व्यर्थ. पॅरिसला वेढा पडल्यासारखी स्थिति झाली आहे, असें जाहीर करून मंत्रिमंडळानें सन १७९२ सालीं लोक धीर धरून पुढें सरसावले, त्याप्रमाणें याहि वेळीं लोकांनीं धीर धरून प्रसंगास तोंड द्यावें असा लोकांस उपदेश केला. पण त्याचा बिलकूल उपयोग झाला नाहीं. लोकांना काय करावें आणि काय करूं नये हें समजेनासें झालें, असें दिसलें. परंतु पूर्ण जागृति उत्पन्न झाल्यावरच देशाच्या हाकेस ओ देण्याच्या ऐवजीं लोक व त्यांचे पुढारी बळी शोधून काढण्याच्या नादीं लागल पहिला बळी त्यांनीं आलिव्हायर प्रधानमंडळाचा घेतला. बादशहाची इच्छा बाजूला ठेवून कायदेमंडळाची खास सभा भरविण्यांत आली. ह्या सभेंत आनंदानें युद्ध पुकारलेल्या आलिव्हायर या मुख्य मंत्र्यानें " मीं राजीनामा दिला आहे व जनरल कूझिन-मान्टॉबॅन कौंट ऑफ पॅलिको (१८६० च्या चिनी युद्धांत हाच फ्रेंच सैन्याचा मुख्याधिपति होता) याच्यावर नवीन मंत्रिमंडळ बनविण्याचें काम बादशहाच्या संमतीनें सोपविलें आहे " असें जाहीर केलें दुसऱ्या साम्राज्याचें हें शेवटलें मंत्रिमंडळ होय.

आतां आपण पुनः समरांगणाकडे वळूं.

वर्थ येथें पराभव झाल्यावर मॅक. मेहन हा आपलें पराजित व पांगापांग झालेलें सैन्य प्रथम न्यान्सी येथें व तेथून चॅलन्स येथें घेऊन गेला. वाटेनें व्होजेस डोंगराच्या ओळीवरील संरक्षणास सोईच्या जागा असतांना त्यानें त्यांचा कांहीं उपयोग करून घेतला नाहीं.

प्रशिआच्या क्रौन प्रिन्सला ह्यामुळेंच कांहीं एक अडथळा न होतां व्होजेस डोंगर उतरून जातां आलें. डोंगर उतरून जाण्याच्यापूर्वी त्यानें बॅडेन सैन्य व प्रशिअन लँडवर यांच्या मदतीनें स्ट्रॅस्बर्गला वेढा देण्याचें काम जनरल फॉन वर्डर याजवर सोंपविलें. आपल्या सैन्याची पुनः चांगली घटना होण्याच्या अगोदरच क्रौन प्रिन्स पुनः आपल्यावर हल्ला करील या भीतीनें मेक मेहन व डी फेली हे आपलीं सैन्यें घेऊन च्यालन्सकडे गेले. त्या ठिकाणीं राखून ठेवलेलें सैन्य तयार होतें, त्यास जाऊन मिळण्याचा त्याचा विचार होता. ता. १६ आगष्ट रोजीं मॅक् मेहन चॅलन्स येथें पोहोंचला, त्यावेळीं त्याच्या मूळच्या ३८५०० सैन्यापैकीं फक्त १६००० सैन्य त्याच्या जवळ होतें व त्याच दिवशीं बादशहा तेथें आला. येतांना बादशहानें बेझेन यास १,७०,००० लोक बरोबर देऊन मेट्झ येथें सोडिलें ह्यापैकीं ११००० घोडेस्वार होते व त्यांच्या जवळ २८० तोफा होत्या.

बेझन मुख्य सेनाधिपति होता.

पॅरिस येथील वर्तमान बादशहाला समजलें तेव्हां ता. १२ आगष्ट रोजीं त्यानें फ्रेंच सैन्याच्या मुख्य सेनाधिपतीचें काम सोडून देऊन तो अधिकार बेझेन यास दिला. पुढें एक दोन दिवसांनीं वर सांगितल्याप्रमाणें मॅक्. मेहन यास चॅलन्स येथें जाऊन मिळण्याकरितां तेथील निघाला बादशहानें बेझेन यास दिलेला शेवटाला हुकूम (वर सांगितलेल्या परिस्थितींत हा शब्द बादशहाच्या सांगण्यास लावितां येत असेल तर) असा होता:—चॅलन्स येथें मॅक्. मेहनच्या अगदीं जवळ

येण्याकरितां बेझेन यानें आपलें सैन्य घेऊन म्यूझ नदीच्या मार्गे यावें, व त्याचप्रमाणें रोमच्या रक्षणाकरितां ठेविलेलें सैन्य, प्रथम आरमारावर पाठविलेलें सैन्य, खलाशांचें सैन्य व सातव्या पलटणींचें बाकी राहिलेलें सैन्य हीं सर्व मिळून झालेलें सैन्य जलदीनें चॅलन्सकडे येत होतें त्या सर्व सैन्याशीं बेझेन यानें मिळतें घ्यावें ही बादशहाची कल्पना मुख्य फ्रेंच सेनापती बेझेन यास पूर्णपणें पसंत होती, म्हणून ती प्रथम अंमलांत आणण्याकरितां त्यानें एंजिनिअर लोकांना मासेली नदीवर होड्यांचे पूल तयार करावे असा हुकूम सोडिला. त्याच दिवशीं त्यानें आपल्या लष्करी गाड्यांचा कांहीं भाग ग्रॅन्हेलाटपर्यंत पाठविला, व मेट्झचें संरक्षण करण्याकरितां एक पायदळ पलटण ठेवून तो वर सांगितलेली योजना पूर्ण अंमलांत आणण्याकरितां निघाला त्याला ज़र यश आलें असतें तर युद्धाला जें स्वरूप प्राप्त झालें, त्यापेक्षां खास निराळेंच आलें असतें. परंतु त्याच दिवशीं म्हणजे ता. १४ रोजीं फॉन स्टाइनमेट्झ याच्या पहिल्या प्रशिअन सैन्यानें मेट्झच्या पूर्वेकडील आघाडीवर छावणी ठेविली. दिवस वर आल्यावर गस्तीस पाठविलेल्या लोकांनीं निरनिराळ्या पलटणींच्या सेनापतींस बातमी दिली कीं, मासेली नदीच्या उजव्या तीरावर तळ दिलेल्या फ्रेंच सैन्यानें कूच करून जाण्यास आरंभ केला आहे. या प्रशिअन सेनापतींपैकीं एकानें लागलीच आपलें सैन्य हालविलें.

कोलोंबेची लढाई.

दुसरी, तिसरी आणि चौथी अशा तीन फ्रेंच पलटणींनीं मासेली नदीच्या उजव्या तीरावर छावणी केली होती. दुसऱ्या व

चौथ्या फ्रेंच पलटणींनीं कूच करण्यास आरंभ केलाच होता, इतक्यांत पिछाडीचे रक्षणार्थ म्हणून मागें राहिलेल्या तिसऱ्या पलटणांवर कोलें-बेच्या पठाराजवळ पहिल्या प्रशिअन सैनिकांनीं हल्ला केला. हा प्रकार पुढें वर्णन केल्याप्रमाणें घडून आला फ्रेंच लोक परत फिरून निघून जात आहेत असें कानीं आल्याबरोबर सातव्या प्रशिअन पलटणीच्या आघाडीच्या सैनिकांचा सेनापति फॉन गॉल्टझ याच्या मनांत फ्रेंच सैन्य परत जात असतांना त्यास शक्य तितका अडथळा करावा, असा सुविचार एकदम उद्भवला. लागलीच त्यानें आपला लॅक्केनेक्झी येथील उघड्या जागेंतील तळ उठविला आणि मदतीकरितां पहिली पलटण व पहिली घोडेस्वारांची तुकडी यांस आपल्या पाठीमागून येण्यास सांगून त्यानें स्वतःच्या सैन्यासह सेंटबार्ब या खेड्याजवळ तिसऱ्या फ्रेंच पलटणी-वर हल्ला केला. दुसरी व चौथी या पलटणी आपल्या संवगड्यांस मदत करण्याकरितां मागें फिरल्या प्रशिअन सैन्यालाहि मदत आली व लवकरच सेंट बार्बपासून ग्रिंगीपर्यंत सात मैल लांबीच्या रेषेवर जोराची लढाई सुरू झाली दोन्ही पक्षाकडील लोक मोठ्या धैर्यानें व निश्चयानें लढूं लागले व एकदां इकडे तर पुनः दुसरीकडे असें जयाचें पारडें फिरतां फिरतां लढाई सात तास चालली. नऊ वाजतां प्रशिअन लोक थांबले व फ्रेंच सैन्य आपला सकाळचा बेत पार पाडण्याकरितां पुढें चालतें झालें. प्रशिअन सैन्यहि आपल्या पूर्वीच्या जागीं निघून गेलें. कारण कोणत्याहि बाजूला या लढाईंत आपला जय झाला असें हक्कानें म्हणतां येणार नाहीं, दृश्य परिणामा

कैदेंतून पाहूं गेल्यास या लढाईपासून हल्ला करणाऱ्या प्रशिअन सैन्यास फार मोठा फायदा झाला असें आपणांस दिसून येतें कारण या लढाईमुळें बेझेनचा मौल्यवान् असा पुष्कळ वेळ व्यर्थ खर्च झाला, परंतु त्याच वेळेचा प्रशिअन लोकांनीं इतका उत्तम उपयोग करून घेतला कीं, त्यांनीं फ्रेंच लोकांना मोठ्या कचाट्यांत पकडलें. तेथें ते जे अडकले, ते शेवटीं प्रशिअनांना शरण जाऊन त्यांचे कैदी म्हणून बाहेर पडले.

कोलोंबे येथील लढाई महत्त्वाची झाली खरी, परंतु तिच्यामुळें फ्रेंच लोकांना आपला मार्ग जाण्याचा क्रम तसाच चालू ठेवण्यास कांहीं हरकत पडली नाहीं. ता. १४ चीं रात्र त्यांनीं मासेली नदी उतरून तिच्या डाव्या तीरावर जाण्यांत खर्च केली. व्हर्डनकडे जाण्याला रस्ता आपल्याला मोकळा ठेवून खालीं दिलेल्या पांच पलटणी मासेली नदीच्या डाव्या तीरावर ता. १५ रोजीं सकाळीं बेझेन यानें युद्धाला सज्ज करून ठेविल्या. फ्रासार्ड याची दुसरी, डेकीन याची तिसरी, ला ॲडमिरालट्झ याची चौथी, कॅन राबर्टस याची सहावी व बूर्बाकी याची 'गार्ड्स' पलटण. या सर्व सैन्याचे दोन भाग करून त्यांच्यासह समांतर रेषांनीं कूच करण्यास त्यानें एकदम आरंभ केला. परंतु मेट्झच्या आसमंतांतून निघून जाण्यास तो अजूनहि नाखूष असल्यामुळें किंवा हालचाली करणें ला फार झटपट केल्या पाहिजेत ह्याची त्याला अजून पूर्ण जाणीव उत्पन्न न झाल्यामुळें, किंवा शत्रु फार झपाझप हालचाली करील हें त्याला शक्य न वाटल्यामुळें,

काय असेल तें असो, त्याच्या सैन्याची प्रगति फारच सावकाश झाली. ती इतकी कीं, त्या दिवशीं रात्रीं त्याच्या सैन्यानें तळ दिला तेव्हां त्याच्या उत्तरेकडील सैन्यभागाच्या आघाडीच्या रक्षकांची पलटण डांकूर येथें होती; दक्षिण भागाच्या आघाडीची पलटण व्हायनव्हाइल येथें होती; सैन्याचा बहुतेक भाग ग्रॅव्हेलाट येथें मुख्य ठाण्यावर होता.

ता. १४ रोजीं मुख्य शत्रुसैन्याला निसटून जातां येऊं नये म्हणून पराकाष्ठेचे मोठें प्रयत्न केल्यावरहि फ्रेंचांना होईल तितका अडथळा करून थोपवून धरावयाचें असा जर्मनांचा ठाम निश्चय झाला. कोलोंबेच्या लढाईपासून त्यांचा फायदाच झाला होता, कारण पूर्वी म्हटल्याप्रमाणें मासेली नदी उतरून जाण्यास दुसऱ्या जर्मन सैन्याला वेळ पाहिजे होता, तो या लढाईमुळें त्या सैन्याला चांगलाच मिळाला. ता. १४ रोजीं जर्मनांच्या मुख्य ठाण्याच्या जागीं पुढें दिल्याप्रमाणें सैन्याची मांडणी केली होती:—पहिल्या सैन्यापैकीं मँटाइफेल याची पलटण व दोन घोडेस्वारांच्या तुकड्या यांनीं मासेली नदीच्या उजव्या तीरावर तळ देऊन बसावयाचें होतें; झॅस्ट्रो व गोव्रेन यांच्या ७ व्या व ८ व्या पलटणींनीं मेट्झच्या दक्षिणेच्या बाजूकडे नदी उतरून जावयाचें होतें; दुसऱ्या सैन्यानेंहि अशीच व्यवस्था करावयाची होती. पूर्वी सांगितलेल्या जागीं ता. १५ ऑगस्ट रोजीं फ्रेंच सैन्य विश्रांति घेत असतां संध्याकाळीं आपल्याला मिळालेल्या हुकुमाप्रमाणें कान्स्टन्टाइन फॉन आलव्हेनस्लेबेन यानें दुसऱ्या सैन्याची तिसरी पलटण घेऊन कूच

केलें व नदी उतरून तो पलीकडे गेला. मेट्झपासून व्हर्डनकडे जाणाऱ्या आड रस्त्याला मिळावें म्हणून तो उत्तरेच्या बाजूनें चालला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तीन वाजतां गार्झे व आव्हाइल येथें पोहोंचला. त्या ठिकाणीं फक्त दोन तास विश्रांति घेऊन त्यानें पुनः मार्स–ला–टूर व व्हायनव्हाइलकडे कूच करण्यास आरंभ केला. त्याच्या मागून ६ व्या घोडेस्वारांची तुकडी येत होती. तो व्हायनव्हाइल जवळ आला, तेव्हां त्यानें पुढें धाडिलेल्या गस्तवाल्यांनीं फ्रेंचांच्या आघाडीच्या जागा येथें जवळच आहेत व त्याच्यामागें मोठ्या फ्रेंच सैन्याचा तळ पडला आहे, अशी बातमी त्याला दिली. शत्रूच्या बगलेवर हल्ला चढविण्याला आपल्याला चांगली जोराची जागा सांपडली आहे व जरी शत्रूच्या सैन्याच्या मानानें आपलें सैन्य थोडें आहे, तरी शत्रूची उमेद खचली असल्यामुळें आपण त्याच्यावर हल्ला केल्यास त्याला पुढें जाण्यास चांगलाच अडथडा होईल असा विचार करून आलव्हेन्स्लेबेन यानें लागलीच हल्ला करण्याचें ठरविलें. घोडेस्वारांची पलटण घेऊन तो पुढें गेला व सुमारें ७ वाजतां त्यानें त्यांच्याच मदतीनें लढाई आरंभिली. फ्रेंच पायदळाची संख्या त्याच्या सैन्यापेक्षां मोठी असतांहि त्यानें दोन तास लढाई चालविली फ्रेंच पायदळानें शत्रूला तोंड देण्याकरितां गिरकी मारली व त्यानें आपली उजवी बगल व्हायनव्हाइलवर ठेवली. तेथून मेट्झकडे डाव्या बाजूला फ्रेंच सैन्याची ओळ टेकड्यांच्या रांगेच्या माथ्यावर गेली. दक्षिणेच्या बाजूनें जर्मन सैन्य येत होतें, हें वाचकांच्या लक्षांत असेलच; त्या सैन्याच्यापुढें ही फ्रेंच सैन्याची ओळ आतां बाह्य

वर्तुळाकारानें उभी होती. या जागेची किल्ली व्हायनव्हाइल ही होती, कारण जर्मनांनीं फ्रेंचांना तेथून घालवून दिलें असतें तर त्यांनीं व्हर्डनशीं असलेला फ्रेंचांना सर्व व्यवहार बंद पाडला असता. व्हायनव्हाइल न सोडणें हा फ्रेंचांना फार महत्त्वाचा मुद्दा होता व तें खेडें हस्तगत करून घेणें हा जर्मनांचा मुख्य हेतु होता.

व्हायनव्हाइलची लढाई.

व्हर्डनपर्यंत जाऊन पोहोंचण्याचें महत्त्व आतां बेझेन यास पूर्ण कळून चुकलें होतें. म्हणून आपल्या बगलेवर आलेल्या शत्रूवर आपल्या सैन्यास चढाई करण्यास सांगण्याविषयीं तो मागेंपुढें करीत होता. परंतु ज्या जागेचें वर्णन वर दिलें आहे ती जागा हातचीं जाऊं न देतां बगलेवरील हल्ला चुकवितां येईल या आशेनें मुख्य सैन्य ग्रॅव्हलाटच्या पलीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न त्यानें चालू ठेविला. परंतु दहा वाजतां तिसऱ्या जर्मन पलटणीचें पायदळ या जागीं येऊन पोहोंचलें व त्यानें मोठ्या आवेशानें व्हायनव्हाइलवर हल्ला चढविला. फ्रेंचांनीं नेहमींप्रमाणें शौर्यानें आपला बचाव आरंभिला. परंतु फ्रेंच सेनापतीचें मन मुख्य सैन्यासह निसटून जाणें व त्याच वेळीं सैन्याच्या एका भागानें बगलेवरच्या हल्ल्याचें निवारण करणें या दोन एकदम करावयाच्या गोष्टींनीं द्विधा झालें होतें, तर जर्मनांना या वेळीं व्हायनव्हाइन घेणें एवढी एकच गोष्ट एकाग्र चित्तानें करावयाची होती. फार निकरानें लढल्यावर जर्मनांचा हा उद्देश ११ वाजतां सिद्धीस गेला. एका तासानें

फ्लॅन्हिनीपासून ट्रान्व्हाइलपयर्तची जागा त्यांनीं व्यापिली व तेथून पुढें झाडीच्या डाव्या अंगाला दुसऱ्या टोंकापर्यंत त्यांचें सैन्य पसरलें व तें आतां मार्स–ला–टूरच्या आघाडीसच बहुतेक येऊन भिडलें. या सुमारास फ्रासार्ड याला बरोबर घेऊन बेझेन आपल्या मागें हटणाऱ्या मध्य भागच्या सैन्याला पाठबळ देण्यास रणांगणांत येऊन पोहोंचला. बेझेन अशी मदत करूं लागला तोंच जर्मन सेनापतीला बातमी आली कीं, फ्रेंच सैन्याच्या उजव्या बाजूचा सेनापति कॅन्राबर्ट यानें जर्मन सैन्याची डावी बाजू मागें हटविण्यास आरंभ केला आहे. त्या बाजूला पाठिंबा देण्याकरितां आल्व्हेन्स्लेबेन यानें ब्रेडौ यास आपली घोडेस्वारांची तुकडी घेऊन तिकडे जा असा हुकूम सोडला. ब्रेडौ, व्हायन्व्हाइलच्या उत्तरेला घाटावर चढला, मागचे शिपाई पुढें आणून त्यानें आपली आघाडी विस्तृत केली व आपल्यावर होत असलेल्या तोफांच्या भडिमाराला न जुमानितां हल्ला चढवून त्यानें फ्रेंच सैन्याला हार खाणें भाग पाडिलें.

आतां तीन वाजले होते व मध्यावर आणि डाव्या बाजूला लढाई कमजोर होत आली असतां दुसरीकडे फ्रेंच सैन्याच्या उजव्या बगलेवर, रणांगणांत दोन्ही पक्षाकडे नुकत्याच येऊन पोहोंचलेल्या सैन्यांमध्यें दुसरी अशीच निकराची लढाई सुरू झाली होती. या लढाईंत फ्रेंच ३ री व ४ थी या पलटणी एका बाजूला असून जर्मन १० वी पलटण दुसऱ्या बाजूला होती. तीन तास खूप जोराचें युद्ध झाल्यावर फ्रेंच सैन्य संख्येनें जास्त असल्यामुळें त्याची सरचढ झाली

व त्यानें जर्मन हल्ला हळू हळू मागें रेटला. तथापि उजव्या बाजूला व मध्यावर जर्मन सैन्यानें काबीज केलेल्या जागा आपल्या हातच्या जाऊं दिल्या नाहींत. वरती जी तीन तास लढाई झाली म्हणून सांगितलें आहे, त्या लढाईंत प्रिन्स फ्रेडारिक चार्ल्स याच्याकडे सैन्याची मुख्य हुकमत आली होती व त्यानें फ्रेंच सैन्याची उजवी बाजू मार्स-ला-टूरच्या पलीकडे हाकून देण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. नंतर फ्रेंच सैन्यानें या जर्मन पराजयाचा पूर्ण फायदा घेण्याचा प्रयत्न केला होता, परंतु जर्मनांच्या गार्ड पलटणीच्या घोडेस्वारांच्या ब्रिगेडनें त्याला विरोध करून त्या सैन्याचें पाऊल पुढें पडूं दिलें नाहीं व इकडे त्याच्या डाव्या बगलेवर दुसऱ्या एका घोडेस्वारांच्या ब्रिगेडनें हल्ला केला. नंतर उभय पक्षांच्या घोडेस्वारांच्या सैन्यांमध्यें मोठें तुंबळ युद्ध झालें. फ्रेंच लोकांच्या घोडेस्वारांच्या २२ टोळ्या होत्या व जर्मनांच्या २४ होत्या. तेव्हां दोघांच्या संख्याबलांत म्हणण्यासारखी विषमता नव्हती. ह्या युद्धांत या घोडेस्वारांच्या लढाई इतकी भयंकर लढाई दुसरी केव्हांहि झाली नव्हती. पांच हजार लोकांची हातघाईची झटापट झाली. आपण ज्या सैन्याचे एक घटकावयव आहों त्या सैन्याचें अखेरीस बरें वाईट होणें सर्वस्वीं या झटापटीच्या निकालावर अवलंबून आहे असें प्रत्येक माणसाला वाटत असल्यामुळें या लढाईला फारच उग्र स्वरूप आलें होतें एकदां या पक्षाची तर पुनः त्या पक्षाची सरशी होई असें होतां होतां फ्रेंच लोक मागें हटविले गेले; नंतर त्या दिवसाची एकदा अखेर करण्या-

करितां सर्व जर्मन सैन्यानें रेझनव्हाइलच्या टेकड्यांवर एकदम हल्ला चढविला. परंतु फ्रेंच संरक्षक आपली जागा बळकट धरून बसले व जर्मनांचा हल्ला मागें परतविला गेला. अंधार पडला तेव्हां प्रशिअन सैन्याच्या आघाडीच्या सैनिकांच्या टोळ्या बॉय डी ऑयनॉनपासून रेझनव्हाइलच्या पठाराच्या बाजूनें इरान बॅकपर्यंत गेल्या होत्या. नंतर दोन्ही पक्षांनीं धडपड करण्याचें सोडून दिलें व विश्रांति घेतली. युद्धांतील इतर सर्व लढायांपेक्षां या लढाईत रक्तपात जास्त झाला. ही लढाई बारा तास चालली होती व दोन्ही बाजूंचें नुकसानहि अतोनात झालें. लढाई चालू असतां ज्या जागा दोघांनीं धरून ठेवल्या होत्या त्याच जागीं रात्रीं दोघांचाहि तळ राहिला.

दोन्ही पक्षांच्या सैन्याची परिस्थिति.

सर्व रेषेवर शत्रूला मागें हटविलें व फ्रेंचांनीं आपल्या जागा सोडल्या नाहींत अशी तार बेझेन यानें पॅरिसला केली. एका अर्थीं हें त्याचें म्हणणें खरें होतें. त्यानें जर्मन हल्ला मागें परतविला होता आणि व्हर्डनकडे जाणारा रस्ता जरी आतां खुला नव्हता, तरी अजूनहि उत्तरेकडे जाण्याला त्याला एक रस्ता मोकळा होता. दुसऱ्यापक्षीं जर्मन हल्ल्यामुळें त्याचा एक दिवस फुकट गेला होता. तथापि त्याला अजूनहि आशा होती कीं, आपण अद्यापि शत्रूला मागें हटवूं; व ज्या कचाट्यांस आपल्याला अडवून धरण्याचा शत्रूचा विचार आहे त्यांतून आपण जोरानें बाहेर पडूं. मेट्झपासून ब्रेकडे जो रस्ता जातो त्यावर सेंट प्रॅन्व्हट आहे, त्याकडे व्हर्डनच्या उत्तरेकडील रस्त्यानें आपल्या सैन्याची उजवी बगल हलविण्यांत त्यानें १७ वी तारीख घालविली.

त्याची डावी बगल, फासार्ड याची दुसरी व लेबूफ याची तिसरी या पलटणींनीं बनली होती ही डावी बगल त्यानें अशा रीतीनें मांडली कीं, तिचें टोंक राझेराइल या खेड्याजवळील टेकडीवर यावें हें खेडें ग्रॅव्हेलाटच्या मुख्य रस्त्यावर आहे. ह्या टेकडीपासून त्याची उजवी बगल सेंट प्रॅव्हॅटकडे पसरली होती, ती अशी कीं, ती पुढें ला ॲडमिराल्ड याच्या पलटणींशीं जाऊन भिडावी; ला ॲडमिराल्ड याच्या उजव्या बाजूला सेंट प्रॅव्हॅट येथें कॅन्राबर्ट याचें सैन्य होतेंच. गेल्या दिवशीं बेझेनचें इतकें नुकसान झालें होतें तरी अजूनहि त्याच्यापाशीं जवळ जवळ १,२५,००० इतकें युद्धोपयोगी असें सैन्य होतें

व्हायनव्हाइल येथें जर्मन सेनापतींनीं फ्रेंच सैन्यावर हल्ला चढविला होता त्यांना असें वाटलें होतें कीं, फ्रेंच लोक या वेळीं आपल्या जवळ सांपडण्याजवळ जास्त आहे यावर विशेष भरंवसा ठेवून ता. १७ रोजीं चढाई करतील. परतु बेझेन हा असलेली जागा सोडून देऊन संरक्षण करण्यास जास्त सोईची अशी जागा धरण्याचा प्रयत्न करीत आहे असें जेव्हां जर्मन सेनापतींस दिसून आलें, तेव्हां दुसऱ्या दिवशीं सकाळीं मोठी निकराची लढाई करण्याच्या तयारीस ते लागले. एका दिवसाचा विसावा मिळाला तेवढ्यांत राजाला आपल्या दुसऱ्या सैन्याच्या बाकीच्या भागाला बोलावून घेतां आलें.

जर्मन लोक अनुकूल स्थितीचा पूर्ण फायदा घेतात

राजा रात्रीं पान्ट आ मॉसॉन येथें होता, तो ता. १८ रोजीं सकाळीं ह्रेन्हिनीच्या दक्षिणेच्या टेकडीच्या माथ्यावर गेला. तेथून

त्याला एक तास अगोदर आलेलें दुसरें सैन्य उत्तरेच्या बाजूनें अगदीं व्यवस्थितपणें कूच करीत आहे, असें आढळलें. प्रत्येक पलटण पूर्ण असून तिचा सेनापति तिच्याबरोबर होता. प्रत्येक सेनापतीच्या मुद्दे वरून त्याला आपल्याला कोठें जाययाचें आहे हें पक्कें माहीत होतें, असें स्पष्ट दिसत होतें. सातवी पलटण ग्रॅव्हेलाटकडे चालली होती. फ्रेंच सैन्याची उजवी बाजू डाव्या बाजूच्या व माथ्याच्या सैन्याचें रक्षण करण्याकरितां सेंट ग्रॅव्हॅट येथें बसली आहे असें प्रशिअन राजास प्रथम वाटलें.

प्रशिअन राजाच्या हुकमतींत या वेळीं २,३०,००० लोक होते; ह्या सर्व शिपायांना उत्तम प्रतीचें लष्करी शिक्षण मिळालें होतें व नुकत्याच मिळालेल्या विजयानें त्यांना वीरश्री चढली होती शत्रूच्या सैन्याच्या योजनेविषयीं जास्त पूर्ण अशी माहिती मिळाली होती, तीवरून अवश्य ते फरक केल्यावर १० वाजतां राजानें ९ व्या पलटणीला व्हर्नेव्हिल व ला फॉली येथें फ्रेंच सैन्याच्या (ला ॲड-मिराल्टच्या सैन्याच्या) मध्याच्या समोर जावयास हुकूम दिला; गार्डांच्या पलटणीनें ९ व्या पलटणीच्या मदतीकरितां ॲमानव्हिलर्स येथें जावयाचें होतें; व १२ व्या पलटणीनें ब्रेकडे जाणाऱ्या राज-मार्गावर जाऊन बसावयाचें होतें. फ्रेंच सैन्याची उजवी बाजू व्हर्ने-व्हाइलच्या अगदीं समोरच्या बाजूच्या शेवटल्या बिंदूपर्यंत पसरली आहे व त्याच ठिकाणीं फ्रेंच सैन्याच्या उजव्या बाजूच्या टोका-कडील सर्व सैन्यभार जमला आहे अशी हल्ला करणाऱ्या जर्मन

सैन्याची झटकर समजूत झाली. ह्या जागेला खंदक व घाईघाईनें केलेली मोर्चेबंदी यांनीं चांगला सुरक्षितपणा आला होता ही जागा संरक्षण करण्यास मोठी भक्कम होती, इतकेंच नाहीं तर, प्रशिअनांच्या नीड्ल्गनपेक्षां फ्रेंचांच्या 'शॉसेपो' बंदुकीचा टप्पा जास्त लांब पल्ल्याचा असल्यामुळें ज्या जागेवरून जर्मन सैन्याला पुढें यावयास पाहिजे होतें, त्या जागेवर या फ्रेंच बंदुका रोखून ठेविल्या होत्या. ह्या गोष्टी विचारांत घेऊन जर्मन लोकांनीं आपल्या हल्ला करण्याच्या योजना पुढें दिल्याप्रमाणें बदलून टाकल्याः—पहिल्या सैन्यानें ग्रॅव्हेलाट धरून बसावें व मेट्झच्या अगदीं जवळच्या जागीं शत्रूला अडवून धरावें, आणि इकडे दुसऱ्या सैन्यानें डाव्या बाजूला वळून भक्कम जागा धरून बसलेल्या मध्य व उजवी बाजू येथील फ्रेंच सैन्यास हाकून द्यावें.

ग्रेव्हेलॉटची लढाई.

प्रशिअन ९ वी पलटण पुढें चाल करून जात असतांना शॉसेपो बंदुकांच्या भडिमारानें तिची फार खराबी झाली व म्हणून तिच्या तोफखान्याला व्हाइनव्हाइल जवळ फ्रेंच सैन्याच्या मध्यावर तोफांचा भडिमार सुरू होतो तों मध्याह्नकाळ झाला. फ्रेंच तोफखान्यानेंहि या जर्मन भडिमाराला प्रत्युत्तर म्हणून आपल्या तोफांचा मारा जोरानें सुरू केला; आणि पुढें लवकरच जर्मन तोफखान्याला पायदळाचें साहाय्य नाहीं असें पाहून फ्रेंच गोलंदाजांनीं एका जर्मन तोफखान्यावर भडिमार केला व दोन तोफा घेतल्या. दोन वाजतां

जर्मन लोकांच्या तोफखान्याची इतकी खराबी झाली कीं, त्यांना तोफांचा मारा चालू ठेवणें अशक्य झालें. पुढें याच पलटणींच्या (९ व्या) दुसऱ्या तुकडीचा तोफखाना हॅबानव्हाइल येथें आला व रेलवेच्या दोन्ही बाजूला त्यांतील तोफांच्या रांगा व्यवस्थेनें उभ्या केल्या, तरी जर्मन सैन्याची स्थिति सुधारली नाहीं. ह्या तोफांच्या रांगांवर फ्रेंचांनीं आपल्या सर्व तोफांचा भडिमार चालू केला. जर्मन तोफखान्यांचा भडिमार मध्यान्हापासून चालू होता, ते तोफखानें आत जर्मनांनीं पिछाडीला आणिले. ते आणीत असतांना फ्रेंच गोलंदाजांनीं त्यांचा पाठलाग केला, परंतु अखेरीस त्यांस परत फिरावें लागलें. तिसऱ्या व गार्डांच्या पलटणींची कुमक लवकरच येऊन पोहोंचली आणि थोड्याच अवधींत व्हाइनव्हाइल येथें १२० तोफांची आघाडी बनविण्यांत आली. ह्या तोफांच्या आघाडीला पायदळाची मदतहि मिळाली होती. जर्मनांच्या मुख्य ठाण्याच्या जागीं या ठिकाणच्या सुरक्षिततेविषयीं खरोखर अत्यंत काळजी वाटत होती, ती आतां नाहींशी झाली. ही जागा हल्ला करणारांना खरोखरच फार धोक्याची होती. जर्मन अधिकारी मोठे हुशार असतांहि ह्या ठिकाणीं फ्रेंचांच्या सैन्याचा खरा मथ्य, ती त्याची उजवी बगल असा त्यांचा गैरसमज झाला. इकडे बेझेनच्या हातूनहि मेट्झच्या फारच जवळ आपल्या सैन्याचा फार मोठा भार एकत्र आणून ठेविल्याची चुकी झाली नसती, त्यानें गार्डांना आपल्या जवळ ठेवण्याच्या ऐवजीं उजव्या बगलेवर ठेविलें असतें, म्हणजे थोड.

क्यांत तो भित्रा नसता, मोठ्या छातीचा सेनापति असता, तर जर्मनांना त्यांच्या चुकीबद्दल फार भयकर प्रायश्चित्त भोगावें लागलें असतें.

जर्मनांच्या हातून झालेल्या चुका.

कारण, सुमारें दोन वाजतां जर्मन सेनापतीच्या ध्यानांत येऊं लागलें की, ज्या ठिकाणावर आपण फ्रेंच सैन्याची उजवी बगल म्हणून हल्ला केला ती जागा म्हणजे खरोखर फ्रेंच सैन्याचा मध्य होती. फ्रेंच सैन्याच्या अगदीं उजव्या बाजूच्या टोकासमोर आपण जागा धरिली आहे असा प्रशिअन गार्डांच्या पहिल्या तुकडीच्या सेनापतीचा समज झाला. इतक्यांत आपल्या डाव्या बाजूवर फार मोठा धोका आहे असें त्याला दिसलें. सेंटी–मारी–आक्सचेनीज ह्या खेड्यावर फ्रेंच सैन्यानें चांगलीच तयारी ठेविली होती व ही जागा संरक्षणासहि फार सोईची होती. येथून वर म्हटल्याप्रमाणें जर्मन सैन्याला धोका होता. म्हणून काय होईल तें होवो हें खेडें घेतलेंच पाहिजे, असा जर्मन सेनापतीचा निश्चय झाला. परंतु हें करण्याला सॅक्सन पलटण जलदीनें मदतीस यावयास निघाली होती, ती येऊन पोहोंचेपर्यंत वाट पाहणें अवश्य होतें.

सॅक्सन पलटणीच्या तोफांच्या रांगा तीन वाजतां अशा एका जागीं आल्या कीं, तेथून सेंटी–मारीवर तोफांचा भडिमार सुरू करणें शक्य झालें व भडिमाराचा परिणाम फ्रेंचांना जाणवूं लागल्याबरोबर प्रशिअन पायदळानें हल्ला चढविला आणि तें खेडें काबीज केलें. त्या खेड्याचा ताबा कायम ठेवण्यास जर्मन सैन्याला त्रास

17 JAN 1994

मात्र फार सोसावा लागला. फ्रेंचांनीं तें खेडें पुनः मिळविण्याकरितां चांगल्या नेटानें पुष्कळ प्रयत्न केले; परंतु जर्मनांना कुमक एकसारखी येत राहिल्यामुळें त्यांची सरशी होत गेली व शेवटपर्यंत हें खेडें त्यांच्याच हातांत राहिलें पुढें लवकरच ९ व्या पलटणीनें फ्रेंच सैन्याच्या जागेच्या अगदीं मध्यासमोर चँपेनायच्या शेतजमिनीवर चांगली जागा धरिली. परंतु जरी जर्मनांनीं फ्रेंच जागेची आघाडी जोरानें फोडून जाण्याचे पुष्कळ प्रयत्न केले, तरी प्रत्येक वेळीं त्यांस माघार घ्यावी लागली व त्यांचें फार नुकसान झालें. ह्या ठिकाणीं पांच वाजेपर्यंत फ्रेंच सैन्याच्या मध्यावर झालेल्या हल्ल्याचा दृश्य असा परिणाम कांहींच झाला नाहीं.

राजा फ्रेंचांच्या डावींवर हल्ला करतो.

तथापि पांच वाजतां प्रिन्स फ्रेंडरिक चार्ल्स याच्या सैन्याच्या सर्व तुकड्यांनीं त्यांना सांगितलेल्या जागांवर येऊन तळ दिला. राज व त्याचे सल्लागार यांनीं ही गोष्ट होईपर्यंत वाट पाहावयाची व नंतर सगळीकडे हल्ला चढवावयाचा असा प्रथम बेत केला होता. परंतु मध्याह्नाच्या वेळीं व्हायनव्हाइल येथून तोफांच्या भडिमाराचे आवाज मोठमोठ्यानें ऐकूं आले त्यांवरून योग्य वळ होण्याला अवकाश असतांहि योग्य संधि आली असें त्यांस वाटलें. नंतर राजानें उजव्या बाजूच्या तोफखान्याला भडिमार सुरू करा असा हुकूम दिला. ग्रॅव्हेलाटच्या उजव्या व डाव्या अंगाला सातव्या व आठव्या पलटणीच्या सोळा बॅटरीज (तोफांच्या रांगा)

ठेविल्या होत्या. त्यांनीं वरील हुकूम सुटल्यावर फ्रेंच ठाण्यावर तोफांचा भडिमार सुरू केला; आणि जरी प्रशिअन गोलंदाजांवर फ्रेंच गोलंदाजांच्या गोळ्या येत होत्या व त्यामुळें त्यांची फार खराबी होत होती, तरी अखेरीस जर्मन सैन्याच्या पायदळानें फ्रेंच गोलंदाजांना त्यांच्या स्थानावरून हाकून लाविलें. वर सांगितलेल्या जर्मन बॅटरीज मॅन्स नदीच्या खोऱ्याच्या अगदीं पश्चिम सीमेच्या जवळ आतां आणितां आल्या व तेथून त्यांनीं फ्रेंच सैन्याच्या डाव्या बगलेच्या उजव्या बाजूवर तोफांचा मारा सुरू केला.

जर्मन लोक उजव्या बाजूकडून पुढें सरकतात.

डाव्या बाजूच्या समोर व मध्यावरील फ्रेंच सैन्याच्या डाव्या बाजू समोर बॉय दी जेनिव्हॉक्स या नांवाची झाडी होती. ही झाडी तिच्या डाव्या बाजूकडे जाऊन बॉय दी व्हॉक्स या झाडीला बहुतेक भिडली होती. या डाव्या बाजूच्या एका भागापासून ते चँपेनॉय खेड्याच्या पलीकडेच एका जागेपर्यंत बॉय दी जेनिव्हॉक्स ही झाडी पसरलेली होती. ह्या झाडीचा मध्य अजूनहि फ्रेंच सन्याच्या ताब्यांत होता, परंतु ९ वी जर्मन पलटण पूर्वीच दक्षिणेच्या टोकाच्या भागांत घुसली होती व आतां ८ व्या पलटणीच्या पहिल्या तुकडीची २९ वी ब्रिगेड या झाडीच्या उजव्या भागांत शिरली. या ब्रिगेडला वर सांगितलेल्या तोफखान्याच्या भडिमारानें चांगली मदत झाली होती. या ब्रिगेडच्या कांहीं सैनिकांच्या टोळ्यांनीं सेंट ह्युबर्टच्या शेतजमिनींतील दगडांच्या खाणींचा ताबा घेतला (ही जमीन फ्रेंच

सैन्याच्या डाव्या बाजूच्या मध्यासमोर होती.) जर्मन सैन्य ह्याप्रमाणें पुढें जात असतांना जर्मन तोफखान्यानें फ्रेंच तोफखान्याचा अगदीं नाइलाज करून सोडला होता. ह्याच वेळीं फ्रेंच सैन्यानें सेंट ह्यूबर्टच्या शेतजमिनीचें संरक्षण करण्याचे आटोकाट प्रयत्न केले होते; कारण त्याला वरती सांगितलेल्या २९ व्या ब्रिगेडच्या टोळ्यापासून मोठा धोका उत्पन्न झाला होता. तीन वाजतां जर्मनांनीं हें शेत हस्तगत केलें. सेंट ह्युबर्टच्या फ्रेंच सैन्याला उजव्या बाजूला मॉस्कौचें शेत आहे, त्याच्या उजव्या बाजूला जरा पलीकडे लायप्झिगचें शेत आहे हीं दोन्हीं शेतें झाडी तोडून टाकून साफ केलेल्या जमिनीवर आहेत. हीं दोन्ही शेतें घेण्याचा जर्मन सैन्यानें ३१ व्या ब्रिगेडच्या साहाय्यानें नेटाचा प्रयत्न केला, पण तो फुकट गेला; परंतु २९ व्या ब्रिगेडनें बॉय दी व्हॉक्सच्या प्रशिअन सैन्याच्या उजव्या बाजूला जसी शेत आहे तें घेतलें. फ्रेंच सैन्याच्या डाव्या बाजूच्या कोनाच्या शिरोबिंदूशीं हें शेत होतें, म्हणजे ह्याच जागीं फ्रेंच सैन्याच्या डाव्या बाजूचें टोंक पॅपेन्हाइलकडे मागें फिरलें होतें. जर्मनांनीं जसी शेत घेतल्यामुळें व्हर्डनपासून थेट मेट्झकडे जाणाऱ्या रस्त्यावर मेट्झ किल्ल्याच्या अगदीं जवळ जर्मन सैन्याचा तळ पडला.

ह्यावरून असें लक्षांत येईल कीं, तीन व चार यांच्या दरम्यान् जर्मन सैन्याचें पाऊल त्याच्या उजव्या बाजूला थोडेसें पुढें पडलें होतें परंतु ही प्रगति अगदीं निश्चित अशी नव्हती; कारण ही प्रगति होतांना त्याचें भयंकर नुकसान झालें होतें व फ्रेंच सैन्य अजूनहि

चांगल्या भक्कम जागा धरून बसलें होतेंच. परंतु अशा स्थितींत सुद्धां निदान एका जर्मन सेनापतीला इतका आत्मविश्वास वाटत होता कीं, आपण फक्त अशा रीतीनें पुढें पाऊल टाकीत गेलों कीं आपणांस पूर्ण यश मिळणारच. परंतु हाच जोराची आशा जर्मन मध्य भागांतील सैनिकांस वाटत नव्हती; कारण त्यांच्या सेनापतींना डाव्या बाजूकडे प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याची मदत अजून आली नव्हती व त्यांना या डाव्या बाजूच्या समोर फ्रेंच सैन्याचा फार मोठा जमाव आहे अशी पुसट कल्पना असून त्या सैन्यभाराशीं आपणांला तोंड द्यावें लागेल असें वाटत होतें. या फ्रेंच सैन्यानें चढाई केली तर तें आपल्या बगलेवर हल्ला करील व आपण तर त्यावेळीं आपल्या समोरच्या फ्रेंच मध्यावरील सैनिकांशीं लढत असणार, अशीहि त्या जर्मन सेनापतींस भीति होती. ही त्यांची कल्पनाबरोबर होती. चार वाजले तरी सुद्धां जर्मन सेनापतींपैकीं एकालाहि फ्रेंच सैन्याच्या उजव्या बाजूनें किती उंचीवरील चांगली सोईची जागा व्यापिली आहे याची खरी कल्पना नव्हती; पण तेथील सेनापति कॅन्राबर्ट याला जर्मन सैन्यावर हल्ला करून त्याचा पार फडशा उडविणें हें काम सहज करितां येण्यासारखें होतें.

लढाईचा निकाल अजूनहि संशयात्मक होता.

चार वाजतां ज्या जर्मन सेनापतींस पुढें जाऊन आपण जय मिळवूं असें वाटत होतें, त्यामध्यें पाहिल्या सैन्याचा सेनाधिपति जनरल स्टाइन्मेट्झ प्रामुख्यानें पुढें होता. त्यावेळीं त्यानें ताब्या दमाचे

सैनिक घेऊन फ्रेंच सैन्याच्या डाव्या बाजूवर पुनः हल्ला करावा असा हुकूम सोडला. ह्या हुकुमाला अनुसरून सातवी पलटण बॉय दी जेनिव्हाक्स याच्या बाह्य रेषेवर म्हणजे फ्रेंच सैन्याच्या अगदीं जवळच्या मर्यादेपर्यंत जाऊन तेथें व्यवस्थितपणें तळ देण्याकरितां निघाली व इकडे चार तोफखाने संरक्षणासाठीं घोडेस्वारांची पहिली तुकडी घऊन ग्रॅन्हेलाटच्या पूर्वेस १५०० कदम लांबींचा एक अरुंद वाट आहे तींतून तुर्की चालीनें चाल करून पुढें जाण्यास निघाले. परंतु फ्रेंच लोक शत्रस तोंड देण्याची तयारी करून बसले होते. जर्मन सैन्याच्या रांगांचे आघाडीचे लोक त्या अरुंद रस्त्याच्या तोंडांतून बाहेर पडूं लागल्याबरोबर त्या तोंडावर ठेवून ठेवलेल्या शॅसोपो बंदुकांचा व इतर बंदुकांचा भडिमार त्यांच्यावर सुरूं झाला. तो भडिमार इतका बिनचूक व जोराचा होता कीं, चारहि तोफखान्यांचे गोलंदाज मारले गेले, व ते तोफखाने झाडीच्या अगदीं कडेपाशीं मागें ओढून आणण्यास जर्मन लोकांना जिवापाड प्रयास पडले. सेंट ह्यूबर्ट येथील शेतांत जे जर्मन तोफखाने ठेविले होते, त्यांचेंहि फ्रेंच तोफांच्या भडिमारानें अतोनात नुकसान झालें, तथापि ती शेतजागा जर्मनांनीं सोडिली नाहीं. चार जर्मन तोफखान्यांच्या मदतीला जी घोडेस्वारांची पलटण गेली होती ती सेंट ह्यूबर्टच्या दिशेनें जाऊन पसरून उभी राहिली, परंतु ते घोडेस्वार आणि फ्रेंच सैन्याची जागा यांच्या दरम्यान् त्यांना हल्ला करण्यासारखें असें कांहींच नव्हतें. ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें व

फ्रेंच लोकांचे गोळे येऊन पडत व ते फुटून त्यांना फार इजा होऊं लागली यामुळें ह्या जर्मन घोडेस्वारांच्या पलटणीला कोणतीहि काम गिरी बजाविल्याशिवाय मान्स नदीच्या खोऱ्यानें परत जावें लागलें. याप्रमाणें जर्मन घोडेस्वार परत गेल्यामुळें सेंट ह्युबर्टच्या डाव्या आघाडीला जें फ्रेंच पायदळ होतें, त्याला आपली आघाडी विस्तृत करून पॉइन दू–जूरच्या शेतापर्यंत पुढें जाण्यास उमेद आली व त्या पायदळानें पुढें कूच करून जातांना शत्रूच्या सैन्याच्या वेगवेगळ्या टोळ्यांना झाडीच्या अगदीं कडेपर्यंत मागें हटवून लाविलें. फ्रेंचांच्या शेसेपो तोफांचे गोळे ज्या ठिकाणीं जर्मनांचा मुख्य सेनापति तळ देऊन होता, तेथपर्यंत जाऊन पडूं लागले आणि एका गोळीनें तर प्रिन्स आलबर्ट ज्या घोड्यावर बसला होता त्या घोड्याचा प्राण घेतला. ह्या ठिकाणीं कुमक येऊन पोहोचल्यामुळें जर्मनानीं गेलेली जागा पुन्हां मिळविली; परंतु फ्रेंच सैन्याच्या जागेच्या मुख्य डाव्या बाजूवर त्यांना कोणत्याहि प्रकारची छाप बसवितां आली नाहीं आणि पांच वाजतां, पूर्ण थकवा आल्यामुळें दोन्ही पक्षांनीं जणूंकाय एकमेकांच्या संमतीनें लढाई थांबविली.

परंतु ही विश्रांति फार वेळ टिकली नाहीं. माल्मेसन शेताच्या दक्षिणेस एक टेकडी आहे. त्या टेकडीवर आपल्या अधिकाऱ्यांसह प्रशिआचा राजा आला, तेव्हां सहा वाजण्याचा सुमार होता. ह्या टेकडीवरून पॉइन–दू–जूर, मास्कौ, लाइप्झिग आणि मंटीनी–ला–ग्रेंज हीं शेतें दिसत होतीं; परंतु पॉइन्–दू–जूरपासून फ्रेंच सैन्याच्या

जागेचा मध्य ला—फॉलीपर्यंत धुरामुळें कांहींएक दिवस नव्हतें. इकडे चार मैलांपेक्षां जास्त अंतरावर उत्तरेच्या बाजूला फ्रेंच सैन्याच्या उजव्या बाजूला अगदीं टोंकाकडून तोफांचा जबर भडिमाराचा आवाज जास्त जास्त जोरानें ऐकूं येत होता. आपला पराभव झाला असें म्हणावयाचें नसेल तर कांहींतरी भगीरथ प्रयत्न करणें जरूर आहे असें राजाला वाटलें. लागलीच त्यानें लांबून कूच करून नुकतीच या जागीं येऊन पोहोंचलेली दुसरी पलटण स्टाइन्मेट्झच्या हुकमतींत देऊन त्याला पुढें चाल करून जाण्यास सांगितलें.

स्टाईन्मेट्झ याचा निरुपाय झाला.

या हुकुमाप्रमाणें राखून ठेवलेल्या पांच पायदळ पलटणींखेरीज मिळतील तेवढे सातव्या पलटणींतले सैनिक बरोबर घेऊन स्टाइन्मेट्झ यानें ला—मान्सच्या खोऱ्यांतून बाहेर पडून पॉइन—दू—जूर व खाणी यांच्या दिशेनें कूच केलें. तो जात असतांना वाटेंत त्याला व्हॉक्स झाडींत ठेवलेल्या पायदळ पलटणी येऊन मिळाल्या या दोन ठिकाणांकडे जाण्यांत त्याचा हेतु तेथून दुसऱ्या फ्रेंच पलटणीला घालवून देण्याचा होता.

परंतु तेथें त्याला तोंड देण्यास फ्रेंच लोक तयार होतेच. दुसऱ्या पलटणीला गार्डांच्या पलटणींची कुमक नुकतीच येऊन मिळाली होती, आणि बोझेन यानें आघाडीच्या मदतीकरतां जेवढें म्हणून राखून ठेवलेलें सैन्य मिळालें तेवढें सगळें पाठवून दिलें होतें. म्हणून पुढें येणाऱ्या जर्मन सैन्यावर फ्रेंच जागेवरील तोफखान्यांतून व पायदळां

तून गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला, व त्यामुळें जर्मन सैनिक पटापट मरून पडूं लागले. स्टाइन्मेट्झ याला पुढें जातां येईना. परंतु इतक्यांत सकाळीं दोन वाजल्यापासून कूच करीत असलेली फ्रॅन्सेकी याच्या हुकमतींतील दुसरी जर्मन पलटण ग्रॅव्हेलाटच्या दक्षिणेच्या एका स्थळीं आली. झालेल्या श्रमांची बिलकूल पर्वा न करितां या पलटणींतील शूर पॉमेरेनिअन लोकांनीं शत्रूवर लागलींच चाल करून जाण्याची अनिवार इच्छा दर्शविली. त्यांच्या उत्साहाचा भंग होऊं नये म्हणून पलटणीच्या सेनापतींनीं त्यांना ग्रॅव्हेलाटच्या पलीकडे थेट खाणीपर्यंत, पॉइन–दू–जूर झाडीच्या कांहीं फूट अलीकडे नेलें नंतर हें जर्मन सैन्य व फ्रेंच सैन्य यांच्यामध्यें हातघाईची लढाई झाली अंधार इतका पडला होता कीं, शत्रू का मित्र अशी निवड करणें सुद्धां अशक्य झालें. म्हणून तोफा सोडण्याचें काम हळू हळू कमी पडत चाललें, तरी गोळीबार १० वाजेपर्यंत पूर्ण थांबला नाहीं. या पूर्वीचें जर्मन लोकांच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं, आपल्या डाव्या बाजूला फ्रेंच लोकांनीं धरिलेली जागा निदान त्या वेळेपुरती तरी दुर्भेद्य आहे व म्हणून त्यांच्या सेनापतींनीं आतां सकाळ होईपर्यंत यापुढें प्रयत्न करणें थांबवावयाचें असें ठरविलें.

फ्रेंचांच्या उजव्या बगलेवर हल्ला.

दरम्यान् फ्रेंच सैन्याच्या उजव्या बगलेकडे, म्हणजे सेंट-ग्रॅव्हॅटच्या उजव्या व डाव्या बाजूस कॅनावर्ट याची हुकमत होती. त्या ठिकाणीं अशा कांहीं गोष्टी घडून येत होत्या कीं, शेवटीं होणाऱ्या

निकालावर त्यांचा बराचसा परिणाम झाला. कॅन्राबर्ट याची स्वतःची ६ वी पलटण व ला. ॲडमिराल याची ४ थी पलटण यांनीं सेंट प्रॅव्हॅट व रॉन्कूर हीं खेडीं व्यापिलीं होतीं. पहिलें खेडें सेंट मारीच्या समोर आहे व दुसरें प्रॅव्हॅटच्या उजव्या बाजूला आहे. त्यांच्या बगलांनीं आर्मेनव्हायलर्स हें आगगाडीचें स्टेशन धरून ठेविलें होतें त्यांच्या अगदीं उजव्या बाजूला, म्हणजे त्यांच्या समोर सॅक्सनीच्या राजपुत्राच्या हुकमतींतील सैन्य व प्रिन्स ऑफ वूर्टेबर्गच्या हाताखालचे प्रशिअन गार्ड्स हीं सैन्यें होतीं; परंतु सव्वापांच वाजेपर्यंत या दोन सेनापतींमध्यें कोणत्याहि प्रकारचें बोलणें किंवा बातमी देणें वगैरे व्यवहार झाला नव्हता. खरा प्रकार असा होता कीं, याच वेळीं प्रिन्स ऑफ वूर्टेबर्ग हा सेंट ऑइल या खेड्यांत येऊन पोहोंचला. हें खेडें सेंट–मारी–ऑक्स–चेनीपासून मेट्झच्या दिशेला $\frac{3}{4}$ मैलावर आहे. त्यावेळीं सॅक्सनीचा राजपुत्र ऑबूनच्या रानाच्या बाजूला आपलें सर्व सैन्य जमा करण्यांत गुंतला होता. तेथून फ्रेंच सैन्याच्या उजव्या बगलेच्या शेवटाकडील सैनिकांस मागें हटवून लावण्याच्या उद्देशानें तो पुढें चाल करून जाणार होता.

त्याच्या अगदीं डाव्या बाजूच्या सैन्यासंबंधीं व्यवस्था लावणें ही गोष्ट केवळ त्याच्याच हातची असल्यामुळें, प्रिन्स ऑफ वूर्टेबर्ग यानें आपलें चौथें ब्रिगेड जेरूसॅलेमच्या शेतावर हल्ला करण्याकरितां धाडिलें. हें शेत सेंट प्रॅव्हॅटच्या फ्रेंच सैन्याच्या अगदीं डाव्या बग-

लेशीं होतें. हॅबान व्हाइल येथें गार्डांची दुसरी ब्रिगेड सेनापति मॅन्स्टाइन याच्या हुकमतींत दिली होती, त्यानें त्याच वेळीं त्या ब्रिगेडला ॲमानव्हीलर्सवर चालून जाण्यास सांगितलें; हो जागा सेंट प्रॅन्हॅटच्या आणखी खालीं दक्षिणेकडे आहे. ह्यांच्यामध्यें हे सिअन पलटण कूच करीत होती. पुढें अर्ध्या तासानें सेंटमारीहून गार्डची पहिली तुकडी थेट सेंट प्रॅन्हॅटवर आली येणेप्रमाणें हीं सैन्यें चाल करून येत आहेत, तोंपर्यंत अशा प्रकारच्या हल्ल्याचें निवारण कर याकरितां फ्रेंचांनीं काय खबरदारी घेतली होती, तें आपण पाहूं या.

फ्रेंचांच्या उजव्या बाजूचें वर्णन.

फ्रेंचांच्या छावणींतील मुख्य संरक्षणाचीं ठाणीं सेंट प्रॅन्हॅट व ॲमान्व्हायलर्स हीं होतीं ॲमान्व्हायलर्स हें मेट्झपासून व्हर्डनकडे जाणाऱ्या रेल्वे मार्गावर एक स्टेशन आहे. ह्या दोहोंमधील अंतर सुमारें सव्वा मैल आहे. हीं दोन्हीं ठिकाणें फ्रेंचांनीं चांगलीं बळकट करिलीं होतीं. ह्या दोन जागांच्या समोर विशेषतः प्रॅन्हॅटच्या समोर खोऱ्याकडे जाणाऱ्या उतरणी झुडुपानें आच्छादित असून त्यांच्यावर खंदकहि खणले होते. त्यांचें संरक्षण करणारें पायदळ व तोफखाने यांची रचना फ्रेंचांनीं इतकी उत्तम केली होती कीं, ज्या हल्ल्याचें आतां पुढें वर्णन येणार आहे तो हल्ला होण्याच्या पूर्वीचे सर्व हल्ले मागें परतविण्यांत आले होते. सेंट प्रॅन्हॅट आणि ॲमान्व्हायलर्स ह्या दोन मुख्य संरक्षणाच्या जागांवर एकहि जर्मन तोफेचा गोळा येऊन पडला नव्हता.

सेंट प्रॅव्हॅटवर हल्ला.

वर सांगितलेल्या दोन मुख्य ठिकाणांवर हल्ला चढविण्याकरितां प्रिन्स ऑफ वूर्टेंबर्ग यानें पांच वाजतां व्यवस्था केली. त्यानें गार्डांची चौथी ब्रिगेड जेरुसॅलेम शेतावर पाठविली आणि इकडे जनरल मॅन. स्टाइन आपल्या हुकमतींत दिलेली दुसरी ब्रिगेड घेऊन ॲमान्व्हायलर्स वर चाल करून गेला. या दोन हल्ल्यांमध्यें हेसिअन पलटण कूच करीत होती. पुढें अर्ध्या तासानें सेंट–मारी–ऑक्स–चेनीपासून गार्डांच्या पहिल्या तुकडीस सेंट प्रॅव्हॅटकडे जाण्याचा हुकूम मिळाला सेंट प्रॅव्हॅट ही जागा मूळचीच मोठी भक्कम होती. तेथील सर्व घरांचें काम चांगलें बांधीव होतें, त्यांत शस्त्रांचा पुरवठा चांगला केला होता व तीं घरें शिपायांनीं गच्च भरून गेलीं होतीं. ह्या जागेवर हल्ला करण्यास जर्मन लोकांना लांब टेकड्यांच्या चढणीवर चढून जावयाचे होतें. ही चढण झुडुपांनीं व्यापली होती; हिच्या प्रत्येक भागावर फ्रेंच टायरेलर्स युद्धास सज्ज होते; त्यांना असें उभें केलें होतें कीं, वरच्या रांगेला खालची रांग चांगली दिसत होती. संरक्षणाला या जागेइतकी योग्य अशी दुसरी जागा सांपडणें शक्य नव्हतें.

आणि फ्रेंच सैन्यानें बराच वेळ या जागेचा बचाव अत्यंत शौर्यानें केला. याविषयीं मोल्टके असें लिहितोः–" गार्डांच्या पलटणीनें हल्ल्याला आरंभ केला. त्या पलटणीचें अतोनात नुकसान झालें. अर्ध्या तासाच्या आंतच गार्डांच्या पांच पलटणींचे सर्व अधिकारी मारले गेले व बाकीच्यांचेहि बहुतेक अधिकारी, त्यांतल्या त्यांत वरिष्ठ

अधिकारी, मृत्युमुखीं पडले. गार्डांच्या मार्गांत हजारों सैनिक मरून किंवा जखमी होऊन पडले तथापि या जबर हानीकडे लक्ष न देतां गार्डांनीं आपला पुढें जाण्याचा क्रम तसाच चालूं ठेविला त्यांच्या रांगांत खंड पडल्यास तो ते पुनः पुनः भरून काढीत व अधिकारी मारला गेल्यामुळें त्याच्या जागीं लेफ्टनंट अगर त्याच्यापेक्षां हलका अधिकारी आला, तरी ह्या शूर शिपायांनीं आपली जूट फुटूं दिली नाहीं व अतःकरणाची उमेद बिलकूल खचू दिली नाहीं. "

हळू हळू जर्मन सैनिक चिकाटानें पुढें येत राहिल्यामुळें फ्रेंच सैन्य मागें हटूं लागलें सव्वा सहा वाजतां जर्मन लोक ॲमानव्हिलर्स-पासून ६०० कदम व सेंट प्रॅव्हॅटपासून ८०० कदम एवढ्या अंतरावर आले. या जागांपासून पुढें ॲमान्व्हिलर्स व सेंट प्रॅव्हॅट यांच्या जाणारी चढण जास्त जास्त उभी होत गेली होती व तिच्यावर निवारा असा बहुतेक नव्हताच. ह्या ठिकाणीं थकलेले जर्मन सैनिक फ्रेंचांनीं सोडून दिलेल्या मोर्चेबंदीचा फायदा घेऊन थांबले. ४००० कदम लांब अशा रेषेवर आळीनें उभे राहिले (या वेळीं सेंट मारी येथें राखून ठेवलेल्या अशा काय त्या चारच पलटणी हात्या). त्यांच्यावर डी सायसे तुकडी व फ्रेंच घोडेस्वार यांनीं वरचेवर हल्ले केले, परंतु जर्मन सैन्यानें त्यांचें अर्धा तासपर्यंत कांहीं एक चालूं दिलें नाहीं

फ्रेंच सेनापतींचा फाजील सावधगिरी.

या वेळीं फ्रेंच सैन्याच्या उजव्या बाजूच्या सेनापतींनीं जास्त मोठी कुमक पाठविली असती, तर जर्मन सैनिकांची संख्या फार

का ३५३
२७१८

मोठी असतांहि फ्रान्सचा जय झाला असता. परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं. याचें कारण आतांपर्यंत जर्मन लोकांना मिळालेल्या यशामुळें त्यांना दुष्पट सावधगिरीनेंच वागणें बरें असें वाटलें हें असलें पाहिजे. फ्रेंच सेनापतींची कल्पना अशी होती कीं, आपण धरून ठेवलेल्या भक्कम जागांचें फक्त संरक्षण करण्यालाच पुरेसे लोक आपणांपाशीं आहेत. चढाई करणाऱ्या शत्रूचा कमीपणा कोठें आहे हें त्यांस माहीत नव्हतें आपल्याला शत्रूवर सरशी करण्यास काय केलें पाहिजे याची थोडी कल्पना कॅन्राबर्ट यास झाली होती, असें दिसतें. कारण सकाळींच त्यानें फ्रेंच गार्डांना माझ्या मदतीस पाठवा असा आग्रहाचा निरोप बेझेन यास धाडिला होता ते गार्ड त्याच्या मदतीला आले असते तर लढाईचा निकाल निराळाच लागला असता मेट्झ-पाशीं निरोप अगर सैन्य पाठविणें अत्यंत अवश्य आहे असें बेझेन याला वाटून त्यानें कॅन्राबर्ट याची विनंति अर्धवटच मान्य केली. बेझेन यानें गार्डांची फक्त एकच तुकडी सेनापति पिकार्ड याच्या बरोबर कॅन्राबर्ट याच्या मदतीस पाठविली परंतु पिकार्ड रस्ता चुकला व त्याचें नेमलेल्या ठिकाणावर पोहोंचणें वराती मागून घोडें आल्यासारखें झालें. फ्रान्सचा भवितव्यता पिकार्ड याच्या हातांत होती व तिची त्यानें पूर्णता केली.

जर्मन लोक हल्ला मोठ्या निकरानें पुढें चालवितात.

कारण कॅन्राबर्ट यानें आपल्या अपुऱ्या सैन्याच्या मदतीनें मुख्य संरक्षणाच्या दोन जागांपासून ६०० ते ८०० कदमांच्या अंतरावर

निवाऱ्याच्या मोर्च्यापाशीं धापा टाकीत बसलेल्या जर्मन सैनिकांचा फडशा उडविण्याचा प्रयत्न केला. परंतु हा त्याचा प्रयत्न अगदीं कमजोर होता इकडे पूर्वी सांगितल्याप्रमाणें पांच वाजण्याच्या कांहीं थोडा वेळ अगोदर दोन सॅक्सन पलटणी फ्रेंच सैन्याच्या उजव्या बाजूच्या टोंकाकडील सैनिकांस मागें रेटण्याच्या उद्देशानें निघाल्या होत्या, त्या आतां जर्मन सैनिकांस मदत करण्याकरितां जवळ जवळ येत होत्या. सात वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दोन ब्रिगेड्स जर्मन गार्डांच्या डाव्या बाजूस समरांगणावर आल्या आणखी दोन ऑबूच्या रानाजवळ युद्धास तयार होत होत्या. हीं सैन्यें याप्रमाणें गुंतलीं असतांना जर्मन तोफखान्याच्या २४ बॅटरींच्या गोलंदाजांनीं रान्कूरवर तोफांचा जोराचा भडिमार सुरू केला. (सेंट प्रॅव्हंटच्या फ्रेंचांच्या उजव्या आघाडीला).

सुमारें सात वाजतां मार्शल कॅन्राबर्ट यास स्पष्ट दिसून आलें कीं, आतां जास्त सैन्य आणून आपण धरून ठेवलेल्या जागांवर खूप जोराचा हल्ला करून त्या हस्तगत करून घेण्यचा जर्मनांचा बेत आहे. सेंट प्रॅव्हॅट ही या जागेची किल्ली आहे हें मनांत आणून फ्रेंच मार्शल कॅन्रावर्ट यानें या भक्कम जागेंत व तिच्या भोंवतालीं आपलें सर्व सैन्य एकत्र करण्याचा निश्चय केला. अगदीं अखेरपर्यंत सेंट प्रॅहॅट धरून बसावयाचें ह्मणून, रान्कूर येथें बेताबातानेंच सैन्य ठेवावयाचें व आपली उजवी बाजू अशा रीतीनें मागें सारावयाची कीं जामांट झाडीची बाह्यरेषा तिच्या सैनिकांस व्यापितां यावी, असें त्यानें

ठरविलें. अशा रीतीनें त्यानें आपलें सैन्य आपल्याला पाहिजे तसा व पाहिजे तेव्हां त्याचा उपयोग करितां यावा म्हणून अगदीं तयार ठेविलें त्या दिवसाची ती स्थिति ध्यानांत घेतां ही गोष्टहि महत्वाची होती, असें आपणांस दिसेल. याचा परिणाम असा झाला कीं सॅक्सन पुढें कूच करीत आले व त्यांनीं फारसा विरोध न होतां रान्कूर व्यापिलें व त्या सैन्याचे बॅटॅलिअन्स थेट सेंट प्रॅन्हॅट वर चालून आले होते, त्यांस हें सैन्य आपल्याला उजव्या बाजूकडे येऊन भिडलें. हे बॅटॅलिअन्सहि आपल्या उजव्या बाजूकडे जें गार्डाचें सैन्य सव्वासहा-पासून निवाऱ्याच्या मोर्च्यापाशीं विसावा घेत बसलें होतें त्यास येऊन मिळालें.

जर्मन्स सेंट प्रिन्हॅट घेतात.

याप्रमाणें सैन्यें एकमेकांस येऊन मिळाल्याबरोबर जर्मनांच्या २४ बॅटरींच्या गोलंदाजांनीं फ्रेंचांनीं धरिलेल्या जागांवर फार जोराचा तोफांचा भडिमार सुरू केला. ह्या भडिमारामुळें सेंट प्रिन्हॅट येथील चांगल्या बांधणीचीं घरें कोसळून पडलीं. सेंट प्रिन्हॅट व जामांटचें रान यांच्या-मध्यें ठेविलेल्या फ्रेंच तोफा जर्मनांच्या भडिमाराला प्रत्युत्तर म्हणून लागलींच सुरू झाल्या. ज्या जागेवरून सॅक्सन सैन्य पुढें येत होतें ती जागाहि याच तोफांच्या माऱ्यांत होती. सेंट प्रिन्हॅट येथें फ्रेंच सैन्याच्या डाव्या बाजूकडील बॅटरीज व फ्रेंचांच्या आघाडीवरील बिन चूक नेम धरणारे लोक यांनीं सॅक्सन सैन्याच्या उजव्या बाजूला असलेल्या प्रशिअन सैन्यावर इतका जोराचा व एकसारखा गोळ्यांचा

मारा सुरू केला कीं, त्या बाजूला प्राणहानि झाल्याखेरीज पुढें सरकणें जर्मन सैन्याला अगदीं अशक्य झालें.

पावलोपावलीं जर्मन सैनिक पडत होते. तरी वाखाणण्यासारखें धैर्य धरून जर्मन लोक तसेच पुढें चालून गेले. थोडक्याच वेळांत त्यांनीं ८०० कदम अंतरापैकीं ५०० कदम अंतर तोडिलें ते ३०० कदम अंतरावर आलें तेव्हां, दहाव्या पलटणींतील कांहीं सैनिकांच्या टोळ्या त्यांस येऊन मिळाल्या व त्या सर्वांनीं सर्व रेषेवर शेवटला हल्ला चढविला. फ्रेंचांनीं अत्यत निश्चयानें व चिकाटीनें आपला बचाव करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या बचावाच्या जागांनीं पेट घेतला होता. हळू हळू फ्रेंच सैन्यावर तीन बाजूंनीं हल्ला झाला शत्रूची सैन्यसंख्या फार मोठी असल्यामुळें फ्रेंच सैनिकांस मागें हटावें लागलें व एकीकडे घरास लागलेली आग व दुसरीकडे शत्रूचा मारा अशा कचाट्यांत ते सांपडले. नंतर ज्यांना निसटून जातां आलें नाहीं ते शत्रूला शरण गेले. ज्या थोड्या लोकांना निसटून जातां आलें ते ॲमान्व्हायलर्सकडे परत गेले. ह्या जागीं फ्रेंचांनीं सकाळीं तीन वाजेपर्यंत टिकाव धरिला. रात्रीं व दुसऱ्या दिवशीं सकाळीं फ्रेंच सैन्याच्या उजव्या बाजूकडील व मध्यांतील लोकांची दाणादाण होऊन ते डाव्या बगलेकडे गेले व तेथून मेट्झमध्यें शिरले. पॅरिसचा रस्ता फ्रेंचांच्या हातांतून गेला.

हा अपजय फ्रेंचांना घातुक झाला.

फ्रेंच सैन्याच्या मुख्य सेनाधिपतीच्या चुकांमुळें ग्रॅव्हेलाटच्या

लढाईंत फ्रेंचांचा पराभव झाला, असें म्हणणें रास्त आहे. पॅरिसचा रस्ता आपल्या ताब्यांत ध्यावयाचा व त्याच वेळीं मेऱ्झवरील आपला तावाहि सोडावयाचा नाहीं, असा बेझेन याचा बेत होता हा बेत सिद्धीस जावा म्हणून जे जर्मन लोक आपल्याला अडथळा करतील त्यांचा फडशा उडविण्याकरितां बेझेननें आपली उजवी बगल कुमक देऊन खूप भक्कम करावयास हवी होती. सव्वासहा वाजतां असें करणें त्यास शक्य होतें. जेव्हां गार्डांच्या ब्रिगेडिअर लोकांच्या पलटणीची एक तुकडी मदतीस देऊन बेझेन यानें पिकार्ड यास पाठविलें, तेव्हां आपणांस काय करितां येईल याची साधारण कल्पना त्यास होती. परंतु पॅपेव्हाइलपासून निघूनहि सात वाजेपर्यंत सेनापति पिकार्ड यानें असलेलें अवघें पांच मैल अंतर सुद्धां तोडलें नाहीं. ही जी त्यानें ढिलाई केली त्या ढिलाईमुळें बेझेननें मारून मुटकून केलेला प्रयत्न वायां गेला. फ्रेंचाचा प्रयत्न अशा रीतीनें फसला व जर्मनांनीं सात वाजतां लढाईस शौर्यानें व निश्चयानें पुनः सुरुवात केली. या दोन गोष्टींचा मिलाप होऊन ग्रॅव्हेलाटच्या लढाईंत फ्रेंच लोकांस हार खावी लागली. फ्रेंच लोक उत्तम प्रकारें व त्यांच्यापेक्षां संख्येनें फारच मोठ्या सैन्याबरोबर लढले होते. मध्याकडे व डाव्या बगलेकडे त्यांनीं चांगला टिकाव धरिला होता कॅन्राबर्ट यानें सुमारें सव्वासहा वाजतां जास्त जोरानें चढाई केली असती तर सात वाजतां फ्रेंचांवर जो पुनः हल्ला झाला तो झाला नसता असें वाटतें परंतु हेंहि केवळ अनुमानच आहे. फ्रेंच शिपाई थोर भावनांनीं प्रेरित होऊन लढले हें

खचित; परंतु त्यांच्या सेनापतींच्या अंगीं चांगली कर्तबगारी नव्हती; त्यांचा अशा स्थितींत जो पराभव झाला तो त्यांस मोठा घातुक होता.

जर्मनांचे ५२३८ लोक मेले, यांपैकीं ३२९ अधिकारी होते. त्यांचे १४,४३५ लोक जखमी झाले, यांपैकीं ५७७ अधिकारी होते. मरणानें व जखमी झाल्यामुळें फ्रेंचांचीं ६०९ अधिकारी व ११,७०५ शिपाई इतकीं माणसें वायां गेलीं.

प्रकरण १५ वें.

सेडन

ता. १९ ऑगस्ट रोजीं बेझेनचें बाकीचें सैन्य मेट्झमध्यें शिरलें. सेनापति कार्यक्षम नसल्यामुळें फ्रान्सच्या संरक्षणाच्या कामीं इतरांशीं सहकार करणें या सैन्यास अशक्य झालें. कारण तें एका बाजूला अडकून पडलें होतें. ज्या अडचणींच्या जागीं फ्रेंच सैन्य आतां सांपडलें होतें तेथून निसटून जाण्यास जे मार्ग होते ते सर्व बंद व्हावे म्हणून जर्मनांस जें करितां येण्यासारखें होतें तें सर्व त्यांनीं केलें. १८ व्या दिवशीं सकाळीं मेट्झ व थिआव्हाइल यांच्यामध्यें जो आगगाडीचा रस्ता होता तो त्यांनीं उखडून टाकिला. नंतर पहिल्या व दुसऱ्य सैन्यांपैकीं बहुतेक लोकांना मेट्झच्या किल्ल्यास वेढा देण्याचें काम सांगून प्रशिअन राजानें दुसऱ्या सैन्यांतून गार्ड्स, चौथी व बारावी पलटण अशा तीन पलटणी वेगळ्या केल्या व त्या सॅक्सनीच्या क्रौन प्रिन्सच्या हुकमतींत देऊन त्यांस सर्व मिळून चौथें सैन्य अशी संज्ञा दिली. तुम्ही तिसऱ्या सैन्याला जाऊन मिळा व मार्शल मॅक-मेहन याच्या हुकमतींत चॅलन्स येथें पुनः तयार होत असलेल्या फ्रेंच सैन्याच्या हालचालीवर बारकाईनें नजर ठेवा असा प्रशिअन राजानें सॅक्सनीचा क्रौन प्रिन्स यास हुकूम दिला बादशहा नेपोलिअन हाहि याच सैन्याबरोबर होता.

ग्रॅव्हेलाटच्या लढाईनंतर फ्रान्सची परिस्थिति.

आलेल्या कुमकीसुद्धां मेट्झ किल्ल्याच्या समोर प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याच्या हुकमतींत जें सैन्य तळ देऊन होतें त्यांत पुढें दिलेल्या साडेआठ पलटणी होत्या:—साडेपांच पलटणींचें तिसरें सैन्य; व वर सांगितल्याप्रमाणें तीन पलटणींनीं बनलेलें नवें चौथें सैन्य. ह्या सैन्यावरोबर प्रशिअन घोडेस्वारांच्या चार तुकड्या, सॅक्सन घोडेस्वारांची तुकडी आणि दक्षिण जर्मन घोडेस्वारांची पलटण इतकें घोडेस्वारांचें सैन्य होतें. तिसरें व चौथें या सैन्यांनीं मुख्य छावणींतून त्यांच्या सेनापतीला जे सर्वसाधारण हुकूम आले होते त्याप्रमाणें करण्यास मुळींच विलंब केला नाहीं.

त्यांना जें काम दिलें होतें तें पार पाडण्यास हिंमत, जागच्या जागीं व जलद कोणताहि निर्णय करणें व कोणत्याहि गोष्टीविषयीं अगदीं बरोबर मत बनविणें ह्या सर्व गोष्टींची आवश्यकता होती. मार्शल मॅक्-मेहन याच्या नव्या सैन्यास मागें हटून पॅरिसला जाणें व फ्रान्सच्या धोका उत्पन्न झालेल्या राजधानीच्या संरक्षणांत कसलेल्या शिपायांच्या सैन्याची भर घालणें शक्य होतें. जर्मनांनीं पॅरिस शहराला वेढा घालण्याच्या मार्गांतील अडचणींपैकीं बेझेनचें सैन्य हीं एक अडचण होती. परंतु तें सैन्य आतां मेट्झच्या किल्ल्यांत अडकून पडलें होतें. जर्मन मुख्य अधिकाऱ्यांच्या मतानें (घडलेल्या गोष्टीवरून विचार केला तर हें त्यांचें मत बरोबर नव्हतें) आतां एकच अडचण राहिली होती. ती अडचण म्हणजे मॅक्-मेहन याचें सैन्य. त्याचा

एकदां फडशा उडविला कीं, पॅरिस पडलेंच पाहिजे असें जर्मन अधिकाऱ्यांस वाटत होतें. पॅरिसकडे जो रस्ता जात होता त्यावरून हें सैन्य हांकून लावणें अथवा त्याचा नाश करणें हें काम क्रौन प्रिन्स याजवर सोपविलें होतें. यावेळीं फ्रान्सचा राज्यकारभार सर्वथैव बादशहाचा प्रतिनिधि म्हणून राणी चालवीत असे. तिच्या सल्लागारांनीं जर उन्मत्तपणाची वागणूक केली नसती, तर क्रौन प्रिन्स याच्या अगीं कर्तबगारी असतांहि त्याला सांगितलेलें काम त्याच्या हातून पार पडलेंच असतें असें म्हणतां येत नाहीं.

ता. २८ जुलई रोजीं सरहद्दीवरील सैन्यास जाऊन मिळण्याकरितां बादशहा निघाला. तेव्हां त्यानें फ्रान्सचा राज्यकारभार राणीच्या हातीं दिला होता. पुढें कांहीं दिवसांनीं युद्धारंभीं फ्रेंचांना अपयश आल्यामुळें लोक घाबरून गेले व त्यांच्यापुढें मान वांकवून आलिव्हायर याच्या प्रधानमंडळाला राजीनामा देणें कसें भाग पडलें हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. आलिव्हायरच्या मागून जनरल कूझीन-मांटबॅन, कौंट ऑफ पॅलिकॅओ यानें दुसरें मंत्रिमंडळ बनविलें व आपण मुख्य प्रधान, युद्धमंत्री व सर्वच कामांत पुढारी झाला कूझिन मांटाबॅन याच्या सल्ल्यामुळें अथवा प्रतिनिधि राणीच्या नांवानें व तिनें दिलेल्या अधिकारानें त्यानें जे हुकूम सोडिले (असें म्हटलें तरी चालेल) त्यामुळें फ्रान्सच्या साम्राज्याचा नाश झाला. हें कसें झालें हें आतां आपण पाहूं.

मॅक. मेहन यास बेझेनच्या मदतीस जा असा हुकूम सुटला.

वर्थ येथें पराभव झाल्यावर आपल्या अव्यवस्थित झालेल्या बाकीच्या सैन्यासह मॅक्. मेहन चॅलन्स येथें परत गेला. तेथें आपल्या सैन्याची पुनर्घटना करून व सैनिकांची नवीन भरती करून सैन्य जोमदार करावें असा त्याचा बेत होता. पुष्कळअंशीं दोन्ही बाब तींत प्रगति झाली होती. इतक्यांत पॅरिस येथें ग्रॅन्हेलाटच्या लढाईच्या निकालाची बातमी आल्यावर तुम्ही आपली चौथी पलटण घेऊन उत्तरेच्या बाजूला म्यूज नदीकडे जा व वेढ्यांत सांपडलेला बेझेन यास साहाय्य करा असा कौंट ऑफ प्यालिकॅओ यानें मॅक् मेहन यास हुकूम दिला. ज्या रोगानें बादशहाला शेवटीं मृत्यु आला त्यापासून ह्या वेळेसहि त्याला फार त्रास होत होता व त्या त्याला घड घोड्यावर बसण्याचीहि शक्ति नव्हती. तशांत बसलाच, तर त्यापासून त्याला तीव्र वेदना होत असत. शारीरिक यातनांपेक्षा युद्धांमध्यें फ्रेंच सैन्यावर जे अनर्थ गुदरले त्यामुळें त्याचें धैर्य जास्त खचलें होतें अशा स्थितींत बादशहा मॅक्. मेहनच्या सैन्याबरोबर केवळ प्रेक्षक म्हणून गेला. बादशहा म्हणून त्याला कोणताहि अधिकार नव्हता, कारण त्यानें आपले सर्व अधिकार प्रतिनिधि राणीच्या हातांत दिले होते. सेनाधिपति म्हणूनहि त्याच्याकडे कोणताच अधिकार नव्हता. कारण ता. १२ ऑगस्ट रोजीं त्यानें सैन्याचें मुख्य आधिपत्य बेझेन यास दिलें होतें. यश मलिन होऊं न देतां आपण मरावें अशी त्याची मनापासून इच्छा होती.

मेक. मेहन उलटसुलट कूच करितो.

ह्या हुकुमाप्रमाणें करण्याची मॅक् मेहन यानें तयारी केली. चार पलटणी बरोबर घेऊन तो चॅलन्सहून निघाला व मोठा रस्ता सोडून देऊन मधल्या वाटांनीं होईल तितकी जलदी करून सुइप्पे नदीच्या कांठीं डान्ट्राइन खेडें आह तेथें तो गेला. त्या दिवशीं रात्रीं आबेराइव्हपासून हाट्रेजिव्हाइलपर्यंत या नदीच्या कांठीं त्याच्या सैन्याच्या तळ पडला दुसऱ्या दिवशीं रात्रीं त्या सैन्यानें कान्ट्रीव्ह व शेजारचीं खेडीं यांत उघड्या मैदानांत तळ दिला व सेनापतीनें मुख्य ठाणें रेथेल येथें ठेविलें ता. २५ रोजीं मुख्य ठाण्याच्या जागीं लोक मोठ्या फिकिरींत होते असें स्पष्ट दिसून आलें. कारण हुकुमाप्रमाणें डाव्या बाजूला पुढें दिल्याप्रमाणें सैन्यानें आघाडिवरील योजना बदलली:—सातवी पलटण सुमारें पांच मैल व्हूझायर्सकडे गेली; पांचवी व बारावी रेथेल येथेंच राहिली व पहिली ऑटेनी येथें थांबली. मध्याह्नींच्या सुमारास ऐन नदीच्या डाव्या तीरावर सैन्य व्यवस्थितपणें उभें केलें हल्ला होणार अशी मॅक्. मेहन याची अटकळ होती हें उघड दिसतें. कारण मान्थाईकडून येणाऱ्या मार्गावर चांगलें लक्ष ठेविलें होतें. शत्रूला जवळ येण्याला फक्त एवढाच मार्ग होता

त्याच दिवशीं संध्याकाळीं मान्थाईच्या मार्गानें मार्ग्यूराइट ही २०० घोडेस्वारांची तुकडी तेथें येऊन पोहोंचली. ह्या तुकडीला सातव्या पलटणीला मदत द्यावी व सैन्याच्या डाव्या बाजूच्या संरक्षणास राहावें असा हुकूम होता. काय कारण झालें असेल तें असो,

ही तुकडी आतां सैन्याच्या मध्यावर आणिली होती यामुळें छावणींत मोठी गडबड उडाली; युद्ध पुकारल्यानंतर लागलींच कांहीं गोष्टी घडल्या, तेव्हांपासून अगोदरच सेनापतींविषयीं संशयग्रस्त असलेल्या शिपायांच्या मनांत त्यांची हुशारी व राजनिष्ठा याबद्दलची शंका जास्त बळावत चालली होती.

ता. २६ रोजीं सकाळीं मान्थाईच्या मार्गावर लक्ष ठेवण्यास दुसऱ्या तुकडीच्या एका ब्रिगेडची नेमणूक मॅक् मेहन यानें केली व त्यानें याच वेळीं सातव्या पलटणीला व्हूझार्समधून जाऊन, ऐन नदी उतरून, तिच्या उजव्या तीरावर तळ देऊन बंदुका उभ्या ठेवून तयार राहण्यें असा हुकूम दिला व इकडे त्यानें टेहळणी करण्याकरितां घोडस्वारांची चौथी पलटण पाठविली. सेनापति बोर्ड्यास याची ब्रिगेड, कांहीं मैल अंतरावर बुर्गेन्सी खेडें आहे, तें धरून बसण्यास पाठविली होती, त्यानें सुमारें अडीच वाजतां कळविलें कीं, ग्रँड–प्रे येथें बरेंच मोठें शत्रुसैन्य आपल्याला आढळलें व त्यामुळें तेथेंच तळ देऊन बसणें भाग आहे. सातव्या पलटणीचा सेनापति जनरल ड्यूए यास हल्ला होणार असें वाटून त्यानें एकदम आपलें सैन्य सज्ज केलें, कांहीं अंतरावर पुढें जाऊन चेस्ट्रे आणि फॅले या दोन खेड्यांमधील दोन टेकड्यांवर आपली तुकडी युद्धास तयार करून ठेविली आणि मार्शल यास ही बातमी देण्यास लष्करी जासूद पाठविला. ही पलटण लढाई कुठें होते अशी मोठ्या आतुरतेनें चार वाजेपर्यंत वाट पाहात

होतीं. इतक्यांत चौथी घोडेस्वारांची पलटण परत आली, त्यामुळें पुनः खळबळ उडाली. कारण त्यांनीं आम्हांस कांहीं एक दिसलें नाहीं अशी बातमी आणली आणखी दोन तासांनीं सेनापति बोर्ड्यास याच्याकडून दुसरा एक नवीन खलिता आला. त्यांत म्हटलें होतें कीं, मी अजून ग्रँड–प्रे येथेंच आहे व ही जागा आणि व्हूझा र्स यांच्यामधील भागांत प्रशिअन्स तळ देऊन आहेत अशी माझी खात्री असल्यामुळें मला येथून हलणें शक्य नाहीं. ज्या अधिकाऱ्यानें हा निरोप आणिला, तो, ज्या वाटेनें त्या सेनापतीला कूच करून जावयास पाहिजे होतें, त्याच वाटेनें आला; तरी त्याला वाटेवर शत्रु जवळ पास असल्याचें मुळींच चिह्न दिसलें नाहीं यावरून सेनापतीला मिळालेली बातमी बरोबर नव्हती व त्याच्या अंगीं धाडसहि नव्हतें असें सिद्ध झालें तथापि हा निरोप येऊन पोहोंचल्यावरही बोर्ड्यास याची ब्रिगेड ज्या तुकडीचा एक भाग होती त्या तुकडीचा सेनापति, जनरल डयूमांट, हा आपल्या प्रतिनिधींला (लेफ्टनंटला) सोडविण्याकरितां ग्रँड–प्रे येथें जाण्यास निघाला.

सैनिकांना अधिकाऱ्यांविषयीं बेभरंवसा वाटतो.

दरम्यान् सेनापति डयूए यास पुढील आशयाचें मार्शल याचें पत्र आलें: " मी तुमच्या मदतीस येईन; मी पहिली पलटण टेरान येथें व पांचवी ब्यूझँसी येथें पाठविली आहे; व बारावी पलटण लीचेनी येथें दुसऱ्या रेषेंत राहावयाची आहे. गँड–प्रे येथें १,००,००० जर्मन सैन्य ठाणें देऊन बसलें आहे अशी वदंता होती व

भोर

दुसऱ्या दिवशीं सैन्य येण्याची लोक मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात बसले होते; परंतु मध्याह्नकाळ उलटला, एक वाजला, दोन वाजले तरी शिरस्त्राण घातलेला एकहि शिपाई दृष्टीस पडला नाहीं, तेव्हां हुशार फ्रेंच सैनिकांस आपल्या सेनापतींचा पुनः कांहीं तरी गैरसमज झाला आहे असें वाटूं लागलें. आपण बेझेनच्या मदतीस निघालों असतां प्रशिअन्स जवळच आपल्या समोर आहेत या केवळ निराधार बातमीवर अवलंबून राहून आपण मध्येंच तळ देऊन बसावें हें त्या सैनिकांना अत्यंत हास्यास्पद वाटतें.

पॅरिसला परत येऊं नये असा महाराणी हुकूम सोडते.

बेझेनच्या मदतीस व्हर्डनकडे सैन्यानें जाण्याचा बेत मॅक्. मेहन याला केव्हांच पसंत पडला नव्हता पॅरिसवर घाला येणार आहे व म्हणून सैन्यानें परत तिकडे जावें असें मॅक्. मेहन याचें मत होतें. बादशहाला हे त्याचे विचार पूर्णपणें मान्य होते व्हर्डनला जाऊन पोहोंचण्याचा प्रयत्न सैन्याला व त्याप्रमाणेंच देशालाहि घातुक होणार, अशी मॅक्. मेहनची खात्री पटल्यामुळें ता २७ रोजीं पुढें जाण्याचा प्रयत्न सोडून देऊन पॅरिस राजधानीस मागें जाण्याचा निश्चय त्यानें केला. तदनुरोधानें त्या दिवशीं रात्रीं सैन्य मागें फिरलें व लीचेनी या शहरीं येऊन पोहोंचलें तेथून मॅक् मेहन यानें बेझेन यास पुढील आशयाची तार पाठविली: " चॅलन्स येथें क्राउन प्रिन्स येऊन बसल्यामुळें उत्तरेकडील भक्कम ठाण्याकडे

मागें जाणें मला प्राप्त झालें आहे " त्यानें पॅलिको यास दुसरी तार करून आपण मागें कां फिरलों हें खुलासेवार कळविलें.

ही तार पॅरिस येथें रात्रीं पोहोंचली. राणीला व त्याचप्रमाणें कौंट पॅलिको याला ही तार मुळींच इष्ट नव्हती. आतां पॅरिसमध्यें बंड उद्भवण्यास मुळींच अवकाश नाहीं व हें बंड राजघराण्यास फार घातुक होणार असें त्यांस वाटलें. " पराभूत व हिंमत खचलेलें सैन्य घेऊन बादशहाच्या परत येण्यानें असा स्फोट होणार आहे कीं, त्याचा प्रतिकार करणें शक्य नाहीं. काय होईल तें होवो सैन्य परत येऊ द्यावयाचें नाहीं, " अशी स्वार्थी व अदूरदर्शीपणाची विचारसरणी मुख्य प्रधानानें करून त्यानें तुम्ही मान्टमेडीकडे चाल करून जा, असा खास हुकूम मॅक्. मेहन यास पाठविला. ता २५ रोजीं असें कूच करून जाण्याची हिंमत केली असती तर तें शक्य होतें; परंतु आज तसें करणें म्हणजे केवळ वेडेपणाच होता. ह्याचें मुख्य प्रधानास कांहींच वाटलें नाहीं. आज असें करणें म्हणजे सैन्याचा प्रत्यक्ष नाश करण्याचा हुकूम देण्यासारखेंच होतें. एकंदरींत सर्व सैनिकांची आहुति पडून ती-बरोबरच बादशहा मृत्युमुखीं पडेल तर मागल्या सर्व तकारींचें क्षालन झालें, असें पॅरिसच्या अडाणी प्रजेस बहुतकरून वाटेल व मग गादीचा वारसा त्याच्याच घराण्याकडे राहील असाहि विचार मुख्य प्रधानानें केला असावा.

सेडनकडे कूच करून जाणें विघातक झालें.

बादशहा व मॅक्. मेहन या दोघांनींहि त्या हुकुमाचा अर्थ

बरोबर ताडला. परंतु तो अमलांत लागलींच आणण्याच्या तयारीस ते लागले त्याच रात्रीं–ही रात्र तुफानाची व वावटळाची होती– सैन्यानें पुनः परत जाण्यास आरंभ केला. शिपायांचें धैर्य सर्वस्वीं सुटलें होतें हुकूम, प्रतिहुकूम, घरसोडीचें वर्तन, सेनापतींचें उघड उघड दिसून येणारें अज्ञान या सर्वांमुळें त्यांचा विश्वास अगदीं उडून गेला होता. ता. २८ रोजीं सातव्या पलटणीच्या पिछाडीच्या रक्षकां मधील चकमक व फॅलीच्या खेड्याला आग लागलेला देखावा ह्यावरून सैनिकांना स्पष्ट कळून आलें कीं, आपण लीचेनीला गेल्यामुळें आपल्या पुढें प्रत्येक ठिकाणीं आघाडी मारण्यास पाहिजे असलेली सवड जर्मनांना मिळाली आहे. आपल्या मुख्य सेनापतीला जर्मनांचें मुख्य सैन्य कोठें होतें हें मुळींच माहीत नाहीं अशी त्यांना खात्री होती, ही गोष्टहि त्यांचें धैर्य खचण्यास तितकीच कारणीभूत झाली.

सातव्या पलटणीला व्यूझँसीच्या रस्त्यानें स्टीनेकडे धाडावयाची असा मार्शलचा पहिला उद्देश होता. कारण तेथून त्या पलटणीला म्यूज नदी ओलांडितां आली असती. परंतु प्रशिअन्स स्टीने येथें अगोदरच येऊन पोहोंचले आहेत अशी केवळ बातमी ऐकूनच त्यानें दुसऱ्या दिवशीं मौझानपाशीं ती नदी उतरतां येईल अशा रीतीनें कूच करून जावें असा हुकूम त्या पलटणीस दिला. पांचव्या पलटणीची शत्रूबरोबर व्यूझँसी येथें चकमक अगोदरच झाली होती, तिला नौऱ्याटकडे, बाराव्याला मौझानकडे व पहिलीला रांकूरकडे परत जाण्याचे हुकूम वरील वेळेस सुटले. सातवी पलटण कूच करीत

असतांना जर्मन टेहळणी करणारे 'उहलान्स' यांचें तिच्यावर चांगलें लक्ष होतें. ते सैन्यापुढें येत व पुनः अदृश्य होत, परंतु ते गोळी वगैरे झाडण्याच्या भानगडींत पडले नाहींत.

त्याच दिवशीं संध्याकाळीं आपले शिपाई अन्न न मिळाल्यामुळें व थकवा आल्यामुळें अगदीं निःसत्त्व झाले आहेत असें पाहून सेनापति हूए यानें त्यांस मार्शलनें छावणीकरितां नेमलेल्या जागेच्या कांहीं थोडे मैल अलीकडे रात्रींपुरता तळ देण्यास परवानगी दिली होती. मार्शलसाहेब सकाळींच असें कां केलें म्हणून खुलासा विचारण्याकरितां घोडा दौडीत तेथें आले. नंतर पहिल्या तुकडीनें व सामानसुमान पोहोंचविणाऱ्या सैन्यानें मौझानकडे कूच करणें चालू ठेवावें, व बाकीच्या दोन तुकड्यांनीं रांकूर व ॲटिकूर यांच्या बाजूनें ब्हिलर्स येथें म्यूज नदी उतरण्याकरितां जावें असें त्यांच्यामध्यें ठरलें. त्याच दिवशीं रात्रीला आपण आपल्या सर्व सैन्यासह म्यूज नदीच्या उजव्या बाजूला जाऊन पोहोंचूं अशी मार्शल यास आशा होती.

हें कूच करणें सैनिकांच्या मोठें जिवावर आलें. तोफांचे गडगडाट उजव्या बाजूला ऐकूं येत होते. ब्यूझॅन्सी आणि बॉक्लेअर यांच्यामध्यें असलेल्या पांचव्या पलटणीवर जर्मन लोक मोठ्या सैन्यासह हल्ला करीत होते. सातव्या पलटणीची शत्रूशीं गांठ कोणत्याक्षणीं पडेल याचा कांहींच नेम सांगवत नव्हता आणि या वेळेस तर त्या पलटणीच्या तुकड्यांची फाटाफूट झाली होती त्यांनीं थेट रान्कूरकडे चालून जावें असा हुकूम सेनापति हूए यानें सोडला होता.

त्या रात्रीं म्यूज नदी उतरून जाण्याविषयींचे त्याचे हुकूम अगदीं स्पष्ट होते, आणि त्यांची अंमलबजावणी होण्यास फक्त योग्य तेच उपाय त्यानें योजिले.

सेडनकडे माघारी जाणें.

पुष्कळ अडचणी सोसून सातवी पलटण रांकूर जवळ येत होती. इतक्यांत रस्त्याच्या एका वळणापाशीं तिची व पहिल्या तुकडीच्या ब्रिगेडच्या भयभीत झालेल्या अशा शिल्लक राहिलेल्या लोकांची गांठ पडली. ही तुकडी सामुग्रीच्या गाड्यांबरोबर रक्षणार्थ जात होती व तिची गैरसमजूत होऊन ती वाटहि चुकली होती. इतक्यांत बॉमांट जवळ व्हार्निफारेट येथें जर्मन लोकांनीं नुकताच पराभव केलेल्या पांचव्या तुकडीची व ह्या पहिल्या तुकडीची गांठ [illegible] पडली हे फ्रेंच सैनिक कसे तरी सैरावैरा रांकूरमध्यें शिरलें. त्यांच्यावर हल्ला कसा झाला व जर्मन सैन्य कसें व कोठें ठेविलेलें होतें याविषयीं सैनिकांप्रमाणेंच त्यांच्या सेनापतींनाहि बिलकुल माहिती नव्हती. रांकूर सोडल्यावर कोणत्या दिशेनें जावें व बदललेल्या स्थितींत व्हिलर्स येथें म्यूज नदी उतरून जाण्याकरितां आट्रेकूरकडे चाल करून जावें किंवा न जावें याविषयीं त्यांच्या मनाची अजून धरसोडच चालली होती. आतां पांच वाजले होते व सैनिक पहांटेपासून कूच करीत होते. रांकूर येथें त्यांना अन्न मुळींच मिळण्यासारखें नव्हतें, कारण मार्शल व पहिली पलटण त्या दिवशींच ह्या गांवांतून पुढें गेले होते व त्यांनीं कोणतीहि अन्नसामुग्री मागें शिल्लक

ठेविली नव्हती. शिपायांना दोन दिवस अन्न मिळालें नव्हतें, म्हणून ते भुकेनें व्याकूळ झाले होते व त्यांना थकवाहि फार आला होता, तरी ह्या रांकूरच्या अरुंद वाटेनें रेमिलीपर्यंत पुढें जावयाचें असा निश्चय ठरला. ही गोष्ट त्यांनीं अगदीं वेळेवरच केली. त्या पलटणीच्या पिछाडीचे लोक बाहेर पडले न पडले इतक्यांत जर्मन्स तेथें आले व एका टेकडीवर डाव्या बाजूला उभ्या केलेल्या दोन तोफखान्यांतून मागें चाललेल्या फ्रेंच सैनिकांवर तोफांचा मारा सुरू झाला. फ्रेंच सैनिकांची इतकी गाळण झाली कीं, जर जर्मनांनीं पुढें येऊन ह्या रांकूरच्या पुढें पुढें जास्तच अरुंद होत जाणाऱ्या वाटेंत त्यांच्यावर हल्ला केला असता, तर फ्रेंच सैनिकांपैकीं एकादाहि मागूस जिवंत राहिला नसता. परंतु तोफांचा एकसारखा मारा चालू ठेवण्यापलीकडे जर्मनांनीं कांहींएक करावयाचें मनांत आणिलें नाहीं हें फ्रेंचांचें मोठें नशीब समजलें पाहिजे. त्या परिस्थितींत हा माराहि मोठा भयप्रद होता; कारण पलटणीच्या अगोदर सामानाच्या गाड्या पुढें गेल्या होत्या, त्यांची रस्त्यामध्यें मोठी अडचणच झाली होती.

फ्रेंच सैन्य मेडनच्या आघाडीवर येतें.

सरते शेवटीं रस्त्यांत एक वळण लागलें व त्यामुळें फ्रेंच सैनिक तोफांच्या टप्प्याच्या पलीकडे गेले. सैनिक आट्रेकूरला येऊन पोहोंचले. तेथून पुढें अडचणीचा रस्ता रुंदावला व थकलेले व उपासमार झालेले ते सैनिक रेमिलीच्या टेकड्यावर चढले. जीम्यूज नदी गांठण्याविषयीं ते अगदीं आतुर झाले होते व जिच्याविषयीं

त्यांची आतांपर्यंत निराशा झाली होती ती म्यूज नदी खालून वाहात असलेली त्यांनीं पाहिली. नदी पलीकडे संधिप्रकाशांतून सेडनची तटबंदी पुसटपुसट त्यांस दिसत होती. दुसऱ्या दिवशीं सकाळींच फ्रेंच सैन्यानें ला मान्सेलच्या टेकड्या, डुइनी आणि गिव्हान या जागा धरिल्या. बॅझेलीच्या पूर्वेला वाहत जाणारी व म्यूज नदीला मिळणारी गिव्हान नांवाची एक लहानशी नदी आहे, तिच्या उजव्या तीरावर गिव्हान हें खेडें आहे. फ्रेंच सैन्याची रेषा इली व फ्लॉइंग यांच्या बाजूनें पूर्वेकडेस इजीक द्वीपकल्पाच्या जवळ म्यूज नदीवर जाऊन टेकली होती. या सैन्याला आतां आपणांस येथेंच सोडलें पाहिजे व ग्रॅव्हेलाट येथें जय झाल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं सॅक्सनीचा क्राउन प्रिन्स आणि तिसरें जर्मन सैन्य हीं मेट्झपासून कूच करून निघालीं त्यांच्या मागें आपणांस गेलें पाहिजे. त्यांच्याकडे दृष्टि टाकून क्राउन प्रिन्स यानें मॅक्. मेहननें विवक्षित दिशेनें जावें याकरितां काय युक्ति योजिली, त्याचें वर्णन आतां आपण करूं.

जर्मन सैन्याच्या हालचाली.

ग्रॅव्हेलाटच्या लढाईच्या दुसरे दिवशीं म्हणजे तारीख १९ रोजीं ज्या दोन सैन्यांना मॅक्. मेहेनवर चालून जाण्यास सांगितलें होतें, त्यांनीं आपल्या हालचाली सुरू केल्या. चौथ्या पलटणीनें थेट म्यूज नदीकडे कूच केलें व इकडे तिसरें सैन्य नदी ओलांडून बार-ले-डूपर्यंत जलदीनें चाल करून गेलें. या सैन्यावरोबरच राजा व मुख्य ठाण्यावरील अधिकारी हे होते. चौथ्या पलटणीच्या एका तुकडीनें

टूल किल्ल्यावर व्यर्थ हल्ला केला होता, ती तुकडी आतां आपल्या पलटणी बरोबर गेली होती. त्या तुकडीची टूल किल्ल्यासमोरची जागा हार्टमानच्या बव्हेरिअन पलटणीच्या एका ब्रिगेडला धरून बसण्याविषयीं हुकूम झाला होता. म्यूज नदीच्या कांठीं बार–ला–डूच्या खालीं अडीच मैलांच्या अंतरावर लिनी येथें ता. २० रोजीं क्राउन प्रिन्स यानें मोल्टके याची गांठ घेतली व त्यांची भेट फार वेळ चालली होती; नंतर ब्लुमेंथाल याची व पुढें खुद्द राजाचीहि क्राउन प्रिन्स यानें त्याच दिवशीं गांठ घेतली. मॅक्. मेहन आपलें सैन्य बरोबर घेऊन चॅलन्स सोडून गेला होता अशी बातमी क्राउन प्रिन्स यास मिळाली होती. मॅक्. मेहन पॅरिसकडे कूच करून जाईल किंवा एका बाजूला तळ देऊन जर्मन सैन्य पॅरिसच्या दिशेनें जाऊं लागलें असतां त्याच्यावर तेथून हल्ला करील ह्या प्रश्नाचा विचार करावयाचा होता. कांहीं असलें तरी क्राउन प्रिन्स यानें चॅलन्सकडे चालून जाण्याचा आपला क्रम चालू ठेवावा, असेंच वरील भेटींत ठरलें. ह्याप्रमाणें तो कूच करून जात असतां त्याला समजलें कीं, मॅक्. मेहन व्हीम्सकडे जात असतां त्यानें आपली दिशा एकदम बदलली व उत्तरेच्या बाजूला वळून त्यानें रेथेलकडे जाण्यास आरंभ केला. यावरून हें स्पष्ट झालें कीं, पॅरिसला जाण्याचा त्याचा इरादा नसून लांबलचक मार्गानें बेझेनला सोडविण्याकरितां जाण्याचा त्याचा विचार होता. फ्रेंच मार्शलचा हा बेत फसविण्याकरितां चाल करून जाणाऱ्या सैन्यास उजव्या बाजूला इतका वळसा घेण्यास सांगावयाचें कीं, पुढें त्याचें कूच उत्तर दिशेनें व्हावें असें ठरलें.

ह्याप्रमाणें ता. २६ ऑगस्ट रोजीं चौथ्या सैन्यानें उत्तर दिशेकडे जाण्यास आरंभ केला व इकडे तिसरें सैन्य क्लेर्मांटकडे निघालें. या सैन्याच्या मदतीकरतां म्हणून व फ्रेंच सैन्याच्या मनांत एकदम मेट्झकडे धांव घेण्याचें आल्यास त्यास तसें करितां येऊं नये म्हणून इटेनला वेढा घालणाऱ्या सैन्यापासून तिसरी व नववी ह्या पलटणी फोडिल्या. ता. २७ रोजीं कौंट लिप्पे याच्या हुकमतींतिल घोडेस्वारांच्या एका तुकडीनें चॅसूरांच्या १२ व्या पलटणींवर ब्यूझान्सी जवळ छापा घातला, शर्थीनें लढून तिचा पाडाव केला, पुष्कळ लोक मारिले व फ्रेंच सैन्यांत मोठी गडबड उडवून दिली. सैनिक अगदीं घाबरून गेले. दोन फ्रेंच पलटणी आपल्या लोकांच्या मदतीकरितां आल्या, तेव्हांच जर्मनूस मागें हटले. राजा व्हारेनी येथें होता त्यानें दुसऱ्या दिवशीं " तुम्ही म्यूज नदीच्या डाव्या तीरावर संरक्षणास योग्य अशी जागा आपल्या सैन्यासह धरून बसा " असा हुकूम सॅक्सनीच्या क्रौन प्रिन्सला सोडिला. तथापि " तुम्हांस तोंड देण्यास शत्रूचें मोठेसें सैन्य तुमच्या संमुख नाहीं असें आढळून आल्यास व्हौझायर व स्टीने यांच्यामधील रस्ता व्यापून तेथून पुढें बॉमांटला जाण्यास तुम्हांस हरकत नाहीं, अशी सॅक्सनीच्या क्रौन प्रिन्सला सवलत देण्यांत आली होती. दुसऱ्या दिवशीं या क्रौन प्रिन्सनें वरील रस्ता धरण्याकरितां तिसरी पलटण धाडिली. नौआर्ट येथें त्याच्या आघाडीच्या रक्षकांची व फ्रेंचांच्या पिछाडीच्या रक्षकांची एकाएकीं गांठ पडून त्यांचा लढाई जुंपली. ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली. पण अखेरीस तींत फ्रेंचांस हार खावी लागली. एका फ्रेंच वरिष्ठ

अधिकाऱ्याच्या जवळ फ्रेंचांनीं अमलांत आणण्याकरितां ठरविलेल्या युद्धाच्या हालचालीचा नकाशा सांपडला. हा नकाशा विचारपूर्वक पाहिल्यावर जर्मन सेनापतीनें खालीं दिलेल्या योजना करण्याचें ठरविलें:—चौथ्या सैन्याच्या उजव्या बगलेनें एकदम स्टीनेकडे जावें व तिसऱ्या सैन्याच्या उजव्या बगलेनें म्हणजे पहिल्या बव्हेरिअन पलटणीनें तिच्या मदतीस असावें; तिसऱ्या सैन्यानें तीन पलटणी व वूर्टेंबर्ग तुकडी घेऊन ली चेनीवर जावें. इकडे सहाव्या पलटणीनें डाव्या बाजूच्या मागें तिच्या मदतीकरितां असावें. या सर्व योजनेचा उद्देश स्टीने व ली चेनी यांच्यामध्यें असलेल्या फ्रेंच सैन्यास पकडण्याचा होता

लढाई अगदीं संनिध असल्या वेळची स्थिति.

ता. ३० ऑगस्ट रोजीं यापुढें जाणाऱ्या जर्मन सैन्यानें, बॉमांट समोर डी फेलीची पांचवी पलटण तळ देऊन होती तिजवर छापा घातला, तिचा अत्यंत गोंधळ करून टाकिला व तिला तेथून हांकून दिलें. इतकें करून तें सैन्य पुढें सातव्या व बाराव्या पलटणीवर हल्ला करण्याकरितां निघून गेलें. पुष्कळ रक्तपात झाल्यावर लढाई संपली व जर्मनांनीं त्या दोन्ही पलटणींना क्यारिग्नॅनच्या रस्त्यावर मागें फिरावयास लाविलें. अशा रीतीनें फ्रेंच लोकांच्या मार्शलास सेडनकडे परत जाणें प्राप्त झालें. ही बातमी समजल्यावर राजानें ता. ३१ रोजीं, चौथ्या सैन्यानें फ्रेंच सैन्याच्या डाव्या बाजूला पूर्वेकडे मागें हटणें भाग पाडावें व इकडे फ्रेंच सैन्य अजूनहि

म्यूज नदीच्या डाव्या तीरावर असल्यास त्याच्यावर हल्ला करावा व त्याच्या उजव्या बगलेवर चढाई करून फ्रेंच सैन्याला म्यूज नदी व बेल्जिअन सरहद्द यांच्यामधील अरुंद पट्टींत अडवून धरावें असा हुकूम दिला. परंतु तटस्थ राष्ट्राच्या सरहद्दींत आपणास घुसावें लागेल अशी जागा धरून बसण्याचा मॅक्. मेहन याचा मुळींच विचार नव्हता. त्या रात्रीं तो सेडनमध्यें शिरला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं जर्मनांच्या हल्ल्यास तोंड देण्यास सोईची अशी त्यानें आपल्या सैन्याची व्यवस्था केली. पूर्वेकडून हल्ला येणार अशी अटकळ करून त्यानें आपलें सर्वांत उत्तम सैन्य पूर्व बाजूला ठेविलें; त्याची उजवी बगल बॅझाइल येथें असून ती म्यूज नदीवर टेकली होती. डावी बगल इलाय येथें होती त्याच्या मुख्य ठाण्याची आघाडी मूळचीच भक्कम होती, कारण तिच्या सर्व रेषेवर गिव्हान नदी व टेंकड्या असल्यानें फ्रेंचांवर हल्ला करण्यास जर्मनांना जड जाणार होतें.

ता. ३१ रोजीं रात्रीं जर्मन सैन्याच्या मुख्य ठाणाच्या जागीं फ्रेंच सैन्याचा मार्शल सेडन येथें लढाई देण्यास तयार राहील असा संभव आहे या गोष्टीचा विचार झाला व त्याप्रमाणें जर्मन सैन्यहि लढाईस तयार राहील अशी योजना करण्याचें ठरलें. चौथें म्हणजे सॅक्सनीच्या क्राउन प्रिन्सच्या हुकमतींत दिलेलें सैन्य, जर्मन सैन्याच्या डाव्या बगलेस होतें व बव्हेरिअन पलटण मध्यभागीं होती, आणि प्रशिअन सैन्य डाव्या बगलेस राहिलें. सैन्याच्या आघाडीच्या शिपा यांची व्यवस्था खालीं दिल्याप्रमाणें होती:—उजवीकडच्या ओळींत

प्रथम बाराबो पलटण, मग चौथी प्रशिअन. पुढें प्रशिअन गार्ड्स, सरते शेवटीं चौथी घोडेस्वारांची पलटण–असा क्रम होता; त्यांच्या पाठी रेमिलीकडे होत्या; ह्या जागेपासून बॅझाइनच्या समोर पहिली व दुसरी या बव्हेरिअन पलटणी होत्या त्यांच्यापर्यंत ही रांग जाऊन भिडली होती. या दोन पलटणी ११ व्या व पांचव्या पलटणीशीं जाऊन पोहोंचल्या होत्या व त्याहि डॉम–ली–मेसनिल येथें वूर्टेंबर्गर्स यांना जाऊन मिळाल्या होत्या. ॲटिनी व लीचेनी यांच्यामध्यें ५ वी प्रशिअन पलटण, राखून ठेविलेलें सैन्य म्हणून ठेविली होती

ज्या जागीं आतां लढाई लवकरच व्हावयाची होती, त्या जागेचें वर्णन थोडक्यांत खालीं दिलें आहे. म्यूज नदीच्या खोऱ्याच्या फार रमणीय भागांत सेडन आहे. त्याच्या भोंवतीं वृक्षांनीं आच्छादिलेल्या व एका मागें एक उंच उंच होत गेलेल्या अशा टेंकड्या आणि एकामेकांपासून थोडथोड्या अंतरावर असलेलीं–डानचेरी, ईजिस व्हायलेट, ग्लेअर, डेनी, बॅझाइल हीं व इतर खेडीं आहेत. म्यूजच्या डाव्या तीराच्या बाजूनें डानचेरीपासून फ्रेनॉयमधून मुख्य रस्ता गेला होत; हा रस्ता टार्सी नांवाच्या अगदीं लहान खेड्याजवळ नदी ओलांडून सेडनमध्यें शिरला होता. ह्या स्थळाचा भूभाग फळझाडांनीं व द्राक्षांच्या मळ्यांनीं आच्छादिलेला होता; तेथील रस्ते अरुंद असून त्यांच्या दोन्ही बाजूंला दगडी भिंती होत्या; येथील वाटा झाडींत लपून गेलेल्या होत्या, त्यांतून बाहेर पडण्याचे मार्ग पुष्कळ ठिकाणीं उभ्या चढणीचे व एकदम तुटलेले असे होते.

लढाईची जागा, ही अशी होती. आतां सैनिकांविषयीं दोन शब्द लिहिणें जरूर आहे. सर्व सैन्य जमेंत धरल्यास सेडन समोर २,४०,००० जर्मन सैनिक व १,३०,००० फ्रेंच सैनिक होते. या दोन प्रतिस्पर्धी सैन्यांमध्यें ज्या विषमतेच्या गोष्टी होत्या, त्यां पैकीं सैन्यसंख्येची विषमता ही सर्वांत क्षुल्लक बाब होती. एका पक्षांतील सैनिकांचा आपले सेनापति व इतर अधिकारी यांच्यावर अमर्याद विश्वास होता, तर दुसऱ्या पक्षांतील सैनिकांना आपल्या अधिकाऱ्यांबद्दल अत्यंत तिरस्कार वाटत होता. एक पक्ष ठरलेल्या योजनेप्रमाणें मेट्झ येथून कूच करून आला होता. या पक्षांतील अति खालच्या दर्जाच्या शिपायाला सुद्धां परिस्थितीचा ओघ कळत होता व या परिस्थितीप्रमाणें मूळच्या योजनेंत फरक व्हावयाचा होता; दुसऱ्या पक्षांतील सैन्याला इकडून तिकडे, तिकडून इकडे हेलपाटे घालावे लागले—उदाहरणार्थ, तें सैन्य प्रथम मांटमेडीकडे गेलें, तेथून पॅरिसकडे गेलें, नंतर पुनः त्यास मांटमेडीकडे परत नेलें—हें सर्व करण्यांत वेळ मात्र व्यर्थ खर्च झाला. सोक्षमोक्ष करणारी लढाई आतां होणार अशी सैनिकांची मोठी अपेक्षा असतांना सेनापतींच्या निष्काळजीपणामुळें त्यांच्यावर एकाएकीं छापा पडला व त्यांना अशा एका शहरीं आश्रय घ्यावा लागला कीं, तेथून बाहेर पडण्यास मार्गच नव्हता. असा एकहि उच्च दर्जाचा अधिकारी नव्हता कीं ज्याला तो येऊन पडलेल्या प्रांताची थोडीतरी माहिती होती. शिपाई अगदीं मरेपर्यंत लढण्यास तयार होते, परंतु त्यांच्यापैकीं एकाचाही सेनापती-

वर विश्वास असा मुळींच नव्हता. तशांत आतां नेपोलिअन हा नुसता नांवाला बादशहा होता. त्याला एखाद्या नाइकाच्या नोकरालाहि हुकूम सोडण्याचा अधिकार नव्हता. अशा स्थितींत त्याला रणक्षेत्रांत इकडे तिकडे चित्रांच्या खेळांतील पुतळ्याप्रमाणें ओढींत नेत असत. हा देखावा पाहून सैनिकांस मोठी उमेद येणार होती असाहि संभव नव्हता. बिचाऱ्या या बादशहाची स्थिति मात्र कींव करण्यासारखी होती त्याला प्राप्त झालेल्या दुःस्थितीबद्दल अत्यंत वाईट वाटत होतें. मोठ्या लढाईंत आपली कीर्ति उज्ज्वल करणारा असा मृत्यू येण्याचा दिवस केव्हां उगवेल असें त्याला झालें होतें. असा मृत्यू आला म्हणजे आपल्या दोषांवरून मी प्रायश्चित्त भोगिलें, असें फ्रान्सनें मानण्यास हरकत नाहीं असें त्यास वाटत होतें.

सेडनची लढाई.

ता. १ सेप्टेंबर रोजीं सकाळीं लढाईस आरंभ झाला. तोफखान्यांतून झपाट्यानें होत असलेल्या भडिमाराच्या साहाय्यानें बव्हेरिअन्स पुढें गेले, व त्यांनीं सहा वाजतां बॅझेलीवर बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. ह्या खेड्यांतील बांधीव घरांत शस्त्रास्त्रांचा पुरवठा केलेला होता व त्यांत शत्रुसैन्यहि सज्ज होऊन बसलें होतें. संरक्षकांनीं बचाव करण्याचें काम मोठ्या शौर्यानें चालविलें. त्यांनीं शत्रु पुढें आला कीं त्यास मागें हटवावें असा क्रम आरंभिला व अशा रीतीनें फ्रेंचांनीं बव्हेरिअन सैन्यास दोन तासपर्यंत मुळींच दाद दिली नाहीं. नतर सॅक्सन्स बव्हेरिअन सैन्याच्या मदतीस आले आणि

पहिल्या ठाण्यावर त्यांनीं जोरानें हल्ला केला व ते आंत घुसले. तथापि संरक्षकांनीं आपलें काम चालविलेंच होतें. बरोबर दहा वाजतां बव्हेरिअन लोकांना त्या खेड्यांत जातां आलें. अजूनहि रक्षक घरामागून घर लढवीत होतेच व त्यामुळें लढाई लांबत चालली. परंतु एका घराशिवाय प्रत्येक घर काबीज होईपर्यंत किंवा जळून खाक होईपर्यंत जर्मन लोकांना हें खेडें किंवा त्याचा अवशेष आतां आपला आहे असें म्हणतां आलें नाहीं. याच वेळीं फ्रेंच लोक आपल्या इतर संरक्षणाच्या जागीं म्हणजे फ्लोइग, सेंट मेंजांस, फ्लायनीं, इलाय व ईजीस (ह्या ठिकाणीं म्यूज नदीला मोठें वांकण आहे त्यामुळें ज्या भूभागाभोंवतीं ही नदी संथपणानें वाहाते त्या भूभागांत एक द्वीपकल्पच बनलें आहे) येथें शिपायांच्या रांगांतच मिसळून इतकेंच नव्हे तर, त्यांच्या थोडासा पुढेंच बादशहा होता. त्याचे सर्व पार्श्वचर मारले गेल्यामुळें त्याच्याजवळ सरतेशेवटीं एकच रक्षक उरला होता. अशा स्थितींत बादशहा दुःखाकांत होता खरा; परंतु त्यानें आपली संथ व शांत वृत्ति ढळूं दिली नाहीं. इतकेंच नाहीं, तर एखादा तोफेचा गोळा अगर बदुकीची गोळी आपल्यास लागून आयुष्यक्रमाची अखेर लष्करी शिपायास योग्य अशी केव्हां होईल याची तो वाट पहात होता. आपल्या शिपायांना उमेद यावी म्हणून सेनापतीला जें कांहीं करणें शक्य होतें तें करीत मॅक-मॅहन याच ठिकाणीं हजर होता. तथापि शत्रु हळू हळू परंतु निश्चयानें आपलें पाऊल पुढें टाकीत होता. फ्रेंचांना अत्यंत अरुंद जागीं

कोंडून धरण्याकरितां तिसऱ्या सैन्याची पांचवी व अकरावी या पलटणींनीं सेडनच्या डाव्या बाजूला म्यूज नदी ओलांडिली होती व त्या पलटणी आतां फ्रेंच सैन्याची डावी बगल मागें खेंचण्याकरितां पुढें चाल करून जात होता. परंतु त्यांच्या हल्ल्याचा परिणाम भासूं लागण्याच्या पूर्वी एक गोष्ट घडून आली होती, तिचें फ्रेंच सैन्याला फार महत्त्व होतें.

विंफेन मुख्य सेनापति होतो.

बव्हेरिअन्स बॅझाइल हस्तगत करून घेण्याकरितां लढत असतां अगदीं सकाळींच मार्शल मॅक्. मेहन यास इतकी जबरजस्त जखम झाली कीं, त्याला रणांगणांतून सेडन शहरांत न्यावें लागलें. त्यानें सैन्याची हुकमत सेनापति डयूक्रो यास दिली. या पूर्वीच सेनापति डयूक्रो याला सेडन समोरील आपली जागा जर्मन सैन्याच्या फार मोठ्या संख्येपुढें धरून बसणें अशक्य आहे असें वाटूं लागलें होतें व आपलें सैन्य वांचविण्याचा एकच मार्ग होता व तो मार्ग म्हणजे मीझायर्स येथें परत जाणें हा होय असें त्याचें मत झालें होतें. म्हणून सैन्याचें आधिपत्य स्वीकारण्याबरोबर सैन्यानें मीझायर्सकडे परत जावें असा हुकूम त्यानें काढिला. परंतु हेंहि करण्याची वेळ केव्हांच निघून गेली होती. सेंट आलबर्टच्या अरुंद वाटेनें कूच करणें रात्रीं केव्हांहि किंवा अगदीं पहाटे शक्य होतें खरें. परंतु तें आतां मुळींच शक्य नव्हतें. डांचेरीच्या मैदानांत जर्मन सैनिकांचे थवेच्या थवे लोटले होते व कॅरिनॅनच्या रस्त्याला जाऊन पोहोंचण्यास संख्येनें जास्त

20 APR 1990

अशा शत्रुसैन्याच्या अंगावरून जाण्याखेरीज दुसरा उपायच नव्हता तथापि डयूक्रो यानें हुकूम सोडिला होता व वरिष्ठ अधिकाऱ्यांनींहि तो अंमलांत आणण्याची शर्थ केली. सेडनमधील गच्च भरून गेलेले रस्ते रिकामे होण्यास आरंभ झाला होता, इतक्यांत एकाएकीं सुटलेले नवे हुकूम रद्द करण्यांत आले पांचव्या पलटणीचा सेनापति डी फेली हा नालायक ठरल्यामुळें त्याच्या जागेवर सेनापति विंफेन याची नेमणूक झाली होती. आदल्या दिवशींच विंफेन आपल्या कामावर येऊन रुजू झाला होता मॅक्. मेहन यास अपघात झाल्यास विंफेन यानें मुख्य सेनापतीचें काम आपल्या हातांत घ्यावें असा युद्धमंत्र्याचा हुकूम विंफेन यानें आपल्या बरोबरच आणिला होता या बाबतींत बादशहाला कांहींच करितां येत नव्हतें, कारण बादशहाचा प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार जोंपर्यंत राणीकडे होता, तोंपर्यंत त्याचा राज्यकारभाराशीं मुळींच संबंध येत नव्हता. दोघे सेनापति एकत्र आले व कांहींसा कडाक्याचा वादविवाद झाल्यावर युद्धमंत्र्याचा हुकूम मान्य करणें डयूक्रो यास भाग पडलें. नंतर विंफेन यानें सैन्याचें आधिपत्य आपल्याकडे घेतलें मीझायर्सकडे परत जाण्याचा हुकूम रद्द करणें व मक् मेहन हा जखमी झाला त्यावेळीं जें जें सैन्य ज्या ज्या ठिकाणीं होतें त्या त्या ठिकाणीं त्यानें त्यानें जागा धरावी असा हुकूम सोडणें ही गोष्ट विंफेन यानें प्रथम केली. हाहि हुकूम शक्य तितका अंमलांत आणण्याची तजवीज झाली.

विंफेन याचे विफल प्रयत्न.

दरम्यान् या जागांवर नेटानें चढाई करण्याचा क्रम चालू

होताच. गार्डाची पलटण प्रत्येक पाऊलभर जाग्याकरितां लढत लढत पुढें चालली होती. ती मध्याह्नास तिसऱ्या सैन्याच्या डाव्या बाजू जवळ आली व तिला मदत करूं लागली. इलाय आणि फ्लोइंग हीं ठाणीं म्हणजे फ्रेंच आघाडीच्या किल्ल्या होत्या, म्हणून त्यांचा बचाव करण्याचें काम अपूर्व चिकाटीनें चाललें होतें; पण आतां तींहि ठाणीं जर्मनांनीं जोराचा हल्ला चढवून घेतलीं. ह्या टेंकड्या जर्मनांच्या हातीं पडल्यावर सेडन शहराला पूर्ण वेढा पडला. आतां फ्रेंचांना बाहेर पडण्यास वाट अशी मुळीं राहिलीच नाहीं. फ्रेंच सैनिक शहर व त्याच्या भोंवतालचीं खेडीं यांत जाऊन बसले व इकडे ५०० जर्मन गोलंदाजांनीं आपलीं अस्त्रें, तोफांचे गोळे व कुलपी गोळे तटावर व आंतील लोकांच्या झुंडीवर फेंकले.

फ्रेंच सैन्य शरण जातें.

नंतर विफेन यानें फ्रेंच सैनिकांनीं मोठमोठ्या टोळ्या करून एकदम गदीनें जर्मन लोकांच्या दाट रांगा फोडून निघून जाण्याचा प्रयत्न करावा असा हुकूम दिला, पण व्यर्थ. फ्रेंच सैन्याची फार अव्यवस्था झाली असल्यामुळें हेंहि करणें अगदीं अशक्य होतें. बादशहानें मृत्यूला जणूं काय बोलावणेंच पाठविलें होतें, परंतु मृत्यु त्याला आला नाहीं. त्या बादशहालाहि आतां खऱ्या स्थितीची पूर्ण जाणीव झाली व एकसारख्या चालू असलेल्या भडिमारामुळें होत असलेली प्राणहानि थांबवावी, या इच्छेनें त्यानें आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर संरक्षणाच्या जागांपैकीं एका अत्युच्च ठिकाणीं शरण आल्याची खूण

म्हणून पांढरें निशाण उभारावें असा हुकूम दिला. परंतु तोफांचा भडिमार तसाच चालू राहिला, व शत्रुसैन्यांतून जोरानें वाट काढून जावें असा अजूनहि विंफेन याचा निश्चय कायम असल्यामुळें तो शरण जाण्याची सूचना पुरती ऐकूनहि घेईना. लोकांची एक सारखी होत असलेली कत्तल पाहून बादशहाचें अंतःकरण कळवळलें. मग त्यानें आपला मुख्य जासूद जनरल सीले यास त्याच्याबरोबर पत्र देऊन प्रशिआच्या राजाकडे पाठविलें. "मी सैनिकांच्या अग्रभागीं असून नहि मृत्युमुखीं पडलों नाहीं, तेव्हां मी आपली तरवार दांतीं तृण धरून आपल्याकडे पाठवीत आहे" असा मजकूर त्या पत्रांत होता. "मी तरवारीचा स्वीकार करितों. परंतु आपण पूर्ण अधिकार असलेला आपला प्रतिनिधि तहाच्या अटी ठरविण्याकरितां मजकडे पाठवून द्यावा" असें विल्यम राजानें बादशहाला परत उत्तर पाठविलें. इतक्यांत विंफेन याचें बादशहाशीं बोलणें झालें, त्यावरून यापुढें शत्रूला विरोध करणें शक्य नाहीं असेंच त्याचेंहि मत झालें. मग त्याच दिवशीं रात्रीं सुमारें आठ वाजतां विंफेन, मोल्टके व बिझमार्क यांच्या विचारें राजास कोणत्या शर्तीं मान्य होतील हें ठरविण्याकरितां प्रशिअन छावणींत गेला. डांचेरी जवळ बेलेव्ह्यूच्या डोंगरावर ते दोघे विंफेन यास आढळले. ही भेट फ्रेंच सेनापतीला फार दुःखद झाली; कारण तींत प्रशिअन पुढाऱ्यांचा निश्चय ऐकून घेऊन तो मान्य करणें या पलीकडे त्याला कांहींएक करितां आलें नाहीं. त्यांनीं दिलेला निर्णय फार साधा होता. फ्रेंच अधिकारी व शिपाई यांनीं शस्त्रास्त्रें

व सामान यांसह लढाईंत केलेले कैदी म्हणून जर्मनांच्या स्वाधीन व्हावें एवढीच काय ती एक शर्त त्यांच्या निर्णयांत होती. यापेक्षां कांहीं तरी बऱ्या शर्तीं आपणास मिळाव्या म्हणून तीन तासपर्यंत विंफेन यानें आपली सर्व वक्तृत्वशक्ति खर्च केली. परंतु तिचा बिलकुल उपयोग झाला नाहीं ह्या युद्धांत जर्मनीच्या विरुद्ध आम्हीं लढणार नाहीं असें शपथेवर सांगून जे अधिकारी करारपत्रावर सह्या करतील त्यांना घरीं जाण्यास परवानगी मिळेल एवढींच काय ती सवलत विंफेन यांस त्या दोघांपासून मिळवितां आली.

दुसऱ्या दिवशीं या शर्तीं पद्धतशीर रीतीनें स्वीकारण्यांत आल्या. बादशहानें आपली तरवार प्रशिआच्या राजाच्या हवालीं केली. ८८,००० लोक (यांत एक मार्शल, ३९ वरिष्ठ अधिकारी आणि ३२३०) इतर अधिकारी असे होते) १०,००० घोडेस्वार व ४००० तोफा, ७० मिट्रेल्यूसेस आणि भला मोठा इतर सामग्रीचा सांठा— ह्या सर्व गोष्टी विजयी झालेल्या जर्मन लोकांच्या हातीं लागल्या. अशा रीतीनें फ्रेंच सैन्यापैकीं एक मोठें सैन्य अस्तित्वांतून नाहींसें झालें.

ह्याबद्दल दोष कोणाकडे येतो ? ज्या सैन्यानें योग्य अधिकाऱ्याच्या हुकमतीखालीं अखेरीस शरण जाण्याचा प्रसंग टाळला असता, अशा सैन्याला पॅरिस येथील संरक्षणाच्या ठिकाणीं येण्याची मनाई ज्या कोत्या दृष्टीच्या मुत्सद्यांनीं केली व ज्यांना त्या सैन्याचा खास नाश होईल अशा स्थितींत त्यास लोटून देणेंच बरें वाटलें

त्या मुत्सद्यांच्या माथींच याबद्दलचा सर्व दोष निःपक्षपाती इतिहासकार मारतील. अशा धोणाला 'नीच' हें विशेषण लावून त्याचा निषेध करणें हें खचित न्याय्य आहे. या धोरणाच्या पुरस्कर्त्यांस यापासून कोणताहि फायदा झाला नाहीं हें नमूद करण्यास मोठें समाधान वाटतें.

प्रकरण १६ वें.

युद्धाचें अखेरचें स्वरूप.

आपल्या शत्रूच्या पुढें मान वांकवून त्याला शरण जाणें या शिवाय जणूं काय फ्रान्सला गत्यंतर नाहीं असें दिसलें फ्रान्सचीं दोन सैन्यें नष्ट झालीं होतीं:—एक मेट्झ येथें कोंडून पडलें होतें व दुसरें सेडन येथें शत्रूच्या स्वाधीन झालें होतें. एवढ्यानेंच संपलें नाहीं. युद्ध झालेंच पाहिजे असा ज्या पॅरिसनें हट्ट धरला होता, त्याच पॅरिसमध्यें सेडन येथील पराभवानें राज्यक्रांति झाली ज्या राजघराण्याला युद्धाची गरज नव्हती, ज्या राजघराण्यानें पॅरिसच्या अडाणी लोकांच्या आग्रहावरून युद्धास हात घातला, त्याच राजघराण्याला लोकांनीं हद्दपार केलें, कारण ह्या युद्धांत, लोकांनींच उपस्थित केलेल्या युद्धांत यश आलें नाहीं. पॅरिसच्या लोकांनीं आपल्या दोषांबद्दलचें उट्टें बोनापार्ट घराण्यांतील पुरुषांवर काढलें जय मिळाल्यामुळें उत्साहपूर्ण अशा शत्रूच्या पुढें पॅरिस शहर आपला बचाव कसा करणार होतें ? मागला इतिहास आपण लक्षांत घेतला तर आपणास असें दिसून येईल कीं, प्रशियन लोकांच्या सारखीच फ्रेंच लोकांची वृत्ति असती तर त्यांच्या हातून कांहीं झालें नसतें व त्यांनीं केलेंहि नसतें. १८०६ सालीं पूर्व प्रशिआ खेरीज करून सर्व प्रशिआ विल्यात नेपोलिअननें एका महिन्यांत जिंकला. युद्ध पुकारल्यापासून आठ दिवसांनीं जेना व ऑर्स्टयाट या लढाया झाल्यावर

प्रशिआनें शत्रूवर हात उगारल्याशिवाय, व पुष्कळ ठिकाणीं शत्रूचें सैन्य कमी असतांहि आपलें किल्ले नामर्दपणानें त्याच्या स्वाधीन केले व इतका निःसत्त्वपणा दाखविला कीं, शत्रूनें त्यास खुशाल पाया खालीं तुडवावें. त्या लढाया होऊन २२ दिवस झाले नाहींत तोंच प्रशिआ पार रसातळाला जाऊन मिळाला. आणि आतां जेना व ऑर्स्टेयाट येथें प्रशिआला बसलेल्या धक्कयापेक्षां जास्त जोराचे व ज्यास्त घातुक असे धक्के फ्रान्सला बसले होते. फ्रान्सला पुढील गोष्टींची जाणीव होती:—आपली लष्करी योजना तिला अगदीं मुळाशीं कीड लागल्यामुळें कुजून पोकळ झाली आहे. आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकीं बहुतेकांनीं आपले अधिकार रणांत कामगिरी बजावून किंवा आपल्या गुणांनीं मिळविले होते असें नसून ते राजकृपेनें त्यांनीं ते मिळविले होते; आपल्या राजधानीच्या वेशी पाशीं विजयी शत्रु तोफांचा गडगडाट करीस असतां इकडे आपणांस नवीन पद्धति सुरू केली पाहिजे. ह्या गोष्टी जशा फ्रान्सला तशा जर्मनी व यूरोपलाहि ठाऊक होत्या. फ्रान्स खेरीज इतरांना यापुढें शत्रूला विरोध करणें हें अगदीं अव्यवहार्य आहे असें वाटत होतें. सेडन येथील जेते व जित यांच्या जातींच्या स्वभावांतील अंतर फ्रान्स खेरीज दुसऱ्या कोणींहि लक्षांत घेतलें नाहीं. जर्मन सैन्याच्या पुढाऱ्यांनीं सुद्धा जेनाच्या लढाईपासून झालेले परिणाम मनांत आणून तसेच परिणाम आतांहि झालेच पाहिजेत अशी अटकळ बांधली. एक मोठा पराभव झाल्याबरोबर (कारण त्याच दिवशीं व त्याच वेळीं झालेल्या एका मोठ्या लढाईची—जेना व ऑर्स्टेयाट हीं दोन

अंगें होतीं) प्रशिअन लोक अगदीं गडबडून गेले व अत्यंत लज्जास्पद अशा रीतीनें शत्रूस हार गेले. आतां फ्रान्सवर तर त्याहीपेक्षां दुर्धर प्रसंग गुदरला होता. म्हणून तो प्रशिआचेंच अनुकरण करील व एकहि प्रहार न करितां शत्रूस पाहिजे तें आपल्यापासून घेऊं देईल असा जर्मन अधिकाऱ्यांचा सुद्धां अजमास होता.

फ्रेंचांचें उज्ज्वल वर्तन.

परंतु सन १८०६ सालच्या प्रशियाच्या कृतीचें अनुकरण फ्रान्सनें ह्या वेळीं केलें नाहीं, यामुळें फ्रान्सची कीर्ति अक्षय राहील. नामांकित बौद्धिक कामगिरीमुळें प्रख्यात झालेल्या या सुंदर देशांत शत्रूला शरण जावें असें म्हणण्यास एकहि पुरुष पुढें आला नाहीं. त्याप्रमाणेंच जनता घाबरून गेल्याचें चिन्हहि कोठें दिसलें नाहीं. परंतु " आपण सैन्यांत दाखल होऊं या; चला, शस्त्रें धारण करून युद्धास पुढें होऊं या; देशाचें संरक्षण केलेंच पाहिजे, " असा एकच ध्वनि जिकडे तिकडे घुमूं लागला. ज्यूलस फॉव्हर हा लोकसत्तावादी पक्षाच्या मंत्र्यांपैकीं एक होता; यानें साम्राज्यावर हल्ला केला होता व साम्राज्याच्या मंत्रिमंडळामागून नव्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचा तोच पुरस्कर्ता झाला होता. सेडनच्या लढाईनतर त्याची व बिझमार्कची भेट झाली. त्या भेटींत अमुक प्रांत व किल्ले फ्रान्सनें जर्मनीस द्यावे अशी बिझमार्क यानें मागणी केल्यावर फाव्हर यानें पुढील उच्चार काढले:—" आमच्या देशांतील एक इंचभर जागा अथवा आमच्या किल्ल्यांचा एक दगडसुद्धां

आम्ही तुम्हांस देणार नाहीं " हे उच्चार फ्रान्स देशांत सर्व लोकांस काय वाटत होतें याचें निदर्शक आहे. प्रत्यक्ष स्थितीवरून पाहिलें तर फ्रान्सनें याप्रमाणें करण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्याला बरेंच यशहि आलें असें आपणांस दिसून येईल. बेझेन हा होता त्यापेक्षां निराळ्या प्रकारचा असता, मेट्झ येथील सैन्य अलौकिक बुद्धीच्या व स्वदेशाभिमानी पुरुषाच्या हुकमतींत असतें तर युद्धाचा परिणाम एकदरींत लोकांमध्यें बाणलेल्या स्वदेशाभिमानानुळें पुढें दिल्याप्रमाणें न होतां कांहीं निराळाच झाला असता इतकें खास कीं, तशा स्थितींत जर्मन साम्राज्याची पुनर्घटना आपणांस दिसली नसती.

फ्रान्स आपल्या शत्रूंवर उठतो.

सेडन व त्यांतील फ्रेंच सैन्य हीं जर्मन लोकांच्या हातीं सांपडलीं तेव्हां युद्धाचा एक भाग आटोपला. ह्या वेळपर्यंत जर्मनांनीं जें जें कांहीं केलें तें सर्व खरोखरी संरक्षणात्मकच होतें. कारण जरी ते फ्रेंच भूमीवर येऊन लढत होते तरी हा प्रथमारंभीं फ्रेंच सैन्यांत असलेल्या अव्यवस्थेचा परिणाम होता. चढाई करून संरक्षण करीत वसावयाचें असें जर्मनांचें धोरण होतें. परंतु आतां ही स्थिति अगदीं बदलून गेली होती. आतां चढाई करणें म्हणजे संरक्षण करणें असा प्रकार नव्हता. जर्मनांना आतां शत्रूवर हल्ला करून तो पुनः डोकें वर काढणार नाहीं असा त्याचा पूर्ण मोड करणें जरूर होतें स्ट्रॅसबर्ग व वेलफोर्ट या दोन ठिकाणचे वेढे तसेच पुढें चालवावयास पाहिजे होते. वेढ्याचा तोफखाना बोलावून घेतला पाहिजे;

नॅन्सीपासून पॅरिसकडे जाणारा रस्ता खुला व्हावा म्हणून ट्रूल किल्ला होईल तितका झटकर हस्तगत करून घेण्याविषयीं हुकूम दिले पाहिजेत.

बेझेनला मेट्झमधून बाहेर पडतां येत नाहीं.

हे वरील बेत पूर्ण होईपर्यंत फ्रेंचांची पॅरिसकडे जाण्याची हालचाल थांबली नाहीं. ता. ३१ ऑगस्ट रोजीं व ता. १ सेप्टेंबर रोजीं (सेडनच्या लढाईच्या एक दिवस अगोदर) मोझेली नदीच्या उजव्या तीरावर असलेल्या जर्मन सैन्यावर हल्ला करून मेट्झ येथून जोरानें वाट काढून निघून जाण्याचा नेटाचा प्रयत्न बेझेन यानें केला होता. ह्या बेझेनच्या कृतीला फ्रेंच लोक सेंट बार्बची लढाई व जर्मन लोक नॉयझेव्हाइलची लढाई असें म्हणतात. ही लढाई फार निकराची झाली. मेट्झच्या किल्लयांतून ३१ व्या तारखेस सकाळींच निघून फ्रेंचांनीं कोलोंबे घेतलें व त्याच्या समोर आपलें सर्व सैन्य जमा केलें. कांहीं करणामुळें त्यांनीं एकदम हल्ला चढविण्याची घाई केली नाहीं. बेझेनच्या सैन्यासमोरच मॅन्टाइफेल याचें २६००० पायदळ, ४८०० घोडेस्वार व १३८ तोफा इतकें सैन्य युद्धास तयार होतें व डाव्या तीरावर प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याचें सैन्य या मॅन्टाइफेलच्या छावणीकडे गरज पडेल तेथें कुमक पाठविण्याकरितां एकसारखी नजर ठेवून बसलें होतें. बेझेन यानें मिळेल तेवढें सगळें सैन्य किल्लयाच्या बाहेर आणिलें होतें, परंतु त्याला शत्रूच्या आपल्यापेक्षां संख्येनें थोड्या पण उत्तम रीतीनें जागा धरून बसलेल्या सैन्या-

वर हल्ला चढविण्यास चार वाजले. सहा वाजतां बेझेन यानें नॉयझेव्हाइल हें खेडें व त्याच्या दक्षिणेस असलेला दारू काढण्याचा कारखाना हीं घेतलीं. तेथून तो पुढें गेला व जातांनां मॉन्टॉय, कॉइन्सी व आणखी कांहीं लहान लहान खेडीं घेऊन त्यानें ९ वाजतां सर्व्हिनी घेतलें. परंतु ह्या ठिकाणीं त्याच्या यशस्वी चालीची मजल थांबली फ्रेंचांनीं पॉइ व फेली यांतून आपला मार्ग पुढें काढण्याचे पुष्कळ प्रयत्न केले, परंतु त्यास यश आलें नाहीं. दहा वाजतां जर्मनांनीं सर्व्हिनी पुनः घेतलें, परंतु त्यांनीं पुनः पुनः नॉयझेव्हाइल घेण्याचा प्रयत्न केला असतां त्यांस मागें हटणें भाग पडलें. दरम्यान् सेंट बार्ब आणि मालॉय–चार्ली यांच्या बाजूनें डाव्या तीराकडून पुष्कळ कुमक मान्टाइफेल यास येऊन पोहोंचली, आणि कार्सेली येथें स्वस्थ बसलेली एक ब्रिगेड ऑगीवर पाठविली. ही मदत आल्यावर मान्टाइफेल याच्याजवळ ६९००० पायदळ व २९० तोफा इतकें सैन्य झालें. मग त्यानें दुसऱ्या दिवशीं पहांटे तोफांचा जोराचा व एकसारखा मारा चालू ठेवून नॉयझेव्हाइलवर पुनः हल्ला केला व नऊ वाजण्याला नॉयझेव्हाइल घेऊन आदल्या दिवशीं हातांतून गेलेल्या इतर सर्व जागाहि त्यानें परत घेतल्या. याप्रमाणें फ्रेंचांचा पराभव झाल्यामुळें त्यांची हिंमत खचली व ते पुनः मेट्झच्या किल्ल्यांत परत गेले. यश येण्यास सेनापतीनें आपल्या सैन्यास वीरश्री चढावी म्हणून जी हिंमत व कुशलता दाखविली पाहिजे, ती या वेळीं बेझेननें दाखविली नाहीं, असें म्हटल्याखेरीज आमच्यानेंच राहवत नाहीं. ज्या जागीं परत आल्यामुळें फ्रान्सचें

मुख्य सैन्य देशाला निरुपयोगी झालें, त्या जागीं परत येण्यापेक्षां प्रत्येक मनुष्य पडेपर्यंत लढणेंच बरें झालें असतें.

पॅरिस येथील युद्धसामग्री.

दरम्यान् इतर जर्मन सैनिक पॅरिसला जाणाऱ्या रस्त्यानें पुढें चाल करून जात होते. ता ५ सेप्टेंबर रोजीं प्रशिआचा राजा व्हीम्समध्यें शिरला. ता. ८ रोजीं लेआन शरण आलें. ता. १५ ला तिसऱ्या व चौथ्या सैन्याच्या आघाडीला गेलेल्या लोकांनीं पॅरिसला पोहोंचण्यास तीन तास लागतील इतक्या अंतरावर पॅरिसच्या बचावाच्या जागांभोंवतीं अर्धवर्तुळाकार तळ दिला.

फ्रान्समध्यें झालेल्या राज्यक्रांतीमुळें ट्राकू नांवाच्या एका सेनापतीच्या हातांत पॅरिसच्या कारभाराची सत्ता आली होती. अशा महत्त्वाच्या राज्यक्रांतींच्या वेळीं पॅरिसमधील लहरी सामान्य जनतेला आंवरून धरण्यास वर्तनानें जोरदार व विशाल लोकोत्तर बुद्धीच्या पुढारी पुरुषाची अत्यंत जरूर होती हें निर्विवाद आहे; आणि ट्राकू याची बुद्धिमत्ता जरी सामान्यच होती तरी त्याला आव चांगला आणितां येत असे. तो लांब लांब बाता मारी. अंगीं आत्मविश्वास नसतांहि तो असल्याचा मोठा बाहणा करी व त्याच्यासारख्या माणसाच्या हातून जी कार्यसिद्धि होणें शक्य नव्हतें अशीं कामें फत्ते करण्याविषयीं लोकांस वचनें देण्यास तो मागें पुढें पाहत नसे. संरक्षणाच्या जागांतून आंतल्या आंत जर्मनांबरोबर टक्कर देण्यास उपलब्ध अशीं साधनें चांगलीं मुबलक होतीं असें मुळींच नाहीं. सेडन

येथें खास नाश होण्याकरितां पाठविलेल्या १,३०,००० सैन्याचा त्याला कांहींच उपयोग नव्हता ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. परंतु सेनापति व्हिनॉय याची तेरावी व सेनापति रेनॉल्ट याची चौदावी पलटण आणि १८००० आरमारी शिपाई इतके एकंदर ८८,००० उत्तम शिकलेलें नेहमींचें सैन्य त्याला उपयोगांत आणितां येण्यासारखें होतें. ह्या शिवाय त्याच्याजवळ खालीं दिलेले लोक होते:—व्हिन्सेनी व सेंटमार येथील छावणींत १,००,००० गार्ड मोबाइलसपैकी सैनिक होते, परंतु त्यांचें लष्करी शिक्षण अर्धवटच झालेलें होतें. दहा हजार प्रांतिक स्वयंसेवक हे लोक दृढनिश्चयी असून आपल्या देशाकरितां प्राण देण्याची त्यांची तयारी होती. राष्ट्रीय गार्ड पलटणींत साठ जुन्या व १९४ नव्या बॅटॅलिअन्स व पॅरिसचे संकीर्ण स्वयंसेवक सर्व मिळून बहुतेक २,००,००० लोक असावे, परंतु हे सर्व खात्रीनें उपयोगी पडतीलच असा विश्वास धरितां येत नव्हता. एकंदर फ्रेंच रक्षकांची संख्या ४००००० होती. परंतु यांपैकीं ८८००० नेहमींचे सैनिक व १०००० प्रांतिक स्वयंसेवक एवढेच काय ते ज्यांच्यावर भिस्त ठेवितां येईल, असे सैनिक होते. पुढें कांहीं दिवसांनीं ा विश्वसनीय सैनिकांच्या संख्येंत आणखी १,२२,००० लोकांचा भरती झाली.

संरक्षणाची योजना.

सेडन येथून निसटून जे लोक पॅरिसला आले, त्यांत सेनापति ट्रॉको हा होता. सेडनची लढाई झाल्यावर त्यानें "मी

पानआ–मौसान येथें राहीन व यापुढें युद्धांत भाग घेणार नाहीं" असें शपथपूर्वक सांगितल्यावरून त्यास सोडून देण्यांत आलें होतें असें जर्मन अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे. ह्या दोषारोपाचा तो साफ खोटा म्हणून डूक्रो यानें शेवटपर्यंत इनकार केला आणि वास्तविक पाहतां हा आरोप साधार केव्हांच सिद्ध झालेला नाहीं. दुसऱ्या सैन्याची हुकमत ट्राकू यानें डूक्रो याच्याकडेच दिली व पॅरिसवर हल्ला करणाऱ्या जर्मनांशीं दोन हात याचेंच झाले. फ्रेंच संरक्षणाचें पहिलें सैन्य सेनापति थामस याच्या हुकमतींत होतें व तें राष्ट्रीय गार्ड्स यांनीं बनलेलें होतें. डूक्रोचें दुसरें सैन्य नेहमींच्या सैनिकांचेंच होतें; तिसऱ्या सैन्यांत सात स्वयंसेवकांच्या तुकड्या होत्या व त्याचा सेनापति व्हिनॉय हा होता. सेनापति ट्रोकू याचा बेत असा होता कीं, दुसऱ्या सैन्यानें वेढा देणाऱ्या शत्रुसैन्याच्या रांगांतून जोरानें वाट करून निघून जावें व इकडे पहिल्या सैन्यानें शहराच्या सरक्षणाच्या जागा व किल्ले धरून बसावें आणि तिसऱ्या सैन्यानें इतर ठिकाणीं बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे जर्मनांना चोहोंकडे लक्ष देणें भाग पडून तारांबळ उडेल. पुढें कांहीं दिवस झाल्यावर राष्ट्रीय गार्डांपैकीं अविवाहित लोकांच्या निराळ्या पलटणी बनविल्या व त्यांचा नेहमींच्या पायदळ सैनिकांप्रमाणें उपयोग केला.

पॅरिसमधून निघून जाण्याचे प्रयत्न फसतात.

आतां पॅरिसला जो वेढा पडला त्यांत घडलेल्या बारीकसारीक गोष्टींची हकीकत देण्यास जागा नाहीं. परंतु ता. ५ सेप्टेंबर रोजीं

सीन नदीच्या डाव्या तीरावर दक्षिणेकडील जर्मन अघाडीवर हल्ला करून पॅरिस शहराला पूर्ण वेढा पडूं नये म्हणून ब्रूकोनें मोठ्या नेटाचा प्रयत्न केला, इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे पेटिट बिसेटर व चॅटिलान यांच्यामध्यें सीकॉ येथें लढाई झाली. तिसरी बव्हेरिअन पलटण व्हिलेनूव्ह–सेंट जॉर्ज येथें सीन नदी उतरून पुढें चालली, इतक्यांत सीका व्हिलेजूइफ व मान्टूग यांच्या दरम्यान् तिची व ब्रूकोच्या तीन तुकड्यांची अकस्मात गांठ पडली. प्रशिआच्या क्रौन प्रिन्सची पांचवी प्रशिअन पलटण व्हर्सेल्झकडे जात होती तिच्या साहाय्यानें बव्हेरिअन सैन्यानें फ्रेंच सैन्यास प्लेसी–पिकेटच्या टेंकड्यांवरून हाकून दिलें आणि त्यांना दक्षिणेकडील किल्ल्यांच्या मागें आश्रयास जाण्यास भाग पाडिलें. मौलिन–ले–टूर येथें फ्रेंचांनीं उभारलेली मोर्चेबंदी, सात तोफा आणि सुमारें तीनशें कैदी केलेले सैनिक हे सर्व जेत्यांच्या हातीं लागले. ह्यानंतर सेव्हरपासून मार्न नदीपर्यंत दक्षिण व आग्नेय या दिशांकडील शहरांच्या आघाडीवर तिसऱ्या जर्मन सैन्याला जागा धरण्यास मुळींच त्रास पडला नाहीं. चौथ्या सैन्यानें ईशान्य व उत्तर दिशांकडील फ्रेंचांच्या आघाडीकडे तोंड करून व सीन नदीचीं वांकणें लक्षांत घेऊन आणि घोडे स्वारांच्या पलटणीनें पश्चिम आघाडीकडे तोंड करून तळ दिला होता. ता. ५ ऑक्टोबर रोजीं क्रौन प्रिन्सनें आपलें मुख्य ठाणें व्हर्सेल्झ येथें केलें, व राजाचें मुख्य ठाणें, पॅरिस रॉथ्सचाइल्डस यांचें वसतिस्थान फेरायरस येथें होतें. ह्याच ठिकाणीं फ्रेंचांचा परराष्ट्रीय मंत्री जूल्स फेव्हर व बिझमार्क याची सर्वश्रुत भेट झाली. ह्याच भेटींत

" फ्रान्स आपल्या प्रांतांतील एक टीचभर जागा किंवा किल्ल्यांचा एक दगडहि जर्मनांस देण्यास तयार नाहीं " असे उद्गार ज्यूल्स फेव्हर यानें काढिले. या भेटीपासून फलनिष्पत्ति अशी कांहींच झाली नाहीं.

दरम्यान् ता. २४ सेप्टेंबर रोजीं टूलचा किल्ला जर्मनांच्या हातीं पडला स्ट्रेस्बर्गच्या वेढ्यांत ६ आठवडे फ्रेंचांनीं टिकाव धरला. परंतु त्याच्यावर जोराचा हल्ला चढवून तो घेण्याची तयारी पूर्ण होणार इतक्यांत किल्ल्याचे अलग असलेले बुरूज जर्मनांनीं घेतले असून तटबंदींत शिरतां येण्यासारखें भगदाडहि पाडिलें आहे असें फ्रेंचांनीं पाहिलें. मग ता. २७ सेप्टेंबर रोजीं त्यांनीं किल्ला जर्मनीच्या स्वाधीन केला.

सेप्टेंबर अखेर पॅरिस शहराला पूर्ण वेढा पडला तथापि अजूनहि जर्मन्स मुख्यत्वेंकरून हल्ला आलाच तर स्वसंरक्षण करण्याचेंच तेवढें काम करीत होते चढाईच्या हालचाली करूं लागल्यास जर्मन सेनापतींना वेढ्याचे तोफखाने येईपर्यंत वाट पाहणें भाग होतें ता. ३० सेप्टेंबर रोजीं दक्षिणेकडील आघाडीवरून सेनापति व्हिनॉय यानें बाहेर पडण्याकरितां दुसरा हल्ला केला, परंतु सहा तास लढल्यावर त्याला माघार घेणें प्राप्त झालें. नंतर कांहीं वेळ किल्ल्यावरून तोफांचा भडिमार करण्यापलीकडे फ्रेंचांनीं कांहीं एक केलें नाहीं. मान्टव्हॅलेराइन किल्ल्यावर मोठ्या व्यासाच्या नळ्यांच्या लढाऊ गलबतावरील तोफा ठेविल्या होत्या त्यांच्या भडिमारानें शत्रूच्या तिसऱ्या सैन्याच्या डाव्या बगलेला फार त्रास झाला. आयसी, व्हाव्हे,

मान्टूयूग, बिसेटर व आयव्ही ह्या दक्षिणेकडील किल्ल्यावरून, दक्षिणेडील आघाडीच्या चॅरेटेन किल्ल्यावरून, पूर्वेकडील आघाडीच्या किल्ल्यावरून, आणि ह्या सर्वांना जोडणाऱ्या बाहेरील कोटावरून एकसारखा भडिमार होत होता. त्यामुळें शत्रूला जवळ येतां आलें नाहीं. ता. १३ ऑक्टोबर रोजीं दक्षिणेकडील अघाडीवरून पुनः तिसरा हल्ला झाला, परंतु पूर्वीप्रमाणेंच तोहि शत्रूनें मागें परतविला. ता २२ रोजीं मान्टव्हॅलेराइन येथून सेनापति ह्विनाय याच्या सैन्यानें चौथा हल्ला केला, परंतु त्याचाहि परिणाम तसाच झाला. इतक्यांत ट्रूल व स्ट्रॅस्बर्ग हे किल्ले सर करून मोकळे झालेलें जर्मन सैन्य युद्धरेषेवर आलें. आणखीहि असेच सैनिक येणार अशी अटकळ होती, कारण न्यू–ब्रायझॅक व व्हर्डन यांस जर्मन्स वेढा देत होते आणि बेल फोर्ट यास वेढा घालण्यास जर्मन सैन्य चाललें होतें व फैब्बर्ग व बिट्स्के यांचे मार्ग जर्मन सैन्य बंद करून टाकीत होतें

ह्विनॉय यानें केलेल्या चौथ्या हल्ल्याच्या दिवशीं (ता. २१) मान्टव्हॅलेराइनवरून झालेल्या तोफांच्या माऱ्यानें सेंट क्लौड यास आग लागली व त्याचा नाश झाला. ह्यानंतर एका आठवड्यानें उत्तर बाजूकडून हल्ला करणाऱ्या जर्मनांवर फ्रेंचांनीं पांचवा हल्ला केला. त्यांनीं प्रशिअन सैन्याला लेबूर्गेट येथून हाकून लावून ती जागा बळकाविली परंतु पुढें दोन दिवसांनीं पुष्कळ तास लढाई करून प्रशिअन गाडींच्या तिसाव्या पलटणीनें तें स्थान परत घेतलें. ह्या झटापटींत दोन्ही पक्षांमध्यें प्राणहानि फार झाली.

बेझेन शरण जातो.

अजूनहि पुष्कळ फ्रेंच लोकांना अखेरीस फ्रान्स विजयी होईल अशी आशा होती, परंतु ती आशा निष्फळ करून टाकणारी अशी एक गोष्ट ऑक्टोबर संपतां संपतां घडून आली ता. २७ ऑक्टोबर रोजीं मार्शल बेझेन यानें मेट्झ व आपलें सर्व सैन्य वेढा घालणाऱ्यांच्या स्वाधीन केलें त्यामुळें फ्रान्सचे तीन मार्शल्स, ६००० वरिष्ठ व इतर अधिकारी आणि १,७३००० शिपाई जर्मनांच्या हातीं लागले. इतक्या मोठ्या सैन्याला अन्नसामुग्री पुरेशी मिळणें अशक्य झाल्यामुळें याप्रमाणें शत्रूला शरण जाणें मला भाग पडलें असें बेझेन याचें म्हणणें आहे. ज्या वर्तनानें फ्रान्सची परमावधीची हानि झाली, तें वर्तन योग्य होतें असें सिद्ध करण्यास ही सबब पुरेशी मानावी कीं काय, हें संशयात्मकच आहे. स्वतःचें सैन्य जगविण्याचे व शत्रूच्या सैन्याचा नाश करण्याचे जे जे उपाय करणें सेनापतीला अवश्य होतें, ते ते सर्व प्रयत्न बेझेन यानें करून पाहिले किंवा कसें, हें तर जास्तच संशयात्मक आहे. इतकें खचित कीं, राजकारणसंबंधीं विचारांचा पगडा बेझेनच्या मनावर जास्त बसून तो असें करण्यास प्रवृत्त झाला असावा. कारण बेझेन हा बोनापार्ट घराण्याचा पक्का पक्षपाती असून, ज्या पक्षाचें पॅरिसमध्यें यावेळीं वर्चस्व होतें त्याचा तो द्वेष्टा होता. नायझेव्हाइलचा मोठा हल्ला (३१ ऑगस्ट) झाल्यावर लागलींच त्यानें ता. २७ सेप्टेंबर व ता. ७ ऑक्टोबर या दिवशीं बाहेर निघून जाण्याचे दोन प्रयत्न कसेबसे केले.

ता. २४ सेप्टेंबरपासून रेगनायर नांवाच्या एका माणसाच्या मार्फत जर्मन सेनापतीपाशीं बेझेन यानें गुप्त पत्रव्यवहार चालू ठेवला होता. सैन्याला अडथळा न होतां तें आपल्याला बादशाही सत्ता पुनः स्थापित करण्याकरितां घेऊन जातां यावें अशा बेतानें तह ठरवावयाचा, असा या पत्रव्यवहाराचा अंतस्थ हेतु होता हाच हेतु मनांत धरून त्यानें सेनापति बूर्बाकी यास इंग्लंड येथें राणीकडे ता १५ सप्टेंबर रोजीं, व त्याच्या स्टाफचा मुख्य सेनापति बॉयर यास, व्हर्सेल येथें जर्मनांच्या मुख्य ठाण्याकडे ता. १२ ऑक्टोबर रोजीं रवाना केलें होतें परंतु त्याचे सर्व बेत बसले. सैनिक या बेझेनच्या बेतांत सामील होण्याचें नाकारतील असें त्याच्या सेनापतींपैकीं कांहींनीं आपलें मत दिलें होतें, हें या कामांत बेझेनच्या अपयशाचें मुख्य कारण होय. अशा निराशा झाल्यावर ता. २७ ऑक्टोबर रोजीं बेझेन शरण गेला. या बेझेनच्या कृत्यामुळें ८०० मोठाल्या तोफा, १०२ मिट्रेल्यूसेस व ३ लक्ष शॅसेपो बंदुका इतकी युद्ध-सामग्री व यूरोपांतील अतिशय बळकट किल्ल्यांपैकीं एक किल्ला हें सर्व जर्मनांच्या ताब्यांत गेलें. याचमुळें प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स याचें वेढा देणारें सैन्य प्रशिअन राजाला फ्रान्सच्या उत्तरेकडे व दक्षिणेकडे आतां पाठवितां येऊन त्याला स्वतःला पॅरिसचा वेढा नेटानें तसाच पुढें एकाग्र चित्तानें चालविण्यास सवड मिळाली.

ॲम्देट्टा.

प्रतिनिधि-राणीच्या हातांतून ज्या सत्ताधारी मंडळानें मोठी गडबड करून जबरीनें राज्यकारभार काढून घेतला होता, त्या मंडळी-

मध्यें गॅम्बेट्टा नांवाचा एक वकील होता. आपल्या भाषणानें तो लोकांवर आपली छाप पाडीत असे, तो मोठा हिंमतवान् व निश्चयी होता. कोणत्याहि गोष्टीचें मर्म त्याच्या तेव्हांच लक्षांत येई. त्याची इच्छाशक्ति मोठी दांडगी होती. पॅरिसला वेढा पडून फार दिवस झाले नाहींत तोंच त्याच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं शहरावर गुदरलेल्या अनर्थामुळें लोकांमध्यें उत्पन्न झालेल्या उत्साहशक्तीला चांगलें वळण देऊन पॅरिसच्या बाहेर तिचा उत्तम उपयोग करून घेणें अत्यंत अवश्य आहे. पॅरिसला पूर्ण वेढा पडण्याच्या पूर्वी कारभारीमंडळाच्या कांहीं सभासदांना टूर्स येथें या राष्ट्रीय चळवळीला योग्य वळण लावण्याकरितां पाठविण्यांत आलें होतें. परंतु ही चळवळ सफळ होण्यास तिचा नेता मोठा हिंमतवान् असला पाहिजे, याची जाणीव गॅम्बेट्टा इतकी दुसऱ्या कोणालाहि नव्हती. म्हणून स्वतः टूर्स येथें जाऊन राष्ट्रांतील साधनांचा योग्य उपयोग करून घेण्याचें काम आपल्या देखरेखीखालीं करावयाचें, असा त्यानें निश्चय केला. पॅरिसमधून बाहेर पडण्याचा इतर कोणताहि मार्ग उरला नाहीं असें पाहून तो ता. ७ ऑक्टोबर रोजीं एका विमानांत बसून निघाला व टूर्स येथें दाखल झाला. मग तेथें तो युद्धखात्याचा मुख्य मंत्री झाला, व फान्सचीं सत्तासूत्रें व्यवहारदृष्ट्या त्याच्याच हातांत आलीं. तेथून त्यानें एक जाहीरनामा काढून त्यांत पुढील उपदेशप्रमाणें वागण्याची लोकांस मोठ्या कळकळीनें विनंति केली:—" तुम्ही शत्रूला विरोध करण्याचें काम मरण येईपर्यंत चालू ठेवा;

भोर

शस्त्र धारण करण्याची ताकद असणाऱ्या प्रत्येक माणसानें या कामाला हातभार लावण्याकरितां टूर्स येथें पायदळांत येऊन मिळावें." याप्रमाणें त्यानें प्रथम उत्तरेकडील सैन्य व 'लायर' सैन्य अशीं दोन सैन्यें तयार केलीं व पुढें कांहीं दिवसांनीं पूर्वेकडील सैन्य म्हणून एक तिसरें सैन्यहि त्यानें उभारिलें. सर्व बाबतींत त्यानें अनेक प्रकारचे उपाय इतक्या कुशलतेनें काढले कीं, ते पाहून सर्व जग अगदीं थक्क झालें. शस्त्रें, शिपायांचे लष्करी पोषाख, दारूगोळा आणि इतर सामग्री हीं सर्व त्यानें परदेशांतून—विशेषतः इंग्लंडांतून पैदा केली. नवीन सैन्यभरतीवर खरे शिपाई असतील त्यांचींच सेनापतींच्या जागेवर नेमणूक करण्याच्या कामीं त्यानें अत्यंत खबरदारी घेतली. फैथर्बी, आरेली, डी पॅलेडाइन्स व चॅन्झीं हे सैनापति त्यानेंच निवडलेले होते. लोकांमध्यें हुरूप उत्पन्न करणाऱ्या त्याच्या शिकवणीमुळें या प्रांतिक युद्धाला विशेष महत्त्वाचें रूप येऊं लागलें. राष्ट्राकरितां त्यानें केलेल्या विनंतीस लोकांनीं मोठ्या उत्साहानें मान दिला. आरंभीं आलेल्या अपयशामुळें नाउमेद न होतां नवीन भरती केलेले शिपाई जास्तच नेटानें लढूं लागले. आर्थेनी व आर्लीन्स येथें फॉन डर्थॅन याच्या हाताखालच्या बॅव्हेरिअन्सबरोबर आणि चॅटॉउन व चॅर्ट्रीज येथें ब्रिटिच या तुकडीबरोबर ह्या नव्या सैनिकांनीं मोठ्या धैर्यानें युद्ध केलें. परंतु एकसारख्या वाढत जाणाऱ्या मोठ्या शत्रुसैन्यावरोबर गॅम्बेट्टा लढत होता. लवकरच जर्मनांना कुमक येऊन पोहोंचूं लागली मेट्झ येथें फ्रेंच लोक शरण गेल्यामुळें जर्मनांना आपलीं सर्व साधनें एकत्र आणिवतां आलीं व पुढें त्यांना

सहजच या मवीन चळवळीला तिच्या बाल्यावस्थेंतच उखडून टाकितां आलें जर्मन लोक मेट्झच्या वेढ्यांत गुंतले असतांनाच जर ही चळवळ फोंफावली असती तर पॅरिसचा वेढा उठविणें जर्मनांस भाग झालें असतें. मेट्झचा किल्ला पडल्यावर प्रतिक जागृतिपासून कांहीं धोका उत्पन्न झाला आहे असें प्रशिअन राजाच्या लक्षांत चांगलेंसें न आल्यामुळें त्यानें मान्टाइफेल यास पहिलें सैन्य आपल्या हुकमतींत घेऊन तुम्ही आर्लीन्सकडे जा व इकडे प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स यानें पॅरिसला वेढा देणाऱ्या सैन्याच्या मदतीकरितां आपल्या सैन्याचा दुसरा भाग व्हर्सेलकडे पाठवावा आणि पहिला भाग आपण घेऊन त्यानें दक्षिणेकडे जावें असा हुकूम दिला. फॉन डर्थॅन याच्या हाताखालच्या बव्हेरिअन्स यांनीं लायर नदीवरून हालचाल करावी असा त्यांस हुकूम मिळाला होता,

प्रांतांतील चळवळी.

दरम्यान् गॅम्बेट्टानें लायर सैन्यांत शिपायांची संख्या १ ५०,००० पर्यंत वाढविली होती या सैन्याची हुकमत सेनापति ऑरेली डी पॅलेडाइन्स यास दिली होती. त्याचा बेत आर्लिन्स परत घ्यावें व पॅरिसला जाण्याला रस्ता खुला करावा, असा होता. नोव्हेंबरच्या आरंभीं सेनापति ऑरेली हा आर्लीन्स परत घेण्याच्या आशेनें लायर नदीच्या उजव्या तीरानें पुढें चाल करून गेला त्याचा रस्ता अडवून धरून कौल्मायर्स येथें फॉर डर्थॅन हा चांगली जागा धरून बसला होता. त्या ठिकाणीं ऑरेली यानें त्याच्यावर हल्ला केला.

त्यांची मोठी भयंकर लढाई झाली व चार्ट्रीजच्या आग्नेयेस २७ मैलांवर टौरी येथें परत जाणें फॉन डर्थॅन यास भाग पडलें. टौरी येथें विटिक तुकडी व सॅक्सनीच्या क्राउन प्रिन्सची घोडेस्वारांची तुकडी होती, त्यांस फॉन डर्थॅन जाऊन मिळाला. त्याच दिवशीं पॅरिसचा रस्ता मोकळा सोडून देऊन जर्मनांनीं आर्लीन्स मोकळें केलें. व्हर्सेल्स येथें असलेल्या जर्मन सेनापतींस आतां मोठी दहशत पडली व त्यानीं पॅरिसच्या वेढ्यांतून दोन तुकड्या वेगळ्या करून त्यांना दुसऱ्या सैन्याचा मुख्य भाग घेऊन प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स येऊन पोहोंचेपर्यंत आरेलीच्या सैन्यास अडवून धरण्याकरितां पाठवून दिलें. शत्रूनें केलेली ही सैन्याची योजना आरेलीच्या कानीं पडली. त्याच्या अगोदरच आरेली आपलें सैन्य घेऊन पॅरिसकडे जाण्यास निघाला होता. परंतु वर सांगितलेल्या या दोन जर्मन तुकड्यांचे सेनापति व्हॉइन्ट्स-हेट्झ आपली पांचवी पलटण घेऊन येऊन मिळाला आहे असें आरेली यास कळल्यावर तो त्यांच्यावर बॉनी ला-रोलँडी येथें हल्ला करण्याकरितां एका बाजूस झाला. ह्या ठिकाणीं त्याचा पराभव झाल्यामुळें तो आर्लीन्सकडे परत गेला, व त्या शहराजवळील झाडीच्या आघाडीवर जागा धरून बसला ता. ३ डिसेंबर रोजीं तेथें त्याच्यावर हल्ला झाल्यावर त्याला शहरांत शिरणें जरूर झालें. दुसऱ्या दिवशीं उत्तर व पश्चिम या दोन्ही जर्मन सैन्यांच्या सेनापतींनीं उपान्त भागांत प्रवेश केला. नंतर जर्मन सेनापति, ग्रॅन्ड ड्यूक ऑफ मेक्लेनबर्ग-स्केरिन याच्याबरोबर केलेल्या तात्पुरत्या तहाप्रमाणें फ्रेंचांनीं आर्लीन्स शहर सोडिलें व ठरल्याप्रमाणें

मध्यरात्रींनंतर जर्मन लोक शहरांत शिरले. फ्रेंच लोक टूर्सकडे मागें हटले व जर्मन घोडेस्वारांची तुकडी त्यांच्या पाठीमागें गेली. फ्रान्सच्या त्या भागांतील युद्धाच्या हालचालींचें मुख्य ठाणें आतां जर्मनांनीं आर्लीन्स शहरीं केलें व म्हणून युद्ध संपेपर्यंत आर्लीन्स यापुढें त्यांनीं आपल्याकडचें जाऊं दिलें नाहीं.

जर्मनांची संख्याबळामुळें सरशी होते.

ऑरेलींच्या हालचालींचा असा शेवट झालेला पाहून गॅम्बेट्टानें त्याला सेनापतीच्या जागेवरून दूर केलें. गॅम्बेट्टानें नंतर लायर सैन्याचे दोन भाग करून एक भाग, नुकताच राणी यूजेनाय इच्या-पाशीं आपलें काम संपवून इंग्लंडांहून परत आलेल्या, सेनापति बूर्बाकी याच्या व दुसरा भाग सेनापति चॅन्झी याच्या हुकमतींत दिला. ब्रूर्जेस येथें बूर्बाकी यानें तळ ठेविला व प्रिन्स फ्रेडरिक चार्ल्स आपलें सैन्य घेऊन त्याच दिशेनें येत होता हें त्यास माहीत असल्यामुळें त्याला तोंड देण्याच्या तयारीनें तो त्याच्या येण्याची वाट पाहत बसला. इतक्यांत चॅन्झी, बॉजेन्सी येथें जाऊन तळ देऊन राहिला. त्याच्या वर प्रॅन्ड डयूक ऑफ मेक्लेन्बर्ग याच्या हुकमतींतील सैन्य चाल करून आलें. ह्या हालचालींमागून जे दोन हल्ले होणार होते त्यांच्या निकालावर युद्धाचें अखेरचें यशापयश अवलंबून आहे असें वाटलें. परंतु व्हर्सेल येथील जर्मन अधिकाऱ्यांनीं बूर्बाकीकडे मुळींच लक्ष न देतां चॅन्झीच्या विरुद्ध एकाग्र चित्तानें हल्ला करावयाचा असें ठरविलें. त्यांनीं त्याप्रमाणें फ्रेडरिक चार्ल्स यास हुकूमहि सोडले बूर्बाकीवर

नजर ठेवण्याकरितां आपल्या सैन्याचा थोडा भाग रेड प्रिन्स यानें ठेविला ९ वी व १० पलटण बरोबर घेऊन तो ग्रॅन्ड डयूक याला मदत करण्याकरितां गेला. दरम्यान् चॅन्झी यानें म्यूंग येथें डिसेंबर ७ रोजीं पश्चिम सैन्याच्या आघाडीच्या पलटणीवर थोडा जय मिळविला होता, परंतु दुसऱ्या दिवशीं बॉजेन्सी येथें ग्रॅन्ड डयूक यानें पराभव केल्यामुळें त्याला मारचेनॉयरच्या रानाकडे परत जावें लागलें. तथापि ता. १० रोजीं चॅन्झी यानें पुनः चढाई केली, परंतु तोफांच्या भडिमाराची भयंकर चकमक झाल्यावर त्याला पुनः परतावें लागलें. नतर चॅन्झी, ब्लाईकडे गेला. जर्मनांची एक पलटण त्याच्या मागें गेली व तिनें ता. १३ रोजीं ब्लाई घेतलें. नंतर चॅन्झी व्हर्डोंमकडे गेला. त्या ठिकाणीं गॅम्बेट्टा त्याला येऊन भेटला. त्यांचा युद्धासंबंधीं कांहीं वेळ विचार झाल्यावर त्यांनीं व्हर्डोंम सोडून दिलें. नंतर फ्रेंच सैन्य ली मान्सकडे परत गेलें. ग्रॅन्ड डयूक मागून येऊन त्यानें ला मारी येथें फ्रेंचांच्या पिछाडीच्या रक्षकांचा पराभव केला व ता. १६ रोजीं त्यानें व्हर्डोंम ताब्यांत घेतलें. नंतर ग्रॅन्ड डयूक यानें सैन्याच्या दोन तुकड्या करून टूर्स आणि ली मान्स यांच्यावर चाल केली टूर्स येथील सैन्यानें प्रथम थोडा विरोध केला. पण तें लवकरच शरण आलें, (ता. २१ डिसेंबर); परंतु हुकुमाप्रमाणें ता १९ जानेवारी पर्यंत जर्मन सैन्य शहरांत शिरलें नाहीं परंतु त्या सैन्यानें ली मान्सकडे जाणारा आगगाडीचा रस्ता उखडून टाकिला व तें सैन्य शहराच्या आसपास तळ देऊन राहिलें. चॅन्झीनें पुनः एकवार व्हर्डोंम

जवळ चढाई करण्याचा प्रयत्न करून पाहिला (ता. ३१ डिसेंबर) परंतु त्याचें फार नुकसान होऊन त्यास मागें फिरावें लागलें.

प्रांतांतील लढाया.

ता. २० नोव्हेंबर रोजीं उत्तरेस ॲमन्स येथें प्रशिअन सैन्यानें सेनापति फॅरे याच्या हुकमतींतील फ्रेंच सैन्याचा पराभव केला होता. फॅरे ह्यास त्या कामावरून दूर करून आतां त्याच्या जागीं गॅम्बेट्टानें सेनापति फैधर्बे याची नेमणूक केली होती. फैधर्बे यानें हॅल्ल नदीवर सुमारें ५४,००० सैनिकांसह (या सैनिकांपैकीं बहुतेकांची नवीनच भरती झालेली असल्यामुळें त्यांना अनुभव असा मुळींच नव्हता) चांगल्या सोईच्या जागीं चांगल्या तयारीनें तळ ठेविला होता. तेथें ता. २२ डिसेंबर रोजीं मान्टाइफेल यानें आपल्या दोन तुकड्या बरोबर घेऊन फैधर्बे याच्यावर हल्ला करून त्यास आरासाच्या पाठीमागच्या बाजूस परत जावयास लाविलें. ता. २६ डिसेंबर रोजीं मान्टाइफेल बापाम येथें गेला व तेथून त्यानें आपल्या सैन्यापैकीं बरेंच मोठें सैन्य पेरोनला वेढा देण्याकरितां पाठविलें. जर्मन सैन्य असें फोडलेलें पाहून फैधर्बे यानें बापाम येथें असलेल्या जर्मन सैन्यावर ता. २ जानेवारी रोजीं हल्ला केला. त्या दिवशीं त्याला माघार खात्री लागली, परंतु दुसऱ्या दिवशीं त्यानें पुनः हल्ला चढविला. लढाई मोठ्या निकराची झाली व त्यांत हल्ला चढविणारांच्या इतकेंच जर्मनांचेंहि नुकसान झालें. परंतु संध्याकाळीं फैधर्बे यास आरास व इएकडे परत जावें लागलें. ता. १० रोजीं पेरोन पडलें. नंतर फैधर्बे

यानें दक्षिणेकडे निघून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु ता. १७ रोजीं बॉव्हॉय येथें फॉन गोबेन यानें त्यास गांठलें, सेंट क्वेंटिनकडे त्यास परत फिरावयास लाविलें आणि ता. १९ रोजी क्वेंटिन येथेंच त्याचा पूर्ण मोड केला.

प्रांतांतील चळवळीपासून झालेले परिणाम.

या नवीन भरती केलेल्या फ्रेंच सैन्याच्या सेनापतींना क्रमाक्रमानें स्वस्थ बसणें कसें भाग पडलें, याचें वर्णन देत बसल्यास फार जागा अडेल तेव्हां इतकें सांगितलें म्हणजे पुरें होईल कीं, मेट्झच्या आघाडीवर असलेल्या सैन्याचा सेनापति कॅमेक यानें डायडेन्हाफेन यास ता २४ नोव्हेंबर रोजीं, ता. १४ डिसेंबर रोजीं मांटमेडी यास व ता. २७ नोव्हेंबर रोजीं ला फेरी यास शरण येण्यास लाविलें डिसेंबरच्या प्रारंभींच सेनापति कॅमेक याच्या जागीं सेनापति फॉन सेंडेन याची नेमणूक झाली. त्यानें आकस्मिक घाला घालून ता २५ जानेवारी रोजीं रॉशॉय घेतलें; मेझायर्स पूर्वीच ताब्यांत घेतलें होतें (ता २ जानेवारी); कर्नेल फॉन क्रेन्स्की यानें ता. २५ जानेवारी रोजीं लाग्वी घेतलें; पूर्वीच व्हर्डन व फॅलझबर्ग हीं अनुक्रमें ता ८ नोव्हेंबर व ता. १२ डिसेंबर रोजीं हस्तगत झालीं होतीं अर्थात्च या सर्वांबरोबर पुष्कळ कैदी व तोफा आणि बरीचशी युद्धाची सामग्री जर्मनांच्या हातीं लागली बेलफोर्टला ता. ३ नोव्हेंबरपासून वेढा पडला होता त्यानें आतांपर्यंत टिकाव धरिला होता; इतकेंच नाहीं, तर युद्धाच्या अखेरपर्यंत त्यानें असाच टिकाव धरिला. बिटस्के किल्ल्याची अशीच स्थिति होती.

सेनापति बूर्बाकी याच्या हालचाली.

गॅम्बेट्टाच्या प्रोत्साहनामुळें उभारलेल्या सैन्यांच्या हालचालींना आतांपर्यंत तर यश आलें नाहीं. मेट्झ फारच लवकर शत्रूला शरण गेल्यामुळें त्यांचे सर्व बेत फसले. जर बेझेन यानें आणखी १५ दिवस टिकाव धरिला असता, तर जर्मनांना पॅरिसचा वेढा उठविणें भाग पडलें असतें, असा बराच संभव होता. बूर्बाकी यालाहि असेंच यश आलें नाहीं. तुम्ही १५. १८. २० व २४ या चार पलटणी म्हणजे सुमारें १,५०,००० लोक घेऊन, गॅरिबाल्डी यानें फ्रेंचांना मदत करण्याकरितां तयार केलेल्या सैन्यास जाऊन मिळा व सर्व मिळून पुढें बेलफोर्ट सोडविण्यास जा; व मग पॅरिसच्या आघाडीवरील जर्मन सैन्य व राइन नदी यांच्यामधील व्यवहाराचा मार्ग बंद पाडा, असा गॅम्बेट्टा यानें बूर्बाकी यास हुकूम दिला होता. बूर्बाकी याप्रमाणें जात असतां वाटेंत त्याच्या बगलेवर सेनापति वर्डर यानें ता. ९ जानेवारीं रोजीं आपल्या जवळ फार मोठें सैन्य आहे असा आव आणून सैन्याची हालचाल केली. यामुळें बूर्बाकीला पुढें चाल करून जाणें कांहीं वेळ बंद ठेवावें लागलें. त्याचा असा खोळंबा झाल्यामुळें बर्डर यास मोर्चेबंदी केलेल्या व अंशतः वेढ्याच्या तोफांनीं रक्षित अशा जर्मन छावणीस जाऊन पोहोंचण्यास वेळ मिळाला. ही छावणी ईशेन व लूझ या मार्गानें फ्रेशायरपासून हेरीकोर्ट येथील मुख्य जर्मन ठाण्या पर्यंत पसरली होती. तेथून वर्डर दक्षिणेच्या मान्टबेलीअर्ड व डेले इकडे गेला. हीं ठिकाणें इतक्या उंचावर होतीं कीं, ज्या रस्त्यानें

बूर्बाकीला पुढें जावयास पाहिजे होतें, तो रस्ता चांगला दृष्टीस पडत होता ह्या ठिकाणावरून वर्डर यानें, फ्रेंचांनीं त्याच्यावर ता १५, १६ व १७ रोजीं केलेले हल्ले परतवून लाविले. बूर्बाकी हा आतां मोठ्या अडचणींत सांपडला होता. वर्डर त्याच्यासमोर अशी जागा धरून बसला होता कीं, तींतून जोरानें वाट काढून जाणें बूर्बाकी यास अशक्य होतें. इकडे अनुभविक शिपायांचें नवीन तयार केलेलें सैन्य बरोबर घेऊन मान्टाइफेल त्याच्या डाव्या बगलेवर हल्ला करण्यास चाल करून येत होता. बूर्बाकी यानें अशा स्थितींत बेझॅन्कानकडे परत जाण्याचा निश्चय केला. परंतु मान्टाइफेल यानें मोठ्या गर्दीनें चाल करून येऊन बूर्बाकीचें हेंहि काम फार दुर्घट केलें. तथापि बूर्बाकी यानें आपला बेत सिद्धीस नेला खरा, परंतु त्याला शेवटीं आपण आगींतून निघून फुपाट्यांत पडल्याप्रमाणें झालें. त्याला कूच करितांना कॉट दी आरच्या खडकाळ मार्गांतून व जूराच्या बाजूनें जावें लागलें. त्याच्याजवळ अन्नसामग्री अगदीं तुटपुंजी होती, चोहोंकडून शत्रुसैन्य पसरलेलें होतें, वाटेंत बर्फामुळें त्याला बराच अडथळा झाला, या सर्व कारणांनीं त्याचे अनुभवी सैनिक जाग्यावर येतात तों त्यांचा जोम पार नाहींसा झाला होता. दहा दिवसांच्या मजलीनें त्याच्या सैन्याची स्थिति अत्यंत शोचनीय झाली. परंतु याहिपेक्षां कठिण प्रसंग त्याच्यावर घाला घालण्याकरितां अगदीं टपून बसला होता. बेझॅन्कान येथें आपल्या सैन्याचें पुढें काय होणार या जबरदस्त काळजींत तो असतांनाच त्याला ता. २७ जानेवारी रोजीं गॅम्बेट्टाचें पत्र पावलें. या

पत्रांत लोक, तुमच्यासह मीं नेमलेले सर्व सेनापति देशद्रोही आहेत असें उघड बोलतात अशी बातमी त्यास दिली होती. सैन्याच्या दुःस्थितीमुळें व हा तिरस्करणीय लोकापवाद ऐकल्यामुळें बूर्बाकी याची सारखीच निराशा झाली; आणि म्हणून त्यानें आपल्या सैन्याची हुकमत सेनापति ब्लिचन्ट याच्याकडे दिली व आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हा त्याचा प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. ब्लिचन्ट सैन्य घेऊन बूर्बाकीसह स्विट्झर्लंडमध्यें गेला. त्या ठिकाणीं सैन्य तटस्थ राष्ट्रांच्या स्वाधीन झालें व तें तटस्थ प्रांतांत शिरलें असल्यामुळें त्यास शस्त्रास्त्रें खालीं ठेवणें भाग पडलें.

पॅरिसला सर्व शिस्त स्वतःच्या सामर्थ्यावरच ठेवणें भाग झालें.

गॅम्बेट्टा व त्याचे सेनापति यांनीं पॅरिसचा वेढा उठविण्याकरितां केलेले प्रयत्न याप्रमाणें व्यर्थ झाल्यामुळें व वेढा घालणाऱ्या जर्मन लोकांपासून शहराच्या सरकाराला चोहोंकडून त्रास होत असल्यामुळें शर्थ करून शक्य तितक्या अनुकूल अटींवर शरण जाण्याशिवाय फ्रेंच सरकारला आतां दुसरा उपाय राहिला नाहीं. पॅरिसच्या संरक्षकांनीं बाहेर जाण्याकरितां केलेले सर्व हल्ले मागें परतविण्यांत आले होते. ज्या आशांच्या जोरावर संरक्षकांनीं आजपर्यंत आपली हिंमत खचूं दिली नाहीं त्या आशा भराभर मावळत चाल्ल्या होत्या. लोकांची उपासमार जसजशी जास्त होत चालली तसतशी पॅरिसच्या संरक्षणाच्या जागांच्या मर्यादेच्या बाहेरील भक्कम ठिकाणें एकामागून एक शत्रूच्या हातीं पडत चाललीं. शत्रूचें सैन्य जसजसें जवळ येत चाललें तसतसा त्याच्या तोफांचा

भडिमार जास्त एकवटलेला व जास्त जोरदार असा होऊं लागला. तह करून घेतलाच पाहिजे अशी स्थिति प्राप्त झाली. नंतर ता. २८ जानेवारी रोजीं व्हर्सेल येथें तीन आठवड्यांचा तात्पुरता तह ठरला. त्या नंतर शांतता पुनः स्थापित कशी होईल याचा विचार करण्याकरितां बोर्डो येथें राष्ट्रीय सभा भरविली. ह्या सभेंत एम् थायर्स यास राज्यकारभाराचे सर्व अधिकार मिळाले. बिझ्मार्कबरोबर बोलणें करण्याचें काम त्यानें जूल्स फाव्हर यास आपल्या जोडीला घेऊन, स्वत:कडे घेतलें. हें बोलणें करण्यांत चांगलें यश यावें म्हणून तात्पुरत्या तहाची मुदत दोनदां वाढवून घेतली. थायर्सच्या विनंतीवरून ही मुदत वाढविण्यांत आली, कारण बिझ्मार्क ज्या अटींविषयीं आग्रह धरून बसला होता, त्या अटी फार जाचक होत्या. या फ्रेंच मुत्सद्यानें बिझ्मार्कनें आपल्या अटी जरा ढिल्या कराव्या अशाविषयीं त्याचें मन वळविण्याच्या कामीं आपली सर्व शक्ति खर्च केली विशेषत: मेट्झ वांचविण्याचा निदान लक्झेंबर्ग तरी मोबदला म्हणून मिळावें याविषयीं त्यानें आटोकाट प्रयत्न केला.

तह व त्यांतील अटी

परंतु थायर्स याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. फारच झालें तर अजूनहि पडलेला बेलफोर्ट किल्ला आम्हांस मिळावा असा आग्रह मी धरणार नाहीं असें बिझ्मार्क म्हणाला. यापेक्षां जास्त बिझ्मार्कच्या हातून आपणांस कांहीं मिळण्याची आशा नाहीं असें पाहिल्यावर थायर्स व फाव्हर यांनीं हार घेऊन ता. २४ फेब्रुवारी रोजीं तहाच्या मसुद्यावर सह्या केल्या. मसुद्यांत अटी होत्या त्या येणेंप्रमाणें:-(१)

लोरेनचा ईशान्य भाग मेट्झ व डॉगडेन-हॉफेन यासह आणि बेल्फोर्ट खेरीज करून आलसेस हीं जर्मनीस देणें, (२) सन १८७१ सालीं फ्रान्सनें जर्मनीस दहा अब्ज फ्रँन्क्स द्यावे आणि पुढल्या तीन वर्षांत ४० अब्ज फ्रँन्क्स द्यावे (३) तह कायम झाल्यावरोबर जर्मनांनीं फ्रान्सचे प्रांत सोडून देण्यास आरंभ करावा; पॅरिस व त्याचे सीन नदीच्या डाव्या तीरावरील किल्ले व आणखी कांहीं विवक्षित प्रांत एकदम सोडून द्यावे; उजव्या तीरावरील किल्ले तह कायम झाल्यावर व पांच अब्ज फ्रँन्क्स दिल्यावर सोडावे. वीस अब्ज फ्रँक्स देऊन झाल्यावर मार्ने, आर्डेनी, अप्पर मार्न, म्यूज, व्हास्जेस आणि म्यूर्थे हे प्रांत व बेल्फोर्ट किल्ला हीं जर्मनांनीं सोडून द्यावीं. तह कायम झाल्या दिवसापासून रक्कम द्यावयाची राहील तिच्यावर दरशेंकडा ५ प्रमाणें व्याज आकारावयाचें, (४) फ्रान्समध्यें जें जर्मन सैन्य राहील त्यानें तें ज्या प्रांतांत असेल त्या प्रांतावर कोणतीहि मागणी करूं नये, मात्र त्या सैन्याचा अन्नसामग्रीचा खर्च फ्रान्स देईल, (५) तोडून दिलेल्या मुलुखांतील रहिवाशांस एक तारीख नेमून द्यावी, तिच्या आंत त्यांनीं आपण कोणत्या राज्यांत राहणार तें ठरवावें, (६) युद्धांत धरलेले कैदी एकदम ज्याचे त्यास परत करावे, (७) ह्या सर्व अटी नमूद असलेला तहनामा ब्रूसेल्स येथें कायम करावा. आणखी असें ठरलें होतें कीं, जर्मन सैन्यानें पॅरिसमध्यें राहूं नये, परंतु विल्यम बादशहानें (कारण त्याला आतां हें पद मिळालें होतें) शहराच्या एका भागांतून मिरवणूक काढून त्यांतच संतोष मानावा.

अखेरीस ह्याच तहनाम्यावर सह्या झाल्या.

ता. २८ फेब्रुवारी रोजीं थायर्स यानें या शर्ती बोर्डो येथील सभेपुढें मांडिल्या. ता. १ मार्च रोजीं ५४६ व १०७ प्रतिकूल मतें पडून या शर्ती मान्य झाल्या त्याच दिवशीं बादशहा विल्यम व त्याचे अधिकारी आणि जर्मन सैन्याचा कांहीं भाग हे पॅरिसमध्यें आले. बाकीचें सैन्य दुसऱ्या दिवशीं आलें व सर्व सैन्य ता. ३ रोजी शहर सोडून गेलें

ता. २८ मार्च रोजीं ब्रूसेल्स येथें तहपरिषद भरली, परंतु त्याच वेळीं पॅरिसमध्यें जो दंगा उद्भवला, त्यामुळें लवकरच या परिषदेचें काम तहकूब करावें लागलें. फ्रान्सच्या सैनिकांनीं हा दंगा मोडल्यावर त्यांच्या पुढाऱ्यांनीं तहाच्या मसुद्यांतील शर्तींना धरून राहावें किंवा कसें याविषयीं संशय प्रदर्शित केला अखेरीस फ्रॅन्कफोर्ड येथें ता. ६ मे रोजीं तहाची वाटाघाट पुनः सुरू झाली. बिझमार्क व ज्यूल्स फाव्हर हे वाटाघाट करणारे पुढारी होते कायमच्या तहनाम्यावर ता १० मे रोजीं सह्या झाल्या. शर्तींमध्यें केलेल्या फरकांत खंडणी देण्याची मुदत कमी केली हा मुख्य फरक होता.

असा या युद्धाचा शेवट झाला. ही अखेर ज्या प्रकारानें झाली त्यामुळें, विशेषतः जेत्या जर्मनांनीं ज्या जबर शर्ती फ्रान्सवर लादल्या त्यामुळें, जर्मन जहालांच्या अंतःकरणांत दाबून ठेविलेल्या इच्छा सफल झाल्या खऱ्या; परंतु या युद्धानें यूरोपखंडांतील दोन प्रबल देशांमध्यें द्वेषाचें व भविष्यकालीन कलहाचें बी पेरलें गेलें हेंहि तितकेंच खरें आहे.

प्रकरण १७ वें.

आरंभलेल्या कामाची सिद्धि.

सन १८७० सालीं जर्मन सैन्यानें मिळविलेल्या विजयामुळें जर्मनीचें एकीकरण घडवून आणण्याच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर झाल्या. जर्मनीचें एकीकरण हें कित्येक वर्षे उत्साही जर्मनांचें मनोराज्य होतें. सन १८४८ सालच्या राज्यक्रांतीनंतर कांहीं महिने या मनोराज्याला प्रत्यक्ष रूप येण्याचा संभव आहे, असें दिसलें. त्या वेळीं हें मनोराज्य पूर्ण होण्याला ऑस्ट्रिआ आड आला. १८६६ सालीं दक्षिण जर्मनीवर प्रशियनांनीं जय मिळविला त्या वेळीं उद्दिष्ट हेतु साधण्याची तर्कशास्त्रदृष्टया वेळ आली असली, तरी प्रत्यक्ष व्यवहार त्याप्रमाणें करण्याला अजून अवकाश आहे असें बिझमार्क याला वाटलें. ऑस्ट्रिआच्या बाहेरील जर्मन संस्थानाबरोबर, शत्रु उत्पन्न झाल्यास सर्वांनीं मिळून बचाव करण्यास पुढें यावें असा ठराव त्यानें केला हें जरी खरें आहे, तरी त्याची मजल त्यावेळीं याच्या पुढें गेली नाहीं, हें लक्षांत घेण्यासारखें आहे खरें पाहूं गेल्यास सन १८६६ व १८७० यांच्या दरम्यान् आपणांस ज्या बंधनांनीं जखडून टाकिलें आहे, तीं बंधनें तोडून टाकण्यास योग्य संधि मिळाली तर फार बरें होईल, असें बव्हेरिआ व वूर्टेंबर्ग यांस वाटत होतें, अशी पुष्कळ चिह्नें दृष्टीस पडत होतीं. स्पेनच्या रिकाम्या पडलेल्या गादीला होहेन्झोलर्न घराण्यांतील पुरुष उमेद-

वार म्हणून पुढें आला, त्यावेळीं बादशहा नेपोलिअन याचें प्रत्यक्ष वर्तन व त्याच्यावर बळेंच लादलेलें वर्तन या दोहोंचाहि एकसारखाच उपयोग करून घेण्यांत बिझमार्क यानें मोठी कुशलता दाखविली व फ्रान्सबरोबर केलेल्या युद्धांत जर्मनीला यश आलें. या दोन गोष्टींमुळें बव्हेरिआ व वूर्टेंबर्ग यांचा झालेला प्रतिकूळ ग्रह कमी झाला, इतकेंच नाहीं तर ज्या जर्मन राजानें सन १८७० सालीं आलेलें यश मिळविण्यास फार मोठी मदत केली त्याच्या महत्त्वाकांक्षा सफल होतील अशा रीतीनें जर्मनीचें एकीकरण घडवून आणण्याची आलेली संधि फुकट जाऊं द्यावयाची नाहीं, असा सर्व जर्मन राष्ट्राचा आतां कल झाला. प्रशिआनें पुढाकार घेतला व त्याच्या शिकवणीप्रमाणें जर्मन लोक एकजुटीनें वागले, याचेंच प्रत्यक्ष फळ जर्मनीचा [illegible] झाला हें होतें, अशी प्रत्येक विचारी जर्मनाची खात्री झाली आणि म्हणून फार मोठ्या बहुमतानें असें ठरलें कीं, सन १८६६ सालीं आरंभिलेलें जर्मनीच्या एकीकरणाचें काम आतां विलंब न लावितां पूर्ण करावयाचें. बॅडेन या कामास प्रथम लागलें. बव्हेरिआच्या राजानें त्याचें अनुकरण केलें. ऑक्टोबर अखेर व्हर्सेल येथें परिषद भरली व लवकरच तींत अनुकूल असा निकाल झाला. ता. १५ नोव्हेंबर रोजीं बॅडेन आणि हेसी यांनीं साम्राज्यशासनपद्धतींतील मुख्य मुद्यांस अनुमोदन दिलें; पुढें ता. २३ रोजीं बव्हेरिआच्या राजानें व ता. २५ रोजीं बर्लिन येथें वूर्टेंबर्गनेंहि त्याचप्रमाणें अनुमति दिली. निरनिराळ्या लहान लहान संस्थानांनीं आपला बोज कायम राहावा म्हणून निर-

निराळ्या लहान लहान सवलती मागितल्या, त्या त्यांस देण्यांत आल्या. सर्व जर्मनीचें असें एकच परराष्ट्रीय खातें असावें, एकत्र झालेल्या सर्व संस्थानांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ असावें व सैन्यावर एकाचेंच मुख्य आधिपत्य असावें यासारख्या मुख्य बाबतींत प्रशिआनें आग्रह धरिला एकीभूत संस्थानांनीं जर्मन साम्राज्य ही संज्ञा कबूल केली. प्रशिआचा राजा साम्राज्याचा मुख्य ठरला व त्याला जर्मन बादशहा हा पदवी मिळाली.

जर्मन साम्राज्याची पुनः स्थापना होते.

हा प्रश्न निरनिराळ्या संस्थानांच्या सभांत विचाराकरितां निघाला, तेव्हां असेंच मतैक्य सर्व ठिकाणीं दिसून आलें नाहीं. हेसी, बॅडेन आणि वूर्टेंबर्ग यथील पार्लमेंट सभांनीं ही नवीन शासनपद्धति विरोध न करितां मान्य केली. बव्हेरिआच्या सभेंत जवळ जवळ ३/४ सभासदांनीं या नव्या योजनेच्या विरुद्ध मतें दिलीं परंतु वाद-विवाद होण्याच्या अगोदरच ही गोष्ट प्रत्यक्ष ठरली होती. ता. १ जानेवारी १८७१ रोजीं जर्मनींतील राजे व संस्थानाधिपति यांच्या वतीनें बव्हेरिआच्या राजानें पुढील आशयाचें पत्र प्रशिआच्या राजास लिहिलें:-" आपणांस एकमतानें जर्मन साम्राज्याचा पहिला अधिपति निवडलें आहे व आपण स जर्मन बादशाहा ही पदवी दिली आहे. " जानेवारी महिन्याच्या १० व्या तारखेस व्हर्सेल येथें हा वरील अधिकार प्रशिआच्या राजानें स्वीकारला आहे अशी द्वाही मोठ्या थाटानें फिरविली गेली त्याच दिवशीं जर्मन साम्राज्याची पुनः स्थापना झाली.

बिझमार्क याची कामगिरी—त्याची परिस्थिति.

हा संस्मरणीय समारंभ झाल्याला बात्रीस वर्षांपेक्षां जास्त काल लोटला आहे. त्यांत भाग घेतलेल्या लोकांपैकीं पुष्कळजण इहलोक सोडून गेले आहेत. स्वतः बादशहा, प्रशिआचा क्रौन प्रिन्स म्हणून ज्याच्या पराक्रमांचें वर्णन या हकीकतींत दिलें आहे, तो बादशहाचा थोर मनाचा मुलगा; रेड प्रिन्स; कार्यक्षम असें सैन्य तयार करणारा, फॉनरून; रणांगणांत सैन्याला हालचाली ठरवून त्याची रचना करण्यांत कुशल असा मोल्टके; व इतर पुरुष हे दिवंगत झाले आहेत. त्यांच्यापैकीं एक बिझमार्क मात्र जिवंत आहे. कोणत्याहि कामाचा पिच्छा पुरविणारा निश्चयी स्वभाव, खऱ्याखोट्याचा मुळींच विधिनिषेध न बाळगितां निरनिराळे उपाय योजण्याच्या कामांत प्राविण्य, ज्वाज्वल्य सामर्थ्य, जोरदार इच्छा—शक्ति इत्यादि गुणांनीं संपन्न असा हा पुरुष जर्मनीच्या बाजूला नसता, तर झालेली कामगिरी जर्मनीच्या हातून पार पडली नसती. हातीं घेतलेल्या कामांत पूर्ण यश यावें म्हणून खटपट करितांना त्यानें पार्लमेंट सभेला व लोकांना धाब्यावर बसविलें; व राजा आणि देश यांना अशा भयंकर मार्गांनीं जावयास लावलें कीं, त्या मार्गांत एखादें पाऊल जर चुकीचें पडलें असतें, तर सर्व देश रसातळाला गेला असता. हें कबूल केलें पाहिजे कीं, ऑस्ट्रिआच्या भिकार राजकारणानें, फ्रान्सच्या बादशहाच्या सामर्थ्याच्या ऱ्हासानें, त्याच्या स्वतःच्या कमालीच्या धाष्टर्यानें बिझमार्क याला

चांगलाच हात दिल्यामुळें त्याच्या कामगिरीच्या मार्गांत नीतिदृष्ट्या आलेल्या अडणी त्यानें आपल्या इच्छेच्या जोरानें पायांखालीं तुडवून टाकिल्या. फॉनइन व मोल्टके यांनीं बाकीचें सर्व काम केलें, परंतु बिझमार्कनें जर्मनीचें एकीकरण करून जो साम्राज्याचा वृक्ष लाविला त्याची जोपासना करण्याच्या कामांत कोणत्याहि प्रकारें हात घालण्यास त्याला यापुढें अधिकार नाहीं. फॉनरून व मोल्टके यांच्यावरील बादशहाचा विश्वास कायम असतांनाच जसें त्यांस मरण आलें,तसेंच तें बिझमार्क यास आलें असतें तर जास्त बरें झालें असतें. अधिकारावरून दूर झाल्यावर जो कोणी जाणारा येणारा भेटेल त्याच्याजवळ आपल्या दुःखाची काहणी सांगण्यास व नवीन बादशहानें आपलें शिष्यत्व पतकरलें नाहीं म्हणून त्याच्याविषयीं बोलतांना जवळ जवळ राजद्रोहाची भाषा वापरण्यास त्यानें आरंभ केला आहे. ज्या युद्धानें स्लेसविग व होलस्टीन प्रशिआला १८६४ त मिळालीं तें युद्ध मीं उकरून काढलें; १८६६ सालीं ऑस्ट्रिआची इच्छा नसतांहि त्याला युद्ध पुकारण्यास मीं भाग पाडलें; तिखटमीठ लागून फुगविलेल्या बातम्या मीं वाटेल तशा चोहोंकडे पसरविल्या आणि जर्मनींत त्यायोगें फ्रान्सच्या विरुद्ध अति विकोपास गेलेलें असें प्रतिकूळ मत मीं उत्पन्न केलें. नंतर पॅरिसचे मुत्सद्दी व मुख्यत्वेकरून पॅरिसचे अशिक्षित लोक यांच्यामध्यें त्याच साधनानें अत्यंत क्षोभ १८७० सालीं मीं उत्पन्न केला. मी ह्या सर्व गोष्टी काम फत्ते होऊन होहेन्झोलर्न घराण्याला साम्राज्य मिळाल्याबरोबर रस काढून घेतलेल्या लिंबाप्रमाणें बादशहानें मला दूर झुगारून द्यावें, एवढ्याकरितांच

केल्या काय?" असेंच जणूं काय बिझमार्क पुटपुटतो आहे असें दिसतें. असे विचार त्याच्या मनांत घोळणें अगदीं स्वाभाविक आहे, कारण त्यालाच म्हणून जर्मनीचें एकीकरण करण्याचें काम साधलें. तथापि ज्या मार्गानें त्यानें ही गोष्ट घडवून आणली तो मार्ग 'परिणामावरून साधनांचा बरेवाईटपणा ठरतो' असें ज्याचें मत असेल, त्यांसच पसंत पडेल.

ही कामगिरी टिकाऊ आहे काय ?

हें नवीन साम्राज्य टिकेल किंवा तें ढांसळून पडेल या प्रश्नाशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं, ही आनंदाची गोष्ट आहे; परंतु इतकें सांगून ठेवण्यास हरकत नाहीं कीं, जर्मनीच्या वतीनें ज्यांनीं तहाचें बोलणें केलें त्यांनीं जर शत्रूपासून इतकी जबरदस्त खंडणी घेण्याचा आग्रह धरिला नसता, तर ह्या साम्राज्याला जोमदार आयुष्य लाभण्याचा जास्त संभव होता. असा आग्रह त्यांनीं धरिल्यामुळें भविष्यकालीन युद्धाचें बीज पेरलें गेलें व त्यामुळें अशा भांडणाचा पाया घातला गेला कीं, त्यानें शेजाऱ्यांमध्यें वैमनस्याचा अग्नि एकसारखा कित्येक वर्षे धुमसत राहील. गेल्या बावीस वर्षांत जर्मनीला फ्रान्सपासून जबरीनें विभक्त केलेल्या लोकांचीं मनें आपलीशीं करून घेण्यांत यश आलें नाहीं. या लोकांचा फ्रान्स देशाशीं फार दिवसांचा संबंध होता व आपला देश फ्रान्सचा एक भाग आहे असें म्हणण्यांतच त्यांस मोठा अभिमान व महती वाटे. ह्या सर्व गोष्टींनीं अशा कांहीं अडचणी उत्पन्न केल्या आहेत कीं, लोभ थोडा आंवरून धरिला

असता तर त्या लयास गेल्या असत्या. परंतु त्या कायम असल्यामुळें पुनः स्थापित झालेलें जर्मन साम्राज्य त्याच्या अस्तित्वाच्या काळा संबंधांत, शार्लमेननें स्थापिलेल्या साम्राज्याची बरोबरी करणार कीं काय, असा प्रश्न पुनः उद्भवण्याचा संभव आहे.

प्रकरण १८ वें.

हल्लींच्या युद्धाचीं ठोकळ कारणें.

मागल्या प्रकरणाच्या शेवटीं वापरलेले शब्द कसे भविष्यार्थ सूचक आहेत हें अलीकडेस घडून आलेल्या हकीकतीवरून स्पष्ट झालें आहे. सन १८७१ पासून सर्व यूरोपखंडावर आपलें वचस्व स्थापण्याचे युक्तिप्रयुक्तीचे बेत एकसारखे जर्मनी करीत आहे. आपला द्वेष्टा प्रतिस्पर्धी ग्रेटब्रिटन यास आपल्या मार्गांतून पार उखडून टाकण्याचा विशेष प्रयत्न जर्मनी करीत आहे, कारण राजकारणांत व व्यापारांत या दोन राष्ट्रांची आज कित्येक दिवस चुरस लागून राहिली आहे. जर्मनीचा द्वेष, कुटिल नीति व कृष्ण कारस्थानें ह्या सर्वांचा दृश्य परिणाम म्हणजे जगानें आजपर्यंत पाहिल्या नाहींत अशा युद्धाच्या हालचाली. अखेरीस पॉट्स्डॅम यथील चांडाळचौकडींचा दिवस उगवला आहे, परंतु त्याचा शेवट कसा होईल हें पुढें होणाऱ्या घडामोडीवरच अवलंबून आहे. तथापि आपणास निश्चयानें असें धरून चालण्यास हरकत नाहीं, कीं अशा नवीन कालाचा उदय होईल कीं त्या कालांत मोठ्या राष्ट्रांनीं दिलेलीं अभिवचनें थोर मनानें पाळलीं जातील व भविष्यकाळीं एखादा तहनामा म्हणजे केवळ ' कागदाचा कपटा ' असें म्हणणें कोणासहि शक्य होणार नाहीं.

जर्मनीची महत्त्वाकांक्षा.

जर्मनीच्या ब्रिटनविषयींच्या दीर्घद्वेषाला हल्लींचें तीव्र स्वरूप येण्यास प्रारंभ झाला तो, बहुतकरून १८८८ सालीं हल्लींचा कैसर, तिसरा

विल्हेल्म, हा जर्ममीच्या गादीवर आला, तेव्हांपासून झाला असावा. पहिल्या विल्यमचा धूर्त, शांत विचाराचा, बिनदिक्कत कोणतेंहि काम करणारा असा सल्लागार बिझमार्क यानें जर्मनीनें वसाहती वाढवाव्या असा सल्ला कधींहि दिला नव्हता, परंतु साम्राज्याचा पाया भक्कम करण्याकडे व राष्ट्रांतील उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याकडे त्याच्या यत्नांचा मुख्य रोख होता. १८९० सालीं दुसरा विल्यम व बिझमार्क यांच्यमध्यें खटका उडाला व बिझमार्क यानें राजीनामा दिला. नंतर या हेकेखोर तरुण कैसरनें साम्राज्याचा सर्व अधिकार आपल्या हातीं घेऊन तो स्वतंत्रतेनें चालविण्यास आरंभ केला. त्यानें बिझमार्कचें धोरण अगदीं उलटून टाकिलें. जर्मनीला अनुकूल परिस्थिति उत्पन्न करावयाची होती, इतरांना दरारा वाटेल इतकें जर्मनींचें आरमार मोठें करावयाचें होतें, व वसाहती वाढविण्यास प्रोत्साहन द्यावयाचें होतें. जगांतील मोठ्या राष्ट्रांपैकीं एक राष्ट्र होण्याचा जर्मनीनें प्रयत्न केला; तुर्कस्तानाच्या कारभारांत जर्मनानें ढवळाढवळ केली व त्यामुळें तुर्कस्तानाला कदाचित् अपायहि झाला असता; दोन ख्रिश्चन धर्म-प्रसारक ठार मारले याबद्दलनुकसानभरपाई म्हणून जर्मनीनें १८९७त कियोचौ ९९ वर्षांच्या करारानें मागितलें व तें जर्मनीला मिळालेंहि. जर्मनीनें पॅसिफिक महासागरांत कांहीं प्रांत व ऑफ्रिकाखंडांत चार निरनिराळ्या ठिकाणीं महत्त्वाच्या वसाहतीच्या जागा मिळविल्या; सन १९०५ सालीं मोरोक्कोच्या सुलतानावर आपलें वजन पाडून फ्रान्सची सत्ता मर्यादित करावी या हेतूनें कैसर टँजोर येथें उतरला सन १९०८ सालीं ऑस्ट्रियानें बॉस्निआ व हर्झेगॉव्हिना हीं खालसा

केली; ह्या ऑस्ट्रिआच्या करण्याला इतर राष्ट्रांनीं हरकत घेतली; परंतु कैसरनें आपलें लखलखीत चिलखत घालून मोठ्या शिताफीनें आपल्या दोस्तास मदत केली, व जपानबरोबर झालेल्या युद्धानें रशिआस आलेला थकवा अजून गेलाच नसल्यामुळें ऑस्ट्रिआचा डाव साधला. मोरोक्कोबद्दल सर्व प्रश्न पुनः उपस्थित करण्याच्या हेतूनें आगॅडर येथें पॅन्थर नांवाचें त्याच्यावर तोफा असलेलें जहाज रवाना झालें, ही बातमी ऐकून यूरोपच्या चॅन्सिलरीजमध्यें १९११ सालीं मोठी गडबड उडाली तथापि फ्रान्सनें जर्मनीला कांगोप्रदेशाचा बराच मोठा तुकडा देऊन ही भानगड मिटविली.

जर्मनांनीं ब्रिटिश लोकांविषयीं आपला द्वेष अगदीं उघड उघड व्यक्त केला आहे. जर्मनांना मोठा चेव येऊन त्यांनीं आपल्या आरमाराची केलेली वाढ हें, क्रूगरला कैसरनें पाठविलेल्या प्रसिद्ध तारेप्रमाणें, ग्रेटब्रिटनला युद्धाला येण्यास केलेलें आव्हानच आहे कैसरनें या तारेंत पुढील मजकूर घातला होता:—आम्हांला मुठींत त्रिशूळ धरून बसलें पाहिजे. आम्ही फ्रान्स व रशिया यांची खोड मोडून मग शेवटीं ग्रेटब्रिटनचा भरपूर समाचार घेऊं " अशी तत्त्वें व उद्गार जिकडे तिकडे पसरविल्याचा, जातीजातींत वैमनस्य हा एकच परिणाम व्हावयाचा तो झाला. या वैमनस्याचा शेवट, हल्लींचें युद्ध, हा होय. या युद्धाचें मूळ कारण जरी सर्व्हिआ होतें तरी जर्मनीच्या संबंधानें विचार करितां सर्व्हिआ हें कारण म्हणण्यापेक्षा हो

एक सबब होती असें आपणांस दिसून येईल. बोअर युद्ध चालू असतांना जर्मनींत इंग्लंडविषयीं मोठ्या भीतीची लाट उसळली होती. तिचा फायदा घेऊन कैसरनें आपल्या युद्धसंबंधीं बेतांपैकीं पुष्कळांना मूर्तस्वरूप दिलें; व त्यानें एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राशीं लढाईस उभें करण्यांत व चोहोंकडे वैर आणि भांडण उत्पन्न करण्यांत बिझमार्कच्या धोरणाचें अनुकरण केलें आहे.

सेऱ्याजेव्हो येथील भयंकर प्राणहानि.

ता. २८ जून १९१४ रोजीं ऑस्ट्रिआच्या गादीचा वारस आर्च डयूक फ्रॅन्सिस फर्डिनँड व त्याची बायको होहेन्बर्गची डचेस यांच्यावर रस्त्यांत बॉस्निआची राजधानी सेऱ्याजेव्हो येथें कुलपी गोळे कोणी फेकल्यामुळें त्यांस जागच्या जागीं मृत्यु आला. ह्या गुन्ह्याचा हेतु पुढें सांगिल्याप्रमाणें होता:—ब्रिटन व ईजिप्त यांच्यामध्यें जो संबंध आहे तसाच संबंध ऑस्ट्रिआ व बॉस्निआ यांच्यामध्यें होता. राष्ट्रांच्या सभेंत ठरल्याप्रमाणें ऑस्ट्रिआनें या प्रांतांचा राज्यकारभार आपल्या हुकमतीखालीं पाहावा म्हणून तो प्रांत ऑस्ट्रिआच्या दिमतीस दिला होता. याप्रमाणें बॉस्निआचा राज्यकारभार ऑस्ट्रिआच्या नजरेखालीं चालू झाला व तो कारभार पुष्कळ प्रकारें बॉस्निआला हितावह असाच होता. परंतु १९०८ सालीं ऑस्ट्रिआनें हा प्रांत खालसा करण्याची योजना तयार केली व यूरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं तिला विरोधहि केला. या बाबतींत राष्ट्रांची एक सभा भरवावी अशी सूचना या प्रतिनिधींनीं केली; पण ती ऑस्ट्रिआनें मान्य

केली नाहीं. या संबंधांत जर्मनीनें दोस्त म्हणून ऑस्ट्रिआला पाठिंबा दिला व ऑस्ट्रिआला आपल्या मताप्रमाणें व्यवस्था लावण्यांत यश आलें. पूर्वी सर्व्हिआचा कल ऑस्ट्रिआशीं मैत्रीनें राहण्याचा होता, परंतु बाल्कनमधील स्लाव्ह लोकांचा कैवार रशिआनें घेतल्यामुळें सर्व्हिअन लोकांच्या अंतःकरणांत नवीनच अभिमान उत्पन्न झाला होता ज्या बाँब गोळ्यानीं दुर्दैवी आर्च डयूक व त्याची बायको यांचे प्राण घेतले ते सर्व्हिअन असून सर्व्हिआच्या लष्करी कारखान्यांतच तयार झाले होते, व त्या प्रकारणांत सर्व्हिअन अधिकाऱ्यांचें अगहि होतें असा समज जिकडे तिकडे पसरला होता त्या नंतर सर्व्हिआला योग्य शासन करण्याचा प्रश्न उपस्थित झाला व ऑस्ट्रिआनें सुचविलेल्या उपायानें सर्व्हिआच्या स्वातंत्र्यावर मोठी गदा येणार आहे अशी भीति उत्पन्न झाली. सर्व्हिअन रशिआकडे धाव घेतली, परंतु रशिआनें त्याला काय उपदेश दिला हें बाहेर आलें नाहीं. तें कांहीं असो; सर्व्हिआनें आपल्या स्वातंत्र्याची पायमल्ली करणाऱ्या अटी शिवाय ऑस्ट्रिआनें पुढें केलेल्या इतर सर्व अटी मान्य केल्या. ऑस्ट्रिआनें या सर्व्हिआच्या करण्याचा अर्थ त्यानें आपला सरशेवटचा खलिता नाकारिला असा करून युद्ध पुकारिलें. ब्रिटिश परराष्ट्रीय मंत्री, सर एडवड ग्रे, यानें शांतता राखण्याकरितां मनुष्याला शक्य ते सर्व उपाय केले, व रशिआ आणि ऑस्ट्रिआ यांच्यामध्यें वाटाघाट सुरू झाली. वाटाघाटीनें शांतता राखण्याच्या प्रयत्नाला यश येणार असा रंगहि दिसूं लागला. इतक्यांत ता. ३१ जुलई रोजीं जर्मनीनें तडजोड होण्याची बहुतेक

तयारी झाली आहे असें दिसत असतांहि रशिआला निर्बाणीचा खलिता पाठविला. त्यांत रशिआनें युद्धासाठीं सैन्य गोळा करण्याचें काम बंद ठेवावें असें–हें म्हणणें रशिआस पटणार नाहीं असें ठाऊक असतांहि–म्हटलें होतें; आणि लागलींच दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. १ ऑगस्ट रोजीं जर्मनीनें रशिआबरोबर युद्ध पुकारिलें. जर्मनींत युद्धाला अनुकूल असणाऱ्या पक्षांमध्यें क्रौन प्रिन्सहि होताच. या पक्षाचें वर्चस्व असल्यामुळें त्यानें युद्ध पुकारण्याची इतकी घाई केली कीं शांतता राखण्याकरितां केलेली सर्व खटपट पार लयास गेली.

लज्जास्पद सूचना.

दरम्यान् उत्तरसमुद्रांत जर्मनीनें फ्रान्सच्या विरुद्ध कांहीं हालचाली केल्यानंतर फ्रान्सला आपलें संरक्षण करण्याच्या कामीं आम्ही मदत करूं असें ब्रिटिश सरकारानें अभिवचन दिलें होतें तथापि जर्मनीची फार इच्छा होती कीं, या भानगडींत इंग्लंडनें न पडतां तटस्थ राहावें; आणि म्हणून लंडन येथील जर्मन वकील लिक्नौस्की याच्यामार्फत जर्मनीनें सर एडवर्ड ग्रे यास सुचविलें कीं, जर्मनीनें फ्रेंच वसाहती घेण्याचा व फ्रेंचांचा पराभव करण्याचा क्रम चालविला असतां इंग्लंडनें हात जोडून स्वस्थ बसावें. "ही सूचना इंग्लंडनें मान्य केल्यास त्याच्या उज्ज्वल कीर्तीला लागणारा काळीमा धुवून काढणें कधींहि शक्य होणार नाहीं, इतकी ही गोष्ट लांच्छनास्पद आहे" हें एडवर्ड ग्रे यांचें उत्तर अगदीं यथायोग्य होतें.

जर्मनी व ग्रेटब्रिटन यांच्यामधील युद्धाचें मूळ कारण.

तथापि बेल्जम तटस्थ असतां त्याच्यावर हल्ला करून त्याच्या हक्कांची जर्मनीनें पायमल्ली केली हें जर्मनी व ग्रेटब्रिटन यांच्यामधील युद्धाचें खरें कारण आहे. सन १८३९ सालीं लंडन येथें बेल्जमचें स्वातंत्र्य कबूल करून इंग्लंड, फ्रान्स, रशिआ, ऑस्ट्रिआ आणि प्रशिआ यांनीं तहनाम्यावर सह्या केल्या. फ्रान्स व प्रशिआ यांचें युद्ध चालू असतां इंग्लडनें आणखी अशीहि जबाबदारी पतकरली होती कीं, युद्ध करणाऱ्या एखाद्या राष्ट्रानें वरील तहाच्या अटी मोडल्यास इंग्लंड त्याच्या विरुद्ध पक्षास मिळेल; ही अट फक्त युद्ध असतां लागू पडावयाची होती. पण दुसऱ्या पक्षीं १८३९ सालचा तह निरंतर लागू पडणारा असा होता. फ्रान्स आणि जर्मनी बेल्जमच्या तटस्थ राहण्याचा हक्क आबाधित राखण्यास तयार आहेत किंवा कसें, असा प्रश्न निघाला असतां फ्रान्सनें ताबडतोब उत्तर दिलें कीं, "आम्ही तसें करण्यास तयार आहों." परंतु जमनीनें समाधानकारक असें उत्तर दिलें नाहीं. लक्झेंबर्गच्या संबंधानें अशीच राष्ट्रांनीं आपआपसांत हमी दिली होती, परंतु तरुण ग्रॅन्ड डचेस हिनें जर्मनीच्या करण्याचा जोरानें निषेध केला असतांहि या प्रांतावर जर्मनीनें हल्ला केला व थोड्याच अवधींत डचेसला वस्तुतः बहुतेक कैद केलें. बेल्जिअमनें जर्मनांना जर आपल्या हद्दींतून बिनहरकत फ्रान्समध्यें जाऊ दिलें तर जर्मनी बेल्जिअमची आपल्या दोस्तांत गणना करण्यास तयार आहे हें जर्म

नीचें म्हणणें बेल्जिअमनें मान्य केलें नाहीं व इंग्लंडजवळ या बाबतींत त्यानें दाद मागितली. इंग्लंडनें ता. ४ ऑगस्ट रोजीं जर्मनीला अखेरचा म्हणून एक खलिता पाठविला, त्याला जर्मनीनें कांहींच उत्तर पाठविलें नाहीं, सबब इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारिलें. यापुढें निरनिराळ्या राष्ट्रसंघांचे परस्पर संबंध खालीं सांगितल्याप्रमाणें होते:—रशिआ आणि सर्व्हिआ यांनीं स्लाव्ह लोकांचा कैवार घेतला होता; त्या स्लाव्ह लोकांच्या विरुद्ध टयूटन्सच्या तर्फेनें जर्मनी व ऑस्ट्रिआ यांनीं युद्ध सुरूं केलें; फ्रान्स रशिआचा दोस्त असल्यामुळें अर्थात्च तो या कलहांत गुरफटला गेला. इंग्लंडनें स्वातंत्र्यदेवतेचा पक्ष उचलून धरिला व इकडे बेल्जिअमला स्वतःच्या अस्तित्वाकरितां लढणें प्राप्त झालें. इटलीचा कल उघड उघड दोस्तांना सहानुभूति दाखविण्याकडे होता, आणि दोस्तत्रयींपैकीं एक असतांहि त्यानें आपण तटस्थभाव कडकपणें पाळणार असें जाहीर केलें.

जर्मनांच्या स्वारीची योजना.

गेल्या कित्येक वर्षे जर्मनीनें आपले बेत मोठ्या दक्षतेनें व विचारपूर्वक करून ठेवून त्यांस १८१४ त परिपक्वता आणिली. मोठ्या जलदीनें चाल करून फ्रान्समध्यें घुसावयाचें, इतक्यांत फ्रान्सनें जें कांहीं सैन्य तयार केलें असेल त्याच्यावर हल्ला करावयाचा व त्याची अगदीं वाताहत करून पॅरिस राजधानी घ्यावयाची. नंतर तेथें ताबा कायम राहण्याकरितां कांहीं सैन्य ठेवून रशिअन सरहद्दीकडे झपाट्यानें जाऊन ऑस्ट्रिअन सैन्याला मिळावयाचें; आणि मग यथावकाश रशिआचा समाचार घ्यावयाचा.

संख्येच्या मानानें रशिआचें पारडें जड होतें, तर झटपट काम उरकून घेण्याच्या बाबतींत जर्मनीची सरशी होती. जर्मनीनें आपल्या काम करण्याच्या वेगाचा बरोबर अदमास करून व आपलें सर्वस्व केवळ त्वरित गतीवर अवलंबून टेवून त्या बेतानें आपल्या सर्व योजना ठरविल्या होत्या परंतु शत्रूला युद्धाला सैन्य तयार करण्यास पुष्कळ वेळ लागेल असा जो जर्मनीचा अदमास होता तो चुकीचा होता व तोच जर्मनीस बाधक झाला. जर्मनीला जितक्या जलदीनें सैन्य सज्ज करितां आलें तितक्याच जलदीनें फ्रान्सलाहि आपलें सैन्य तयार करितां आलें असतें; परंतु फ्रान्सनें प्रथम चढाई करण्यास आरंभ केला असें म्हणण्यास तिळमात्र जागा राहूं नये, म्हणून त्यानें त्या कामीं मुद्दाम दिरंगाई केली.

प्रतिस्पर्धी पक्षांचें सैन्यबल

जर्मनीजवळ युद्धाला उपयोगी पडेल असें ७० ००,००० सैन्य आहे असा अदमास आहे. त्यांपैकीं कलमवार आंकडे असे आहेतः— प्रत्यक्ष लढाईस तयार असें सैन्य, राखून ठेवलेलें व लँडवर ३१,००,००० एर्स्टॅझ येथें राखून ठविलेलें ९,००,००० इतर बोलाविल्यास तयार, परंतु बहुतेक शिक्षण नसलेलें ३०,०० ००० फ्रान्सचें सैन्य ४५,०० ००० आहे. रशिआची सामग्री फार मोठी आहे व ती साधारण अंदाजानेंहि किती आहे हें सांगतां येण्यासारखें नाहीं. परंतु त्याचें युद्धोपयोगी असें सैन्य ८०,००,००० आहे. ऑस्ट्रिआचें युद्धोपयोगी सैन्य जर्मनीच्या इतकेंच असावें, परंतु योग्यतेनें तें कमी

प्रतीचें आहे. प्रथम इंग्लंडचें, स्वारीवर जाण्यास योग्य असें सरासरीनें १,५०,००० सैन्य होतें. परंतु लढाईस उपयोगी अशा हिंदुस्तान व वसाहती यांच्या सैन्याखेरीज इंग्लंडच्या लढाऊ ७,००,००० सैन्यबलाचा वरील सैन्य हा एक भाग होय इंग्लंडच्या युद्धोपयोगी सैन्याची संख्या १५,००,००० पर्यंत किंवा जरूर पडल्यास यापेक्षांहि जास्त वाढवितां येण्यासारखी आहे. बेल्जिअमच्या सैन्याची एकंदर संख्या ३,४०,००० व सर्व्हिआच्या सैन्याची ४ आणि ५ लक्षांच्या दरम्यान् आहे

ब्रिटिश आरमारांत ५५ लढाऊ गलबतें, १२७ सर्व प्रकारचीं क्रूझरें आणि टार्पेडो विनाशिका टार्पेटो गलबतें, पाण्याखालून चालणारीं गलबतें व इतर अशीं मिळून ४०० लहान गलबतें आहेत. फ्रान्सचीं २३ लढाऊ गलबतें, २४ क्रूझरें आणि ३५५ लहान गलबतें आहेत. रशिआचीं ८ लहाऊ गलबतें आहेत, यांपैकीं ४ बांधून तयार होत आहेत; तशींच २५ क्रूझरें आहेत, त्यांपैकीं १२ तयार होत आहेत; आणि लहान गलबतें १४५ आहेत. जर्मनीचीं ३३ लढाऊ गलबतें, ५७ क्रूझरें आणि २२६ लहान गलबतें आहेत. ऑस्ट्रिआचीं १२ लढाऊ गलबतें, १२ क्रूझरें व ८९ लहान गलबतें आहेत.

दुसऱ्या राष्ट्राचें आरमार कितीहि मोठें असो, त्याला सुद्धां जर्मनीच्या आरमाराचा दरारा वाटेल इतकें मोठें जर्मन आरमार तयार करण्याचा प्रयत्न आज १७ वर्षे फॉन टर्पिट्झस यानें चालविला आहे.

बहुतेक अंशीं जर्मन आरमाराची वाढ हें त्याच्याच प्रयत्नाचें फल आहे आणि त्यानें आपल्या योजना, युक्तिप्रयुक्ति, मग त्या चांगल्या असोत अगर वाईट असोत–करून तयार ठेविल्या आहेत. प्रशिआला १८६४ सालीं कील मिळाल्यामुळें आणि विल्हेल्मशेव्हन त्यानें खरेदी केल्यामुळें जर्मनीला उत्तर समुद्रावर व बाल्टिक समुद्रावर मक्कम ठाणीं मिळालीं आणि कीलचा कालवा बांधल्यामुळें या ठाण्यांचा उपयोग फारच उत्तम होऊं लागला.

तथापि कैसर विल्हेल्म याच्या घाईच्या वर्तनानें जर्मनीच्या आरमाराचा जोर फार कमी पडला आहे भर समुद्रावर आरमार आणून दोस्तांच्या व्यापाराची अगदीं धुळधाण उडवावयाची, असें जर्मनीचें धोरण होतें; परंतु जर्मनी असें करील, हें ब्रिटिश आरमारा वरील अधिकाऱ्यांच्या अगोदरच लक्षांत येऊन चुकल्यामुळें त्यांनीं जर्मन गलबतांची उत्तरसमुद्रांत येण्याची वाट अगदीं बंद केली व जर्मन गलबतें जागजागींच अडकवून टाकिलीं. याचा परिणाम असा झाला कीं, फार थोड्या हल्ला करणाऱ्या जर्मन क्रूझरांखेरीज जगतांमध्यें कोणत्याहि समुद्रावर जर्मनीच्या आरमाराचें अस्तित्व दिसून आलें नाहीं.

एखाद्या जुगार खेळणाऱ्या नादावलेल्या माणसाप्रमाणें जर्मनीनें आपलें सर्वस्व धोक्यांत घातलें आहे व जर्मनीचे नेते त्याला चुकीच्या मार्गानें. विशेषतः राजकारणांत नेत आहेत कीं, अखेरीस जर्मनीचा अध पात होण्याशिवाय दुसरी गतीच त्याला राहणार नाहीं.

प्रकरण १९ वें.

महायुद्ध व व्हर्सायचा तह.

१९१४--दीर्घसूत्री रशिआच्या सैन्याची जमवाजमव होण्याच्या आंत फ्रान्सवर हल्ला चढवून त्याला चीत करावयाचें, हा जर्मनीचा बेत होता. फ्रान्स व जर्मनी यांच्यामधील १५० मैल सरहद्द डोंगराळ होती व फ्रेंचांनीं किल्ले वगैरे बांधून तिला जास्तच बळकटी आणिली होती. तेथून चाल करून जाणें मुष्कालीचें वाटल्यावरून जर्मनांनीं बेल्जममधून फ्रान्सवर स्वारी करावयाची व फ्रेंच व इंग्लिश सैन्यांची डावी बगल वेढून तिचा निकाल लावावयाचा असें ठरविलें. प्रथम या बेताप्रमाणें सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें. बेल्जमच्या पूर्वहद्दींतून जर्मन सैन्यें आंत घुसलीं. युद्धकलेंत व युद्धसाहित्यांत झालेल्या सुधारणांनीं किल्ल्यांचें महत्त्व किती कमी झालें होतें याची कल्पना दोस्तराष्ट्रांना मुळींच झाली नव्हती. पूर्वसरहद्दीवरील किल्ले सर करण्याच्या कामांत जर्मनीचे बरेच दिवस जातील असें फ्रेंचांना व इंग्लिशांना वाटत होतें; परंतु लिएझसारखे किल्ले जुन्यापुराण्या साहित्यानें सजविलेले होते; हें साहित्यही जर्मन मक्तेदारांनीं पुरविलेलें. त्यामुळें क्रुप्च्या कारखान्यांतील प्रचंड तोफांच्या मोठमोठ्या स्फोटक गोळ्यांपुढें या किल्ल्यांचा पार धुव्वा उडून गेला. किल्ल्यांत सैन्य उगीच अडकून मात्र पडलें एका आठवड्यांच्या आंत ऑगस्ट ९ ला लिएझचा किल्ला पडला तर नामुरच्या किल्ल्यानें तीन दिवस सुद्धां

टिकाव धरिला नाहीं. ऑगस्ट २० ला म्हणजे युद्ध सुरूं होऊन पंधरवडा उलटतो न उलटतो इतक्यांत बेल्जमची राजधानी बुमेल्स ही जर्मनांनीं काबीज केली. २३ ऑगस्ट रोजीं सकाळीं फॉन क्लुकच्या हाताखालील १,६०,००० सैनिकांच्या पहिल्या जर्मन सैन्यानें फ्रान्स–बेल्जम सरहद्दीवर तळ दिला.

फ्रेंच सैन्याचा जमाव लौकरच झाला होता, पण बेल्जममधून स्वारी येईल अशी फ्रेंचांची कल्पना नव्हती. बेल्जम हें तटस्थ राष्ट्र असल्यामुळें तिकडच्या बाजूला फ्रेंचांनीं फारशी सरक्षणाची तयारी ठेविली नव्हती. दक्षिण आर्देनमध्यें मेट्झ किल्ल्याच्या आसपास फ्रेंच सैन्य चढाई करून गेलें; पण फॉन बेसेलर नांवाच्या ८० वर्षांच्या कसलेल्या जर्मन सेनापतीनें त्या प्रदेशाची खडान्खडा माहिती मिळवून ठेविलेली असल्यामुळें या फ्रेंच सैन्याचा पुरा मोड करून टाकण्यास त्याला मुळींच अडचण पडली नाहीं अशा रीतीनें पराभव झालेल्या सैन्याला, बेल्जममधून चालून आलेल्या जर्मन सैन्याला इंग्लिशांच्या मदतीनें तोंड देण्याची तयारी करावी लागली. बेल्जनांच्या मदतीला म्हणून आलेल्या ७००० ब्रिटिश सैन्यावर मॉन्स येथें २२ ऑगस्टला सत्त्याबलाच्या जोरावर जर्मनांनीं असा निकाराचा हल्ला चढविला कीं, सर्व नाश टाळण्यासाठीं तें सैन्य झपाट्यानें पण व्यवस्थित रीतीनें मागें हटत चाललें. या छोट्या ब्रिटिश सैन्याला एका बाजूला हांकून देऊन उजव्या बगलेचें जर्मन सैन्य फ्रेंच सैन्याची दामटी वळण्याकरितां व पारीस (Paris) काबीज करण्याकरितां झपाट्यानें पुढें घुसले.

जर्मन सेनापतिमंडळाला आपल्याला जय मिळालाच असें वाटलें. ऑगस्टच्या अखेरीस फ्रान्समधून सैन्य कमी करून तें राशिआच्या बाजूला नेण्यास त्यांनीं आरंभ केला. पण इतक्यांत फ्रेंचांनीं सावरासावर करून मोठ्या कुशलतेनें उलट हल्ला चढविला. त्यांनीं जर्मन मध्यावर चाल केली. डाव्या बाजूला एक नवें सैन्य एकदम आणून उभें केलें व कुमक येऊन ताजेतवानें झालेलें इंग्लिश सैन्यही त्या बाजुला लढण्याकरितां उपयोगी पडलें. जर्मन उजवी बाजू फार पुढें आली असल्यामुळें तेथील सैन्य विस्कळित झालें. फ्रेंचांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठीं फॉन क्लुकला मध्यावरील व डाव्या बाजूवरील सैन्य कमी करावें लागलें व त्यामुळें त्याचें स्वतःचें सैन्य व दुसरें जर्मन सैन्य यांमध्यें फट पडली दरम्यान् दुसऱ्या व तिसऱ्या जर्मन सैन्यांनीं फ्रेंच सेनापति फॉक याच्या हुकमतीखालील सैन्याचा मोड करण्याची शिकस्त केली तरी त्यांना यश आलें नाहीं. तेव्हा संयुक्त फ्रेंच व इंग्लिश सैन्यांनीं जर्मन पहिलें व दुसरें सैन्य यांची पुरती ताटातूट करण्याचा रंग आणिला. अशा रीतीनें ६ सेप्टेंबर ते १० सेप्टेंबर १९१४ पर्यंत लढाईची मोठी धुमश्चक्री चालून जर्मनांना मार्न नदीपासून एन नदीपर्यंत मागें हटावें लागलें.

दोस्तराष्ट्रांना मोठा आनंद झाला व आतां जर्मनांची लवकरच वाट लागणार असें मनोराज्य करण्यांत तीं गुंग झालीं. पण जमिनींत चर खणून त्यांत युद्ध करीत बसल्यानें मोठ्या सैन्यासुद्धां, संख्याबलानें बऱ्याच मोठ्या सैन्याला वाटेल तितका वेळ तोंड देतां येतें हें

राखवून जर्मनांनीं त्यांच्या आनंदावर विरजण घातलें. चर उध्वस्त करावयाला जी प्रचंड तोफांची, फार मोठ्या स्फोटक गोळ्यांची व 'टाक्यां'ची सामुग्री लागते ती दोस्तांच्याजवळ मुळींच नव्हती. मार्नच्या लढाईनें जर्मनांचा मूळचा बेत फसला व फ्रान्सच्या जिवावर जें संकट बेतलें होतें तें निभावलें ही गोष्ट खरी; पण युद्धसाहित्याच्या बाबतींत जर्मनांची श्रेष्ठता कायम राहिल्यामुळें जर्मनांचा तळ जो बसला तो कायमचाच. 'रें' (Reims) पासून आल्प्स पर्वतापर्यंतची सैन्यरेषा निश्चल झाली व पुढील चार वर्षेपर्यंत पांचसहा मैलांपेक्षां मागें पुढें असा तिच्यांत फरक पडला नाहीं.

१९१४ सेप्टेंबरपासून नोव्हेंबरपर्यंत एन नदीच्या उत्तरेला प्रत्येक पक्षानें दुसऱ्या बाजूला घेरून वेढण्याचा प्रयत्न केला, पण कोणालाच जय मिळाला नाहीं. जर्मनांनीं यावेळीं बेल्जन बंदर 'आंतवेर' (Antwerp) घेतलें होतें व त्यांच्या मनांतून काले व बुलॉन हीं फ्रान्सच्या किनाऱ्यांवरील बंदरेंही हस्तगत करावयाचीं होतीं. जर कां हीं बंदरें जर्मनांच्या हातांत पडलीं असतीं तर इंग्लिश आरमारावर मोठेंच सकट कोसळलें असतें व इंग्लिश चॅनलमधील सर्व दळणवळण बंद झालें असतें. पण सुदैवानें फ्रेंच-इंग्लिश बेल्जन सैन्यरेषा कालेच्या ६०–७० मैल पुढें पडली. ईप्र येथें दोस्तसैन्याची फळी फोडून जाण्याचा निकाराचा प्रयत्न जर्मनांनीं केला, पण इंग्रजांनीं तो मोडून काढिला. तेव्हां दोन्ही बाजू हिंवाळ्यासाठीं चर खणून किरकोळ चकमकी करीत राहिल्या.

जर्मनांनीं बेल्जम व फ्रान्सचा अत्यंत संपन्न असा कांहीं प्रदेश काबीज केला होता, पण त्यांचा जो मूळचा बेत एकामागून एक जय मिळवून फ्रान्सला १८७० मध्यें ज्याप्रमाणें लोळविलें त्याप्रमाणें लोळवावयाचें, तो निश्चितपणें फसला.

आतां या वर्षीं पूर्वेच्या बाजूला रशिआनें काय केलें हें पाहिलें पाहिजे. १९१४ ऑगस्टच्या अखेरीस जर्मन सैन्य पश्चिम बाजूकडून पूर्वेकडे रवाना होऊं लागलें असें म्हटलें आहे. या हालचालीचें कारण असें कीं, रशिअन सैन्याचा जमाव जर्मनींच्या अंदाजापेक्षां लवकर होऊन त्यानें पूर्वप्रशिआंत प्रवेश केला हें होय. या कठिण प्रसंगीं कैसरनें हिंडेनबुर्ग नांवाच्या पेन्शनींत निघालेल्या सेनापतीस तार पाठविली कीं, " आपण जें मिळेल तें सैन्य घेऊन रशिअन सैन्याला पायबंद लावावा. " पूर्वप्रशिआमध्यें दलदलीची जागा फार आहे व सेनापति म्हणून नोकरी करीत असतां तेथील इंचन् इंच जागा हिंडेनबुर्गनें न्याहाळून ठेविली होती. युद्धाच्या वेळीं तो पेन्शन घेऊन हॅनोव्हरमधील एका खेड्यांत स्वस्थ दिवस कंठीत होता. कैसरची तार आल्याबरोबर तो बर्लिनला गेला. आगगाडीनें सैन्य नेण्यास वेळ लागेल म्हणून सांपडतील तेवढ्या मोटारी त्यानें वेठीला धरल्या व जें सांपडलें तें सैन्य त्यांत भरून तें सरहद्दीकडे रवाना केलें. रशिअन सैन्याची आपण राळ उडविणार यावद्दल त्यास क्षणभरही शंका आली नाहीं. रशिअन सैन्याच्या मागें जाऊन आगगाड्यांचीं स्टेशनें व टणक रस्ते सगळे

हिंडेनबुर्गनें रोखून ठेविले व तेथें आसपासच्या किल्ल्यांहून आणिलेल्या तोफा सज्ज करून ठेविल्या मूर्ख सेनापतींच्या तावडींत सांपडलेलें रशिअन सैन्य दलदलीच्या प्रदेशांत अडकलें. जर्मन तोफांचा मारा कमी करण्याला त्यांच्याजवळ तोफाच नव्हत्या. रशिअन सैन्याची दाणादाण उडाली. हजारों सैनिकांच्या जर्मन तोफांच्या गोळ्यांनीं ठिकऱ्या उडाल्या. सैराबैरा धांवत असतां हजारों सैनिक चिखलांत रुतून केविलवाण्या किंकाळ्या फोडति मरण पावले जे वांचले ते जर्मनांना शरण जाऊन त्यांचे कैदी बनले. ही लढाई टॅने. नबर्गची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. एका आठवड्याच्या आंत १,५०,००० रशिअन सैन्याची वाट लागली व जर्मनीला रशिआ. डून भय म्हणून राहिलें नाहीं. हिंडेनबुगची जिकडे तिकडे स्तुती पडली; जर्मनाना तर तो देवासारखा वाटूं लागला.

१९१५ या वर्षीं मुख्यत्वेंकरून पूर्वेकडेच विशेष लक्ष देणें जरूर आहे. पूर्व प्रशिआंत जोराची थप्पड बसल्यानंतर ऑस्ट्रिआच्या गॅलिशिआ प्रांतावर रशिआनें स्वारी केली. १९१५ च्या आरंभींच्या महिन्यांत गॅलिशिआ प्रांत व्यापून कार्पेथिअन पर्वतांतील खिंडी रशियानें काबीज केल्या व हंगेरीवर स्वारी करण्याची त्याची तयारी झाली; पण रशिअन जयांचा डोलारा व दोस्तांच्या आशा धाडकन् कोसळून पडल्या. जर्मनांनीं रशिअन मध्यांवर डुनाजेक नदीजवळ निकराचा हल्ला चढवून रशिअन सैन्याची धुळधाण उडविण्याची गुप्तपणानें अत्यंत जय्यत तयारी करून

ठेविली होती. ही सर्व योजना अत्यंत हुषार व कल्पक सेनापति फॉन फाल्कनहैन याची होती. १० मैलांच्या आघाडीवर सुमारें १५०० तोफा गोळा करून त्यांचा असा एकसारखा भडिमार जर्मनांनीं रशिअन सैन्यावर सुरूं केला कीं, त्या प्रदेशांत जवळजवळ एकही रशिअन सैनिक जिवंत राहिला नाहीं. या फटींत जर्मन सैन्य घुसून आपल्या सैन्याचे दोन अलग भाग होऊं नयेत म्हणून भराभर मागें पळत जाण्याशिवाय रशिअनांना गत्यंतर उरलें नाहीं. रशिअनांना मागें खेंचींत नेण्याचें काम फॉन मॅकेनसनकडे होतें. सांगितलेलें काम कांहीं झालें तरी पार पाडावयाचें, हा जो जर्मन अधिकाऱ्यांचा गुण तो मॅकेसनमध्यें उत्कटत्वानें होता एकाही ठिकाणीं हार किंवा कच न खातां जणूं काय ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणें त्यानें रशिअन सैन्य मागें रेटीत नेलें. याप्रमाणें रशिअनांस गॅलिशिआंतून हांकून लावल्यावर उत्तरेकडील हिंडेनबुर्गच्या हाताखालील सैन्यानें चढाईचें धोरण सुरूं केलें रशिअन सैन्याचा आंवाका पार नाहींसा झाला. पोलंड व लिथुॲनिया या प्रदेशांतून पळतां पळतां रशिअनांना भुई थोडी झाली. पोलंडची राजधानी वॉरसॉ व इतर सर्व किल्ले जर्मनांच्या स्वाधीन झाले. लक्षावधि राशिअन लोक रणांगणांवर मरण पावले किंवा कैदी झाले. रशिअनांच्या बहुतेक सर्व तोफा व अगणित युद्धसाहित्य जर्मनांनीं हस्तगत केलें. युद्धरेषा पूर्णपणें रशिआच्या हद्दींत आली व त्यामुळें कारखान्यांनीं गजबजलेला रशिआचा प्रदेश जर्मनांच्या अंमलाखालीं राहिला.

हा रशिआचा पराभव अगदीं ऐन वेळीं झाला, व त्यामुळेंच ऑस्ट्रिआ वांचला असें म्हणावयास हरकत नाहीं. मे १९१५ मध्यें इटलीनें ऑस्ट्रिआविरुद्ध युद्ध पुकारिलें व अशा रीतीनें दोन बाजूवर लढावयाचे आधींच मेटाकुटीस आलेल्या ऑस्ट्रिआच्या अंगांत उत्साह उत्पन्न झाला व रशिआकडून फारसें भय न राहिल्यामुळें इटलीची डाळ त्यांनीं शेवटपर्यंत शिजूं दिली नाहीं.

आतां १९१५ मधील दुसऱ्या महत्वाच्या वृत्ताकडे वळलें पाहिजे. हें वृत्त म्हणजे ब्रिटिशांनी डार्डानेल्स सामुद्रधुनी काबीज करण्याकरितां केलेली स्वारी दोस्तांच्या विरुद्ध ऑक्टोबर १९१४ मध्यें तुर्कांनीं युद्ध पुकारिलें. डार्डानेल्स तुर्कांच्या हातांत असल्यामुळें काळ्या समुद्रांतून रशिआशीं दळणवळण करण्याचा दोस्तांचा मार्ग खुंटला. रशिआशीं दळणवळण करण्याचा हा मार्ग खुला करावा, इजिप्तवर तुर्कांनीं स्वारी करण्यापूर्वी त्यांची राजधानी काबीज करून त्यांना हतवीर्य करावें, हे हेतु मनांत धरून ब्रिटिशांनीं ही स्वारी केली. पण चर्चिलबोवांची ही योजना असल्यामुळें त्यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरण तिचे लवकरच बारा वाजावे असा घाट घडविला. मार्च १९१५ मध्यें त्यांनीं नुसतीं जहाजें सामुद्रधुनी काबीज करण्याकरितां पाठविली. फ्रेंचांचें एक व इंग्रजांचीं दोन अशीं तीन जहाजें सुरुंगांना गाहक बळी पडलीं. पण सर्वांत नुकसानकारक परिणाम असा झाला कीं, तुर्कांना ब्रिटिशांचा बेत कळून आल्यामुळें त्यांनीं डार्डानेल्स सामुद्रधुनी

व त्यालगतचें गॅलिपोली द्वीपकल्प यांच्या संरक्षणाची अशी जय्यत तयारी करून ठेविली कीं. तीं शत्रूला कांहीं झालें तरी काबीज करतां येऊं नयेत. एप्रिलमध्यें गॅलिपोलींत ब्रिटिशांनीं सैन्य उतरविलें व याप्रमाणें जमिनीवरून व समुद्रावरून मारा केल्यानें कांहीं फल-निष्पत्ति होते कीं काय, हें पाहण्यास आरंभ केला. इंग्लड, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथून आलेल्या हजारों शूरवीरांनीं त्या रुधिरप्रिय किनाऱ्यावर आपलें रक्त सांडलें. पण त्यांचें आत्मार्पण व पराक्रम अगदीं निष्फल झाला. एकही महत्त्वाचा जागा तुर्कांकडून घेतां येईना व सैनिक तर खाईंत पडल्याप्रमाणें नाहींसे होऊं लागले, तेव्हां डिसेंबर १९१५ त ब्रिटिश सरकारनें सैन्य तेथून काढून आणिलें. गॅलिपोलींतील या पराभवानें दोस्तांची अत्यंत निराशा झाली, पण या स्वारीचे अप्रत्यक्ष परिणाम दोस्तांना हितावह झाले व म्हणूनच हे हजारों शूर सैनिक अगदींच निरर्थक बळी दिले गेले नाहींत असें समाधान मानण्यास जागा आहे. तुर्कांनीं इजिप्तवर स्वारी करून किंवा सुएझच्या कालव्यावर चालून जाऊन जो त्रास दिला असता तो त्यांना देतां आला नाहीं व या अत्यंत आणीबाणीच्या वेळीं पांच महिनेपर्यंत बल्गेरिआला दोस्तांच्या विरुद्ध युद्धांत सामील होतां आलें नाहीं.

गॅलिपोलींत ब्रिटिशांची फजिती झालेली पाहून बल्गेरिआला दोस्तांच्या विरुद्ध ऑक्टोबर १९१५ त युद्ध पुकारण्याचें धैर्य आलें. बल्गेरिआ जर्मनीला मिळाल्यावरोबर सर्वियाचा निकाल लागला.

सर्बिआवर जर्मन व ऑस्ट्रिअन सैन्यांनीं उत्तरेकडून स्वारी केली व बल्गेरिआनें पूर्वेकडून स्वारी केली. जात्याच्या तळ्यांमध्यें सांपडलेल्या धान्याप्रमाणें सर्बिआच्या सैन्याचा अगदीं चुराडा झाला. सर्व सर्बिआमध्यें जर्मनींचा अंमल बसला. बाल्कन द्वीपकल्पांत सालोनिका हें ग्रीक बदर व त्यासभोंवतींचा कांहीं प्रदेश याशिवाय दोस्तांकडे मुलूख राहिला नाहीं. हा प्रदेश दोस्तांनीं पुढें स्वारी करण्यास उपयोगीं पडावा म्हणून जबरदस्तीनें घेतला.

आशा रीतीनें १९१५ हे साल दोस्तांना पूर्वेकडे फार वाईट गेलें. सर्बिआचा नायनाट झाल्यामुळें बर्लिनपासून कान्स्टांटिनोपलपर्यंत हरमस्ता झाला व तेथून आशिआमायनर व इजिप्त इकडे सैन्य व सामुग्री नेणें जर्मनांना सुलभ झालें. ब्रिटिशांनीं गॅलिपोलींत हार खाल्लयामुळें रशिआशीं दळणवळण करण्याचा जवळचा मार्ग बंद राहिला. यानंतर मेसापोटेमिआवर ब्रिटिशांनीं स्वारी केली, तिचाही बोजवारा उडाला. आपल्या कर्तबगारीची भलती घमेंड मिरविणाऱ्या हिंदुस्थानांतील इंग्लिश अधिकाऱ्यांच्या हातांत ही व्यवस्था होती सैन्याला आवश्यक अशा साहित्याचा व सघटनेचा अगदीं अभाव होता. यामुळें मेसापोटेमिआंतील सैन्याचे फार हाल झाले. १९१४ च्या नोव्हेंबरांत हिंदी सैन्य बसऱ्यास उतरलें. त्याला बगदादवर चाल करून जाण्याचा हुकूम होता त्याप्रमाणें तें सैन्य गेलें. बगदादपासून २५ मैलांवर टेसिफॉन येथें त्यानें तुर्कांवर जय मिळविला परंतु शेवटीं अव्यवस्थेची शिकस्त झाल्यामुळें हिंदी

शिपायांना मुकाट्यानें तोंड फिरवावें लागलें. इतक्यांत तुर्कांच्या सैन्यानें त्यांचा पाठलाग करून कुटेल अमारा येथें त्यांस घेरिलें. या सैनिकांनीं शक्य तितके दिवस दम धरिला; शेवटीं तर ते घोड्याच्या मांसावर व गवतावर राहिले. पण अखेर १९१६ एप्रिलमध्यें त्यांना शरण जावें लागलें. १७७७ मध्यें सेरेटोगा येथें अमेरिकन बंडखोरांनीं इंग्लिश सैन्य शरण गेलें, त्यानंतरचा हा पहिलाच तशा नामुष्कीचा प्रसंग व हा हिंदुस्थानांतील इंग्लिश अधिकाऱ्यांच्या 'कर्तबगारी' नें आणल्यामुळें त्यांची जगापुढें पुरी नाचक्की होऊन हिंदुस्थानसरकारच्या राज्यपद्धतींत आमूलाग्र फरक करण्याचें ठरलें.

१९२५ सालांत पूर्व आघाडीवर जसे महत्त्वाचे वृत्तांत घडले, तसे पश्चिम आघाडीवर घडले नाहींत. चकमकी पुष्कळ झाल्या, पण त्यांचा अखेर परिणाम शून्य. बेल्जन किनाऱ्यापासून आल्प्स पर्वतापर्यंत चर खणून व त्यांच्यापुढें कांटेरी तारांचीं कुंपणें घालून विरुद्ध बाजूंचीं सैन्यें बसलीं होतीं. कांहीं ठिकाणीं हे चर एकमेकांपासून शेंकडों तर कांहीं ठिकाणीं फक्त ६०–७० यार्डांच्या अंतरावर होते. कांहीं ठिकाणीं ४ वर्षांत मुळींच फरक झाला नाहीं. या पांचशें मैलांच्या रेषेवर लाखों शिपाई समोरासमोर चरामध्यें बसले होते. त्यांना अनन्वित हाल काढावे लागत. विशेषतः हिंवाळ्यांत चर पाण्यानें व चिखलानें भरले म्हणजे तर त्यांची दुर्दशा काय विचारावी ! चकमकी सारख्या सुरूं असत. रात्रींचे छापे, बांबफेंकी, विमानांच्या झटापटी, तोफातोफी या लांबचलांब आघाडी-

वर बहुतेक सर्व ठिकाणीं चालत असत. १९१५ त कित्येक वेळां मोठ्या प्रमाणांवर चढाई करून जाण्याचा प्रयत्न दोन्ही पक्षांनीं केला, पण या प्रयत्नांस कोठेंच फारसें यश आलें नाहीं व म्हणण्या सारखा फरक कोठेंही न होतां दोन्ही बाजू आपापल्या ठिकाणीं कायम राहिल्या. मार्चमध्यें इंग्रजांनीं नव्हशापेल येथें हल्ला चढविला, पण दोन्ही बाजूंचीं बरींचशीं माणसें मरण्यापेक्षां त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. एप्रिलमध्यें जर्मनांनीं विषारी वायु शत्रूंवर सोडून ईप्रच्या उत्तरेस इझेर नदीवर हल्ला चढवून शत्रूला बरेंच मागें हटविलें, पण शेवटीं कॅनेडिअन शिपायांनीं त्यांचा प्रगति थांबविली मे महिन्यांत फ्रेंचांनीं आराच्या उत्तरेला चढाई केली व थोडा मुलूख घेतला; परंतु व्हिमी टेकडी कांहीं त्यांना घेतां आली नाहीं. सर्वांत महत्वाचा हल्ला सेप्टेंबरमधील होय. दक्षिणेकडे शांपान्य जिल्ह्या-मध्यें व्हुझिएरकडे फ्रेंच चालून गेले. त्याच वेळीं उत्तरेकडे फ्रेंचांनीं व्हिमी टेकडीवर व ब्रिटिशांनीं लूवर असा जोड हल्ला चढविला. कांहीं प्रगति झाली, पण अटकळीप्रमाणें विशेष कांहीं झालें नाहीं.

१९१६—या वर्षांत रशिआला युद्धांतून पार कमी करण्याचा प्रयत्न जर्मनीनें पुढें चालविला नाहीं. उन्हाळ्यांत ऑस्ट्रिआनें ट्रेंटिनो नदीवर इटलीवर चढाई केली, पण तींत ऑस्ट्रिआला बेताचेंच यश आलें. पश्चिम आघाडीवर फेब्रुआरींत व्हेर्दूं काबीज करण्याच्या उद्देशानें जर्मनांनीं चढाईचा उपक्रम केला. व्हेर्दूंच्या पूर्वेला अर्धवर्तुळाकार टेंकड्यांची रांग आहे, ती व्हेर्दूंच्या बचावाला साहायक आहे. या

टेंकड्यांवर फ्रेंचांनीं दोमां, व्हॉ, वगैरे किल्ले बांधिले होते. व्हेर्दूंचें स्थानमाहात्म्य दोन प्रकारचें आहे. पश्चिमेकडे चालून जाण्याऱ्या शत्रूला व्हेर्दूं हें फ्रान्सच्या वेशीसारखें आहे. त्याचप्रमाणें पूर्वेकडे स्वारी करावयाची झाल्यास फ्रेंचांना तें चांगलें आरंभस्थान आहे. जर्मनांना अशी आशा होती कीं, चढाई करून आपण व्हेर्दूं काबीज केलें म्हणजे फ्रान्स युद्धाला निकामी होईल व मग इंग्लंडची आपल्याशा खोड मोडितां येईल. या हल्ल्यांना सुरवात फेब्रुआरींत होऊन ते जूनच्या अखेरपर्यंत चालू राहिले. प्रथम दोमां व व्हॉ हे किल्ले व दुसऱ्या दोन महत्वाच्या टेंकड्या फ्रेंचांच्या हातून जर्मनांकडे गेल्या. परंतु फ्रेंचाचें धैर्य खचलें नाहीं. त्यांनीं अत्यंत शूरपणानें व चिकाटीनें व्हेर्दूंचा बचाव चालूं ठेविला. व्हॉ किल्ल्यांतील तळघर एक आठवडाभर रात्रंदिवस मुळींच विश्रान्ति न घेतां व शेवटचे दोन दिवस पाण्याचा थेंबही न पितां लढविणें दोमां किल्ल्याचा व खेड्यांचा बचाव. वगैरे झटापटींचें वर्णन वांचलें म्हणजे फ्रेंचांचें शौर्य पाहून एकादें अद्भुत काव्य वाचीत आहों कीं काय, असें वाटून मति गुंग होऊन जाते. व्हेर्दूंचा बचाव करण्यासाठीं ४०,००० फ्रेंच लोकांनीं धारातीर्थीं आपले देह ठेविले व त्या प्रदेशांतील यार्डायार्डावरचें प्रत्येक स्थळ कोणातरी फ्रेंच शिपायाच्या अचाट पराक्रमाच्या संसर्गानें स्मरणीय होऊन राहिलें. यानंतर दुसरीकडे हल्ले चढवून व्हेर्दूं येथें पडत असलेला फ्रेंचांवरचा ताण कमी करण्यांत आला.

प्रथम रशियाकडून मदत आली. मे महिन्यांत ऑस्ट्रिआनें इटलींत चाल केली तेव्हां रशिआंतील सैन्य बरेंच कमी केलें. ही संधि साधून

ब्रुसिलॉफ या रशिअन सेनापतीच्या हाताखालील सैन्यानें पूर्वआघाडी-वर दक्षिण बाजूला ऑस्ट्रिअनांवर हल्ला केला. ऑस्ट्रिअन सैन्य रशिअनांनीं भुसासारखें उडवून दिलें. पंधरा दिवसांत ऑस्ट्रिअन सैन्य पन्नास मैल मागें हटलें व एके ठिकाणीं तीस मैल लांबीचीं फट पडली. आपल्या दोस्तांवरचें हें मोठें संकट वारण्यासाठीं जर्मनांना पश्चिम आघाडीवरून घाईघाइनें कित्येक पथकें पूर्वआघा-डीवर न्यावीं लागलीं.

नंतर जुलैच्या आरंभीं इंग्रज व फ्रेंचांनीं मिळून सोम नदीच्या दोन्ही तीरांवरून मोठ्या चढाईचा उपक्रम केला. फ्रेंचांनीं पुष्कळ प्रदेश कावीज केला, पण त्यांना ब्रिटिशांइतकें लढावें लागलें नाहीं. हे हल्ले एकसारखे पांच महिने चालले होते व ते इतक्या मोठ्या प्रमाणावर होते कीं, यापूर्वीच्या कोणत्याही चकमकींत इतकीं माणसें किंवा इतका दारूगोळा वापरला गेला नव्हता. ज्या मानानें माणसें व दारूगोळा खर्ची पडला त्या मानानें प्रगति अगदींच थोडी होती. बापोम किंवा पेरोन हेंहि दोस्तांना काबीज करितां आलें नाहीं. अत्यंत चिकाटीनें व शर्थीनें लढून हाताहातीपर्यंत येई तेव्हांच जर्मन एकादें पाऊल मागें सरत; यामुळें दोस्तांचे पुष्कळ सैनिक बळी पडल्याशिवाय एक यार्डहि जागा दोस्तांना मिळाली नाहीं. नाहीं म्हणावयाला या हल्ल्यांचा एवढा उपयोग झाला कीं, जर्मनां-वरील ताण फारच वाढत चालला. लोकसंख्येच्या मानानें त्यांचे शक्य तेवढें सैनिक तयार करण्यांत येत होते, पण अशी

मनुष्यहानि चालली असतां ती भरून काढीत राहणें त्यांना शक्य नव्हतें. उलट इंग्रजांचे फार थोडे सैनिक रणांगणावर आले होते व त्यांना जगभर पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या सर्व भागांतून आलेल्या सैनिकांची मदत खास मिळणार होती तेव्हां आपली मनुष्यहानि झाली तरी जर्मनांची मनुष्यहानि होईल तितकी करून त्यांना जेरीस आणावयाचें, हें धोरण बाळगून दोस्तांनीं हे हल्ले एकसारखे चालूं ठेविले. शिवाय रक्त पिण्यास चटावलेल्या या समरभूमीवर इंग्लंडनें उभारलेल्या नव्या सैन्याला कसलेल्या जर्मन सैनिकांबरोबर लढण्याचा प्रसंग आला व त्यांत त्या सैन्यानें टिकाव धरल्यामुळें इंग्लंडचा उत्साह द्विगुणित झाला ब्रिटिश वैमानिकांनीं आपल्या कौशल्यानें सेर्रांस थक्क करून टाकिलें; यावेळीं तरी निदान जर्मनांपेक्षां ब्रिटिश वैमानिक जास्त सरस होते यांत संशय नाहीं. तिसरी व शेवटचो गोष्ट म्हटली म्हणजे अशी कीं, ज्याच्या योगानें दोस्तांना शेवटीं जय मिळावयाचा होता तें आयुध या लढायांतून प्रथम मोठ्या प्रमाणावर उपयोगांत आणिलें गेलें. हें म्हणजे 'टांकें' (Tank) म्हणून प्रसिद्धास आलेला चालता लोखंडी किल्ला होय.

याप्रमाणें १९१६ तील पहिली चढाई रशिआनें व दुसरी इंग्रज फ्रेंचांनीं केली. या सालांतील तिसरी चढाई म्हणजे इटलीनें ऑस्ट्रिआच्या ट्रीस्ट बंदरावर चालून जाण्याचा केलेला प्रयत्न होय. ऑगस्टमध्यें इटॅलिअनांनीं इसौझो नदी ओलांडून गॉरिझिआ शहर घेतलें. अशा रीतीनें दोस्तांनीं चहूंकडून चढाई सुरूं केल्यानुळें व्हेर्दूंवरील हल्ले पुढें

सुरूं ठेवणें जर्मनांना अशक्य झालें. हें वर्ष संपावयाच्या आंत फ्रेंचांनीं दोन जोराचे हल्ले चढवून मीझ नदीच्या उजव्या तीरावरून ते जितके मागें सरले होते तो सर्व मुलूख पुनः जिंकिला. यांत अर्थात्च दोमां व व्हॉ हे इतिहासप्रसिद्ध किल्ले पुनः फ्रेंचांच्या ताब्यांत आले.

पूर्वेकडे मात्र पुनः या वर्षीं दोस्तांच्या कपाळावर निराशेचा घाव बसला. ऑगस्टच्या अखेरीस दोस्तांच्या बाजूनें रुमेनियानें युद्ध पुकारिलें व ऑस्ट्रिआच्या ट्रॅन्सिल्व्हेनिआ प्रांतावर चाल केली पण या वेळीं पूर्वेच्या बाजूला रशिआचीं व सर्बिआचीं हाडें मोडून प्रसिद्धीस आलेल्या हिंडेनबुर्ग व लुडेनडॉर्फ या जर्मन सेनापतींच्या हातांत सैन्याचीं सर्व सूत्रें आलीं होतीं. हिंडेनबुर्ग हा सेनापति-मंडळाचा नामधारी मुख्य होता; पण लूडेनडॉर्फ हा प्रत्यक्ष व्यवस्था जास्त पाही असें म्हणतात. हिंडेनबुर्गनें आतां रुमेनिआला जमीन-दोस्त करण्याची योजना करून ती अमलांत आणण्याचें काम फाल्कनहैन व मॅकेन्सन यांजवर सोंपविलें. त्यांनीं प्रथम रशिआची प्रगति थांबविली व ऑस्ट्रिअनांच्या साहाय्यानें रुमेनिआवर चढाई केली. १९१६ हें वर्ष संपावयाच्या आंत रुमेनिआचा निकाल लागला व बुखारेस्ट राजधानी जर्मनांच्या हातांत पडली. वालेकिआ हा प्रांत जिंकल्यामुळें तेथील सर्व धान्य जर्मनांना मिळालें.

१९१७-१९१६ सालांत एक मोठी समुद्रावरील लढाई झाली, परंतु समुद्रावरील झटापटींना खरा रंग १९१७ त आला. यावद्दलचें विशेष वर्णन पुढें करण्यांत येईल.

सध्यां एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, पाणबुड्या बोटींच्या जोरावर व्यापारी माल–वहातुकीचीं व उतारूंचीं देखील जाहजें इशारात वैरे न देतां किंवा उतारूंचे जीव वांचविण्याची कांहीं तजविज न करितां बिनदिक्कत आंतराष्ट्रीय कायदे धाब्यावर बसवून बुडवायाचीं व अशा रीतीनें इंग्लंडची उपासमार करून त्याला शरण यावयास लावावयाचें, हा जर्मनांचा बेत होता. परंतु या उपक्रमामुळें युनैटेड स्टेट्सनें एप्रिलमध्यें जर्मनविरुद्ध युद्ध जाहीर केलें. याचा परिणाम जर्मनीला कसा भोंवला हें आपल्याला दिसेलच; पण जिचा दोस्तांना तावडतोब मोठा धक्का बसला ती दुसरी गोष्ट म्हणजे रशिअन राज्यक्रान्ति होय.

लढाईमध्यें रशिअनांना जे हाल काढावे लागले ते अवर्णनीय व त्यांची जी मनुष्यहानि झाली ती अपरिमित होय. उणीव सर्व गोष्टींची; त्यांच्या जवळ बंदुका नव्हत्या, तोफा नव्हत्या, दारूगोळा नव्हता, विमानें नव्हतीं, खावयाला अन्न नव्हतें. अशा विकट परिस्थितींतही रशिअन लोक शौर्यानें व इमानानें लढत होते, व त्यांच्या चढाईमुळें मार्ने नदीवरील व व्हेर्दूंजवळील लढायांच्या वेळीं पश्चिम आघाडीवरील दोस्तांचें काम कसें सोपें झालें याचें वर्णन वर आलेंच आहे. रशिआची बादशाही बेबकूब व बेइमानी होती. धार्मिकतेच्या नांवाखालीं बेडगळ दंभाचार झारसाहेबांनीं आरंभिले व ज्याचें नांव घेतलें असतांही सचैल स्नान करावें अशा अधमाधम रासपुटीन नांवाच्या 'साधूचे' किळसवाणे 'भक्ति

सोहाळे ' दरबारांत बोकाळले या घाणेरड्या पंथाचें प्राबल्य आणि आळशी, नीच व सर्व दृष्टींनीं भ्रष्ट अशा लोकांचा सुळसुळाट यांमुळें लढाईच्या बाबतींत दिवसेंदिवस बेबंदशाही जास्तजास्तच माजत चालली. तोफा किंवहुना नीट बंदुकाही न देतां शिपायांना रणांगणावर पाठाविल्यामुळें पुष्कळ वेळां शत्रूच्या तोफांना घाबरयास आणिलेले लाचार बळी अशी त्यांची स्थिति होई. मर्जी लागेल त्याप्रमाणें व त्यावेळीं वाटेल तितकीं माणसें लष्करी अमलदारांनीं व सेनापतींनीं खर्ची घालावीं हा लढाईचा प्रकार झाला. पुष्कळ वेळपर्यंत मुक्या इमानी कुत्र्यांप्रमाणें रशिअन शिपायांनीं हे हाल सहन केले; परंतु अत्यंत अज्ञ व गरीब अशांच्याही सहनशीलतेला सीमा असते. रशिअन सैन्यामधून असंतोषाचा वणवा पसरत चालला व ज्या झारचा शिपायांना अगदीं वीट आला होता तो आपल्या सर्व अनुयायांसह त्यांत जळून खाक होणार अशीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं. १९१७ च्या मार्चमध्यें अन्नासाठीं पेट्रोग्राडमध्यें दंगे झाले व त्यांनाच राज्यक्रान्तीचें स्वरूप प्राप्त झालें. झारला पदच्युत करण्यांत आलें. कांहीं काळपर्यंत क्रान्तिकारक पक्षांतील समंजस लोकांचें वर्चस्व होतें व हे दोस्तांना अनुकूल होते. परंतु राज्यक्रान्तीच्या वेळीं साधारणतः विकारवशतेचेंच प्राधान्य होत असतें. त्याप्रमाणें सत्ता हळू हळू जहाल लोकांच्या हातांत जाऊं लागली. बेशिस्त सैन्यांतही शिरली. रशिअन सैन्याची चढाई थंडावली, तें मागें सरत चाललें व शेवटीं त्याची पुरी दाणादाण उडाली. थोड्याच दिवसांत रशिआच्या बाजूला लढावयास संघटित असें एकही पथक उरलें नाहीं. शेवटीं सत्ता

लेनिन व ट्रॉट्स्की यांच्या नेतृत्वाखालीं बोल्शेव्हिक नांवाच्या जहाल-तम पक्षाकडे गेली. बोल्शेव्हिकांनीं हें वर्ष संपावयाच्या आंत जर्मनां-कडे युद्धतहकुबी मागितली. १९१८ च्या आरंभीं ब्रेस्टलिटोस्क येथें त्यांनीं जर्मनीशीं तहहि करून टाकिला. या तहानें रशिआचें भयंकर नुकसान झालें. पोलंड, बाल्टिक प्रांत व पश्चिमेकडील उरलेला सर्व प्रदेश या तहामुळें जर्मनींत सामील झाला. औद्योगिक दृष्ट्या हेच रशिआचे भाग महत्वाचे होते.

इकडे पश्चिम आघाडीवर युद्धाचा जोर बिलकूल कमी झाला नव्हता. पूर्वीप्रमाणेंच १९१७ त वर्षभर निकराच्या चकमकी ठिक-ठिकाणीं सुरू होत्या. दोस्तांनीं चढाईचें धोरण ठेविलें होतें तर पाणयुद्धांच्या कर्तबगारीवर विसंबलेल्या जर्मनांनीं बचावाचें धोरण स्वीकारिलें होतें. या वर्षाच्या आरंभीं जर्मनांनीं सॉम नदीवरून माघार घेतली, पेरोम, बोपोम हीं शहरें सोडून हिंडेनबुर्गनें सैन्यरेषा म्हणून प्रसिद्ध असलेल्या आघाडीवर तळ दिला व मागें हटतांना सर्व प्रदेश इतक्या कसोशीनें बेचिराख करून टाकला कीं, कित्येक दिवसपर्यंत दोस्तांना पुढें सरकता येऊं नये. एप्रिलमध्यें आराच्या लढाईंत कॅनेडिअन शिपायांनीं आराच्या उत्तरेस असलेली व्हिमी टेंकडी हें महत्वाचें स्थळ काबीज केलें. पण याच महिन्यांत फ्रेंचांनीं एन नदीच्या उत्तरेस आरंभिलेली मोठी चढाई पुरी फसली. लाओं पहिले दिवशीं हस्तगत होईल असा फ्रेंचांचा अंदाज होता. पण दोन महिन्यापूर्वी या चढाईच्या संबंधानें सोडलेला एक हुकूम जर्मनांच्या

हातीं पडला होता त्यामुळें जर्मनांनीं जय्यत तयारी करून ठेविली होती या अपयशानें फ्रेंच राष्ट्राची व सैनिकांची अत्यंत निराशा झाली. मुख्य फ्रेंच सेनापति निव्हेल याला काढून टाकण्यांत आलें.

यानंतर ब्रिटिश व फ्रेंच यांनीं इकडे तिकडे महत्वाचीं ठाणीं घेण्यासाठीं हल्ले केले. ईप्रजवळ सैन्यरेषेला बांक होता तो काढून टाकून ती सरळ करावयाची, हा ब्रिटिशांचा हेतु होता. या आकुंचित बांकामुळें ब्रिटिशांना आपले हजारो सैनिक खर्ची घालावे लागले होते सेनापति प्लूमरनें जूनमध्यें जो हल्ला चढविला त्याला चांगलें यश येऊन ईप्रच्या दाक्षणेस असलेली मेसिन टेंकडी ब्रिटिशांनीं हस्त गत केली ईप्रच्या उत्तरेस फ्लँडर्समध्यें सेनापति गॉफच्या हाताखालील सैन्यानें पाशेंदेल टेंकडी घेण्यासाठीं ऑगस्टपासून नोव्हेंबरपर्यंत फार कसून प्रयत्न केले. पण पावसानें जमीन भिजून जिकडे तिकडे चिखल झाला होता; त्यामुळें टाक्यांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं शिवाय जर्मनांनीं 'सिमेंट'च्या भोंकें असलेल्या अशा पोकळ घना-कृति केल्या कीं त्या भोंकांतून यांत्रिक तोफांचा मारा चोहोंकडे व्हावा या सर्व कारणांनीं ब्रिटिशांची प्रगति अत्यंत मंद गतीनें झाली त्यांची कितीतरी भयंकर मनुष्यहानि झाली. तेव्हांच त्यांना ती टेंकडी मिळाली. याच वेळीं फ्रेंचांचा नवा मुख्य सेनापति पेते याच्या हुक-मतीखालीं फ्रेंचांनीं दोन ठिकाणीं चढाई केली. प्रथम व्हेर्दूंच्या पुढून जर्मनांना पार मागें हुसकावून लाविलें व नंतर शेमां-दे-दाम या रस्त्यावरून जर्मनांना मागें हाकललें. नोव्हेंबरमध्यें ब्रिटिशांनीं कांब्रेच्या

समोर अचानक हल्ला चढविला. इतके दिवसांची अशी पद्धत होती कीं हल्ला चढविण्याच्या अगोदर तोफांच्या माऱ्यानें शत्रूचीं ठाणीं उध्वस्त करावयाचीं, पण यावेळीं ब्रिटिशांनीं टांक्यांच्या व खऱ्या आणि कृत्रिम धुक्यांच्या साहाय्यानें छापा घातल्याप्रमाणें केलें. हा हल्ला उत्तम यशस्वी झाला; इतका कीं, या पूर्वी ब्रिटिशांनीं एका दिवसांत इतकी जागा कधींही काबीज केली नव्हती. पण हें यश टिकवितां आलें नाहीं. जर्मनांनीं फेर हल्ला केला व ब्रिटिशांना जें मिळालें होतें तें गमावून बसावें लागलें. तरी पण ब्रिटिशांच्या यावेळच्या युद्धापद्धतीनें युद्धशास्त्रांत एक नवीन मनु सुरूं केला व कशा रीतीनें चढाई केली असतां ती यशस्वी होईल हें सर्वांना दाखविलें असें म्हणावयास हरकत नाहीं

या वर्षीं इटलीमध्यें दोस्तांची निराशाच झाली. इटेलिअनांनीं चढाईचा प्रयत्न केला तो निष्फळ झाला व नंतर ऑक्टोबरमध्यें त्यांच्यावरच शत्रूनें फेरहल्ला केला सहा जर्मन तुकड्या ऑस्ट्रिआच्या मदतीला गेल्या व भालफळाप्रमाणें त्यांनीं इटेलिअन सैन्यांत प्रवेश केला. कापारेतो या ठिकाणाजवळ थोडे इटेलिअन शिपाई होते त्यांच्यावर ऑस्ट्रो जर्मनांनीं छापा घातला एका जर्मन तुकडीनें धुक्याचा फायदा घेऊन इटेलिअनांच्या मागील उंचवटे काबीज करून तेथें तळ दिला. पूर्वीच रोमन लोक लढण्याबद्दल प्रसिद्ध असले तर अलीकडील इटेलिअन लोक पळपुटेपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. हा सद्गुण त्यांनीं अनेक वेळां प्रकट करून शाबासकी

मिळविली आहे; त्याचें त्यांनीं या वेळींहि प्रदर्शन केलें ! धान्य-सामुग्री, युद्धसाहित्य वगैरे सर्व जागच्याजागीं टाकून ते भरधांव पळत सुटले. शेवटीं ते पिएव्ह नदीला पोहोंचले व ब्रिटिश व फ्रेंच पथकें येऊन त्यांना मिळालीं तेव्हां कोठें त्यांचा पळ थांबला व त्यांच्या पायांना विश्रांति मिळाली. या पळांत त्यांनीं अडीच लक्ष कैदी व १८०० तोफा जर्मनांच्या हवालीं केल्या व या शिवाय त्यांचे अडीच लाख लोक कामास आले.

तुर्कांच्या विरुद्ध मात्र दोस्तांपैकीं ब्रिटिशांस या वर्षीं चांगलें यश मिळालें. सेनापति मॉडच्या हाताखालील सैन्यानें मेसोपोटेमिआवर पुनः स्वारी केली; कुट परत घेतलें व मार्चमध्यें बगदाद शहरावर आपलें निशाण फडकविलें १९१७ च्या शेवटीं तुर्क बगदादच्या उत्तरेस १०० मैल मागें रेटले गेले होते. शेवटच्या तीन महिन्यांत सेनापति ॲलन्बीनें पॅलेस्टाइनवर स्वारी केली, गाझाच्या पुढून तुर्कांना पिटाळून लाविलें व जेरूसलेममध्यें डिसेंबरांत प्रवेश केला.

१९१८—या वर्षाच्या आरंभीं जर्मनीला कळून चुकलें कीं, पाणबुड्यांनीं इंग्लंडचा पाडाव होऊं शकत नाहीं. म्हणून जर्मनांनीं अमेरिकन सैन्यें मोठ्या प्रमाणावर येण्याच्या आंत पश्चिम आघाडीवर मोठी चढाई करून सोक्षमोक्ष करून टाकावयाचाच असें ठरविलें. रशिआचा निकाल लागलेला असल्यामुळें आपले लाखो शिपाई जर्मनांनीं पूर्वेकडून पश्चिम आघाडीवर आणिले.

मार्चमध्यें त्यांनीं आमिआं घेण्याचा प्रयत्न केला. आमिआं हें आगगाड्यांचें जंक्शन असून फ्रेंच-इंग्रजांच्या दळणवळणाचें केंद्रस्थान होतें. हें शत्रूच्या हातांत सांपडल्याबरोबर दोन्ही सैन्यांचा संबंध तुटला असता कांब्रे व सेंट केंतांच्या समोर ब्रिटिश तिसऱ्या व पांचव्या सैन्यावर जर्मनांनीं छापा घातला तिसऱ्या सैन्यानें त्यांना फारशी दाद दिली नाहीं; पण गॉफच्या पांचव्या सैन्याच्या चौदा तुकड्यांविरुद्ध जर्मनांनीं चाळीस तुकड्या आणून सेंट केंतांजवळ त्या सैन्याची फळी फोडली. दोन्ही ब्रिटिश सैन्यांना यामुळें बरीच माघार घ्यावी लागली. व फ्रेंच सैन्यहि दक्षिणेला मागें हटलें. मनुष्यांचें व युद्धसाहित्याचें भयंकर नुकसान होऊन सॉम नदीच्याजवळ जिंकलेला सर्व मुलूख गेला. पण आरा येथें ब्रिटिशांच्या डाव्या बगलेवर हल्ला करण्याकरितां जर्मन पुढें सरले, तेव्हां त्यांचा पराभव झाला. व्हिएर-ब्रेतोन हें खेडेंहि त्यांना आपल्या हातांत ठेवितां आलें नाहीं. जर एक दिवस त्यांच्या हातीं राहिलेलें हें खेडें त्यांच्याकडे कायम राहिलें असतें तर तेथून केलेल्या माऱ्यापुढें आमिआं सोडून देणें दोस्तांना भाग पडलें असतें व आमिआं गेल्यानें दोस्तांचा पराभव होणेंहि शक्य होतें. पण सुदैवानें ही आपत्ति टळली. ३,५५,००० ब्रिटिश शिपाई त्वरेनें मदतीस पाठविण्यांत आले व आमिआंजवळ जर्मनांना तोंड देण्याची चांगली तयारी झाली.

एप्रिलमध्यें लाबासपासून दीम्यूदपर्यंतच्या आघाडीवर हल्ला चढवून इंग्लिश चॅनलवरील बंदरें घेण्याचा जर्मनांनीं प्रयत्न केला.

येथेंहि त्यांना आरंभीं चांगला जय मिळाला. १९१७ त लढून दीर्घप्रयत्नानें मिळविलेल्या मेसीन व पोशेंदेल टेंकड्या वगैरे सर्व जागा ब्रिटिशांच्या हातच्या जाऊन शिवाय केमेल ही टेंकडी गेली. ईप्रच्याजवळील बांक जास्तच अरुंद झाला पण येथेंहि जमनांना पुरता जय मिळाला नाहीं. जिव्हेन्री जर्मनांना घेतां आलें नाहीं; केमेलपलीकडील दोन टेंकड्या घेतां आल्या नाहींत; कासेलहि घेतां आलें नाहीं कासेल हें ५० फूट उंचीच्या टेंकडीवर वसलेलें असून तेथून एकतीस शहरें, शंभर खेडीं व समुद्रकिनारा हीं सर्व दिसतात व तेथून बुलोन व कॅले या बंदरांवर जर्मनांना तोफांचे गोळे टाकितां आले असते. मार्च व एप्रिल या दोन महिन्यांत एकट्या ब्रिटिशांचेच चार लक्ष शिपाई जायबंदी झाले अगर मेले व ८०,००० कैदी झाले.

मे महिन्यांत जर्मनांनीं शेमां–दे–दाम येथें हल्ला केला. त्यांत मोठा जय मिळून ते एका दिवसांत दहा मैल पुढें सरकले. हजारों कैदी त्यांच्या हातीं सांपडून मार्न नदीपर्यंत पारीपासून ते ४० मैलांवर येऊन थडकले. जूनमध्यें त्यांची फारशी प्रगति झाली नाहीं व जुलैमध्यें तर त्यांचा रें घेण्याचा प्रयत्न सपशेल फसला. यावेळीं फ्रेंचांनीं एका नव्या युक्तीचा अवलंब केला. त्यांनीं पहिल्या रांगेवर यांत्रिक तोफानिशीं फार थोडे शिपाई ठेविले. हांते पण खरी बचावाची त्यांची जागा मागें होती. पहिली रांग जर्मनांनीं जों हस्तगत केली तोंच त्यांच्यावर मागील रांगेवरून तोफांचा भडिमार सुरू

होऊन त्यांचा फार नाश झाला. त्यानंतर पुनः चढाई करण्याचें अवसान चार वर्षांच्या अविरत श्रमांनीं जेरीस आलेल्या जर्मन सैन्यांत राहिलें नाहीं

इकडे दोस्तांची चढती कमान होती. युद्धाचीं सर्व सूत्रें एकाच कर्तबगार माणसाच्या हातीं येणें जरूर होतें फ्रान्समध्यें क्लमान्सो, अमेरिकेंत विल्सन व इंग्लंडमध्यें लॉइड जार्ज यांनीं आपआपल्या राष्ट्रांचें सर्व सामर्थ्य युद्धाच्या कारणीं लाविलें. दोस्तांच्या आरमारी धोरणाचीं सूत्रें ब्रिटिश आरमारखात्याच्या हातीं आलीं व शेवटीं मार्चमध्यें जमिनीवरील सर्व हालचालींचीं सूत्रें फ्रेंच सेनापति फॉक याच्याकडे आलीं. यामुळें सर्व आघाडीवरील धोरणांची नीट संगति लाविता येणें शक्य झालें. दुसरी गोष्ट म्हणजे अमेरिकेहून येणारें वाढतें सैन्य. पहिल्या वर्षी म्हणजे १९१७ त अमेरिकेनें पाणबुड्यांचा प्रतिकार करण्याकडे लक्ष लाविल्यामुळें फारसे अमेरिकन शिपाई फ्रान्समध्यें आलें नाहींत, पण दोस्तांच्या प्राणावरील संकट पाहून अमेरिकेनें १९१८ त दरमहा ३०,००० शिपाई पाठविण्यास आरंभ केला. हे शिपाई अर्थात्च ताजेतवाने असल्यानें दमून गेलेल्या जर्मन शिपायांना भारी वाटूं लागले. तिसरी गोष्ट म्हणजे बाहेरून यावयाचा माल जवळजवळ पुरता बंद झाल्यामुळें अन्न, दारूगोळा व इतर साहित्य यांची जर्मन सैन्याला व लोकांना जास्त जास्त वाण भासूं लागली

या कारणांमुळें दोस्तांना आवेश चढून त्यांनीं जुलै १८ ला युद्धाचा यशस्वी शेवट करणाऱ्या मोठ्या चढाईला आरंभ केला.

20 APR 1990

मार्न नदीवरील शातो–तिएरीपर्यंत जर्मन चाल करून पुढें आले तेव्हां त्यांच्या सैन्यरेषेंत पुढच्या बाजूला फार मोठा बांक आला. स्वासां व शातो–तिएरीमधील २७ मैलांच्या आघाडीवर फॉकनें हल्ला चढविला. या बांकावरील जर्मन सैन्य मोठ्या मुष्किलीनें व पुष्कळसे शिपाई बळी देऊन कसें तरी निसटलें या जयानंतर दोस्त भाग पाडितील तेथें जर्मनांनीं लढावयाचें अशी स्थिति प्राप्त झाली. आगस्ट ८ ला पारी–आमिआं आघाडीवर फ्रेंच व ब्रिटिश यांनीं मिळून हल्ला केला. व्हिएर–ब्रेतोन रस्त्याच्या दोन्ही बाजूंवर ब्रिटिशांनीं व त्याच्याच उजव्या बाजूला थोडा पलीकडे फ्रेंचांनीं हल्ला केला सेनापति रॉलिन्सनच्या हाताखालील ४ थ्या सैन्यानें २००० तोफांचा फार थोडा वेळ परंतु अत्यंत जोराचा भडिमार केला ००० टांकीं पुढें करून एका बाजूनें ऑस्ट्रेलिअन व दुसऱ्या बाजूनें कॅनेडिअन खऱ्या व कृत्रिम धुक्याचा फायदा घेऊन एका दिवसांत सात मैल पुढें गेले. फ्रेंचहि पुष्कळ पुढें सरकले. यानंतर सैन्यरेषेच्या निरनिराळ्या भागांवर एकसारखे हल्ले करीत राहण्याचें फॉकनें ठरविलें. शत्रूची स्थिति गर्दी दुर्धर झाली एका भागावर लढाई सुरू झाली म्हणून राखीव सैन्य तिकडे पाठवावें तोंच एकदम दुसरीकडे नवी लढाई सुरू व्हावी. ऑगस्ट ८ च्या लढाईनंतर डाव्या बाजूस फ्रेंचांनीं आणखी दोन हल्ले चढविले. विंगच्या तिसऱ्या सैन्यानें आल्बेर व आर यांच्या दरम्यान हल्ला करून बेपोम व पेरोन हीं कावीज केलीं. या प्रसंगीं दहा दिवसांत जेवढा मुलूख

मिळाला तेवढा १९१६ त चार महिने लढूनहि दोस्तां ा मिळला नव्हता सप्टेंबरच्या आरंभी हान या हाताखालील पहिल्या सैन्यानें आराच्या उत्तरेस हल्ला केला व त्यानंतर सेंट मिएल येथें जर्मन सैन्याची पाचर होती ती अमेरिकनांनीं मागें रेटून मेट्झवर चाल करून जाण्याचा वाट खुली केली. सबंध सप्टेंबर महिन्यांत दोस्तांनीं हिंडेनबुर्ग रेषेवर असेच हल्ले पुढें चालू ठेविले. अमेरिकनांनीं व्हेर्दू व आर्गान यांच्या दरम्यान व फ्रेंचांनीं आर्गान व रें यांच्या दरम्यान हल्ले केले ब्रिटिशांनीं दोन हल्ले केले पहिल्यानें कानाल-दू-नॉर हा काबीज केला व दुसऱ्यानें सेंट कॅंटिन काल्वा व हिंडेनबूर्ग रेषेंतील स्थळें काबीज केलीं यांच्याहि उत्तरेस फ्रेंच, बेल्जम व ब्रिटिश यांनीं सर्वांनीं मिळून हल्ला चढवून ईप्रच्या आसपास जर्मनांना मागें हांकून मेसिन व पाशेंदेल टेंकड्या परत मिळविल्या.

परंतु याच महिन्यांत दुसरीकडे दोस्तांना मोठमोठे जय मिळाले व्हार्दारच्या लढाईंत बल्गेरिआचा निकाल लागला दहा दिवसांच्या आंत बल्गेरिआनें युद्धतहकुबी मागितली व ३० सेप्टेंबरला बल्गेरिआ नाक मुठींत धरून दोस्तांना शरण आला. दोस्तांना सर्बिआ परत मिळाला, त्यांनीं बल्गेरिआ ताब्यांत घेतला व अशा रीतीनें तुर्कस्थान व जर्मनी यांचें दवळवळण पार व कायमचें बंद करून टाकिलें. याच सुमाराला मुख्यत: हिंदी सैन्यानिशीं सेनापति आलेन्बी पॅलेस्टाइनमध्यें पुढें चाल करून गेला. ब्रिटिशांनीं जेरूसलेम घेतल्यानंतर दोन्हीं सैन्यें जेरिकोपासून समुद्रकिनाऱ्या-

पर्यंत समोरासमोर तळ देऊन बसलीं होतीं. किनाऱ्याजवळ तुर्कांच्या सैन्याची फळी आलेन्बीच्या पायदळानें फोडिली त्या फटींतून घोडेस्वार ४० मैल दौडत गेले व त्यांनीं दोन तुर्की सैन्यांचा परत फिरण्याचा मार्ग बंद केला; दुसरीं दोन सैन्यें आणखी एका रस्त्यावरून मागें जाण्याचा प्रयत्न करीत होतीं त्यावर विमानांनीं बांब टाकून मोठा कहर उडवून दिला पूर्वेकडे पळालेल्या तुर्कांचा ब्रिटिशांचे दोस्त बनलेल्या अरबांनीं फडशा केला. सेप्टेंबर सपण्याच्या आंत दमास्कस पडलें व पुढील महिन्यांत आलेन्बी अलेप्पो व मेसोपोटेमिआकडे जाणाऱ्या रेल्वेचें जंक्शन येथपर्यंत पोंचला. ऑक्टोबर अखेरीस तुर्कस्तानानें युद्धतहकुबी मागितली. लौकरच आस्ट्रिआहि युद्धांतून बाहेर पडला. आक्टोबरमध्यें फ्रेंच व ब्रिटिश यांच्या साह्याच्यानें इटॅलिअनांनीं चढाई केली तेव्हां ऑस्ट्रिआचें सैन्य रानोमाळ पळत सुटलें. ऑस्ट्रिआ हंगेरीच्या निरनिराळ्या भागांतून राज्यक्रांत्या झाल्या व ऑस्ट्रिआची इतिश्री झाली.

याप्रमाणें जर्मनीचे सर्व आधार एकामागून एक ढांसळले दरम्यान् पश्चिम आघाडीवरील धमश्चक्री सुरूंच होती. उत्तरेला जर्मनांना बेल्जम किनारा सोडून द्यावा लागला; खालीं दक्षिणेला त्यांनीं लील सोडून दिलें. वीस मैलांच्या आघाडीवर आणखी एक लढाई करून ब्रिटिशांनीं क्रांब्रे घेतलें. अमेरिकनांनीं आर्गान अरण्य कावीज केलें तर फ्रेंचांनीं त्याच्या उत्तरेला प्रगति केली. जर्मनांची स्थिति दुर्धर झाली. लूडेन्डार्फनें राजीनामा दिला व जर्मनांनीं युद्ध-

तहकुबी मागितली. जबरदस्त अटी घालून दोस्तांनीं ती दिली. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं सकाळीं ११ वाजतां युद्ध बंद झालें. दोस्तांचा पुरा विजय झाला. दोनच दिवस अगोदर जर्मनींत राज्यक्रांति होऊन कायसर व युवराज हॉलंडमध्यें पळून गेले. मुख्य कायसरच पळून गेल्यावर जर्मनींतील इतर संस्थानिकांचीहि तीच स्थिति झाली.

या पूर्वीच्या युद्धांत जर्मनांचा समुद्राशीं जवळजवळ मुळींच संबंध नव्हता असें म्हटलें तरी चालेल. पण या युद्धाचे वेळीं जर्मनीचें आरमार ब्रिटिश आरमाराच्या खालोखाल होतें. यामुळें समुद्राबरील युद्धाचें थोडेसें वर्णन देणें जरूर आहे. समुद्रावर अननुभवी होते तरी जर्मनांनीं शौर्याची व कौशल्याची शर्थ करून ब्रिटिशांशीं बरोबरीनें दोन हात केले. लढाईच्या आरंभीं गोबेन व ब्रेस्ला हीं दोन जहाजें ब्रिटिश जहाजाच्या हातावर तुरी देऊन डार्डानेल्स सामुद्रधुनींतून कॉन्स्टॉन्टिनोपलला गेलीं. दहा जहाजें पासिफिक व इतर महासागरांत वावरत होतीं. त्यांपैकीं फॉन स्पीच्या काफिल्यानें चिलीच्या किनाऱ्यावर ब्रिटिशांचीं दोन जहाजें मोठ्या खुबीनें बुडविलीं. मोठ्या जहाजांच्या जोरावर ब्रिटिश ॲडमिरल क्रॅडॉकनें पाठलाग चालविला, तेव्हां संध्याकाळीं सूर्यास्ताची वेळ होती. याचा फायदा स्पीनें पुरता घेतला. त्यानें आपलीं जहाजें किनाऱ्यालगत चालविलीं तेव्हां क्रॅडॉकला वाटलें कीं, जमन जहाजांना आतां आपल्याला मागें रेटतां येईल व मग तीं रेतींत रुतून बसतील. पण

स्पीनें जहाजें किनाऱ्याजवळून चालविलीं होतीं तीं अशासाठीं कीं, किनाऱ्याच्या काळोखांत आपलीं जहाजें ब्रिटिशांना दिसूं नयेत उलट अस्तमान सूर्याच्या प्रकाशांत ब्रिटिशांचीं जहाजें मात्र आपल्याला स्पष्ट दिसावीं. यामुळें ब्रिटिशांच्या तोफांचे गोळे भलतीकडे तर जर्मन तोफांचे गोळे नेमके ब्रिटिश जहाजांवर पडूं लागले अशा रीतीनें ब्रिटिशांच्या दोन जहाजांना वरील सर्व खलाशांसह जलसमाधि मिळाली पण पुढें लौकरच ब्रिटिशांनीं ॲडमिरल स्टर्डीच्या हाताखालीं फारच मोठ्या जहाजांचा काफिला पाठवून फॉन स्पीचीं जहाजें दक्षिण अमेरिकेंत फॉकलंड बेटांजवळ बुडवून टाकलीं. जर्मन खलाशी शरण न जातां त्या बुडत्या जहाजांच्या तक्तपोशीवर रांगेनें उभे राहिले व आपलें राष्ट्रीय गीत गात रसातळाला गेले. इतर क्रूझरांपैकीं फॉन म्यूलरचें एम्डेन जहाज सर्वांत जास्त प्रसिद्धीस आलें. नानाप्रकारच्या युक्त्या लढवून दोन महिन्यांत त्यानें एकंदर बावीस जहाजें मटकाविलीं; त्यांपैकीं कांहीं फारच म्यूल्यवान् होतीं. एम्डेनचा सर्वांत मोठा पराक्रम म्हणजे ब्रिटिश क्रूझरासारखें दिसण्यासाठीं एक जास्त खोटा बंब लावून पेनंगजवळ जाणें व तेथें एक रशिअन क्रूझर व एक फ्रेंच विनाशिका यांचा नाश करणें हा होय. शेवटीं दोस्तांच्या दहा क्रूझरांनीं एम्डेनचा पाठलाग केला तेव्हां कोठें तें कोकास बेटाजवळ सांपडलें व त्याचा ऑस्ट्रेलिअन क्रूझर सिडनी यानें नाश केला.

जर्मन आरमार ब्रिटिश आरमाराच्या मानानें फार कमी असल्यामुळें जर्मन आरमारानें बाहेर येऊन छातीठोकपणानें ब्रिटिश

आरमाराशीं लढणें शक्य नव्हतें. पाण सुरुंग पसरून ब्रिटिश जाहजें बुडतील असें करावयाचें किंवा पाणबुड्यांनीं टार्पेडो मारून तीं बुडवावयाचीं एवढेंच काम जर्मनांनीं साधारणतः चालविलें होतें. एक दोन वेळां रूपाड्यानें चालणारीं क्रूझरें पाठवून कांहीं ब्रिटिश बंदरांवर तोफांचा भडिमार जर्मनांनीं केला. मुख्य आरमारांची लढाई अशी एकच—यूटलंडची—झाली (३१ मे १८१६) जर्मन आरमार बाहेर पडून त्यानें ॲडमिरल बॅटीच्या दहा जहाजांवर हल्ला केला व त्यांपैकीं दोन बुडविलीं. पण मुख्य ब्रिटिश आरमार येण्याबरोबर धुराचे लोट सोडून आपलीं जहाजें दिसतनाशीं करून जर्मन आपल्या बंदरांत परत गेले.

पण याप्रमाणें समुद्रावर जर्मनांचें कांहीं चाललें नाहीं तरी पाण्याखालीं त्यांना जास्त यश आलें. १९१५ च्या आरंभापासून त्यांनीं व्यापारी जहाजें बुडविण्यासाठीं पाणबुड्यांचा उपयोग सुरू केला आंतराष्ट्रीय कायदे धाब्यावर बसवून दोस्तांचीं व्यापारी मालाचीं व उतारूंचीं जहाजें इशारत न देतां बुडविण्यास त्यांनीं आरंभ केला. लुसिटानिआ हें उतारूंचें भव्य जहाज १९१५ मेमध्यें त्यांनीं बुडविलें, तेव्हां १२०० उतारू (यांपैकीं १२० अमेरिकेचे नागरिक होते) पाण्यांत बुडून मेले व जर्मनांच्या निर्दयपणाची सर्वांना चीड आली. अमेरिकेनें याबद्दल त्यांची खरड काढिली तेव्हां अमेरिकेचें म्हणणें जर्मनांनीं कबूल केल्यासारखें केलें; पण १९१७ च्या आरंभीं युरपच्या समुद्रांत सांपडतील तीं सर्व जहाजें कोणत्याहि

राष्ट्राचीं असलीं तरी आम्हीं बुडविणार असें जर्मनांनीं जाहीर केलें. जर्मन आरमारी अंमलदारांची अशी कल्पना होती कीं, सहा महिन्यांच्या आंत इंग्लंडची उपासमार करून त्याला आपण शरण आणूं. प्रथम त्यांना कल्पनातीत यश आलें. इंग्लंडच्या किनाऱ्यापासून जाणाऱ्या जहाजांपैकीं एकचतुर्थांश जहाजें समुद्रास्तृप्यन्तु होऊं लागलीं. एप्रिल महिन्यांत तर नऊ लक्ष टनांचीं जहाजें बुडालीं. इतकीं नवीं जहाजें कशीं बांधावयाचीं, हा मोठा बिकट प्रश्न दोस्तांच्या पुढें उभा राहिला.

याच महिन्यांत दोस्तांना अत्यंत हितावह अशी गोष्ट घडून आली. अंतर्राष्ट्रीय कायदे मोडून केलेल्या अत्याचारांनीं चिडून जाऊन अमेरिकेनें जर्मनांशीं युद्ध करण्याचें ठरविलें. आपल्या सर्व विनाशिका व लढाऊ जहाजें अमेरिकेनें दोस्तांच्या मदतीला पाठवून दिलीं अमेरिकेंतील व इंग्लंडांतील शोधकांनीं कांहीं वेळपर्यंत आपलें सर्व लक्ष पाणबुड्यांचा कांटा कसा काढितां येईल याकडे लाविलें. लौकरच त्यांना यशहि आलें.

१९१७ च्या अखेरीस पाणबुड्यांचा नक्षा उतरला व १९१८ मार्चमध्यें त्यांनीं बुडणाऱ्या जहाजांची संख्या इतकी कमी झाली कीं दोस्तांना तेवढीं नवीं जहाजें सहज बांधतां येऊं लागलीं. दोस्तांच्या पाणबुड्यांनीं पुष्कळ जर्मन पाणबुड्या समुद्रतळाला पाठविल्या. साधीं व्यापारी जहाजें दिसतील अशीं जहाजें दोस्तांनीं बांधिलीं; टार्पेडो मारून जहाजावरील कागदपत्र हस्तगत करण्यासाठीं

पाणबुडी वर आली कीं तिच्यावर तोफांचा भडिमार करून तिचा निकाल लावावयाचा, असें दोस्तांनीं चालविलें. १९१७ आगस्ट-पासून पुष्कळ व्यापारी जहाजांचा एक गट करून तीं विनाशिका-बरोबर देऊन पाठविण्याची पद्धति दोस्तांनीं सुरू केली विनाशिका-पुढें पाणबुड्या लुप्त्या पडल्या. विनाशिका फार जलद चालणाऱ्या असून त्यांचा फार थोडा भाग पाण्यांत असतो त्यामुळें त्यांच्यावर टार्पेडो नेमके मारतां येईनात, पण विनाशिकांना मात्र धडक देऊन किंवा टार्पेडो सोडून पाणबुड्या सहज बुडवितां येत. गट मोडून जहाजें फांकल्यावर तीं बंदरांत बुडविण्याचाहि जर्मनांनीं प्रयत्न करून पाहिला. पण तीस मैलांवरून पाणबुड्यांच्या खळबळीचा आवाज ऐकूं यावा अशी व्यवस्था केलेल्या किनाऱ्याजवळच्या लहान लहान मोटार बोटींनीं त्यांचा नाश करण्यास सुरुवात केली. कित्येक वेळां विमानांतून जाऊन पाणबुडी दिसली कीं तिच्यावर हवेंतून बांब फेंकावयाचे, असा उपक्रम दोस्तांनीं सुरूं केला तसेंच झीब्रज व ऑस्टेंड वगैरे बंदरांतून पाणबुड्या बाहेर पडण्याचें काम दोस्तांनीं जास्त मुष्किलीचें केलें. बंदराबर हद्दे केले व पन्नास यार्ड लांबीच्या बारीक तारा लाविलेले पाणसुरुंग बंदराबाहेर पसरून ठेविले. या तारांचा स्पर्श पाणबुड्यांना झाल्याबरोबर विजेच्या धक्क्यानें सुरुंग उडे व पाणबुडीचा निकाल होई. पाणसुरुंगांचें क्षेत्र सपाटून वाढवि-ण्यांत आलें इंग्लिश चॅनेलमध्यें शिरणें कठीण झालें, नॉरवेपासून शेटलंड बेटापर्यंत अमेरिकनांनीं सुरुंग पसरून ठेविले व भूमध्य-समुद्रांत ओट्रँटो सामुद्रधुनींतहि हीच व्यवस्था करण्यांत आली.

१९१७ च्या आरंभीं जें प्राणबुड्यांचें सकट कल्पनेबाहेर भयंकर वाटत होतें तेंच १९१८ च्या सेप्टेंबरांत लढाई संपण्याच्या सुमारास क्षुल्लक होऊन गेलें.

व्हर्साच्या तहानें (जून १९१९) जर्मनीची व्यवस्था लागली. तहाच्या अटी खरोखर विल्सन, क्लमांसो व लॉइड जार्ज या तिघांनींच ठरविल्या. अठराव्या शतकांत पोलंडचा जो भाग प्रशिआच्या होहेंझोलर्न घराण्यांतिल राजांनीं बळकाविला होता तो जर्मनांना परत द्यावा लागला. त्याचप्रमाणें १८७१ त बळकाविलेला आल्सास लोरेन जर्मनीकडून फ्रान्सला देण्यांत आला, व १८६४ त डेन्मार्कपासून बळकाविलेला स्लेस्विग डेन्मार्कला परत देण्यांत आला. आफ्रिकेतील जर्मन वसाहती फ्रान्स, बेल्जम, पोर्टुगाल व इंग्लंड यांनीं वांटून घेतल्या चीनमधील कियोचो बंदर जपाननें घेतलें पासिफिक महासागरांतील बेटें जपान, आस्ट्रेलिआ व न्यूझीलंड यांनीं वाटून घेतलीं फ्रेंच खाणी दुष्टपणानें उध्वस्त करून टाकिल्याबद्दल भरपाई म्हणून जर्मनीच्या सारदरांतील कोळशांच्या खाणी पंधरा वर्षेपर्यंत फ्रेंचांनीं आपल्या ताब्यांत ठेवाव्या असें ठरविण्यांत आलें. जामिनवर, समुद्रांत व हवेंत दोस्तराष्ट्रांचें जें भयंकर नुकसान जर्मनांनीं केलें होतें त्याबद्दल कांहीं भरपाई म्हणून जर्मनीकडून मोठी खंडणी घ्यावयाची असें एक कलम तहांत होतें. ही खंडणी देईपर्यंत व्हाइन नदीचा पश्चिम किनारा दोस्तांच्या कबजांत राहावयाचा आहे. आणखी एक पिढी होऊन जाईपर्यंत तरी युद्ध करण्याचें त्राण जर्मनींत राहूं नये अशा रीतीनें त्याची लष्करी व्यवस्था कमी करण्यांत आली.

क ३७३

जर्मनीचा पराभव कां झाला ? विद्येंत, उद्योगधंद्यांत पहिलें पद मिळविलेल्या या थोर राष्ट्राला अशी हलाखीची स्थिति कां आली ? जर्मन लोक सर्व युद्धांत इतक्या चिकाटीनें लढले कीं, पुष्कळ वेळां कायमचा जय मिळाल्यासारखें झालें, त्यांच्या शौर्याबद्दल व लढवय्येपणाबद्दल प्रश्न नाहीं सर्व जगाला त्यांनीं या बाबतींत थक्क करून टाकिलें. या साडेसहा कोटि लोकसंख्येच्या एकाकी राष्ट्रानें ऑस्ट्रिआ व तुर्कस्तान अशा दुय्यम राष्ट्रांच्या बेताबाताच्या साहाय्यानें ब्रिटश साम्राज्य, फ्रान्स, रशिआ इटली व अमेरिका या प्रचंड राष्ट्रांच्या संघाशीं चार वर्षेपर्यंत टक्कर दिली व त्यांना शेवटीं जय मिळाला तोहि केवळ जर्मनी दमल्यामुळें. आम्हांला जर्मनीच्या अपजयाचें एकच कारण दिसतें व तें म्हणजे सदसताची मुळींच क्षिति न बाळगणें हें होय. लढाईंत पराभव हें राष्ट्रीय पापांचें प्रायश्चित्त होय. कांगो फ्रिस्टेटमध्यें आफ्रिकन लोकांचा अमानुष छळ बेल्जनांनीं केला तर बेल्जन होते कां नव्हते अशी त्याची स्थिति झाली. निरपराध बायकामुलांना समुद्राला बळी देऊन अमेरिकेला जर्मनांनीं आपल्या विरुद्ध युद्धांत ओढलें. त्याच वेळीं त्यांची घटका भरली. १८६० मध्यें अमेरिकेंत गुलामगिरी पाहिजे म्हणणाऱ्या दक्षिणेच्या व ती नको म्हणणाऱ्या उत्तरेच्या संस्थानांमध्यें यादवी युद्ध झालें, तेव्हां धर्मात्मा अॅब्राहाम लिंकन म्हणाला, " गुलामांच्या पाठीवर ओढलेल्या चाबकांनीं काढलेल्या रक्ताच्या थेंबागणिक आपल्या पाठातून रक्तबिंदु पडेपर्यंत व गुलामांच्या श्रमानें रचिलेली संपत्तीची

रास नाहींशी होईपर्यंत हें युद्ध थांबावयाचें नाहीं असें देवानें ठरविलें असल्यास त्याच्या कृतीला आपल्याला नांवें ठेवितां येतील काय ?" उन्मत्त युरपच्या पाठीवर भवितव्यतेचा महायुद्धरूपी कोरडा अवश्य हवा होता. जर्मनीच्या मानानें इंग्रजांची काय किंवा फ्रेंचांची काय, इतर खंडांशीं वर्तणूक जास्त चांगलेपणाची आहे हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. जर्मन लोकांत जो सत्ताधारी वर्ग होता त्यानें क्रौर्याचे देव्हारे माजविले होते व त्याचें नियंत्रण करण्याचें सामर्थ्य जर्मन जनतेंत नव्हतें. इंग्रजांतहि डायर निघत नाहींत असें नाहीं. तथापि त्यांना कामावरून दूर करून त्यांच्या पराक्रमांचें अनुकरण करण्याची बुद्धि इतर अधिकाऱ्यांना होऊं नये एवढी खबरदारी घेण्याचें सामर्थ्य ब्रिटिश जनतेंत आहे. जर्मनीचा जय झाला असता तर ही राक्षसी वृत्ति बोकाळली असती. पराभवाची आंच लागली तेव्हां जर्मनांनीं आपल्या सत्ताधाऱ्यांना वाटेस लाविलें व आतां त्यांची खरी उन्नति होण्यास आरंभ होईल.

समाप्त.

श्री सयाजीग्रंथमालेंतून प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांची यादी.

(१) श्रीसयाजीसाहित्यमाला.

ग्रंथानुक्रम.	ग्रंथाचें नांव	किंमत.

१ **संस्कृत वाङ्मयाचा इतिहास**–(इतिहासगुच्छ)– लेखक रा. रा. सीताराम वासुदेव पेंडसे बी. ए. एम् सी. पी., एफ्. आर. सी. आय; Macdonnel's History of Sanskrit Literature ह्या पुस्तकाचें भाषांतर. वेदकाल, वेदांतील कविता, तत्त्वविचार, सामाजिक स्थिति, ब्राह्म ग्रंथ, सूत्र, पुराण, काव्य, नाटक, तत्त्वज्ञान, वगैरे विषयांचा इतिहास या पुस्तकांतून देण्यांत आला आहे. २–८–०

१० **बालोद्यानपद्धतीचें गृहशिक्षण**–(शिक्षणगुच्छ) सचित्र. लेखक रा. रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. Kindergarten Teaching at Home ह्या ग्रंथाचा अनुवाद पाठ कसा द्यावा याचा विचार, शिक्षणाचें साधन या दृष्टीनें खेळाचा विचार, वाचन व लेखन शिकविणें, प्राथमिक गणित, हातकाम, शाळेंतल्या इतर विषयांतले प्राथमिक पाठ, एक आठवड्यापुरत्या अभ्यासाचें पत्रक, इतके विषय ह्या ग्रंथांत दिले आहेत; आणि यावरून घरीं लहान मुलांना शिकवतां यतें. ०–८–०

१५ **सुधारणा आणि प्रगति**–(प्रकीर्णगुच्छ)–द्वितीयावृत्ती लेखक रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए. एल्एल्. बी. Crosier's Civilization and Progress ह्या ग्रंथाचा अनुवाद.

ग्रंथानुक्रम.	ग्रंथांचें नांव.	किंमत

प्रमाणचिकित्सा, साध्यमीमांसा, विषयविवेचन आणि उपसंहार ह्या चार परिच्छेदांतून इतिहास, सुधारणेचा मार्ग, परिस्थितीचें समीकरण, समाजरचना, जनताधर्म, धर्मसाधन, राजकीय अनुशासन वगैरे विषयांचें उत्कृष्ट विवेचन केलेलें आहे. ग्रंथ फार उपयोगी व लोकप्रिय झाला आहे व त्याचें गुजराथी व हिंदी या भाषांतून भाषांतर झालें आहे. ३-०-०

२१ **शिस्त-(प्रकीर्णगुच्छ)**-लेखक कर्नल नानासाहेब शिंदे व मेजर के. एन्. सावंत, स्वतंत्र मराठी पुस्तक. लष्करी दृष्टीनें गृहशिक्षण, शाळाशिक्षण, खेळ, व्यवहार वगैरेंतून शिस्तीची उपयुक्तता, नीतिविषयक व धार्मिक शिस्तीचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार, हे विषय ह्या ग्रंथांत दिले गेले आहेत. १-०-०

२२ **दीघनिकाय भाग १ ला-(धर्मगुच्छ)**-लेखक रा रा. चिंतामण वैजनाथ राजवाडे एम्. ए, बी. एससी. पाली भाषेंतील ग्रंथाचें भाषांतर. बौद्धपंथाचा मूळ ग्रंथ 'त्रिपिटक' याचे तीन भाग आहेत. त्यापैकीं 'सुत्तापिटका'तून बुद्ध भगवानानें वेळोवेळीं केलेल्या उपदेशांचा संग्रह केला आहे. त्याचे पांच भाग आहेत; त्यापैकीं ' दीघनिकाय ' हा एक भाग आहे. त्यांत मोठ्या सूत्रांचा संग्रह केला आहे त्याचें हें भाषांतर आहे. १-८-०

२९ **हिंदुस्तानचा लष्करी इतिहास व दोस्त राष्ट्रांच्या फौजा-(प्रकीर्णगुच्छ)**-लेखक कर्नल नानासाहेब शिंदे. स्वतंत्र मराठी पुस्तक. ह्या ग्रंथांतून वेदकालापासून आधुनिक काळापर्यंतचा लष्करी इतिहास दिला आहे; इतकेंच नव्हे तर देशी संस्थानें, इंग्रज सरकार, ग्रेटब्रिटन, फ्रेंच, रशियन, इटालियन, अमेरिकन व जर्मन या राष्ट्रांच्या फौजा ह्या संबंधानेंहि हकीकत दिलेली आहे. २-८-०

ग्रंथानुक्रम.	ग्रंथाचें नांव	किंमत

४१ महाराजा शिवाजी-(चरित्रगुच्छ)-लेखक रा. रा. सीताराम वासुदेव पेंडसे बी. ए., एफ्. आर. सी. आय्., एम. सी पी. स्वतंत्र मराठी पुस्तक. यांत महाराष्ट्रवीर शिवाजी महाराजांचें चरित्र दिलें आहे. १-६-०

६५ हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास मराठी रियासत (मध्य-विभाग) इतिहासगुच्छ. द्वितीयावृत्ति. लेखक रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. स्वतंत्र मराठी पुस्तक. अनेक आधारांचें दोहन करून छत्रपति शाहू महाराजांचा इतिहास व बाळाजी विश्वनाथाच्या उदयापासून बाजीरावानें दिल्लीवर स्वारी केली तेथपावेतों जो इतिहास घडला त्याची हकीकत व बाजीरावाचीं योजना आणि त्याचें जीवनचरित्र यांत दिलें आहे २-१२-०

६६ हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास (मध्यविभाग भाग)-१७४०-१७६१-इतिहासगुच्छ. लेखक रा. रा. गोविंद स. सरदेसाई बी. ए. स्वतंत्र. नवीन पेशव्याच्या उपक्रमापासून इंग्रज लोकांची हकीकत देऊन नागपुरकर भोंसल्यापर्यंतची सगळी उपयुक्त हकीकत या ग्रंथांत दिली आहे. ३-०-०

६८ सदर-मध्यविभाग १७४०-१७६१ पानिपत प्रकरण. इतिहासगुच्छ-लेखक रा. रा. गो. स. सरदेसाई बी. ए. स्वतंत्र मराठी ग्रंथ. यांत रघुनाथरावाच्या पहिल्या स्वारीपासून पानिपतच्या भयंकर रणसंग्रामापर्यंतची माहिती देण्यांत आली आहे. २-४-०

७३ जबाबदार राज्यपद्धति-(प्रकीर्णगुच्छ)-लेखक स्व. महादेव रामचंद्र भिडे एम्. ए. स्वतंत्र ग्रंथ. लोक आणि लोकमत

ग्रंथानुक्रम.	ग्रंथाचें नांव.	किंमत.

प्रतिनिधी आणि प्रतिनिधींची सभा, कायदे घडणारी मंडळी, हुकुमांची अम्मलबजावणी, राज्यबंधारण, वगैरे विषयांच्या संबंधानें उपयुक्त माहिती दिली आहे. ०–१३–६

१४ मिरांबाई–(चरित्रगुच्छ)–लेखक रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए., एलएल्. बी. गुर्जर कवयित्री मिरांबाईच्या संबंधानें या ग्रंथांत संपूर्ण माहिती दिली आहे. ०–१५–०

१९ इंग्रजी शिष्टाचार–(प्रकीर्णगुच्छ)–लेखक रा. रा. चिंतामण विनायक जोशी, एम्. ए. Webb's English Etiquette या ग्रंथाचें भाषांतर. यांत शिष्टचाराचें सामान्य नियम, भेट घेणें, व्हिझिटिंग कार्डे, उपवन संमेलन, भोजन-प्रारंभ, वाटेंत भेटण्याच्या प्रसंगाचे शिष्टाचार, दरबार, विवाहप्रारंभ, प्रवास, सार्वजनिक ठिकाणें, गृहशोभा, सेवकांचा शिष्टचार, त्यांचें काम, इतक्या विषयांचें विवेचन केलें आहे. ०–१४–०

८४ पार्लमेन्ट–(इतिहासगुच्छ)–लेखक रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए., एलएल्. बी. 'Parliament' by Sir Courtney P. Ilbert या ग्रंथाचा अनुवाद. पार्लमेंटचा उत्पत्ति आणि वाढ, कॉमन्स सभेची घटना, कायदे करण्याची पद्धति, जमाबंदी व राज्यकारभार, सभेचें अधिवेशन व कार्यपद्धति, सभेची कार्यव्यवस्था, सभासद व मतदारसंघ, सभेचें दफ्तर, छापखाना व लौकिकसंघ, हाऊस ऑफ लॉर्डस् व तुलनात्मक विवेचन, इतक्या प्रकरणांत मुख्य विषयांचें सुंदर विवेचन केलें आहे. १–८–०

८४–८५ सनईवादन पाठशाळा–पुस्तक तिसरें. (विज्ञानगुच्छ). लेखक रा. रा. गणपतराव पिराजी वसईकर.

ग्रंथानुक्रम.	ग्रंथाचें नांव.	किंमत.
	स्वतंत्र पुस्तक १	०–१२–०
	,, पुस्तक २	०– ८–०
	,, पुस्तक ३	१– २–०
	सदर पुस्तक ४	१–१२–०

सनई कशी वाजवावी हे ह्या ग्रंथांतून शास्त्रीय रीतीनें दाखविलें आहे.

८६ **सगुणोपासना व मूर्तिपूजा**–स्वतंत्र. लेखक रा. रा. शिवराम महादेव फडके. मूर्तिपूजेच्या संबंधानें संपूर्ण माहिती ह्या ग्रंथांत दिली आहे. १–८–०

८७ **नागरिकांचीं कर्तव्यें**–(प्रकीर्णगुच्छ)–लेखक रा. रा. कृष्णाजी गंगाधर गोगटे, बी. ए. यांत कुटुंब, शाळा, समाज, राज्य, ब्रिटिश राज्य, बडोदें राज्यांतील स्थानिक स्वराज्य, ग्रामपंचायत, वगैरे विषयांच्या संबंधीं नागरिकांचीं कर्तव्यें दाखविलीं आहेत. ०–१४–०

८८ **सजीव सृष्टीची उत्क्रांति**–(विज्ञानगुच्छ)–प्रचित्र लेखक रा. रा. सदाशिव नारायणराव दाते एम्.ए., बी. एस्.सी. स्वतंत्र. ह्या ग्रंथांत उत्क्रांतीबद्दलचें ऐतिहासिक विवेचन, नैसर्गिक संमति, निषदसंबंधी संमति, मानवजातीची उत्क्रांति, मनुष्याकारखे वानर, मनुष्य वानरांपासून उत्पन्न झाला आहे कीं काय, पशूंचें मन व त्यांची बुद्धी, मनुष्यांची मानसिक उत्क्रांति, इत्यादि विषयांची चर्चा केली आहे. २–११–०

९० **मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया**–(इतिहासगुच्छ)–लेखक कर्नल नानासाहेब शिंदे स्वतंत्र. ह्या ग्रंथांत मराठ्यांच्या मुख्य मुख्य लढायांचें सविस्तर वर्णन केलें आहे. ३–०–०

९१ **यांमिकप्रदीप, सचित्र, प्रथम भाग (विज्ञानगुच्छ)**–लेखक रा. रा. सखाराम विनायक आपटे एम्. ए., बी. एस्. सी. स्वतंत्र, ह्या ग्रंथांत यंत्रशास्त्राच्या विविध विषयांची सविस्तर हकीकत देण्यांत आली आहे.

ग्रंथानुक्रम.	ग्रंथाचें नांव.	किंमत.

९४ **बडोद्याचे मराठी साहित्य-(प्रकीर्णगुच्छ)**–लेखक रा. रा. गणेश रंगनाथ दंडवते, स्वतंत्र. बडोदें राज्यांत आजपावेतों प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांची सविस्तर माहिती यांत दिली आहे ०–११–०

९८ **अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें-(इतिहासगुच्छ)**– लेखक रा. रा. विनायक सदाशिव वाकसकर, स्वतंत्र. ह्यांत मराठ्यांच्या इतिहासांतील अज्ञात ऐतिहासिक व्यक्तींच्या संबंधानें आजपावेतों अप्रसिद्ध राहिलेली हकीकत देण्यांत आली आहे. १–०–०

११२ **तत्त्वज्ञानांतील कूटप्रश्न**–लेखक रा. रा. दाजी नागेश आपटे बी. ए., एल्एल्. बी. पाश्चात्य व पौरस्त्य अशा दोन्ही पद्धतींच्या तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करण्यास उत्तम ग्रंथ. यांत नित्य व्यवहारांतील दृष्टांतांचे द्वारें सर्व विषय सोप्यापासून अवघड या रीतीनें समजाविला असल्यानें विद्यार्थ्यांस तो फार सुलभ व रसाळ झाला आहे. १–०–०

११३ **सुबोधकथामाला**–लेखक रा. रा. दाजी गोविंद चिपळोणकर– या पुस्तकांत एकंदर साठ गोष्टी असून त्या नेहमीं व्यवहारांत घडणाऱ्या व पदोपदीं ज्यांचा आपणांस अनुभव येण्यासारख्या आहेत. लहान मुलांच्या मनावर यांतील नीतितत्त्वांचा चांगलाच परिणाम घडण्यासारखा आहे. शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस गणित, भूगोल, व्याकरण व इतिहास हे विषय जसे त्यांचे शिक्षक त्यांस मनापासून शिकवितात, त्याचप्रमाणें शिक्षकानें शाळेंत व आईबापांनीं घरीं, नीतिशिक्षण हें आपल्या मुलांस अवश्य दिलें पाहिजे. ०–१५–०

११४ **सुप्रजाजननशास्त्र**–लेखक रा. रा. गजानन नारायण मोडक बी. एजी. सुप्रजाजननशास्त्रावर पाश्चात्य देशांत अनेक ग्रंथ तयार झाले असून त्याच धर्तीवर मराठी भाषेंत हें पुस्तक तयार कर-

ण्यांत आलें आहे. उत्तम प्रकारची संतति कशी निर्माण करतां येईल, हें या पुस्तकांत उत्कृष्ट तऱ्हेनें दाखविलें आहे. ०–१२–०

११९ **मुक्या मुलांचें गृहशिक्षण**–लेखक रा. रा. पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर. मूकशिक्षण आपल्या देशांत नवीन आहे. यूरोप, अमेरिका वगैरे खंडांतून तें रूढ झालें आहे. त्याविषयीं एक ओळहि आपल्या देशांतील भाषांतून कोठून सांपडणार ? मराठींत हें पुस्तक पहिलेंच आहे. मुक्या व बहिऱ्या मुलांच्या पालकांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें. ०–१४–०

१२० **कादंबरीची गोष्ट**—लेखक रा. रा. गणेश रंगनाथ दंडवते, लायब्रेरियन, सेंट्रल लायब्ररी, बडोदें. स्वतंत्र. हें पुस्तक आपल्या नांवाप्रमाणें खरोखरीच मराठी कथावाङ्मयाचा इतिहास गोष्टीच्या रूपानें व मनोरंजक रीतीनें निवेदन करते. १–०–०

१२३ **हिंदुस्तानच्या इतिहासांतील गोष्टी**–लेखक रा. रा. महादेव मुकुंद जोशी. आर्य लोकांनीं पंजाबांत पंचनद्यांच्या दोआबांत आपली वस्ती केली तेथपासून इ. स. १९९ पावेतों इतिहास त्रोटक रीतीनें ह्या पुस्तकांत आलेला आहे. ०–१३–०

१२८ **चीनदेशांतील सुधारणा**––लेखक राजाराम नारायण पाटकर बी. ए. प्राचीन काळापासून चीन देशांत कायदेकानू, वाङ्मय, सुधारणा, औद्योगिक प्रगति, शिक्षण, आचारविचार वगैरे बाबतींत कसकशी सुधारणा झाली, तें या पुस्तकांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे १–४–०

वरील सर्व पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील.

भगवंत बळवंत पाळेकर

संपादक जागृति, बडोदें.

G) 363
2996

(२) श्रीसयाजीबालज्ञानमाला.

४७ **छत्रपति संभाजी महाराज**–(चरित्रगुच्छ)–लेखक रा. रा. केशव मंगेश रांगणेकर बी. ए. ह्या लहान ग्रंथात छत्रपति संभाजी महाराजांचें संपूर्ण जीवनचरित्र दिलें आहे. ०–६–०

४८ **महाराणा प्रताप** (चरित्रगुच्छ)–लेखक परशुराम काटदरे बी. ए. यांत सुप्रसिद्ध क्षत्रिय वीर महाराणा प्रताप याचें सविस्तर चरित्र देण्यांत आलें आहे. ०–६–०

६० **कोषांचें वर्णन**–(विज्ञानगुच्छ)–लेखक रा. रा. रघुनाथ बळवंत फळणीकर बी. ए. प्राणिशास्त्रासारख्या नीरस विषयासंबंधींचें हें पुस्तक फार सुबोध व सरस उतरलें आहे. आपल्या शरीरामध्यें जे Cells (कोष) ह्मणून असतात, त्यांच्यासंबंधानें संपूर्ण शास्त्रीय माहिती ह्यांतून मिळते. ०–६–०

७१ **विलियम एवर्ट ग्लॅडस्टन**–(चरित्रगुच्छ)—लेखक रा. रा. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. यांत सुप्रसिद्ध इंग्रज राजनीतिनिपुण ग्लॅडस्टन साहेब यांचें सविस्तर चरित्र देण्यांत आलें आहे. ०–६–०

७२ **संपत्ति व भांडवल**–(विज्ञानगुच्छ)–लेखक रा. रा. भास्कर त्रिंबक काळे, बी. ए. अद्यतनसारख्या शास्त्रीय विषयावर हें पुस्तक सोपें व सरस भाषेत लिहिलें आहे. ०–६–०